म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. ६०१
REFBK-0006611

नि ६०१

काळकर्ते

# शिवरामपंत परांजपे

—जीवन—

लेखक

वामन कृष्ण परांजपे
बी. ए. एलएल. बी.

प्रस्तावना

गंगाधरराव देशपांडे

६६९१
REFBK-0006611

It may fo[...] great Artist to push the present sta[...]oke in advance the plenitude of [...] only announce itself tomorrow.

—Romain Rolland.

आवृत्ति पहिली १९४५

किंमत ५ रुपये

मुद्रक
दामोदर त्र्यंबक जोशी
बी. ए. (टिळक)
चित्रशाळा प्रेस
१०२६ सदाशिव पुणें.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

प्रकाशक
प्रो. र. श्री. देशपांडे
बी. ई. ए. एम्. आय्. ई.
सारस्वत कॉलनी, पुणें १.

# प्रस्तावना

काळकर्ते देशभक्त शिवरामपंत परांजपे यांना दिवंगत होऊन सोळा



वर्षे झालीं. त्यांचें मराठी वाङ्मयांतील उच्च स्थान व त्या द्वारा महाराष्ट्रांत स्वातंत्र्याबद्दल त्यांनीं उत्पन्न केलेली तळमळ या त्यांच्या जीवनांतील दोन महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत घेतल्यावर त्यांचें चरित्र यापूर्वीच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होतें. पण त्यांचे चिरंजीव कै. कृष्णराव यांनीं प्रसिद्ध केलेलें एक छोटेंसें चरित्र, आचार्य भागवत व प्राध्यापक माटे यांनीं लिहिलेले स्फुट लेख, आणि इतरांच्या कांहीं थोड्या आठवणी यांखेरीज शिवरामपंतांच्या जीवनासंबंधानें विशेष माहिती मिळत नाहीं. त्यांच्या 'काळ'पत्रांतील निवडक लेखांचीं पुस्तकें सरकारच्या रोषाला बळी पडल्यामुळें त्यांच्या वाङ्मयांतून त्यांच्या जीवनावर प्रकाश पाडणारीं साधनेंही दुर्मिळ झालीं आहेत. अशा स्थितींत त्यांचें साग्र चरित्र लिहिण्याचें कार्य किती कठीण झालें आहे, हें सहज समजण्यासारखें आहे. तथापि अशा प्रतिकूल परिस्थितींतही या पुस्तकाचे कर्ते त्यांचे नातू श्री. वामनराव यांनीं परिश्रम करून आपल्या आजोबांच्या संबंधानें बारीकसारीक माहिती मिळवून महाराष्ट्राला त्यांचा परिचय करून देण्याचें कार्य हातीं घेतलें व तें यशस्वी रीतीनें शेवटाला नेलें, याबद्दल ते अभिनंदनाला

पात्र आहेत. आमच्या संस्कृतीला अनुसरून त्यांनीं आपल्या पूज्य पितामहांचें ऋण फेडलें असें म्हणतां येईल.

शिवरामपंतांच्या सारख्या स्वातंत्र्याकरितां तळमळणाऱ्या व ती तळमळ आपल्या वाङ्मयांत उत्कटत्वानें उतरवणाऱ्या गृहस्थांच्या जीवन-चरित्रावर प्रस्तावना लिहिण्याचें काम एखाद्या समानधर्मी साहित्यिकानें केलें असतें तर तें योग्य झालें असतें. तथापि मींच ही प्रस्तावना लिहावी असा ग्रंथकर्त्याचा विशेष आग्रह पडल्यामुळें मी हा प्रयत्न करीत आहें.

डेक्कन कॉलेजमधील माझ्या विद्यार्थिदशेपासून शिवरामपंतांचा मी एक चाहता होतों. मीं राजकारणांत प्रवेश केल्यानंतर त्यांचा माझा संबंध वाढत गेला व त्यांच्या अंतकालापर्यंत तो कायम राहिला. त्यांच्या लेखांच्या प्रेरणेमुळें माझ्या स्वाभाविक भावनांना चालना मिळाली. त्यांच्या बरोबर कांहीं काल कार्य करण्याची संधी मला मिळाली. या अनुरोधानें शिवराम-पंतांचें जीवन मला कसें भासलें व त्याचे माझ्या स्वतःवर काय परिणाम झाले हें येथें थोडक्यांत निवेदन करतों.

डेक्कन कॉलेजमध्यें मी असतांना शिवरामपंत त्याच कॉलेजांत फेलो असून, एम्. ए. चा अभ्यास करीत होते. त्या वेळीं बहुतेक फेलो झालेले लोक आपला अभ्यास पुढें न चालवितां, फेलोशिपमुळें मिळालेल्या पैशाचा उपयोग वकिलीच्या अभ्यासाकडे करीत असत. याला कांहीं अपवाद असत. त्यांतच शिवरामपंतांची आम्ही विद्यार्थी गणना करीत असूं. शिवरामपंत हे नेहमीं अभ्यासांत गढलेले दिसत. त्यांना आमच्या वर्गावर येऊन संस्कृत नाटक शिकविण्याचे कांहीं प्रसंग आले. त्या वेळीं त्यांची शिकविण्याची शैली व शिकविण्याच्या विषयाशीं तादात्म्य पावण्याची त्यांची वृत्ति पाहून आम्हांला त्यांच्या शिकवणीचा लाभ नेहमीं मिळावा असें वाटत असे.

त्या वेळीं महाराष्ट्रांत व विशेषतः पुण्यांत आगरकरपक्ष व टिळकपक्ष असे दोन पक्ष गाजत होते. आम्हां कांहीं विद्यार्थ्यांमध्येंही हे दोन पक्ष पडले होते. आमच्यामध्यें खूपच चर्चा व वादविवाद चालत असत. इतक्या आवेशानें वादविवाद चाले कीं, पुष्कळ वेळां फेलोंच्या खोल्यांतून वादविवाद बंद करण्याकरितां आम्हांला आदेश येत असत. शिवरामपंत त्या वेळीं अगदीं एकलकोंडे असत. त्यांच्या पुढील सहवासांत मला त्यांच्यामध्यें जी

विनोदबुद्धि आढळून येत असे तिचा ते फेलो असतांना कांहींच मागमूस दिसला नाहीं. त्यांची मुद्रा नेहमीं विषण्ण असल्यासारखी दिसे. त्यांच्या पुढच्या आयुष्यांत महाराष्ट्राच्या गतवैभवाबद्दल त्यांच्या भाषणांतून व लेखांतून जो आविर्भाव दिसत असे, त्यासंबंधानें आम्हांला त्या वेळीं त्यांच्या बोलण्याचालण्यावरून कांहींच कल्पना येण्यासारखी नसे. पण पुढें त्यांचीं भाषणें ऐकते वेळीं अथवा लेख वाचते वेळीं त्यांच्या अंतःकरणांत वास करीत असलेल्या स्वातंत्र्याच्या स्फुलिंगाचें मला जसजसें दर्शन होऊं लागलें तसतसें त्यांच्या कॉलेजांतील विषण्णतेचें कोडें थोडेंफार उलगडूं लागलें.

पुढें एकदां विजापुरास उघड्या जागेवर प्रशांत अशा रात्रींच्या वेळीं त्यांचें एक भाषण मला ऐकावयास मिळालें. व्यासपीठावरून विजापूरच्या किल्ल्याच्या पडक्या भिंती, बुरूज व मोडकळीस आलेलीं बादशहांचीं निवासस्थानें दिसत होतीं. तीं सर्व पाहून विजापूरचें वैभव त्यांच्या डोळ्यांपुढें येऊन त्यांनीं त्या इमारतींना व इमारतींच्या दगडांना वगैरे उद्देशून अनेक अलंकारांनीं भरलेलें व वक्रोक्तियुक्त असें भाषण केलें. त्याचा परिणाम श्रोत्यांच्या अंतःकरणांवर उमटत असतांच, त्यांना बोलतां बोलतां शहाजी व बालशिवाजी यांचें स्मरण होऊन त्यांच्या कल्पनेची भरारी, शिवाजीच्या बाललीला वर्णन करण्यांत रंगून गेली. त्या भाषणांतील शब्द मला जसेच्या तसे उतरणें शक्य नाहीं. तथापि ज्या भावनांना त्यांनीं त्या वेळीं चेतना दिली, त्या अद्यापि माझ्या अंतःकरणांत खोल जिवन्त आहेत. विजापूरचें पूर्वीचें वैभव, शहाजींनीं विजापूरच्या आदिलशाहीच्या राजवटींत केलेले पराक्रम व विजापुरास असतांना शिवाजी महाराजांच्या कोवळ्या अंतःकरणावर निर्माण झालेले परिणाम या सर्वांच्या वर्णनानें झालेल्या कल्पनारम्य वातावरणांत शिवरामपंत स्वतःही कांहीं काळपर्यंत मुग्ध झाल्यासारखे आढळून आले. त्यावरून शिवरामपंतांच्या प्रतिभासामर्थ्याची, त्यांच्या स्वातंत्र्याच्या तळमळीची ओळख श्रोत्यांना सहज पटली. या एका प्रसंगावरून डेक्कन कॉलेजमध्यें असतांना ते कष्टी कां दिसत असत, याची कल्पना करतां येण्यासारखी आहे. डेक्कन कॉलेजजवळच होळकरांचा तळ पडत असे, असे सांगतात. होळकरपूल तेथून जवळच आहे. डेक्कन कॉलेजच्या टॉवरवरून र्वतीची टेकडी व देवळें दिसतात, टेकडीच्या खालचा पुणें शहराचा

विस्तारही दिसतो. थोड्या अंतरावर असलेल्या सिंहगडाचें दर्शन होतें. पुरंदर किल्ला असलेले डोंगर दिसतात, व त्यांतून ज्या खडकीच्या लढाई-मुळें पेशवाईचा शेवट झाला, त्या लढाईचें मैदानही डेक्कन कॉलेजच्या आस-पासच पसरून आहे. अशा ऐतिहासिक वैभवाच्या उन्नतीच्या व अवनतीच्या एकसमयावच्छेदेंकरून होणाऱ्या दृश्याचा परिणाम शिवरामपंतांच्या भावनात्मक अंतःकरणावर विशेष झाला असला पाहिजे.

डेक्कन कॉलेजमध्यें त्यावेळीं बेन या नांवाचे एक विद्वान् गृहस्थ इति-हासाचे प्राध्यापक होते. ते एके दिवशीं वर्गांत शिकवितांना 'You Marathas should not have lost the battle of Kirkee' असें बोलून गेले. ते शब्द माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसाच्या अंतः-करणाला अद्यापि बोचतात व भावनांत उमटतात. मग शिवरामपंतांच्या सारख्या, पारतंत्र्याची अत्यंत चीड असणाऱ्या गृहस्थाला तें रणक्षेत्र पाहून काय वाटलें असेल व त्याचें प्रतिबिंब त्यांच्या मुद्रेवर कसें पडलें असेल, याची कल्पना करणें कठीण नाहीं.

डेक्कन कॉलेजमध्यें असतांनाच शिवरामपंतांचें त्या कॉलेजच्या क्वार्टर्ली-मध्यें 'अहल्याजार' या नांवाचें एक काव्य प्रसिद्ध झालें होतें. तें Quarterly इंग्रजी, मराठी व कानडी भाषेंत निघत असे, व मी त्याचा पहिला व्यवस्थापक ( Manager ) होतों. डॉ. भांडारकर सेवानिवृत्त झाल्या वेळीं त्यांच्या गौरवार्थ संस्कृत भाषेंत मानपत्र देण्यांत आलें होतें, तेंही काव्यमय होतें व शिवरामपंतांनींच तें तयार केलें होतें असें मला वाटतें. यावरून संस्कृत भाषेवरील त्यांचें प्रेम व काव्यकला त्यांच्या विद्यार्थीदशेंतही त्यांच्यामध्यें दिसत होती. पुढें ते एम्. ए. झाल्यानंतर महाराष्ट्र कॉलेजांत प्रोफेसर झाले व ती जागा सोडून त्यांनीं 'काळ' वर्तमानपत्र काढलें. पण त्यांचा व माझा प्रत्यक्ष संबंध १९०६ पर्यंत फारसा आला नाहीं. असो.

मी विद्यार्थीदशेंत असल्यापासून माझी प्रवृत्ति पूर्ण स्वातंत्र्याकडेच असे. तथापि, माझ्यावर असे कांहीं संस्कार झाले होते कीं, माझा ओढा सुधारकपक्षाकडे होता. राजकीय बाबतींत पूर्ण स्वातंत्र्यवादी व सामाजिक बाबतींत सुधारणावादी अशा स्थितींत मी होतों. 'केसरी' 'काळ' या

पत्रांचें वाचन मी लक्षपूर्वक करीत असें. या पत्रांच्या वाचनाचा व देशांतील एकंदर परिस्थितीचा परिणाम माझ्यावर होऊन १९०५ सालापासून ‘ जहाल राजकारणां ’ त मी सामील झालों. याला टिळकांच्या वरील पहिला राजद्रोहाचा खटला, काळांतील लेख, व वंगभंगाची चळवळ हींच प्रमुख कारणें झालीं.

कॉलेजमध्यें शिकत असतां ‘ आगरकर–रानडे मोठे कीं टिळक मोठे ’ असा वाद असे. १९०५–१९०६ सालीं जहाल म्हणून संबोधल्या जाणाऱ्या तरुण मंडळींत ‘ टिळक मोठे कीं परांजपे मोठे ’ हा वादही डोकावत होता. शिवरामपंतांच्या लेखांनीं व भाषणांनीं पूर्णपणें भारलेली तरुण मंडळी टिळकांना मवाळ म्हणत असत. याचा अर्थ टिळकांना स्वातंत्र्य नको आहे असें या मंडळींना वाटत होतें असें नाहीं. शिवरामपंतांच्या लेखांतून व भाषणांतून स्वातंत्र्यावद्दल जेवढी स्फूर्ति तरुणांना मिळत असे व त्यांच्या भावना जितक्या उचंबळून येत असत, तितकी स्फूर्ति टिळकांकडून त्यांना मिळत नसे व त्यांच्या भावनाही तितक्या उद्दीपित होत नसत. शस्त्रावांचून स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं असें वाटून त्या दिशेनें प्रयत्न व्हावा असें शिवरामपंतांना वाटे व त्याचा ध्वनि त्यांच्या लेखांत व भाषणांत उमटे. तो काळच असा होता कीं–हल्लीं देखील तो गेला आहे असें नाहीं–असल्या मताचा प्रचार करणें ही साधीसुधी गोष्ट नव्हती. म्हणून शिवरामपंतांना आपल्या लेखांत व भाषणांत काव्याचा आश्रय करून विरोध, वक्रोक्ति व इतर अलंकार यांचा उपयोग करावा लागत असे. त्यामुळें त्यांचीं भाषणें किंवा लेख सुशिक्षित लोकांच्याच मनांत भरत व त्यांच्यामध्येंच स्वातंत्र्याची तळमळ उत्पन्न करीत. तथापि, असे लोक स्वातंत्र्याच्या ध्येयाकडे जरी ओढले जात व आशावादी बनत, तरी त्या ध्येयाच्या सिद्धीकरतां प्रत्यक्ष कार्यक्रमाचा व साधनांचा अभाव असल्यामुळें, त्या उचंबळलेल्या भावना पुष्कळ वेळां जिरून जात.

याच सुमारास जपानसारख्या आशियांतील लहानशा राष्ट्रानें रशियासारख्या मोठ्या युरोपियन राष्ट्रावर विजय मिळवल्यामुळें हिंदुस्थानांतील राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांना उन्माद चढल्याप्रमाणें झालें होतें. त्यानंतर लगेच वंगभंगाची चळवळ सुरू झाली. कांहीं दिवस ती वंगालपुरतीच मर्यादित होती. परंतु महाराष्ट्रांत टिळक–परांजपे यांनीं ती उचलून धरली, त्यामुळें बहुजनसमाजांत तिचा प्रवेश झाला, त्यामुळें सर्व राष्ट्र खडबडून जागें झालें. जिकडे

तिकडे सभा, भाषणें, मिरवणुकी यांची प्रचंड लाट उसळली. त्यांतच सशस्त्र क्रांतिकारक संस्था बंगाल्यांत स्थापल्या गेल्या; व महाराष्ट्रांतसुद्धां लहान-सहान प्रमाणांवर त्यांचा प्रभाव दिसूं लागला. १९०५ पासून त्यांच्यावरील पहिल्या खटल्यापर्यंतचा काल शिवरामपंतांच्या जीवनांतील महत्त्वाचा काल असें म्हणतां येईल. वस्तुस्थिति पाहिली तरी सर्व देशाला तो काळ महत्त्वाचा असा होता. १८५७ नंतर कांहीं वैयक्तिक प्रयत्न सोडले तर एवढ्या मोठ्या प्रमाणावर अशा तीव्र स्वरूपाची, राष्ट्रव्यापी चळवळ यापूर्वी झाली नव्हती. १८८५सालीं राष्ट्रीय सभा स्थापन झाली होती व तिच्यामार्फत आमचीं गाऱ्हाणीं येथील व इंग्लंडांतील ब्रिटिश सरकारच्या कानावर घालण्याचे प्रयत्न चालले होते हें खरें; तथापि त्या संस्थेंत चैतन्य आलें नव्हतें. परकीयांच्या प्रेरणेनेंच ती संस्था अस्तित्वांत आली होती. त्यांच्या धोरणानेंच प्रायः तिचें कामकाज चालत असे. अशा परावलंबी संस्थेपासून शिवरामपंतांसारख्या तेजस्वी व निर्भेळ स्वातंत्र्याची आवड असणाऱ्या माणसाला स्फूर्ति ती काय मिळणार! पण 'काळ' पत्र काढल्यापासून वंगभंगाच्या चळवळीपर्यंत त्यांनीं महाराष्ट्रांतील जनतेला स्वातंत्र्योन्मुख करण्याचे जे प्रयत्न केले होते, त्यांचें दृश्य फल मिळण्याचा योग आला असें वाटून त्यांचा उत्साह वाढला असल्यास आश्चर्य नाहीं. याच वेळीं महाराष्ट्रांतील पुष्कळ होतकरू तरुणांचे ते लाडके पुढारी झाले होते.

स्वातंत्र्याबद्दल आवड उत्पन्न करण्याचें काम करीत असतांच लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेऊन त्यांची प्रतिकारशक्ति हळूहळू वाढवावी अशी टिळकांची कार्यपद्धति होती. परांजपे लोकांच्या गाऱ्हाण्यांसंबंधानें सरकारवर कडक टीका करीत नसत असें नाहीं. पुष्कळ वेळां 'काळां'तील टीका सरकारला जास्ती झोंबत असे. पण जनतेच्या सर्व दुःखांचें मूळ पारतंत्र्यांत आहे व त्यावर स्वातंत्र्य हाच रामबाण उपाय आहे असें प्रतिपादन करण्यांत ते जास्ती लक्ष देत. असा या दोघांच्या कार्यपद्धतींत थोडासा भेद होता.

नाशिक येथें सावरकर-बंधूंच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेली "अभिनव भारत मंडळी" शिवरामपंतांच्या विशेष प्रेमांतील होती. या मंडळीकडून त्यांच्या अपेक्षेप्रमाणें पुष्कळ कार्य होईल असें त्यांना वाटत होतें. १९०६ सालीं टिळक नाशकाला गणपति-उत्सवाकरितां गेले होते. त्यावेळीं या

मंडळींची व टिळकांची भेट होऊन बोलणें वगैरे झालें होतें. त्याच सालीं टिळक नाशिकहून बेळगांवला आले होते. बेळगांवच्या उत्सवांत काम करीत असलेल्या कांहीं तरुण मंडळीसंबंधानें माझ्यावरोबर बोलतांना त्यांनीं खालील उद्गार काढले:—

"मी नाशिकहून आतां नुकताच आलों आहें. तेथें मला अशीच तरुण मंडळी दिसली व कांहीं मला भेटली. त्यांचा उत्साह व महत्त्वाकांक्षा अपूर्व आहे, पण त्यांच्यामध्यें थोडा मूर्खपणा आहे. तुमच्या तरुणांना संभाळा. अशा मूर्खपणामुळें कार्यहानि होते."

माझ्या टिळकांच्या आठवणींपैकीं एक म्हणून ती बापटांनीं आपल्या पुस्तकांत दिली आहे.व केळकरांनीं तिचा टिळक-चरित्रांत उपयोग केला आहे. शिवरामपंतांचें त्यावेळीं या मंडळीसंबंधानें काय मत होतें हें मीं वर दिलेंच आहे. टिळक दहशतवादी विचारांच्या लोकांचें एकप्रकारें कौतुक करीत असत, पण त्यांच्याशीं सावधगिरीनें वागत. त्यांच्या भावनांना व त्यांच्या साहसवृत्तीला योग्य मान देत असत, पण त्यांना उच्छृंखल होऊं देत नसत. त्यांना उत्तेजन देत नसत, पण त्यांचा धिक्कार करून त्यांचा तेजोभंग करीत नसत. शिवरामपंतांची अशा मंडळींशीं वागणूक निराळ्या प्रकारची होती. त्यांच्या लिखाणांतून व भाषणांतून या मंडळींना उत्तेजन मिळेल, निदान त्यांच्या भावना अधिक उद्दीपित होतील असें पुष्कळ होत असे. यामुळें अशा मंडळींचा जरी टिळकांबद्दल आदर होता व त्यांच्यावर विश्वास होता तरी शिवरामपंतांबद्दल त्यांना जास्ती आपुलकी वाटत होती.

१९०७ सालीं पुढें त्यांना व शिवरामपंतांना आमच्या जिल्ह्यांतील गुर्लहोसूर गांवीं येण्याबद्दल आमंत्रण देण्यांत आलें होतें. कै. अण्णासाहेब किर्लोस्करांचा हा जन्मगांव व तेथेंच पेशवाईच्या पडत्या काळांत तिला सावरून धरण्याकरितां ज्या बापू गोखल्यांनीं आपल्या प्राणाचें बलिदान केलें त्यांचे गुरु श्रीचिदंबर दीक्षित यांचा उत्सव होत असतो. तेथें बापूंचा वाडा अद्यापि आहे. टिळक–परांजपे यांना आमंत्रण देण्याकरितां अण्णासाहेबांचे बंधू गेले असतां, गुर्लहोसूर गांवची माहिती त्यांनीं दोघांनाही सांगितली. दोघांनाही गुर्लहोसूरचें वरील कारणाकरितां आकर्षण वाटून दोघेही आले होते. या दौऱ्यांत मी त्यांच्याबरोबर होतों. गुर्लहोसूर येथें शिवरामपंतांचें पुराण झालें. उत्सवाकरितां शास्त्री, पंडित, अशी कांहीं मंडळी आली होती.

पुराणांत राजकारणाचा विषय थोडा होता. पण त्यापेक्षांही शिवरामपंतांचा वेदांत, दर्शन इत्यादिकांचा अभ्यास किती गाढ होता हें दिसून आलें. गुर्लेहोसूर येथें दोघांचा मुक्काम किर्लोस्करांच्या वाड्यांत होता. यावेळीं बापू गोखल्यांच्या वाड्याला शिवरामपंतांनीं भेट दिली.

शिवरामपंतांच्या ऐतिहासिक संशोधनाच्या आवडीची एक आठवण या ठिकाणीं सांगण्यासारखी आहे. गुर्लेहोसूर जवळ 'बडली' म्हणून एक गांव आहे. तेथें चिंद्वर दीक्षितांची एक शाखा आहे. या शाखेंतील एक घराणें ग्वाल्हेर येथें आहे, व त्याला तिकडे इनामी उत्पन्न व तैनात असून साधु-घराणें म्हणून मानमरातब आहे. त्या घराण्यांतील एका गृहस्थांनीं आपल्या गांवाला टिळक–परांजपे यांनीं भेट द्यावी असा आग्रह धरला. मींही मध्यस्थी केली. पण त्याचें आमंत्रण स्वीकारलें जाईल असें दिसेना. त्यावेळीं मला एक युक्ति सुचली. आमंत्रण देण्याकरितां आलेल्या गृहस्थांच्या संग्रहीं बापू गोखल्यांच्या हस्ताक्षरांचीं कांहीं पत्रें आहेत हें मला माहीत होतें. ही माहिती मीं शिवरामपंतांना सांगितली. लागलेंच तीं पत्रें पहाण्याची जिज्ञासा शिवरामपंतांमध्यें उत्पन्न झाली व त्याचा परिणाम त्या गांवाला भेट देण्यांत झाला. त्यांनीं त्या गांवीं जाऊन पत्रें वगैरे पाहिलीं, पण त्यांत ऐतिहासिक महत्त्वाचें कांहीं आढळून आलें नाहीं.

या दौऱ्यांत टिळक व परांजपे यांचे परस्परसंबंध कोणत्या प्रकारचे आहेत हें मला पहाण्याला मिळालें. 'टिळक मोठे कीं परांजपे मोठे' हा प्रश्न कांहीं मंडळींच्या मनांत घोळत असे याचा मीं वर उल्लेख केलाच आहे. तथापि शिवरामपंतांच्या मनांत टिळकांच्याबद्दल अत्यंत आदर वसत असे हें त्यांच्या वागणुकींत मला या दौऱ्यांत दिसून आलें, व टिळकही त्यांना कसें मानीत हें माझ्या प्रत्ययास आलें. वागणुकींतील लहानसहान प्रकारा-वरून या गोष्टी जशा समजतात तशा त्या मोठ्या प्रसंगावरूनही समजत नाहींत. टिळकांना परांजप्यांच्या कर्तृत्वाची योग्यता पूर्ण माहीत असल्या-मुळें ते परांजपे यांना लोकांनीं आपल्यापेक्षां कमी लेखूं नये याविषयीं फार जपत. याचें उदाहरण म्हणून बैलहोंगळ या गांवीं घडलेल्या मानपत्राबद्दलचा उल्लेख या ग्रंथाच्या पान १२३ वर आलेला असल्यामुळें मी येथें त्याबद्दल अधिक विस्तार करीत नाहीं. अशाच प्रकारचा अनुभव पुढेंही मला येत गेला.

अशा या दोन मोठ्या लोकांच्या परस्परांमध्यें असलेल्या वागणुकीमुळें ' टिळक मोठे कीं परांजपे मोठे ' हा वाद आपोआपच मावळून गेला.

१९०७ च्या सुरतेच्या कॉंग्रेसच्यावेळीं जो बखेडा झाला त्याचा परिणाम आपल्याला भोगावा लागेल हें टिळक-परांजपे यांनीं हेरलें होतें. याच सुमारास बंगाल प्रांतांत बॉंब-पिस्तुलांचा उपयोग करून कांहीं अत्याचार घडले. अशा प्रसंगीं शिवरामपंतांच्या लेखणीचें तेज अधिक प्रखर होणें साहजिक होतें. त्याचा परिणाम म्हणून त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यांत आला. या खटल्यांत वकील-बॅरिस्टर वगैरे देऊन बचावाचें काम करावें कीं नाहीं हा प्रश्न उपस्थित झाला होता. बॅरिस्टराच्या खर्चाची वगैरे सर्व व्यवस्था सिद्ध झाली असतांही शिवरामपंतांनीं वकील-बॅरिस्टराची मदत न घेण्याचें ठरविलें. राजद्रोहासारख्या महत्त्वाच्या खटल्यांत आरोपीनें वकील-बॅरिस्टर न देण्याचा हिंदुस्थानांत हा पहिलाच खटला असावा. खटल्याचा परिणाम काय होणार हें ठरल्याप्रमाणेंच होतें, तरी शिवरामपंतांनीं केलेल्या भाषणाचा परिणाम होऊन ज्यूरीपैकीं दोन मतें शिवरामपंत निरपराधी म्हणून पडलीं. मराठी भाषेवर शिवरामपंतांचें जसें प्रभुत्व होतें तसें इंग्रजी भाषेवर नव्हतें; हें खरें असलें तरी त्यावद्दल लाज वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. गोपाळरावजी गोखले यांचेसारखे अपवाद सोडल्यास इंग्रजी भाषेचें वर्चस्व न मानण्याकडेच महाराष्ट्राची प्रवृत्ति आहे. त्यामुळें इतर प्रांतांत शिवरामपंतांसारख्या पहिल्या दर्जाच्या देशभक्ताची माहिती विशेष नव्हती. इंग्रजी वक्तृत्वाच्या दृष्टीनें पाहिल्यास टिळकांमध्येंदेखील ही उणीव होतीच. त्यामुळें गोखल्यांचे जितके इतर प्रांतांतील पुढाऱ्यांबरोबर संबंध आले तितके टिळकांचे प्रारंभीं तरी आले नाहींत. टिळक इंग्रजींतून आपले विचार स्पष्टपणें व मुद्देसूद रीतीनें मांडीत असत व त्याचा परिणामही होत असे. तरी त्यावेळच्या नामांकित पुढाऱ्यांवर इंग्रजी भाषेचा प्रभाव विशेष असल्यामुळें टिळकांचा पुष्कळ दिवसपर्यंत दुय्यम दर्जाच होता. पुढें पुढें त्यांचा त्याग, त्यांचे कष्ट; सतत उद्योग, संकटाला खुषीनें तोंड देण्याची तयारी, त्यांची विद्वत्ता इत्यादि गुणांमुळें त्यांच्या शेवटच्या काळांत त्यांना श्रेष्ठ स्थान मिळालें. हायकोर्टांत शिवरामपंतांनीं इंग्रजींत आपल्या बचावाचें ज्या प्रकारचें भाषण केलें त्यावरून पाहिलें असतां त्यांनीं पहिल्यापासूनच इंग्रजीचा सराव ठेविला असता तर त्या भाषेवर प्रभुत्व मिळविणें त्यांना कठीण गेलें असतें असें

वाटत नाहीं. पण, इंग्रजी भाषेचें आपल्या व्यवहारांत स्तोम माजविणें म्हणजे आपल्या गुलामगिरीच्या एका चिन्हाचें प्रदर्शन करून त्यांत भूषण मानण्याचा एक प्रकार आहे असें स्वातंत्र्यप्रिय शिवरामपंतांना वाटलें असावें. आज हिंदुस्थानच्या राजकारणांत अग्रेसरत्वानें भाग घेणाऱ्या कॉंग्रेसच्या कारभारांत इंग्रजीला अर्धचंद्र मिळत आहे याचें कारण हेंच आहे. आपल्या भाषेला गौणत्व देण्यानें स्वातंत्र्याच्या प्रयत्नांत कमीपणा येतो ही जाणीव शिवरामपंतांना असावी. त्यांची ऐतिहासिक दृष्टि सूक्ष्म असल्यानें इंग्रजांनीं इंग्रजी भाषेचें महत्त्व या देशांत आपलें आसन स्थिर करण्याकरितां वाढविलें आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नसावी. टिळकांना किंवा त्यांच्या निकटवर्ती कार्यकर्त्या मंडळींना इंग्रजींतून बोलतां येत नाहीं म्हणून त्यावेळीं त्यांची हेटाळणी प्रतिपक्षांतील कांहीं लोकांकडून केली जात असे. पण, आज इंग्रजींतून व्यवहार न करणें हा दोष नसून, तें एक स्वाभिमानाचें चिन्ह आहे असें मानण्यापर्यंत मजल आली आहे; हा विचारक्रांतीचा महिमा आहे.

शिवरामपंतांच्या मागोमाग टिळकांना दीर्घकालपर्यंत बंदिवासांत जावें लागलें. परांजपे यांच्या गैरहजेरींत त्यांचें 'काळ' पत्र चाललें होतें. पहिले संपादक खरे व दुसरे बाबासाहेब सोमण ('किरातां'चे बंधू) यांनीं काम पहिल्याप्रमाणें चालवण्याची आपल्याकडून शिकस्त केली. पण देशांतील परिस्थिति अत्यंत बिकट झाली असल्यानें, शिवरामपंतांचा 'काळ' व त्यानंतरचा 'काळ' यांमध्यें अंतर पडणें अपरिहार्य होतें. एक 'काळ'च काय पण सर्व वृत्तपत्रांची तीच स्थिति झाली होती. टिळकांच्या खटल्याच्या वेळीं त्यांच्याच प्रेरणेनें मुंबईला 'राष्ट्रमत' या नांवाचें मराठी दैनिक काढण्यांत आलें होतें. त्या पत्राचे चालक व संपादक टिळकांचे अनुयायी होते. व टिळकांच्याच धोरणाला अनुसरून त्यांनीं कांहीं कालपर्यंत तें पत्र चालविण्याचा प्रयत्न केला. नाशिक येथील त्या वेळचे कलेक्टर जॅक्सन यांच्या खुनामुळें जे प्रकार उघडकीस आले व सरकारनें दडपशाहीचें जें उग्र स्वरूप धारण केलें, त्याचा परिणाम सर्व पत्रकर्त्यांवर झाला. 'राष्ट्रमत' पत्राकडून मोठ्या रकमेचा जामीन मागण्यांत आला. माझा या पत्राशीं संबंध असल्यानें ती रक्कम उभी करण्याचे प्रयत्न झाले असते तर यशही आलें असतें हें मी निश्चित सांगतों. पण त्याचा परिणाम प्रयत्नानें मिळविलेली एवढी रक्कम

लवकरच सरकारजमा झाली असती अशी खात्री वाटल्यावरून 'राष्ट्रमत' पत्र बंद करावें लागलें. तिकडे बंगाल प्रांतांतही असाच सरकारनें धुमाकूळ घालून तिकडील राष्ट्रीय वृत्तीचीं पत्रें बंद पाडलीं.अशा परिस्थितींत शिवरामपंतांचें 'काळ' पत्र पहिल्या जोमानें चालविणें कोणालाही शक्य झालें नसतें. शिवरामपंत सुटून आल्यानंतर, 'काळ' पत्राकडून जामीन मागितल्यामुळें तें पत्र बंद करावें लागलें.

टिळकांना शिक्षा झाल्यानंतर ते परत सुटून येईपर्यंतचा १९०९–१९१४हा काल महाराष्ट्रालाच काय पण सर्व देशाला अत्यंत कष्टांत काढावा लागला. स्वतःचा कार्यक्रम पुढें चालविण्याची शक्ति नाहीं व दुसऱ्याचा पटत नाहीं, अशा स्थितींत महाराष्ट्र होता. त्यामुळें शिवरामपंतांसकट सर्व लहानथोर कार्यकर्त्यांत राजकारणाच्या दृष्टीनें निष्क्रियता आली होती. नाशिकच्या कटाच्या खटल्यांत सशस्त्र उठावणीचे मार्ग कसे फसतात याचा अनुभवही आला होता.त्या खटल्यांतील कबुलीजबाब, माफीच्या साक्षीदारांच्या जबान्या इत्यादि प्रकार पाहिले म्हणजे हा मार्ग किती धोक्याचा आहे हें पुष्कळांच्या निदर्शनास आलें असलें पाहिजे. ज्यांनीं अशा प्रयत्नांत भाग घेतला, व ज्यांनीं त्याचा परिणाम म्हणून आपल्या प्राणांचें बलिदान केलें व अन्य यातना भोगल्या त्यांना कमीपणा आणण्याचा माझा उद्देश नाहीं. त्या मंडळींपैकीं कांहींचा व माझा प्रत्यक्ष संबंध आला होता. त्यांच्या देशभक्तीचा व त्याकरितां त्यांनीं केलेल्या त्यागाचा पूर्ण आदर ठेवून हे मार्ग यशस्वी होऊं शकत नाहींत असें म्हणण्यानें त्यांना कोणत्याही प्रकारें कमीपणा आणण्यासारखें होत नाहीं.असो.हें सर्व पाहून शिवरामपंतांसारख्या ध्येयवादी, भावनाप्रधान अशा तळमळीच्या गृहस्थाला हा काळ किती दुःसह झाला असेल याची कल्पना केलेलीच बरी. आयुष्याच्या जाणतेपणापासून ज्या एका भव्य ध्येयाची कास धरून आपण एक प्रपंच थाटला होता, तो उध्वस्त होत आहे हें पाहून त्यांचा उत्साह मावळला. टिळक–परांजपे यांच्या पक्षांतील मीही एक लहानसा कार्यकर्ता होतों व माझेही कांहीं उद्योग त्या वेळच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या कल्पनेला धरून चालले होतेच. पण १९०९–१९१४ पर्यंतच्या काळांत आमचें सर्व मनोराज्य ढासळून पडल्याप्रमाणें होऊन पुनः आमच्याकडून कांहीं कार्य होईल कीं नाहीं अशी शंका वाटूं लागली होती.

या अवधींतच कोल्हापूरच्या कांहीं वड्या लोकांनीं ब्रिटिश हद्दींतील कांहीं पोलीस अधिकाऱ्यांच्या मदतीनें 'महाराष्ट्रांत सशस्त्र बंडाचा एक मोठा कट झाला असून हत्यारें, बॉंब वगैरेंचा संग्रह करण्याचे प्रयत्न चालले आहेत' अशी माहिती सरकारला दिली होती. टिळकांना राजद्रोहाच्या खटल्यांत सहा वर्षांची जरी शिक्षा झाली होती तरी या मंडळींचें समाधान झालें नव्हतें. टिळक, परांजपे, खाडिलकर, वगैरे लहानथोर कार्यकर्त्यांना एका मोठ्या कटाच्या खटल्यांत गोंवून, त्याच्या अनुषंगानें शक्य तर कोल्हापूर संस्थानांतील इचलकरंजी विशाळगडसारख्या ब्राह्मण जहागीरदारांच्या जहागिरीवर धाड आणण्यासाठीं, एका मोठ्या कटाची तयारी चालली होती. हें प्रकरण १९०९-१९१० पासून १९१२ पर्यंत, जवळजवळ ३।४ वर्षे चाललें होतें. पण याचा शेवट टिळक-परांजपे व इतर मंडळीवर न होतां, योगायोगानें ज्यांनीं हा व्यूह रचला होता त्यांच्यावरच उलटला. हा इतिहास महत्त्वाचा असला तरी तो अप्रस्तुत आहे म्हणून येथेंच तो सोडतों. सारांश, टिळक मंडालेहून येईपर्यंत निष्क्रियता किंवा बचाव याशिवाय महाराष्ट्रांत दुसरें कांहीं होऊं शकलें नाहीं. टिळकांच्या गैरहजेरींत कॉंग्रेसचें काम यथातथाच चाललें होतें. कॉंग्रेसचें विशाल स्वरूप जाऊन, तिचीं अधिवेशनें एकाद्या लहान सभागृहांत भरूं लागलीं होतीं, तिच्यांतील प्राण नाहींसा होण्याच्या मार्गावर होता. सरकारच्या दडपशाहीमुळें प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनें फारसें कांहीं घडलें नसलें तरी लोकांचा क्षोभ कमी झाला नव्हता. या परिस्थितीचा फायदा घेऊन दुसरी कॉंग्रेस भरवावी किंवा जुन्या कॉंग्रेसमध्यें पुनः प्रवेश करून घ्यावा असें महाराष्ट्रांत कांहीं मंडळींना वाटूं लागलें होतें. पण परांजपे यांना हें दुसरें धोरण मान्य नव्हतें. त्यांच्यासारख्या मानी मनुष्याला मवाळांनीं तयार केलेल्या क्रीडवर सही करून, त्यांनीं घालून दिलेल्या पद्धतीनें निवडणूक करून घेऊन निस्तेज झालेल्या कॉंग्रेसमध्यें प्रवेश मिळविणें हें पटत नव्हतें. मानभंग करून घेऊन आपल्या पुढाऱ्यांच्या गैरहजेरींत कांहीं तरी निष्प्रभ काम करण्यापेक्षां वनवास बरा अशीच त्यांची वृत्ति होती; व तीच इतर मंडळींना पटली. म्हणून टिळक येईपर्यंत कांहींच हालचाल झाली नाहीं.

अशा स्थितींत टिळक सर्व शिक्षा भोगून मुक्त होऊन परत आले. त्या संधीलाच पहिल्या महायुद्धाला प्रारंभ झाला होता. त्या प्रसंगांत टिळक

काय धोरण स्वीकारतात हें पहाण्याकडे सर्वांचें लक्ष होतें. ( England's difficulty is our opportunity ) ' इंग्लंडचा संकटकाळ हाच आमचा पर्वकाळ ' असें मानणारे महाराष्ट्रांत बरेच लोक होते. जर्मनीमध्यें हिंदुस्थानचे कांहीं तरुण होते. त्यांची इच्छा त्यावेळीं हिंदुस्थानांत क्रांतिकारक उठांव व्हावा अशी होती, व तसे त्यांचे संदेशही येऊं लागले होते. या सर्व गोष्टींचा फायदा घेण्याचा मोह कित्येकांना झाला. पण टिळकांनीं सर्व परिस्थिति पाहिली व सर्वच सुकाणूं बदलून युद्धविषयक धोरणाचा एक जाहीरनामा काढला. या जाहीरनाम्यासंबंधानें आमच्या मंडळींमध्यें बरीच भवति-न-भवति झाली. / शिवरामपंतांना टिळकांचें धोरण मनापासून मान्य झालें नाहीं. तुरुंगांतून सुटून आल्यानंतरची जी देशांतील परिस्थिति त्यांनीं पाहिली, तिजमुळें त्याचवेळीं शिवरामपंतांचा उत्साह ओसरला होता. महायुद्धाच्या प्रारंभीं टिळकांनीं जें धोरण स्वीकारलें त्यामुळें शिवरामपंतांच्या व त्यांची विचारप्रणाली मान्य असणाऱ्या इतरांच्या निरुत्साहांत आणखी भर पडली.

टिळकांनीं जो जाहीरनामा काढला तो असहाय स्थितींत अपरिहार्य म्हणूनच काढला असें आम्हांला वाटलें. पण, टिळकांच्या नेतृत्वावर विश्वास असल्यामुळें तो आम्हांस मान्य करावा लागला. त्याचप्रमाणें नेमस्तांनीं तयार केलेल्या कॉंग्रेसक्रीडला मान्यता देऊन कॉंग्रेसमध्यें पुनः प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न मनाला पटत नव्हता, पण नेमस्तांनीं आमच्या पक्षाच्या कांहीं अटी स्वीकारल्या व टिळकांनीं आग्रह धरला म्हणून कॉंग्रेसमध्यें आमचा प्रवेश झाला. टिळकांनीं आपल्या कर्तृत्वानें कॉंग्रेसवर आपला प्रभाव पाडला व जे लोक त्यांना विरोध करीत असत त्यांनाच कॉंग्रेसच्या बाहेर जावें लागलें.

पहिल्या महायुद्धाच्या प्रसंगीं टिळकांनीं आपल्या परीनें कांहीं अटींवर युद्धांत सहकार्य करण्याची तयारी दाखविली, तरी सरकाराचें वर्तन त्यांना अनुकूल झालेंच नाहीं. मुंबईच्या युद्धकॉन्फरन्समध्यें टिळकांना आमंत्रण देऊनही ते बोलत असतां त्यांना थांबवून त्यांचा अपमान करण्यांत आला व त्यामुळें चिडून टिळक कॉन्फरन्समधून उठून आले. ही गोष्ट प्रसिद्धच आहे. त्यानंतर टिळकांच्या धोरणांत फरक झाला ही गोष्ट माझ्या प्रत्यक्ष माहितीवरून मी सांगूं शकतों. तेव्हां लष्करभरती होण्यासंबंधानें टिळकांनीं

जें लिहिलें आहे, तें त्यांचा निराशा होण्यापूर्वींचें आहे. शिवरामपंतांनीं देखील लष्करभरतीच्या कामाला जो पाठिंबा दिला होता त्याच्या मुळाशीं सरकारशीं सहकार करण्याचा हेतु मुळींच नव्हता. इंग्लंडनें हिंदुस्थानचें निःशस्त्रीकरण केलें होतें; त्यामुळें हिंदी लोकांचा तेजोभंग होत होता. म्हणून मातृभूमीचे संरक्षणार्थ सैनिक होण्याचें पवित्र कर्तव्य केलें पाहिजे असें शिवरामपंत व टिळक या दोघांचेंही मत होतें! पण, साम्राज्याचाच एक घटक अशा दृष्टीनें टिळक त्यावेळीं हिंदुस्थानकडे पहात असत; पण शिवरामपंतांची दृष्टि स्वतंत्र हिंदुस्थानावरच होती. त्यामुळें पुढें मागें लष्करी शिक्षण घेतलेल्या लोकांचा उपयोग आपल्या देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीकरतां होण्याचा संभव आहे असें शिवरामपंतांना वाटत असावें.

पुढें पंजाब-प्रकरण उद्भवलें व खिलाफतीचा प्रश्न मुसलमानांच्या पुढें आला. गांधीजींनीं त्याला उचलून धरलें, व असहकारितेच्या चळवळीचा उच्चार होऊं लागला. निरुत्साही झालेल्या शिवरामपंतांत पुनः उत्साह दिसूं लागला. राष्ट्रांत कांहीं तरी जागृति होऊन सरकारशीं दोन हात करणारी शक्ति निर्माण होईल अशी त्यांना आशेचीं चिन्हें दिसूं लागलीं. पण, टिळक कोणतें धोरण स्वीकारतील हें स्पष्ट दिसेना. मुसलमान जितके पुढें जातील तितकें आपल्यास जावें लागेल असें त्यांनीं बोलून दाखविलें होतें. पण कौन्सिलमध्यें काम करण्याची जी संधि मिळाली आहे तिचा उपयोग करून घ्यावा असेंही त्यांचें मत होतें. या बाबतींत शिवरामपंतांच्या मताचा मीं अंदाज घेतला होता, पण टिळकांचें स्पष्ट मत मला कळणें जरूर होतें. त्याच संधीला उरण येथें मला कुलाबा जिल्हा सभेचा अध्यक्ष या नात्यानें भाषण करावयाचें होतें. म्हणून, मीं कोणत्या धोरणानें बोलावें हें विचारण्याकरितां टिळकांना भेटलों. खिलाफतची चळवळ उचलून धरून भाषण करण्यास त्यांनीं मला अनुमति दिली, पण माझें भाषण किती परिणामकारक होतें हें त्यांना कळविण्यास मला सांगितलें. यावरून लोकमताचा अंदाज घेऊन आपलें धोरण ठरविण्याकडे टिळकांचा कल होता असें मला वाटलें.

टिळकांनीं डेमोक्रॅटिक कॉंग्रेस पक्ष स्थापून निवडणुकींत भाग घेण्याचें ठरविलें, व शिवरामपंत परांजपे यांनीं कुलाबा जिल्ह्यातर्फे उमेदवार म्हणून उभें रहावें असें निश्चित केलें. हें शिवरामपंतांनीं मान्य केलें, पण या कौन्सिलच्या कामावर त्यांचा विश्वास नव्हता, व तशा प्रकारें काम करण्याची

त्यांची मनोवृत्तीही नव्हती. बेळगांव जिल्ह्यातर्फे मी उभें रहावें असें टिळकांनीं ठरविलें होतें, पण मलाही तें पसंत नव्हतें. शिवरामपंत किंवा त्यांच्या विचारसरणीला अनुकूल असलेले माझ्यासारखे, टिळकांचा शब्द मानावा याच इच्छेनें प्रेरित होऊन या कार्यक्रमांत हिरिरीनें भाग घेत होतों, पण मनापासून तो कार्यक्रम आम्हांला पसंत नव्हता. मनाचा कल एकीकडे ओढी, तर टिळकांचें नेतृत्व दुसरीकडे ओढी, अशा कैचींत शिवरामपंतांचें मन हेलकावे खात होतें. टिळकांच्या कार्यक्रमाला सोडावें तर मवाळांची सरशी व्हावयाची अशी अडचण उभी राहत असे. म्हणून दोन आपत्तींपैकीं कमी हानिकारक आपत्ति ( Lesser evil ) म्हणून आम्हीं कौन्सिलला उमेदवार म्हणून उभें राहण्याचें कबूल केलें.

अशा अनिश्चित स्थितींत असतां टिळकांचें देहावसान ता. १ ऑगस्ट १९२० इ. रोजीं झालें. पुढें थोड्याच दिवसांत कलकत्त्याची स्पेशल काँग्रेस भरावयाची होती. त्या काँग्रेसमध्यें असहकाराच्या कार्यक्रमाचा विचार व्हावयाचा होता. तेव्हां टिळकांच्या अनुयायांनीं काय धोरण स्वीकारावें असा प्रश्न आमच्यापुढें उत्पन्न झाला. टिळकांचें देहावसान झाल्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशीं खापर्डे, करंदीकर ( दादासाहेब ), परांजपे, मी व इतर कांहीं मंडळींच्या मतानें असें ठरविलें कीं, कलकत्त्याच्या काँग्रेसमध्यें असहकाराच्या ठरावाला विरोध करावा, पण तो मंजूर झाल्यास त्याप्रमाणें वागावें, असें ठरवून आम्ही पुढें कलकत्त्याला गेलों. असहकारितेच्या ठरावाविरुद्ध आम्हीं मतें दिलीं, पण तो प्रचंड बहुमतानें मंजूर झाला. कलकत्त्यामध्यें गांधीजींच्या बहुजनसमाजावरील पकडीची कल्पना आम्हांला प्रथम आली, व आम्हांला वाटूं लागलें कीं, पुनः देशांत अशांततेची लाट उसळणार व त्यांतून कांहींतरी आमच्या मताप्रमाणें निघणार. कलकत्त्याच्या खास अधिवेशनांत बहुमतानें असहकारितेचा ठराव मंजूर झाला होता, तरी पुढें त्याच वर्षी नागपूर येथें भरणाऱ्या वार्षिक अधिवेशनांत या ठरावाला विरोध करून तो हाणून पाडण्याचा देशबंधु दास वगैरेंनीं व्यूह रचला होता; व त्यांत खापर्डे, केळकर, अणे, मुंजे, वगैरे महाराष्ट्रांतील मंडळी सामील होती. नागपूर काँग्रेसच्या वेळीं काँग्रेसच्या प्रतिनिधींची संख्या हल्लींप्रमाणें मर्यादित नव्हती. गांधींनीं कलकत्त्याच्या काँग्रेसनंतर देशव्यापी चळवळ करून असहकाराला प्रचंड पाठिंबा मिळविला होता. म्हणून नागपूर काँग्रेसला

२०,००० प्रतिनिधी आले होते. दास वगैरे मंडळींनीं विरोधाचा थोडासा प्रयत्न केला; पण तो यशस्वी झाला नाहीं. व बहुतेक एकमतानें कौन्सिल-बहिष्कारासहित असहकारितेचा ठराव मंजूर झाला. कलकत्त्याचा ठराव मंजूर झाल्याबरोबर त्या ठरावाला अनुसरून आम्हीं आमचीं नांवें निवडणुकींतून काढून घेतलीं. शिवरामपंतांना पहिल्यापासूनच त्यांत उत्साह नसल्या-कारणानें नांवें काढून घेण्यानें त्यांना आनंदच वाटला असावा. पण, केळकर इत्यादिकांना असहकार मनापासून पटत नव्हता. यांतूनच पुढें महाराष्ट्रांत मतभदाचें-भांडणाचें बीज पेरलें गेलें. वरून कॉंग्रेसबद्दल निष्ठा दाखवावयाची पण आंतून कॉंग्रेसच्या कार्यक्रमाचा तेजोभंग करावयाचा ही नीति कांहीं पुढाऱ्यांनीं अवलंबिली.

या मतभेदाच्या संबंधानें एक विचार मनांत आल्याशिवाय रहात नाहीं. टिळकांच्या हयातींत केळकर, खाडिलकर आणि शिवरामपंत हे त्यांच्याच नेतृत्वाखालीं देशकार्य करीत. परंतु त्यांच्या पश्चात् केळकरांनीं गांधींच्या नेतृत्वाखालीं चळवळ करणाऱ्या कॉंग्रेसपासून अलग राहून, किंबहुना तिला विरोध करून, स्वतंत्र पक्षाची स्थापना करण्याचा यत्न केला. खाडिलकर व परांजपे यांनीं उलट गांधींचें अनुयायित्व पत्करलें. इतकेंच नव्हे तर टिळकांच्या शिष्यांचे हे दोन पक्ष एकमेकांवर निकरानें हल्ले चढवूं लागले. टिळक-पक्ष या फाटाफुटीमुळें महाराष्ट्रांत कमजोर झाला. ज्या पुढाऱ्यांना टिळक एकाच निशाणाखालीं ठेवूं शकत, त्यांच्यांत पुढें अशी फाटाफूट कां पडावी? हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. ‘ टिळकांच्या इतका प्रभावी पुढारी पुढें त्या पक्षांत राहिला नाहीं व नवीन निर्माण झाला नाहीं. त्यामुळें एकत्र काम करणाऱ्या त्यांच्या या साहाय्यक नेत्यांना एकत्र ठेवणें अशक्य झालें ’ असें या प्रश्नाचें एक उत्तर देतां येईल. परंतु एवढ्यानें या प्रश्नाचा पूर्णपणें खुलासा होतो असें मला वाटत नाहीं. टिळकांच्या हयातींत देखील या दोन गटांतील फरक स्पष्ट होऊं लागला होता. असें असूनही टिळकांच्या दूरदृष्टि मुत्सद्दे-गिरीमुळें या दोन भिन्न गटांचा एकाच कार्यासाठीं उपयोग करून घेणें शक्य होत असे. स्वभावविशेष, पूर्वसंस्कार, आणि दृष्टिकोनाची भिन्नता यांमुळें असे विचारभेद उत्पन्न होणें हें अपरिहार्य आहे, हें टिळकांना माहीत होतें. या दोनही गटांची विचारसरणी कमी अधिक महत्त्वाची असली तरी प्रामाणिक असूं शकेल, आणि दोहोंचाही आपल्या कार्यास उपयोग करून घेतां

येईल असें त्यांना वाटत असलें पाहिजे. म्हणून ते दोन्हीही गटांना जवळ करूं शकेल.

आपल्यामध्यें खाडिलकर-परांजपे यांचेप्रमाणें पक्षाभिमान नसल्याकारणानें आपण टिळकांच्या विश्वासाला त्यांच्या इतपत पात्र झालों नाहीं असें केळकरांचें म्हणणें आहे. पण हें म्हणणें यथार्थ आहे असें मला वाटत नाहीं. खाडिलकर-परांजपे यांच्यावर टिळकांचा अधिक विश्वास असावयाला कांहीं-तरी महत्त्वाचें कारण असलें पाहिजे, असें कोणाही वरवर पहाणाऱ्यांनासुद्धां समजून येईल. पक्षाभिमान म्हणजे काय याची फोड तरी केळकरांनीं करावयाला पाहिजे होती. माझ्या माहितीप्रमाणें खाडिलकर व परांजपे यांचेवर केळकरांपेक्षां टिळकांचा अधिक विश्वास होता. त्याला पक्षाभिमानापेक्षां जास्ती सबळ कारणें होतीं. केळकरांप्रमाणें टिळकांना केवळ मामुली राजकारण चालवावयाचें नव्हतें. टिळकांच्या राजकारणाला बहुजनसमाजाच्या पाठिंब्याची आवश्यकता वाटत होती. लहानसहान सद्यःफलाकडे विशेष लक्ष देण्यापेक्षां दूरदृष्टीनें स्वातंत्र्याच्या ध्येयालाच चिकटून रहाणें अधिक श्रेयस्कर असें खाडिलकर-परांजपे यांना वाटे; व त्यांत टिळकांचें व त्यांचें एकमत होतें. अशी परिस्थिति असल्यामुळें आपलें उच्च ध्येय गांठण्याचे मार्ग कोणते आहेत, इतर देशांनीं कोणत्या मार्गांचा अवलंब केला, आपल्याला काय करतां येईल, वगैरे महत्त्वाच्या प्रश्नांची त्यांच्यामध्यें चर्चा होई. म्हणून त्यांच्यामध्यें सहाजिकच विश्वास जास्ती होता. अशा उपायांची चर्चा करून त्यांची उपयुक्तता ठरविणें हें केळकरांच्या स्वभावांतच नाहीं, असें म्हटल्यानें त्यांची योग्यता कमी केल्याप्रमाणें होतें असें मला वाटत नाहीं. वादाच्या भरांत एकमेकांवर हल्ले-प्रतिहल्ले क्षम्य मानले तरी शिवरामपंतांच्या मृत्यूनंतर दहा वर्षांनीं लिहिलेल्या 'गतगोष्टींत' केळकरांनीं त्यांच्या स्वभावाची जी चिकित्सा केली आहे, तींत सत्यांश कमी आहे व ती शिष्टाचाराला सोडून आहे, असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. त्याबद्दल या ग्रंथांत (प्र० १३ वें) बराच ऊहापोह आला आहे म्हणून मी येथें जास्ती लिहीत नाहीं.

या घर्षणानें परांजपे यांची वृत्ति क्रांतिकारक असल्यामुळें त्यांनीं बेधडक असहकारितेला आपला पाठिंबा दिला. असहकारितेच्या कार्यक्रमांत खादी, चरखा वगैरे विधायक कार्यांचा समावेश करण्यांत आला होता. या साध्या दिसणाऱ्या गोष्टींबद्दल शिवरामपंतांना आकर्षण वाटत नव्हतें. पागोटें

टाकून खादीटोपी त्यांनीं घातली, व खादीचाही स्वीकार केला, हें खरें आहे. पण, त्यांना त्याला अनुलक्षून गांधींनीं केलेली मीमांसा पटत होती, असें नाहीं. मुळांतच त्यांची वृत्ति अहिंसेकडे नसल्यानें त्याच्या पोषणार्थ आंखलेल्या कार्यक्रमासंबंधानें त्यांना प्रेम व अभिमान वाटणें हें त्यांच्या स्वभावाविरुद्ध होतें. पण, गांधींनीं सरकारला 'सैतानी सरकार' म्हणून घोषणा करून असलें सरकार हटवलें पाहिजे किंवा मिटवलें पाहिजे. ( either mend or end ) अशी वीरप्रतिज्ञा करून सर्व हिंदुस्थान हलवून सोडला, त्याचा परिणाम शिवरामपंतांवर झाल्याखेरीज राहिला नाहीं. गांधींनीं आसेतुहिमाचल दौरे काढून लोकांत अभूतपूर्व जागृति केली. गांधीजींची अहिंसा आपल्याला पटो किंवा न पटो, या परिस्थितीचा फायदा आपण करून घेतला पाहिजे असें परांजपे यांना वाटलें. त्यांच्या आशेला पुनः पालवी फुटूं लागली. त्यांचीं भाषणें त्या दिशेनें होऊं लागलीं. पण, गांधींच्या चळवळींत उघड उघड बोलण्याची वेळ आली होती. जे विचार सांगण्याकरितां वक्रोक्ति, अलंकार इत्यादिकांनीं भाषण सजवावें लागे, तो काळ निघून गेला होता. लहान मुलापासून म्हाताऱ्यापर्यंत, बायकापासून पुरुषापर्यंत, सर्व वर्गांत, सर्व समाजांत स्वराज्य–स्वातंत्र्याची घोषणा उघडपणें होऊं लागली होती. त्यामुळें शिवरामपंतांच्या भाषणांतून व लेखांतून पूर्वींचा साहित्याच्या दृष्टीनें असलेला रस कमी कमी होऊं लागला. जी गोष्ट पडद्याआड सांगण्याची आवश्यकता होती तिची जरूरी उरली नाहीं. शिवरामपंतांच्या पाहिल्या खटल्याचे वेळीं बचावाचें काम स्वतः करावयाचें, एथपर्यंतच मजल गेली होती. पण असहकारितेच्या कालांत आम्ही परकी सरकारचें कोर्ट मानीत नाहीं, म्हणून बचावाचें काम करणार नाहीं, असा रोखठोक जबाब लोक देऊं लागले. ही विलक्षण क्रांति झालेली पाहून शिवरामपंतांना आनंदाच्या उकळ्या फुटत असत. ज्या तरुण मंडळीवर त्यांनीं १९०६ व त्यानंतर कांहीं वर्षें विश्वास ठेविला होता, त्यांपैकीं बरीच मंडळी या चळवळीपासून अलिप्त राहून तिची टिंगल उडवूं लागले, आणि हिंदु व मुसलमान हे परस्पर शत्रु आहेत, अशी विचारसरणी मांडूं लागले. त्यावेळीं शिवरामपंतांची या मंडळीसंबंधानें पूर्ण निराशा झाली. व त्यांच्यासंबंधानें अत्यंत कष्टी होऊन त्यांनीं त्यांच्याबद्दल तिरस्काराचे

उद्गार माझ्या समक्ष अनेक वेळां काढले आहेत. गांधींची चाल कितीही वक्र दिसो, पण ते स्वातंत्र्याचे भोक्ते आहेत असें शिवरामपंतांना वाटत असावें व त्यांनीं केलेल्या जागृतीचा व तींतून उत्पन्न होणाऱ्या शक्तीचा स्वातंत्र्याकरितां मागेंपुढें उपयोग होईल अशी आशा शिवरामपंतांना वाटत असावी. यामुळेंच ते हा कार्यक्रम व्यवहार्य आहे कीं अव्यवहार्य आहे या चिकित्सेंत पडत नसत. अशी चिकित्सा करणाऱ्यांची बुद्धि स्वातंत्र्याच्या प्रयत्नांत पुरी पडणें शक्य नाहीं. माझ्यासारख्याला तर त्यावेळीं गांधींनीं अहिंसेचें पांघरूण घेतलें आहे व पुढेंमागें त्यांच्या मनांत क्रांतीचें बंड उठवावयाचें आहे असें वाटे. शिवरामपंतांना तसें वाटत होतें कीं काय, हें मला ठाऊक नाहीं. पण त्या चळवळीच्या क्षोभाचा स्फोट होऊन स्वातंत्र्याच्या मार्गांतील एक टप्पा गांठतां येईल असें त्यांना खास वाटत होतें.

टिळकांच्या मागें केळकरांच्याकडे केसरी–मराठा पत्रांचें चालकत्व आलें होतें. म्हणून त्यांच्या मार्फतच पुढील सर्व काम महाराष्ट्रांत होईल अशी काँग्रेस पुढाऱ्यांची आशा होती, व त्याकरितांच त्यांना काँग्रेस वर्किंग कमिटींत घेण्यांत आलें होतें. पण ती आशा कशी निष्फळ झाली हा इतिहास येथें विस्तारानें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

शिवरामपंतांना काँग्रेसमध्यें केळकरांसारखे जरी मानाचें स्थान मिळालें नव्हतें, तरी त्यांनीं आपल्या ‘ स्वराज्य ’ पत्रांतून असहकार व सत्याग्रह या तत्त्वांना जोरदार पाठिंबा दिला.

पुढें १९३० च्या चळवळीपासून नवोदित मंडळींनीं महाराष्ट्राला सत्याग्रहाची दीक्षा दिली, व महाराष्ट्र आज आपल्या परंपरेप्रमाणें देशाच्या आघाडीवर राहून इतर प्रांतांबरोबर स्वातंत्र्याचा लढा लढत आहे. पण, आरंभीं शिवरामपंत व कृष्णाजीपंत ही जोडी नसती तर महाराष्ट्रांतील राजकारणाला निराळें वळण लागून त्यांतून तो मुक्त होण्याला फार मोठा कालावधि लागला असता.

मुळशीच्या सत्याग्रहाला पुढें सुरवात झाली. शिवाजी महाराजांच्या शूर मावळ्यांच्या वंशजांच्या जमिनी एका भांडवलवाल्या व्यापाऱ्याच्या कारखान्याकरितां जाणार व त्या योगानें मावळे घरादाराला मुकून अन्नाला मोताद होणार व शेवटीं त्यांच्यांतील स्वाभाविक असलेलें तेज नाहींसें

होणार; या गोष्टी होऊं नयेत म्हणून सत्याग्रह करून जमिनी वांचवाव्यात अशी या चळवळींत योजना होती. महाराष्ट्रांतील सर्व काँग्रेसकार्यकर्ते या योजनेला आरंभीं अनुकूल होते. शिवरामपंतांनीं या सत्याग्रहाच्या चळवळींत प्रत्यक्ष भाग घेतला व त्यांना त्यांच्या उतारवयांत बंदिवास भोगावा लागला. त्यावेळीं मी येरवड्याच्या तुरुंगांत माझ्यावरील राजद्रोहाच्या खटल्यांत झालेली शिक्षा भोगीत होतों. माझें उतार वय पाहून मला साधी शिक्षा देण्यांत आली होती. शिवरामपंत वयानें माझ्यापेक्षां वडील होते, तरी त्यांची सक्तमजूरीची शिक्षा होती. मला तुरुंगाच्या ज्या भागांत ठेवण्यांत आलें होतें, त्याच भागांत पण दुसऱ्या बराकींत शिवरामपंतांना ठेविलें होतें. फक्त एका लंगोटीनें आच्छादिलेलें त्यांचें भव्य शरीर माझ्या दृष्टीस पडून मला अत्यंत दुःख झालें. त्या वेळचा तुरुंगवास व आजचा तुरुंगवास यांत पुष्कळ अंतर पडलें आहे. सरकार तुरुंगांत घालतें म्हणून तुरुंगांत जाणें निराळें व स्वतः सत्याग्रह करून आपल्यावर तुरुंगवासाचें संकट ओढून घेणें निराळें! शिवरामपंतांचे जीवन मोठें विलासी नसलें तरी सुखांत गेलेलें होतें. त्या वेळच्या आम्हां सर्व मंडळींत शिवरामपंतच उठून दिसत; व त्यांच्या पोषाखावरून व राहण्याच्या एकंदर ढबीवरून तेच सर्वांत सुस्थितींत आहेत, असा भास होई. त्याचप्रमाणें ते तुरुंगवासासारख्या कष्टदायक जीवनाला भिणारे आहेत, असा एक त्यांच्यासंबंधानें प्रवाद होता. यापूर्वी ते तुरुंगांत गेले होते तरी त्यांना सरकारनें घातलें म्हणून त्यांना जावें लागलें, पण स्वेच्छेनें कष्ट सोसण्याची त्यांची तयारी नाहीं असेंच पुष्कळ लोकांना वाटत असे. त्यांचा व्यासंगही विद्यार्जनाचा असल्यामुळें ते बहुतेक काल बसूनच घालवीत. तथापि मुळशीसारखा प्रसंग आला म्हणजे ते मागेंपुढें पहात नसत. समाजाला जागृत करून सरकारशीं लढा देण्याचें ढोल वाजूं लागले म्हणजे त्यांत सामील न होतां, बाहेरूनच आशीर्वाद देत बसावयाचें हें त्यांच्या स्वभावांत नव्हतें असें मुळशी सत्याग्रहांत त्यांनीं जो भाग घेतला त्यावरून म्हणण्यास हरकत नाहीं.

असहकारितेच्या कार्यक्रमांत कौन्सिल बहिष्कार हा एक भाग होता. पण कौन्सिलांतील कामाचें ज्यांना विशेष आकर्षण होतें, अशांनीं देशबंधू दास व पं. मोतीलालजी यांच्या नेतृत्वाखालीं खूप जोरानें चळवळ करून

काँग्रेसमध्येंच स्वराज्यपक्षाची स्थापना करून तिच्या मार्फत कौन्सिलें लढविण्याला काँग्रेसची मान्यता मिळविली. त्यामुळें कौन्सिलामध्यें काम करण्याची हौस असणाऱ्यांना एक संधी मिळाली. पण इतरांना विधायक कार्याशिवाय दुसरें काम राहिलें नाहीं.

पुढें कौन्सिल प्रवेशाचे अध्वर्यु दास नेहरू यांनाच कौन्सिलच्या कामानें स्वातंत्र्यप्राप्तीला मदत होत नाहीं असा अनुभव आला व त्यांनीं प्रांजलपणें तशी गांधीजींजवळ कबुली देऊन 'प्रत्यक्ष प्रतिकाराचा कांहीं मार्ग काढावा' असें सुचविलें. त्याला अनुसरून पुढें १९३० सालीं मोठ्या प्रमाणावर सत्याग्रहाच्या प्रयोगाला सुरवात झाली. पण दुर्दैवानें त्या रोमांचकारी चळवळीच्या वेळीं शिवरामपंत दिवंगत झाले होते. १९२२ पासून त्यांच्या मृत्युपर्यंतचा काळ त्यांना निराशेचा वाटला असावा. कौन्सिलच्या कार्यक्रमांत त्यांना कांहीं अर्थ वाटला नाहीं, व काँग्रेसच्या खादीसारख्या कामांत त्यांना रस घेतां आला नाहीं. त्यामुळें त्यांची फारच कुचंबणा झाली, असल्यास आश्चर्य नाहीं. कांहीं काळ त्यांच्या कर्तृत्वाला क्षेत्रच नसल्याप्रमाणें झालें. तरी त्यांनीं आपल्या वाणीनें व लेखणीनें नवीन विचारांना पाठिंबा दिला व महाराष्ट्रांतील इतर कांहीं त्यांच्या समकालीन पुढाऱ्यांप्रमाणें त्यांनीं स्वावलंबनाच्या आधारानें पुढें पाऊल टाकणाऱ्या शक्तीला विरोध केला नाहीं.

साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेलें भाषण हें बहुतकरून त्यांचें शेवटचें असावें. त्यावेळीं त्यांची प्रकृति क्षीण झाली होती, व कानांत कळा वगैरे येत असत. तथापि संमेलनाचा कार्यक्रम त्यांनीं उत्तमप्रकारें पार पाडला. बेळगांव जिल्हा हा राजकीय दृष्ट्या कर्नाटकांत आहे, अशा अर्थाचा एक ठराव मीं संमेलनाच्या विषयनियामक कमिटींत मांडला होता. व तात्यासाहेब केळकरांनीं त्याला पाठिंबा दिला होता. ठरावाला विरोध करणारीं बरींच भाषणें झालीं. उलट बेळगांव जिल्हा हा महाराष्ट्राचाच भाग आहे, अशा आशयाचा ठरावही दुसऱ्या कांहीं मंडळींनीं आणला होता. शिवरामपंतांचें धोरण काय आहे, हें त्यांनीं वादविवादाच्या वेळीं दाखविलें नाहीं. पण, अखेर हें वादाचें विषबीज वाढूं नये म्हणून तो विषय साहित्य-संमेलनाच्या क्षेत्रांत येत नाहीं, असा अध्यक्षीय निकाल देऊन दोन्ही ठराव

नियमबाह्य ठरविले व वाद थांबविला. विरुद्ध पक्षांतील केळकरांनीं मला पाठिंबा द्यावा व आमच्या पक्षांतील शिवरामपंतांनीं एक प्रकारें चाणाक्षपणा दाखवून विरोध करावा याचें मला त्या वेळीं वैषम्य वाटलें. पण विचारांतीं राजकीय दृष्ट्या प्रांतविभागणीसारखा विषय साहित्यसंमेलनाच्या क्षेत्रांत येत नाहीं हें मला पटलें.

शिवरामपंतांच्या लेखी अगर तोंडी प्रचारकार्यांत आंकडेगिरीची मोड-तोड फारशी नव्हती. देशाला स्वातंत्र्याची आवश्यकता आहे हें पटवून देण्याला आंकडेशास्त्राचा आधार कशाला घ्यावा असेंच त्यांना वाटलें असावें. आंकड्यानें आमची गरिबी, जीवनांतील सर्व भागांतील कमीपणा सिद्ध करून इंग्रजी राज्यकर्त्यांचें धोरण थोडेंच बदलणार होतें? स्वातंत्र्य हा उपजत हक्काचाच विषय आहे ही जाणीव त्यांनीं लोकांना करून दिली. व तो हक्क कसा प्राप्त करून घ्यावा हें परदेशांतील व स्वदेशांतील ऐतिहासिक पुरुषांनीं कसे प्रयत्न केले याचीं रसभरित वर्णनें करून लोकांना कार्यप्रवृत्त करण्या-कडे त्यांचा रोख होता.

शिवरामपंतांच्या बुद्धीला व स्वातंत्र्यप्रेमी वृत्तीला प्रतिकूल परिस्थिती-मुळें वाव मिळाला नाहीं. स्वतंत्र हिंदुस्थानांत त्यांची मोठे पंडित म्हणून ख्याति झाली असती हें निश्चित आहे. त्या कालांत देखील स्वातंत्र्याला धोका येण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली असती तर त्यांनीं आपल्या बुद्धीला मुत्सद्देगिरीचें वळण लावलें असतें व त्यांची श्रद्धा शस्त्रबलावर असल्या-कारणानें त्यांनीं हातांत तलवारही धरली असती. अथवा मुत्सद्देगिरी व तलवारबहादुरी यांचें मिश्रणही त्यांच्यांत दिसलें असतें.

त्यांच्या मृत्यूनंतर २।३ वर्षांतच १९३०–१९३२ सालीं जीं आंदोलनें झालीं त्यांचा परिणाम त्यांच्या भावनात्मक बुद्धीवर होऊन अहिंसेंत प्रभावी शक्ति आहे हें त्यांना पटलें असतें. दहशतवादाचा प्रयोग मोठ्या प्रमाणावर होणें शक्य नाहीं, व तो परिणामीं यशस्वीही होणार नाहीं, असा अनुभव आलेला होता. देशांत आधुनिक युद्धशास्त्रांना उपयोगी पडतील अशीं शस्त्रास्त्रें उत्पन्न करण्याचीं साधनें उपलब्ध नाहींत व तीं बाहेरून आणतां येणार

नाहींत, अशा स्थितींत कांहीं नव्या मार्गाचा अवलंब करण्याचीच आवश्यकता होती. १९२० सालीं अहिंसात्मक असहकाराची चळवळ ही कांहींतरी एक हुल्लड आहे व तींतूनच क्रांतिकारक हिंसात्मक कांहीं तरी उठाव होईल, या आशेनें अहिंसेवर विश्वास नसणाऱ्या कित्येकांनीं त्यांत भाग घेतला होता. गांधींनीं ती चळवळ हुल्लड नसून ती पद्धतशीर चालविल्यास तिच्यामध्यें हिंसेच्या चळवळीपेक्षां जास्त शक्ति आहे, याचीं कांहीं प्रात्यक्षिकें दाखविलीं. तेव्हां पुष्कळांच्या वृत्तींत बदल होऊन त्यांनीं या अभिनव प्रयोगाचा मनापासून अंगीकार केला. अशा मंडळींतच शिवरामपंतांची गणना होऊन त्यांनीं आपल्या तेजस्वी वाणीचा व लेखनाचा उपयोग करून, त्या प्रयोगाचा शास्त्रीय पद्धतीनें पुरस्कार केला असता.

बंगालच्या फाळणीच्या चळवळीच्या वेळीं जो बहिष्काराचा प्रयोग चालला होता त्याला Passive Resistance असें म्हणण्यांत येत असे. याचा अर्थ त्या किंवा तशा प्रकारच्या चळवळींत Resistance चा active भाग असें मानण्यांत येई. पण गांधींनीं आपल्या चळवळीची जी मीमांसा केली आहे तिजवरून ती चळवळ केवळ अभावरूप नसून, तींत प्रत्यक्ष ( active ) प्रतिकाराचें (Resistance) सामर्थ्य आहे हें आतां सिद्ध झालें आहे. लोकांमध्यें ताठरपणा यावा, निर्भयवृत्ति बाणावी हाच शिवरामपंतांच्या प्रयत्नाचा मुख्य पाया होता. तो गांधींच्या सत्याग्रहानें आतां निर्विवाद सिद्ध झाला आहे.

शिवरामपंतांच्या खासगी जीवनाची मला फारशी माहिती नाहीं. खाजगी बैठकींत बरोबरीच्या व विश्वासांतील स्नेह्यांबरोबर ते मोकळेपणानें बोलत असत. हास्यविनोद त्यांच्या संभाषणांत भरपूर असे. मोठ्या प्रश्नावर ते गंभीरपणेंही विचार करीत. वासुकाका जोशी, कृष्णाजीपंत खाडिलकर, यांच्याशीं ते विचारविनिमय करीत असतांना असे प्रसंग मीं पुष्कळ पाहिले आहेत.

त्यांच्या घरीं पाहुणा म्हणून रहाण्याचा मला एकदांच योग आला होता. त्यावेळीं त्यांच्या घरांतील त्यांची शिस्त व पाहुण्याची व्यवस्था ठेवण्याची दक्षता पाहून मी थोडा संकोची वृत्तीचा मनुष्य असल्यामुळें माझा जीव गुदमरल्यासारखा झाला. अतिथिसत्काराकडे किती बारीक नजरेनें ते लक्ष घालीत हें पाहून मला त्यांचें कौतुक वाटलें.

वरील विवेचनांत मीं शिवरामपंतांच्या विद्वत्तेबद्दल व वाङ्मयाबद्दल साहित्यशास्त्रदृष्ट्या चर्चा केली नाहीं. याचें कारण त्या क्षेत्रांत माझा अधिकार नाहीं. वर नमूद केलेल्या बेळगांवच्या मराठी साहित्य-संमेलनाच्या वेळीं त्यांची अध्यक्ष म्हणून सूचना करण्याचें काम मला सांगण्यांत आलें होतें. त्यावेळीं शिवरामपंतांचा साहित्यांत दर्जा काय आहे, त्यांची विद्वत्ता किती आहे वगैरे सांगण्याचा प्रसंग होता. पण, तें सांगणें माझ्या अधिकाराबाहेर असल्याकारणानें शिवरामपंत ज्या लोकांकरितां वर्तमानपत्रांतून लेख लिहीत असत, भाषणें करीत असत, त्यांपैकींच मी एक असल्यानें त्यांच्या साहित्याचा परिणाम अशा लोकांवर काय झाला हेंच मीं सांगितलें. त्यांनीं आपल्या साहित्यानें मरणोन्मुख असलेल्या समाजांत चैतन्य भरवून त्याच्या भावना उत्कट करून पारतंत्र्याबद्दल अत्यंत चीड उत्पन्न केली, व त्यांना स्वातंत्र्योन्मुख केलें असें मीं म्हटलें होतें. ध्येयनिष्ठा व जीवितसाफल्य हीं जर वाङ्मयाचीं चिन्हें समजावयाचीं, तर तीं शिवरामपंतांच्या वाङ्मयांत भरपूर आहेत. शिवाय त्यांच्या साहित्यांत विद्वत्ता व कला हीं ओतप्रोत भरलेलीं आहेत. हे त्यांचे गुण कोणी अमान्य करतील असें वाटत नाहीं. त्यांच्यासारखा भावनांना उद्दीपित करून बुद्धीनें आपलें म्हणणें पटवून देणारा कलावंत लेखक व वक्ता महाराष्ट्रांत अद्यापि जन्मावयाचा आहे, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं. प्रत्यक्ष कार्यरूपी क्रांति करण्यापूर्वी विचाराची क्रांति करावी लागते. तें काम शिवरामपंतांनीं यशस्वी रीतीनें केलें व त्याबद्दल महाराष्ट्र त्यांचा सदैव ऋणी राहील.

शिवरामपंतांसारखा कलावंत विद्वान्,स्वातंत्र्यप्रेमी देशभक्त अकालीं निधन पावल्यानें महाराष्ट्राची हानि झाली यांत संशय नाहीं. तथापि त्यांचें जीवनचरित्र डोळ्यापुढें ठेवून देशकालपरिस्थितीला अनुसरून त्यांचें अनुकरण करावें व देशाला स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रयत्नांना साहाय्य करावें अशी शेवटीं महाराष्ट्रांतील जनतेला प्रार्थना करून ही प्रस्तावना मी पुरी करतों.

**बेळगांव**
ता. १७।९।४५

**गंगाधर बाळकृष्ण देशपांडे**

Date 28-8-45.

My dear Mahatmaji,

I wish I had not troubled you. But I thought it to be worth while. It is for you to judge.

I am the grandson of Shivrampant Paranjpe ... ... I have written his life. The book is to be published on his 16th aniversary day i. e. the 27th of September 1945.

I want a few words (not even lines) from your pen-depicting, describing or concerning him. I know your few lines speak volumes. Your writing always reminds one of the Sanskrit verse—

श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः

You must be remembering him. You had come to us in 1923 and after, whenever you came to Poona. ( I do not wish to divert by stating how as a boy, I was then thrilled by your coming. )

I know your time is precious. I, therefore, beg of you not to spend more than five minutes in writing a few words for the book.

Yours sincerely,
V. K. Paranjpe.

પુના ૨૧-૮-૩૨

ભાઈ વાલનજી આપરાં ગણે,

આપનો પત્ર મળ્યો છે.

આપને પિતાજીનું ઉઠવું ખરાબ

પડ્યું છે. વેઠવું જોઈએ. ઈશ્વર રક્ષે.

આપનો,

મો. ક. ગાંધી

# हृदयाविष्करण

आकाश-अंत न कळोनिहि अंतरिक्षीं
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी

आपल्या वाडवडिलांची कीर्ति आपणच सांगितली असतां त्या गोष्टीला काय म्हणावें, हें समर्थांनीं दासबोधांत एके ठिकाणीं सांगून ठेवलें आहे. याची जाणीव असतांनाही तसें करण्याची प्रवृत्ति कां व्हावी, तें कळविण्यासाठींच हें हृदयाविष्करण आहे.

काळकर्ते शिवरामपंत परांजपे यांची गणना महाराष्ट्रांतील महापुरुषांच्या मालिकेंत करण्यांत येते. त्यांनीं आपल्या वाणीनें आणि लेखणीनें जी कामगिरी केली ती हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहील. वीर सावरकर आपल्या पत्रांत लिहितात :

...शिवरामपंतांनीं, काळकर्त्यांनीं त्यांच्या काळच्या एका, दोघा, तिघा सबंध पिढ्यांच्या राजकीय जीवनावर आपल्या क्रांतिकारक विचारांचा ठसा पाडला ! हेंच त्यांचें चरित्र ! ... [ता. ११-९-४५ ]

खरोखर सुदैव आपल्या महाराष्ट्रीयांचें कीं, चिपळूणकर-टिळक-परांजपे असे सुपुत्र महाराष्ट्र-लक्ष्मीच्या उदरांतून पाठीला पाठ लावून आल्यासारखे एकामागून एक निघाले. यांचीं नांवें निघतांच तो जळजळीतपणा, तो पोटांतला पीळ, तो खरा जातिवंत महाराष्ट्रीय बाणा, तें ज्ञानगांभीर्य आणि भावनोत्कटता व या सर्वांचाही स्वातंत्र्य-संपादनार्थ उपयोग करण्यांतील त्यांची ती धडाडी आणि ध्येयनिष्ठा-असा तो सारा गुणसमुच्चय एकवटून डोळ्यांसमोर उभा रहातो. पण आतां हा हा गुणगण अशरण झाला आहे कीं काय अशी शंका मनाला चाटून जाते.

कदाचित् आपण वर्तमानकाळाच्या फार जवळ असल्यामुळेंही तसा भास होत असेल. तें कसेंही असो, पण तीं माणसें गेलीं, एवढी गोष्ट खरी. वसुंधरेप्रमाणेंच काळ हाही बहुरत्न आहे. फरक इतकाच कीं, रत्नें पृथ्वीच्या पोटांतून बाहेर येतात तर काळाच्या पोटांत तीं गडप होतात! परंतु कांहीं रत्नें अशीं असतात कीं, तीं कालकवलित झालीं तरीही त्यांचा कीर्तिप्रकाश त्यांच्या मागें कायमच रहातो. एका कवीनें लिहिलें आहे—

Virtue lives, when beauty dies

शिवरामपंतांची गणना या कोटींत होत असल्यामुळें त्यांच्या जीवनाचें रहस्य आणि कामगिरीचें मर्म उकलून दाखविणारा विस्तृत चरित्रग्रंथ यापूर्वींच व्हावयास पाहिजे होता. अर्थात् हें काम यथायोग्य रीतीनें व्हावयाचें तर तें त्यांच्या काळांतल्या माहितगार व अधिकारी माणसांच्या हातूनच व्हावयास हवें होतें. पण अनेक कारणांनीं का होईना, तें होऊं शकलें नाहीं एवढी गोष्ट खरी. म्हणूनच हें पुस्तक लिहिलें आहे.

ह्या पुस्तकांत शिवरामपंतांचा जीवनवृत्तांत सुसंगत असा दिला आहे. यांत त्यांचें स्वभाव-दर्शन, वक्तृत्व, वाङ्मय यांची चिकित्सा व योग्यता आणि कामगिरी यांचें दिग्दर्शन ठिकठिकाणीं ओघानें आलें तसें केलेलें आहेच. तथापि या सर्वांचें ठळकपणें दर्शन व्हावयाचें तर त्याकरितां स्वतंत्रच ग्रंथ लिहिला पाहिजे.

प्रस्तुत पुस्तक लिहितांना श्री. हरि सखाराम गोखले यांनीं आत्मीयतेनें जें साहाय्य केलें, त्याचें मोलच करतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें माझे स्नेही श्री. ग. रा. जोग, शं.स.ओक, श्री.बापू पाटणकर,कमला देशमुख व वकील-मित्र गो.ल. आपटे व ना. कृ. देशपांडे यांची सर्वतोपरी मदत झालेली आहे. जुनी माहिती दे. भ. खाडिलकर, बाबासाहेब पोतदार, शंकरराव लवाटे,दादासाहेब रानडे, वीर सावरकर इत्यादि मंडळींनीं आस्थापूर्वक सांगितली,त्यांचा मी आभारी आहें. बॅ. मेहेंदळे,सरदार कानडे व शिवरामपंतांचे चिरंजीव श्री. विनायकराव यांनीं ठसे करण्याकरितां आपल्याजवळच्या तसबिरा दिल्या,याचा आभारपूर्वक उल्लेख करणें अवश्य आहे.पुस्तकाचें बाह्यांग सजविण्याची मनांतली कल्पना चित्रार्पित करून छापण्याचें सर्व श्रेय कलावंत श्री. दलाल व मुंबईचा वागळे प्रेस यांचें आहे. पूर्वीं पुस्तक लिहून झालें म्हणजे अर्धी लढाई जिंकली

अशी स्थिति असे. परंतु या लढाईच्या दिवसांत ती स्थिति पार बदलून गेली आहे. प्रकाशक प्रो. देशपांडे यांनीं आयत्या वेळीं आपला कागदाचा सांठा दिला नसता, तर हें पुस्तक निघालें नसतें. तसेंच कै.वासुकाका यांच्या वेळचे जुने संबंध स्मरून चित्रशाळेनें दीड महिन्याचे आंत हस्तलिखिताचें मुद्रितांत रूपांतर करून दिलें याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें, हें मी माझें कर्तव्य समजतों. चित्रशाळेच्या व्यवस्थापकांपासून ते जुळणीस–कामगारांपर्यंत सर्वांना वाटणाऱ्या आस्थेनें मला चकित आणि आनंदित करून सोडलें.

अखेर राहिले प्रस्तावना-लेखक.त्यांची माझी ओळखही नव्हती. पण साधे पत्र जातांच त्यांनीं अनुकूलता दर्शविली. व थोडा नेट धरतांच त्यांचें संमति-पत्र आलें. सौजन्य आणि सरळपणा हे जगांतले दुर्मिळ आणि मोहून टाकणारे गुण आहेत, यांत संशय नाहीं. शिवरामपंतांचे समकालीन स्नेही व सहकारी दे. भ. गंगाधररावजी यांनीं समरस होऊन किती मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे, हें सांगावयास नको. त्यांचेजवळ मागितली होती प्रस्तावना, तर त्याच्या जोडीला त्यांत त्यांनीं आपल्या आठवणीही नमूद केल्या आहेत. अंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन म्हणतात तें हें असें. महात्माजींनीं वेळांत वेळ काढून सारभूत असे **दोन शब्द** लिहून पाठविले, याबद्दल काय लिहावें हेंच सुचत नाहीं !

प्रस्तुत पुस्तक हें या सर्व मंडळींचा स्नेह, सहकार्य व सहानुभूति यांचेंच दृश्य फळ होय. असो. एकंदरींत बरेच दिवसांपासून—

**वाटे चरित्र त्यांचें कांहीं आपण तरावया गावें**

अशी मनाची अवस्था होतीच.पण वर सांगितलेलीं कारणें अधिक प्रेरक व उत्तेजक ठरलीं यांत शंका नाहीं.तथापि शिवरामपंतांसारख्याचें चित्र आणि चरित्र प्रत्यक्ष रेखाटतांना 'उद्बाहुरिव वामनः' अशी अक्षरशः स्थिति होऊं लागली ! परंतु कशींही लिहिलीं तरी थोरांचीं चरित्रें दीपगृहाप्रमाणें मार्गदर्शक आणि स्फूर्तिदायक होत असतात हें लक्षांत आणून आणि केवळ 'अकरणात् मंदकरणं श्रेयः' या बुद्धीनेंच नाव ढकलली आहे. हां, एक काळजी मात्र अवश्य घेतली आहे. चरित्र लिहितांना पक्षनिष्ठतेची दृष्टि ठेवलेली नाहीं. घडलेल्या गोष्टी सादर केल्या आहेत. इतिहास–मंदिरांत सत्य हेंच परमदैवत मानले

पाहिजे, हें उघड आहे. माहिती व विवेचनें साधार आणि कसोशीनें केलेलीं आहेत.

जगांत सोयीपेक्षां अडचणीच अधिक भेटतात, हा सर्वसामान्य सिद्धांत चरित्र-लेखनालाही लागू पडतो. त्यांतून बराच काळ लोटल्यानंतर चरित्र लिहावयाला बसलें म्हणजे त्या काळांतल्या कांहीं गोष्टी कळू शकत नाहींत. कांहीं कळल्या तरी सांगतां येत नाहींत. आणि कांही कळल्याबरोबर ग्रंथार्पित करून टाकणें इष्ट असतें. शेक्सपिअरनें आपल्या एका नाटकांत–

All the world's a stage:
And all the men and women merely players:
They have their exits and their entrances;
And one man in his time plays many parts.

असें मोठें मार्मिक वाक्य घातलें आहे. त्यांतल्या कल्पनेच्या दृष्टीनें पाहिलें तर मनुष्यमात्राच्या जीवन-नाटकाचा कांहीं भागच प्रेक्षकांना दिसत असतो. तो दृश्य भाग एका दृष्टीनें जितका महत्त्वाचा, तितकाच दुसरा अदृश्य भाग दुसऱ्या दृष्टीनें महत्त्वाचा असतो. प्रेक्षकांनाही पडद्याचे आंत काय चाललें आहे, हें जाणण्याचें कुतूहल असतें. कां? त्यांतही कांहीं महत्त्व आहे, शिक्षण आहे. पडद्याच्या आंत व पडद्याच्या बाहेर या दोहोंनीं मिळूनच नाटकाला पूर्णत्व येत असतें. खरा जीवनवृत्तांत म्हणजे हा मधला पडदा गुंडाळून बाजूला सारणें होय! तोच प्रयत्न पुढील पानांतून केलेला सांपडेल......

६ शुक्रवार, पुणें २
सोळावा स्मृतिदिन
२७ सप्टेंबर १९४५

वामन कृष्ण परांजपे

---

# प्रकरणें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | पूर्वज, जन्म आणि बाल्य | - | - | १–२५ |
| २ | मनःक्रांति | - | - | २६–३७ |
| ३ | विद्यादेवीची आराधना | - | - | ३८–६२ |
| ४ | प्रोफेसर परांजपे | - - | - | ६३–७८ |
| ५ | ध्येय कोणतें ?–स्वातंत्र्य | - | - | ७९–९४ |
| ६ | 'काळा'चा अवतार | - | - | ९५–११८ |
| ७ | राजकीय कार्य व धोरण | - | - | ११९–१४६ |
| ८ | काळानें उग्र स्वरूप धारण केलें | - | - | १४७–१६० |
| ९ | स्वदेशभक्तीवर राजद्रोहाचा आरोप | - | - | १६१–१८९ |
| १० | मुक्ततेनंतरचे दोन आघात | - | - | १९०–२१४ |
| ११ | स्वल्पविराम | - - | - | २१५–२३२ |
| १२ | पुन्हा राजकारण | - - | - | २३३–२६० |
| १३ | असहकारिता विरुद्ध कौन्सिल-प्रवेश | - | - | २६१–२८२ |
| १४ | बेकीची एकी | - - | - | २८३–२९३ |
| १५ | उपान्त्य प्रकरण | - - | - | २९४–३१२ |
| १६ | अतृप्त आत्म्याचें प्रयाण | - - | - | ३१३–३२० |

## छाया-चित्रः

शिवरामपंत परांजपे

डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थी

महाराष्ट्र कॉलेजांतील प्रोफेसर

टिळक-परांजपे

सरदार कानड्यांचा ( कौनकरांचा ) वाडा

त्या वाड्यांतील सोनेरी रंगमहाल

पति-पत्नी

कृ० शि० परांजपे

असहकारयुगांतले अण्णासाहेब

मुळशी-सत्याग्रहाला निघण्यापूर्वी

महाराष्ट्र प्रां. परिषद् (परांजपे भाषण करतांना)


बेळगांव साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष

प्रयाण

— न मातुः परदैवतम् —

मुलांना सांवली करण्याकरितां

जिनें ऊन सोसलें, त्या ग्रहिनीस-



शिवरामपंत परांजपे

## काळकर्ते

# शिवरामपंत परांजपे

## पूर्वज, जन्म आणि बाल्य

" शिवाजी लहान होता. वडिलांचा धाक आणि आईची प्रीति यांच्या मिश्रणामध्यें कधीं विद्या तर कधीं क्रीडा अशा अवस्थेंत त्याचे दिवस जात होते. "

—शि. म. परांजपे

महाराष्ट्राचें स्वातंत्र्य हरपलें त्या १८१८ या अविस्मरणीय सालानंतर अठराशें सत्तावन सालांतलें बंड हीं परकीय पाशांत सांपडलेल्या हिंदुस्थानानें केलेली सामुदायिक व सशस्त्र अशी अखेरची उठावणी होय. सत्तावन सालचें बंड नसून तो एक क्रांतीचा फसलेला प्रयत्न होता, असें खुद्द काळकर्त्यांनींच १९०४ मध्यें 'काळांत' लिहिलें होतें. कदाचित् हीच कल्पना उचलून सावरकरांनीं पुढें ' सत्तावनचें क्रांतियुद्ध ' असें या विषयावर स्वतंत्र पुस्तक लिहिलें असावें. या सत्तावनच्या क्रांतियुद्धानंतर लवकरच, पकडलेल्या सापाचे दांत पाडावे किंवा सांपडलेल्या वाघाचीं नखें काढावीं त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांचीं शस्त्रें त्यांच्यापासून हिरावून

घेण्यांत आली. आणि तेव्हांपासून निःशस्त्र हिंदुस्थानाच्या इतिहासाला सुरुवात झाली. आपला देश खरा परतंत्र त्या वेळींच झाला, असेंही कांहीं लोक मानतात. कारण त्यानंतर सामुदायिक—सार्वत्रिक—असा सशस्त्र झगडा करण्याची शक्यता संपुष्टांत आली. त्यानंतर निघाले वासुदेव बळवंत फडके, पण त्यांचा प्रयत्न वैयक्तिक आणि लहान प्रमाणावर असल्यामुळें यशस्वी झाला नाहीं. होणें शक्यही नव्हतें. येथून पुढें मात्र गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याची ऊर्मि निराळ्या मार्गांनीं वाहूं लागली. इंग्रज राज्यकर्त्यांनीं या देशांत नवीन सुरू केलेल्या शिक्षणांत तरबेज झालेल्या सुशिक्षित लोकांच्या हातांत राजकारण आलें. व वैचारिक सनदशीर प्रयत्नांना सुरुवात झाली. या अवधींत व पुढें महाराष्ट्रांत व इतरत्र देशोद्धाराचा हेतु मनांत धरून कार्य करणारे कित्येक थोर पुरुष निघाले, यांत शंका नाहीं. त्यांपैकीं कोणाचा कल सरकारकडे अर्ज-विनंत्या करण्याच्या राजकारणाकडे, कोणाचा भर सामाजिक सुधारणांवर, तर कोणी सनदशीर चळवळींवर जोर देणारे असे असत. परंतु त्यांत मनानें व कृतीनेंही बंडखोर बनण्याला स्फूर्ति—उत्तेजन देणारे असे स्वातंत्र्योपासक 'काळ'कर्ते शिवराम महादेव परांजपे हेच निघाले, यांत संशय नाहीं. शिवरामपंत टिळकांच्या असंतोष-जनकत्वाच्याही दोन पावलें पुढें असत. टिळक असंतोषाचे जनक खरे; पण असंतोष ही मनोवृत्तीच त्या शब्दाप्रमाणें अकरण-रूप ( Negative ) आहे. लोकांच्या हातून प्रत्यक्ष कांहीं होण्याला प्रवृत्तिपर किंवा चेतविणारा असाच मनोविकार जागृत व्हावा लागतो. अशा स्वरूपाची जळजळ किंवा तिडीक शिवरामपंतांनीं महाराष्ट्राच्या मनांत उत्पन्न केली. संपूर्ण स्वातंत्र्य हें ध्येय आणि तें साध्य होण्याकरितां शस्त्रधारण हें साधन, या मंत्राचे मूळ द्रष्टे तेच. आणि या रोखठोक खणखणीत तत्त्वज्ञानाचा आपल्या अवगुंठित भाषेमध्यें प्रसार करणारे आद्यप्रवर्तक म्हणजेच 'काळ'कर्ते शिवरामपंत. अर्थात् त्याकरितां सरकारनें त्यांना राजद्रोहाच्या कलमाखालीं द्वेष व अप्रीति पसरविल्याबद्दल शिक्षा देऊन तुरुंगांत टाकावें, हें क्रमप्राप्तच होतें ! पण त्यांचें सर्व राजकीय तत्त्वज्ञान ज्या काळ—

वाङ्मयांत सांठविलेलें आहे, तेंही सरकारनें जप्त केलें. त्यांत खरे शिवरामपंत आहेत! त्यामुळें नवीन पिढ्यांना एरवीं जी त्यांची ओळख त्यांच्या लिखाणामुळें रहावयाची तीही रहाण्याचा संभव तूर्त तरी दिसत नाहीं. यामुळेंच शिवरामपंतांचें चरित्र लिहिण्याची आवश्यकता दुणावली आहे.

प्रत्येक व्यक्ति ही जणुं कांहीं तिच्या वंशवृक्षाच्या पारंबीसारखी आहे. मूळ वृक्षांतील गुणधर्म पारंबींत उतरतात आणि कालगतीनें त्या पारंबीचाच स्वतंत्र वृक्ष बनून फिरून त्यालाही पारंब्या फुटूं लागतात. कोणीही मोठा मनुष्य झाला म्हणजे तो आकाशांतून पडला आणि धरणीवर सांवरला, असें होत नाहीं. जगाच्या रंगभूमीवर प्रविष्ट होणाऱ्या मनुष्यमात्राला आईबापांच्या पोटींच जन्म घ्यावा लागत असतो. अर्थातच त्यांच्या पिंडाप्रमाणें मानसिक व बौद्धिक शक्तीही कमीअधिक प्रमाणांत कां होईना, पण आनुवंशिकतेनें त्याच्यामध्यें उतरत असतात. मनुष्य हा पूर्वकर्मानें बांधलेला असतो असा एक आपल्या वेदांतशास्त्रांतील सिद्धान्त आहे. तो खरा असो वा नसो. पण पूर्वजांमधील बऱ्यावाईट गुणांनीं, प्रवृत्तींनीं किंवा योग्यायोग्यतेच्या मर्यादांनीं मनुष्य बांधला जातो हा नियम मात्र बुद्धीला पटण्यासारखा आहे. झाडावर फळ येतें तें ज्या मानानें झाड पोसलें गेलें असेल किंवा ज्या जातीचें झाड असेल त्यावर अवलंबून असतें, हा जीव-शास्त्रांतला नियम मनुष्यालाही बरोबर लागू पडतो. Nature vs. Nurture किंवा निसर्गसिद्धता विरुद्ध शिक्षण असा एक वाद आहे. शिक्षण देऊन यक्षिणीची कांडी फिरविल्यासारखे झालेले चमत्कारही कांहीं वेळां दाखवून देतां येण्यासारखे असले तरी आनुवंशिकता म्हणूनही कांहीं असतेच, हें नाकबूल करतां येत नाहीं. म्हणून शेवटीं—

आनुवंशिकता + परिस्थिति + भवितव्यता = मनुष्यमात्राचें जीवन

असेंच समीकरण सिद्ध होतें. एवढ्याचकरितां कोणाच्याही चरित्राचें मर्म समजून घेण्याला थोडें मागें जाऊन त्या व्यक्तीच्या वंश-वृत्तांतांत डोकावून पहाणें अगत्याचें असतें.

ब्राह्मणसमाजांतील विष्णुवर्धनगोत्री परांजप्यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील राजापूर तालुक्यांतलें देवाचें गोठणें हें होय. श्रीवर्धनचें भट घराणें पुण्यास पेशवेपद पावल्यानंतर जे कोंकणांतील लोक भाग्योदय होण्याकरितां देशावर आले, त्यांतच या घराण्यांतील पुरुषांची गणना होते. शिवरामपंतांचे पणजोबा सदाशिवराव हे सवाई माधवराव पेशवे यांच्या पदरीं नोकर होते. त्यांच्या राजवटींत गुणांचें चीज होण्याला वाव होता. पण दुर्दैवानें सवाई माधवरावांचें राज्य औटघटकेचें ठरलें आणि लवकरच रावबाजींची उलटापालटीची कारकीर्द सुरू झाली. ओघानेंच सदाशिवरावांना पुण्यास रावबाजींच्या हाताखालीं दिवस काढण्याचा प्रसंग आला. परंतु रावबाजींना गुणी माणसाच्या गुणांची परीक्षा नसल्यामुळें ते त्यांचा पदोपदीं अपमान मात्र करूं लागले. हा मानभंग सहन न होऊन सदाशिवरावांनीं राजसेवा व राजधानी दोन्हीही एकदमच सोडलीं व ते पुन्हां कोंकणांत—पण कुलाबा जिल्ह्यांत महाड येथें जाऊन राहिले. स्वाभिमान व बाणेदारपणा हे गुण शिवरामपंतांनीं वारसा—हक्कानें मिळविले असावेत, असें दिसतें. असो. एक काळ असा होता कीं, आपल्या बुद्धीच्या किंवा बाहुबलाच्या जोरावर नशीब काढूं पहाणाऱ्या लोकांचा ओघ कोंकणांतून वर—घाटाकडे वहात असे. पण रावबाजींच्या उलट्या काळांत तो ओघ थांबला; एवढेंच नव्हे तर उलट दिशेनें वाहूं लागला, हें काल-माहात्म्य लक्षांत घेण्यासारखें आहे. राजे किंवा सत्ताधारीच नादान निपजले म्हणजे अशा गोष्टी अपरिहार्य होत !

सदाशिवरावांनीं पुणें सोडल्यानंतर आपल्या गांवीं म्हणजे गोठण्याला जाऊन न रहातां त्यांनीं महाड कां पसंत केलें, हें समजणें कठीण आहे. तथापि त्यावरून एक गोष्ट निश्चित होते ती अशी कीं, गोठण्यास त्यांचें घरदार, शेतीवाडी इत्यादि स्थावर मिळकत कांहींच नसावी. अशा स्थितींत नोकरी सोडल्यामुळें गरिबींत दिवस कंठावयाचे मग आपल्या गांवापेक्षां दुसरीकडेच राहिलेलें काय वाईट, असाही त्यांचा विचार असावा. आणि सदाशिवरावांची बाणेदार वृत्ति त्यांच्या मुलाला भोंवली खरीच. त्यांचा एकुलता एक मुलगा म्हणजे शिवराम ऊर्फ बाबा. सदाशिवरावांनीं आपलें उर्वरित आयुष्य कसेंबसें काढलें असेल, पण बाबांची स्थिति

मात्र फारच बिकट झाली. त्यांच्या वेळीं घरांत अतिशय गरिबी असे. त्यांच्या पत्नीचें नांव सीताबाई. या दंपत्याला तीन मुली होत्या. पैकीं धाकटी वाराणशी श्रीवर्धनच्या जोशांकडे दिलेली होती. परंतु दुर्दैवानें बालवैधव्य नशिबीं आल्यामुळें ती माहेरीं म्हणजे बाबांकडेच राहात असे. तिला ताई म्हणत. बाबांना मुलगा एकच–महादेव. हा महादेव म्हणजेच शिवरामपंतांचे वडील. वैधव्यामुळें स्वतःचा संसार उध्वस्त झालेल्या ताईनें पुढें आपल्या भावाचा–महादेवाचा–संसार आपलाच समजून मोठ्या प्रेमानें आणि दक्षतेनें केला.

त्या काळांत परांजप्यांच्या घरीं अंघोळीकरितां मडक्यांतून पाणी तापवीत असत, असें सांगतात. बाबांना वैद्यकी व गायनकला चांगली अवगत होती. तथापि इतकी गरिबी व नड असूनही निःस्पृहपणाच्या वर्तनानें व औषध दिलें तरी रोगी स्वसंतोषानें काय देईल तें घ्यावयाचें अशा वृत्तीमुळें बाबांना व्हावी तशी प्राप्ति मुळींच होत नसे. म्हणूनच कीं काय, बाबा महाडांत आणि आसपासच्या गांवांत कीर्तनें करीत असत. वैद्यकी व कथा-कीर्तन यांवर कसातरी प्रपंच चालत असे. चांगले वैद्य व गवई अशी त्यांची प्रसिद्धि होती, तथापि दारिद्र्यानें त्यांना अखेर-पर्यंत सोडलें नाहीं. नाहीं म्हणायला त्यांच्या आयुष्याच्या शेवटीं शेवटीं गांवांतली एक बखळ–जागा त्यांना मिळाली. त्याची हकीकत अशी: महाडचा एक गुजर–वाणी आजारी होऊन आसन्नमरण स्थितींत पडला होता. बाबांच्यावर त्याची श्रद्धा असल्यामुळें त्याला त्यांचेंच औषध चालू होतें. औषधानें गुण येऊन तो वाणी आजारांतून उठला आणि खडखडीत बरा झाला. त्यानंतर एके दिवशीं बाबांकडे येऊन त्या वाण्यानें सांगितलें कीं, "महाराज, माझ्यापाशीं आपल्याला देण्याला रोकड नाहीं; परंतु माझी एक बखळ–जागा आहे, ती आपल्याला द्यावी असा माझा हेतु आहे. त्यावर घर-इमला काय बांधायचा तो आपण बांधावा." थोड्याच दिवसांत वाण्यानें महाडच्या पूर्वेस काकरतळें नांवाचें एक तळें आहे, त्याच्या लगतच्या त्याच्या जागेचें बक्षीसपत्र बाबांच्या नांवानें करून दिलें. अशा रीतीनें जागा मिळाली तरी त्यावर घर बांधणें म्हणजे हत्ती मिळाला तरी तो पोसण्याइतकेंच दुर्घट होतें. तथापि, लहानसें कां होईना, पण स्वतःचें घर करावें या हौसेनें म्हणा किंवा जागेचा दात्याच्या

इच्छेनुसार कांहींतरी उपयोग केला पाहिजे म्हणून म्हणा, पण शिवराम-बावांनी दगडावर दगड घालून त्या विस्तीर्ण जागेत एक चारच खणी खोपट-वजा घर उभें केलें. पाण्याच्या सोईकरितां त्याच्या समोरच दहावीस हातांवर विहीर खणली व शेजारच्या डोंगराचे कातळ हळू हळू स्वतः वाहून आणून त्यांनीं ती बांधून काढली. या खोपटाला घर बांधलें असें म्हणणें थोडें धाष्टर्याचेंच काम आहे. तरीसुद्धां भाड्याच्या घरांतून या सत्तेच्या घरांत आपल्या कुटुंबीयांसह प्रवेश करतांना बावांना किती आनंद आणि कौतुक वाटलें असेल! त्यांतून नुकतेंच मुलाचें लग्न करून सून आणलेली. इंदूरच्या मालशे घराण्यांतील यमूताई महादेवाला करून घेतली होती. तिचें सासरचें नांव पार्वती असें ठेवलें होतें. पण बाबांच्या मृत्यूची वेळ जवळ येऊन ठेपली होती. मरतेसमयीं त्यांनीं आपल्या एकुलत्या मुलाला जवळ बोलावून सांगितलें, " महादेवा, मरतांना मीं तुला मिळकत कांहीं ठेवली नाहीं हें खरें, पण तुला मागें कर्जही ठेवलं नाहीं. आतां तुझं तूं पहा! " असें बोलून शिवरामबावांनीं त्या खोपटांतच प्राण सोडला. त्या खोपटांतच आणखी बारा वर्षांनीं त्यांचा प्रसिद्ध नातू जन्माला यावयाचा होता.

वडील वारले त्या वेळीं महादेव—किंवा माधवराव सुमारें वीस-बावीस वर्षांचे होते. कुटुंबाचा भार आतां त्यांच्यावर येऊन पडला. माधवरावांनीं अत्यंत गरिबीचे दिवस पाहिले होते, हें वेगळें सांगावयास नको. वडिलांच्या कीर्तनांत ते मागें झांज घेऊन उभे रहात असत. त्यांनीं ३—३॥ रुपयांची नोकरीही पण केली होती. माधवरावांनीं गायनकला आपल्या वडिलांपासून उचलली होती व त्याबरोबरच चित्रकलाही उत्तम रीतीनें संपादन केलेली होती. ते मातीचीं लहान-लहान चित्रें—मूर्ति उत्तम करीत असत. सुरवातीला या दोन कलांवरच भिस्त ठेवून त्यांनीं जीवन कंठण्याचा प्रयत्न केला. परंतु एकंदरींत माधवराव महत्त्वाकांक्षी स्वभावाचे असावेत असें दिसतें. हा १८५० चा सुमार होता. त्या काळांत देशभर नव्या इंग्रजी राज्याची घडी बसविण्याचें काम चाललेलें होतें. इंग्रजांनीं येथें नवीन प्रवर्तित केलेल्या कित्येक गोष्टींबरोबर वकीलवर्गही अस्तित्वांत आला होता. माधवरावांनीं वकील होण्याची उमेद धरली व अभ्यास सुरू केला. अजून युनिव्हर्सिटी स्थापन

झालेली नसल्यामुळें वकिलीची परीक्षा मुंबईस मराठींतूनच होत असे. परीक्षेला बसायचें म्हणजे फी भरायला हवी व शिवाय मुंबईस जाण्यायेण्याचा खर्च वेगळाच. माधवरावांची तर अशी ओढाताण. या अडचणीची गुणगुण शेजाराला रहाणाऱ्या एका म्हाताऱ्या पण गरीब आईमाईला कळली व आपल्याजवळचे कष्ट करून सांठवून गांठीला बांधलेले दहा रुपये तिनें देऊं केले. या भांडवलावर माधवरावजींनीं मुंबईला जाऊन वकिलीची परीक्षा दिली व त्यांत ते पासही झाले. मागाहून महाडासच वकिलीला सुरुवात केल्यावर त्यांनीं बाईचे ते अमोल दहा रुपये कृतज्ञतापूर्वक परत केले !

वकिलीला सुरुवात करण्याच्या वेळची एक गमतीची गोष्ट सांगण्यासारखी आहे. गांवांतील इतर सुप्रतिष्ठित वकिलांचें उदाहरण पाहून वकिलीच्या धंद्याला ऑफिस चांगलें थाटलें पाहिजे, असा विचार माधवरावांच्या मनांत आला. पण त्यासाठीं दुसरीकडे जागा घ्यावी, तर भाडें कुठून देणार ? म्हणून शेवटीं मोठ्या नाखुषीनें व नाइलाजानें रहात्या ठिकाणींच ऑफिस काढण्याचें त्यांनीं मुक्रर केलें. परंतु त्यांतल्यात्यांत बरें व शोभिवंत दिसावें म्हणून खोपटालाच रंग देऊन घेतला. आंत भिंतीला साध्या गांवठी खुंट्या होत्या त्या जाऊन त्यांच्या जागीं रंगीत कांतीव खुंट्या झळकूं लागल्या ! असो. महाडांत लवकरच माधवरावांच्या वकिलीचा उत्कृष्ट जम बसला व गांवांतल्या चांगल्या वकिलांत त्यांची गणना होऊं लागली. त्यामुळें थोड्याच अवकाशांत या घराण्याची सर्व स्थिति पालटून गेली. उत्तम कमाई व काटकसरीची हिशोबी रहाणी अशा दुहेरी दक्षतेमुळें माधवरावांच्या घरांत लक्ष्मीचा प्रभाव दिसूं लागून दारिद्र्याचा काळोख झपाट्यानें नाहींसा होऊं लागला. महाडांतील एक संपन्न व सुखवस्तु घराणें इतकी स्थिति माधवरावांनीं आणून सोडली. पहिले दिवस जाऊन हे सोन्याचे दिवस आले, हें पाहून स्वतः त्यांना आनंद वाटला असेलच; पण तें पहायला, अनुभवायला सबंध जन्म कष्टांत काढलेली त्यांची वृद्ध माता हयात होती. त्या माउलीला किती धन्यता वाटली असेल ! पण त्याहीपेक्षां आपली

आई हें बघायला आहे हें पाहून खुद्द माधवरावांना आपल्या कृतकृत्यतेचें जें चीज झाल्यासारखें वाटलें असेल, त्याची कल्पनाच केली पाहिजे.

हें झालें आर्थिक स्थितीसंबंधानें. पण माधवराव अष्टपैलू व हरहुन्नरी गृहस्थ होते. शिवाय गरिबींतून वर आले असल्यामुळें व्यवहारकुशलत्व त्यांच्या अंगीं चांगलें आलेलें होतें. " *माधवराव परांजपे उंच, सुरेख व सडपातळ होते. चांगले वकील तर ते होतेच, पण शिवाय अनेक गुण त्यांच्या अंगीं होते. त्यांना चांगलें गातां येत असे. तबला, तंबोरा इत्यादि साहित्य घरीं असायचें व महाडास कोणी गवई आला तर त्याची बिदागी त्यांच्या परीक्षेनें दिली जात असे. चित्रें काढणें व मातीचीं चित्रें करणें यांतही ते कुशल होते. त्या कामाकरितां लागणारीं उपकरणें त्यांनीं मुद्दाम तयार करून घेतलीं होतीं. त्यांनीं तयार केलेलें शंकराचें व विष्णूचें हीं दोन चित्रें अद्यापि महाडास आहेत. घर बांधणें इत्यादि कामाचीही त्यांना माहिती होती. " असो. याप्रमाणें उशिरां कां होईना, पण माधवरावांचें बस्तान चांगलें बसलें होतें. माधवरावांचा संसार सुखाचा होऊं पहात होता. अंगच्या गुणांपेक्षांही पैशानेंच समाजांत अधिक वाढणारी प्रतिष्ठाही त्यांना लाभूं लागली होती. त्यांना लाभलेली गृहिणी संसारदक्ष व पतिसेवेंत तत्पर अशी होती. पार्वतीबाईचा स्वभाव बाणेदार, निःस्पृह, भाविक, उदार, प्रेमळ पण शिस्तीची आवड असलेला व कडक असा होता. पार्वतीबाई मोठ्या भाग्यवान् व यशस्वी समजल्या जात असत. किंबहुना पार्वतीचें लग्न झालें त्या वेळची घरची गरिबी; पण ती घरांत आल्यानंतर जो सारखा उत्कर्ष होत गेला तो तिच्या नशिबानें, अशा समजुतीनें वडीलधारी माणसें आणि माधवरावांची आई ह्या सूनबाईच्या पायगुणाचें कौतुक करीत असत. ' वकिलीणबाई ' हा त्या काळांतील नव्या नवलाईचा किताबही कधीं कधीं पार्वतीबाईंना उद्देशून लावण्यांत येत असे. अशा रीतीनें पैसा व नांवलौकिक वाढत चाललेल्या घरांतील हें जोडपें मोठें दैववान् होतें यांत शंका नाहीं.

---

* शिवरामपंतांचे भाचे श्री. हरि सखाराम गोखले यांची स्मरण-वही.

घरच्या गरिबीमुळें माधवरावांचें लग्न पूर्वीचा काळ लक्षांत घेतां त्या मानानें बऱ्याच उशिरां झालेलें होतें. सन १८६० च्या सुमारास पार्वतीबाईंना पाहिली मुलगी झाली. तिचें नांव ठेवलें बयोताई. पण माधवरावांच्या वृद्ध मातेला नातवाचें तोंड पहाण्याची स्वाभाविकपणेंच तीव्र लालसा होती. महादेवाची वाकिली चालू लागून चार पैसे मिळूं लागले होते. अशा स्थितींत आईची तरी दुसरी इच्छा काय असणार? परंतु दुसऱ्या खेपेसही पार्वतीबाईंना मुलगीच झाली. आतां काय मुलींचीच रांग लागते कीं काय, अशी धास्ती माधवरावांच्या आईला वाटली. या दुसऱ्या प्रसूतीच्या वेळीं मुलगा व्हावा अशी सर्वांचीच इच्छा व अपेक्षा होती. पण या जन्मलेल्या मुलीनें ठकविलें म्हणून तिचें नांव 'ठकूताई' ठेवण्यांत आलें! तिसऱ्या खेपेस पार्वतीबाई गरोदर राहिल्या त्या वेळीं माधवरावांची आई मुलगा व्हावा म्हणून देवाला पुष्कळ नवस बोलली होती. या सुमारास झालेल्या एका चमत्कारामुळें सगळ्यांच्याच आशेला एक आधार मिळाला. गरोदर असलेल्या पार्वतीबाईंच्या स्वप्नांत त्यांचे मामंजी—म्हणजे महादेवरावांचे वडील शिवरामबाबा आले. पांढरा शुभ्र पोषाख करून पांढऱ्या घोड्यावर बसून आलेल्या शिवरामबाबांनीं हांक मारून सांगितलें, "पार्वती, मी येतों आहें बरं का!" या अद्भुत स्वप्नदर्शनानें चकित आणि आनंदित झालेल्या पार्वतीबाईंनीं हा सगळा पाहिलेला प्रकार सांगितला, तेव्हां सर्व मंडळींना मोठा आनंद झाला. आशेची जागा खात्रीनें घेतली. आशेला बारीक आधारही पुरतो!

या खेपेस पार्वतीबाई प्रसूत होऊन त्यांना मुलगा झाला. हा मुलगा म्हणजेच चरित्रनायक शिवरामपंत होत. या बालकाचा जन्म वर वर्णन केलेल्या खोपटांत सन १८६४ च्या जून महिन्यांत २७ तारखेस झाला. अर्थात् बारशाला मुलाचें नांव शिवराम ठेवलें तें स्वप्नांतल्या दृष्टांताला धरूनच होतें. शिवाय आजाचें नांव नातवाला ठेवण्याची चाल आपल्यांत जुनीच आहे. अपेक्षेप्रमाणें मुलगा झाल्यामुळें व संसारांत एकच होती ती कमतरता भरून निघाल्यामुळें घरांत सर्वत्र समाधानाचें साम्राज्य पसरलें व या छोट्या बालकाचें बारसें, उष्टावण इत्यादि संस्कार

समारंभानें व उत्साहानें साजरे झाले, अशी माहिती मिळते. मुलाचें नांव जरी शिवराम ठेवलें होतें तरी ज्येष्ठ मुलाला बापानें त्याच्या नांवानें हांक मारूं नये अशी कोंकणांत चाल आहे, त्याला अनुसरून माधवराव 'शिवराम' न म्हणतां बाळक्या किंवा क्वचित् बाळकोबा असें म्हणत. त्यामुळें घरांत तेंच नांव रूढ झालें. शिवरामपंतांना ज्यांनीं त्यांच्या ऐन उमेदींत किंवा त्या सुमारास पाहिलें असेल, त्यांना ते लहानपणीं कसे दिसत असतील, याची कल्पना करतां येईल. बालपणांत देखण्या आणि लाडक्या बाळक्याचीं कोडकौतुकें पुरवणारीं वडील माणसें घरांत बरींच होतीं. बोलूं लागलेला बाळक्या आपल्या आजीला 'ब' आणि आईला 'बाती' म्हणत असे. अर्थात् बाती हें बाळक्याचें पार्वती म्हणण्याच्या प्रयत्नाचें झालेलें बोबडें रूपांतर होतें! त्याचप्रमाणें माधवरावांची बालविधवा बहीण वाराणशीबाई इकडेच रहात असे म्हणून मागें सांगितलें आहे. बाळक्याच्या भाषेंत तिला 'आई' व माधवरावांना 'दादा' अशी संज्ञा मिळालेली होती. याच सुमाराला दादांनीं पूर्वींच्या रिवाजाप्रमाणें व आपला मुलगा कसा काय निघेल हें आगाऊ कळून घेण्याच्या पित्याच्या औत्सुक्यबुद्धीला अनुसरून शिवरामपंतांची पत्रिका तयार करून घेतली होती. व तेव्हांच त्यांच्या कुंडलीवरून 'हे पुढें चांगले विद्वान्, लोकप्रिय व भाग्यशाली होतील' असें भविष्य त्यावेळच्या अनुभविक ज्योतिष्यांनीं वर्तवून ठेवलें होतें, असें सांगतात. पुढच्या आयुष्यांत शिवरामपंतांना कीर्तिलाभ घडूं लागला व जन्मकालींच सांगून ठेवलेल्या फलश्रुतीचे आडाखे त्यांना अनुभवाला येऊं लागले म्हणून म्हणा, किंवा बाबा महाडकर नांवाचे महाडचेच एक सुप्रसिद्ध ज्योतिषी यांच्या संगतीचा परिणाम म्हणून म्हणा, पण शिवरामपंतांचा फल-ज्योतिषावर विश्वास बसलेला होता. व पुढेंही कोणी चांगला ग्रहशास्त्रज्ञ भेटला तर ग्रहमानाची चौकशी-चिकित्सा करीत असत. त्यांची कुंडली पुढें दिली आहे.


॥ श्री ॥

## नांव—शिवराम महादेव परांजपे

जन्मस्थल—महाड—अक्षांश १८°११' उत्तर—रेखांश ७३°—३०' पूर्व

जन्मकाल—मिति ज्येष्ठ वद्य ७ रविवार शकें १७८६, ता. २७ जून १८६४, रात्रीं १२ वाजून ४७ मि. (स्थानिक वेळा–Local–Time)

## सायन–स्पष्ट–भावसह जन्म-लग्न कुंडली




ही कुंडली शिवरामपंतांचे भाचे श्री. नी. स. गोखले यांनीं तयार करून दिली आहे.

महादेवरावदादांच्या वाढत्या संसाराला आतां एक खोपट लहान पडूं लागलें. शिवाय आतां पैशाचीही कमतरता नव्हती. आपल्या वकिलींत मिळालेल्या पैशांतून दादांनीं आसपासची जागा व शेतें विकत घेतलीं होतीं म्हणून दादांनीं घर बांधायचें ठरविलें. रहात्या खोपटाच्या दक्षिण बाजूस सुमारें पन्नास हातांवर जागा निश्चित करून त्या ठिकाणीं दादांनीं घराचें बांधकाम स्वतःच्या देखरेखीखालीं सुरू केलें. व त्याच वर्षीं विस्तीर्ण व सर्व दृष्टींनीं सोइस्कर असें एक टुमदार घर उभें राहिलेलें दिसूं लागलें. वडिलांनीं सोय भागण्यापुरती जी कामचलाऊ विहीर खोदली होती ती दादांनीं आंत पोहतां येईल इतकी ऐसपैस रुंद करून चांगली बांधून काढली. अलीकडच्या आधुनिक पद्धतीच्या

तुलनेनें हें घर म्हणजे मोठें भव्य किंवा टोलेजंग आहे, असें नाहीं. तथापि घराला मागेंपुढें मोठालीं अंगणें, पुढल्या बाजूला कुळें आलीं म्हणजे त्यांना बसण्याकरितां किंवा त्यांनीं भाताचा मक्ता घातला म्हणजे त्याचे कणगे रचून ठेवण्यासाठीं सोपा, त्याच्या आंत येणाऱ्या-जाणाऱ्याला बसण्याउठण्यासाठीं ओटी, बायकांच्या वापराकरितां मागल्या बाजूनें स्वतंत्र वाट, चार पानें झालीं तर बसतील इतपत मोठें माजघर, अंगणांत थोडीशी बाग—त्यांत देवापुरतीं तरी फुलझाडें व कांहीं भाजीपाला, अळूचें खाचर इत्यादि गोष्टी ज्या कोंकणांतल्या घराच्या सुखसोयी व ऐश्वर्य म्हणून समजल्या जातात त्यांनीं समृद्ध असें हें दादांनीं बांधलेलें त्यांचें नवें घर होतें. हल्लीं जेथें शिवरामपंतांचे धाकटे बंधु विष्णुपंत रहात असत आणि ज्या घराची आतिथ्याबद्दल व परगांवाहून *विद्यार्जनाकरितां आलेल्या विद्यार्थ्यांची सोय लागते* अशाबद्दल प्रसिद्धि आहे, तेंच तें घर होय. सुरुवातीला लहानशा खोपटाची डागडुजी व रंगरंगोटी करून तिथेंच संकोचानें वकिली करणाऱ्या माधवरावांना या ऐसपैस व शिवाय आपल्या कमाईनें बांधलेल्या घरांत रहायला जातांना किती अभिमान वाटला असेल ! त्यांच्या आईला तर अस्मान ठेंगणें झालें, यांत आश्चर्य नाहीं. यथाशास्त्र वास्तुशांत होऊन सर्व मंडळी खोपटांतून या घरांत रहावयास आली. तीन वर्षांच्या बाळक्यानेंही आपल्या लहानग्या जन्मभूमीचा त्याग करून बातीच्या कडेवर बसून नव्या घरांत प्रवेश केला. पुढें कांहीं वर्षांनीं शिवरामपंत आपला जन्मप्रदेशही सोडून देशावर पुण्यास जाणार होते, त्याची ही छोटी आवृत्ति किंवा पूर्वसंकेतच होता !

वडीलधाऱ्या माणसांच्या कोडकौतुकाच्या छत्राखालीं बाळक्या लहानाचा मोठा होत होता. पण लवकरच त्याच्या वाढत्या वयाबरोबर उगवत्या दिवसागणिक वाढणाऱ्या हालचालींना नव्या घराच्या विस्तीर्ण मर्यादाही अपुऱ्या पडूं लागल्या. बाळक्याच्या त्यावेळच्या सोबत्यांपैकीं एक अजून हयात असलेले गृहस्थ म्हणजे श्री० वामन मोरेश्वर ऊर्फ बाबा पोतदार हे होत. बाळक्याच्या सातव्या वर्षीं म्हणजे सन १८७१ च्या चैत्रांत साधारण सुखवस्तु गृहस्थाच्या मुलाची व्हावी अशा थाटांत

बाळक्याची मुंज महाडास झाली, त्या समारंभांत बाबा हजर होते. आपल्या ज्येष्ठ मुलाची मुंज दादांनीं खरोखरच मोठ्या हौसेनें केली. दरम्यान महादेवरावांना बाळक्याच्या पाठीवर एक मुलगी व दोन मुलगे अशीं तीन अपत्यें झालीं होतीं. मुलीचें नांव वेणुताई व मुलांचीं नांवें गणेश व विष्णु अशीं ठेवलीं होतीं. स्वतः शिवरामपंत व त्यांचीं भावंडें ज्या घरांत वाढत होतीं. त्या घराचें कल्पनाचित्र डोळ्यांसमोर उभें करणारें उपलब्ध असलेलें वर्णन या ठिकाणीं देणें अप्रस्तुत होणार नाहीं. शिवरामपंतांचे भाचे श्री० ह. स. गोखले लिहितात:

"महाडास काकरतळ्यावर आमच्या मामांचें घर आहे. गांवाच्या पूर्व टोंकास व अगदीं आरंभीं हें घर आहे. घर मोठें व सोइस्कर आहे. तें माधवरावांनीं बांधलें. घर बांधलें तेव्हां तें अगदीं टोंकाला व गांवापासून दूर असें होतें. घराच्या चौफेर मोठी मोकळी जागा व शेतें आहेत; व तीं सर्व मामांचींच आहेत. पाण्याची सोय अतिशय उत्तम आहे. विहीर फार खोल नाहीं. पाणी फार चांगलें व बारा महिने भरपूर पुरणारें. महाडांतील पुष्कळ लोक या विहिरीचें पाणी नेण्यास येतात व पहांटेपासून रात्रीपर्यंत ही रहदारी सुरू असते. पावसाळीं विहीर बहुतेक भरून येते. तेव्हां तींत पोहण्याची व उड्या मारण्याची फारच मौज. विहिरीवर पायरहाट असे. व घराशेजारच्या बागेला पाणी लाटून लावण्याचें काम आम्ही सर्व भावंडें करीत असूं. घर पूर्वाभिमुख आहे. पूर्वेस व उत्तरेस मोठीं अंगणें आहेत. त्यांत फुलझाडें असत. उत्तरेच्या अंगण्यांत विहिरीजवळ बकुळीचें मोठें झाड होतें. त्याचीं फुलें पडून संध्याकाळीं अंगण्यांत पखरण होई व वासाचा घमघमाट सुटे. घरांतून विहिरीवर येण्यास पडवीसारखें बांधलेलें आहे. विहिरीवर धुण्याची सोय उत्तम. महाडच्या आसपास इतकें सुखसोईचें घर क्वचितच आढळेल. घराच्या आग्नेयीस थोडी उंचवट्याची जागा आहे. ती मामांचीच आहे. तेथें भाड्यासाठीं चाळ बांधण्याची कल्पना शिवरामपंतांनीं काढली व त्याप्रमाणें तेथें चाळ बांधली आहे. ८।१० बिऱ्हाडांची सोय तेथें आहे. हवापाण्याच्या उत्तम सोईमुळें तेथें नेहमीं बिऱ्हाडें मिळत व सोबतही झाली. चाळीच्या पश्चिमेस चिंचेचें व जांभळीचें झाड आहे. उत्तरेस आंब्याचीं झाडें आहेत. लहानपणीं दगड मारून आंबे, चिंचा वगैरे खाल्ल्या आहेत. त्यावेळची आठवण होऊन अजून फार आनंद होतो."

भोंवतालच्या बागेंतून बागडणें व पायरहाटावर असून पाणी लाटणें हा मुलांचा एक नित्याचा करमणुकीचा विषय असे. शिवरामपंतांनी लहानपणीं कितीतरी वेळां विहिरीवर बसविलेलें तें रहाटगाडगें मौजेनें फिरविलेलें होतें; पण मागाहून प्रौढपणीं जेव्हां जेव्हां ते महाडास येत तेव्हां तेव्हां तो पायरहाट पहातांना—चालवतांना निसर्गतः भावनावश आणि शिक्षणानें, अनुभवानें प्रगल्भ झालेल्या त्यांच्या मनांत—'रिक्ता भवन्ति भरिता भरिताश्च रिक्ताः'—हें त्यांतलें गूढस्थ तत्त्व उभें राहून बालपणींच्या आठवणींतल्या आनंदाला कितीदां तरी आश्चर्याची जोड मिळाली असेल !

असो. आतां थोडी घरांतली व्यवस्था पाहूं. कारण, घरांतल्या वातावरणाचा व वडील माणसांच्या आचरणाचा ठळक संस्कार लहान मुलांच्या कोंवळ्या मनांवर नकळत उमटत असतो. किंबहुना घर हीच बालकांची खरी शाळा होय. या घरच्या शाळेंत झालेल्या तयारीचाच जगाच्या शाळेंत पुष्कळसा उपयोग होत असतो. शाळा—कॉलेजांतल्या शिक्षणांत व विशेषतः अलीकडल्या काळांत, उपरेपणाची व भाडोत्री-पणाचीच भावना उभयपक्षीं असते. तेथें प्रायः चार 'पाट्या' टाकल्या कीं संपलं काम, अशीच स्थिति अनुभवाला येणार हें सांगणें नको. तशी गोष्ट घराची नाहीं. शाळेच्या वेळेखेरीज मुलाचे सर्व व्यवहार व संबंध घरच्या माणसांशींच पडत असल्यामुळें स्वभावाची घडण म्हणून जी कांहीं आहे ती घरांतल्याच वळणानें आणि वातावरणानें होणार, हें उघड आहे. अर्थात् मुलाच्या उपजत म्हणून कांहीं वृत्ति-प्रवृत्ति असतात ही गोष्ट खरी. तथापि त्यांचा कमी—अधिकपणा दुरुस्त करून, खरखरीत-पणा, अणकुचीदारपणा घासून-कानसून ठाकून-ठोकून त्यांना गोलवा आणण्याचें कार्य गृह—शिस्तीच्या ऐरणीवरच व्हावें लागतें, यांत शंका नाहीं. हें पूर्वीं होत असे. अलीकडच्या काळांत दुर्दैवानें या 'घरांतल्या शाळा' झपाट्यानें बंद पडत चालल्या आहेत. अर्थात् बदलती राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिति हीच या गोष्टीला पुष्कळ अंशीं कारणी-भूत आहे. तथापि, त्यावर काय उपाय-योजना केली असतां पूर्वीं भावी नागरिकांना घरच्या घरीं शिक्षण मिळण्याची जी उत्तम सोय असे,

तिची उणीव कशी भरून निघेल, हा राष्ट्रनेते म्हणविणारांनीं विचार करण्यासारखा एक जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.

वराच्या ओटीवर दादांची बैठक किंवा वकिलीचें ऑफिस असे. त्याला लागून असलेल्या पडवींत त्यांचा कोर्ट–कामाचा कारकून मोरोबा पारखी बसे व तेथेंच त्याच्या भोंवतीं कज्जे भांडणारीं कुळें–अशिलें जमत. दादा भल्या पहांटेस उठून स्नानसंध्यादि नित्यकर्मे आटोपीत. मुलांना उठवून त्यांच्या मागें भुंगा लावीत. स्वतः आपल्या हातानें आपले कपडे धुवून टाकायला चुकत नसत. पैसा मिळूं लागला होता तरी पैशाच्या चोजल्यांना त्यांनीं थारा दिलेला नव्हता. मग सकाळच्या वेळांत कुळांचीं कामें पाहून जेवण उरकून कचेरींत जात. त्यांची वकिलीची पद्धत चोख, व्यवस्थेशीर व सचोटीची असे. त्यासंबंधींची विशेष सांगण्यासारखी गोष्ट अशी कीं, एखाद्या कुळाचा कज्जा बुडाला तर त्याच्यापासून ते फी घेत नसत, व घेतलेली असली तर परत करीत असत. त्याचप्रमाणें खोटींनाटीं, लफड्याचीं किंवा लफंगेगिरीचीं कामें महादेव-राव घेणार नाहींत असा त्यांचा लौकिक होता. महाडास त्यांच्या बरो-बरच्या समकालीन वकील-मित्रांत चिमणाजीपंत भाटे, दामोदरपंत पेंडसे, वीरकर, विष्णुपंत जोशी इत्यादि मंडळी होती. दादांच्या घरांत अक्षरशः सनातनी आणि बाळबोध वळण होतें. स्वतः दादा सदैव आपल्या वृद्ध मातेच्या आज्ञेंत वागत. दादांच्या बोलण्या वागण्यांत करारीपणा आणि निग्रहीपणा होता. त्यांचा मुलांनाही वचक असे. टापटीप व रेखीवपणा यांवर मोठा कटाक्ष. सबंध घरांत एवढासाही अव्यवस्थितपणा त्यांना खपत नसे. ' परांजपे–घरांत उत्तम व्यवस्था, शिस्त व टापटीप म्हणून महाड प्रांतांत त्यांच्या वेळेपासून प्रसिद्धि झाली.' या पद्धती पुढें दादांच्या पश्चात् विष्णुपंतांनीं महाडास उत्तम रीतीनें चालविल्या व शिवरामपंतांनीं उचलून आपल्याबरोबर पुण्यास नेल्या. घरांत सोंवळें-ओंवळें, हव्यकव्य, अतिथि–अभ्यागत इत्यादि गोष्टी श्रद्धापूर्वक आणि अगत्यानें पाळल्या जात असत. स्वतः यजमान म्हणजे माधवराव हे अत्यंत उद्योगी व निरलस असल्यामुळें हें सर्व नीटपणें व नीटसपणें होई. कचेरींतून येतांक्षणींच दादा अंगरखा–पागोटें खुंटीला

अडकवून गृहव्यवस्थेच्या कामाला लागत. कधीं रहाटावर गडी बसवून स्वतः बागेला पाणी सोडावें तर कधीं ओटीवरच्या तसबिरी पुसाव्या, तर कधीं कागदपत्रें लावून दप्तरें बांधून ठेवावीं, असा त्यांचा नित्यक्रम असे. त्यांच्या नेकीच्या व सचोटीच्या ख्यातीमुळें महाड व आजूबाजूच्या कांहीं इस्टेटींच्या विश्वस्ताचें काम त्यांच्याकडे होतें त्यांतही हाच चोखपणा व पद्धतशीरपणा लोकांच्या प्रत्ययाला येत असे. शिवाय कलावान् किंवा कलाप्रिय माणसाच्या अंगीं जी एक नैसर्गिक रसिकता व हौस असते ती त्यांच्या ठिकाणीं भरपूर प्रमाणांत होती. त्या आंतल्या हौसेला गणपतीच्या दिवसांत मोकळेपणानें प्रगट व्हावयाला चांगला वाव सांपडत असे. घरगुती व्हावयाच्या गणेश-पूजनाला दादांनीं गणेशोत्सवाचें स्वरूप दिलें होतें. परांजप्यांच्या घरच्या या उत्सवाचा महाड गांवांत बोलबाला असे. दादा स्वतःच गणपतीची मूर्ति तयार करीत व रंगवीत. आरंभीं ही मूर्ति लहानशी असे. परंतु पुढें पुढें मानवी बालकाप्रमाणें दादांच्या इथला गणपति दरवर्षागणिक वर्धिष्णु म्हणजे लहानाचा मोठा होऊं लागला होता! प्रशस्त अशा जागीं मूर्तीची स्थापना होऊन मखर, तसबिरा, फुलांच्या कुंड्या, हंड्या इत्यादि लावून मोठी आरास होत असे. गणपतीपुढें मधून मधून गाण्याबजावण्याचा कार्यक्रम होई व शेजारपाजारचीं मुलें मंडळी जमल्यामुळें आरत्या सामुदायिक होत. शेवटीं एक दिवस प्रसादभोजन होऊन दोन तीनशेंपर्यंत पान व पानसुपारी होत असे! अशा रीतीनें उत्साहानें साजऱ्या होणाऱ्या या प्रतिवार्षिक समारंभानें घर गजबजून जात असे. या वेळीं दादा तर जातीनें मेहनत घेतच; पण घरांतलीं मुलें आणि गांवांतील ओळखीची व उत्साही मंडळीही मदतीला—खटपटीला येत असत. अशा प्रकारच्या उत्सवांतून एकमेकांच्या मदतीला जाणें—उपयोगी पडणें, सहकार्य करण्याचें महत्त्व व आवश्यकता, त्यांतून निर्माण होणारी खेळीमेळी व आपलेपणा, निरनिराळ्या लोकांचें एकत्र येणें किंवा गुंफण—हल्लींच्या भाषेंत ज्याला एकत्व भावना किंवा संघटन म्हणतात—इत्यादि गोष्टींचें शिक्षण सहजासहजीं मिळत असतें. अशा गोष्टींचा व वर वर्णन केलेल्या एकंदर घरांतील वातावरणाचा बालमनावर नकळत उमटणारा

ठसा त्याचा स्वभाव बनण्याला किती प्रेरक व पोषक असतो, हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. शिवरामपंत व त्यांचीं भावंडें या घरच्या उत्सवांत हौसेनें भाग घेत असत. पुढें शिवरामपंत शिकूं लागून त्यांना काव्यस्फूर्ति होऊं लागल्यानंतर त्यांनीं स्वत: रचलेलीं व महाडास पाठवून दिलेलीं पदें व आरत्या कौतुकानें म्हटल्या जात त्या याच उत्सवांत. हा घरगुती छोटेखानी उत्सव केले—पाहिलेले शिवरामपंत १८९५।९६ मध्यें टिळकांनीं सुरू केलेल्या सार्वजानिक गणेशोत्सवांत उत्साहानें आणि स्वयंस्फूर्तीनें सामील झाले, यांत नवल नाहीं. वाढतां-वाढतां कमंडलूंत मावेनासा झालेला मासा नदींत किंवा समुद्रांतच सोडावा लागतो.

महादेवरावांच्या घरांत प्रपंचाची व्यवस्था आणि मुलांचें संगोपन या दोनही बाबतींत दादा व पार्वतीबाई यांचे बरोबरीनें दादांची घरीं आलेली थोरली बहीण ताई हिची कर्तबगारी लक्षांत घेतली पाहिजे. ताईचें रूप चित्रासारखें आणि स्वभाव अत्यंत प्रेमळ असे. मुलें तर तिला 'आई'च म्हणत. आणि बाती रागीट असल्यामुळें मुलांना ती खरो-खरीच आईसारखी वाटे. महादेवरावांचा संसार ताईनीं डोळ्यांत तेल घालून पाहिला. कर्तेपणानें व हुशारीनें त्या सर्व गोष्टी पहात. मुलांच्यावर तर त्यांचें फार लक्ष. मुलांना कमी-आधिक कांहीं लागलें तर आणवून देत. वकीलसाहेबांच्याकडे त्याच्या पैशाची मागणी गेली, म्हणजे साह-जिकच महादेवराव कुणीं आणायला सांगितली जिन्नस, म्हणून घरांत विचारूं लागत. तेव्हां ताई सांगत 'हो हो, मीं आणायला सांगितली होती.' आणि मग यावर दादाही कांहीं बोलत नसत. खुद्द दादांनाही ताईचा धाक असे. शिवरामबाबांची वैद्यकी त्यांना थोडीफार अवगत झालेली होती. महाडांतील बायकामुलांना त्या औषध देत असत.

मुलाचें मौंजीबंधन म्हणजे जणूं कांहीं त्यानंतर एकामागून एक येणाऱ्या बंधनांची सुरुवातच असते कीं काय कोण जाणे! निदान तसें लहानपणीं शिवरामपंतांना वाटलें असावें खास. पहिली गोष्ट म्हणजे संध्या, वैश्वदेव, ब्रह्मयज्ञ, इत्यादि ब्रह्मकर्माचा भाग महादेवरावनीं बाळक्याला 'आचार्य—द्वारा' शिकायला लावला होता. लावला होता म्हणण्याचें

कारण असें कीं, उनाडक्या करीत असलेल्या व संध्या चुकविण्याकडे प्रवृत्ति असलेल्या बाळक्याला हुडकून धरून आणून बसवावा लागत असे; तथापि त्याची वाणी शुद्ध व गोड असे. मनाप्रमाणेंच वाणीवर सुद्धां लहानपणीं झालेले संस्कार खोल व चिरस्थायी असतात. या वेदपठणाच्या संथेनंतर वर्ष–सहा महिन्यांच्या आंतच महादेवरावांनीं शाळेची व्याद बाळक्याच्या पाठीमागें लावून दिली !

त्या वेळीं महाडास इंग्रजी शिकण्याची सोय नव्हती. फक्त मराठी सहा इयत्ता असलेली प्राथमिक शाळा होती. कुलाबा जिल्ह्यांतील ही पहिली शाळा १८४० सालीं स्थापन करून चालविण्याचें श्रेय त्या शाळेचे पहिले शिक्षक काशीनाथ बापूजी यांस आहे. शिवरामपंतांचा या शाळेशीं संबंध सन १८७२ पासून ते १८७६ पर्यंतचीं चार पांच वर्षें आला. या अवधींत शाळेंतल्या विद्यार्थ्यांची संख्या कमींत कमी १२३ व जास्तींत जास्त १५६ होती असें शाळेच्या कागदपत्रांवरून दिसतें. शिक्षक पांच होते. पैकीं हेडमास्तर होते प्रल्हाद नरहर जोशी व त्यांच्यामागून पंढरीनाथ नारायण सुदामे हे आले. शिवरामपंतांच्या वेळीं या महाडच्या शाळेंत शिकत असलेले त्यांच्या वर्गातील किंवा एखादें दुसरें वर्ष आगेमागें असलेले विद्यार्थी म्हणजे प्रि. गोविंद चिमणाजी भाटे, नामदार भास्करराव जाधव, प्रो. गो. गो. टिपणीस इत्यादि होत. या शाळेच्या लहानपणच्या आठवणी ना. भास्कररावांनीं लिहिल्या आहेत. त्यावरून तत्कालीन समाजस्थिति व शाळेंतलें वातावरण यांची चांगली कल्पना येते. शिक्षणाच्या कामांत ब्राह्मणेतरांना कमी लेखण्याची परंपरेनें चालत आलेली तत्कालीन ब्राह्मणवर्गातील प्रवृत्ति व त्याबरोबरच नुसत्या बोलण्यांतच नव्हे तर अन्यायी परंपरेला न जुमानतां आपलें उदार मत प्रत्यक्ष कृतींत उतरविणारे व मराठ्यांच्याच नव्हे तर अस्पृश्यांच्या शिक्षणाची कळकळ वहाणारे पंढरीनाथ सुदाम्यांसारखे छातीठोक सुधारक त्या काळीं ब्राह्मणांत होते, अशीं दोन्ही टोकें जाधवरावांच्या आठवणींत सांपडतात. असो. त्यावेळच्या या शाळेंतील विद्यार्थ्यांपैकीं एम्. ए. असे तिघेजणच झाले. गोविंदराव भाटे, भास्करराव जाधव व शिवरामपंत परांजपे हे तिघे ' महाडचे तीन

एम्. ए.' म्हणून ओळखले जात. एकाच वेळीं, एकाच शाळेंत शिक्षण घेत असलेल्या, एकाच गांवच्या या तिघांतला साम्य-विरोध व पुढें तिघांच्या तीन वाटा कशा झाल्या हें पहाणें जितकें मनोरंजक तितकेंच बोधप्रदही आहे. तिघेही बुद्धिमान्, कर्तबगार व तिघांनीही एम्. ए. पर्यंत मजल मारलेली आणि युनिव्हर्सिटींत वरचा वर्ग व बक्षिसें मिळविलेलीं. तिघेही उत्तर आयुष्यांत सार्वजनिक क्षेत्रांत पडून आपल्या कर्तृत्वानें पुढें आले. वास्तविक एका गांवचे, बरोबरीचे, शाळेंतले म्हणून तिघांची ओळख तर खरीच. पण त्यांतल्या त्यांत भाट्यांची व शिवरामपंतांची विशेष सलगी असण्याला आणखीही एक कारण होतें. भाट्यांचे वडील चिमणाजीपंत व शिवरामपंतांचे वडील माधवराव हे दोघे स्नेही व समव्यवसायी. पण पुढें होतां होतां तिघेही निरनिराळ्या प्रवाहांत सांपडून तिघांच्याही आयुष्याला निरनिराळ्या किंबहुना परस्परविरुद्ध अशा दिशा लागल्या. भाटे आगरकरांच्या मताची छाप पडून प्राध्यापक, मवाळ मताचे व समाजसुधारक बनले; जाधवराव 'सत्यशोधक' नामदार व सरकारजमा होऊन राहिले; तर परांजपे स्वातंत्र्योपासक, ज्वलज्जहाल पत्रकार व कट्टे सरकार-विरोधक झाले! 'यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ। समेत्य च व्यपेयातां तद्वद्भूतसमागमः' हा जो न्याय जगांत चालू असलेला दिसतो, त्याचेंच हें एक उत्तम उदाहरण नाहीं काय? माणसामाणसांत हें वैचित्र्य किंवा विरोध पडतो तो मूळ प्रकृतींतल्या स्वभावभेदामुळें पडतो; किंवा ज्याला जसा गुरु भेटेल व तदनुसार वळण लागेल त्यावर तो अवलंबून आहे; किंवा मनुष्य ज्या विशिष्ट सामाजिक अगर राजकीय परिस्थितीच्या चौकटींत सांपडेल त्याप्रमाणें त्याचें वर्तन व मतप्रणालि बनत जाते; अथवा दैव म्हणून कांहीं एक आहे आणि त्याच्या पूर्वयोजनेप्रमाणेंच सर्व कांहीं घडून येत असतें; याचा निर्णय करणें कठीण आहे.

कदाचित् हीं सगळीं कारणें एकवटूनही परिणाम घडत असेल! तें कसेंही असो. पण या सर्व गोष्टींचा स्थूलमानानें विचार करतां पृथ्वीच्या पाठीवर नांदणारा मनुष्य म्हणजे मोक्षपटावर नाचणाऱ्या सोंगटीसारखा

भासतो. या गमतीच्या पटावर निरानिराळे चौकोन असतात. जसें दान पडेल त्या मानानें सोंगटी पटावर कमीजास्त चढावयाची असते. पण त्यांत खुबी अशी असते कीं, कांहीं चौकोनांत शिड्या असतात तर कांहीं चौकोनांत सापाचीं तोंडें आलेलीं असतात. दैवयोगानें योग्य दान पडून सोंगटी शिडी असलेल्या चौकटींत आली कीं, एकदम दोनचार रांगा वर चढते. तीच सर्पमुखाच्या चौकटींत आली, कीं तिला खालीं घसरावें लागतें ! दोनही नसून चौकट साधीच असेल तर त्याच चौकोनांत सोंगटी स्थिर रहाते. कोणतें दान पडून कोणती चौकट मिळेल हें जसें सोंगटीच्या हातांत नाहीं, त्याचप्रमाणें कोणत्या परिस्थितीची चौकट आपल्या वांट्याला येईल हें माणसाच्या ताब्यांत नाहीं! असो. येथें सांगायची गोष्ट इतकीच कीं, हे तिघे लहानपणचे शाळुसोबती खरे; पण शाळेनंतरच्या आयुष्यांत मार्गभिन्नतेमुळें एकमेकांचें भेटणें, जाणें येणें—सुद्धां राहिलें नाहीं. कुठें चुकून गांठ पडली तर काय नमस्कार—चमत्कार होईल तेवढाच !

ही सर्व झाली पुढली हकीकत. पण बाल्यदशेंतली स्थिति अगदींच भिन्न होती. शिवरामपंतांच्या वडिलांना आपल्या मुलानें मोठें व्हावें, विद्वान् व्हावें व नांवालौकिकास चढावें अशी फार इच्छा होती. आणि म्हणूनच त्यांनीं मोठ्या उमेदीनें आणि हौसेनें आपल्या मुलाचें नांव सन १८७२ च्या सुमारास महाडच्या या प्राथमिक शाळेंत नोंदवलें. पण बाळक्या कसला खमंग ! त्याचें मुळीं शाळेंत चित्तच नव्हतें. सारें लक्ष हूडपणा आणि उनाडक्या करण्याकडे. पंतांचे एक चरित्रकार लिहितात: " बहुतेक थोर पुरुषांचें बालपण हूडपणा करण्यांतच गेलेलें आहे, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ज्यांनीं पुढें उत्तर आयुष्यांत मोठें नांव कमाविलें त्यांचें पूर्वायुष्य अशा प्रकारें अव्यवस्थितपणें जावें, हा जणूं काय एक सिद्धांतच ठरून गेला आहे. " तें कसेंही असो. पण पंतांच्या बाबतींत मात्र त्यांच्या वडिलांना त्यांच्यापुढें हात टेंकण्याची पाळी आली खास. पंतांची स्वारी शाळेला बुट्टी देऊन बाहेर कोठें तरी हिंडण्याभटकण्यांत आपले दिवस घालवीत असे ! " You can take the horse to the water, but you cannot make him drink it. " या इंग्रजी म्हणींत सांगितलेला अनुभव महादेवरावांना

पंतांच्या शिक्षणाच्या बाबतींत या वेळीं आला, यांत शंका नाहीं. पुढें १९०८ सालीं शिवरामपंतांवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना शिक्षा झाली त्या वेळीं त्यांचे चिरंजीव कृष्णाजीपंत यांनीं सदर खटल्याच्या हकीकतीच्या पुस्तकाला लोकांच्या माहितीकरितां शिवरामपंतांचें एक त्रोटक चरित्र लिहून जोडलें होतें, त्यांतील त्यांच्या बाल्यदशेचें वर्णन असलेला भाग खालीं दिला आहे :

" शिवरामपंतांचा प्राथमिक मराठी अभ्यास महाडासच झाला. परंतु पोरपणांत त्यांचें अभ्यासाकडे फारच थोडें लक्ष असे. हे वर्गांत बहुधा शेवटचा नंबर कायमचा धरून बसत, असेंही सांगतात. कित्येक वेळा तर हे 'शाळेला जातों' असें म्हणून वडील माणसांच्या धाकानें बाहेर पडत, पण दुसरीकडे कोठें तरी खेळ खेळून वेळ दवडीत व शाळा सुटण्याची वेळ झाली म्हणजे नेमके घरीं येऊन हजर होत! तरी पण लहानपणीं यांचा स्वभाव एकलकोंडा असून त्यांना फारसे कोणी खेळगडी नसत असें म्हणतात. वडिलांनीं आपली चित्रकलेची व गायनाची विद्या आमच्या चरित्रनायकांस शिकविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु आमच्या चरित्र-नायकांनीं या गोष्टींत मुळींच मन घातलें नाहीं. त्यांना खेळण्याप्रमाणें पोहण्याचाही लहानपणीं नाद असे. घरच्या गड्याला बरोबर घेऊन हे कित्येक तास पाण्यांत डुंबत असत. वडिलांचें त्यांच्यावर चांगलें प्रेम असे. परंतु त्यांच्या रागीट स्वभावामुळें यांना वरचेवर मार बसत असल्या-कारणानें ते बापाशीं फारसें बोलत नसत. आईशीं मात्र यांचा लळा फार असून हे तिजपाशीं सर्व गोष्टी मोकळ्या मनानें बोलत असत. कांहीं वस्तु मागणें झाल्यास आईपाशीं मागत असत. याप्रमाणें पहिलीं चवदा वर्षें कांहीं खेळाडूपणांत व कांहीं अभ्यासांत गेलीं."

या महाडच्या शाळेला १९४० सालीं शंभर वर्षें पुरीं झालीं त्या वेळीं एक स्मारकग्रंथ प्रकाशित करण्यांत आलेला आहे. त्यांत शाळेला उद्देशून—

" तुझा 'बाळक्या' सरस्वतीचा कंठमणी जाहला

भारतीं हिरा खरा चमकला "

असें जें गौरवपर स्तवन केलें आहे, त्यांतला हा ' कंठमणि ' त्या वेळीं शाळा चुकविणारांचा व उनाडांचा मेरुमणि होता, हें फारच थोड्यांना माहीत असेल !

लहानपणीं बाळक्याला झाडावर चढण्याचा, पोहण्याचा व हिंडण्याचा मनस्वी छंद होता. एकदां अगस्त्याच्या झाडावर फुलें काढण्यास स्वारी चढली असतां पाय घसरून खालीं आली व अंगाची एक सबंध बाजू खरचटली गेली. पण माराच्या भीतीनें जखमांवर धोतराचा सोगा पांघरून त्यांनीं वेळ मारून नेली. असाच खोडकरपणा घरांत चाले. लहानपणीं ते आपल्या म्हाताऱ्या आजीची म्हणजे ' ब ' ची फार गंमत करीत. दोनप्रहरीं वामकुक्षी करण्यासाठीं म्हणून ' ब ' आंत जाऊन अंथरुणावर स्वस्थ पडली, कीं मग लगबगीनें हे तेथें जात व आव आणून म्हणत ' ब ! तूं मला पोथी वाचून दाखव म्हणून सांगतेस ना ? चल तर ओटीवर, तुला आत्तां वाचून दाखवतों ' बिचाऱ्या ' ब ' ला बाळक्याच्या या बोलण्यांतला मानभावीपणा न समजून तिला तें खरेंच वाटे. व ती हळूहळू खुरडत खुरडत पण नातवाच्या कौतुकानें बाहेर येऊन बसे आणि म्हणे, ' हं, दाखीव वाचून आतां. ' पण आजी बाहेर आल्यावर मात्र लुच्चा बाळक्या म्हणे ' ब, आतां नाहीं कांहीं मी तुला वाचून दाखवणार; आपली उगीच केली तुझी गंमत. ' जी तऱ्हा घरांत तीच बाहेर. शाळा बुडवून यांनीं यथेच्छ हिंडावें, खेळावें व नदींत डुंबत बसावें. एकदां तर भर पुरांत शेडावावर पोहण्यास गेले असतां थकून पाण्यांतच गटंगळ्या खाऊं लागले. बरोबर घरांत शिवा नांवाचा एक जुना इमानी गडी असे तो होता, त्यानें हात देऊन पोहत पोहत कांठाला आणून वर काढलें म्हणून बरी गोष्ट; नाहींतर सारा ग्रंथ इथेंच आटोपला असता !

असो. शाळेला जातों म्हणून पाटीदप्तर घेऊन बाळक्या बाहेर पडतो व हे उद्योग करतो हें घरांतल्या माणसांना कसें समजलें त्याचीही हकीकत गमतीची आहे. मुलगा बरेच दिवस शाळेला आला नाहीं हें पाहून वर्गावरचे मास्तर एक दिवशीं घरीं आले व म्हणूं लागले:—

' महादेवराव, तुमचा मुलगा हल्लीं शाळेंत येत नाहीं, हा काय प्रकार आहे ? ' हें ऐकतांच महादेवराव व घरांतली मंडळी स्तिमित झाली व उलट मास्तरांनाच प्रपादूं लागली कीं ' अहो, म्हणतां काय मास्तर तुम्ही ? मुलगा रोज न चुकतां बरोबर अकरा वाजतां जेवून शाळेला जातो आहे—' यावर मास्तर म्हणाले ' मुलालाच बोलवा अन् विचारा म्हणजे कळेल आपोआपच.' दादा व घरांतील मंडळी घरांत पहातात तों बाळक्याचा कुठं पत्ता आहे ! मास्तर घरांत शिरलेले पहातांक्षणींच बाळक्या मागल्या दरवाजानें अदृश्य झाला होता !

याप्रमाणें बालसुलभ असलेला उच्छृंखलपणा व स्वैरवृत्ति सोडून दिली तरी दोन गुण मात्र पंतांच्या ठिकाणीं लहानपणापासून दृष्टोत्पत्तीस येत होते. ते म्हणजे कल्पकता व नाट्यप्रियता. आपल्या लहान भावंडांना किंवा सोबत्यांना जमवून बाळक्यानें त्यांना डोक्यांतून कांहीं तरी काढून—रचून व मोठा आव आणून गोष्टी सांगाव्या. आणि त्याही आविर्भावासहित ! बाळक्याच्या नाटकासंबंधींच्या हौशीबद्दल बाबा पोतदार आपल्या आठवणींत लिहितात—

> "अगदीं लहानपणींही शिवरामपंतांस नाटकाचा नाद होता. आम्ही उभयतां सुमारें ९–१० वर्षांचे असतांना महाडानजीक आमच्या विरवाडी गांवीं आमच्या आतेच्या म्हणजे आंबेकर यांच्या घरीं श्रीरामनवमीच्या उत्सवाच्या शेवटीं कांहीं तरी पौराणिक नाटक करीत असूं. एकदोनदां ' नरसिंह–अवतार ' नाटक केल्याचें स्मरतें. जुन्या नाट्यपद्धतींत प्रारंभीं विदूषक, गणपति व सरस्वती अशीं पात्रें येण्याची वहिवाट होती. त्या वेळीं शिवरामपंतांनीं सरस्वतीच्या पात्राचें काम उत्तम केल्याचें स्मरतें. मीही प्रल्हादाची भूमिका करीत असे."

पुढें हा आपला निस्सीम भक्त होणार म्हणून सरस्वतीनें एव्हांपासूनच शिवरामपंतांना ' तद्रूप ' बनाविण्याचा बेत केला होता कीं काय कोण जाणे ! घरांतही त्यांच्या नाट्यप्रेमाचा धुडगूस चालावयाचा. दादा दुपारीं कचेरींत गेल्यावर सोप्यांतल्या झोंपाळ्याच्या कड्यांना धोतरें बांधून रंगभूमि आणि पडद्यांची सिद्धता होत असे. धाकट्या

गणू–विष्णूंना आणि इतर समवयस्क सवंगड्यांना सजवून ( म्हणजे हाताला लागतील त्या कपड्यांनीं त्यांना बेढब करून ) थोरला दरवाजा बंद करून यांचे ' प्रयोग ' चालत असत ! कोर्टातून परतणाऱ्या दादांची थाप दारावर पडली म्हणजे मात्र पंत कोठें तरी नाहींसे होत ! बाकीचीं सर्व मुलें पाहून दादांनीं विचारावें, ' हा मेण्या गेला कुठें ? ' पंत धाकामुळें दादांच्या वाऱ्याला उभे रहात नसत, व गांठ पडून कधीं त्यांना बोललं–विचारलं तरी मेणघुण्यासारखे गप्प बसत. या मेणघुणे-पणाला उद्देशून ' मेण्या ' हें दादांनीं त्या शब्दाचें बनविलेलें संक्षित रूप होतें !

त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें शिवरामपंतांचें लग्न लवकर म्हणजे त्यांच्या वयाच्या अकराव्या वर्षी सन १८७५ च्या वैशाखांत झालें. नवरी–मुलगी सात वर्षांची होती ! मुली अशा पाहिल्याच नव्हत्या. गोरेगांवचे गणेशपंत गोखले नांवाचे गृहस्थ प्रथमच मुलगी सांगून आले. त्या काळीं वधूपरीक्षेप्रमाणें वरपरीक्षाही असे व ती अक्षरावरून होई. पण या 'मुला' ला चांगली वळणदार पुस्ती काढतां येईना, म्हणून तो बैठकींतून रुसून पळून गेला ! तरी गणेशपंत म्हणाले " महादेवराव, पुरे झाली ही परीक्षा. तुमच्याकडे मुलगी द्यायला मी तयार आहें. मुलगा मला पसंत आहे. " इतकें म्हणतांना लग्न ठरल्यासारखें होऊन देण्या–घेण्याच्या गोष्टी निघाल्या. गणेशपंत म्हणूं लागले माझी ऐपत नसल्यामुळें दोनशें रुपये हुंडा घ्यावा. महादेवराव तीनशें धरून बसले. तेव्हां गणेशपंत नाइलाजानें काठी उचलून बैठकींतून निघून जाऊं लागले. तितक्यांत आंतल्या बाजूला बसलेल्या ' ब ' नें महादेवरावांना आंत हांक मारून सांगितलें, ' महादेवा, पहिली लक्ष्मी चालत आली आहे तिला नाहीं म्हणूं नकोस. माझ्या डोळ्यांदेखत बाळक्याचें लग्न कर–मला नातसून पाहूं दे. एवढ्याशा हुंड्यावरून फिसकटवायला तुला थोडा का पैसा मिळतोय ! ' आईच्या वचनांत वागणाऱ्या महादेव-रावांनीं लगेच बाहेर जाऊन गणेशपंतांना हांक मारून थांबविलें व त्यांना हाताला धरून पुन्हा आंत आणून बसविलें. आणि मातोश्रींची इच्छा कळवून हुंड्याच्या बाबतींत आपला आग्रह नाहीं असें स्पष्ट केलें.

पण गणेशपंतांनींही मन मोठें करून ऐपत नसली तरी दोनशेंच्या ठिकाणीं अडीचशें देईन असें सांगितलें व लग्न ठरलें. मुलीचें माहेरचें नांव होतें बयोताई. सासरीं शिवरामांतल्या 'रामा'ला अनुलक्षून मुलीचें नांव जानकी असें ठेवण्यांत आलें. लग्न होण्याच्या आधींपासूनच शिवरामपंतांना पोषाखांतला रेखीवपणा व डामडौलाची आवड होती ही गोष्ट जातां जातां सांगण्यासारखी आहे. मुंजीच्या वेळीं वडिलांनीं कानांत घातलेली भिकबाळी तर होतीच. ( ती ते मुळशी—सत्याग्रहाच्या वेळीं तुरुंगांत गेले तोंपर्यंत निघाली नाहीं. ) शिवाय डोकीवर मोठा घेरा व रेशीमकांठी धोतरें आणि इतर जिनसा यांकरतां घरांत हट्ट चालत असे ! पण दादांपुढें तर बोलण्याची प्राज्ञा नव्हती. तथापि बाती किंवा थोरली बहीण आक्का यांनीं कौतुकानें हे बाळक्याचे लाड पुरवावे व दादा कांहीं बोलल्यास त्यांनीं त्यांच्यापाशीं रदबदली करावी, असा प्रकार घडत असे.

लग्न झाल्यानंतरचीं दोनतीन वर्षेंपर्यंत शिवरामपंतांचा आधीं चालू असलेला 'कधीं विद्या तर कधीं क्रीडा' हाच कार्यक्रम कायम होता. अर्थात् पाहिल्या बाबीपेक्षां दुसरीवरच त्यांचा बहुतेक भर होता, हें पूर्वीं सांगितलेलेंच आहे. महादेवरावांना तर या पोराला काय करावें अशी मोठी काळजी येऊन पडली होती. या प्रकरणाच्या आरंभीं दिलेलें अवतरण 'शिवाजीची एक रात्र' या पंतांनीं लिहिलेल्या एका सुंदर गद्य-काव्यांतून वेंचून घेतलेलें आहे. लहानग्या शिवाजीचें बालपण रेखाटणारीं तीं वाक्यें अशीं आहेत:

> " शिवाजी लहान होता. वडिलांचा धाक आणि आईची प्रीति यांच्या मिश्रणामध्यें कधीं विद्या तर कधीं क्रीडा अशा अवस्थेंत त्याचे दिवस जात होते. "

शिवाजीच्या लहानपणीं त्याची व त्याचे वडील शहाजी यांची गांठही पडण्याची मुष्कील होती मग शहाजीचा धाक त्याला कोठून असणार ? हा इतिहास लक्षांत घेतला म्हणजे हें वर्णन शिवाजीला लागू पडत नाहीं, हें उघड होतें. कवि म्हणून निरंकुश असलेल्या शिवरामपंतांनीं या वाक्यांत स्वतःचें लहानपण तर शिवाजीवर लादलेलें नसेल ना !

## २

# मनःक्रांति

"स्वदेशाभिमानाचीं पहिलीं बीजें विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे हातून महाराष्ट्रांत चोहोंकडे फेंकण्यांत आलीं."

—शि. म. परांजपे ( स्वराज्य )

मुरुडास इंग्रजी शाळा नाहीं व मुलाचेंही शिकण्याकडे लक्ष नाहीं यामुळें महादेवराव उद्विग्न झालेले होते, हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. बाळक्याची हुषारी व तरतरी त्यांना दिसत होती. पण बाब्या सुधारला तर बारा वाघ मारील, अशांतली ती स्थिति होती. परंतु तो सुधारणार कसा हा त्यांच्यापुढें प्रश्न होता. रत्नागिरीचे रहिवाशी बळवंतराव पंडित नांवाचे एक गृहस्थ महादेवरावांच्या विशेष ऋणानुबंधांतील होते. त्यांची याच सुमाराला गांठ पडून बोलण्यांत हा विषय निघाला. तेव्हां पंडित दादांना म्हणतात, "अहो महादेवराव, पोरांना पोटाशीं बाळगून काय बसलांत ? या चालू काळांत मुलांना इंग्रजी शिकवायला हवें. बाळक्याला आमच्या रत्नागिरीच्या हायस्कुलांत घाला." हा विचार महादेवरावांच्या मनाला पटला. रत्नागिरीस दूर ठेवल्यामुळें बाळक्याचा हूडपणा कमी होऊन, अभ्यासाकडे त्याचें चित्त वळेल व शिवाय तेथेंही बळवंतरावांची देखरेख राहीलच, असा विचार करून बाळक्याला विद्याभ्यासासाठीं रत्नागिरीला पाठविण्याचें दादांनीं ठरविलें. शिवरामपंतांचे बालपणचे स्नेही

बाबा पोतदार हेही पुढें इंग्रजी शिक्षणाची सोय नाहीं म्हणून या सुमाराला बिरवाडीस घरींच स्वस्थ बसले होते. बाबांचें व पंडितांचें नातें होतें. त्यांच्या प्रोत्साहनानें बाबांचेंही रत्नागिरी हायस्कुलांत शिकण्यासाठीं जाण्याचें ठरल्यामुळें शिवरामपंतांना आयताच ओळखीचा जोडीदार मिळाला. यावेळीं घर सोडून रत्नागिरीला जावयास निघतांना शिवरामपंतांच्या मनाला काय वाटलें असेल तें असो, पण एवढी गोष्ट मात्र खरी कीं, याच सुमाराला रत्नागिरींत जाऊन दाखल होण्याच्या या अकल्पित घटनेमुळें त्यांच्या विद्यार्थिजीवनालाच काय पण सबंध जीवनालाही एक वेगळीच कलाटणी मिळावयाची होती. तो कथाभाग पुढें येणारच आहे. परंतु आतांच्या महाड सोडण्यांतील आणखी एक दैवी योजना म्हणून अशी सांगतां येईल कीं रत्नागिरीच्या हायस्कुलांत शिकण्याच्या निमित्तानें म्हणून शिवरामपंतांचें पाऊल जें घराबाहेर पडलें तें कायमचेंच. तेथून ते परस्पर पुण्यास जावयाचे होते व नंतर तिकडेच स्थायिक होऊन पुणेकर बनले. अर्थात् रत्नागिरीस असतांना सुट्टींत व पुढील आयुष्यांतही अखेरपर्यंत कार्याकारणानें ते महाडास येत जात. पण तें केव्हांही तात्पुरतेंच. महाडच्या आपल्या नात्याच्या माणसांविषयींची व घराबद्दलची त्यांची ओढ व प्रेम शेवटपर्यंत कायमच होतीं. पण पुढें पुण्यास निराळा व्याप मांडल्यानंतर त्यांचें महाडास रहाणें असें झालें नाहीं व तें शक्यही नव्हतें. अशा रीतीनें एव्हांपासून शिवरामपंतांना घर सोडून अलग रहावें लागल्यामुळें यापुढें बहुवंशीं त्यांचाच वृत्तांत स्वतंत्रपणें असा येणार. म्हणून त्यांच्या भावंडांची हकीगत थोडक्यांत या ठिकाणींच देणें योग्य व सोईचें होणार आहे.

लहान भावंडें शिवरामपंतांना अण्णा म्हणत असत आणि म्हणूनच त्यांचें अण्णा हें नांव पुढें रूढ झालें. थोरल्या बयोताई या गोरेगांवास दारशेतकर घराण्यांत दिलेल्या असून त्यांचेहून लहान ठकूताई किंवा अक्का ही बोरवाडच्या भाट्यांकडे दिलेली होती. सर्व भावंडांत या ठकूताईचा स्वभाव अत्यंत प्रेमळ होता व सर्वांत बाळक्यावर तिची फार भक्ति व माया असे. बाळक्याच्या पायाला जाळवात असल्यामुळें त्याच्या पायाला धूळ लागूं नये म्हणून आक्कानें त्याला अंघोळ झाल्यावर स्नान-

गृहांतून तसेंच अलगच्च उचलून आंत आणावें व पायाला तेलतूप चोळावें. ती बातीला नेहमीं म्हणे "आपला बाळक्या कसा दिसतो नाहीं, आणि किती हुषार आहे!" सर्वांत तिला बाळक्याचें फार कौतुक. त्यावेळीं धूळपाटीवर लिहिण्याची पद्धत होती. म्हणून विटकरें आणून कुटून त्याची वस्त्रगाळ धूळ करून व बोरू आणून ही प्रेमळ बहीण, माहेरपणाला येई तेव्हां आपल्या लहानग्या भावाच्या लेखन-साहित्याची तयारी करून देत असे. पुढें अण्णा पुण्यास कॉलेजांत शिकत असतांवेळेसच त्यांची ही ममताळू बहीण निवर्तली. अण्णांच्या पाठच्या वेणुताई बिरवाडीस गोखल्यांकडे दिलेल्या होत्या. परंतु १९१२ चे सुमारास त्यांचें कुटुंब पुण्यास रहावयास आलें. त्यामुळें पुढील आयुष्यांत अखेरपर्यंत अण्णांचा व यांचा सहवास दुरावला नाहीं. त्यावेळच्या लहानपणच्या आठवणी सांगण्याला आतां अण्णांच्या पिढींतल्या त्या एकट्याच हयात आहेत. आईबापांप्रमाणें व त्यांच्या भावाप्रमाणें वेणुताईंचा स्वभाव मोठा करारी व उद्योगी आहे. जात्याच त्या तल्लख बुद्धीच्या आहेत. लहानपणीं वेणुताईंची हुषारी पाहून अण्णांनीं म्हणावें, 'वेणे, तूं मुलगा झाली असतीस तर... ..' त्या पूर्वीच्या काळांत महादेवरावांनीं वेणुताईंना लहानपणीं कांहीं दिवस शाळेंत घातलें होतें, या गोष्टीचें त्यांना अद्याप स्मरण आहे. वेणुताईंच्या पाठचे गणपतराव त्यांना चित्रकलेचा नाद म्हणून ते आर्ट्स स्कूलमध्यें गेले होते. हा गुण गणपतरावांचे ठिकाणीं जन्मसिद्ध होता. अगदीं लहानपणापासूनच ते गणपती करीत व चित्रें काढीत. पुढें ते उत्तम आर्टिस्ट झाले व रविवर्म्यांकडे नोकरीस राहिले. त्यांनीं वडिलांचे मृत्यूनंतर त्यांची तसबीर हुबेहुब तयार केली होती, ती अद्याप महाडास आहे. या पुस्तकांत घातलेला महादेवरावांचा फोटो त्या चित्रावरूनच घेतलेला आहे. गणपतरावांना गायनवादनही येत असे. ते, त्यांची पत्नी, तीन मुली व एक तान्हा मुलगा अशा कुटुंबासह नोकरीनिमित्त ते मुंबईस रहात असत. ते स्वभावानें मोठे धीट किंबहुना धाडसी, बाणेदार आणि करारी असे होते. दिसायला अण्णांप्रमाणेंच भव्य आणि रसरशीत दिसत. १९०६ सालीं मुंबईस प्लेगच्या दिवसांत उंदीर पडलेले हातानें बेधडक उचलून टाकीत! पण तेंच नडलें. त्याच सालीं

प्लेगनें त्यांचा बळी घेतला ! मरतेसमयीं अण्णांना तार करून बोलाविलें होतें. अण्णांसाठीं गणपतरावांचा जीव घुटमळत होता. अखेर अण्णा आले. भेटले. प्राण सोडतांना त्यांनीं अण्णांना एकच सांगितलें—“अण्णा, मुलें आतां तुमचीं आहेत ! ” यावेळीं अण्णांनीं दुःखावेग आवरून दिलेलें आश्वासन पुढें स्वतः घस सोसून किती दक्षतेनें पाळलें, ही हकीगत यथाक्रम पुढें येणारच आहे.

सर्वांत धाकटे विष्णुपंत. वडील वारल्यामुळें त्यांचें शिक्षण फारसें झालें नाहीं. पण त्यांनीं घरचें पहाण्याची कामगिरी उत्तम रीतीनें केली. पुण्यास अण्णांना विचारल्याशिवाय ते कोणतीही गोष्ट करीत नसत. सर्व मिळकत अण्णांची आहे, आपण नुसते पहाणारे आहों अशीच त्यांची भावना असे. पण उलट अण्णांनींही वाडिलांचे पश्चात् महाडच्या मिळकतींतून एक पैही घेतली नाहीं व स्वतः पैसे मिळवून आपलें शिक्षण पुरें केलें. एवढेंच नव्हे तर परीक्षांतून मिळणारीं बक्षिसें आईकडे महाडास पाठवून देत. त्यांना कॉलेजांत एकदा पागोटें-उपरणें मिळालें होतें तें त्यांनीं आपल्याकरतां न ठेवतां आपल्या या धाकट्या भावासाठीं पाठवून दिलें होतें. विष्णुपंतांचा चोखपणा, व्यवस्था व टापटीप किता घेण्यासारखीं असत. मोडी अक्षर तर असें फरडें होतें कीं, जशा कांहीं मोत्यांच्या ओळीच. महाडाहून विष्णुपंतांचें पत्र आलें म्हणजे अण्णांनीं घरांतल्या लहान मुलांना मुद्दाम तें दाखवावें. अण्णांप्रमाणेंच विष्णुपंतही निस्सीम मातृ-भक्त होते. बाती १९१० सालापर्यंत होती. तिथपर्यंत त्यांनीं तिची मर्जी कधीं मोडली नाहीं. विष्णुपंत आत्तां आत्तांपर्यंत होते. त्यांचें वागणें बोलणें अत्यंत सभ्य, निग्रहाचें व चाणाक्षपणाचें असे. या सर्व भावंडांत एकमेकांबद्दल अंतःकरणापासूनची ओढ व प्रेम असे. ‘मोठे’ म्हणून अण्णांबद्दल सगळ्यांनाच आदर होता आणि म्हणूनच त्यांच्याशीं वागतांना त्यांचा अतिशय मान ठेवूनच सर्वजण वागत. या सर्व मुलांच्यांत आईबापांचे गुण व कला कमीअधिक प्रमाणांत कशा उतरल्या होत्या, हें सहज समजून येण्यासारखें आहे.

असो. इकडे रत्नागिरीस सन १८७८ मध्यें शिवरामपंतांचें काय झालें तें पाहूं. त्या सालच्या जून महिन्यांत म्हणजे वयाच्या चौदाव्या वर्षी शिवरामपंतांनीं तिथल्या सरकारी हायस्कुलांत इंग्रजी पहिलींत आपलें नांव नोंदवलें. या काळांत रत्नागिरी हायस्कूलचा लौकिक दांडगा होता. सबंध इलाख्यांत या हायस्कूलइतकी प्रसिद्ध अशी एकही शाळा नव्हती. खिरवाडीचे बाबा पोतदार हेही याच सुमाराला शिक्षणासाठीं रत्नागिरीस आले. लहानपणापासूनची दोस्ती असल्यामुळें दोघांची दुकल चांगलीच जमली. प्रथम कांहीं दिवस पंडितांकडे रहात असले तरी लौकरच दोघांनीं शाळेंतच आपलें घर केलें. सकाळीं उठून बिऱ्हाड-बिस्तरा गुंडाळून वर्गांतच एका कोपऱ्यांत ठेवून देत व जेवायला खाणा-वळींत जात. याच सुमाराला तालमीची गोडी लागून दोघेहीजण तालीम करीत व दूध पीत. शिवरामपंतांच्या मूळच्या निरोगी शरीराला जो पुढें पीळदारपणा व भव्यपणा आलेला होता, त्याचा उगम यावेळेपासून केलेल्या मेहेनतींत सांपडतो. पुढें पुण्यास गेल्यावर डेक्कन कॉलेजांत व तद्-नंतरही कांहीं वर्षें जोर, बैठका, जोडी इत्यादि देशी पद्धतीचा व्यायाम घेण्याचा त्यांचा क्रम अबाधितपणें चालू होता. त्यामुळें पुढेंपुढें विशेष असा कांहीं व्यायाम न घेतां हें तरुणपणांतलें संचित शरीरसामर्थ्य त्यांना कायम उपयोगी पडलें, यांत शंका नाहीं.

शिवरामपंत रत्नागिरीच्या शाळेंत जाऊं लागल्यानंतर थोड्याच दिवसांत शाळेंत एक मोठा बदल घडून आला. त्याचा फार मोठा परिणाम त्यांच्या आयुष्यावर व्हावयाचा होता. कर्मधर्मसंयोग असा कीं, त्यावेळींच सरकारी नोकरींत असलेले विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची बदली रत्नागिरीस झाली. व त्यांनीं या शाळेंत अध्यापनाला सुरवात केली. ते मराठी शिकवीत असत. तथापि चालू विषय शिकविण्यापेक्षां विद्यार्थ्यां-मध्यें स्वाभिमान, स्वधर्माभिमान व स्वदेशाभिमान उत्पन्न होईल व ते स्वावलंबी आणि बाणेदार निघतील अशा रीतीचे इतर विषयच ते वर्गांत अधिक सांगत, हा शास्त्रीबुवांचा लौकिक प्रसिद्ध आहे. हें विषयाध्यापन नसून विषयान्तर आहे हें जरी खरें असलें, तरी शिक्षणाचें ध्येय व हेतु यांबद्दल शास्त्रीबुवांचे कांहींएक निश्चित विचार ठरलेले होते. आणि

त्यांना अनुसरूनच त्यांनीं पुढें टिळक-आगरकरांच्या मदतीनें न्यू इंग्लिश स्कूल काढलें. असो. पण रत्नागिरीच्या शाळेंत या मराठीच्या शिवाजीची व विद्यार्थिदशेंतल्या शिवरामपंतांची गांठ पडली, हा एक पंतांच्या आयुष्यांतील फार महत्त्वाचा योगायोग होता यांत शंका नाहीं. किंबहुना पंतांच्या जीवनांतील हा क्रान्तिबिंदूच (टर्निंगपॉईंट) म्हणावयाला हरकत नाहीं. विधिघटना म्हणतात ती ही समजा. विष्णुशास्त्र्यांसारखा गुरु भेटला नसता तर कोण जाणे, शिवरामपंतांच्या आयुष्याला कोणती दिशा लागली असती ? पण होणाऱ्या गोष्टी चुकत नसतात. शिवरामपंतांच्या अंतःकरणांत देशप्रेमाची पहिली ऊर्मि विष्णुशास्त्र्यांनीं उत्पन्न केली. पहिली ठिणगी त्यांनीं टाकली ! शिवरामपंतामधल्या तीव्र देशाभिमानाचें बीजारोपण शास्त्रीबोवांच्या वाणीनें आणि शिकवणीनें केलें. या बीजाचा वृक्ष कसा बनला याचा इतिहास म्हणजेच यापुढील शिवरामपंतांचें चरित्र!

या रत्नागिरीच्या शाळेपासूनच पंतांना मराठी व संस्कृत या विषयांची गोडी उत्पन्न झाली. महाडच्या शाळेंत वर्गांत त्यांचा ठरलेला शेवटचा नंबर होता. तर आतां त्यांचा नंबर पहिला दुसरा असे. शास्त्रीबुवांच्या येण्यापासून त्यांच्या मनःसृष्टींतच क्रांति झाली होती. शास्त्रीबुवा रत्नागिरीस सरासरी वर्ष दीड वर्षच होते खरे, पण तेवढ्याशा अवधींतही त्यांनीं मुलांच्यावर चांगली छाप पाडली होती. त्यांच्यासारख्या रसिक व विदग्ध भाषा-पंडिताच्या रसिक बोलण्या-शिकविण्यावर मुलें मुग्ध होत असत. या गोष्टीचा प्रत्यक्ष पुरावा पुढें दोनतीन वर्षांचे आंतच मिळाला. विष्णुशास्त्र्यांची ती धीरगंभीर आकृति, त्यांचा तो जुन्या पद्धतीचा थाट, त्यांची विषय-प्रतिपादनाची हातोटी आणि बोलण्यांतून प्रकट होणारी स्वभाषेविषयींची आणि स्वदेशाविषयींची तळमळ यांचा शिवरामपंतांच्या मनावर कसा ठसा उमटला असेल, हें कल्पनेनेंच ताडलें पाहिजे. शास्त्रीबुवांनीं शिक्षकाच्या कामाबद्दल एके ठिकाणीं मोठें मार्मिक लिहिलें आहे.

"धर्म, नीति वगैरेंचें वारें देखील शिक्षणाला लागूं नये अशी सरकारची व्यवस्था. पण ही स्थिति बदलून शिक्षण चालूं असतां शिक्षक

जर विद्यार्थ्यांच्या मनांत विद्येची खरी थोरवी भरून देऊन तिच्या अभ्यासानें होणाऱ्या अनिर्वाच्य सुखाची त्यांना चट लावून उत्साह उत्पन्न करतील तर शिक्षण हें, ठिसूळ न बनतां तरवारीच्या पोलादा-सारखें कठीण व लखलखीत होऊन, फार दिवस धिऱ्हाड करून ज्या अरिष्टरूपी राक्षसांनीं या देशास जेरीस आणलें त्यांचें निर्दाळण करील, व तेणेंकरून सुशिक्षित लोक व त्यांचे कारागीर म्हणजे शिक्षक यांचें दिव्य यश भूमंडळावर मिरवेल."

हें मर्म जाणणारे शास्त्रीबुवा वर्गांत शिकवितांना मुलांच्या मनावर कोणता परिणाम घडवून आणण्यासाठीं शिकवीत असतील, हें न सांगतांही कळण्यासारखें आहे. शास्त्रीबुवांच्या पोटांतला हा हेतु त्यांच्या या बाल-शिष्याच्या बाबतींत तंतोतंत साध्य झाला, यांत तिळाएवढीही शंका नाहीं. राष्ट्रीय शिक्षणाचें महत्त्व पटवावयाचें असेल तर एकट्या शिवरामपंतांचें उदाहरण दिलें तरी बस्स आहे. अर्थात् हा इष्ट परिणाम घडला तो पंतांचीही मनोभूमिका मुळांत अनुकूल म्हणून घडला, हेंही लक्षांत आणलें पाहिजे. गुरु चांगला भेटला तरी शिष्यही तसाच भेटावा लागतो !

'प्रभवति शुचिर्बिम्बोद्ग्राहे मणिर्न मृदांचयः' यांतील मर्म तेंच आहे. कांहीं गुण सोन्याचा तर कांहीं गुण सोनाराचा हाच न्याय गुरु-शिष्य-संबंधालाही लागू पडतो. शास्त्रीबोवा रत्नागिरीहून गेल्यानंतरही दोन तीन वर्षें म्हणजे इंग्रजी पांचवीपर्यंत पंतांनीं याच शाळेंत काढलीं. आतां ते एक हुशार विद्यार्थी म्हणून गणले जाऊं लागले होते. शिवाय निबन्धमाला व इतर पुस्तकेंही वाचण्याची चटक त्यांना याच सुमारास लागली. दृष्टि फांकूं लागली होती. आणखी वर्षाभरानें निघालेला 'केसरी' रत्नागिरीस येऊं लागला. शास्त्रीबुवांनीं काढलेला म्हणून शिवरामपंत व बाबा तो आस्थेनें वाचीत असत. शिवरामपंतांची केसरीशीं पहिली ओळख ही रत्नागिरींतली. या व्यासंगामुळेंच कीं काय, बुद्धीच्या बहुधा आसपास राहणाऱ्या प्रतिभेलाही चालना मिळून त्यांची काव्यस्फूर्ति जागृत होऊं लागली होती. रत्नागिरीस असतांनाच त्यांच्याजवळ, त्यांनीं केलेल्या कवितांचें एक बाड होतें व त्यांतून मधून मधून ते आपल्या कविता वाचून दाखवीत असत, असें बाबा पोतदार सांगतात.

अशा रीतीनें रत्नागिरीच्या शाळेंत मनःक्रांति धरून आल्यानंतर, शिवरामपंत किंवा अण्णा सुट्टींत पुष्कळदां महाडला आपल्या घरीं जात. पण तो पहिला उनाड बाळक्या आतां राहिलेला नव्हता. बाळक्याच्या मनांत आतां विद्याभिरुचीनें प्रवेश केला होता. अर्थात् आपल्या भावंडांच्या खेळांत तो पूर्वींच्याच प्रेमानें व हौसेनें सामील होई खरा, पण आतां त्याचे मनाला निराळेंच वळण लागलें असल्यामुळें तें दुसऱ्याच विचारांत गुंग असे. कधीं मुलें मुलें सोंगट्यांचा डाव मांडून किंवा गप्पांचा अड्डा ठोकून बसलीं असलीं तर अण्णाही त्यांत असत. परंतु खिडकींत त्यांचा कागद व दौत-टांक ठेवलेला असे व कांहीं सुचतांच खेळाच्या मधूनच चटकन जाऊन कागदावर लिहून मग पुनः येऊन मुलांत मिसळत. लहान भावंडांनीं विचारलें कीं, "येवढ्यांत जाऊन काय लिहितोस रे?" तर अण्णांनीं हांसून म्हणावें, "अरे, तुम्हांला नाहीं समजायचं तें इतक्यांत. सुचलेलं टिपून ठेवलं नाहीं तर पुनः तसं सुचत नाहीं." यावरून काव्यरचनेचा छंद त्यांना किती लागला होता व प्रतिभाशक्तीच्या कक्षेंत येऊन त्यांचें मन कसें ओढलें जाऊं लागलें होतें त्याची चांगली कल्पना येते. तशीच गोष्ट हिंडण्याची. महाड गांव सह्याद्रीनें वेष्टिलेला आहे. रायगड, चांभारगड वगैरे शिवाजीचे किल्ले शिवरामपंतांच्या घरांतल्या अंगणांतूनही दिसतात. पंतांनीं पूर्वीं हिंडतां-भटकतांना किंवा आपल्या अंगणांतूनही किती वेळां तरी या ऐतिहासिक किल्ल्यांकडे निर्विकार मनानें दृष्टि फेकली असेल! पण आतां 'आणि नंतर ही देशाभिमानाची ज्योत अंतःकरणांत पेटल्यावर व आपल्या जुन्या इतिहासाचा अभिमान जागृत झाल्यावर नवी दृष्टि प्राप्त झालेले शिवरामपंत, जेव्हां महाडच्या ह्या भागांत येत जात तेव्हां त्यांच्या डोळ्यांना तोच सह्याद्रि आणि तेच सह्याद्रीवरचे किल्ले कसे दिसत असतील ! त्यांनींच 'काळा'त एके ठिकाणीं लिहिलें आहे—

"वाचकहो, जुन्या इमारतींच्या या अद्भुतशक्तीचा अनुभव तुम्हांला कधीं आला आहे काय? रात्रीच्या अंधुक चांदण्यांत एखाद्या भयंकर अरण्यांतलि ओसाड किल्ल्यांचे भयाण बुरूज जर तुम्हीं कधीं

पाहिले असतील, किंवा मावळणाऱ्या सूर्याच्या किरणांमुळें चमकणारें असें एखाद्या मोडकळीस आलेल्या राजवाड्याचें सोनेरी शिखर जर तुम्हीं कधीं पाहिलें असेल, तर त्या किल्ल्यानें किंवा राजवाड्यानें तुमचे मनोविकार प्रक्षुब्ध केल्यावांचून तुम्हांस कधीं सोडलें नसेल, यांत अगदीं संशय नको. पुष्कळ लोकांची अशी तक्रार असते कीं, या जुन्या इमारती आमच्याशीं एक अक्षरसुद्धां बोलत नाहींत. पण मित्रहो, त्यांचा स्वभाव असा आहे. सद्गुणी स्त्रियांप्रमाणें त्याही भलत्याशीं कधीं बोलत नाहींत. तुम्हीं इतिहास वाचल्यावांचून त्यांच्याशीं बोलावयाला जाल; तर त्या तुमच्याकडे ढुंकूनसुद्धां पाहणार नाहींत. तुमचें मन इतर गोष्टींत व्यग्र झालेलें आहे, असें त्यांना कळलें; तर आपलें रहस्यनिवेदन तुमच्यापाशीं कधींही करणार नाहींत. इतिहासज्ञान आणि चित्ताची एकाग्रता; हीं साधनें घेऊन तुम्ही त्यांचेजवळ जा; म्हणजे त्या आपलें हितगुज तुम्हांला सांगतील. मग किल्ल्याचा एखादा पडका बुरूजही तुमच्या बाहूंत स्फुरण उत्पन्न करील; एखादें कारंजें तुमच्या डोळ्यांतून पाणी काढील व एखादें भुयार तुमच्या अंगावर शहारे आणील. या जुन्या इमारती जरी सर्व दगड, विटा आणि चुना यांनीं बनलेल्या असतात; तरी त्यांना योग्य मनुष्य भेटला म्हणजे त्याच्यापाशीं त्या हजारों तोंडांनीं बोलूं लागतात आणि प्रत्येक दोन दगडांच्या सांध्यामध्यें जणूं काय एक एक जीभ त्यांना फुटते असा भास होतो व सर्वत्र सामसूम झाल्यानंतर या इमारती गतवैभवाबद्दल इतका आक्रोश करितात कीं, त्या वेळीं जवळ असणाऱ्या इसमाची छाती अगदीं फाटूनच जाते. अशा रीतीनें या इमारती स्वदेशभक्तीचे मनोविकार जागृत करितात; इतकेंच नव्हे तर कधीं कधीं त्या आपल्या शत्रूला भयानें गर्भगळित करून सोडण्याचेंही साहस करितात. मध्यरात्रीच्या काळोखांत एखाद्या किल्ल्याच्या दिल्ली-दरवाजासमोर कोणी शिपाई फितूर होऊन शत्रूसाठीं त्या किल्ल्याच्या रखवालीचें काम करीत असला; तर त्याला त्या किल्ल्याचे पूर्वीचे खरे मालक त्या काळोखांत दिसूं लागतात; आणि मीं जें हें अधमपणाचें आणि फितुरीचें काम पत्करिलें आहे; त्या माझ्या अपराधाबद्दल

या दरवाजाच्या कमानीचे दगड; माझ्या डोक्यावर कोसळून पडतील कीं काय, अशा भीतीनें तो दरवाजापासून दूर दूर पळूं लागतो. सारांश, पहाणाराचें मन तल्लीन झालेलें असलें म्हणजे या जुन्या इमारतींतील प्रत्येक दगड आणि प्रत्येक वीट, हीं पूर्वींचा वृत्तांत प्रत्यक्षवत् भासवितात व त्यामुळें पूर्वींच्या वैभवाविषयीं पहाणाराच्या मनांत अतिशय उत्सुकता उत्पन्न होते."

या उताऱ्यांत कल्पनाविलास असला तरी तो आत्मप्रत्ययावर आधारलेला आहे! भोंवतालच्या वातावरणाचा त्यांत वाढणाऱ्या मनुष्यावर विलक्षण आणि कल्पनातीत परिणाम होत असतो. या दृष्टीनें शिवरामपंत ज्या ठिकाणीं वाढले त्या ह्या भू-प्रदेशाची पार्श्वभूमि लक्षांत घेणें अत्यंत महत्त्वाचें व आवश्यक आहे. महाडचें ऐतिहासिक महत्त्व पूर्वापार चालत आलेलें आहे. महाड प्रांत हा शिवाजींच्या हालचालींनीं संचारित झालेला आहे. शिवाजी महाराजांनीं स्थापिलेल्या राज्याची राजधानी जो रायगड किल्ला तो महाडपासून सारा आठ मैलांवर. दुसरा किल्ला चांभारगड तर महाडच्या वेशीवर. पुढें पेशवाईतल्या राजकारणाच्या कांहीं उलाढालींचें हेंच क्षेत्र होतें. अशा ऐतिहासिक महत्त्वाच्या स्थळांचें सान्निध्य म्हणजे केवढी गोष्ट असते, ह्याची कल्पना इतरांना येणें शक्य नाहीं. या स्थळांना कित्येक दंतकथा आणि आख्यायिका चिकटलेल्या असतात. व त्या मेलेल्या स्वातंत्र्यवीरांच्या जिवंत आठवणी तिथल्या जवळपास राहणाऱ्या लोकांच्या स्मृतींत गुंगत असतात! अशा स्थळांनीं वेष्टिलेल्या ठिकाणीं जो लहानाचा मोठा होतो व ज्याला आपल्या देशाच्या चालू स्थितीची कांहीं जाणिव उत्पन्न झालेली असते, त्याच्या दृष्टीनें हे समोर उभे ठाकलेले किल्ले व त्यांविषयींच्या कानांवर येणाऱ्या पूर्वजांच्या वीरकथा यांमध्यें केवढें स्फूर्तिदायकत्व सांठविलेलें असतें; त्याचा थोडासा कां होईना पण साक्षादनुभव त्या त्या ठिकाणीं तात्कालिक वास्तव्य करणाऱ्यालाही आल्यावांचून राहणार नाहीं. शिवरामपंतांच्या मनावर या गोष्टींचा परिणाम आणि पगडा जितका बसावयाचा तितका पूर्णत्वानें बसलेला होता यांत संशय नाहीं.

असो. विष्णुशास्त्री १८७९ च्या मे महिन्यांत रत्नागिरी सोडून पुनरागमनाय म्हणजे रजेवर म्हणून पुण्यास गेले खरे. पण पुन्हा परत न येतां त्यांनीं सरकारी नोकरीची बेडी कशी व कां तोडून टाकली, पुण्यास त्यांना टिळक,आगरकर ही तरुण उत्साही मंडळी कशी भेटली व या त्रिवर्गांनीं नवीन शाळा काढण्याचा बेत कसा मुक्रर केला, इत्यादि गोष्टींचा इतिहास सर्वांस माहीत असल्यामुळें त्याचा येथें विस्तार करण्याची आवश्यकता नाहीं. या सर्वांची परिणति ता. १।१।१८८० रोजीं न्यू-इंग्लिश-स्कूल स्थापण्यांत झाली एवढें सांगितलें म्हणजे पुरें आहे. 'नव्या दमाचे नव्या दिलाचे' लोक संस्थापकांत व अध्यापकांत जमल्यामुळें उत्साहाच्या वातावरणांत शाळेचें काम सुरू झालें व दिवसेंदिवस शाळेची भरभराटच होत चालली. आरंभापासून न्यू-इंग्लिश स्कूलच्या पटावरील मुलांची संख्या अपेक्षेबाहेर व प्रमाणाबाहेर वाढूं लागल्यामुळें चालकांनीं आपल्या शाळेची प्रसिद्धि पुण्याचे बाहेर फारशी केली नाहीं. तथापि लौकरच या शाळेच्या छापील 'जाहिराती' रत्नागिरीच्या हायस्कुलांत येऊन धडकल्या, व त्याबरोबर तिथल्या विद्यार्थ्यांत जोराची खळबळ उडाली; आणि बऱ्याच विद्यार्थ्यांनीं पुण्यास न्यू इंग्लिश स्कुलांत जाण्याचें ठरविलें. त्यांत शिवरामपंतही सामील होते. ही कुणकुण हायस्कूलच्या चालकांस लागतांच त्यांनीं सर्व विद्यार्थ्यांस बोलावून चांगला दम भरला. कारण एक तर सरकारी शाळा आणि विष्णुशास्त्र्यांनीं उघड उघड काढलेली ही राष्ट्रीय शाळा यांत एक प्रकारची तेढ होती. व शिवाय पूर्वीची शाळा सोडून मुलांनीं नव्या शाळेंत जाणें यांत जुन्या शाळेला सहजच कमीपणा चिकटत होता. म्हणूनच रत्नागिरी हायस्कूलच्या चालकांनीं जेवढें करावयाचें तेवढें करून पाहिलें. पण विद्यार्थ्यांचाही निश्चय वाखाणण्यासारखा होता. त्यांनीं एक दिवस शाळेच्या इमारतीच्या बाहेर उभे राहून शाळेवर बहिष्कार टाकला! त्या दिवशीं मास्तरांचे तास रिकाम्या बांकांनाच ऐकावे लागले! विद्यार्थ्यांना शास्त्रीबुवांच्या शिकविण्याचा साक्षात् अनुभव आलेला असल्यामुळें त्यांच्याबद्दलचें कांहींएक विलक्षण आकर्षण मुलांना उत्पन्न झालें होतें. 'शास्त्रीबुवांनीं नवीन शाळा काढली आहे त्यांत आम्ही जाणार' आम्ही 'पुण्यास जाणार' हीं ठरीव

वाक्यें त्यावेळीं मुलांच्या तोंडून ऐकूं येत होतीं. बाबा पोतदार लिहितात. "..... त्याबद्दल रत्नागिरी हायस्कूलचे विद्यार्थ्यांत फार मोठी खळबळ झाली. व बरेच विद्यार्थी पुण्यास आले. ह्या चळवळींत माझ्याबरोबर शिवरामपंतांनींही पुढाकार घेतला होता."

अशा रीतीनें शिवरामपंतांच्या मनानें पुण्यास जाण्याकरितां उचल खाल्ली व ती त्यांनीं कृतींतही आणिली. ही सन १८८२ च्या मार्च महिन्यांतली गोष्ट. त्या वेळीं त्यांचें वय १८ वर्षांचें होतें. पण त्यावेळीं मोटारी नव्हत्या. पडशी खांद्यावर टाकून शिवरामपंतांनीं पुण्याची वाट धरली!

## ३

# विद्यादेवीची आराधना

" माझी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा होण्याच्या आधींपासूनच मी कॉलेजबद्दल मनोराज्य करीत असे, व मी कॉलेजमध्यें आलों, तेव्हांही माझ्या मनांत फार आशा होत्या...ह्या कॉलेजांतून शिकून बाहेर पडलों, म्हणजे मी अमुक करीन, आणि तमुक करीन, असें मला वाटत होतें. मी आपल्या देशाच्या कांहीं तरी कामीं येईन, मी आपल्या देशांतील लोकांची दैन्यावस्था दूर करीन, मी आपला धर्म उत्कृष्टावस्थेला नेईन, अशा एक कां दोन, लक्षावधि महत्त्वाकांक्षा माझ्या मनांत घोळत होत्या. "

शि. म. परांजपे

( डेक्कन कॉलेजला पाहून केशवरावांच्या मनांत आलेले विचार—काळ. )

सन १८८२ तील पुणें हें त्यानंतर लाभलेल्या कीर्तीच्या मानानें उणें होतें, यांत शंका नाहीं. तथापि तेव्हांही पुण्याचें नांव देशांत पुनरपि गाजूं लागलें होतें. लोकहितवादी, माधवराव रानडे, विष्णुशास्त्री, गणेश व्यंकटेश जोशी, वासुदेव बळवंत इत्यादि मंडळी डोकें वर काढूं लागली होती व सार्वजनिक सभा, न्यू इंग्लिश स्कूल, ज्ञानप्रकाश, केसरी, मराठा इत्यादि सार्वजनिक संस्था उगवूं लागल्या होत्या. इंडियन नॅशनल कॉंग्रेस अद्यापि स्थापन होऊन चळवळीला निश्चित स्वरूप व नेट यावयाचा होता. पण चळवळीला आरंभ झाला होता, ही गोष्ट तितकीच

निश्चित होय. चळवळीचा सूर्य वर येऊन त्याच्या उन्हाची तिरीप अजून नव्हती लागत, पण त्याचे कोंवळे किरण देशभर पडूं लागून अंधकाराचा नाश झपाट्यानें होत चालला होता. पुण्यांत 'द्विज' गणाचा किलबिलाट खासच सुरू झाला होता. अशा रीतीनें पुणें हें राजकीय जागृतीचें माहेरघर तर बनलेंच होतें. पण शिवाय स्वराज्य-संस्थापक शिवाजींची कर्मभूमि आणि इंग्रज येण्यापूर्वी व नंतरही आक्रमणाची लाट थोपवून त्यांच्याशीं टक्कर देणाऱ्या मराठ्यांची किंवा पेशव्यांची आत्तां आत्तांपर्यंत असलेली राजधानी म्हणून पुण्यनगरीचा जुना लौकिक होताच. यामुळें परप्रांतांतून प्रथमच पुण्यास येणाऱ्या बाहेरच्या लोकांना पुण्या-बद्दल 'क्या चीज है' असें आदरमिश्रित आश्चर्य वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. पण त्यांतल्या त्यांत बाहेरून पुणें शहरांत येणाऱ्या महाराष्ट्रीयाला तर त्यांत आणखी आपलेपणाची आणि अभिमानाचीही भावना असे. पुण्यांत पाहिल्यानेंच पाऊल टाकणाऱ्या विद्यार्थिदशेंतल्या शिवरामपंतांच्या मनांत अशाच प्रकारच्या भावना खेळत असल्यास त्यांत नवल नाहीं. विष्णुशास्त्र्यांनीं जागा केलेला त्यांचा जुन्या इति-हासाचा अभिमान वाचनानें उद्दीपित झालेला होता. त्यामुळें पुण्याची वाट चालत असतांना पुण्याच्या गतवैभवाचीं कितीक रम्य कल्पनाचित्रें त्यांच्या डोळ्यापुढें उभीं रहात असतील आणि निदान आतां आपल्याला त्याचें स्मृतिरूप अवशेष तरी पहावयास सांपडून कुतूहलबुद्धि कांहीं अंशीं तरी शांत होईल अशा विचारानें त्यांनीं दुःखांत सुख मानलें असेल! त्याचप्रमाणें पुण्याच्या आणि तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या शिवरामपंतांनीं पुण्यांत आपल्याला थोर विद्वान् लोकांचा सहवास घडेल, पुन्हां विष्णुशास्त्र्यांच्या अध्यापनाचा लाभ मिळेल, शाळा—कॉलेजांत शिकून आपण ज्ञान संपादन करूं—विद्वान् होऊं, इत्यादि भावी आयुष्यक्रमासंबंधींच्या आकांक्षांचे मनोरेही मनांतल्या मनांत बांधले नसतील असें नाहीं. व अशा रीतीनें त्या वेळीं त्यांच्या मनांत भूत आणि भविष्य यांची एक सांगडच बनून राहिली असली पाहिजे, यांत शंका नाहीं. पण इथें तर्कांचा प्रांत लागला.

याप्रमाणें ‘ आम्ही शास्त्रीबोवांच्या शाळेंत जाणार ’ या अभिनिवेशानें शिवरामपंत पुण्यांत आले खरे; पण दैवाची त्या बाबतींतली योजना निराळीच होती. ते पुण्यास येऊन पोहोंचले तो दिवस होता १७ मार्च १८८२. शास्त्रीबुवांचा त्या दिवशींच अंत झाला होता ! संस्था–स्थापनाचा मोठा खटाटोप आरंभून व त्यांची मांडामांड चालू असतांनाच ‘ बोलावणें ’ आल्यामुळें बत्तिसाव्या वर्षी तो तसाच टाकून देऊन त्यांचा आत्मा शरीर सोडून निघून गेला होता ! मागें राहिलेल्या शरीराची स्मशानयात्रा निघाली होती. “ आम्ही आलों त्याच दिवशीं स्मशानयात्रा व वरीच मंडळी पाहून आम्ही विचारलें, तेव्हां ‘ शास्त्रीबुवा चालले आहेत ’ असें आम्हांला समजलें ” असें बाबा पोतदार स्मरणानें सांगतात. कांहीं एक हेतु आणि हुरूप मनांत धरून उमेदीनें शिकण्यासाठीं आलेल्या या मंडळींना हें दृश्य पाहून केवढा धक्का बसला असेल, याची कल्पना करणें कठीण नाहीं. शिवरामपंतांच्या मनाला बसलेला हा धक्का त्यांनीं या वेळीं रचलेल्या एका कवितेंत उतरला होता. या प्रसंगाचा ठसा त्यांचे मनावर खोल उमटला असल्यामुळें ते ही कविता नेहमीं गुणगुणत असत. त्यांच्या बहिणीच्या स्मरणांत राहिलेला हा पद्य त्यांतला एक चरण—

हा हा ! विष्णु, तुला कशी नच दया गेलास ना टाकुनी !

पण योगायोगापुढें कोणाचेंच कांहीं चालत नाहीं. शिवरामपंत आणि बाबा यांनीं शास्त्रीबुवांच्या पण शास्त्रीबुवा नसलेल्या शाळेंत इंग्रजी पांचव्या इयत्तेंत नांवें घातलीं आणि अभ्यास सुरू केला. त्या वेळीं न्यू इंग्लिश स्कूल मोरोबादादाच्या वाड्यांत भरत असे. पण आणखी कांहीं महिन्यांतच तें तेथून निघून शनवारांतील गद्रे–वाड्यांत गेलें. शिवरामपंतांनीं अभ्यासाकरितां व रहाण्यासाठीं पुण्यांत भाड्यानें एक खोली घेतली होती. त्या वेळीं दगडू हलवायाचे दत्ताच्या पाठीमागें काळ्या जोगेश्वरीच्या शेजारीं अप्पा खाणावळवाल्याची एक प्रसिद्ध खाणावळ असे. कृष्णाजी त्र्यंबक गांगल, बाबा पोतदार व शिवरामपंत

ह्या न्यू इं. स्कुलांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचें त्रिकूट जमून तें या खाणावळींत जेवावयास जात असे.

शिवरामपंत शिकूं लागले त्या वेळीं न्यू इंग्लिश स्कूलच्या अध्यापकांत टिळक, आगरकर, वामन शिवराम आपटे अशी मंडळी होती. हाच टिळकांशीं आलेला त्यांचा पहिला संबंध. अर्थात् या सुमाराला त्यांचें 'टिळकत्व' प्रस्थापित झालेलें नसून अद्याप ते साधे बळवंतराव टिळकच होते. टिळकांकडे गणित विषय होता. आपटे हे इंग्लिश प्रोज व संस्कृत आणि आगरकर Poetry शिकवीत. यांपैकीं आगरकर हे हंसत–खेळत शिकवीत. ही खेळीमेळी टिळकांच्या शिकविण्यांत नव्हती. आपण बरे नि आपला विषय बरा अशी त्यांची पद्धत असे. शिवाय प्रथमदर्शनींच छाप पडेल किंवा सामान्य विद्यार्थ्यांना त्यांच्या बुद्धीची चमक कळेल असें नव्हतें. फक्त बुद्धिमान् विद्यार्थ्याला मात्र त्यांच्या शिकविण्यांत विषयाची किल्लीच हस्तगत झाल्यासारखी होत असे. एकंदरींत टिळक–आगरकर स्वार्थत्यागी व बुद्धिमान् असले तरी त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांना फारसा झाला नाहीं. कदाचित् परीक्षेकरतां म्हणून ते शिकवीतही नसावेत. किंवा या दोघांच्या कार्यशक्तीचा एक डोळा शिकविण्याकडे असला तरी दुसरा केसरी–मराठ्यांतील लेखनाकडे होता, हेंही त्याचें कारण असूं शकेल. पण वामनराव आपट्यांची गोष्ट तशी नव्हती. शिक्षक या नात्यानें त्यांची सर कुणालाच आली नाहीं. विद्यार्थ्याला नेमकीं उपयोगी पडतील अशींच टिपणें ते देत. हेडमास्तर म्हणूनही त्यांची शिस्त व कायदा कडक असे. ते छडीही फारशी दूर ठेवीत नसत. मुलांचे पेपर इतक्या काटेकोरपणानें तपाशीत कीं, धारवाडी कांट्याच्याही वरताण. त्यांनीं बारकाव्यानें दिलेल्या मार्कांचा आंकडा, $\frac{2}{5}$, $\frac{3}{8}$ अशा अपूर्णांकांत शिरत असे. त्यामुळें शाळेंत एकंदर शिस्त, टापटीप व अभ्यास उत्तम रीतीचा असे. पण याहीपेक्षां त्यांच्यामध्यें शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें एक मोठा गुण–किंवा गुणग्राहकता म्हणा–वास करीत होता. चुणचुणीत व होतकरू विद्यार्थी नेमके हेरून त्यांना आपल्या घरीं बोलावून व स्पेशल कोचिंग देऊन ते

परीक्षिकरतां त्यांना उत्तम तयार करीत असत. न्यू इंग्लिश स्कूलला लागोपाठ जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलरशिपा मिळवून देऊन शाळेचा लौकिक वाढविण्याचें सर्व श्रेय वामनराव आपट्यांनाच आहे.

शिवरामपंत न्यू इंग्लिश स्कूलमध्यें आल्यानंतर थोड्याच दिवसांत त्यांचे शिक्षक टिळक व आगरकर यांना कोल्हापूर प्रकरणांत शिक्षा झाली. ता. २६ ऑक्टोबर १८८२ रोजीं टिळक–आगरकर यांची डोंगरीच्या तुरुंगांतून सुटका झाली त्या वेळीं लोकांनीं मुंबईस व डेक्कन कॉलेजांतील मंडळींनीं खडकी–स्टेशनावर त्यांचा सत्कार केला; पण पुणें स्टेशनावर पुष्कळ लोक गेले होते त्यांत वामनराव आपटे आपल्या शाळेंतील विद्यार्थी घेऊन स्वागतार्थ हजर होते. त्यांत शिवरामपंत होतेच. स्टेशनपासून दोघांना मिरवून आणून सायंकाळीं मोरोबा दादाच्या वाड्यांत त्यांना जाहीर पानसुपारी करण्यांत आली. त्या सभेंतही शिवरामपंत व इतर कांहीं विद्यार्थी उत्साहानें आलेले होते. रत्नागिरीपासून देशाभिमानाचा व राष्ट्रीय बाण्याचा जो कांहीं संस्कार त्यांच्या मनावर झालेला होता तो अशा तऱ्हेच्या प्रसंगांनीं दृढ आणि खोल होण्याला मदत होत होती. टिळक–आगरकरांसारख्या आपल्या गुरूंना, विद्वानांना व स्वार्थत्यागी देशभक्तांना सरकारच्या कायद्यांमुळें ऐनजिनसी कारागृहवास सोसावा लागला, हें पाहून शिवरामपंतांची सरकारबद्दलची मनांतली अढी बळकट होत चालली असेल, यांत बिलकुल शंका नाहीं.

असो. शिवरामपंत पांचवीच्या वर्गात दाखल झाले तेव्हां त्यांचा नंबर पहिल्या तिहींत असे. लवकरच त्यांची वर्गांतील हुषारी व तरतरी यांवर आपट्यांची शोधक नजर गेली, व त्यांनीं त्यांना एकदम पांचवींतून सातव्या इयत्तेंत घेतलें. एवढेंच नव्हे तर शिवरामपंत, महादेव हरि मोडक व बाबा पोतदार अशा तिघांस निवडून काढून त्यांना शंकरशेठ स्कॉलरशिपसाठीं ते तयार करूं लागले.

एकीकडे शिवरामपंतांचा काव्यरचनेचा छंद चालूच होता. ते आपल्या कविता शाळेच्या संमेलनांत वाचून दाखवीत असत. आपटे–आगरकर वगैरे मंडळींना या त्यांच्या कविता फार आवडत असत.

त्यांच्या कवितांतून विशेषेंकरून सृष्टिचमत्कारांचीं वर्णनें फारच बहारीचीं उतरत असत.

सन १८८३ मध्यें पहिल्या वर्षी शिवरामपंत मॅट्रिकच्या परीक्षेला बसून नापास झाले. त्यांचे इंग्रजी मराठी हे विषय तयार होते;व संस्कृत तर उत्तमच होतें. तथापि पांचवींतून एकदम सातवींत घेतले गेल्यामुळें एखाद्या कच्च्या राहिलेल्या विषयानें ( बहुधा गणितानें, कारण गणितांत त्यांची विशेष गति नसे, अशी माहिती मिळते ) त्यांना दगा दिला असावा. पण या अपयशाचा वचपा त्यांनीं पुढील वर्षी भरून काढिला. १८८४ सालच्या परीक्षेंत, युनिव्हर्सिटींत संस्कृतांत त्यांचा नंबर पहिला येऊन त्यांना पहिली जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळाली. अर्थात् हें ऐकून आणि बाळक्याच्या लहानपणच्या आणि आतांच्या स्थितींत इतका फरक पडलेला पाहून त्यांचे वडील महादेवराव यांच्यापेक्षां अधिक आनंद कुणाला होणार होता?

शिवरामपंत मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास व्हावयाला आणि फर्ग्युसन कॉलेज नवीन स्थापन होण्याला एकच गांठ पडली. टिळक, आगरकर, आपटे या तडफदार आणि महत्त्वाकांक्षी लोकांनीं मनांतल्या पूर्वसंकल्पानुसार नवें कॉलेज उभारण्याचें ठरविलें. पण पहिल्या वर्षाचा एकच वर्ग काढण्याची परवानगी त्यांना मिळाली. म्हणून एकच कां होईना, पण प्रीव्हियसचा वर्ग त्यांनीं सुरू केला. त्या वेळीं पुण्यांत एकच एक असलेलें डेक्कन कॉलेज साहजिकपणेंच भरभराटींत होतें. शिवाय त्याला सरकारी आश्रय. फर्ग्युसन कॉलेजच्या पायाचा दगड बसवावयाला गव्हर्नरसाहेब आले असले तरी तें स्वतंत्र व निराळ्या बाण्याचें होतें. यामुळें या दोन कॉलेजांत एक प्रकारची चुरसच होती. निदान या नव्या कॉलेजांतील नव्या दमाच्या अध्यापकांत तर असा अभिनिवेश होताच कीं, आम्ही तर स्वतंत्र कॉलेज चालवून दाखवूंच दाखवूं. या नव्या कॉलेजचे प्रिन्सिपल झाले वामन शिवराम आपटे. अशा स्थितींत टिळक–आगरकर प्रभृति मंडळींच्याच शाळेंत तयार झालेले व आपट्यांच्या तर खास मर्जींतले व प्रेमांतले विद्यार्थी शिवरामपंत हे या शाळेचेंच निघालेलें कॉलेज टाकून डेक्कन कॉलेजमध्यें जाणें

शक्यच नव्हतें. परंपरेचा म्हणून कांहीं एक अभिमान निर्माण होतच असतो. शिवरामपंतांनीं फर्ग्युसन कॉलेजांत आपलें नांव दाखल केलें व अशा रीतीनें फर्ग्युसन कॉलेजच्या पहिल्या विद्यार्थिगणांपैकीं एक म्हणून ते गणले जातात. याविषयींची खुद्द शिवरामपंतांनींच लिहिलेली एक आठवण या ठिकाणीं देणें योग्य होईल. आठवण टिळकांची म्हणून दिलेली आहे खरी; पण त्यांत नव्या कॉलेजची स्थिति व वातावरणाचें चित्र चांगलें रेखाटलेलें सांपडतें.

पुण्यांत **फर्ग्युसन कॉलेज** स्थापन झालें, तेव्हां त्याच्या पहिल्या वर्षी प्रीव्हियस परीक्षेचा एकच क्लास प्रथम सुरू करण्यांत आला होता. व हा क्लास जेथें पूर्वी न्यू इंग्लिश स्कूल असे, त्याच शनवार पेठेंतील गद्रयांच्या वाड्यामध्यें पुढल्या थोरल्या दिवाणखान्यांत भरावेण्यांत येत असे. व शाळेंतच त्या वेळीं हें कॉलेज भरत असल्यामुळें व मागच्या वर्षी मॅट्रिक्युलेशनमध्यें पास झालेलीं मुलें नवीन वर्षी या प्रीव्हियसच्या वर्गांत येऊन बसल्यामुळें प्रीव्हियसचा वर्ग म्हणजे सातव्या इयत्तेच्या पुढची एक **आठवी इयत्ता**, असाच पुष्कळ लोकांच्या मनावर परिणाम झालेला होता. पुण्यांतील डेक्कन कॉलेज हें त्या वेळीं फार चांगल्या स्थितीमध्यें होतें. व त्या मानानें पाहिलें असतां नुकतेंच नवीन निघालेलें फर्ग्युसन कॉलेज हें डेक्कन कॉलेजची बरोबरी करूं शकेल, हें शक्य नव्हतें. व त्यामुळें हा फर्ग्युसन कॉलेजचा पहिल्या वर्षीचा प्रीव्हियसचा वर्ग म्हणजे सातव्या इयत्तेच्या पुढचा आठव्या इयत्तेचा न्यू इंग्लिशमधील आणखी एक नवीन वर्ग, असें पुष्कळ लोकांकडून म्हणण्यांत येत असे. त्यावेळच्या त्या म्हणण्यांत जर कोणाचा कांहीं गर्भित अर्थ असला, तर तो गर्भित अर्थ फर्ग्युसन कॉलेजनें आपल्या पुढील कर्तबगारीनें आणि भरभराटीनें कसा निराधार ठरविला आहे, हें हल्लीं सर्वांना प्रत्यक्ष दिसतच आहे. पण या पुढल्या भावी उन्नतीचीं चिन्हें सूक्ष्म रीतीनें पाहणारांना अगदीं पहिल्या वर्षापासूनही दिसत होतीं, असें म्हणावयाला हरकत नाहीं. कोणत्याही कॉलेजचा नांवलौकिक हा मुख्यत्वें-करून त्या कॉलेजांतील शिक्षकांच्या शिक्षणनैपुण्यावर अवलंबून असतो, हें उघड आहे. आणि या दृष्टीनें पाहतां फर्ग्युसन कॉलेजचे

त्या सुरुवातीच्या वेळचे प्रोफेसर इतके उत्कृष्ट होते कीं, निदान विद्यार्थ्यांना काळजीपूर्वक रीतीनें शिकविण्याच्या बाबतींत तरी त्यांची बरोबरी त्यावेळच्या दुसऱ्या कोणत्याही कॉलेजांतील प्रोफेसर करूं शकले नसते. प्रो. वामन शिवराम आपटे, प्रो. केळकर, प्रो. आगरकर वगैरे ते त्या वेळचे सर्वच प्रोफेसर फार नामांकित होते. परंतु त्या सर्वांमध्येंही लोकमान्य टिळक यांची शिकविण्याची पद्धत फारच वाखाणण्यासारखी होती. लोकमान्य हे जो विषय हातीं घेत, त्यांत ते निष्णात होत, अशी त्यांची बुद्धि होती, यांत संशय नाहीं. त्या वेळीं न्यू इंग्लिश स्कूलच्या वरच्या वर्गांतून ते गणिताचाच विषय शिकवीत असत, त्यावरून कॉलेजमध्येंही ते बहुतेक गणिताचेच प्रोफेसर होतील, असा पुष्कळांचा अंदाज होता. व त्या अंदाजाप्रमाणें गणित शिकविण्याचें काम तर त्यांच्याकडे आलेंच. पण गणिताशिवाय संस्कृताचाही कांहीं भाग त्यांच्याकडे देण्यांत आला होता. प्रो. वामन शिवराम आपटे यांची संस्कृत विषय शिकविण्याची हातोटी फारच वर्णनीय होती. त्यांनीं आपल्याकडे 'मालविकाग्निमित्र' नाटक शिकविण्याचें काम घेतलें होतें. व भर्तृहरीचीं नीतिशतक आणि वैराग्यशतक हीं जीं दोन शतकें त्या वर्षींच्या प्रीव्हियसच्या परीक्षेला नेमलेलीं होतीं, तीं शिकविण्याचें काम लोकमान्यांकडे होतें. आणि तो विषयही विद्यार्थ्यांना समाधान वाटेल अशा उत्कृष्ट रीतीनें, त्यांच्याकडून शिकविला जात असे. गणितांतल्याप्रमाणेंच संस्कृतांतीलही ही त्यांची पारंगतता पाहून लोकमान्यांच्या सव्यसाचीपणाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनामध्यें अतिशय कौतुक आणि आदर उत्पन्न झाल्यावांचून केव्हांही राहिला नाहीं."

या उताऱ्यावरून या नवीन कॉलेजविषयीं वातावरणांतील तुच्छता-बुद्धि व उलट त्यांतील उत्साही अध्यापक व अभिमानी विद्यार्थी यांच्या पोटांतला पीळ आणि आत्मविश्वास सहज लक्षांत येणार आहे. त्याचप्रमाणें वामनराव आपट्यांचें स्वभाव-वैशिष्ट्य आणि टिळकांच्या बुद्धीचें सव्यसाचित्व यांबद्दल शिवरामपंतांना किती आदर वाटत होता, याची कल्पना येते. शाळेपासून टिळकांबद्दल गुरु म्हणून त्यांना आदर होताच;

पण या कॉलेजच्या वर्गाप्रमाणेंच पुढें इतर क्षेत्रांतही त्यांचें बुद्धिवैभव व इतर गुण प्रत्ययाला येऊन उत्तरोत्तर त्यांच्याबद्दल पंतांना कौतुक, प्रेम आणि ओढ वाटूं लागली असेल ! फर्ग्युसन कॉलेजांत प्रीव्हियसच्या वर्गांत त्यांच्याबरोबर हरि नारायण आपटे, दादासाहेब रानडे ( किवळेकर ), के. के गोखले, वामन मोरेश्वर पोतदार, महादेव हरि मोडक, बुलढाण्याचे वि. कृ. गर्दे, गोविंद सखाराम सरदेसाई इत्यादि मंडळी होती.

फर्ग्युसन कॉलेजांतून प्रीव्हियसची परीक्षा पास झाल्यावर शिवरामपंत डेक्कन कॉलेजांत दाखल झाले. व तेथेंच त्यांचा एम्.ए. पर्यंतचा अभ्यास पूर्ण झाला. डेक्कन कॉलेज गांवापासून बरेंच दूर असल्यामुळें बहुतेक विद्यार्थी रेसिडेन्सीमध्यें रहात. किंबहुना रेसिडेन्सींत राहणें हा एक चैनीचा भाग असेंही पुष्कळसे—विशेषत: पैशाची ऊब असलेले विद्यार्थी मानीत असत; तरी पण शंकरशेट स्कॉलरशिप् मिळाली होती तरी देखील आपला भार वडिलांच्यावर शक्य तितका कमी टाकावयाचा अशी पंतांची वृत्ति होती. शिवाय त्यांचे धाकटे भाऊ याच सुमारास शिक्षणासाठीं पुण्यास आले असल्यामुळें पंतांनीं मुंजाबाच्या बोळांत तळेकरांच्या वाड्यांत जागा घेऊन बिऱ्हाडच थाटलें होतें. स्वत: ते, त्यांच्या पत्नी जानकीबाई, गणपतराव, विष्णुपंत व भाचे लक्ष्मण नारायण दारशेतकर अशी मंडळी त्या वेळीं या पुण्याच्या बिऱ्हाडांत रहात होती. येथूनच शिवरामपंत कधीं पायीं तर कधीं गाडींतून कॉलेजला जात. त्या वेळीं डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपल प्रथम ऑक्झनहॅम व नंतर सेल्बीसाहेब असून प्रो. बॅरेट, प्रो. फॉरेस्ट इत्यादि मंडळी अध्यापकवर्गांत होती. एतद्देशीय प्रोफेसरांत डॉ. भांडारकर व प्रो. करकरे हे होते. यांपैकीं भांडारकरांची शिवरामपंतांवर विशेष मर्जी बसली होती.

डेक्कन कॉलेजांतील पहिलें वर्ष डे–स्टूडण्ट म्हणून काढल्यानंतर, पुढील सालीं म्हणजे सन १८८७ मध्यें शिवरामपंत रेसिडेन्सींत रहावयास गेले. त्या वेळीं वि. का. राजवाडे, रा. वापट (उमरावती), बाबासाहेब खरे, नीळकंठराव पाटणकर, प्रो० नारायण सखाराम पानसे, कृष्णाजीपंत

खाडिलकर हे त्यांचे त्या वेळचे कॉलेजांतील व रेसिडेन्सींतील समकालीन मित्र होते. तथापि राजवाडे आणि खाडिलकर यांच्याशीं त्या वेळेपासून त्यांचें विशेष रहस्य असे. महादेव हरि मोडक हे त्यांचे ' रूम-मेट ' होते. एकंदरींत कॉलेजमध्यें बुद्धिमान् विद्यार्थी म्हणून शिवरामपंतांचा लौकिक असला तरी ते अत्यंत शांत वृत्तीचे व अबोल म्हणून गणले जात असत. अत्यन्त खोल अशा त्यांच्या स्वभावाची खूण त्यांच्या या कॉलेजांतील वर्तनक्रमांत सांपडण्यासारखी आहे.

पंतांच्या डेक्कन कॉलेजांतील वर्तनक्रमाची कल्पना खालीं दिलेल्या सूचक मुद्द्याच्या गोष्टींवरून करतां येईल. कॉलेजमध्यें असतांना अभ्यासापेक्षां संस्कृत व इंग्रजी वगैरे वाङ्मयें वाचण्याचा त्यांना फार नाद लागला होता. क्रिकेट, टेनिस या त्या वेळीं ' फॅशनेबल ' होत चाललेल्या खेळांकडे त्यांनीं ढुंकूनही पाहिलें नाहीं. मधूनमधून बोटिंग–क्लबांत व नदींत पोहावयास जात. संस्कृत नाटकांचीं भाषांतरें करणें व नाटकें लिहिणें, या गोष्टीही सुरू झाल्या होत्या. कॉलेजमध्यें कोणत्याही गोष्टी-मध्यें ते विशेष किंवा प्रत्यक्ष पुढाकार कधींही घेत नसत. त्या वेळीं डेक्कन कॉलेजांत डिबेटिंग क्लब्स स्थापन होऊन त्यांतून वाद–चर्चा चालत असत, तथापि शिवरामपंत त्यांत कधींही बोलत नसत, अशी खात्री-लायक माहिती मिळते. ना. बेळवी, प्रो. विजापूरकर हे त्या वेळीं भाषण-चतुर म्हणून प्रसिद्ध होते. शिवरामपंतांच्या वाचनाचा व्याप आणि विस्तार मात्र वाढत चालला होता. त्यांची वाचन–अभ्यासाची एक बैठक सहा–सहा तासांची सहज असे! हें सर्व पाहिल्या-नंतर कॉलेज ही एक डिग्र्या मिळविण्याची जागा किंवा क्रीडाक्षेत्र नसून ज्ञान संपादन करण्याचा आखाडा या बुद्धीनें ते कॉलेजकडे पहात होते, हें उघड दिसतें. पूर्वीच्या काळीं गुरुगृहीं व्रतस्थ राहून विद्यार्जन करणाऱ्या शिष्यवर्गासारखीच त्यांची कॉलेजमधील दिनचर्या होती. कॉलेजांतही स्फुटकाव्यें व पद्यें करण्याचा त्यांचा क्रम चालूच होता. याच सुमारास आपल्या कॉलेजचें एक त्रैमासिक काढावें असा त्यांच्या सहाध्यायी मंडळींत विचार निघाला. त्याप्रमाणें ' डेक्कन-कॉलेज कॉर्टरली ' या नांवाचें त्रैमासिक सुरू झालें. त्याच्या पुरस्कर्त्यां-

पैकीं ते एक होते. या 'क्वार्टरली'च्या पहिल्याच अंकांत शिवरामपंतांनीं अहल्या-जार या नांवाचें आपलें एक लहानसें खंडकाव्य प्रसिद्ध केलें होतें. त्यांची मोठी अशी ही एवढी एकच कविता उपलब्ध आहे, असें म्हटलें तरी चालेल. पण ही एकच कविता त्यावेळच्या त्यांच्या वाचनाची, सदभिरुचीची, संस्कृतांतील कल्पनांच्या सहवासाची व भाषाप्रभुत्वाची साक्ष पटविण्याला पुरेशी आहे. उपजाति वृत्तांतल्या या रम्य काव्यांतील कांहीं उतारेच घेऊं. सुरुवातीला गौतम-पत्नी अहल्या हिच्याबद्दल मनांत अभिलाष उत्पन्न झाल्यामुळें इंद्राला होणाऱ्या मदनबाधेचें वर्णन आहे.

जो कोकिलेचा रव सौख्यराशी । वाटे विलासी रसिका नराशीं ॥
अध्यापि माधुर्य सुगायकाला । तो नावडे कां सुरनायकाला ॥
जो मन्मथाचा रथ होय वारा । जो देहसंताप हरीत सारा ॥
जो हर्षवीतो गिरिकंदरातें । तेणें न कां हर्ष पुरंदरातें ॥
संकल्प कल्पद्रुम पूरवाया । जेथें उभे तत्पर सर्व ठायां ॥
आनंद त्या पाहुनि नंदनाला । कां होत नाहीं बलकंदनाला ॥
चन्द्रा मुखें, तामरसा पदानें । जिंकीत रंभा गज जी मदानें ॥
पाहूनि जी सुंदररूप तीला । कां सौख्य नोहे सुरभूपतीला ॥
अंकीं जयाच्या सुत तो जयंत । अर्धांगि कांता अतिरूपवंत ॥
ज्या संगरीं शत्रु कदा न वारी । तो खिन्न कां दीसत दानवारी ॥
कां इन्द्रचिन्तामशका हराया । नाहीं तुलाही बळ दंतिराया ॥
देवेन्द्रचित्ता सुखलेश नोहे । गेली कुठें त्वद्गुरुता गुरो हे ॥
ऐशापरी सेवक दास दासी । विचारिती प्रश्न परस्परांशीं ॥
कोणा परी कारण तें कळेना । नेत्राश्रुधारा प्रभुची खळेना ॥

इंद्राच्या या स्थितीचें त्याच्या सेवक दास–दासींना न कळलेलें कारण हें होतें—

पत्नी अहल्या मुनिगौतमाची । शोभा तयाच्या जणुं आश्रमाची ॥
सौंदर्य-धर्में प्रतिमा रतीची । भूलोकिं होती विमला मतीची ॥
तीची मनोज्ञाकृति पाहुनी ती । सुनीति आणी जनवादभीती—
त्यजूनि तीच्यावर सक्त झाला । सुरेश तेणें न सुचे तयाला ॥

तें होइना साध्य तयास रत्न । जरी करी इंद्र बहु प्रयत्न ॥
अनेक वेळांहि तिची विनंती । करी परी निष्फळ होइ अंतीं ॥
तेव्हां जरी तापद होय इन्दु । जरी गळाले नयनोदबिंदु ॥
गेल्या जरी जागरणेंच रात्री । जाई न चित्तांतुनि चारुगात्री ॥

या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें मनाची अवस्था झाल्यामुळें एके दिवशीं इंद्र भूतलावर येऊन गौतम ऋषीच्या आश्रमाप्रत गेला आणि—

बाहेर जेव्हां मुनिवर्य गेला । इन्द्रें तदा आंत प्रवेश केला ॥
वाटे तया काय सुखाब्धिमाजी । दैवें निमग्ना तनु केलि माजी
जी भासते मूर्तिमतीच नीती । गेहीं अहल्या मुनिगेहिनी ती ॥
होती तिला पाहुनि वासवाला । झाला प्रमोद स्मरपीडिताला ॥
प्रार्थूनि तीला अमरेश्वराची । वाणी तदा जीवितदान याची ॥
जो प्राशितो दिव्यवरामृतातें । मागे तिशीं तो अधरामृतातें ॥
तो चित्त तीचें वळवावयाला । तें शीळ तीचें मळवावयाला ॥
व्यर्थ प्रयत्नां करि इंद्रजार । वदे असें त्यास मुनींद्रदार ॥

अशा रीतीनें परस्त्रीशीं प्रेम-याचना करणाऱ्या इंद्राची अहल्येनें केलेली निर्भर्त्सना पहा—

"इंद्रा तुला लाज कशी न वाटे । अन्य स्त्रियेच्या मम जाशि वाटे ॥
पापी जनां दंडाचि तूं करावा । का हेतु निंदास्पद हा धरावा ॥
मीं आजपर्यंत सहस्र वेळां । धिक्कारिलें रे सुरलोकपाळा ॥
असेल तूंतें परि निस्त्रपाला । नाहीं त्रपास्पर्श कधींहि झाला ॥
दिव्यांगना त्या तव कोटि कोटी । झाली तुला कोठुनि बुद्धि खोटी ॥
कां मौक्तिका सांडुनि गारगोटी । घ्यायास इच्छा तव सांग पोटीं ॥
जे दोहदारंभमिषें वसंतीं । रंभापदालक्तकरक्त होती ॥
त्या नंदनांतील तरूंपरीस । हे श्याम धूमें प्रिय का हरीस ॥
इंद्रा मरंदार्थमिलन्मिलिंदें । मंदाकिनीचीं कनकारविंदें ॥
जीं त्यांहुनी कंटकयुक्त ऐशीं । पूजाप्रसूनें रमणीय कैशीं ॥
जीनें लया जाइ तृषा क्षुधाही । ती जो सुधा प्राशुनि नित्य राही ॥
त्याच्या कसें शुष्कदलप्रपातें । अस्वच्छ कुल्याम्बु मनास येतें ॥

आश्चर्य कीं, सर्वांहि नंदनांत । श्रेष्ठत्व ज्या, त्या हरिचंदनांत ॥
अद्यापिही जो करि वास वास । या भस्मि तो भासत वासवास ॥
आनंदकृन्नंदन इंद्र कोठें । कष्ट श्रमें आश्रम आणि कोठें ॥
कोठें सुखाचें गृह देवलोक । कोठें धरा जेथ रहात शोक ॥
जीच्या नखाचीहि मला सरी न । शोभेन दासीहि जिची सुदीन ॥
ती तूं शची त्यागुनि पापशीला । भोगावया इच्छिसि तापशीला ॥
होई जरी बुद्धि विलुब्ध कामें । होऊं न द्यावी पुरुषार्थकामें ॥
सर्वां मनींही कुविचार येती । ते साधु जे त्यांप्रति संयमीती ॥
देवेंद्र तुम्हांसम मोठमोठे । ऐसें करीती तरि सांग कोठें ॥
मोठेपणें होउनि दीन जावें । कीं टाकिलें त्या सुरलोकरावें ॥

एवढें बोलून न थांबतां इंद्राचें मन या पापी मार्गापासून परावृत्त करण्याकरितां अहल्येनें केलेला युक्तिवाद आणि त्यांतील भाषणचातुर्य पहाण्यासारखें आहे. इंद्राच्या अशा परस्त्रीलंपट वर्तनानें त्या बिचाऱ्या इंद्रपत्नीची काय अवस्था होईल याचें चित्र अहल्या त्याच्या दृष्टीपुढें उभें करीत आहे—

"एकांत कांता इतरा नराशीं । तूझी करीतां जरि तूं पहाशी ॥
जेवी तुला तेंविच मत्पतीला । येईल संताप हि शांतिशीला ॥
माझा पती अन्य विलासिनीला । प्रार्थी असें ऐकुनि मन्मतीला ॥
जसा तसा त्या शचिच्या मनांत । आतां महाखेद असेल होत ॥
जी चित्त अर्पी तव पादपद्मीं । ती त्वत्प्रिया वाट पहात सद्मीं ॥
क्षणोक्षणीं होत असून कष्टी । तूझी परस्त्रीवरि दुष्ट दृष्टी ॥
जिनें त्वदीयें विरहें झुरावें । त्वत्प्राणरक्षार्थ निजांस द्यावें ॥
चित्तीं तुला रात्रि दिनींहि ध्यावें । तीशीं तुवां काय असें करावें ॥
पर्यंक मानूनि त्वदीय अंका । जी झोंप घे त्यावर निष्कलंका ॥
निःशंक तत्कंठ चिरावयाला । कसा तरी त्वत्कर सिद्ध झाला ॥
ती बापडी गाय करील काय । सर्व प्रकारें हरला उपाय ॥
विश्वास तूझ्यावर सर्व तीचा । तो तूंच व्याघ्रापरि होशि नीचा ॥
मत्संगमेच्छा स्वमनीं धरून । ती तूं शची त्यागिलि, यावरून ॥
अद्यापि वाटे मजला नसावें । इंद्रा तुला मत्सरदुःख ठावें ॥

लागे कधीं अन्न न गोड कांहीं । खावेंच तें लागत अंगिं नाहीं ॥
जी पांडुता येइ न वत्सरानें । ती एक रात्रींतहि मत्सरानें ॥
संबंध माझा नसतांहि तीची । मला दया येइ तया सतीची ॥
प्रत्यक्ष तूं तत्पति त्या तुला रे । नये दया तूं पति हा कसा रे ॥
डोळ्यांतुनी इंद्र न काढि पाणी । माझेपुढें जोडुं नकोच पाणी ॥
कां तूं करीसी मुख दीनवाणें । वज्री कसा पीडित पुष्पबाणें" ॥

परंतु अहल्येच्या या चतुर भाषणाचा कामांध झालेल्या इंद्रावर कांहींच सुपरिणाम झाला नाहीं. उलट रागावून इंद्र अतिप्रसंग करूं लागला. त्या वेळचें त्या पतिव्रतेचें तेजस्वी भाषण पहा.

"देवेंद्र देवेंद्र करी विचार । मी सर्पिणी जाण नव्हेच नार ॥
तूं स्पर्श माझ्या करितां तनूला । जाळीन मी नेत्रविषेंच तूला ॥
माझे पतीला जरि हें कळेल ! तत्कोपयोगें रविही जळेल ॥
तेथें तुझा रे मग पाड काय । प्राणां करीशी स्वकरें अपाय ॥
मन्नाम आहे अबला म्हणून । जाऊं नको त्यावरि तूं सुजाण ॥
जी नाहिं लक्षावधिही गजांच्या । ती शक्ति अंगांत पतिव्रतांच्या ॥
मीं जिंकिले दैत्य बलासमान । हीची कथा काय असें न मान ॥
सत्कर्मि जें येइल वीर्य कामा । पीडावया तें नच अन्य रामा ॥
सूर्या करीं हें जग पेटवीन । आणूनि भूतें नभ भेटवीन ॥
और्वानलें सागर आटवीन । धैर्यें तया मेरुस हाटवीन ॥
फोडीन हा अंडकटाह पूर्ण । करीन ते पर्वत सर्व चूर्ण ॥
विद्युल्लतेला धरुनी स्वहस्तीं । जाळीन तो चंद्रम तो गभस्ती ॥
माझें न चाले इतकें करून । जरी तरी ही रसना धरून ॥
ओढूनियां त्वत्पदिं देवराय । अर्पीन मी प्राण परी न काय ॥"
ऐसें अहल्या विरमे वदोनी । राहे पदीं लावुनि नेत्र दोनी ॥
सर्वांग कोपें अति लाल झालें । न बोलतांही अधरोष्ठ हाले ॥

अहल्येच्या या उग्र स्वरूपानें ही आपल्याला वश होत नाहीं, अशी इंद्राची खात्री झाली. त्याच वेळीं कपटाची कल्पना मनांत येऊन त्यानें आपल्याला पश्चात्ताप झाल्याचें सोंग केलें व अहल्येची क्षमा मागून तो त्यावेळेपुरता निघून गेला. त्यामुळें फसून जाऊन अहल्येनेंही—

पाहूनि इंद्रा अनुताप झाला । ती तें कथी वृत्त न गौतमाला ॥
तो एकपत्नीक पतिव्रता ती । सौख्यें तयांचे दिन सर्व जाती ॥

परंतु त्यानंतर कांहीं दिवसांनींच कामातुर झालेल्या देवेंद्रानें मनांत योजलेल्या कपट-नाटकाचा प्रयोग करण्याचें ठरविलें. एके दिवशीं त्यानें हुबेहूब गौतमाचा मुनिवेष धारण करून व गौतमरूपी स्नानार्थ बाहेर पडला असतां त्याच्या आश्रमांत प्रवेश केला, त्या प्रसंगाची हकीकत खालीं वर्णिली आहे.

स्नानार्थ एके दिनिं अस्तमानीं । गंगेसि गेला मुनिवर्य मानी ॥
मागें अहल्या उटजांत आर्या । भार्या तयाची करि गेहकार्या ॥
तों “ हे अहल्ये उघडी ग दार ” । ऐके असे शब्द मुनींद्रदार ॥
हा शब्द आहे अपुल्या पतीचा । झाला असा निश्चय त्या सतीचा ॥
येऊनि दारा उघडूनि पाहे । तों तो उभा गौतम दारिं आहे ॥
वल्कें तनू दंड-कमंडलूंनीं । त्याचे तदा मंडित हस्त दोनी ॥
घालूनी बोले पतिकंठिं पाणी । राणी मुनीची अति मंजुवाणी ॥
“ स्नानार्थ तुम्ही सरितेस गेलां । अस्नात ते कां परतोनि आलां ॥
तेणें प्रियेला उटजांत नेलें । आणी असें उत्तर रम्य केलें ॥
“हे आननाऽभाजितचन्द्रकान्ते । कामामुळें ये परतोनि कान्ते ” ॥
जाणूनिया आशय तन्मनाचा । झाला तिला विस्मय फार साचा ॥
चित्तीं म्हणे, “आकृति मत्पतीची । परी असे ही कृति दुर्मतीची ” ॥

शांतिब्रह्म आणि वैराग्याचा सागर असा जो आपला पति गौतम त्याला ही मदनबाधा भलत्याच वेळीं कशी झाली, याचा अहल्येला साहाजिकच विस्मय वाटला. तिचा विस्मय आणि शंका दूर करण्याकरितां गौतमवेषधारी इंद्र अहल्येला उत्तर करतो—

तों तो वदे त्या कमलाननेला । “ माझा स्मरें धीर लयास नेला ॥
कामानलें पोळुनि जाइ काय । मी आणखी सुंदरि सांगु काय ।
जो सर्वदा शांत तया अशी कां । व्हावी मती ही नच आणि शं
येतांचि चन्द्रोदयरम्यवेला । विलंघितो काय न सिंधु वेला ॥
नाहीं तुम्हां वेळ अवेळ कैशी । वाणी मुखांतूनि न काढि ऐशी
जाणों स्मरोत्पत्तिस बंध नाहीं । सारीं निबद्ध स्मरबंधनांहीं ॥

नित्याभिषेकस्खलनेंहि मातें । न पाप लागे स्मर पीडि ज्यातें ।।
धर्मा–अधर्मांतिल ऐक वर्म । जो राक्षि आत्मा साखि तोचि धर्म ।।

चुंबूनि पूर्वामुख पश्चिमेला । चंडांशु पाही कमलाक्षि गेला ।।
घ्याया निशासंगमसौख्य रात्रीं । येईल शीतांशुहि चारुगात्री ।।

ज्योत्स्ना चकोरीस्तव चन्द्र वर्षे । मेघावली पाहुनि मोर हर्षे ।।
भानु स्वतेजें नलिनी विकासी । सर्वत्र ऐसे असती विलासी ।।

आम्ही परी मूर्ख मुनी न ज्यांला । प्रेमामृताचा कधिं गंध आला ।।
हें ब्रह्म तें ब्रह्म अशा प्रकारें । गेलेंचि आयुष्य सरूनि सारें ।।

लाजे शशी पाहुनि यन्मुखाला । टाकूनि तत्संगभवा सुखाला ।।
या ब्रह्मवादीं करितों विचार । न आमुचे मूर्खपणास पार ।।

ऐकूनियां जो रव कोकिलाही । घाली मुखीं अंगुलि तोहि नाहीं
मूढां परी वाटत रम्यरम्य । तें ब्रह्म जें कर्कशतर्कगम्य ।।

यत्स्पर्शमात्रें जणुं संगसाक्षी । रोमांच अंगीं उठती मृगाक्षी ।।
ती कामिनी टाकुनि मूढ हातीं । निःस्पर्श तें ब्रह्म धरूं पहाती ।।

यद्वक्त्रगंधासवमुग्ध मिलिंद । होतां अनास्वादितची मरंद ।।
वाहे फुलांतूनि त्यजूनियां ती । निर्गंध तें नीरस चाखिताती ।।

हें ब्रह्म ऐसें नलगे मला गे । तूं ब्रह्म माझें तव पायिं लागें ।।
पंचायुधाच्या कुसुमाशुगांहीं । माझे मना अन्य सुचे न कांहीं ।।

वासिष्ठ पाराशरतात यांही । हें ब्रह्म-वैयर्थ्य कळोचि पाही ।।
येतांचि इच्छा मनिं ते किं साची । घेती रुची या विषयामृताची ।।

विवेक माझे मनिचा समस्त । पावे सहस्रांशुसवेंच अस्त ।।
जसा जसा ये उदयास इंदु । तसा तसा वाढत कामसिंधु ।।

हा मंद वाहे मलयाद्रिवात । सदा वसे चंदनगंध ज्यांत ।।
सुधामयी जी अवियुक्त लोकीं ।। ती ही प्रिये कौमुदिका विलोकीं ।।

होतां वसंतागम रम्य आम्र । झाले पहा पक्व फळांहि ताम्र ।।
बैसूनियां त्यांवर कोकिला या । सोत्कंठ होती कलकंठ गाया ।।

मी कांत कांते तव पायिं लग्न । आशा अशा कालिं करी न भग्न ।।
मी देह अर्पी तव पाणिपात्रीं । तूं मारि वा तारि तया सुगात्री'' ।।

तरी सुद्धां यावर अहल्या आपल्याकडून समजाविते—

"जें आचरीलें तप उग्र रानीं । कां ओतितां त्यावर आज पाणी? ॥
कां इच्छितां लौकिक घालवाया । या कीर्तिदीपाप्रति मालवाया ॥
युष्मन्मती नष्ट जरी जहाली । नाहीं मदीया तरि याहि काळीं ॥
अकालसंभोग सुखप्रदान । द्याया न मी होइन मान्य मान" ॥

तिच्या पतीचा वेष घेऊन येऊनही आपलें कपट आणि कामना सिद्धीस जात नाहींत हें पाहून क्रोधाविष्ट झालेला इंद्र तिला डिवचण्याकरितां तिच्या पातिव्रत्याची निंदा करण्याची शेवटची युक्ति अवलंबितो—

"मीं वल्कलातें परिधान केलें । सर्वांगि तें भस्महि चर्चियेलें ॥
तेणें तुला अप्रिय वाटतों मी । तूं होशि हे जारिणि अन्यकामी ॥
करूनिया ढोंग अकालतेचें । तूं झांकिशीं प्रेम परावरीचें ॥
अगाधचित्तोदधि कामिनींचा । लागे न कोणासहि अंत त्याचा" ॥

इंद्राचा हा वाग्बाण मात्र त्या पतिव्रतेच्या वर्मी लागून त्याचा दुष्ट हेतु तो तडीस नेणार इतक्यांत अहल्येचा खरा पति गौतम परत आला, तो प्रसंग पुढील दोनच श्लोक डोळ्यापुढें उभा करतात.

लज्जाविनम्राननपद्म तीचें । स्वपाणिनालें उचलूनि साचें ॥
तो भृंग जाई मधु घ्यावयाला । तों काल-अम्भोद नभांत आला ॥
"कांते अहल्ये उघडी ग दार" । ऐके असे शब्द मुनींद्रदार ॥
आहेच हाही ध्वनि मत्पतीचा । झाला असा निश्चय त्या सतीचा ॥

त्यानंतर गौतममुनीला इंद्राचें सर्व कपट-नाटक कळलें व त्यानें इंद्राला व अहल्येलाही शाप दिला इत्यादि कथाभाग आहे. परंतु अहल्येनें उःशाप मागितल्यावरून गौतमानें तसें आश्वासन दिलें व तो फिरून ब्रह्म-चिंतनांत निमग्न झाला, हा वृत्तांत सांगणाऱ्या या काव्याच्या अखेरच्या पद्यपंक्ति किती शांतकरुणोदात्त आहेत—

परी करीतां विनति प्रियेनें । बोले तिला गौतम तो दयेनें
'श्रीरामपादांबुज लागतांची । तूं देहिनी होशी फिरूनि साची'
देवेंद्र गेला मग देवलोका । झाली अहल्याहि शिला विलोका
ब्रह्मस्वरूपाकलनें करोनी । हें वृत्त जाई मुनि विस्मरोनी

पुढें कॉलेज सुटल्यानंतर मात्र वर्तमानपत्राचा धबडगा पाठीमागें लागला म्हणून म्हणा किंवा त्यांच्या प्रतिभेच्या प्रवाहाला व त्यालाच येऊन मिळणाऱ्या वक्रोक्तीच्या ओघाला गद्यांतच अधिक स्वतंत्रता वाटूं लागली असावी म्हणून म्हणा, पण शिवरामपंतांची स्फूर्ति त्यानंतर छंदोबद्ध अशी झाली नाहीं. या वेळेपर्यंत केलेल्या कवितांनीं भरलेलीं एक दोन बाडें होतीं, तीं सन १९०८ सालीं 'काळ' ऑफिसच्या झडतींत पोलिसांबरोबर गेलीं तीं गेलींच, अशी माहिती लागते. कुणाला ठाऊक त्यांत काय काय होतें !

शिवरामपंत आपल्या वयाच्या चोविसाव्या वर्षी बी. ए. च्या वर्गांत असतांना म्हणजे सन १८८८ मध्यें त्यांच्यांवर अत्यंत दुःखद आणि त्यांच्या यापुढच्या आयुष्यांत व स्थितींत बराच बदल घडवून आणणारा असा प्रसंग ओढवला. महादेवरावांचें वय या सुमारास साठीच्या आसपास होतें. कोर्ट-कचेरींत जाणें वगैरे कामें यथास्थित चाललीं असलीं तरी ते आंतून थकले असावेत असें दिसतें. शेवटच्या चार महिन्यापासून ताप—खोकला येऊं लागला व याच दुखण्यांत त्यांचा अंत झाला. महादेवरावांनीं निष्कांचन स्थितींत सुरुवात करून मरतेसमयीं आपल्या उद्योगानें आणि कर्तबगारीनें महाडांत राहतें घर, शिवाय बाजारपेठेंत दोन घरें आणि बरीचशी शेतवाडी दागदागिना इतकी मिळकत आपल्यामागें ठेविली होती. शिवाय थोडी फार सावसावकारीही पेरलेली होती. अर्थात् दादांच्या मागें ही घरची व्यवस्था पहाण्याला तिघां मुलांपैकीं कोणीतरी राहणें अगदीं आवश्यक होतें. पण तिन्ही मुलें शिकत होतीं. त्यांत गणेशपंत चित्रकलेंतले होतकरू म्हणून आर्ट स्कूलमध्यें शिकत होते. शिवरामपंत तर बुद्धिमान् आणि महत्त्वाकांक्षी विद्यार्थी. त्यांतून त्यांच्या बी. ए. एम्. ए. च्या डिग्र्या हातातोंडाशीं आलेल्या म्हणून शेवटीं 'वाती'च्या विचारानें धाकट्या विष्णूनें शाळा सोडून घरीं राहावें असें ठरलें. विष्णुपंतांमध्यें वडिलांचे कित्येक चांगले गुण उतरले होते. ते शिकते तर चांगले पुढें येते. पण परिस्थिति अशी कांहीं विचित्र येते कीं, त्यापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं. असो. या प्रसंगींच शिवरामपंत महाडला गेले होते त्यावेळीं त्यांच्या

तरी सुद्धां यावर अहल्या आपल्याकडून समजाविते—

“जें आचरीलें तप उग्र रानीं । कां ओतितां त्यावर आज पाणी? ॥
कां इच्छितां लौकिक घालवाया । या कीर्तिदीपाप्रति मालवाया ॥
युष्मन्मती नष्ट जरी जहाली । नाहीं मदीया तरि याहि कालीं ॥
अकालसंभोग सुखप्रदान । द्याया न मी होइन मान्य मान” ॥

तिच्या पतीचा वेष घेऊन येऊनही आपलें कपट आणि कामना सिद्धीस जात नाहींत हें पाहून क्रोधाविष्ट झालेला इंद्र तिला डिवचण्याकरितां तिच्या पातिव्रत्याची निंदा करण्याची शेवटची युक्ति अवलंबितो—

“ मीं वल्कलातें परिधान केलें । सर्वांगिं तें भस्महि चर्चियेलें ॥
तेणें तुला अप्रिय वाटतों मी । तूं होशि हे जारिणि अन्यकामी ॥
करूनिया ढोंग अकालतेचें । तूं झांकिशीं प्रेम परावरीचें ॥
अगाधचित्तोदधि कामिनींचा । लागे न कोणासहि अंत त्याचा ” ॥

इंद्राचा हा वाग्बाण मात्र त्या पतिव्रतेच्या वर्मीं लागून त्याचा दुष्ट हेतु तो तडीस नेणार इतक्यांत अहल्येचा खरा पति गौतम परत आला, तो प्रसंग पुढील दोनच श्लोक डोळ्यापुढें उभा करतात.

लज्जाविनम्राननपद्म तीचें । स्वपाणिनालें उचलूनि साचें ॥
तो भृंग जाई मधु प्यावयाला । तों काल–अम्भोद नभांत आला ॥
“ कांते अहल्ये उघडी ग दार” । ऐके असे शब्द मुनींद्रदार ॥
आहेच हाही ध्वनि मत्पतीचा । झाला असा निश्चय त्या सतीचा ॥

त्यानंतर गौतममुनीला इंद्राचें सर्व कपट-नाटक कळलें व त्यानें इंद्राला व अहल्येलाही शाप दिला इत्यादि कथाभाग आहे. परंतु अहल्येनें उःशाप मागितल्यावरून गौतमानें तसें आश्वासन दिलें व तो फिरून ब्रह्म-चिंतनांत निमग्न झाला, हा वृत्तांत सांगणाऱ्या या काव्याच्या अखेरच्या पद्यपंक्ति किती शांतकरुणोदात्त आहेत—

परी करीतां विनति प्रियेनें । बोले तिला गौतम तो दयेनें
‘श्रीरामपादांबुज लागतांची । तूं देहिनी होशि फिरूनि साची ’
देवेंद्र गेला मग देवलोका । झाली अहल्याहि शिला विलोका
ब्रह्मस्वरूपाकलनें करोनी । हें वृत्त जाई मुनि विस्मरोनी

* * * *

पुढें कॉलेज सुटल्यानंतर मात्र वर्तमानपत्राचा धबडगा पाठीमागें लागला म्हणून म्हणा किंवा त्यांच्या प्रतिभेच्या प्रवाहाला व त्यालाच येऊन मिळणाऱ्या वक्रोक्तीच्या ओघाला गद्यांतच अधिक स्वतंत्रता वाटूं लागली असावी म्हणून म्हणा, पण शिवरामपंतांची स्फूर्ति त्यानंतर छंदोबद्ध अशी झाली नाहीं. या वेळेपर्यंत केलेल्या कवितांनीं भरलेलीं एक दोन बाडें होतीं, तीं सन १९०८ सालीं 'काळ' ऑफिसच्या झडतींत पोलिसांबरोबर गेलीं तीं गेलींच, अशी माहिती लागते. कुणाला ठाऊक त्यांत काय काय होतें !

शिवरामपंत आपल्या वयाच्या चोविसाव्या वर्षीं बी. ए. च्या वर्गांत असतांना म्हणजे सन १८८८ मध्यें त्यांच्यावर अत्यंत दुःखद आणि त्यांच्या यापुढच्या आयुष्यांत व स्थितींत बराच बदल घडवून आणणारा असा प्रसंग ओढवला. महादेवरावांचें वय या सुमारास साठीच्या आसपास होतें. कोर्ट-कचेरींत जाणें वगैरे कामें यथास्थित चाललीं असलीं तरी ते आंतून थकले असावेत असें दिसतें. शेवटच्या चार महिन्यापासून ताप—खोकला येऊं लागला व याच दुखण्यांत त्यांचा अंत झाला. महादेवरावांनीं निष्कांचन स्थितींत सुरुवात करून मरतेसमयीं आपल्या उद्योगानें आणि कर्तबगारीनें महाडांत राहतें घर, शिवाय बाजारपेठेंत दोन घरें आणि बरीचशी शेतवाडी दागदागिना इतकी मिळकत आपल्यामागें ठेविली होती. शिवाय थोडी फार सावसावकारीही पेरलेली होती. अर्थात् दादांच्या मागें ही घरची व्यवस्था पहाण्याला तिघां मुलांपैकीं कोणीतरी राहणें अगदीं आवश्यक होतें. पण तिन्ही मुलें शिकत होतीं. त्यांत गणेशपंत चित्रकलेंतले होतकरू म्हणून आर्ट स्कूलमध्यें शिकत होते. शिवरामपंत तर बुद्धिमान् आणि महत्त्वाकांक्षी विद्यार्थी. त्यांतून त्यांच्या बी. ए. एम्. ए. च्या डिग्र्या हातातोंडाशीं आलेल्या म्हणून शेवटीं 'वाती'च्या विचारानें धाकट्या विष्णूनें शाळा सोडून घरीं राहावें असें ठरलें. विष्णुपंतांमध्यें वडिलांचे कित्येक चांगले गुण उतरले होते. ते शिकते तर चांगले पुढें येते. पण परिस्थिति अशी कांहीं विचित्र येते कीं, त्यापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं. असो. या प्रसंगींच शिवरामपंत महाडला गेले होते त्यावेळीं त्यांच्या

वडिलांच्या स्नेह्यांनीं व हितचिंतकांनीं त्यांना सांगितलें, " बाळकोबा, तुम्ही आतां लवकर बी. ए. होऊन वकिलीची परीक्षा द्या व वडिलांची गादी पुढें चालवा. " अर्थात् हा उपदेश व्यावहारिक व जनरीतीला धरूनच होता. बापाचें गांवांत बसलेलें वकिलीचें बस्तान व वग यांचा मुलाला खात्रीनें पुष्कळ उपयोग होण्यासारखा होता. शिवाय शिवरामपंतांची अभ्यासांतली हुषारी आणि एकंदर तरतरी या सल्ला देणाऱ्यांच्या कानावर आलेलीच होती. या दृष्टीनें त्यांचा सल्ला मुळींच वावगा नव्हता. खुद्द शिवरामपंतांनाही वडिलांप्रमाणेंच वकिलीनें गांवांत मिळणारी प्रतिष्ठा व पैसा मिळविण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली असती तर त्यांत अ-स्वाभाविक कांहीं नव्हतें. परंतु वरील बोलण्यावर त्यांनीं दिलेलें उत्तर अनेक दृष्टींनीं विचार करण्यासारखें व त्या वेळच्या त्यांच्या मनोवृत्तीचें गमक असें आहे. शिवरामपंतांनीं स्वच्छ सांगितलें कीं, **मला कळवंतिणीचा धंदा करावयाचा नाहीं !** म्हणजे Prostitution of intelligence अथवा बुद्धिविक्रय करावयाचा नाहीं हा त्याचा ठाम निश्चय त्या वेळींच ठरलेला होता. पुण्याच्या वातावरणांत स्वतःच्या वाचनानें व निरीक्षणानें त्यांची राजकीय व सामाजिक बाबतींत जीं मतें किंवा दृष्टिकोण तयार झाला होता, तो या वर दिलेल्या लहानशा ठांशीव उत्तरांत फारच परिणामकारक रीतीनें बाहेर पडला. वकिलीच्या धंद्याचा मूळ उद्देश व पावित्र्य कितीही स्तुत्य असो; परंतु अलीकडच्या राज्यपद्धतींत व समाजव्यवस्थेंत त्यामध्यें जो भाडोत्रीपणा व धंदेवाईकपणा आला आहे व त्यांत आपलें बुद्धिचापल्य, वक्तृत्वादि इतर गुण व सदसद्विवेकबुद्धिही, आपलीं मतें गुंडाळून ठेवून किंवा त्यांविरुद्धही वागून दुसऱ्याकरतां आणि कित्येकदां खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें करण्याकरितां खर्चावीं लागतात, ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. हा शुद्ध बुद्धि-विक्रय होय, जो केवळ पैसे मोजील त्याला आपली अक्कल भाड्यानें देणें होय. वकिलीच्या धंद्यांत कन्स्ट्रक्टिव किंवा समाजोपयोगी असें फारच थोडें आहे व म्हणूनच ह्या व्यवसायाला दुसऱ्यांचें रक्तशोषण करणारा अर्थात् परोपजीवी (Parasytic) असें म्हटलें जातें. अशा तऱ्हेची वकिली न करतां देशाची वकिली करावयाची असा निर्धार, शिवरामपंतांनीं याचवेळींच

मनाशीं केलेला होता, ही गोष्ट जितकी त्यांच्या उच्च विचारांची निदर्शक आहे तितकीच ती त्यांचें सामाजिक बाबतींतील खोल निरीक्षण दाखविणारी आहे, यांत संदेह नाहीं.

याच ठिकाणीं आणखी एक उल्लेखनीय गोष्ट आहे, ती अशी. वडिलांच्या पश्चात् मिळकतीवर वडील मुलगा म्हणून पंतांचा हक्क होताच; एवढेंच नव्हे तर त्याप्रमाणें सर्व मिळकत शिवरामपंतांच्याच नांवावर झाली. पण विष्णुपंत, वडील बंधुच मालक व आपण केवळ वहिवाटदार किंवा मुक्त्यार या बुद्धीनेंच मिळकतीची सर्व व्यवस्था पहात. तथापि वडील वारल्यानंतर आतां धाकट्या भावावर आपला भार पडूं देणें हें योग्य नव्हे असेंच शिवरामपंतांनीं मानलें. आणि येथून पुढें अर्धवट राहिलेलें शिक्षण पुरें करण्यासाठींच काय, पण उभ्या हयातींतही त्यांनीं महाडाहून एक पै अगर तांदुळाचा दाणा कधीं घेतला नाहीं. कधीं घर–व्यवस्थेंत ढवळाढवळ तर नव्हेच पण लक्षही घातलें नाहीं. उलट विष्णुपंत कांहीं महत्त्वाचें करावयाचें झाल्यास शिवरामपंतांना पुण्यास पत्रानें सल्ला व संमति विचारीत. एवंच, धाकट्या भावानें थोरल्याला मोठेपणा द्यावा आणि उलटपक्षीं त्यांनींही ' तुम्ही करीत आहां तेंच योग्य असणार, ' असें लिहून मनाचा मोठेपणा दाखवावा असा प्रकार चालत असे. पुढें शिवरामपंतांचे धाकटे बंधु गणेशपंत १९०६ सालीं संसाराच्या ऐन भरांत प्लेगनें अचानक वारले, तेव्हां मरतेसमयीं त्यांना दिलेल्या वचनानुसार त्यांनीं त्यांच्या तीनही मुलींचीं लग्नें चांगल्या स्थळीं हुंडा देऊन आणि स्वतः मिळविलेला पैसा लावून केलीं. सन १९२७ मध्यें विष्णुपंत आणि कै. गणेशपंतांचा मुलगा यांच्यामध्यें वाटण्या करण्याची वेळ आली तेव्हां शिवरामपंत महाडास गेले होते. त्यांनीं इस्टेटीच्या **दोनच वांटण्या** करून दिल्या व स्वतःला कांहींच घेतलें नाहीं. त्या बैठकींत महाडांतल्या जुन्या व पोक्त मंडळींनीं वडिलांचा प्रसाद म्हणून कांहींतरी वांटणी घ्यावीच असें सांगितल्यावरून त्यांनीं मूळचें लहान खोपट ( त्यांचें जन्मस्थान ) व १७ मणांचें शेत एवढेंच आपणाकडे ठेविलें. पण तेंही कागदोपत्रींच राहिलें. कारण ते असेपर्यंत त्यांनीं त्याचें उत्पन्न कधींच घेतलें नाहीं, अगर त्याची साधी चौकशीही केली नाहीं !

आपल्या पित्यानें मिळवून ठेवलेलें आयतें तें आपलें नव्हे, आपण स्वतः मिळवूं तें आपलें खरें अशीच त्यांची भावना होती व हें पुढील हकीकतीवरून अधिकच स्पष्ट होणार आहे. सांठवलेली संपत्ति म्हणजे देशबांधवांपासून हरण करून दूर ठेवलेली देशाची संपत्ति किंबहुना ती एक प्रकारची चोरीच होय. अशा प्रकारचें सोशालिस्ट तत्त्वज्ञान जें पुढें पुढें 'काळ' पत्रांत मांडलें जात असे तें त्यांच्यापुरतें त्यांनीं खासच आचरणांत आणलें होतें. महादेवरावांच्या मृत्यूनंतर शिवरामपंत पुण्याला परतल्यानंतर त्यांनीं रेसिडेन्सींत राहण्याचें सोडून दिलें व गांवांत पुन्हां बिऱ्हाड मांडलें. जागा हल्लींच्या श्रीकृष्ण सिनेमासमोरच्या ढमढेरेबोळांत पाच्छापूरकरांच्या वाड्यात दरमहा तीन रुपये भाड्याची होती. स्वतःचें शिक्षण व बिऱ्हाड आतां त्यांचें त्यांनाच चालवावयाचें असल्या-मुळें त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाची जागा पत्करली. ते इंग्रजी पांचवी सहावीला इंग्रजी व संस्कृत विषय शिकवीत. त्यांच्या वर्गांत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांत त्या वेळीं भालाकार भोपटकर, लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, गोपाळ कृष्ण देवधर वगैरे मंडळी होती. या सुमारास त्यांच्या पुण्यातल्या बिऱ्हाडातली काटकसर व एक पैसाही वायफट जाऊं नये याबद्दलची दक्षता कमाल मर्यादेपर्यंत जाऊन पोंचलेली होती. दिव्याचें तेल अधिक लागूं नये म्हणून रात्रीं अभ्यास न करतां ते पहांटे उठून वाचीत बसत असत. सकाळीं लाकूड चुलींत घातल्यावर सैंपाक होतांच काढून विझवून ठेवावें आणि संध्याकाळच्या सैंपाकाला तेंच अवशिष्ट राहिलेलें लाकूड उपयोगांत आणावें म्हणजे रोज एका लांकडा-पेक्षां जळण लागतां कामा नये, अशी त्यांची घरात सक्त ताकीद असे. या शितावरून भाताची परीक्षा सहज होण्यासारखी आहे. स्वतः पंतांना दोन वेळचें जेवण व कपड्याचा टाकटीकपणा यापलीकडे कांहींच खर्च नसे. त्या काळांतही जरुर तेवढाच खर्च करून स्कॉलर-शिपच्या व पगाराच्या रकमेंतून कांहीं पैसे ते शिल्लक टाकीत असत ! असो. अध्ययनाबरोबर अध्यापनही करणें भाग पडल्यामुळें त्यांना बी. ए. होण्याला १८९० साल गांठावें लागलें. त्यांत त्यांचा नंबर बराच वर आल्यामुळें त्यांना डेक्कन कॉलेजांतील दक्षिणा फेलोशिप

मिळाली. १८९११९२ हीं दोन वर्षें ते फेलो होते. व त्या अवधींत डेक्कन कॉलेजच्या रेसिडेन्सींतच ते राहूं लागले. प्रीव्हियसच्या वर्गाला संस्कृत काव्य शिकविण्याचें काम त्यांच्याकडे होतें व त्या वेळींच तो विषय ते अत्यंत रसिकतेनें व चित्ताकर्षक रीतीनें समजावून सांगत असत असें त्यांच्या वर्गांतील विद्यार्थी सांगतात. याच अवधींत 'भामिनीविलास' या जगन्नाथपंडिताच्या काव्याचें इंग्रजी भाषांतर व इंग्रजी नोट्स् त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या होत्या. परंतु त्यांच्या आयुष्यांतल्या या दोन वर्षांच्या अवधीचें महत्त्व आहे तें वेगळेंच आहे. पुढें सबंध जन्मभर त्यांनीं जो क्रांतिवाद पुरस्कारिला व क्रांतीचें एक तत्त्वज्ञान किंवा शास्त्र म्हणून पुढें मांडलें, त्याची बैठक या काळांत तयार झालेली आहे. या दृष्टीनें त्यांच्या या दोन वर्षांना पूर्वतयारीचा काळ (Formative years) असें म्हणावें लागेल. एकीकडे फेलो म्हणून पगार मिळून एम्. ए. च्या टर्म्स् भरण्याचें सुरूच होतें. रेसिडेन्सींतच राहण्यामुळें जाण्यायेण्यांतला त्रास व वेळाचा अपव्यय नाहीं. शिवाय कॉलेजची मोठी लायब्ररी हाताशीं. शिवरामपंतांनीं या सवलतींचा भरपूर मनसोक्त उपयोग करून घेतला.

या काळांत त्यांनीं आपलें लक्ष उच्च दर्जाच्या वाङ्मयाकडे लाविलें होतें. अर्वाचीन ग्रंथकारांपेक्षां प्राचीन ग्रंथकारांच्या ग्रंथांचें परिशीलन करण्याची त्यांना विशेष हौस असे. बहुतेक पूर्वकालीन कवि, इतिहासकार, तत्त्ववेत्ते व साहित्यिक यांचे ग्रंथ त्यांनीं वाचून टाकले. युरोपांतील व इतर देशांतील वाङ्मय त्यांना विशेष आवडत असे. जर्मनी, फ्रान्स, इटली, अमेरिका वगैरे देशांतील मोठमोठ्या लेखकांनीं लिहिलेल्या निरनिराळ्या भाषेंतील पुस्तकांचीं इंग्रजी भाषांतरें मुद्दाम आणवून तीं ते मोठ्या आवडीनें वाचीत असत. प्लेटो, सॉक्रेटिस, गिबन, बायरन, बर्क, होमर, कार्लाइल, शिलर, लेसिंग, रेसीन, गीझो, गटे, रँक, शेक्सपिअर वगैरे ग्रंथकार त्यांच्या फार आवडीचे होते. शिवाय त्यांच्या वाचनांत रूसो, व्हॉलटेअर, टॉलस्टॉय इत्यादि पुरोगामी लेखकांचीं (Radical thinkers) पुस्तकें आल्यामुळें त्यांच्यावर सोशॅलिस्ट मतांची बरीच छाप पडूं लागली होती. 'राज्यापहार आणि न्याय,' 'इन्कमटॅक्स आणि सोशॅलिझम्,'

'आमच्या इंग्रजांच्या इंपीरिॲलिझम्‌चा शेवट काय होणार?' इत्यादि 'काळा'त लिहिलेल्या लेखांतील विचारसरणीचा उगम या वेळीं केलेल्या वाचनांत सांपडतो. या ग्रंथमंथनांतून एक 'चवदावें रत्न' ही निघालें! तें म्हणजे त्यांनीं नंतर प्रसृत केलेले क्रांतीचें तत्त्वज्ञान. आपला हिंदुस्थान देश गुलामगिरींत सांपडलेला आहे, ही गोष्ट त्यांच्या मनाला खटकत होती. या गुलामगिरीवर रामबाण शोधून काढण्याकरितां इतर पारतंत्र्यांत सांपडलेल्या देशांनीं काय इलाज केले व त्यांनीं आपलें स्वातंत्र्य कसें संपादन केलें, याचा इतिहास त्यांनीं अभ्यासण्यास सुरुवात केली. व जगाच्या पाठीवर परतंत्र राष्ट्रांत जिथें जिथें म्हणून स्वातंत्र्याची क्रांति झाली त्या सगळ्या क्रान्तींचे संपूर्ण इतिहास त्यांनीं पालथे घातले. आजपर्यंतच्या राज्यक्रान्त्या ह्या गुप्तसंस्थांनीं असोत किंवा उघड बंडांनीं असोत, पण सशस्त्र उठवणीमुळें झालेल्या आहेत हें त्यांच्या लक्षांत आलें. अर्जविनंतींनीं कांहीं एक मिळत नसतें, खणाखणी करून, लढून-झगडून गेलेलें स्वराज्य मिळवावें लागतें, हाच बोध कोणींही इतिहास वाचला तरी त्याला मिळणार! पुढें शिवरामपंत 'काळां'तून काय किंवा व्याख्यानांतून काय गतेतिहासांतले हेच दाखले लोकांपुढें ठेवीत असत. व त्याच उपायाचा अवलंब करण्याला लोकांनीं प्रवृत्त व्हावें, असें त्यांचें संसूचन असे.

या फेलोशिपच्या दोन वर्षांनंतर पंत पुन: गांवांत राहूं लागले. १८९५ सालीं त्यांच्या एम्. ए. च्या परीक्षेचा निकाल लागला. या सुमारास त्यांचे स्नेही विसूभाऊ राजवाडे हे किर्लोस्कर थिएटरशेजारीं तिसऱ्या मजल्यावर साळवेकरांनीं सरदारगृह (मुंबईस नेण्यापूर्वीं) काढलें होतें, त्यांतच जेवीत व रहात असत. त्यांच्याकडे पंतांचें बरेंच जाणें येणें असें. शंकर गणेश लवाटे हेही तेथें येत असत. निकालाचे दिवशीं तिथूनच या दोघांनीं लवाट्यांस निकाल पहाण्याकरितां पाठविलें व पंतांचा पहिला नंबर येऊन त्यांना **गोकुळदास** व झाला **वेदान्त** अशीं नऊशें रुपयांचीं प्राइझेस मिळाल्याची आनंदाची बातमी त्यांनींच आणली. याखेरीज कांहीं पुस्तकेंही त्यांना बक्षीस मिळालीं. शिवरामपंतांनीं पुस्तकें स्वत:साठीं ठेवून नऊशें रुपये तावडतोब महाडास आपल्या मातुःश्रीकडे पाठवून दिले. नंतर कांहीं दिवसांनीं पंत महाडास गेले त्या वेळीं 'बाती' त्यांना म्हणाली—

'थोडा आणखी अभ्यास करतास तर हजार रुपये पुरे नसते मिळाले ! थोडी कसूर केलीस.' आईनें जेव्हां शिवरामपंतांचा असा भोळ्या भावानें पण प्रेमानें आधिक्षेप केला तेव्हां मात्र शिवरामपंतांना हसूं खास आवरलें नसेल ! असो. ते कॉलेजमध्यें फेलो असतांना घडलेले दोनतीन प्रसंग त्यांच्या यावेळच्या स्वभावावर व मनोवृत्तीवर झगझगीत प्रकाश पाडणारे आहेत. ते सांगून हें प्रकरण संपवूं.

१८९२ सालीं शिवरामपंत रेसिडेन्सींत रहात असतांना त्यांचे माजी शिक्षक प्रि. वामनराव आपटे हे आजारी पडून त्यांची स्थिति अत्यवस्थ झाली होती. त्या दिवशीं शिवरामपंत कॉलेजच्या भव्य कमानींत उभे राहून चिंतातुर स्थितींत गांवांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची वाट पहात उभे होते. आलेल्या विद्यार्थ्यांनीं त्यांना सांगितलें कीं, "ते सकाळींच परलोकवासी झाले. प्रेतयात्रा एक वाजतां निघणार आहे." हे शब्द ऐकतांच पंतांना रडण्याचा उमाळा येऊन त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. व ते त्यांनीं आपल्या अंगरख्याच्या टोंकास पुसले व म्हणाले, "आमचे गुरु गेले, मोठा वाईट प्रसंग आला." नंतर त्यांनीं स्मशान-यात्रेस सर्व विद्यार्थ्यांकरितां परवानगी मिळविली व शक्य तितके विद्यार्थी बरोबर घेऊन शिवरामपंत परस्पर ओंकारेश्वरावर गेले. वाटेनें गुरूंबद्दल त्यांनीं आपलें उत्कट प्रेम वरचेवर दाखविलें. मधून मधून त्यांस दुःखाचे उसासे येतच असत. शेवटीं प्रेतदहनानंतर ते कॉलेजांत परत गेले तरी हुंदके फारसे बंद झाले नव्हते ! शिवरामपंतांच्या हृदयाचा कोमलपणा किंबहुना हळवेपणा, गुरुजनांबद्दलचा आदर व भावनोत्कटता या प्रसंगा-वरून चांगली दिसून येण्यासारखी आहे. त्यांचें अंतःकरण अत्यंत संवेदनक्षम असून दुसऱ्याचें दुःख पाहून तें कळवळून जात असे. संकट किंवा प्रसंग ओढवलेल्या माणसाला शक्य तेवढी मदत करावयाची हें त्यांच्या वृत्तींतच होतें. पुढें पंत एकदां महाडला गेले असतां तिथल्या काकर-तळ्यावरील मुसलमान मोहल्याला आग लागली, ही बातमी समजतांच पंत आपल्या घरांतील गडीमाणसें घेऊन आग विझविण्यासाठीं गेले. या भानगडींत त्यांचें स्वतःचें अंगही होरपळून निघालें होतें ! या आगीमुळें

निराश्रित झालेल्या लोकांना त्यांनीं त्या दिवशीं आपल्या घरीं जेवण घातलें. व अंगणांत पानें मांडून जातीनें हिंडून सर्वांचा परामर्ष घेतला.

ही झाली मऊ बाजू. पण दुसरी तितकीच टणक बनली होती. फेलो असतांना शिवरामपंत एके दिवशीं संध्याकाळीं कॉलेजच्या आवारांत फिरत होते. त्या वेळीं इंटरचे वर्गात शिकत असलेले आहिताग्नि शंकर रामचंद्र राजवाडे, हे सायकलीवर बसायला शिकत होते. राजवाडे-परांजप्यांची गांठ पडून ते बोलत होते तेवढ्यांत कर्मधर्मसंयोगानें प्रि. सेल्बी साहेबांची स्वारी तेथें आली. सेल्बीसाहेब सुमारें अर्धापाऊण तासपर्यंत राजवाडे यांच्याशीं बोलून निघून गेले. पण शिवरामपंत जे दुसरीकडे पहात उभे राहिले होते ते प्रिन्सिपल साहेबांशीं एक चकारशब्दही बोलले नाहींत. युरोपियन साहेबलोकांशीं लांगूलचालन करण्याच्या वृत्तीचा तिटकारा व चीड एव्हांपासून त्यांच्या रोमरोमांत कशी भिनून गेली होती, याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. चांगला व शिक्षणखात्यांतला असला तरी साहेब म्हटला म्हणजे तो आपल्यावर सत्ता गाजवणाऱ्यांपैकींच एक असें ते मानूं लागले होते हें स्पष्ट दिसतें.

अशा तऱ्हेची मनोभूमिका तयार झालेले शिवरामपंत १८९५ सालीं डेक्कन कॉलेजांतून एम्. ए. ची डिग्री घेऊन बाहेर पडले.

---

## ४

# प्रोफेसर परांजपे

" ते एखाद्या लहानशा चार भिंतींच्या शाळेमध्यें किंवा कॉलेजांत शिकविण्याला जन्माला आलेले नव्हते."

—शि. म. परांजपे

(लो॰ टिळकांवरचा मृत्युलेख—स्वराज्य)

अशा रीतीनें शिवरामपन्तांना, पुण्यास पांचव्या इयत्तेंत प्रविष्ट होऊन अखेर विश्वविद्यालयांतून दु—पदवीधर होऊन बाहेर पडण्याला तेरा वर्षें लागलीं. पण परीक्षा पास होण्यापुरता अभ्यास करून डिग्र्या घेणारे असले कोवळे व अननुभविक तरुण ते राहिले नव्हते. या तेरा वर्षांच्या पुण्याच्या वास्तव्यांत त्यांची वृत्ति बरीचशी अन्तर्मुखच होती. तरी देखील कॉलेजच्या बाहेरच्या वातावरणांतल्या चळवळी-उलाढालींचा संपर्क होणें किंवा अजिबात संबंधही न येणें अशक्य होतें. या अवधींत पुण्यांत ( १ ) संमतिवयाचा कायदा, ( २ ) ग्रामण्य प्रकरण,(३) रमाबाईचें शारदासदन, ( ४ ) हिन्दुमुसलमानांचा तंटा, ( ५ )पुण्यांतिल अकरावी राष्ट्रीय सभा व मंडप प्रकरण इत्यादि मुख्य वाद निघाले.या वादांतून डॉ.भांडारकर,माधवराव रानडे,आगरकर,सरदार बाळासाहेब नातू,गोपाळराव गोखले व बळवन्तराव टिळक, प्रो. जिन्सीवाले, माधवराव नामजोशी वगैरे मंडळी प्रामुख्यानें होती.रानडे-भांडारकर हीं त्या काळांतलीं विद्वन्मान्य प्रस्थें होतीं.त्यांच्याशीं पुष्कळदां टिळकांची झुंपल्यामुळें या वादांना कांहीं और रंग चढला होता.

टिळक-आगरकर या समकालीन लेह्यांमध्यें तात्त्विक पण अटीतटीला आलेला सामना मोठा चुरशीचा होऊन वसला होता. आणि या भांडणांना हवा तेवढा खमंगपणा येत नाहीं असें वाटूनच कीं काय, श्रीधर विठ्ठल दाते व गोपाळराव जोशी यांच्यासारखे विक्षिप्त व खटाटोपी आणि कल्पक डोक्याचे किंवा कलतिवाज लोक मधून मधून आपल्या कल्पकपणाची फोडणी देत असत. या वादांच्या हकीकतीचा विस्तार येथें करण्याची आवश्यकता नाहीं. परन्तु या वादांतून एक गोष्ट मात्र निश्चितपणें होती. आणि ती ही कीं, टिळक हे बहुजनसमाजाच्या मनाची झपाट्यानें पकड घेत चालले होते. या काळांत वादाचे जे समरप्रसंग झाले त्यांत त्यांची निर्भयता, विद्वत्ता व बुद्धिमत्ता, आणि देशसेवेची खरी कळकळ लोकांना स्पष्टपणें दिसून आली. वादांत टिळक आपल्या प्रतिपक्ष्यांना पुरून उरत होते. यामुळें रानडे-प्रभृतींचें लोककारणांत जें एक वळण व वर्चष्मा होता तो कमी होऊन त्यापेक्षां निराळा व स्वतन्त्र बाण्याचा असा 'टिळक-पक्ष' बनत चालला होता. अर्थात् या सुमारास हा पक्ष म्हणजे एकखांबी तंबूच होता. टिळकांना आपल्या पक्षांत लोकांत प्रसिद्ध अशा माणसांची वाण भासत होती. त्यांचे सहकारी आणि प्रभावळ यापुढेंच निर्माण व्हावयाची होती. शिवरामपन्त या सर्व वादांतून टिळकांच्या बाजूला प्रत्यक्षपणें नसले तरी मनानें होते. एक तर तरुण वय आणि देशहिताची तळमळ व पारतन्त्र्याची चीड उत्पन्न झालेली असल्यामुळें तेजस्वी जहाल राजकारणाकडे होणारी प्रवृत्ति आणि लहानपणापासून सनातनी वळणांत वाढल्यामुळें किंवा थोडी नैसर्गिक अशी रूढि-प्रियता, या दोन गोष्टींमुळें वरच्यासारख्या राजकीय व सामाजिक वादांत शिवरामपन्तांच्या मनाचा व सहानुभूतीचा कल, टिळकांच्या मताकडे झुकला असला, तर त्यांत आश्चर्य नाहीं. शिवाय कॉलेज सुटण्यापूर्वीच कांहीं दिवस टिळकांकडे त्यांचें जाणें येणें सुरू झालें होतें. विंचुरकरांच्या वाड्यांत टिळकांच्या स्वतःच्या गणपतीपुढें १८९५ सालीं मेळ्यांच्या पानसुपारीच्या समारंभाला शिवरामपन्त हजर राहिले होते.

१८९५ सालांत पन्त परीक्षांच्या चक्रांतून मोकळे झाले ही गोष्ट खरी. तथापि त्यांना सरकारी नोकरींत 'गुंतावयाचें' नव्हतें. विष्णु-



टिळक-परांजपे ( लोणावळें १८९५ )

★



डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थी
( फेलो १८९० )

★



महाराष्ट्र कॉलेजांतील प्रोफेसर
( १८९६ )

शास्त्र्यांचें प्रेरक उदाहरण त्यांच्या डोळ्यापुढें होतेंच. पण आतां त्यांच्या पुढच्चीही पायरी होती. म्हणून शिवरामपन्तांना सरकारी नोकरीची बेडी पायांत अडकवून घ्यावयाची नव्हती. पूर्वीच्या काळांत जसे तरवार-बहाद्दर सरदार असत, त्याप्रमाणें या काळांत पदवीधर आणि त्यांतल्या-त्यांत वर नंबर आलेले हे तर 'विद्येचे सरदार' असे गणले जात असत. त्या काळांत उच्च पदवीधरांनीं आणि त्यांतून परीक्षेंत उच्चांक गांठलेल्यांनीं मोठमोठ्या मानाच्या सरकारी नोकऱ्या मिळविणें ही गोष्ट हातापर्यन्त लवलेल्या झाडाच्या फांद्यांचीं फळें हातानें तोडून घेण्या-इतकीच सोपी होती. आणि खरोखरीच तेव्हांची सरकारी नोकरी म्हणजे फुलांची शेज होती. पण शिवरामपन्तांसारख्या क्रान्तिकारक मतांचा मुकुट धारण करणाऱ्याला 'सुखं च मे शयनं च मे' असा 'राज-विलासी' कार्यक्रम परवडण्यासारखा नव्हता. शिवाय या सुखासनावर चांगली झोंप येऊं लागल्यावर त्यांनीं लोकसेवेचीं, लोकजागृतीचीं जीं कांहीं मनोराज्यें रचलीं असतील तीं केवळ स्वप्नेंच ठरणार! म्हणून सरकारी नोकरीचा विचारही त्यांच्या मनाला स्पर्श करणें शक्य नव्हतें. पण योगायोग असा जमून आला कीं, याच सुमाराला विष्णुपंत गोखले व भावे स्कूलचे हेड-मास्तर जालनापूरकर यांनीं गांवामध्येंच 'महाराष्ट्र कॉलेज'ची स्थापना केली. सदर कॉलेजांत शिवरामपन्तांची नेमणूक झाली व १८९६।९७ हीं दोन वर्षेंपर्यंत ते प्रोफेसर म्हणून होते. नटेश अप्पाजी द्रवीड, साठे, गोखले व परांजपे या चार एम्. ए. ची चौकडी महाराष्ट्र कॉलेजमध्यें चार निरनिराळे विषय शिकवीत असे. संस्कृत शिकविण्याचें काम प्रो॰ परांजपे यांचेकडे आलें होतें. हें कॉलेज त्यावेळीं गांवांतच फड-तऱ्यांच्या वाड्यांत (पूर्वी कन्याशाळा होती तेंथें) दुसऱ्या मजल्यावरील दिवाणखान्यांत भरत असे. पंत कॉलेजमध्यें शिकत असेपर्यंत त्यांचा अंगरखा व टोपी असा पोशाख होता. पण पुढें फेलो झाल्यावर, डोकीला केशरी रंगाचा जरीच्या बारीक चौकटीचा रुमाल ते बांधूं लागले होते. आतां प्रोफेसर झाल्यावर रुमालाची जागा, जी पागोट्यानें घेतली ती सन १९२०।२१ मध्यें गांधी चळवळ सुरू होईपर्यंत सोडली नाहीं.

कडकडीत अंगरखा, रेशीमकांठी उपरणें, विनझिरमिळ्यांचें पागोटें किंवा पगडी, उभें केशरी गंध आणि कानांत भिकबाळी—या त्यांच्या लोकांना परिचित झालेल्या ठरीव व रेखीव पोषाखाला यावेळे-पासूनच सुरुवात झाली. या वेषांतच त्यांचीं खरीं बहारीचीं भाषणें ऐकलेलीं म्हणून, किंवा तोच पाहून पाहून स्मरणांत बसला म्हणून म्हणा, पण अजूनही **शिवरामपंत परांजपे** म्हटले म्हणजे त्या वेषांतली मूर्तिच लोकांच्या डोळ्यासमोर उभी रहाते ! नितळ अंगकान्ति, उंच व भव्य बांधा, तरतरीत मुद्रा व डोळ्यांत प्रतिबिंबित झालेलें विद्वत्तेचें तेज आणि या सर्वाला अनुरूप अशी सभ्य पण कलापूर्ण वेषभूषा यांमुळें, या नूतन कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या मनावर, या सगळ्यांचा मिळून एक कुतूहल-कारक ठसा उमटत असे. वागणूकही तशीच भारदस्त, त्यामुळें विद्या-र्थ्यांत आदर उत्पन्न होई. आणि त्यांचें वर्गांतलें शिकवणें.हें तर हुशार व रसिक मुलांना मेजवानीसारखें वाटे. वर्गांत शिकवितांना प्रो. परांजपे इतके समरस होऊन जात कीं, भरांत आलेला तास संपविण्याचें कॉलेजच्या घंटेंतील सामर्थ्य त्यांचे बाबतींत निष्फळ ठरत असे. त्या वर्षांत उत्तररामचरित हें भवभूतीचें करुणरसप्रधान नाटक परीक्षेला लावलेलें होतें. तें शिकवितांना त्यांची चित्तवृत्ति इतकी तदाकार होऊन जात असे कीं, त्यांचा कंठ सद्गदित होऊन तो आवेग ओसरून जाण्याकरितां त्यांना मधेंच थांबावें लागत असे ! अत्यन्त कोमल, उदात्त आणि रसिक अंतःकरणाची गांठ जिवंत काव्याशीं पडली म्हणजे बहुधा असाच प्रकार होत असावा. दुर्दैवानें आपल्या हयातींत आपल्या कृतींची अवज्ञा आणि अवहेलना करणाऱ्या लोकांच्यामध्यें जरी भवभूति सांपडलेला होता तरी,

उत्पत्स्यते हि मम कोऽपि समानधर्मा
कालोऽह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी

असा जो आशावाद त्यानें उभारला होता, तो शिवरामपंतांसारखे 'समानधर्मे·' पाहिल्यानंतर किती अचुक आणि अबाधित ठरला आहे, हें कोणाच्याही सहज लक्षांत येणार आहे. असो. याप्रमाणें प्रो० परांजपे हे, विद्यार्थ्यांमध्यें प्रिय होऊन राहिलेले होते व त्यांचा जम 'महाराष्ट्र

कॉलेज'मध्यें चांगला बसला होता.पण दोन वर्षांच्या आंतच कॉलेज सोडून देऊन त्यांना बाहेर पडावें लागलें ! अर्थात् एका दृष्टीनें याला त्यांचे तेच जबाबदार होते. त्याची हकीकत अशी.

शिवरामपन्त नुसतें कॉलेजांत शिकवून स्वस्थ बसेनात ! किंवा त्यांच्या अन्तःकरणांतली ऊर्मि त्यांना गप्प बसूं देईना. स्वातंत्र्यप्राप्तीची तळमळ लागलेल्या त्यांच्या मनाचें केवळ कॉलेजांतील विद्यार्थ्यांपुढें गाजविलेल्या वक्तृत्वानें समाधान होईनासें झालें. या वेळीं त्यांचें वय बत्तीस—म्हणजे तारुण्याच्या ऐन उमेदींत ते होते. अंगांत रक्त आणि डोक्यांत स्फूर्ति सळसळत होती. आतांपर्यंत परिश्रमपूर्वक पैदा केलेलें ज्ञान आणि देशसेवे_ करितां त्याचा उपयोग करण्याची तीव्र लालसा व या दोन्हींमुळें आंतून स्फुरणारी प्रतिभा यांमुळें, लोकांना काय सांगूं आणि काय नको असें त्यांना होऊन गेलें असेल ! त्यांची स्थिति या दांडग्या ज्ञानसंचयानें आणि प्रतिभा-स्फुरणानें आंतल्याआंत गुदमरल्यासारखी झाली असावी. त्याला वाचा फोडल्याशिवाय जणुं गत्यंतरच नव्हतें. त्यांनीं लोकांत जागृति करण्याकरितां एक नवीच टूम काढली. आणि ती म्हणजे देवळांतून पुराणें सांगणें ही होय. परांजप्यांचें पुराण म्हणजे हल्लीं होतात त्या प्रवचनांच्या पद्धतीचें नव्हतें. तर अगदीं जुन्या पुराणिकाच्या पद्धतीप्रमाणें देवळांत व्यासपीठावर बसून पोथी समोर ठेवून प्रो० परांजपे आपलें पुराण सांगत असत. अर्थात् हा सगळा थाट पुराणाचा असला तरी आंतला सगळा घाट राजकारणाचा असे. सर्व प्रकारचें राजकारण आणि राजनीति यांचा केवळ महासागरच असें जें महाभारत तें अशा प्रसंगीं त्यांना फार उपयोगी पडत असे. निमित्ताला एखादा श्लोक किंवा प्रसंग घ्यावा आणि त्याच्या मिषानें किंवा अनुषंगानें श्रोत्यांच्या डोळ्यांसमोर सद्यःस्थितीचें व चालू राजकारणाचें चित्र उभें करावें, अशी त्यांची पद्धत होती. हीं पुराणें नव्हतीं, हीं त्यांचीं बैठीं व्याख्यानेंच होतीं. मात्र हीं बैठीं व्याख्यानें पौराणिक कथेच्या चौकटींत मोठ्या कौशल्यानें आणि कांटेकोरपणानें बसविलेलीं असत. आणि म्हणूनच याला "राजकीय पुराण" असें लोकांनीं नांव दिलें होतें. राजकीय जागृती-साठीं व्यासपीठाचा उपयोग, ही त्यावेळीं अभिनव कल्पना होती आणि

यामुळेंच कदाचित् जें भरसभेंत सांगतां येणार नाहीं तेंही इथें सांगून घेण्याची संधि त्यांना साधतां येत असेल ! तरीसुद्धां राजकारणाचा प्रत्यक्ष संबंध न आणण्याचें एक बंधन त्यांचेवर होतें हें उघड आहे. याच अड-चणीमुळें आपल्याला जें कांहीं श्रोत्यांच्या मनांत उभें करावयाचें आहे, तें दुसऱ्या कशाच्या तरी आधारानें छद्मीपणानें—प्रच्छन्नपणानेंच बोलणें भाग होतें. सरळपणें सांगतां येत नसल्यामुळें वक्रपद्धतीनें सांगणें हेंच सरळ होतें. उपमा, दृष्टान्तरूपकांनीं आडवळणानें मनांतला अर्थ सूचित करण्यासाठीं त्यांनीं यावेळीं किती तरी निरनिराळ्या युक्त्या शोधून काढल्या असतील. आणि या दृष्टीनें हीं त्यांचीं राजकीय पुराणें म्हणजेच त्यांच्या भावी वक्तृत्वाच्या भव्य इमारतीचा पाया होता असें म्हटलें पाहिजे. पुढें सभापीठांवरून उघड उपहास करणाऱ्या त्यांच्या वक्रोक्ती-चा जन्म पहिल्याप्रथम या देवळांतल्या व्यासपीठावर झालेला असला पाहिजे, असा अंदाज बांधला तर तो चुकीचा ठरेल असें वाटत नाहीं. वक्तृत्वसमुद्राला जाऊन मिळण्याचें हें नदीमुख होतें.

युनिव्हर्सिटीच्या उच्च पदव्या घेतलेल्या व बक्षिसें मिळविलेल्या आंग्लविद्या-विभूषितानें अखेर पुराणिकबुवा व्हावें, हें कित्येकांना विसंगत व चमत्कारिक भासूं लागलें. डॉ० भांडारकरांसारख्या परांजप्यांवर मर्जी असलेल्या गुरुजींनाही त्याचें वैषम्य वाटलें. पण शिवरामपंतांची पुराण सांगण्याची धाटणी इतकी रसाळ व आकर्षक होती कीं,लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांचें पुराण ऐकण्यासाठीं लोटूं लागल्या. जनतेच्या मनाची आणि शिवरामपंतांच्या अंतःकरणाची गांठ पहिल्यांदा या पुराणांच्या प्रसंगीं देवळांतून पडली. आपण वक्तृत्व करूं अशी उमेद शिवरामपंतांनीं पूर्वी-पासून बाळगली असेल. पण आपल्या ठिकाणीं वक्तृत्वशक्ति वास करीत आहे, या गोष्टीचा प्रथम प्रत्यय त्यांना ह्याच वेळीं आला. रसवंती खुलत असतांना स्वतः वक्त्याला जो बौद्धिक आनंद अनुभवावयाला मिळत असतो, त्याबरोबरच शेंकडों-हजारों श्रोतेही त्या उत्पन्न झालेल्या तुडुंब सरांत पोहत आहेत, या दृश्याच्या सात्त्विक समाधानानें तरुण व महत्त्वा-कांक्षी शिवरामपंतांचें मन त्यावेळीं कसें उल्हसित आणि उत्तेजित होत चाललें असेल याची केवळ कल्पनाच केली पाहिजे. पण ही हकीकत ऐकून

भांडारकरांनीं आपल्या शिष्याला बोलावून घेतलें व या प्रकाराबद्दल त्याची कानउघाडणी केली. "हें तुम्हीं काय आरंभिलें आहे ? गळ्यांत तंबुरा अडकवून बोवा का होणार आहां ? आपली विद्वत्ता अशी वाया दवडूं नका !" जुन्या पिढींतल्या डॉ. भांडारकरांना नवीन पिढींत कोणतें चैतन्य खेळत आहे व ती कशानें प्रेरित झाली आहे याची नीट कल्पना आलेली नसावी. यावर शिवरामपंतांनीं कांहींच उत्तर केलें नाहीं, पण आपला क्रमही सोडला नाहीं. चांगल्या वक्त्याला कधीं कधीं मौनही धरावें लागतें !

पण एवढ्यानें हें थांबलें नाहीं. देवळांतून धर्माच्या निमित्तानें राजकारण उभें करणाऱ्या शिवरामपन्तांना राजकारणांत धर्माच्या निमित्तानें बोलण्याची संधी लवकरच मिळाली. या सुमारास टिळकांनीं **दोन राष्ट्रीय महोत्सव** सुरू करण्याचें ठरविलें होतें. पैकीं गणेशोत्सव चालू झाला होता. पण यंदां रायगडावरच्या शिवाजीमहाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार करून शिवजन्मोत्सव साजरा करण्याचें निश्चित केलें. या उत्सवाचा दिवस ता. १५एप्रिल हा ठरला होता. त्यासाठीं हा उत्सव पार पाडण्याची जबाबदारी अंगावर घेण्याला महाड वगैरे आसपासच्यां ठिकाणची मंडळी कितपत तयार आहेत याचा अंदाज घेणें प्राप्त होतें. शिवरामपंत परांजपे खुद्द महाडचेच. त्यांची रवानगी महाडास झाली. शिवरामपंतांनीं आगाऊ तेथें जाऊन खुद्द महाडांतील व आसपासच्या गांवांतील लोकांना भेटून बोलून या कार्याविषयीं अनुकूल वातावरण व सहानुभूति निर्माण करून ठेविली. व टिळकांच्या स्वागताचीही तयारी केली. उत्सव यशस्वी रीतीनें पार पाडण्याच्या श्रेयाचा मोठा वांटा महाडकर मंडळींचा होता. अर्थात् त्यांत नेतृत्व व प्रेरणा शिवरामपंतांची होती. स्वयंसेवक, सामान-सुमान, शिधा-सामग्री गांवांतून पायथ्याशीं नेणें व गडावर चढवणें इत्यादि बारिक-सारिक गोष्टींतही त्यांनीं आणि त्यांचे धाकटे बन्धु गणपतराव व विष्णुपन्त यांनीं लक्ष घातलें होतें. इतकी तयारी एकीकडे चालू असतां एक विघ्न उपस्थित होईलसें दिसूं लागलें. कुलाब्याच्या कलेक्टरनें आयत्या वेळीं उत्सवाला परवानगी देण्याचें नाकारलें ! अखेर टिळकांना गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट यांचेकडे दाद मागण्याला तांतडीनें महाबळेश्वरला जावें लागलें

व परवानगी मिळवून तेथूनच रायगडावर जाण्याकरितां ते महाडांत येऊन दाखल झाले. शिवरामपंत त्यांच्या आगमनाची वाट पहातच बसले होते. त्याच दिवशीं टिळक, त्यांचे बरोबर आलेली मंडळी व शिवरामपंत महाडहून आठ मैलांवर असलेल्या रायगडाच्या पायथ्याकडे निघाली. पायथ्याशींच 'क्यांप' उघडण्यांत आला होता. पण या हकीकतीचें खुद्द शिवरामपंतांनींच केलेलें वर्णन बघूं.

> रायगडावरील पहिल्या शिवाजी उत्सवाच्या वेळीं लोकमान्य रायगडास जाण्याकरितां आले, त्या वेळीं त्यांच्याबरोबर श्री. रा. रा. माधव कृष्ण देशमुख व कै. नारायण बापूजी कानिटकर हे होते. संध्याकाळच्या वेळीं रायगडाच्या पायथ्याशीं मंडळी जाऊन पोहोंचली. तेथें रा. रा. धारप, हर्डीकर, वगैरे महाडच्या अनेक उत्साही स्वयंसेवकांनीं उतरण्याची वगैरे सर्व जय्यत तयारी करून ठेवलेली होती. व तेथेंच रायगडावर पाठवावयाच्या सामानसुमानाचाही मुख्य क्ँप होता. व येथून धान्य, भांडींकुंडीं वगैरे सामान गडावर पोंचतें करण्याकरितां आसपासचे शेंकडों शेतकरी लोक खालून गडावर आणि गडावरून खालीं, अशा खेपा करीत होते. हे बहुतेक मजूर गडावरची खेप करून आपल्या गडाखालच्या छावणीमध्यें संध्याकाळच्या वेळीं परत आलेले होते. लोकमान्य त्या छावणीमध्यें आल्यानंतर रात्रभर तेथें विश्रांति घेतील आणि नंतर पहांटेस ते गड चढून वर जातील, अशी पुष्कळांची साहजिकच कल्पना होती. पण हा कार्यक्रम अविश्रान्त-श्रम करण्याची संवय असलेल्या लोकमान्यांच्या उत्साही धडाडीला मुळींच पसंत पडला नाहीं. त्यांनीं संध्याकाळचा फराळ झाल्यावर थोडी विश्रांति घेतल्याबरोबर रात्रीच्यारात्रीं गडावर चढून जाण्याचा व तेथें पोंचून मग झोंप घेण्याचा निश्चय ठरविला. त्याबरोबर जी मंडळी पहाटेस उठून वर जाणार होती, त्या लोकांनींही लोकमान्यांच्या समागमामध्येंच रायगड चढून जाण्याची तयारी चालविली. अशा रीतीनें शेंकडों लोक इतक्या रात्रीं रायगडावर चढून जाण्याचें धाडस करण्याला लोकमान्यांच्या उद्दीपक उदाहरणामुळें उद्युक्त झाले. लगेच शेंकडों मार्गदर्शक मजुरांनीं आपल्या चुडी पेटविल्या. ओझेवाल्या

मजुरांनीं पाहुणे मंडळींचे बोजे आपल्या डोक्यावर घेतले. आणि चार-पांच लोकांच्या दरम्यान एक एक चूड-वाला मनुष्य अशा रीतीनें जवळ जवळ चार-पांचशें लोक एक एक माणसांची रांग करून चालूं लागले. रात्रीचा प्रसंग असल्यामुळें व कित्येक ठिकाणची पाउलवाट अगदीं अरुंद असल्यामुळें चारचार पांचपांच माणसांची एक एक रांग करून त्या डोंगरांतून चालणें शक्य नव्हतें. शेंकडों चुडी पेटलेल्या असून त्यांची लांबचलांब अशी एक रांग डोंगरांतील वळणें घेत घेत वर चढत असलेली पाहून तळच्या छावणीमध्यें असलेल्या लोकांना हा डोंगरांतील देखावा फारच मनोवेधक भासला. व खुद्द शिवाजी-महाराजांच्या वेळीं शिवाजीमहाराज आणि त्यांचे मावळे किल्ला सर करण्याच्या वेळीं असेच रात्रींचे वर चढून जात असले पाहिजेत, हें प्राचीन काळचें ऐतिहासिक चित्र त्यांच्या डोळ्यापुढें उभें राहून प्रस्तुतच्या पडत्या काळामध्येंही सर्वांच्या अंगांत वीरश्री संचरण्याचा संभव दिसूं लागला. त्यांतच "शिवाजीमहाराज की जय!" "टिळक महाराजकी जय!" अशा रणगर्जना त्या गडावर होऊं लागल्या आणि त्यांचे प्रतिध्वनि त्या गडाच्या दऱ्याखोऱ्यांतून उत्पन्न होऊं लागले, त्यावेळीं तर हा सगळा रायगड किल्ला त्या चुडींच्या उजेडामध्यें स्वदेशभक्तीनें प्रज्वलित होऊन स्वराज्य-संस्थापनेची भाषा बोलूं लागला आहे कीं काय, असा भास झाला. अशा रीतीनें रातोरात लोकमान्य रायगड चढून वर गेले.

स्वतःचा निर्देश कोठेंही न करतां केलेल्या या वर्णनांत शिवराम-पन्तांच्या ठिकाणीं जी विनयशीलताच नव्हे, तर प्रसिद्धिपराङ्मुखता होती ती तर दिसतेच; पण या उत्सवाच्या प्रसंगीं त्यांच्या मनांत कोणत्या भावना व विचार खेळत होते, याचीही स्पष्ट कल्पना येते. रायगडासारख्या जुन्या ऐतिहासिक किल्ल्यावर 'स्वराज्य-संस्थापनेची' भाषा त्यांच्या कानाला किंवा मनाला ऐकूं येऊं लागली होती. शिवाजी-उत्सव सुरू करण्याची मूळ कल्पना व हेतु काय होता, व शिवरामपंत यावेळीं व पुढेंही रायगडावर जे उत्सवप्रसंग झाले त्यांचा उपयोग आपल्या

वक्तृत्वपूर्ण भाषणानें तो हेतु लोकांच्या मनांत ठसविण्याकडे कसा करून घेत असत, हें वरील उताऱ्यावरून सहज कळण्यासारखें आहे.

दुसरे दिवशीं गडावर उत्सव-समारंभ मोठ्या उत्साहानें व थाटामाटानें साजरा करण्यांत आला. सायंकाळच्या सभेंत नारायण बापूजी कानिटकर, प्रो. शिवरामपंत परांजपे व दापोलीचे गोगटे यांचीं भाषणें झालीं. हेंच शिवरामपंतांचें सभेंतलें पहिलें जाहीर भाषण होय. '**शिवाजी महाराज निर्माण झाले त्यावेळची महाराष्ट्रीयांची स्थिति व महाराजांनीं पुढें आपल्या सामर्थ्यानें त्यांना दाखविलेले दोन सुखाचे दिवस**' या विषयावर त्यांचें व्याख्यान झालें.उत्सव संपल्यानंतर परत येतांना महाडांत टिळक शिवरामपंतांच्या घरींच उतरले होते. पंतांनीं आपल्या गुरूचा यथोचित सत्कार मोठ्या प्रेमानें व उत्साहानें केला. निघतांना व्यवहारी टिळकांनीं पंतांच्या मातुःश्रींस भेटून नमस्कार करून निरोप घेतला.

सन १८९६ मध्येंच महाड येथें नवीन व्याख्यान-माला स्थापन होऊन मे महिन्यांत व्याख्यानें झालीं. या मालेंतील एका व्याख्यानाचे प्रसंगीं जी चकमक उडाली ती त्या वेळच्या परिस्थितीची निदर्शक असल्यामुळें येथें नमूद करणें इष्ट आहे. एके दिवशीं प्रो. परांजपे यांचें व्याख्यान चालकांनीं ठेवलें होतें. व्याख्यान चालू असतां कांहीं राजनिष्ठ व सरकारी नोकरींतल्या गृहस्थांच्या नाकाला मिरची लागूं लागली व त्यांच्यांत थोडी खळबळही सुरू झाली. अखेर तेथील सबजज्ज रा. सा. भट यांनीं " हें भाषण बंद करावें नाहींतर आम्ही उठून जातों " असा धाक घातला. पण त्यावर मंडळींनीं सांगितलें कीं, " यांत कांहीं राजद्रोह नाहीं, व कोणाला उठून जाणें असेल तर त्यास प्रतिबंध नाहीं. " इतकें हडसून खडसून झाल्यावर त्या लोकांना उठून जाण्याशिवाय गत्यंतरच राहिलें नव्हतें. पण रावसाहेब भटांबरोबर कोणीच उठून जाण्याला राजी दिसेना. अखेर परांजप्यांनीं आपलें व्याख्यान पुढें चालू करून संपविलें.

असो. रायगडावरच्या या प्रथम शिवाजी-उत्सवानंतर पांच-सहा महिन्यांनीं पुण्यांतील गणपति-उत्सव आला. यापूर्वीं एक दोन वर्षें मेळे मिरवणुकी निघूं लागून याही उत्सवाला सामुदायिक स्वरूप येऊं लागलें होतें. तरी गणपतीपुढें व्याख्यानें अशीं यंदांच झालीं. विंचूरकरांच्या

वाड्यांत टिळकांच्या लॉ-क्लास गणपतीपुढें प्रो. भानु, परांजपे, साठे यांचीं भाषणें झालीं. ता. २२ सप्टेंबर १८९६ च्या केसरींत परांजप्यांच्या व्याख्यानाचें इतिवृत्त खालीलप्रमाणें दिलेलें आहेः—

"सोमवारीं प्रो० परांजपे यांचें 'निमित्तमात्रम् भव सव्यसाचिन्' या श्लोकावर व्याख्यान होतें. विषय तत्त्वविचाराचा असून गहन होता. 'अनंत' व 'मर्यादित' यांची तुलना करून कर्म व दैववादाच्या जवळ-जवळ व्याख्याते पोहोंचतात न पोहोंचतात तों मेघराजांनीं विशेष कृपा केल्यामुळें व्याख्यान बंद ठेवणें भाग पडलें."

पण मार्केटमधील मंडप सर्व पुण्यांत मोठा होता. बुधवारीं टिळकांचें व्याख्यान होऊन गुरुवार रोजीं सायंकाळीं याच गणपतीपुढें प्रो. परांजपे यांचें व्याख्यान झालें. 'ब्राह्मणेतर' जातीचे लोक तर ह्या दिवशीं फार जमले होते. प्रो. परांजपे यांचें व्याख्यान नेहमींप्रमाणें मुद्देसूद व आवेशाचें होतें. 'धर्मोन्नति आणि देशोन्नति' करावयाची असेल तर स्वार्थत्याग व प्रसंगीं प्राणार्पणही करावयास तयार झालें पाहिजे हें त्यांनीं उदाहरणें देऊन या व्याख्यानांत दाखवून दिलें. त्याचप्रमाणें हुसब-निसांच्या बखळींत व लोणावळ्याच्या गणेशोत्सवांत त्यांचीं भाषणें झालीं. लोणावळ्याच्या 'तरुण मित्रमंडळी'नें टिळक-परांजप्यांना मुद्दाम व्याख्यानाकरितां बोलावणें केलें होतें. पण टिळकांना जातां आलें नाहीं म्हणून परांजपे, पांगारकर, दातार, वगैरे मंडळी गेली होती. हीं वर सांगितलेलीं परांजप्यांचीं तीनही भाषणें त्यांच्या वक्तृत्वाच्या सुरुवातीचीं म्हणून तर त्यांना महत्त्व आहेच, पण शिवाय त्यांचे विचार, राजकीय व सामाजिक प्रश्नांचें त्यांचें निदान व त्यांवर त्यांची औषधयोजना काय होती व खरा पोटांतला रोख काय करण्याकडे होता, या सर्व गोष्टी त्या भाषणांतून ठळकपणें प्रतिबिंबित झालेल्या आहेत. म्हणून हीं तीनही भाषणें ( अहवालरूपानें उपलब्ध आहेत तशीं ) या प्रकरणाचे शेवटीं परिशिष्टांत दिलीं आहेत. त्यांवरून शिवरामपंत, गणेशोत्सवाचा उपयोग आपल्या कार्याकडे म्हणजे राष्ट्रकार्याकडे कसा करून घेऊं लागले होते, हेंही सहजच दिसणार आहे. त्याचप्रमाणें या भाषणांतून 'त्यांची बोलण्याची घाटणी, विचारसरणी व आवेश अत्यन्त मोहक आहेत' हे

' प्रेक्षका 'चे केसरींतले उद्गार पाहिले म्हणजे शिवरामपंतांच्या वक्तृत्वाची छाप श्रोत्यांवर कशी पडूं लागली होती याचीही कल्पना येते.

अशा रीतीनें टिळकांच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं काढलेल्या प्रत्येक चळवळींत शिवरामपंत समरसतेनें भाग घेऊं लागले होते. या राष्ट्रीय उत्थानांत टिळकांनीं त्यांना ओढलें, कीं ते होऊन स्वयंस्फूर्तीनेंच त्यांत पडले, असा प्रश्न सुचण्यासारखा आहे. पण त्याचें उत्तर हेंच कीं, जितके ते होऊन सामील झाले याची शक्यता आहे तितकाच टिळकांच्या धीर आणि धडाडी उत्पन्न करणाऱ्या सहवासाची आपोआप छाप पडत असण्याचाही संभव आहे. उत्साह घेणारा आणि उत्साह देणारा–दोघेही कच्चे नव्हते.

अशा स्थितींत आपलें नवीन काढलेलें 'महाराष्ट्र कॉलेज' भरभराटीस चढावें असें इच्छिणाऱ्या त्या कॉलेजच्या इतर कांहीं पुरस्कर्त्यांना हा आपल्या कॉलेजांतील एक प्रोफेसर या गोष्टी करीत आहे याची भीति वाटूं लागली. शिवाय महाराष्ट्र कॉलेजशीं संबंध असलेल्या महाराष्ट्र-मेळ्यालाही परांजप्यांनीं बरींच पद्यें करून दिलीं होतीं. हें प्रो. परांजपे यांचें एकंदर चरित्र त्यांच्या व्यवसायबंधूंना आवडेनासें झालें. बरें, एवढ्यावरही भागलें असें नाहीं. याच्यापुढें दोनचार महिन्यांच्या आंतच टिळकांनीं सार्वजनिक सभेच्यामार्फत दुष्काळी चळवळीची मोहीम सुरू केली. परांजपे सभेचे एक सेक्रेटरी म्हणून त्याही आंदोलनांत सामील. तो कथाभाग पुढील प्रकरणांत येईल. या एकंदर प्रकारामुळें प्रो. परांजप्यांचीं लक्षणें 'ठीक' दिसत नाहींत, असें महाराष्ट्र कॉलेजच्या संस्थापकांना वाटूं लागलें. व त्याचा परिणाम म्हणजे शिवरामपंतांना आपल्या प्रोफेसरच्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. अशा रीतीनें त्यांची प्रोफेसरी संपली खरी, पण प्रो. या अक्षराची त्याची खूण त्यांच्या नांवामागें जन्मभर कायम राहिली. उभ्या हयातींत प्रोफेसरचें काम त्यांनीं दोनच वर्षें केलें, तथापि त्यांना प्रोफेसर म्हणण्यांतच लोकांना त्यांचा गौरव केल्यासारखें वाटे. पण त्यांची प्रोफेसरीची छोटी कारकीर्द आणि त्याही अवधींत त्यांचे वर वर्णन केलेले उद्योग पाहिले म्हणजे ते नांवालाच प्रोफेसर होते, असेंच म्हटलें पाहिजे !

टिळकांच्या पावलावर पाऊल ठेवीत चाललेल्या शिवरामपंतांना सहकाऱ्यांच्या मतभेदामुळें कॉलेजांतूनही आपल्या प्रोफेसरीचा राजीनामा देऊन बाहेर पडावें लागलें, यांत अभावितपणें टिळकांचेंच अनुकरण त्यांच्या हातून घडलें. पण आतांपर्यन्तच्या चळवळींत निदान सरकारशीं प्रत्यक्ष संबंध तरी नव्हता. यापुढें सरकारशींच दोन हात करावयाचे होते. तें पुढील प्रकरणांत पाहूं.

## परिशिष्ट

[ सन १८९६ च्या गणेशोत्सवामध्यें झालेल्या तीन व्याख्यानांचे अहवाल केसरीच्या सदर वर्षाच्या २२ व २९ सप्टेंबरच्या अंकांतून घेतलेले आहेत. त्यावरून शिवरामपंतांच्या त्यावेळच्या मनोभूमिकेची व विचारसरणीची चांगली कल्पना येते. ]

### ( १ ) हुसवनिसांच्या बखळींतील गणेशोत्सव

शुक्रवारीं सायंकाळीं प्रो. परांजपे यांचें हसबनिसांचे बखळींत 'राजानें प्रजेकरितां काय केलें पाहिजे' ह्या विषयावर व्याख्यान झालें. व्याख्यान नेहमींप्रमाणें सुरसच होतें. 'राजद्रोह' व 'प्रजाद्रोह' यांच्या व्याख्या तात्विक दृष्ट्या फारच प्रगल्भ होत्या. कण्या टाकून कोंबडीं झुंजविण्याचा रोमचा कित्ता इंग्रजांनीं वळविल्यासारखा दिसतो आहे; तेव्हां आम्हीं प्रजाजनांनीं सावध असावें व आपसांतील तंटे बंद करावे; सरकारासही ह्या गोष्टी समजून सांगाव्या; प्रजाद्रोहाचें पाप सरकारचे हातून होऊं देऊं नये. धर्मजागृतीकरितां आम्ही उत्सव करितों, भांडणाकरितां नव्हे, हें सरकारच्या ध्यानांत प्रजाजनांनीं आणून दिलें पाहिजे. प्रो. परांजपे यांच्या व्याख्यानाचा सारांश याहून विस्तृत रीतीनें देण्यास जागा नाहीं याबद्दल वाईट वाटतें.

### ( २ ) लोणावळें येथील 'तरुण–मित्र–मंडळी'तर्फेचा उत्सव

"कांहीं अडचणींमुळें नामदार टिळकांस आज येतां आलें नाहीं याबद्दल आपणां सर्वांस आज वाईट वाटत आहेच; पण विशेषतः मला त्यांचेच जागीं बसून त्यांची योग्यता अंगांत नसतां काम करावें लागत आहे याबद्दल फार दुःख होत आहे. तथापि भक्तीनें आपण फुलाची

पाकळी दगडाच्या मूर्तीस अर्पण केली असतां ती जशी विठ्ठलास पावतेच तद्वत् आजचा आपण केलेला मान आम्ही ना. टिळकांच्या चरणीं सादर करूं. असो. आजच्या प्रसंगाला अनुरूप चार शब्द मला बोलले पाहिजेत. आपण आज येथें महारापोरांसुद्धा साऱ्या जातीचे लोक जमलों आहोंत. धर्मसंबंधें जरी महारांच्या स्पर्शाबरोबर आपणांस स्नान करावें लागतें, तरी आपण इतर बाबतींत एक होण्यास मागें पुढें पहातां उपयोगाचें नाहीं. एकमेकांचे खांद्याला खांदा लावून आपण प्रसंगीं एक झालों होतों; यापुढें एक झालें पाहिजे; धर्मबाबी अवश्य पाळल्या पाहिजेत; पण जातीमुळें मनुष्यास मोठेपणा येत नसून तो गुणांमुळें येतो हें ध्यानांत धरलें पाहिजे. आपले उदारमनाचे मुसलमान बंधु आज येथें हजर आहेत. इतकेंच नव्हे तर एका बोहऱ्यानें या मेळ्यास कपाळावरचे शिक्केही फुकट दिले आहेत ही गोष्ट केवढ्या समाधानाची आहे बरें ! या प्रकारें आपण सर्व हिंदुस्थानच्या लोकांनीं एकीनें वागलें पाहिजे तरच आपलें तारण आहे. असेंच ऐक्य शहरगांवचे लोक व आडगांवचे लोक यांमध्यें झालें पाहिजे. सुशिक्षित व अडाणी यांचेमध्यें झालें पाहिजे. तुम्हांला लागेल त्यावेळेस तुम्ही आम्हां शहरवासी लोकांस बोलावणें पाठवीत जा, आम्ही तुमच्या हांकेस सदा तत्पर राहूं, लागेल ती कामगिरी बजावूं व विचाराल तो सल्ला देऊं. तुम्हीच आपल्या राष्ट्राचे हातपाय आहांत. तुमच्यावरच आमच्या साऱ्या उड्या. तर जरूर पडेल ती मदत करण्यास शहरचे सुशिक्षित लोक तयार आहेत हें मी आपणांस खात्रीनें सांगतों. आपले हे जे मेळे गणपतीचे सेवेस्तव रात्रंदिवस देह झिजवीत आहेत त्यांच्या श्रमाचें चीज झाल्याविना राहणार नाहीं. तथापि आपले मेळे अद्याप चांगले व्हावयाचे आहेत, त्यांत सुधारणा कर्तव्य आहे. देशी कापडाचीच गोष्ट घ्या. आपण सर्व जर देशी कापड वापरण्याचा निश्चय कराल व कांहीं मेळ्यांनीं तो केलेला व अमलांत आणलेलाही दिसत आहे ही फार चांगली गोष्ट आहे. नुसता झगझगीत पोषाख घालणें, गांव गांव गांवभर हिंडणें यांत कांहीं मुद्दा नसून यापासून आपणांत ऐक्य होऊन अशा सुधारणा करूं तरच आपलें कर्तव्य आपण बजावल्यासारखें होईल व आपलें कल्याण होईल.''

( ३ ) पुण्याच्या रे मार्केट मंडपांत—

लोकांच्या अंगीं धर्मोत्सवासारख्या देशोन्नतीचें काम करण्याची योग्यता

नसेल तर ती योग्यता अंगीं आणण्याचे प्रयत्न लोकांनीं केले पाहिजेत. शुकरहात्तरींत शुकानें जसा एका स्त्रीस उपदेश केला आहे त्याच धर्तीवर मी आपणांस कांहीं कांहीं गोष्टी सांगणार आहें.

धर्मजागृति करावयाची असल्यास धर्मबुद्धीप्रमाणें इतरही सद्गुण अंगीं असले पाहिजेत; त्याशिवाय कार्यसिद्धि होत नाहीं. यज्ञादि क्रिया नियमितपणें पार पडाव्या म्हणून केवळ धर्माच्या रणांतच गुंग असणाऱ्या ऋषिवर्यांना राम-लक्ष्मणांची मदत मागणें भाग पडलें.

धर्मरक्षण करण्याकरितां इतरही सद्गुण अंगीं असले पाहिजेत. ते सद्गुण कोणते म्हणाल तर स्वार्थत्यागाची अत्यंत उदात्त कल्पना होय. देशाच्या कामीं झटणाऱ्या मंडळींनीं स्वतःस अजिबात विसरून गेलें पाहिजे. कौरवपांडवांच्या वेळीं राष्ट्रहित साधणारे भीष्माचार्य हे अशाच प्रकारचे होते. 'अ-राजा' राहीन म्हणून बापापाशीं केलेली प्रतिज्ञा त्यांनीं अखेरपर्यंत राखली. राज्याचे खरे वारसदार असतांना राज्य-वैभव तुच्छ मानणारे त्यावेळीं होते म्हणूनच भरतभूमीची भरभराट झाली. "मी मेलों तरी हरकत नाहीं, माझा अत्यंत लय झाला तरी हरकत नाहीं, पण कार्थेजला जिंका" असें सांगणारे लोक रोममध्यें होते.

आपण स्वतः मेल्यानें राष्ट्र जिवंत राहातें असें समजल्यावर मृत्यूस आपण होऊन मिठी मारणारे लोक ज्याप्रमाणें रोमशहरीं होते त्याप्रमाणेंच आमच्यांत निपजले पाहिजेत.

धर्माकरितां काय किंवा इतर गोष्टींकरितां काय, योग्य वाटेल ती गोष्ट करावयाचीच, मग मृत्युमुखांत आपणा स्वतःस उडी घेण्याचें भाग पडलें तरी हौसेनें ती गोष्ट करावयाची. अशा करारी स्वभावाचे लोक ज्या धर्मांत नाहींत त्या धर्माच्या लोकांचें डोकें कधींही वर व्हावयाचें नाहीं. आपण इमारतीखालीं चिरडून गेलों तरी बेहेत्तर; पण इमारतींतील आपल्या वैऱ्यांच्या शरिरांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या पाहिजेत अशाच बुद्धीनें सॅम्सननें शत्रूची इमारत आपल्या अंगावर कोसळून घेतली. आगीच्या भडक्यांत आपण होरपळून मरूं, कांहीं चिंता नाहीं; पण पार्लमेंटांतल्या आपल्या शत्रूंची जळून राख झाली पाहिजे अशाच निकराच्या व निश्चयाच्या पण क्रूर बुद्धीनें गन् पावडर प्लॉटचे वेळीं दारूच्या भुयारांत गायफॉक्स

आगीची ज्योत हातांत धरून शिरला होता. हॅमडन, वॉशिंग्टन, शिवाजी वगैरे मंडळींच्या चरित्रांत ह्याच निकराच्या व निश्चयाच्या उदात्त स्वभावाचें वर्णन केलेलें आढळतें. ज्या राज्यांत असले लोक नाहींत त्या राज्यांत धर्मोन्नति व देशोन्नति हे शब्द देखील उच्चारावयास नकोत.

---

# ५

# ध्येय कोणतें ?—स्वातंत्र्य

" शिक्षणाचें पर्यवसान स्वातंत्र्यप्राप्तीच्या अभिलाषांत व्हावयास पाहिजे. "

—शि. म. परांजपे—काळ

सन १८९७ हें वर्ष देशाला अत्यंत त्रासदायक व विशेषतः पुणें शहराला तर भयंकर धामधुमीचें गेलें. दुर्दशा उडविणारा भीषण दुष्काळ, बळी घेणारा प्लेग, या दोहोंतली सरकारची अनास्था किंवा अव्यवस्था, त्यांतच भरीला सोजिरांचा धिंगाणा आणि उपद्रव व त्यांची प्रतिक्रिया म्हणून झालेले रँड-आयर्स्टचे खून आणि या सगळ्याचें प्रायश्चित्त म्हणून की काय, संन्याशाला सुळीं द्यावें, त्याप्रमाणें टिळकांना दिलेली पहिली राजद्रोहाची शिक्षा या सर्व अकल्पित व अद्भुत गोष्टी या १८९७ सालांतील होत. शिवरामपंतांचा सुप्रसिद्ध ' काळ ' पुढील सालापासून निघूं लागला. दुष्काळापासून काळ निघेपर्यंतच्या या सर्व घटनांमध्यें एकमेकांत एकप्रकारचा सूक्ष्म पण टणक असा कार्यकारणसंबंधाचा धागा आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईल. म्हणून 'काळ' पत्र ज्या परिस्थितींत निघालें ती समजावून घेणें आवश्यक आहे. शिवाय यावेळच्या वर सांगितलेल्या धामधुमींत शिवरामपंतांनीं काय भाग घेतला होता हें लक्षांत येण्याकरितांही वरील घटनांनीं बनलेल्या त्यावेळच्या वातावरणाचें धावतें चित्र कां होईना रेखाटणें जरूर आहे. पण तें करण्यापूर्वी शिवरामपंतांच्या खासगी, सांसारिक जीवनाची बाजू पाहून टाकूं.

शिवरामपंत एम्. ए. होऊन प्रोफेसर होईपर्यंत ते ढमढेरे-बोळांतल्या पाच्छापुरकरांचे वाड्यांत रहात होते, हें वर दिलेलेंच आहे. ही बिऱ्हाडाची जागा खोलांत व अपुरी पडूं लागली होती. शिवाय या सुमाराला त्यांचेकडे लोकांची येजा सुरू झाली होती, म्हणूनही जागा बदलणें भाग होतें. त्यावेळीं पुण्यांतल्या जुन्या प्रसिद्ध ऐतिहासिक वाड्यांत शनवारवाड्याच्या अगदीं समोर असलेल्या सरदार **कानड्यांच्या वाड्याची** गणना होत असे. १८९६ सालापासून पंतांनीं आपलें बिऱ्हाड या वाड्यांत आणलें तें थेट १९१४ सालीं त्यांनीं तुळशीबागेजवळ स्वतःचें घर घेतलें तेव्हां हलविलें. पुण्यांत त्या काळांत जागेची टंचाई नव्हती. म्हणून, गतवैभवाची मूर्तिमंत साक्ष पटविणारा शनवारवाडा जिथून समोरच उभा ठाकलेला नजरेस पडत असे असा हा वाडाच शिवरामपंतांनीं रहाण्यासाठीं पसंत केला, हा केवळ यदृच्छेनें आलेला योगायोगच असेल असें वाटत नाहीं. या वाड्याचा थोडा पूर्ववृत्तांत देणें आवश्यक आहे. कानड्यांच्या घराण्यांतील मूळपुरुष व पेशव्यांचे जरी-पटक्याचे सेनापति सरदार रामचंद्र गणेश कानडे यांनीं थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत सन १७६० ते ६५ चे दरम्यानचे काळांत हा भव्य आणि भक्कम वाडा बांधलेला होता. वाडा तीन-चौकी असून तीन मजली होता. दुसऱ्या मजल्यावर वाड्याचा मुख्य व प्रशस्त दिवाणखाना होता. त्याला रामचंद्राचा दिवाणखाना असें नांव होतें. पण त्याला **सोनेरी रंगमहाल** असें म्हणत. कारण त्याचें छत अत्यंत नक्षीचें व कलाकुसरीचें असून तें सोनेरी रंगाचें होतें. ( १९२० सालीं नवा पूल बांधण्याचे वेळीं हा वाडा पाडला तेव्हां हें छत जुन्या नक्षीकामाचा नमुना म्हणून सरकारनें मुद्दाम जसेंच्या तसें काढून हल्लीं मुंबईच्या आल्बर्ट म्युझीयअमध्यें ठेवलेलें आहे. ) या सोनेरी रंगमहालांत राजकारणाचीं गुप्त खलबतें चालत व खुद्द श्रीमंत माधवराव पेशव्यांची स्वारी त्याकरितां या ठिकाणीं येत असे, असा उल्लेख बखरींतूनही सांपडतो. एवढेंच नव्हे तर या वाड्यांत चोरदरवाजा असून त्यांतून समोर असणाऱ्या **शनवार-वाड्यांत** जाण्यायेण्याकरितां भुयार बांधलेलें होतें, अशीही आख्यायिका

आहे. असा हा इतिहासप्रसिद्ध कानड्यांचा वाडा, शिवरामपंत १८९६ साली रहाण्यास आले त्या सुमारास, कोनकरांच्याकडे गहाण पडून नंतर त्यांनी तो खरेदी घेतलेला होता. त्यावेळी सरदार कानड्यांचे वंशजांपैकी वाड्यांत कोणी रहात नसून मालक म्हणून कोनकरच रहात होते.

या भव्य तीन-चौकी वाड्यांत शिवरामपंतांनी प्रथम बिऱ्हाड आणलें त्यावेळी तळमजल्यावरील दोनतीन खोल्याच त्यांचेकडे होत्या. मागाहून काळ काढल्यानंतर मात्र थोड्याच दिवसांत वाड्याचा पुढील चौक 'काळ' कचेरी व प्रेस यांनी हळूहळू व्यापून टाकला. वर सांगितलेला सोनेरी रंगमहाल किंवा रामचंद्राचा दिवाणखाना म्हणत; ती शिवरामपंतांची लिहिण्या-बसण्याची जागा झाली. या ऐतिहासिक दिवाणखान्यांत बसूनच त्यांनी काळांतील आपले सुप्रसिद्ध लेख लिहिलेले आहेत, ही त्यांच्या लिखाणाची पार्श्वभूमि विसरतां कामा नये. आधींच शून्यांतून शब्दसृष्टि निर्माण करण्याइतकी प्रतिभासंपन्नता लाभलेली, त्यालाच ही ऐतिहासिक स्थळाची बैठक मिळाल्यामुळें उभयतांची कशी जोड बसत असेल, हें सांगावयाला नको. लिहिण्यासाठीं सरसावलेल्या त्यांच्या लेखणीच्या डोळ्यांपुढें गतेतिहासांतील प्रसंगांचीं कल्पना-चित्रें उभीं करून खुद्द पेशव्यांच्या हालचालींनीं संचारित झालेल्या ह्या खलबतखान्यानें शिवरामपंतांच्या प्रतिभेला कितीदां तरी स्मरण आणि स्फुरण उत्पन्न करून दिलें असेल !

असो. ज्या ठिकाणीं 'काळ' पत्र जन्माला येऊन त्यांतलें कडक व क्रांतिकारक वाङ्मय चहूंकडे फैलावलें आणि ज्या ठिकाणीं शिवरामपंतांना कीर्तिलाभ होऊन ते लोक-प्रियतेच्या शिखरावर चढले तोच हा कानड्यांचा वाडा. या वाड्यांत रहावयास येतांना शिवरामपंत एक तरुण अप्रसिद्ध पदवीधर म्हणून आले; पण वाडा सोडतांना ते महाराष्ट्रांतील सर्व-प्रसिद्ध पुढारी व वर्तमानपत्रकार म्हणून बाहेर पडले. शिवरामपंतांच्या वास्तव्यानें अधिकच प्रसिद्धीस आलेला हा वाडा १९२० सालीं हल्लींचा नवापूल बांधण्याच्या वेळीं पाडण्यांत आला. या जुन्या

वाड्याच्या जागेवर नव्या पुलाची पहिली कमान रचली गेली आहे! वाडा पाडते वेळीं साध्या भिंती पाडण्यालाही कित्येक महिने लागले, यावरून हा वाडा किती मोठा व मजबूत असेल याची वाचकांना कल्पना येईल. वाडा नदीला अगदीं खेटून होता. त्यामुळें श्रावण महिन्यांत पुराच्या पाण्यानें ओंकारेश्वराला स्नान होऊं लागलें कीं, इकडे या वाड्याच्या मागल्या चौकांत पाणी शिरूं लागत असे. काळांतील वाङ्मयाची जन्मभूमि आणि खुद्द काळकर्ते यांची कर्मभूमि असा हा वाडाही काळाच्या उदरांत गडप झाला! शिवरामपंतांचा तो काळ पाहिलेलें एक तुळशी-वृंदावन मात्र त्या प्रसिद्ध वाड्याचा अवशेष म्हणून अजूनही उभें आहे! तें पुलावरून दिसतें.

सन १८९६ च्या जुलै महिन्यांत सार्वजनिक सभेंत क्रांति झाली. जिच्यामार्फत कांहीं चळवळ करतां येईल अशी त्यावेळीं पुण्यांत सार्वजनिक सभा ही एकच संस्था होती. पण त्यावेळीं तींत रानडे—प्रभृतींचें प्राबल्य होतें. माधवराव रानड्यांच्या नेमस्त तंत्रानेंच सभेचा कारभार चालत असे. म्हणून जोरावत चाललेल्या टिळक—पक्षाला ही संस्था काबीज करण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. बहुमत करण्यासाठीं दोन्ही पक्षांची जोराची खटपट सुरू झाली. १४ जुलैला सभेची वार्षिक साधारण सभा भरणार असल्यामुळें तोच युद्धाचा दिवस ठरला. शिवरामपंत याचे आधींच कांहीं महिन्यांपूर्वी सार्वजनिक सभेचे सभासद झालेले होते. पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकी चुरशीच्या होऊन टिळकांचें बहुमत प्रस्थापित झालें. अध्यक्षांचे जागीं जुने विष्णु मोरेश्वर भिडे जाऊन महर्षि अण्णासाहेब पटवर्धन आले. जालनापूरकर व कृष्णराव मांडे हीं टिळकांच्या बाजूचीं माणसें सहकारी चिटणीस म्हणून निवडण्यांत आलीं. फक्त जुने सेक्रेटरी प्रो. गोपाळराव गोखले हे कायम ठेवण्यांत आले. त्यांना धक्का लावला नाहीं. हेतु हाच असावा कीं, आपलें बहुमत असल्यावर एकट्या गोखल्यांचें चालावयाचें नाहीं. मग त्यांना आपण होऊन कशाला काढा, राहूं द्या. पण पुढें ऑगस्ट महिन्यांतच गोखल्यांनीं रीतसर राजीनामा दिला. त्यांनीं राजीनामा देऊं नये म्हणून पुष्कळांनीं त्यांना आग्रह केला. तथापि त्यांनीं तो परत घेतला नाहीं. ता. १५ ऑगस्ट रोजीं वार्षिक

सभा भरली, तींत गोखले यांचे जागीं महाराष्ट्र कॉलेजातील प्रोफेसर शिवराम महादेव परांजपे यांचें नांव टिळकांनींच सुचविलें. व सर्वानुमतें त्यांची नेमणूक करण्यांत आली.

टिळक-पक्षाचा हा विजय देशांत जी नवीन राष्ट्रीय स्वतंत्र बाण्याची वृत्ति डोकें वर काढूं लागली होती, तिचा निदर्शक होता.

सार्वजनिक सभेचीं सूत्रें नुकतींच हातीं घेतलेल्या या नवीन कार्यकर्त्यांपुढें कार्याचें ताट अगदीं वाढून ठेवल्यासारखें पुढें आलें. वाढलेल्या ताटाची उपमा सुचली ती दिली खरी, पण ती या ठिकाणीं समर्पक नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. कारण, सभेपुढचें त्यावेळचें कार्य म्हणजे त्यावेळीं पडलेल्या भयंकर दुष्काळाला तोंड देणें हें होतें. दुष्काळ आपलें रौद्र स्वरूप प्रकट करतो न करतो, तोंच त्याच्या पाठोपाठ प्लेग आला ! एकट्या दुष्काळानें लोक व्हावे तितके त्रस्त होऊन त्यांच्यांत असंतोष पसरणार नाहीं असें वाटूनच कीं काय, त्याच्या मदतीला दुर्दैवानें आणखी हें प्लेगास्त्र सोडलें ! या दोघांनीं त्यावेळीं पुण्यांत व मुंबई इलाख्यांत कसा कहर करून सोडला होता, याची हकीगत इतरत्र पुष्कळ ठिकाणीं आलेली आहे. त्यांतच आपलें उत्पन्नाचें नुकसान होईल या भीतीनें सरकारही हवें तेवढें मना-पासून झटेना. उलट सरकार किंवा त्यावेळचे सरकारी अधिकारी यांचें वर्तन लोकांच्या इच्छा–अपेक्षांच्या विरुद्ध व कांहीं प्रसंगीं चीड आणणारेंही होत होतें. यामुळें दुर्दैव व सरकार या दुराराध्य जोडीशीं तोंड देण्याला टिळकांना व सार्वजनिक सभेला सज्ज व्हावें लागलें.

*"१८९६ सालचा पावसाळा सुरू झाल्यावर, पहिल्या पहिल्या नक्षत्रांत खूप पाऊस पडला नि अतिवृष्टीमुळें सगळीकडे पिकांची नासाडी झाली. मघापंचकाचा पाऊस वेळेवर पुरेसा पडेल या आशेनें लोक आकाशा-कडे दृष्टि लावून बसले होते. पण हस्तनक्षत्र संपत आलें तरी, आका-शांचे पाझर पृथ्वीकडे वळण्याचें चिन्ह दिसेना ! यामुळें लोकांचीं तोंडें सुकून जाऊं लागलीं. देशाच्या कांहीं भागांत धान्यांची लुटालूट झाल्याच्या वातम्या फैलावूं लागल्या, तरी मुंबई प्रांताचें सरकार कांहींच हालचाल करीना. दुष्काळाच्या संकटप्रसंगीं लोकांची अल्पस्वल्प

*टिळक–भारत—शि. ल. करंदीकर पान ७८.

तरी सोय व्हावी म्हणून तयार करण्यांत आलेला ‘ फॅमीन कोड ’ नांवाचा कायदा मुंबई सरकारच्या संग्रहीं होता; पण, त्याचा उपयोग करण्याची सरकारची इच्छा आहे असें दिसेना. धान्य व वैरण यांची टंचाई असह्य होऊं लागली. शेतीचीं ढोरें कसायांच्या गळ्यांत पडूं लागलीं नि अनाथ हिंदु माणसें मिशनऱ्यांच्या जाळ्यांत अडकूं लागलीं ! ”

अशा बिकट परिस्थितींत लोकांचे हाल होऊं नयेत, त्यांना कायद्यानें दिलेले हक्क व सवलती कोणत्या आहेत याचें ज्ञान व्हावें व कायदेशीर अधिकार वापरूनच त्यांनीं आपली व्यवस्था योग्य रीतीनें व हक्कानें लावून घेण्याला शिकावें, एवढ्याकरितां टिळकांच्या मार्गदर्शकत्वाखालीं सार्वजनिक सभेची चळवळ सुरू झाली. ता. १ नोव्हेंबरला ‘दुष्काळाबद्दल माहिती ’ हें जाहीर पत्रक शि. म. परांजपे व दुष्काळ कमिटीचे सेक्रेटरी अच्युत सीताराम साठे यांच्या सहीनें निघालें. व त्यानंतरच्याच आठवड्यांत सभेचे एजंट वि. का. राजवाडे, न. चिं. केळकर, नारायण बाबा घमंडे, महाडकर ज्योतिषी वगैरे मंडळी प्रचारकार्यार्थ बाहेर पडली. त्याचप्रमाणें सभेचे सेक्रेटरी शिवरामपंत परांजपे व प्रो. साठे हेही ठिकठिकाणीं हिंडावयास निघाले. लोकांना आपले हक्क समजावून देणें व त्यायोगानें दुष्काळाची तीव्रता कमी करणें हाच या चळवळीचा मुख्य उद्देश होता. वास्तविक दुष्काळ-ग्रस्त जनतेला साहाय्य करावयाला निघालेल्या या मंडळीचें सरकारनें स्वागतच करावयाला पाहिजे होतें. पण उलट हे चळवळे लोक आपले शत्रु आहेत, अशी भावना त्यावेळच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं करून घेतली. दि. १३-१२ ९६ रोजीं ठाणें जिल्ह्यांतील उंबरगांव पेट्यांत खत्तलवाड या गांवीं गरीब गांजलेल्या रयतेची एक जंगी सभा भरली. सभेला महालकरी फौजदार, असिस्टंट कलेक्टर दुबोले वगैरे अधिकारी आले होते. पोलिस-पार्टी मुद्दाम आणविली होती. सभेंत सा. सभेचे प्रचारक प्रो. साठे यांनीं ‘पिकें बुडालीं असलीं तर सरकार-सारा देऊं नका ’ असें रयतेला त्रिवार बजावून सांगितलें. सभेंत दुबोले साहेबांची व प्रो. साठे यांची थोडीशी चकमकही झडली. टिळकांनीं केसरींत यावर लिहिलेल्या अग्रलेखाला **पोलिसांच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्प्यांत भरलेली रयतेची जंगी सभा** ’ असा आपल्या नेहमींच्या पद्धतीचा व लढाऊ वृत्तीचा निदर्शक असा मथळा दिला होता. एकंदरींत वातावरण गरम

होत चाललें होतें व सरकार लवकरच सभेच्या प्रचारकांवर हात टाकणार असा रंग दिसूं लागला व तसें झालेंच. प्रो. साठे व दत्तोपंत आपटे यांना अटक झाली व त्यांच्यावर खटला भरण्यांत आला.

प्रो. साठे यांना अटक होतांच शिवरामपंत व महाडकर ज्योतिषी यांनीं कंबर बांधली व ते अलिबाग जिल्ह्यांत प्रचाराकरतां दौऱ्यावर निघाले. त्यावेळचा केसरी लिहितो—

> ' प्रो. साठ्यांचे हातून पुरतें न झालेलें काम पुढें चालविण्याकरितां अलिबाग जिल्ह्यांत गेलेले सा. सभेचे सेक्रेटरी प्रो. परांजपे व सभेचे एजंट महाडकर ज्योतिषी हे कशा रीतीनें आपली कामगिरी बजावीत आहेत याची कल्पना इतर ठिकाणीं छापलेल्या पत्रव्यवहारावरून दिसून येईल. '

या चळवळींत कित्येक ठिकाणीं शिवरामपंतांचीं हृदयस्पर्शी व कळकळीचीं भाषणें झालीं. दौऱ्यांत गांवोगांवीं हिंडावें लागल्यामुळें शेतकऱ्यांचीं व गरिबांचीं दुःखें त्यांच्या नजरेस पडलीं. याचा फार खोल परिणाम त्यांच्या मनावर झाला. पुढें काळांत गरिबांचा कैवार घेऊन श्रीमंतांवर झोड उठविलेले पुष्कळ लेख सांपडतात. गांजलेल्या दुष्काळग्रस्त रयतेचीं करुणाजनक चित्रें त्यांच्या लेखणींतून पुढें उतरलीं तीं या दौऱ्यांत मिळालेल्या अनुभवांतून निघालेलीं आहेत. **' एका खडी फोडणाऱ्याची गोष्ट '** एकदां वाचलेल्याच्या ध्यानांतून जाणें शक्य नाहीं ! वाचकाच्या अंतःकरणाला पीळ पाडणारें वाङ्मय लिहिणाराच्या आंतड्याला पीळ पडलेला असतो, हें विसरतां कामा नये.

प्रो. साठे यांचेवरील खटला पेण येथें अ. कलेक्टर ब्रुकसाहेब यांचेपुढें चालणार होता. खटल्याची तारीख सोमवार ता. ११-१-९७ ही नेमलेली होती. म्हणून दौऱ्यांत फिरतीवर असलेले शिवरामपंत मुदाम खटल्याकरतां आदले दिवशीं पेणेस येऊन हजर झाले. टिळक कलकत्ता कॉंग्रेसला गेले होते ते, खटले झाल्याचें कळतांच परत येण्यास निघून पुण्यावरून पेणला येऊन दाखल झाले. चळवळीमुळें व खटल्यामुळें लोकांत खूपच खळबळ उडून गेली होती.

* " आदितवार व सोमवार रोजीं पेण गांवांत बाहेर गांवचे सुमारें वीस हजार लोक जमले होते. आदितवारीं हजारों लोकांची जंगी सभा भरली होती. अध्यक्ष बाबासाहेब धारकर होते. नामदार टिळक व प्रो. परांजपे यांचीं जोरदार भाषणें झालीं.

सोमवारीं प्रो. साठ्यांवरील खटल्यास सुरवात झाली. अप्पाराव वैद्य, ना. बा. कानिटकर, पी. पी. खरे, दत्तोपंत वैद्य सॉ. व पेणचे वकील हा खटला चालू असतां हजर होते. हजारों लोक कोर्टासमोर उभे होते........पनवेलचे फौजदार या खटल्यांत फिर्यादी होते. त्यांच्या व आणखी दोन साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. त्यांनीं प्रो. साठ्यांच्या विरुद्ध एकही अक्षर सांगितलें नाहीं. म्हणून उलट तपासणीची जरूर राहिली नाहीं. मि. ब्रुकसाहेबांनीं प्रो.साठ्यांस लागलेंच दोषमुक्त केलें. ह्यामुळें हजारों लोकांस आनंद झाला.

ता. १२ ला टिळक, साठे, परांजपे वगैरेंना गांवांत पानसुपाऱ्या झाल्या. "

या दुष्काळी आंदोलनानें यापुढें सरकारपक्ष व लोकपक्ष यांमधील लढ्याला जी सुरवात झाली, त्यांत शिवरामपंतांनीं आपलें नांव लोकपक्षाच्या वतीनें दाखल केलें. व त्यांच्या धोरणांतील सरकार-विरोधाचें हें सूत्र जन्मभर अखंड राहिलें. त्यांच्या ह्यावेळच्या कामगिरीनेंच पुष्कळांना त्यांचें नांव पहिल्यांदा माहीत झालें व टिळकांप्रमाणेंच त्यांच्याबरोबर काम करणारे एक निःस्वार्थी विद्वान् अशी त्यांची प्रसिद्धि होऊं लागली. हें कार्य करीत असतांनाच खेड्यापाड्यापर्यंत खोल शिरल्यामुळें गरीब मुक्या जनतेची परिस्थिति त्यांच्या अनुभवाला आली. त्याचाही त्यांना पुढें भरपूर उपयोग झाला. हा दुष्काळ या वर्षीच समाप्त झाला खरा, पण पुढें हिंदुस्थानांत कोठेंही दुष्काळी परिस्थिति निर्माण झाली कीं, लगेच त्यांची लेखणी काळांत 'कुरकुरूं' लागे. तो विषय त्यांच्या कोमल व अत्यंत संवेदनक्षम अंतःकरणांत कायमचा घर करून बसला होता.

या दुष्काळी चळवळींत शिवरामपंतांनीं दिलेलीं व्याख्यानें वक्रोक्तिपूर्ण

*केसरी—जानेवारी १८९७.

असत. परंतु खोल वक्रोक्ति समजण्याला सराव व्हावा लागतो. तो खेड्याच्या लोकांत कोठून मिळणार ? यामुळें सुशिक्षित श्रोत्यांत प्रभावी होणारी त्यांची वक्रोक्ति पुष्कळ वेळां सामान्य मनुष्यांच्या डोक्यावरून जात असे. एवढेंच नव्हे तर सामान्य लोक शब्दांचा सरळ सरळ वाच्यार्थ तेवढा समजून व खोंच लक्षांत न आल्यामुळें फसून जात असत. याचें एक गंमतीदार उदाहरण केसरीच्या या सालच्या जानेवारीच्या अंकांत सांपडतें. आपटे, तालुके पनवेल येथें झालेल्या सभेंतील शिवरामपंतांच्या भाषणानें केसरीचा एक वर्गणीदार कसा फसला, हें केसरीला त्यानें पाठविलेल्या पत्रावरून चांगलें दिसून येतें. ' एक वर्गणीदार ' लिहितो—

" काल ता. ८–१–९७ रोजीं आमचे येथें रा. भिकाजी गोपाळ लळींत या सद्गृहस्थांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर सभा झाली. सभेला खेड्यांतील बहुतेक जातींचे एक हजार लोक आले होते. या सभेंत पुण्यांतील सा. सभेंतून आलेले प्रो. परांजपे एम्. ए. यांचें भाषण झालें. मुख्य विषय दुष्काळ हा होता. अशा प्रसंगीं लोकांचे प्राण वांचविण्याकरितां दयाळू सरकारनें कसे कायदे करून ठेविले आहेत, हें प्रो. परांजपे यांनीं लोकांना सौम्यपणानें, कळकळीनें व हृदयद्रावक भाषणानें समजावून दिलें. आणि त्यांनीं आपल्या भाषणानें आपलें सरकार फार दयाळू आहे याचा उत्तम प्रकारें मंडळीच्या मनांवर ठसा उठविला. अशा प्रकारचें १॥ तास अस्खलित भाषण झालें. इ. "

शिवरामपंताच्या वक्रोक्ति-कोशांतला दयाळू या शब्दाचा खास अर्थ—म्हणजे त्याच्या अगदीं उलट—बिचाऱ्या केसरीच्या वर्गणीदाराच्या लक्षांत आला नाहीं. त्यानें अर्थाचा अनर्थ केला !

असो. टिळकांनीं सुरू केलेल्या गणेशोत्सवांत भाग घेऊं लागल्यापासूनच पंतांवर सरकारी गुप्त पोलिसांची सांवली पडूं लागली होती. पण या दुष्काळी चळवळींत सरकारची नजर त्यांचेवर जी एकदां खिळली ती त्यांचे हयातीपर्यंत तशीच राहिली. यादींतलें नांव अखेर मृत्यूनेंच पुसलें असेल !

ही दुष्काळी मोहीम संपते न संपते तोंच प्लेगचा प्रादुर्भाव होऊन त्यानें आपलें ठाणें पुण्यांत दिलें व लवकरच त्यानें पुणें शहरांत थैमान घालण्यास सुरवात केली. पुण्याची मृत्युसंख्या रोजीं ६०।६५ पर्यंत गेली.

रँड नांवाच्या स्पेशल अधिकाऱ्याची या कामावर नेमणूक होऊन पुण्यांत रँडशाहीचा अम्मल चालू झाला. अंदाधुंदीचें वातावरण, सोजिरांचा उपद्रव, लोकांच्या हालअपेष्टा इत्यादि सर्व गोष्टी ' रँडशाही ' या एकाच बोलक्या शब्दानें व्यक्त होतात. त्यावेळचे केसरींतले आणि त्याहीपेक्षां सुधारक पत्रांतले ' आडदांडांना कायदा शिकवा ' इत्यादि कडक लेख यांवरून लोकांना तत्कालीन परिस्थिति किती जाचक आणि असह्य झाली होती याची चांगली कल्पना येते. होतां होतां या वर्षीच्या उन्हाळ्यांत पुण्याचा प्लेग निवळूं लागला होता. म्हणूनच कीं काय,यंदांचा शिवराज्याभिषेकोत्सव विशेष थाटानें झाला. त्याचवेळीं व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीला साठ वर्षें झालीं म्हणून डायमंड-ज्युबिलीचा समारंभही हिंदुस्थानभर मोठ्या प्रमाणावर साजरा होत होता. शिवरायांच्या उत्सवाला सुरवात ता. १२ जून रोजीं लकडीपुलाजवळील विठ्ठल–मंदिरांत झाली. प्रारंभीं स्तुतिपर पद्यें झाल्यावर प्रो. शिवरामपंत परांजपे यांचें पुराण झालें. विषय राजसूय यज्ञ व शकुनि-धृतराष्ट्र–संवाद हा होता. '**असंतोषः श्रियो मूलम्**' व ' संतोषस्तु श्रियो हन्ति' हीं त्यांचीं आधारवचनें होतीं. शिवरामपंतांच्या ह्या पुराणांतलें खरें मर्म काय होतें हें केसरीनें स्फुट लिहून उकलून दाखविलें होतें.

" धर्मराजाचा राजसूय यज्ञ पाहून आल्यावर महाराज सुयोधनाच्या अंगाचा झालेला संताप, तत्संबंधानें त्याचे विचार, शकुनीमामा व धृतराष्ट्र ह्यांच्याशीं त्याचा झालेला संवाद ह्यासंबंधाचा महाभारतांतील कथाभाग त्यांच्या पुराणाचा विषय होता. श्रोत्यांच्या मनांत राजसूय यज्ञाची कल्पना नीट यावी म्हणून डायमंड ज्युबिलीशीं राजसूययज्ञाचें साम्य दाखविल्यावर व दुर्योधनाच्या कृतींचें मंडन करण्याचा हा प्रयत्न नसून प्राणिमात्रास व्यापून असलेल्या महत्त्वाकांक्षेचा प्रभाव, तिचें स्वरूप, राष्ट्राचा किंवा एखाद्या पक्षाच्या उद्धार करण्याचा तिच्या अंगांतील जोम ह्याचें तात्त्विक रीतीनें महाभारतांत केलेलें विवेचन आपणांपुढें मांडण्याचा हा प्रयत्न आहे असा उपोद्घात करून पुराणिकबुवा आपल्या विषयाकडे वळले. प्रो. परांजपे यांची भाषाशैली जोराची व मनोवेधक आहे; ह्यामुळें श्रीव्यासांनीं महत्त्वाकांक्षी मनाचें जें उत्तम

चित्र रेखाटलें आहे त्यांतील खुमारी या प्रसंगीं पुराणिकबुवांनीं श्रोत्यांच्या मनावर चांगली ठसविली. " असंतोषः श्रियो मूलम्......संतोषस्तु-श्रियो हन्ति " हीं वचनें पुराणांतलीं मथितार्थ होतीं, खायाप्यायाला यथेच्छ असलें तरी आपले शत्रु आपणांस पायांखालीं तुडवितात ह्या अपमानाच्या जळफळाटानें मनुष्यास मृत्यु बरा कसा वाटतो, असंतोषी मनुष्य साहाय्य कसें मिळवितो, शस्त्रास्त्रांची उणीव आपल्या कौटिल्यानें कशी भरून काढतो वगैरे प्रकारचें वर्णन मनावर विशेष ठसण्यासारखें होतें. "

एकंदरींत पुण्यांत प्लेगची आग विझत आली होती. इतक्यांत एका खळबळ-जनक घटनेमुळें पुन्हां भडका उडाला ! ता. २२ जूनच्या रात्रीं गणेशखिंडींत गव्हर्मेंट हाऊसमधल्या मेजवानीहून परत येत असतांना रँड व ले. आयर्स्ट यांच्यावर कोणीं अज्ञात इसमानें गोळ्या झाडल्या. पैकीं आयर्स्ट जागच्याजागींच व रँडसाहेब मागाहून इस्पितळांत मृत्युमुखीं पडले ! लगेच या गुन्ह्यांचा तपास लागण्यापूर्वींच मुंबईच्या इंग्रजी वृत्त-पत्रांनीं ' पुण्यांतील ब्राह्मणां'च्या नांवानें गवगवा करण्याला सुरवात केली व या खुनामागें पुण्यांतील ब्राह्मणांचा एखादा कट असला पाहिजे असेंही ध्वनित केलें ! असें असतांही टिळकांनीं न डगमगतां " सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय ? " " राज्य करणें म्हणजे सूड उगविणें नव्हे " अशा अग्रलेखांचे धाडसी प्रतिटोले चढविले होते. पण अखेर व्हायचें तें झालेंच. ता. २७ जुलई रोजीं टिळक मुंबईस गेले असतांना त्यांना तिथेंच अटक करण्यांत आली व दुसरेच दिवशीं पुण्यांत सरदार नातू-बंधूंना पकडून स्थानबद्ध करण्यांत आलें. केसरींत शिवाजीवर एक कविता आली होती. त्याबाबत टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यांत येऊन प्राथमिक चौकशीनंतर लवकरच त्यांचा खटला हायकोर्टांत चालावयास निघाला. शिवरामपंत खटल्याकारितां मुद्दाम मुंबईस गेले होते. एवढेंच नव्हे तर लोकांच्या माहितीकरितां खटल्याची रोजची ताजी हकीगत देणारें जादा पत्रक ते रोजच्या रोज संध्याकाळीं छापून प्रसिद्ध करीत असत, अशी माहिती श्री. दादासाहेब रानडे सांगतात. ता. १४ सप्टेंबर रोजीं टिळकांना दीड वर्षाची शिक्षा सुनावण्यांत आली.

शिवरामपंत मुंबईहून पुण्यास परत आले त्याचवेळीं आपण वर्तमानपत्र काढावें हा विचार त्यांच्या डोक्यांत घोळत होता. त्यांच्या एकंदर 'उद्योगां'मुळें प्रोफेसरीतून त्यांना मोकळें व्हावें लागलें होतें. याच सुमाराला त्यांनीं 'मानाजीराव' हें शेक्सपिअरच्या सुप्रसिद्ध मॅकबेथचें भाषांतरित नाटक लिहिण्यास घेतलें होतें. पण तेवढ्यांत इंदूर दरबारनें बाणाच्या कादंबरीच्या आधारें रचलेल्या उत्तम नाटकाला नऊशें रुपयांचें बक्षीस जाहीर केलें होतें. पंतांचें कादंबरीवर दांडगें प्रभुत्व होतें, एवढेंच नव्हे तर त्यांतील कित्येक भाग त्यांचे मुखोद्गत झालेले होते. म्हणून त्यांनीं त्यांतील कथानकावर 'संगीत कादंबरी' नाटक रचलें. परंतु नाट्याचार्य देवल यांच्या शापसंभ्रमाचा पहिला नंबर लागला व संगीत कादंबरीला इंदूर दरबारकडून उत्तेजनार्थ बक्षीस मिळालें. पुढें हें नाटक नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळीनें रंगभूमीवर आणलें होतें व त्यांत राजपुत्र चंद्रापीड हा खऱ्या घोड्यावर बसून रंगभूमीवर प्रवेश करीत असे, असें सांगतात. या कारणानें मागें पडलेला 'मानाजीराव' त्यांनीं लवकरच पुरा केला व पुढील म्हणजे १८९८ सालीं त्याचें पुस्तक प्रसिद्ध झालें. खऱ्या राजाचा खून करून त्याची गादी विश्वासघातानें व बळजबरीनें बळकाविणाऱ्या मॅकबेथचें नाटकच पंतांनीं कां पसंत केलें, याचें मर्म उघड करून सांगण्याची जरूरी नाहीं. या नाटकांत देवडीवाल्याचा एक अत्युत्कृष्ट प्रवेश आहे, त्यांत जो उपरोधात्मक विनोद आहे, तो प्लेगच्या दिवसांत रँडशाहींत जे विचित्र हुकूम निघत त्यांवर आधारलेला आहे. करुण आणि भयानक रसांनीं भरलेलें व अभिनयाला हवा तितका वाव असलेलें हें नाटक शाहूनगरवासी नाटक मंडळीनें घेतलें. पहिला प्रयोग ता. १६ जुलै रोजीं शनिवारीं रात्रीं झाला. नटवर्य गणपतराव जोशी हे मानाजीरावांची ( मॅकबेथ ) भूमिका व बाळाभाऊ जोग दर्याबाईची ( लेडी मॅकबेथची ) भूमिका अत्यंत उत्कृष्ट व परिणामकारक रीतीनें वठवीत असत. हें नाटक बसविण्याचे कामीं शिवरामपंतांचे मित्र श्री. किरात (सोमण), कृष्णाजीपंत खाडिलकर व श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांच्या शिक्षणाचा नटवर्गाला फार उपयोग झाला होता.

या ठिकाणींच १८९८ मधील कांहीं महत्त्वाच्या गोष्टी नमूद करूं.

टिळकांना राजद्रोहाच्या कलमाखालीं शिक्षा झाल्यानंतर सरकारनें तें कलम दुरुस्त करून अधिक व्यापक करण्याचा कायदा केला होता. या राजद्रोहाच्या नवीन कायद्याविरुद्ध अभिप्राय प्रदर्शित करण्याकरितां सा. सभेचे दिवाणखान्यांत पुणें शहराची सभा भरणार होती. परंतु प्लेग-अधिकाऱ्यांनीं बंधनें घातलीं म्हणून सभास्थानीं दोनशें खुर्च्याच मांडल्या होत्या. अध्यक्ष रघुनाथ दाजी नगरकर वकील होते. ल. र. गोखले, के. एच्. केळकर, अण्णासाहेब पटवर्धन इत्यादिकांचीं भाषणें झालीं. मुख्य ठराव प्रो. परांजपे यांनीं मांडला व तो सर्वानुमतें पास झाला. यंदांच्या वसंत-व्याख्यान-मालेचे सेक्रेटरी प्रो. परांजपे यांनाच निवडण्यांत आलें होतें. या वर्षी मालेचा कार्यक्रम सार्वजनिक सभेच्या नवीनच तयार झालेल्या दिवाणखान्यांत झाला. मालेला सुरुवात रविवार ता. १५ मेला होऊन समारोप ता. १० जून रोजीं न्या. माधव गोविंद रानडे यांचे हस्तें झाला. खुद्द सेक्रेटरी प्रो. परांजपे यांनींही ' धर्मप्रसाराचें वेड ' या विषयावर ता. ७ जून रोजीं एक पुष्प गुंफलें होतें. त्यांनीं आपल्या व्याख्यानांत मिशनरी लोक आपल्या लोकांना धर्मांतराच्या जाळ्यांत कसे अडकवितात याचें वर्णन करून पतितपरावर्तनावर जोर द्यावयाला पाहिजे असें सांगितलें.

याच सुमारास केसरी व पुणेंवैभव या पत्रांना ते आपले लेख अधून-मधून धाडीत असत, अशी माहिती मिळते. परंतु नाटकें लिहून अगर अशा फुटकळ लेखांनीं त्यांच्या स्वातंत्र्योत्सुक मनाचें समाधान होण्यासारखें नव्हतें. स्वतंत्र लिखाणासाठीं त्यांनीं आपली लेखणी अखेर सरसावली व वर्तमानपत्र काढण्याचें मनाशीं निश्चित केलें. अर्थात् त्या परिस्थितींत नवीन वर्तमानपत्र काढणें हें अत्यंत धाडसाचें व धोक्याचें होतें. कारण, टिळक व इतर वृत्तपत्रकारांना कायद्याच्या कैचींत धरून तुरुंग दाखविण्यांत आला होता, हें स्पष्ट दिसत होतें. हें सर्व लक्षांत घेऊन त्यांच्या पुष्कळ मित्रांनीं शिवरामपंतांना उलट सल्ला दिला. तथापि त्यांच्या ठाम ठरलेल्या निश्चयापुढें त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. या सुमाराला त्यांची मनोभूमिका कशी बनलेली होती व त्यांच्या डोक्यांत कोणत्या कल्पना व विचार घोळत होते ह्याचा अंदाज आतांपर्यंतच्या त्यांच्या कृतीवरून व उद्गारांवरून सहज बांधतां येण्यासारखा

आहे. देशाभिमानानें उद्दीपित झालेली त्यांची प्रतिभा देशाच्या गुलामगिरींतल्या अपमानास्पद व दुःखदायक स्थितीनें डिंवचली गेली होती. आणि म्हणूनच त्यांची नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा यापुढें डोक्यांतल्या डोक्यांत घुटमळत बसेल, हें शक्यच नव्हतें. तिला वाट काढून देणें भागच होतें. शिवरामपंतांच्या स्वातंत्र्याच्या ऊर्मीनें त्यांच्यामागें टुमणें लावून ' काळ ' काढविला आणि त्या काळाच्या 'स्तंभां'तून नारसिंहाप्रमाणें तिनें आपलें उग्र स्वरूप प्रकट केलें. नरसिंहानें उन्मत्त व सत्ताधारी हिरण्यकश्यपूच्या सगळ्या अटी पाळून आणि त्याच्या सर्व कायद्यांच्या कक्षेंत राहून त्याचें उदर विदारण केलें हें त्या अवताराचें वैशिष्ट्य सुप्रसिद्धच आहे ! यावरून हेंच दिसून येणार आहे कीं, त्यांनीं काळ काढला तो अपरिहार्य म्हणून.

**'लोकांत दृढमूल व रूढ झालेल्या कित्येक राजकीय कल्पनांच्या उच्छेदासाठींच काळाचा जन्म आहे.'**

हा काळ काढण्यांतील, दिसण्यांत मोघम पण आंत खोल अर्थ भरलेला हेतु त्यांनीं काळांतच दोनतीन ठिकाणीं स्पष्ट केला होता. आतांपर्यंतच्या चळवळींपेक्षां निराळें असें एक राजकीय तत्त्वज्ञान त्यांनीं बसविलें होतें किंवा पसंत केलें होतें. त्याचा प्रसार करण्यासाठीं त्यांना काळ हवा होता. या विशिष्ट तत्त्वज्ञानापासूनच सावरकरांनीं स्फूर्ति घेतली व कार्य केलें असें स्वतः सावरकरच सांगतात !

पत्र काढल्यावर सरकारी गदा येईल ही भावी अडचण होती, तशी पत्र सुरू करतांना एक चालू अडचण होतीच, ती म्हणजे पैशाची होय. महाराष्ट्र कॉलेजांतल्या अर्ध-पोटी पगारांतूनच प्रपंच भागवून काटकसरीनें जी काय थोडीफार शिल्लक टाकली असेल, तेवढेंच काय तें भांडवल होतें.त्या काळांत अशा कामाला कोणाची मदत मिळण्याची मारामार.पगार देऊन माणूस ठेवावा, तर तेंही झेपण्यासारखें नाहीं,अशी स्थिति.परंतु या सर्व गोष्टींना तोंड देऊन त्यांनीं पत्र काढण्याची तयारी चालविली. आणि मनाच्या उभारीपुढें अडचणीदेखील जरा दबतात—गम खातात,

असें वाटतें. शिवरामपंतांचें पत्र जगद्धितेच्छु प्रेसनें छापण्याचें कबूल केलें. बाकी लिहिणें, मुद्रितें तपासणें, जाहिरातदारांचें देणें-घेणें, हिशेब ठेवणें, वर्गणीदारांच्या यादीप्रमाणें अंक रवाना करणें, इत्यादि सर्व गोष्टींचा त्यांनीं स्वतःच पत्कर घेतला. जो संपादक-लेखक तोच मॅनेजर—कारकून अशी सुरवातीची स्थिति होती. अर्थात् पुढें पहिल्या वर्षापासूनच त्यांच्या पत्राला वाढती लोकप्रियता व लोकाश्रय लाभून ही स्थिति पालटली, ही गोष्ट निराळी. 'काळ' पत्रानें पुढें त्यांच्या प्रपंचाचा खर्च तर चालविलाच पण वर चार पैसेही त्यांच्या पदरांत बांधले, ही गोष्ट खरी. तथापि मुळांत पैसा मिळविण्याचा धंदा म्हणून पंतांनीं हा उद्योग खासच आरंभिलेला नव्हता. एखादें वाईट व मूळ धरून बसलेलें झाड तोडायला जावें आणि त्याच्या मुळाशीं खणतां खणतां द्रव्यानें भरलेला हंडा सांपडावा अशांतलाच तो प्रकार झाला. आपलें राज्य हरण करून विळखा घालून बसलेल्या परसत्तेचे पाश ढिले करण्याकरितां ज्यांनीं वर्तमानपत्र काढलें त्यांच्या मनांत द्रव्यदृष्टि होती किंवा नाहीं, हें सहज उमगण्यासारखें आहे.

**अमर्षणः शोणित-कांक्षया किं**
**पदा स्पृशन्तं दशति द्विजिव्हः ?**

हा कालिदासाचा न्याय 'काळ' काढणाऱ्या शिवरामपंतांना तंतोतंत लागू पडतो.

शिवरामपंतांच्या बाबतींत लिहिण्याची हौस यापेक्षां लिहिल्याशिवाय भागत नाहीं, येथपर्यंत मनाच्या तळमळीचा पारा येऊन पोंचला, हीच गोष्ट खरी. त्यांच्या जीवनक्षितिजावर ज्ञानाचा चंद्रोदय होतांच सुप्त भाव-भावनांच्या लाटा उचंबळूं लागल्या आणि देशाभिमानाला भरती आली. अशा स्थितींत साहजिकच गुरुगृहीं राहून धनुर्विद्या, शस्त्रविद्या शिकलेल्या क्षत्रियाचे बाहू जसे स्फुरण पावूं लागत, त्याप्रमाणेंच विद्या हस्तगत केलेल्या शिवरामपंतांचें झालें असावें. स्फूर्तीची ऊर्मि अनावर झाली आणि ऊर्मींचा वेग असह्य झाला. या मनांतल्या खळबळीला वाट करून देण्याचा आणि जनतेला आपलें हृद्गत कळविण्याचा एकच

राजमार्ग त्यावेळीं होता. आणि तोच त्यांनीं पसंत केला. साप्ताहिक काळ दर शुक्रवारीं प्रसिद्ध होईल अशी जाहिरात फडकली ! केसरीच्या ता. १ फेब्रुवारी सन १८९८ च्या अंकांत खालील छोटी पण मुखपृष्ठावर छापलेली जाहिरात लोकांना दिसली--

येत्या वर्ष-प्रतिपदेपासून सुरू होणार

धार्मिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक आणि वाङ्मयीन विषयांची निःपक्षपातानें व निर्भय-पणानें पूर्ण चर्चा करणारें

# काळ

( *The Times* )

या नांवाचें नवीन साप्ताहिक मराठी वर्तमानपत्र

संपादक

प्रो. शिवराम महादेव परांजपे, एम्. ए.

सांचा--प्रारंभीं रॉयल हाफ; परंतु पुढें लवकरच वाढविला जाईल.

वर्गणीचे दरः--प्रतिवर्षी १ रु. व ट. ह. १३ आणे

म्यानेजर ‘ काळ ’

जुन्या मंडईजवळ कानड्यांचा वाडा, पुणें.

---

ता.
नं.
ता.
ठाणें.



# 'काळा'चा अवतार

सा रम्या नगरी महान्स नृपतिः सामन्तचक्रं च तत्
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत्ताश्चंद्रबिंबाननाः
उन्मत्तः स च राजपुत्रनिवहस्ते बंदिनस्ताः कथाः
सर्वं यस्य वशादगात् स्मृतिपथं कालाय तस्मै नमः

काळाचा पहिला अंक शके १८२० च्या पहिल्या दिवशीं म्हणजे पाडव्याला ता. २५ मार्च १८९८ रोजीं शुक्रवारीं सकाळीं बाहेर पडला. त्याच्या मुखपृष्ठावर अग्रभागीं वर दिलेला श्लोक छापलेला होता. 'काळ' हें अर्थपूर्ण नांव व त्यावरचा श्लोक पाहूनच त्यांतील खोंच मार्मिक वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं. 'काळ' या मथळ्याच्या पहिल्या अंकांतलाच काळाची विशालता व मोठमोठालीं साम्राज्यें धुळीला मिळविण्याचें त्याच्या पोटांतील सामर्थ्य वर्णन करणारा अग्रलेख इतका भव्य, उदात्त, खोल व व्यापक विचारांनीं भरलेला आणि पांडित्य-प्रचुर होता कीं, या पहिल्या अंकांतच 'काळ' पत्राच्या भावी यशाच्या व धोरणाच्या खुणा जाणत्या लोकांना पटण्यासारख्या होत्या. सुरवातीला सहाशेंच वर्गणीदार होते, पण फुटकळ अंक बराच खपला. पुढील अंकापासूनच सरकारवर कडक लेख यावयाला सुरवात झाली, व काळाचें एक वैशिष्ट्य जी वक्रोक्ति तिचा विलास सुरू झाला. या नवीन पत्राचा गांवांत बोलबाला सुरू होऊन लवकरच तो लोकांच्या चर्चेचा

एक विषय होऊन बसला. तोंच एक अनपेक्षित अडचण येऊन उभी राहिली. काळाचें पहिलें वर्ष उलटतें तोंच त्यांतील लेखांच्या कडकपणाचे दांते प्रथम छापखानेवाल्याला बोंचूं लागले. काळाची झडप सरकारवर पडण्यापूर्वीं सरकारची झडप आपल्यावरच पडेल असें वाटून जगद्धितेच्छु प्रेसनें पत्र यापुढें आपल्या छापखान्यांत छापण्यास नकार दिला. ही अडचण नेहमींच येणार हें ओळखून शिवरामपंत कायमचीच सोय करण्याच्या तयारीला लागले. त्यावेळीं विठ्ठल प्रेस नांवाचा एक जुना गंजलेला, मोडतोड झालेला व बंद पडलेला प्रेस त्यांना अल्प किंमतींत मिळाला. तो घासूनपुसून कोनकरांचे वाड्यांत आणून जोडून बसविल्यावर इतका चांगला चालू झाला कीं, त्यानें पुढें कधींच त्रास दिला नाहीं. पुढें काढलेलें ‘ स्वराज्य ’ पत्र यांतच छापलें जात असे. या छापखान्याचें नवीन नांव ‘ मनोहर प्रेस ’ असें ठेविलें. व अशा रीतीनें पुढील सालच्या अखेरीपासून काळ हा स्वतःचे मालकीच्या छापखान्यांत छापलेला व कानड्यांच्या भव्य वाड्यांतल्या‘काळ’ कचेरींत प्रसिद्ध झालेला असा बाहेर पडूं लागला.

हें सर्व वैभव वरून दिसण्याला ठीक होतें. पण सुरवातीची ‘ अंदरकी बात ’ निराळीच होती. कारण, मनोहर प्रेस म्हणजे तें मशीन चालविणारा एक प्रेसमन व काळ-कचेरी म्हणजे संपादक शिवरामपंत परांजपे व त्यांचा एक कारकून असा एकूण प्रचंड स्टाफ होता ! पण त्यावेळीं कोनकरांचे वाड्यांत स्वतः मालक कोनकर, शेंबेकर, अभ्यं, परांजपे वगैरे बिन्हाडांमध्यें एकत्र कुटुंबांतल्यासारखा एकोपा आणि प्रेम नांदत असे. एकीकडला भाजीचा नमुना दुसरीकडे गेला, तर तिकडली चटणी-कोशिंबीर इकडे येत असे. जानकीबाईच्या यजमानांनीं वर्तमानपत्र काढलें आहे, या गोष्टीचें सगळ्यांनाच कौतुक वाटत होतें. अंक निघायच्या आदल्या दिवशीं म्हणजे गुरुवारीं रात्रीं वाड्यांतलीं सर्व बायकामुलें पाटावर घड्या मोडायला उत्साहानें जमत व पहांटेपर्यंत गंमतीनें खेळीमेळीनें काम चालत असे. खुद्द मालकीणबाईसुद्धां यांत हौसेनें सामील होत.

असो. पण इकडे बाहेर ‘काळ’ पत्राचें अस्तित्व चांगलें जाणवूं लागलें

होतें. कसें तें वेगवेगळ्या लोकांत व गटांत त्याचा जो प्रतिध्वनि उमटला किंवा प्रतिक्रिया झाली त्यावरून कळून येईल. डॉ. भांडारकर या पंतांच्या नेमस्त गुरूंना काळाचे अंक बघून कसेंसेंच झालें. त्यांनीं शिवरामपंताना भेटीला बोलावून कळवळ्यानें उपदेश केला कीं, " तुम्हीं घेतलेलें वेड सोडून द्या; संस्कृतचे उच्च अध्यापक होण्यास आपण सर्वतोपरी लायक आहांत व म्हणून तुम्हीं तोच व्यवसाय करावा. " यावर विनयाचें पण नकारार्थी उत्तर आल्यावर डॉक्टरसाहेबांनीं पुन्हा सांगितलें कीं, " हें चूक आहे, मी लवकरच रिटायर होतों आहें. तुम्ही हें डोक्यांतलें वेड सोडून देण्यास कबूल असाल तर सरकारांत तुमची शिफारस करून ती जागा मी तुम्हांला देववितों. " यावर ' पाहतों कळवितों ' असें म्हणून काळकर्ते जे निघून आले ते पुनरपि भांडारकरांकडे गेले नाहींत. पहिल्याच वर्षांत काळ पत्रानें पुण्यांतील प्लेगचा जुलूम, रँडशाही, खून वगैरेसंबंधानें जे कित्येक लेख लिहिले ते केवळ सरकारास झोंबले असें नाहीं तर लोकपक्षांतील कित्येक गृहस्थांनीं ते फार कडक असें मत कांहीं खासगी तर कांहीं प्रकट रीतीनें व्यक्त केलें. विशेषतः मुंबईच्या कित्येक देशी वर्तमानपत्रकारांनीं आणि सर फेरोझशहा मेथा-प्रभृति गृहस्थांनीं बरेंच काहूर उठविलें. टिळक यावेळीं कैदेंत होते म्हणून मेथा यांनीं अॅ. सेटलूर यांचेमार्फत केळकरांना संभाषणाला बोलावून 'काळ' पत्राचा तुम्हीं जाहीर निषेध करा नाहींतर तुमच्यावरच काय पण सर्व पुण्यावर मुंबईची अवकृपा होईल असा दम भरला.

§ 'I shall run my pencil through the name of Poona wherever it may occur.'

हेच मेथांचे त्यावेळचे शब्द. पण केळकरांनीं याला त्यावेळीं दाद दिली नाहीं. पुढें १८९८ च्या सप्टेंबरांत टिळक सुटून आल्यावर त्यांच्याही मागें हीच भुणभूण सुरू झाली. किंबहुना टिळकांवर या बाबतींत अधिक टीका होऊं लागली. चँपियन, रास्त गोफ्तर वगैरे वर्तमान-पत्रांनीं तर काळपत्रावर ताबडतोब खटला करावा असेंही ध्वनित केलें. फार काय, बंगाल्यांतील कॉंग्रेसकमिट्यांनीं काळपत्राला कॉंग्रेसच्या जातीं-

---

§ केळकरकृत टिळक-चरित्र खंड २ रा.

तूनच बहिष्कृत करण्याचा ठराव केला. ही धुसफूस बरेच दिवस चालू होती. पण टिळकांनीं बहिष्काराची ही नसती बाजू अंगावर घेतली नाहीं. समाजांतील एका पक्षाकडून दुसऱ्याचा निषेध करविणें, ही सरकारची नेहमींची कपटनीति टिळक ओळखून होते. आणि कांहीं बाबतींत मतभेद असले तरी अखेर दोघांचा प्रतिपक्षी एकच आहे, हें जाणून टिळकांनीं काळपत्राचा निषेध केव्हांच केला नाहीं. या सुमारास रँड-आयर्स्टचा खून चाफेकरबंधूंनीं केला ही माहिती द्रविडबंधूंनीं पुरविल्यामुळें चाफेकरां-वरील खटल्याचें काम सुरू होतें. इतक्यांत ता. ८ फेब्रुवारी १८९९ रोजीं, चाफेकरांचे मित्र रानडे व साठे आणि स्वतः वासुदेवराव चाफेकर अशा तिघांनीं द्रविड-बंधूंचेवर पिस्तुलें झाडून त्यांना जगांतून नाहींसे केलें ! या प्रकारामुळें वातावरणांत पुन्हा खळबळ उडाली. ह्या विषयावर काळांत शिवरामपंतांनीं '**चाफेकर आणि रानडे**' असा अग्रलेख लिहिला होता. हा अग्रलेख पुढें कित्येक दिवस पुण्यांत गाजत राहिला होता. यानंतर शिवरामपंतांचे रहात्या वाड्यांत पोलिसांची जतीही आली होती, पण त्यांत कांहीं सांपडलें नाहीं ! हा वरील तेजस्वी व परिणामकारक अग्रलेख सावरकरांच्या वाचनांत आला. सावरकरांना अजून पुण्याचें दर्शनही झालेलें नसून यावेळीं ते नाशिकला मॅट्रिकच्या वर्गांत शिकत होते. 'चाफेकर आणि रानडे' ह्या काळकर्त्यांच्या लेखानें त्यांच्या मनावर विलक्षण खोल परिणाम झाला, असें सावरकरांनीं* लिहून ठेवलें आहे. सर फेरोझशहा मेथा प्रभृतींना हा व काळातील इतर लेख पाहून पुन्हा उसळी आली. आणि त्यांनीं टिळकांनीं काळ पत्रांतल्या लिखाणाचा स्पष्टपणें निषेध करावा असा त्यांचेमागें लकडा लाविला. परंतु सर्वसंग्राहक टिळकांनीं त्याला भीक घातली नाहीं.

काळ निघाल्यानंतर वर्षसहा महिन्यांच्या आंतच वर सांगितल्याप्रमाणें त्याचे वेगवेगळ्या वर्तुळांत वेगवेगळे पडसाद उमटले. 'तालीपु तारं विटपेषु मंद्रं' इ. मृच्छकटिकांतल्या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें पावसाच्या धारा त्याच असल्या तरी वर्षाव ज्या जागीं होतो त्याच्या भिन्नत्वाच्या मानानें

* अप्रकाशित आत्मचरित्र—वि. दा. सावरकर

निरनिराळे आवाज उत्पन्न होत असतात. असो. केसरीनें काळाचें स्वागत ता. १६ ऑगस्टच्या अंकांत खालील स्फुट लिहून केलें होतें.

"प्रो. परांजपे यांनीं गेल्या वर्षप्रतिपदेपासून पुणें येथें काढलेल्या 'काळ' वर्तमानपत्राच्या अंकांचा आम्ही साभार स्वीकार करतों. 'काळ' वर्तमानपत्रांतील लेख मोठ्या मार्मिकपणें लिहिले असून लोकपक्षाची त्यांत योग्य तरफदारी केलेली असते. प्रो. परांजपे यांचें नांव महाराष्ट्रांत बहुतेक सर्वांस माहीत आहेच, व त्यांच्या विद्वत्तेस साजेसेच लेख काळ वर्तमानपत्रांत येतात; हें सांगावयास नकोच. लोकमत जागृत करण्यास प्रो. परांजपे यांच्या जोरदार, मुद्देसूद व मार्मिक लेखांची फार मदत होईल यांत संशय नाहीं."

यावरून काळ निघण्यापूर्वीच काळकर्त्यांची विद्वत्ता व देशसेवेची बुद्धि यांची कीर्ति महाराष्ट्राच्या कानावर गेली होती, असें स्पष्ट दिसतें. शिवरामपंत एम्. ए. होऊन कॉलेजांतून बाहेर पडल्याला पुरीं तीन वर्षेंही अजून झालेलीं नव्हतीं. याच सुमारास काळाबरोबर इतरही पुष्कळशीं वर्तमानपत्रें निघालीं होतीं. पण या सर्वांत काळालाच पुढें अधिक आयुष्य व यश लाभलें. इतर कांहीं वर्तमानपत्रांच्या मानानें पहातां काळाची करडी कारकीर्द अवघ्या बारा वर्षांतच खंडित झाली, ही गोष्ट खरी आहे. तथापि या बारा वर्षांत काळानें बऱ्याच गोष्टींचे बारा वाजविले ही गोष्ट कबूल करावी लागेल.

मुहूर्तं ज्वलितं श्रेयः न च धूमायितं चिरम्

या वचनांत सांगितलेल्या रजपुती बाण्यांत जर कांहीं अर्थ असेल, तर तो अर्थ काळाच्या या द्वादश-वार्षिक कामगिरींत निःसंशयः सांपडण्यासारखा आहे.

असो. पहिल्यापहिल्यांदा काळांतील मतें कांहीं लोकांना विक्षिप्तपणाचीं वाटत! कारण सरकारवर अशी धाडसी व बेगुमान टीका आणि त्यावेळच्या सरकारमान्य पुढारी म्हणविणाऱ्यांचें स्वरूपाविष्करण पहाण्याची लोकांना संवय झालेली नव्हती. राजनिष्ठा प्रथम संभाळून मग फावल्या वेळांत आपली थोडथोडी सुधारणा अगदीं नेमस्तपणानें–आणि तीही सरकारला अर्ज करून व आर्जवें करून–हळुहळु करून घ्यावयाची, यालाच त्यावेळेपर्यंत राजकारण अशी संज्ञा होती. या कल्पनेच्या ठिकऱ्या काळानें उडविल्या. स्वातंत्र्य हें लोकांचें ध्येय आहे व तें नेमस्त–

मवाळ लोकांच्या कार्यपद्धतीनें मिळावयाचें नाहीं. अर्ज-विनंत्या हे स्वातंत्र्य मिळविण्याचे मार्ग नव्हत. त्यासाठीं जरूर असेंच दडपण व दहशत सरकारला बसली पाहिजे. अशा तऱ्हेचीं शिवरामपंतांचीं मतें वाचनानें आणि विचारपूर्वक बनलेलीं होतीं. हीं त्यांचीं मतें त्यांनीं काळांतून निर्भयपणें मांडावयास सुरवात केल्यामुळें साहजिकच कांहीं लोकांना काळकर्ते हे विक्षिप्तच नव्हे तर बहकलेले असेंही वाटूं लागलें असल्यास त्यांत नवल नाहीं. नेमस्त पक्षांतील मंडळी तर शिवरामपंतांना मनांतल्या मनांत

स्व-बिल-स्थ कृष्णसर्पा कांष्ठें टोंचोनि खवळिशी कां गा ?
तीव्र त्रिशूलवदग्रें तूं खाजवितोसि आपुल्या आंगा !

असें म्हणत असतील यांत शंका नाहीं.

दिवसेंदिवस शिवरामपंतांची लेखणी काळांत अधिकाधिकच रंगूं लागली. पांडित्य आणि प्रतिभा यांचा सहसा एके ठिकाणीं न दिसणारा हृदयंगम संगम लोकांना दर शुक्रवारीं पहावयास मिळूं लागला. व्याजोक्तीचें आणि विनोदबुद्धीचें त्यांनीं देशाभिमानाशीं लग्नच लावून टाकलें. एक वक्रोक्ति-कुशल लेखक असें शिवरामपंतांचें वर्णन जरी राजवाड्यांनीं केलेलें असलें तरी ते म्हणजे कांहीं नेहमींच ' शालजोडी 'चा उपयोग करीत असत, असें नाहीं. कधीं वक्रोक्ति तर कधीं सडेतोड तर्कशुद्ध कोटिक्रम असा दुतर्फी मारा चालत असे. मात्र प्रतिपक्षाची खुसखुशीत उडवावयाची असेल आणि त्याला उपहासास्पद करून सोडावयाचा असेल तर त्यांची लेखणी वक्रोक्तीचा व उपरोधाचा आश्रय केल्याशिवाय रहात नसे. या दृष्टीनें पहातां त्यांचीं राजकीय मतें व स्वातंत्र्य मिळविण्याचे त्यांचे मार्ग हे जसे स्वतंत्र व इतरांपासून निराळे होते,त्याप्रमाणेंच त्यांची लेखनशैलीही नवीन व विशिष्ट अशी होती. वक्रोक्ति आणि तीही इतकी भरपूर व राबवून घेतलेली मराठी वाङ्मयांत यापूर्वी नव्हती. तिचें इतकें वक्र व मनोहर नर्तन मराठी वाचकांनीं प्रथम काळांतच उत्सुक आणि विस्फारित नेत्रांनीं पाहिलें. एकीकडे सरकारी कायद्याचें बंधन आणि दुसरीकडून सरकारला नको पण देशहिताला हवें तें लोकांना कळविण्याची मनाची उत्कटता, अशा दोन्हींच्या दाबामुळें ही वक्रोक्तीची

हिरकणी बनली असावी असें वाटतें. केवळ शिवरामपंतांचेंच वैशिष्ट्य म्हणून म्हणतां येईल अशी ही वक्रोक्ति त्यांच्या ठिकाणीं प्रादुर्भूत होऊन शास्त्र-शुद्धतेप्रत कशी गेली, याची मीमांसाच करावयाची म्हटलें तर उपपत्ति कांहींशी खालीलप्रमाणें बसेल. विष्णुशास्त्र्यांच्या निबंधमालेशीं त्यांचा संबंध अगदीं लहानपणींच जडला. शास्त्रीबुवांच्या भाषेंत ही उपरोधाची शैली अगदीं प्राचुर्यानें किंवा उघड नसली तरी तिचीं बीजें खासच सांपडतात. शास्त्रीबोवा प्रतिपक्षाची टर भरतांना त्यांच्या लिहिण्यांत जो उपरोधिकपणा व वक्रोक्ति आढळते त्याचा शिवरामपंतांच्या मनावर नकळत कां होईना परिणाम झाला असावा. व पुढें त्यांच्या दांडग्या वाचनांत स्विफ्ट, व्होल्टेअरसारखे वक्र-वाचस्पति ( Masters of satire ) आले असतील त्यावेळीं हा वक्रोक्तीचा प्रकार टीकास्त्र म्हणून फार उपयुक्त आहे हें त्यांच्या ध्यानांत आलें असेल. अर्थात् ही वक्रोक्ति तीव्र व परिणामकारक होण्याला एक विशिष्ट मनोरचना आणि भावनेची किंवा विकारांची तीव्रता असावी लागते ती शिवरामपंतांच्या ठिकाणीं होती, यांत शंका नाहीं. शिवाय त्यावेळीं वर सांगितल्याप्रमाणें परिस्थितीची अडचण असे. म्हणजे कांहीं गोष्टी सरळ बोलण्याची चोरी. या सर्व कारणांनीं मिळून ही पंतांची वक्रोक्ति सिद्ध झाली असली पाहिजे. एवढी गोष्ट मात्र खरी कीं, ही त्यांची विशिष्ट शैली जशी पूर्वीं अस्तित्वांत नव्हती तशी त्यांच्यानंतरही ती नाहीं. या शैलीचें अनुकरण करण्याचे कांहीं फुटकळ प्रयत्न झाले असतील, पण त्यांत शिवरामपंतांचा सफाईदारपणा, मर्मभेदकपणा आणि रकानेच्या रकाने भाषा तशीच त्याच पद्धतींत पेलत नेण्याचा तसा दमदारपणा आढळत नाहीं. वक्रोक्ति आणि उपरोध हे विशेष त्यांनीं पेटंट घेतल्याप्रमाणें त्यांचेच होऊन राहिले आहेत !

या वक्र-लेखांच्या ( Satire ) अमोघ शस्त्रामुळें प्रतिपक्षीयांना एकवेळ टिळक पुरवले पण परांजपे नकोत असें होऊन जाई. या वक्रलेखनांतल्या छुपी हल्ल्याची गोष्टच अशी असते कीं, शत्रूच्या गळ्यांत बिनतोड बाजू यावी. चार मंडळी बसली असतांना एखाद्यानें कांहीं मंत्रसिद्धीच्या जोरावर अदृश्यरूप धारण करून यावें आणि एखाद्याची हळूच

पगडी उडवून द्यावी अशांतलाच तो प्रकार होत असतो. धरायला जावें तर धरणार कुणाला ? अशा वेळीं प्रतिपक्षाला तोंड दाबून बुक्क्यांचा मार निमूटपणें सहन करावा लागतो व शिवाय प्रेक्षक पहातात-हंसतात तें वेगळेंच ! वाग्युद्ध करणाऱ्याला अत्यंत उपयुक्त असें हें भयंकर अस्त्र आहे, यांत संशय नाहीं. तथापि तें पेलणाराही तसाच जबरदस्त असावा लागतो. नाहींतर तें उचलतांना तोल जाऊन स्वतःचीच शोभा व्हायचा संभव अधिक. शिवरामपंतांनीं हें हत्यार मोठ्या कौशल्यानें वापरून त्याचा मनसोक्त व भरपूर उपयोग करून घेतला. खायचे दांत वेगळे व दाखवावयाचे वेगळे ही कला किंवा क्लृप्ति, भाषा लिहिण्यांत कमालमर्यादेपर्यंत कोणीं नेऊन भिडविली असेल तर ती शिवरामपंतांनीच. निर्जीव मृदंगांतून बोल काढावे त्याप्रमाणें मुक्या शब्दसमूहांकडून त्यांत न लिहिलेला अर्थ ते बोलावयाला लावीत ! शिवरामपंतांच्या राजकीय विचारसरणीप्रमाणेंच त्यांची भाषाही गुप्तीच्या काठीसारखी होती. ' त्यांच्या उपहासाच्या सपाट्यांत जी जी व्यक्ति सांपडली ती ती अंग छिन्नविच्छिन्न झाल्यावांचून कधींही सुटली नाहीं. विनोदशस्त्र त्यांच्या हातांत जितकें वीर्यशाली झालें, तितकें दुसऱ्या कोणाच्याही हातीं कधीं झालें नसेल. ' सरकारापासून ते खासगी संस्थेपर्यंत व सरकारी अधिकाऱ्यापासून तों खासगी व्यक्तीपर्यंत ज्यांत ज्यांत म्हणून कांहीं वाईट, अनिष्ट, देशविघातक असेल तें नेमकें हुडकून काढून शस्त्रवैद्याच्या चाकूप्रमाणें त्यांची लेखणी त्या व्यंगावर अचूक जाऊन बसत असे. यामुळें संस्था काय किंवा व्यक्ति काय—मग त्या सरकारी असोत किंवा बड्या असोत—पंतांच्या उपहासानें लोकांत हास्यास्पद आणि परिणामांत फिक्या पडत. प्रसिद्ध वक्र-लेखक व्होल्टेअर याच्या लेखणीच्या सामर्थ्याचें मेकॉलेनें फार मार्मिक वर्णन केलें आहे.

He ( Voltaire ) knew that he was a potentate as well as Frederick, that his European reputation and his incomparable power of covering whatever he hated with ridicule, made him an object of dread even to the leaders of armies and rulers of nations. In truths, of all the intellectual weapons which have ever been wielded by man, the most terrible was

the mockery of Voltaire. Bigots and tyrents, who had never been moved by the wailing and cursing of millions, turned pale at his name, Principles unassailable by reason, principles which had withstood the fierest attack of power, the most valuable truths, the most generous sentiments, the noblest and most graceful images, the purest of reputations, the most august institutions began to look mean and loathsome as soon as that withering smile was turned upon them.

(फ्रेडरिक सत्ताधीश आहे तसे आपणही आहों, हें व्होल्टेअरनें ओळखलें होतें. अखिल युरोपभर लाभलेली कीर्तीची बैठक आणि स्वतःला तिरस्करणीय वाटणाऱ्या गोष्टींना हास्यास्पद आणि उपहासास्पद करून सोडण्याचें आपलें विलक्षण सामर्थ्य—यामुळें मोठमोठे सेनाधिपाति आणि राजाधिराजही आपल्याला भितात याची त्याला जाणीव होती. खरोखर, मनुष्यानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें जीं जीं हत्यारें आजवर वापरलीं त्या सर्वांत व्होल्टेअरचा उपरोध हें एक महाभयंकर शस्त्र होतें. लाखोंच्या शिव्याश्रापांनीं आणि किंकाळ्यांनींही ज्यांच्या हृदयाला पाझर फुटूं नये असे मदोन्मत्त सत्ताधीश आणि अहंमन्य पंडित व्होल्टेअरच्या नुसत्या नामोच्चाराबरोबर भीतिग्रस्त होऊन कावरेबावरे होत. बुद्धिवादानें न उलथतां येणारे सिद्धांत, भीषण हल्ल्यांतूनही टिकाव धरून राहिलेलीं तत्त्वज्ञानें, बहुमोल ठरलेलीं सत्यें, उच्च-उदात्त वाटणाऱ्या भावना, लोकांच्या चित्तांत घर करून राहिलेलीं पावित्र्याचीं प्रतीकें आणि त्यांविषयींच्या त्यांच्या कल्पना, धुतल्या तांदुळासारखी निष्कलंक कीर्ति प्रस्थापित केलेलीं बडीं बडीं धेंडें आणि समाजांत मान्य होऊन बसलेल्या व अनेक वर्षांपासून चालत आलेल्या संस्था—यांपैकीं कोणतीही गोष्ट एकदां कुठें त्याच्या तीव्र तुच्छताबुद्धीच्या सपाट्यांत सांपडण्याचा अवकाश, कीं ती लागलीच लोकांना फिक्की, निंद्य आणि तिरस्करणीय वाटूं लागे!)

हें वर्णन शिवरामपंतांच्या काळांतील लिखाणाला कितपत लागू पडतें, हें काळांतील लेख वाचलेल्यांना सहज ठरवितां येईल. पण एक गोष्ट

मात्र अवश्यमेव लक्षांत घेतली पाहिजे, ती ही कीं, शिवरामपंतांनीं चांगल्या गोष्टींचा उपहास कधींच केला नाहीं. शिवरामपंतांचें वक्रोक्तिपूर्ण लेखन वाचणाऱ्याला, एकीकडे झाडाला टेंकून बसल्याबसल्या दुसरीकडे शेपटीनें लंका पेटवून देणाऱ्या हनुमानाची आठवण गंमतीनें झाल्याखेरीज रहात नाहीं. मात्र याही हनुमानाच्या हृदयांत स्वदेशभक्तीचा 'राम' कोरलेला होता, यांत शंका नाहीं. हिंदुस्थानच्या कल्याणाचा आव आणणारे ब्रिटिश मुत्सद्दी, आम्ही लोकहित साधतों आहोंत असें दाखविणारे सरकार-जमा लोकपुढारी इत्यादींचेंच स्वरूपाविष्करण त्यांनीं केलें. त्यावेळचे नेमस्त, नेभळट पुढारी, साहेबांपुढें लांगूलचालन करणारे, समाजांतले ढोंगी व लब्ध-प्रतिष्ठित, गरिबांना पिळणारे श्रीमंत, प्रजाहित न पहातां सरकारच्या कच्छपीं लागणारे संस्थानिक राजे-महाराजे, स्वाभिमान विसरलेले सरदार-दरकदार, क्षुद्र स्वार्थासाठीं परक्यांना सामील होणारे फितुरी वृत्तीचे लोक, यांच्याच पोटांत काळांतील वक्रोक्तीचीं लपलेलीं वाघनखें घुसत असत, हें त्यांचें वैशिष्ट्य विसरतां कामा नये. या प्रच्छन्न टीकेची फोडणी इतकी चुरचुरीत आणि खमंग होत असे कीं, काळाच्या अंकावर वाचकांच्या उड्या पडत असत. त्यावेळच्या काळाच्या चटकदारपणाचें एकच उदाहरण दिलें तरी पुरें आहे. नामदार गोखले व त्यांचा मवाळ पक्ष हें काळांतील हल्ल्यांचें नेहमींचेंच लक्ष्य होतें व ही मंडळी अर्थातच काळपत्राला उघडपणें तुच्छ लेखीत व नाकेंही मुरडीत. परंतु स्वतः गोखले व कांहीं मवाळ 'काळ' मुद्दाम नेऊन चोरून वाचीत असत व त्यांतली 'मौज' लुटीत! तिखटमिठाचा पदार्थ खातांना त्यांतला तिखटपणा जिभेला जाणवूं लागला तरीही त्या तिखटपणांतच गोडी लागते त्यांतलाच हा एक प्रकार म्हणावयाचा! **काश्मीरजस्य कटुताऽपि नितांतरम्या!** शिवरामपंतांची ही वक्रोक्ति, विशिष्ट भाषापद्धति व तिची लोकांवर पडणारी मोहिनी यांचें वर्णन त्यांच्या संक्षिप्त चरित्रांत खालीलप्रमाणें केलेलें आढळतें.

"प्रो. परांजपे हे वाङ्मय-क्षेत्रांतील एक जादूगार आहेत, व त्यांची भाषा म्हणजे निःसंशय लोकांना मोहित करणारी जादू आहे असें म्हणावें लागतें. राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक बाबतींत रा. परांजपे यांच्याहून दक्षिणोत्तर ध्रुवाइतकीं ज्यांचीं मतें भिन्न आहेत

असे पुष्कळ विद्वान् लोक असतील. परंतु विचाराची बाजू सोडून दिली आणि निव्वळ भाषापद्धतीच्या दृष्टीनें पाहिलें तर रा. परांजपे यांच्या लेखांत अशी कांहींतरी लोकोत्तर खुबी आढळून येते कीं, अगदीं विरुद्धमताच्या माणसांना देखील निदान मनोरंजनाकरितां तरी त्यांचे लेख वाचावेसे वाटतात व मनोरंजनाच्या भरांत हे लोक इतके वाहवून जातात कीं, घटकाभर आपलीं सर्व मतें व पूर्वग्रह विसरून जाऊन लेखकाबद्दल धन्यतेचे उद्‌गार त्यांच्या तोंडावाटे हळूच बाहेर पडल्याशिवाय रहात नाहींत!"

पण वक्रोक्ति हें कांहीं 'काळ'पत्राचें एकच एक वैशिष्ट्य नव्हतें. दुसऱ्या कोणत्याही कार्याप्रमाणें लेखनाचींही दोन अंगें असतात. एक विध्वंसक आणि दुसरें विधायक. काळांत वक्रोक्तीच्या मसालेदार टीकाप्रचुर लेखांप्रमाणें प्रतिभासंपन्न व तत्त्वगंभीर असे सात्त्विक लेखही बरोबरीनें असत. असे एकापेक्षां एक कल्पनेच्या भरारींत व विचारसौंदर्यांत एकमेकांशीं स्पर्धा करणारे अनेक सुंदर लेख काळांतून येत असत, परंतु शिवरामपंतांची ही कलेसाठीं कला नव्हती. त्यांच्या वक्रोक्तीला व प्रतिभाविलासाला तीव्र देशाभिमानाचें अस्तर आंतून शिवलेलें असे. प्रायः काळांतील एक ओळ अगर विचारही असा सांपडावयाचा नाहीं कीं, जो स्वातंत्र्याच्या ध्येयाला पोषक नाहीं. शिवरामपंतांनीं आपल्या काळांतील लिखाणानें देशभक्तिरस या दहाव्या रसाची नव्यानें निर्मिति केली.

लोकांना खडबडून जागें करून चेतविण्याकरितां काळकर्ते शिवरामपंत नाना तऱ्हेच्या युक्त्या शोधून काढीत असत. कधीं जुन्या ग्रीक रोमन गोष्टीच काढतील, तर कधीं शिवाजीचें रूपक घेऊन त्यानें स्वातंत्र्यस्थापना करण्यासाठीं लोक कसे जमविले, शस्त्रास्त्रें कशीं मिळविलीं, व गनिमी काव्याचें युद्ध खेळून परकीय सत्ता कशी जर्जर केली, याचें सूचक वर्णन करतील. ते केव्हां चालू परिस्थितीला हुबेहूब लागू पडेल असें सृष्टिचमत्काराचें रूपक करीत, तर केव्हां थोट्या तीळ कसे खाशील अशा मासल्याची एखादी कल्पित गोष्ट रचीत. आज त्यांच्या लेखणीनें साम्राज्याच्या सामर्थ्याला पाहून विकट हास्य केलें, तर उद्यां तीच लेखणी आपलें गतवैभव आणि हल्लींची हीन स्थिति यांची हृदयभेदक तुलना

उपस्थित करून अंतःकरणाला पीळ पाडी. अशा तऱ्हेच्या जिवंत, उद्दीपक रसरसणाऱ्या वाङ्मयामुळें काळपत्राची एक कक्षा ( Magnetic Sphere ) तयार झाली होती. त्यांत सांपडलेल्या वाचकांना मनाचा समतोलपणा टिकविणें कठीण होत असे. पारतंत्र्याच्या जाणिवेनें त्यांचें अंतःकरण प्रक्षुब्ध होई. तरुणांचें रक्त सळसळूं लागे. त्यांचीं डोकीं फिरून-भणाणून जात. काळकर्त्यांचे लेख वाचणारा मनुष्य कोरडा, विकार-हीन व भावना-शून्य असा राहणेंच शक्य नव्हतें. असंतोषाच्या ज्वाला निघणारा तीव्र देशाभिमानाचा हा वणवा दर शुक्रवारीं पेटविला जाई व त्याची लागण साऱ्या महाराष्ट्रभर होत असे!

कारण काळपत्र लोकांना प्रिय आणि तरुणांना प्यार होऊन बसलें होतें. त्याचा खप वाढत वाढत जाऊन १९०४ सालीं तर तो बारा हजारांच्यापुढें गेला. शुक्रवार येतो केव्हां आणि काळ वाचतो केव्हां अशी स्थिति झालेले हजारों वाचक चातकाप्रमाणें अंकाची वाट पहात असत. एवढेंच नव्हे तर पुण्यांत कोनकरांच्या वाड्याच्या बाहेरच्या कट्टयावर शिवरामपंतांनीं या अंकांत काय लिहिलें आहे हें वाचण्यासाठीं आतुर झालेली शेंदीडशें मंडळी तरी पहाटे पांच वाजतां अंक बाहेर पडण्याची वाट पहात बसलेली असत. या मंडळींत भालाकार भोपटकरांसारखे लोकही होते. त्यावेळच्या परिस्थितीमुळें वर्गणीदार होण्याला भिणारे लोक फुटकळ अंक घेऊन वाचीत. काळपत्र वाचण्याचे व त्यांतील लिखाणाची चर्चा करण्याचे अड्डे गांवांत स्थापन झाले होते. १९०८ सालीं तर काळाचे सोळा हजार वर्गणीदार होऊन सुटा खप धरून बावीस हजार प्रती काढाव्या लागत असत. केसरीहून अधिक नसला तरी बरोबरीनें काळ खपत असे, असें म्हणतात. लोकमान्य टिळकांचा 'केसरी' गर्जत असतांना व झेंड्यावर असतांना पांच सात वर्षांतच काळानें इतकी लोकप्रियता संपादन केली, हें शिवरामपंतांच्या लेखनकलेला जनतेनें दिलेलें मोठें शिफारसपत्र होय, त्यांत संशय नाहीं. काळपत्रानें सर्वसामान्य जनतेचें तोंड सरकारकडे फिरलेलें होतें तें वळवून स्वातंत्र्यसन्मुख केलें. एका माणसानें फक्त आपल्या लेखणीच्या साहाय्यानें दहा वर्षांच्या अवधींत लोकांच्या मनोभूमिकेंत जी क्रांति

घडवून आणली व विचाराची दिशाच आजिबात बदलून टाकली, याला मराठी पत्रांच्या इतिहासांत तरी तोड नाहीं. जगांत लेखणीचा प्रभाव केवढा असूं शकतो याचा हा प्रत्यक्ष पुरावाच आहे. लेखणीची बहादुरी व श्रेष्ठत्व अशा प्रकारच्या कामगिरीनेंच प्रस्थापित झालेलें आहे. वेळ आली म्हणजे लेखणीनेंच पुढें तरवारी बनत असतात !

काळवाङ्मयाचा अस्सल व बहुतेक भाग जप्त आहे तोंपर्यंत या विषयाचें अधिक विवरण करणें शक्य नाहीं. कारण हें वाङ्मय नमुना न पाहतां वर्णनानें अनुभवितां येण्यासारखी चीज नाहीं. कॉंग्रेस सरकारनें उदार होऊन दहापैकीं एकच भाग बंधमुक्त केला आहे, त्यावरून त्याची थोडी कल्पना येण्यासारखी आहे. शिवाय पुस्तकाचे शेवटीं जप्त लेखांची यादी माहितीकरितां मुद्दाम जोडली आहे. त्यांवरून नुसती नजर फिरविली असतांही त्यांतल्या विषयांची व्याप्ति, विविधता व वैचित्र्य सहज लक्षांत येणार आहे. लेखांच्या मथळ्यांचा आकर्षकपणा व त्यांवर नजर टाकतांच पराकाष्ठेचें औत्सुक्य उत्पन्न करणारा गुण याबद्दल वेगळें लिहावयास नको.

काळकर्त्यांनीं आपल्या अग्रलेखांवर दिलेला मथळा हा पुष्कळ वेळेला आंत ज्वालाग्राही पदार्थ भरलेल्या पार्सलावर एखाद्या सोंवळ्या व निरुपद्रवी वस्तूचें लेबल चिकटविल्यासारखा भासत असे. दिसायला एक म्हणून पहायला जावें तों आंत 'भलतेंच.' इथून तिथून शब्दांचा आणि अर्थाचा माया-बाजार थाटलेला ! शिवरामपंतांचे या तऱ्हेचे लेख वाचणाऱ्या विरुद्ध पक्षांतील नव्या वाचकाची तर मयसभेंतल्या कौरवांसारखीच अवस्था व्हावयाची. पायरी म्हणून पाय ठेवायला जावें तों साधी जमीन व जमिनीवर पाऊल टाकायला जावें तों पायरीची ठेंच ! ' दगडी कोळशा ' वरचा लेख उघडून पहावें तों आंतल्या कोळशानें प्रतिपक्षाचीं तोंडें काळीं झालेलीं सांपडावीं ! पहिल्या वाक्यांत इंग्रजाची पाठ थोपटलेली आहे असें वाटून पुढें जावें तों शेवटल्या वाक्यांत पाठ जमिनीला लोळवलेली सांपडावयाची ! या सर्वांत लेखनकौशल्याबरोबरच संपादकीय चातुर्यही चांगलें अभिव्यक्त होतें. पण तें सर्व कांहीं एक ' हेतु ' मनांत धरून राष्ट्राच्या उत्थानासाठीं शिवरामपंतांनीं

खर्च केलें, ही त्यांतली विशेष गोष्ट होय. याखेरीज समाज-व्यवस्थेंतलि अन्याय, गरिबांचें रक्तशोषण, संपत्तीची विषम वांटणी इत्यादींबद्दलची सोशॅलिस्ट पद्धतीची विचारसरणी ते काळांतून मांडीत होते त्याचा उहापोह स्वतंत्रपणें करण्याचें ठरविलें आहे. म्हणून काळाच्या सुरवातीच्या पांचसहा वर्षांत शिवरामपंतांनीं इतर कोणते विषय चर्चिले होते तें सांगून व १९०४ सालीं काळावर जें सरकारी गंडांतर येऊं पहात होतें त्याची हकीगत देऊन हें प्रकरण पुरें करूं.

काळाच्या सुरवातीला वैदिक धर्माचें महत्त्व, आपल्यामध्यें असणारे जातिभेद, सुधारक-दुर्धारक कंपूमध्यें म्हणजे आपसांतच पेटलेला कलहवन्हि, ख्रिश्चन मिशनरी लोकांचा हिंदूंना बाटविण्याचा कावा, हे काळकर्त्यांचे प्रथम प्रथम नेहमींचे आवडीचे विषय होते. पतित-परावर्तनावर त्यांचा विशेष कटाक्ष होता. नेमस्त पक्षाची कृतिशून्य तोंडपाटिलकी हाही एक मधूनमधून टीकेचा विषय असे. प्रत्यक्ष हातानें कांहीं झालेलें नसतांना तोंडानें नुसत्या वल्गना करणाऱ्या नेमस्तपक्षीयांना उद्देशून लिहिलेल्या एका अग्रलेखाचा सूचक मथळा खालीं दिल्याप्रमाणें होता—

‘शरदृतूंतील मेघांनो ! तुम्हीं काय केलें आहे म्हणून एवढ्या गर्जना करितां ?’

याखेरीज देशांतील व परदेशांतील रोजचे चालू प्रश्न असतच. पण एकंदरींत काळाचा बेदरकार आणि प्रोत्साहनपर सूर हळूहळू वाढत चालला होता. परराष्ट्रांतील घडामोडी, क्रांत्या, उलथापालथी यांची हिंदुस्थानांतील सद्यःस्थितीशीं अत्यंत कलापूर्ण अशी चमत्कारिक गल्लत करण्याची कांहीं विलक्षण हातोटी शिवरामपंतांना साधून गेली होती.

ता. २ सप्टेंबर १९०४च्या काळाच्या अंकांत त्यांनीं अशाच ‘कदलीदल-न्याया’च्या पद्धतीनें कांहीं स्फुटें लिहिलीं होतीं. आरंभींच्या स्फुटांतून एम्. डी. प्लेहवे या रशियांतील जुलमी प्रधानाचा सोशॅलिस्ट क्रांतिकारकांनीं वध केल्याची हकीगत दिलेली होती. आणि लगेच त्यानंतरच्या स्फुटांमधून कर्झनसाहेबांच्या गुणावगुणांची मालिका दिली होती. पण या दोन विषयांच्यामधील सांधा—

‘येणेंप्रमाणें वरील अध्यायामध्यें एम्. डी. प्लेहवे यांचें आख्यान समाप्त झालें. आतां आपण आपल्या कर्झनसाहेबांच्या आख्यानाकडे

वळूं. येथपर्यंत आपण एम्. डी. प्लेहवे यांचे गुणानुवाद श्रवण केले; आतां लॉर्ड कर्झन यांच्या कीर्तिप्रवादानें आपले कर्ण पवित्र करून घेऊं.'

या वाक्यांनीं जोडलेला होता !

या 'काळां'तील लेखानें मुंबईच्या टाइम्सच्यां नाकाला चांगल्याच मिरच्या झोंबल्या. लगेच टाइम्सकर्त्यांनीं ता. १९ सप्टेंबरच्या टाइम्सच्या अंकांत या लेखाचें व काळांतील चालू वर्षांतील इतर सात लेखांचीं तुटक तुटक व विपर्यस्त भाषांतरें प्रसिद्ध केलीं व त्याच अंकांत दीड कॉलमी अग्रलेख लिहून त्यांत सरकारला काळकर्त्यांवर इलाज करण्याची इशारत दिली. टाइम्सच्या त्या लेखांतील उतारा खालीं दिला आहे :

The article published in the 'Kal' upon September 2nd with its illuminating lessons deduced from the assassination of M. D. Plehve is, as we have said, the most questionble of the series. We are aware that we shall be told that articles expressing something less than sorrow at the murder of the Rusian Minister of Interior, appeared in certain English and American Journals, and that efforts were made in some quarters to trace in the crime a kind of retributive justice which deserved commendation. But we very much doubt whether, in any city in the world except Poona, any journalist had the wicked audacity to commend the assassination as a "noble deed," and then to state that the late and the future head of the Administration under which we lived was responsible for a longer list of grievances than those which the people of Russia are ruputed to have suffered at the hands of De. Plehve. It is true that, as has been the practice throughout these articles, a contradictory qualification is hastily interpolated; but the qualification and the sudden and wholly inconsequent peroration on the subject of Tibet, could hardly mislead the most ignorant of readers. The writer openly avows at the commencement of the article that he has

reproduced the facts about the assassination " because such murders have an educative value. He endeavours to differentiate between " political murders " and " common murders. " He urges that the assassination of " a king as an exalted functionary " is a " laudable object " and " a kind of surgical remedy " intended to " cut off a poisonous part. " Moreover such murders are " perpetrated for the good of the world, " and so on in the same strain. And then by an abrupt transition, we are invited to turn from " This picture of M. De Plehve's oppression " to " Lord Curzon's career, " and to contemplate a list of grievances ......... certainly much longer than M. De Plehves' acts. " The subsequent admission of "the list of lord curzon's virtues" will lead no one astray. What is likely to be the effect upon the minds of the class of readers into whose hands the 'Kal' passes, if articles of this nature, following many others of a questionable character, are allowed to pass unnoticed by those in authority?......But if the state of the law is such that subtly inflammatory and inciting articles of this kind may be printed and circulated in British India without restraint, then, in our belief, the liberty of the press is in this country, is assumming a new and a dangerous character. The artricles we print are merely selections; we believe that the 'Kal' has contained many more in the same strain.........etc.

ता. २ सप्टेंबरच्या अंकांतील लेखाबद्दल वरीलप्रमाणें सरकारास धोक्याची सूचना देऊन टाइम्सकारांनीं एकंदरींत काळांतील लेखांच्या स्वरूपाबद्दल जे उद्गार काढले होते ते पहाण्यासारखे आहेत :

The articles are not without a certain supperficial cleverness. There is an elusiveness about some of them which makes it occasionally difficult to place one's finger upon this phrase or upon that and to deduce direct and clear interpretations therefrom. The author or authors-

there may be a dozen hands at work for ought we know have qualified here, and hastily changed front there, and introduced protestations at the moment when a definite decleration seemed ineminent, in a way that does more credit to their adroitness than to the motives which appear to animate them. But if the articles are read in bulk, if the way in which incendiary tendencies grow plainer in coincidence with chronological sequence is duly noted, if the cumulative impression conveyed by the whole of these articles is dispassionately considered, we think that no sensible man can fail to discern the spirit in which they have been written, or the ideas they were intended to disseminate. The KAL we believe is a journal of some notoriety and considerable circulation. It is not an obscure moffusil sheet, but a paper whose weekly issue is reputed to exceed that of any vernacular journal in the Presidency, save one. What effect may we expect to be produced upon the minds of the thousands who read this publication constantly, if a stream of such screeds is permitted to be circulated with impunity and without intervention ? And, what moreover will be the result upon the minds of the conductors of other of the less reputable native journals, if incitements of the kind we have exposed, are placidly disregarded by Government ? The time seems to have arrived when Government need to be reminded...etc.

त्या काळीं टाइम्समधून हल्ला झाला कीं मागोमाग सरकारी गदा यावयाची असा जणूं काय संकेतच होता. त्यामुळें ही टाइम्समधील टीका म्हणजे काळपत्राच्या दृष्टीनें एक भयसूचक घंटाच होती. या टाइम्स-मधील लेखाच्या आड कोणकोण होते व त्या लेखांत हातचलाखी, खोडसाळपणा व दुष्टपणा किती भरलेला होता हें पुढें स्पष्ट होणारच आहे. परंतु दोनचार वर्षांपूर्वींच ज्या काळपत्राला टाइम्ससारखीं पत्रें 'Rag' 'Sheet' असें संबोधून तुच्छताबुद्धि दाखवीत त्याच काळांतील

लेखांचीं भाषांतरें प्रसिद्ध करून त्यांवर अग्रलेख लिहून त्याची दखल घ्यावी लागली हें ' काळ–माहात्म्य ' लक्षांत घेण्यासारखें आहे. शिवाय कायद्यांत पकडूं पहाणाऱ्याच्या हातून काळकर्त्यांची वक्रोक्ति कशी निसटत असे याचें टाइम्समधील वरील उतारा म्हणजे उत्तम उदाहरण होय. मूळ मराठींतील खरें स्वारस्य आणि रहस्य जरी टाइम्सकारांच्या लक्षांत येणें शक्य नसलें तरी भाषांतरावरूनही त्यांतील लेखनचातुर्य, प्रक्षोभकता आणि त्याचबरोबर भाषेच्या खुबीदारपणामुळें लेखकाला कायद्याच्या कचाटींत धरण्याची अडचण टाइम्सकारांच्या चांगली ध्यानांत आलेली होती. टाइम्स म्हणतो–" काळांतील लेखांतून वरपांगी तरी निदान कौशल्य किंवा खुबीदारपणा दिसून येतो, यांत शंका नाहीं. कांहीं वेळेला तर त्यांत असा कांहीं निसटतेपणा असतो कीं, त्यामुळें अमुक एका शब्दप्रयोगावर किंवा वाक्यावर बोट ठेवून 'हें आक्षेपार्ह' असें म्हणतां येत नाहीं. व त्यांतून अमुक एक स्पष्ट किंवा प्रत्यक्ष ध्वनि निघत आहे असेंही निश्चयानें सांगतां येत नाहीं. ' काळां 'तील लेखक ( टाइम्सकारांची बहुधा काळपत्रांतील लिखाणाचें वैचित्र्य आणि विविधता यांवरून–अशी समजूत झाली होती कीं, काळाच्या संपादक-मंडळांत निदान दहाबारा लेखक तरी असावेत; परंतु वस्तुस्थिति अशी होती कीं, एकटे शिवरामपंतच सर्व संपादकीय मजकूर एकटांकी लिहीत असत. ) लिहितां लिहितां मधेंच अशी कांहीं सफाईदार मुरड घालतो किंवा चटकन् कोलांटी मारून पवित्रा बदलतो; आणि आतां धरतां येण्यासारखें निर्णयात्मक निश्चित असें कांहींतरी विधान ओघानें पुढें येणार असें वाटूं लागावें तोंच तिथें नेमकें कानावर हात ठेवल्यासारखें लिहून मोकळा होतो !...इ० " काळपत्राच्या लेखनसरणीला यापेक्षां मार्मिक आणि चांगलें शिफारसपत्र त्यांच्या अभिमान्यांना आणि चहात्यांना तरी देतां येईल कीं नाहीं याची शंकाच आहे ! पाजळलेल्या हत्याराची धार प्रतिपक्ष्यालाच कळते म्हणतात, तें खोटें नाहीं.

असो. वरील टाइम्समधील टीका प्रसिद्ध झाल्याबरोबर सगळीकडून काहूर उठलें. इतर बहुतेक अँग्लो इंडियन इंग्रजी व देशी वर्तमानपत्रांनीं काळपत्रावर आग पाखडण्यास सुरवात केली व लोकांत काळांतील कडक

लेखांची जाहीर व खासगी रीतीनें चर्चा सुरू झाली. नेमस्त पत्रांनीं टाइम्सची इच्छा व सूर ओळखून " युरोपियन लोकांना बाधक गोष्टी आवडत नसतील तर त्या वेळेस सोडून देणें भाग आहे " अशा अर्थाचा उपदेश केला होता. पण टिळकांनीं या प्रकरणीं केसरीचा सबंध अंक खर्ची घालून **' मराठी आणि इंग्रजी काळ '** या अग्रलेखांत काळकर्त्यांची बाजू जोरानें उचलून धरली. वास्तविक टिळकांची आणि काळकर्त्यांची कांहीं बाबतींत मतभिन्नता होती, व ती टिळकांनीं याच लेखांत पुढीलप्रमाणें नमूदही केली होती.

"रा. परांजपे यांची कांहीं मतें सोशॅलिस्ट मतांप्रमाणें आहेत खरीं; हीं मतें कित्येकांस पसंत होतील, आणि कित्येकांस होणार नाहींत. किंबहुना आम्हांसही त्यांतील कांहीं मतें ग्राह्य नाहींत; पण कोणचीं मतें ग्राह्य आहेत, आणि कोणचीं नाहींत हा प्रश्न आज आमच्यापुढें नाहीं. "

याप्रमाणें सर्वांशीं एकमत नसलें तरी मुद्रणस्वातंत्र्य धोक्यांत आहे आणि आज काळकर्त्यांवर खटला झाला म्हणजे उद्यां इतरांवरही तेंच हत्यार चालविलें जाणार हें टिळकांनीं ओळखलें होतें. आणि म्हणूनच आपल्या आवेशयुक्त लेखनशैलीनें त्यांनीं टाइम्सची कडक शब्दांत हजेरी घेतली होती. भर्तृहरीच्या शब्दांत टाइम्सला ' नृपांगणगत खल ' अशी मार्मिक उपमा देऊन टिळकांनीं खालील जोरदार वाक्यें लिहिलीं होतीं:—

"लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीचें धोरण हिंदुस्थानांतील प्रजेस बिलकुल सुखावह नाहीं, आणि लोक कर्झनशाहीस नाखुष झालेले आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. टाइम्स आणि इंग्रजी अधिकारी कांहींही म्हणोत, आम्ही सरकारास स्पष्टपणें असें कळवितों कीं, कर्झनशाही आमच्या गळ्या-भोंवतालचा गुलामगिरीचा पाश अधिकाधिक दृढ करीत चालली आहे; आणि हिंदुस्थानच्या कारभाराचें हेंच धोरण जर असेंच कायम राहिलें तर हिंडमन किंवा काळकर्ते म्हणतात त्याप्रमाणें परिणामीं ब्रिटिश साम्राज्यास तें अपायकारक झाल्याखेरीज रहाणार नाहीं.........

स्वतंत्र लोकमत काय आहे—मग तें प्रिय असो वा अप्रिय असो—तें सरकारनें समजून घेतलें पाहिजे; आणि तसें झाल्यास हल्लींचें वावटळ हें

केवळ खोडसाळपणाचा परिणाम आहे अशी सरकारची खात्री होईल अशी आम्हांस उमेद आहे."

वरीलप्रमाणें वर्तमानपत्रांतून उलटसुलट टीका येत होत्या. तरी खुद्द काळकर्त्यांनीं या प्रकरणांत बरेच दिवसपर्यंत कांहींच लिहिलें नाहीं. अखेर बराच भडिमार आणि हेतु-विपर्यासही होऊं लागलेला पाहून शिवराम-पंतांनीं ता. ७ ऑक्टोबरच्या काळाच्या अंकांत आपलें 'हृदयाविष्करण' केलें. या पंधरा कॉलमी विस्तृत लेखांत त्यांची विशिष्ट भाषाशैली तर खुललेली दिसतेच. पण यांत त्यांचें मनोगत, वृत्तपत्रांचीं कर्तव्यें, काळाचा हेतु व कामगिरी यांसंबंधींचे त्यांचे विचार आलेले असल्यामुळें त्यांतील कांहीं उतारे देणें अपरिहार्य आहे.

"एम्. डी. व्हेवे यांच्याबद्दलचें स्फुट आणि लॉर्ड कर्झन यांच्याबद्दलचें स्फुट यांची सांखळी एकमेकांत अडकविलेली आहे, या वाळूवर विरुद्ध बाजूनें आपली इमारत रचली आहे. प्रस्तुतचा लेख हृदयाविष्करणाच्या स्वरूपाचा असल्याचें वर एकदां दिग्दर्शन केलें आहे.त्यामुळें पुढील गोष्ट लिहिली असतां ती हृदयाविष्करणामध्यें खपून जाण्याला अडचण पडणार नाहीं.लाहोरच्या कॉंग्रेसच्या वेळीं हल्लींचे न्यायमूर्ति चंदावरकर हे अध्यक्ष होते. कॉंग्रेसच्या अध्यक्षांचें भाषण म्हणजे त्या वर्षामध्यें घडलेल्या एकंदर गोष्टींचें परीक्षण होय. हें परीक्षण अध्यक्ष चंदावरकर यांनीं जें केलें आहे, त्यामध्यें जरी अगदीं भिन्न भिन्न विषय एकापुढें एक आलेले आहेत,तरी ते लोकांपुढें मांडतांना त्यांनीं अशा प्रकारची भाषाशैली उपयोगांत आणलेली आहे कीं, एका विषयामधून दुसरा विषय स्वाभाविकपणेंच उत्पन्न होत चालला आहे, असा श्रोत्यांचा ग्रह होतो. रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूजचे कर्ते मि. स्टेड हे आपल्या मासिक पुस्तकामध्यें "प्रोग्रेस ऑफ दि वर्ल्ड" या सदराखालीं प्रत्येक महिन्याला कांहीं स्फुट लेख लिहीत असतात, त्यांची समजूतही अशीच आहे. प्रत्येक महिन्यांत काय काय विशेष गोष्टी झाल्या आणि काय काय विशेष मतें पुढें आलीं, तीं सगळीं एकत्र करून, केळीच्या एका पानांतून दुसरें पान निघतें त्याप्रमाणें कदलीदलन्यायानें किंवा मालापुष्पन्यायानें एकापुढें एक मांडावयाचा असा स्टेड साहेबांचा बहुतेक परिपाठ असतो. वास्तविक जगाच्या घडामोडींतील भिन्न भिन्न विषय एकमेकांपासून असंबद्धच असतात. परंतु एकाचा शेवट

दुसऱ्याच्या आरंभाला थोड्याशा भाषापद्धतीच्या खुबीनें चिकटवून दिला तर तो प्रकार अधिक गोड दिसतो. व तसाच क्रम काळांतील स्फुट लेखांमध्यें पाळण्यांत येतो. हा क्रम दोन सप्टेंबरच्या अंकाकरितांच स्वीकारलेला होता असें नाहीं. ज्यांना काळाचे दुसरे अंक पाहण्याची सवड झाली असेल किंवा होईल, त्यांना असें आढळून येईल कीं, ही लेखनपद्धति काळांत अनेक प्रसंगीं उपयोगांत आणली गेलेली आहे. जे स्थानिक किंवा क्षुद्र विषय असतील ते सोडून देऊन बाकी प्रत्येक आठवड्यांतील ठळक ठळक गोष्टी आणि मतें होतां होईतोंपर्यंत एकत्र गुंफून त्यांचा सुवासिक गुच्छ आपल्या वाचकांच्या हातामध्यें द्यावा, असा नेहमीं बहुधा काळाचा एक अत्यंत नम्र प्रयत्न असतो.ही गोष्ट निःपक्षपाती न्याय निवडणारांनीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे. बाकी असली मोठमोठ्या लोकांची भाषाशैली आणि लेखनपद्धति आमच्या-सारख्या एखाद्या क्षुद्र आणि Rag या नांवाखालीं मोडणाऱ्या वर्तमानपत्राला उचलण्याचा अधिकार नाहीं व अशी पद्धत उचलणें हाच मुळीं गुन्हा आहे हें आमच्या लक्षांत आहे ! तरी पण एक वस्तुस्थिति पुढें ठेविली आहे. कोणाला रुचल्यास पहावी !

सरकारापाशीं राजद्रोहाच्या कामांत भांडावयाचें कसलें ? रामभाऊंनीं गोविंदरावांचे पैसे फेडले नसले, तर त्याबद्दल रामभाऊंनीं आणि गोविंदरावांनीं आपली तक्रार सरकारापुढें नेणें उचित आहे. पण सरकारच्या विरुद्ध एखाद्यानें राजद्रोह केला कीं नाहीं, याच्या न्यायाकरितां जेव्हां सरकारच्या एखाद्या न्यायाधीशापुढें–म्हणजे अप्रत्यक्ष रीतीनें सरकारच्याच पुढें–जावयाचें असतें, तेव्हां तेथें पुरावा कसला आहे ? आम्हांला हें कबूल आहे कीं, हल्लीं ज्या राजकीय पद्धति जगांत सगळीकडे अस्तित्वांत आहेत, त्या पद्धतीं-प्रमाणें वर दर्शविलेला दोष हा अपरिहार्य आहे. तरी पण तात्त्विक दृष्टीनें विचार करून पाहतां हा दोष आहे हें कोणींही कबूल केलें पाहिजे. अशा स्थितीमध्यें राजद्रोहासारख्या बाबतींत सरकारला आणि लोकांना उभयतां-नाही हेंच श्रेयस्कर आहे कीं, असले वाद उभयपक्षांनीं सलोख्यांनीं मिटवावे. जेथें राजनिष्ठा मुळींच दाखवावयाची नाहीं असें असेल, तेथील गोष्ट वेगळी. अशी वेळ म्हणजे प्रत्यक्ष लढाईचीच वेळ होय. परंतु राजनिष्ठेचें प्रमाण कमी आहे किंवा अधिक पाहिजे, एवढाच जेथें वाद आहे, तेथें तो सामोपचारानेंच

मिटविणें श्रेयस्कर आहे यांत शंका नाहीं. आम्ही आमच्यासंबंधानें हें असें म्हणतों असें नव्हे. आमचें काय ? आम्ही आमच्या ज्या घरांत रहात आहों, तेथून उठून आम्ही सरकार दाखवील त्या घरांत बसूं, व तेथें सुखानें काळ-क्रमणा करूं. कारण, जो परमेश्वर येथें आहे, तो तेथेंही असणारच ! जेथें हिंदुस्थानांत दरवर्षी सुमारें दहा लक्ष लोक कैदेंत जातात, तेथें या वर्षी आणखी एक जास्त जाईल ! याच्यापेक्षां कांहीं मोठासा फरक होईल असें नाहीं. परंतु आम्ही प्रतिपादन करतों, हें तत्त्व जर सरकार लक्षांत घेईल, तर मात्र एक मोठा फरक झाल्यासारखें होईल, यांत शंका नाहीं.

काळानें आज सहा वर्षें यथाशक्ति जी अल्प देशसेवा अत्यंत नम्रपणानें केलेली आहे, तिच्यापेक्षां जास्त देशसेवा आतां वर्तमानपत्राच्या द्वारें विशेष करतां येण्यासारखी आहे असें नाहीं. रूसो–जपानी युद्धाच्या बातम्या आणि स्वदेशांतील आपल्या रोजच्या रडकथा प्रत्येक आठवड्याला गात बसणें म्हणजे खरोखर अतिशय कंटाळवाणें काम आहे. जेथें पांच इंच पाऊस पडला आणि ठाणें जिल्ह्यांत धान्याचे रोपे सहा इंच वाढले आहेत, हेच बहुतेक छापण्या-करितां मुद्रण–स्वातंत्र्य आहे, तेथें तसलें मुद्रण झालें आणि एखादें वर्तमान-पत्र बंद पडलें, म्हणूनही आम्हाला त्यांत मोठीशी फिकीर वाटत नाहीं. काळ हें वर्तमानपत्र चालविण्यामध्यें आमचा एक मुख्य हेतु हा कीं, युरोपिअन भाषांमधून जे कांहीं उत्तमोत्तम विचार आहेत ते आपल्या देशबांधवांना कळावे.........

अन्नाचे आणि पाण्याचे दुष्काळ सरकार दूर करील. परंतु हिंदुस्थानांतील उत्तम विचारांचे दुष्काळ कोणीही साहेब दूर करूं शकणार नाहींत ! असें आपलें पवित्र कर्तव्य दृष्टीपुढें उभें राहूं शकतें.........

काळ हें पत्र यदाकदाचित् बंद पाडलें गेलें, तरी त्यापासून काय होणार आहे ? काळ हें प्रसिद्ध होणारें एक पत्र आहे. परंतु प्रसिद्ध न होणारीं अशीं हिंदुस्थानमध्यें तीस कोटी वर्तमानपत्रें आहेत. त्यांची सरकार काय वाट लावणार ? आम्ही वर्तमानपत्र लिहितों असें मुळींच नाहीं. आम्ही काय करतों, तर हीं तीस कोटी प्रसिद्ध न होणारीं वर्तमानपत्रें प्रत्येक आठवड्याला अत्यंत काळजीपूर्वक रीतीनें आम्ही फक्त वाचून पाहतों, लोकांचे खरे विचार आम्ही खऱ्या शब्दांनीं लिहितों.........

कित्येक मंडळींनीं आम्हांला शिव्या देऊन, काल्पनिक ठरवून, अगर वेडेपणांत ढकलून आमचें संरक्षण करण्याचा आव घातला आहे. परंतु त्यांना आमची एवढीच विनंति आहे कीं, आपल्या शिव्यांनीं आमचें संरक्षण करण्याची अजब युक्ति काढून आपण जी तसदी घेतली आहे, ती आपण विनाकारण घेतली ! कारण असलें संरक्षण काळाला नको आहे.कारण हा Killing with kindness चाच एक प्रकार आहे. तरीपण आमच्या व्यवसायबंधूंनीं प्रस्तुत प्रसंगीं सरकारची जी एक मनीषा तृप्त करून दिली आहे, तिच्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. सरकारचा नियम असा आहे कीं, कोणीही बदमाश आति वाईट मनुष्य झाल्याशिवाय ते त्याला कांहीं एक करीत नाहींत. व कोणी तसा नसेल तर, आधीं ते त्याला तसा करवितात आणि मग त्याबद्दल काय करावयाचें तें करतात. त्याप्रमाणें आपण सर्वांनीं आपल्या एका व्यवसाय-बंधूला वाईट ठरवून सरकारचे हातीं दिलें आहे.व सरकारचें भावी कठीण काम आपण सोपें करून दिलें आहे, ही आपली कामगिरी कांहीं लहानसहान नाहीं. आतां पुढें सरकार कांहीं करो किंवा न करो, आपण आपल्या ऋणांतून पूर्णपणें मोकळे झालां आहां यांत शंका नाहीं ! असें जरी कित्येकांच्या हातून वर्तन झालें आहे, तरी याला अपवादभूत अशींही कित्येक पत्रें आहेत हें कबूल केलें पाहिजे. परंतु आपल्यापैकीं एखाद्या प्रसंगीं कोणीं कसेंही वर्तन केलें तरी तो प्रसंगाचा दोष आहे. वास्तविक पहातां सर्व अंतःकरणें एकच आहेत. ज्या ज्या अंतःकरणामध्यें म्हणून हिंदुस्थानचें हित वास्तव्य करीत आहे, तीं तीं सर्व अंतःकरणें वस्तुतः एकच आहेत !

आतां आम्ही आजपर्यंत काळाच्या द्वारें जीं मतें लोकांपुढें मांडीत आलों, तीं दुसरे वर्तमानपत्रकार प्रसंगीं उचलून धरतील अशा अंदाजावर मांडण्याला आम्ही बिलकुल प्रवृत्त झालों नाहीं. त्या मतांना दुसरें कोणी उघड रीतीनें आधार देवोत किंवा न देवोत; दुसऱ्यांच्या जोराच्या अपेक्षेवर तीं मतें पुढें आलेलीं नाहींत. तीं स्वतःच्या जोरावर पुढें आलेलीं आहेत. तीं सत्याच्या पायावर उभारलेलीं आहेत, आणि खुद्द निसर्गदेवता प्रत्येक अंतः-करणामध्यें त्या मताची जोपासना अत्यंत काळजीपूर्वक रीतीनें

करीत आहे! असलीं हीं आपल्या देशाला परम पावन आणि अत्यंत आवश्यक अशीं सत्य मतें प्रतिपादन करतांना आम्हीं कोणत्याही मानवी साहाय्याची आशा धरलेली नाहीं! या सत्यमतप्रसाराच्या कामीं आमच्यावर लहानमोठीं, बरींवाईट, कोणतींही संकटें आलीं तरी त्यांतून आम्हांला सोडविणारा आमचा परमेश्वर पूर्ण समर्थ आहे! आमचा वकील परमेश्वर! आमची फी परमेश्वर! आमचा जामीन परमेश्वर! आणि आम्हांला संकटांतून सोडविणाराही परमेश्वरच! अशा त्या सर्वशक्तिमान् परमेश्वराचें चिंतन करीत आम्ही हा लेख संपवितों.

वरील हकीगतीवरून काळ पत्राविरुद्ध त्यावेळीं केवढें वावटळ उठलें होतें, याची चांगली कल्पना येते. परंतु काळांत ज्या स्वरूपाचें लिखाण येतें त्याचेविषयीं काळकर्त्यांनीं केलेलें समर्थन आणि हृदयाविष्करण वाचून इसापनीतींतल्या बिगुलवाल्याच्या गोष्टीची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं. रणांगणावर एका पक्षाकडील नेता व बिगुलवाला विरुद्ध बाजूच्या सैनिकांच्या हातीं लागून त्याला त्यांच्या सेनापतीपुढें उभें करण्यांत आलें. तेव्हां भोळेपणाचा आणि नम्रतेचा आव आणून तो बिगुलवाला म्हणतो, "महाराज, मी पूर्ण निरपराधी आहें. कारण मी स्वतः अजून एकालाही मारलेलें नाहीं. मी फक्त लढाई सुरू होण्याच्या आधीं बिगुल वाजविण्याचें काम करीत आहे." यावर अनुभविक सेनापतीनें उत्तर केलें कीं, "म्हणूनच तुला जास्त शिक्षा केली पाहिजे. कारण तूं आपल्या बिगुल वाजवण्यामुळें शेंकडो हजारों सैनिकांच्या अंगांत लढण्याची ईर्षा आणि स्फुरण उत्पन्न करतोस. तुझा गुन्हा लढणाऱ्या सैनिकांपेक्षां शतपटीनें हजारपटीनें भयंकर आहे!" सेनापतीचें हें उत्तर मार्मिक नव्हतें असें कोण म्हणेल?

असो. टाइम्सनेंच म्हटल्याप्रमाणें काळांतील ठेहवेचा लेख कायद्याच्या चौकटींत नीट बसेना म्हणून म्हणा किंवा यावेळीं सरकारला खटला भरणें इष्ट वाटलें नाहीं म्हणून म्हणा, परंतु मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड लॅमिंग्टन यांनीं या लेखावरून काळकर्त्यांवर खटला केला नाहीं एवढी गोष्ट खरी. तूर्त तरी वावटळ शमलें. वारा सुटला होता पण आग भडकली नाहीं.

---

# ७

# राजकीय कार्य व धोरण

" रामदासांची ऐहिक महत्त्वाकांक्षा म्हटली म्हणजे आपला देश परकीयांच्या जुलमापासून स्वतंत्र झालेला आपण पहावा, ही होती. पण ही आपल्या स्वतंत्रतेची इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न झाल्यानंतर त्यांनीं आपल्या सभोंवतालच्या परिस्थितीकडे पाहिलें. त्यावेळीं ती इच्छा परिपूर्ण होण्याचीं साधनें त्यांना कोठेंच दिसेनात, आणि त्यामुळें त्यांची अनेक वेळां निराशा झाली असली पाहिजे. स्वदेशाकरितां स्वतंत्रता मिळवूं इच्छिणाऱ्या देशभक्तांना निराशेचे क्षण कितीतरी वेळां येतात ! आणि रामदासस्वामींचे त्यांच्या ग्रंथांतून जे उद्गार आढळतात, त्यांवरून त्यांच्या मनाचें पृथक्करण केलें असतां त्यांनाही असे निराशेचे क्षण वारंवार प्राप्त होत असले पाहिजेत, असें दिसतें. स्वदेशाला स्वराज्य प्राप्त व्हावें अशी रामदासस्वामींची इच्छा तर खरी. पण ते बिचारे एकटे काय करणार ? ज्यांनीं त्यांच्या देशाला आपल्या जबड्यांत धरलें होतें ते लोक असंख्य, प्रबळ आणि सुसंपन्न, त्यांच्यापुढें या एकट्या स्वदेशभक्तानें काय करावें ? अशा कामाला वास्तविक सर्व लोकांची मदत असली पाहिजे. अर्वाचीन काळांतील सीक्रेट सोसायटीजप्रमाणें आपला एक ' राघवाचा अनंत पथ ' त्यांनीं काढला होता. व स्वातंत्र्यप्राप्तीच्या आणि स्वदेशभक्तीच्या उपदेशाचें काम त्यांनीं सगळीकडे सुरू केलें होतें. " —शि. म. परांजपे

रामदासांच्या शब्दांत स्वराज्यासाठीं प्रार्थना—काळ.

सन १९०४ पर्यन्तच्या हकीकतींचा संगतवार धागा येथवर आला आहे. पण तो येथें कांहीं वेळ तसाच सोडून देणें भाग आहे. कारण, एकापुढें एक घडणाऱ्या घटनांच्या प्रवाहाच्या धारेंत न सांपडतां जरा

थांबून काळांतील लेखनाखेरीज चरित्रनायकाचें प्रत्यक्षकार्य, हालचाली व त्यांतील धोरण हीं पाहिलीं पाहिजेत.

राजकारण हा धकाधकीचा मामला आहे.त्यांत कांहींजणांशीं जूट कांहीं जणांशीं फूट ही चालतेच. पण त्यांत पडणाऱ्याच्या कामगिरीला पुष्कळ बाजूंनीं तोंडें फुटतात व वेगवेगळे पैलू पडूं लागतात.म्हणून या वेगवेगळ्या बाजूंचा स्वतंत्र सदरें पाडूनच विचार केलेला अधिक युक्त व श्रेयस्कर होय.अर्थात् मणी वेगवेगळे दिसले तरी त्यांतून ओंवलेलें ठरीव धोरणाचें व विशिष्ट मतप्रणालीचें सूत्र एकच असतें.राजकारणी व्यक्तीचा स्वभाव,त्यानें मनाशीं ठरविलेलीं मतें, धोरणासंबंधींचे आडाखे आणि कार्यपद्धति या गोष्टींना अनुसरूनच त्यांच्या ओळखी–देळखी, बोलणें–लिहिणें, व्यवहार व प्रत्यक्षकार्य इत्यादि होत असतात हें उघडच आहे. कोणताही राजकीय पुढारी घेतला, तरी पहिल्यानें स्थूलमानानें त्याच्या धोरणाची दिशा समजून घेतल्याशिवाय लोकांतील त्याच्या कार्याची संगति नीट लावितां येत नाहीं. शिवरामपंतांचें धोरण किंवा राजकीय तत्त्वज्ञान काय होतें, हें खालीं दिलेल्या निरनिराळ्या विवेचनांवरून सहज दिसून येणार आहे. धोरणाप्रमाणें व्यवहार असतो, व व्यवहारांत धोरणाचा धागा अनुस्यूत झालेला असतो. शिवरामपन्तांचा इतर पुढाऱ्यांशीं व संस्थांशीं जो संबंध आला त्याच्या हकीकती खालीं दिल्या आहेत. त्यांच्या अनुषंगानें त्यांतल्या धोरणाचें सूत्र आपोआपच स्पष्ट होत जाणार आहे.

## (१) टिळक व परांजपे

केसरी व काळ, अर्थात् त्यांचे सम्पादक टिळक व परांजपे, ही जोडी त्या काळांत अग्रेसर होती. टिळक-परांजपे हे महाराष्ट्राचे पुढारी समजले जात असत. पण त्यांतल्या त्यांत तरुणवर्ग आमचे पुढारी परांजपे असें मानीत असे. परांजपे, टिळकांचे उघड शिष्य व अनुयायी म्हणवीत असत. व दोघांचा पक्षही एकच असून दोघांचींही राजकीय मतें एकमेकांशीं सर्वसाधारणपणें जुळणारीं होतीं, हेंही तितकेंच खरें आहे. परन्तु स्वातंत्र्यप्राप्तीच्या उपाययोजनेच्या बाबतींत उभयतांचे मतांत पुष्कळ अन्तर होतें. अर्थात् हा मतभेद टिळकांपासून किंवा त्यांच्या पक्षापासून फुटून निघण्यापर्यन्त शिवरामपन्तांनीं केव्हांच ताणला नाहीं. उलट

टिळकांच्या कर्तृत्वावर त्यांचा पूर्ण विश्वास असल्यामुळें ते आंखतील त्या धोरणाला पाठिंबा देण्याचें व उचलून धरण्याचेंच शिवरामपन्तांचेंही धोरण असे. उलटपक्षीं टिळकांनाही त्यांच्या अंगीं असलेल्या गुणांची जरूर लागत असे. शिवरामपन्त टिळकांना येऊन मिळाले असले तरी त्यांच्यांत मिसळलेले नव्हते हा त्यांतला खरा मुद्दा आहे. कारण शिवरामपन्तांचा मनापासून सनदशीर चळवळीवर विश्वास नव्हता. देशाचें स्वातंत्र्य कमाविणें असल्यास गुप्तसंस्थांचें जाळें विणून दहशतवादाचा अवलम्ब केल्याशिवाय प्रगति होणें शक्य नाहीं, असें त्यांचें मत बनलेलें होतें. राज्यकर्ते सुखासुखीं अगर सभा-परिषदादि चळवळींनीं भिऊन प्रजेला हक्कदान करीत नसतात. तुमच्यांत पात्रता नाहीं, तुम्ही मागासलेले आहांत, तुमच्यांत ऐक्य नाहीं, इत्यादि राज्यकर्त्यांनीं पुढें केलेल्या सबबी पोकळ व कालहरण करण्यासाठीं योजलेल्या असतात; व म्हणून राजकारणांत सौजन्य, कोणाच्याही भलेपणावर विश्वास व कितीही नेटानें जाहीर स्वरूपाची चळवळ करून राज्यकर्त्यांच्या मागें लावलेला भुंगा, यांचा परिणाम भिंतीवर धडका घेतल्याप्रमाणेंच व्हावयाचा, असा बोध इतिहासवाचनापासून त्यांना झाला होता. व यावरून नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं या तत्त्वावर देशाचें राजकीय धोरण व मार्ग आखले जावे असें त्याचें म्हणणें असे. सशस्त्रतेशिवाय स्वातंत्र्य मिळावयाचें नाहीं असा त्यांचा सिद्धान्त होता, हें मागें सांगितलेंच आहे. अर्थात् हें सर्व तत्त्वज्ञान चूक होतें कीं बरोबर होतें हा प्रश्न येथें प्रस्तुत नाहीं. इतिहास तेवढाच येथें सांगावयाचा आहे व त्या दृष्टीनेंच चरित्रनायकाचीं त्या काळीं कोणत्या प्रकारचीं मतें होतीं हें या ठिकाणीं दिग्दर्शित करण्यांत येत आहे. बाहेरून, परकीय राज्यामुळें प्रजेला भोगावीं लागणारीं दुःखें, हाल—अपेष्टा, विपत्ति इत्यादि अरिष्टें समजावून सांगून जनतेला जागृत व प्रक्षोभित करावें, संघशक्तीच्या व जागृतीच्या जोरावर Passive Resistance नें म्हणजे संप घडवून आणून—मग ते कामगारांत असोत, सरकारी नोकरापोलिसांतले असोत अगर आणखी कोणांतले असोत—राज्ययंत्र अडवावें अगर खिळखिळें करावें, आणि शिवाय आंतून या सर्वांला उग्रबलोपासक चळवळीची जोड

असावी असा राजकीय चळवळीबद्दलचा आराखडा त्यांनी मनाशीं बसविलेला होता. अशा रीतीनें 'इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि' अशा प्रकारचें आंतून बाहेरून दुधारी धोरण त्यांना अभिप्रेत होतें. हें शिवरामपन्तांचें मत पाहिलें म्हणजे टिळकांशीं त्यांचा मतभेद कोणत्या बाबतींत असेल हें सहज ताडतां येण्यासारखें आहे. तेजस्वीपणांत टिळक कमी होते असांतला मुळींच भाग नाहीं. परंतु ते अधिक व्यवहारी, विचारी व व्यापक बुद्धीचे समजले जात. ज्या मानानें जनतेची तयारी असेल तितक्याच मानानें त्यांचें पाऊल पुढें पडत असे. इंग्लंडांत वा पार्लमेंटांतल्या करावयाच्या प्रचार-कार्यापासून पैसाफंडापर्यंत सर्व तऱ्हेच्या चळवळींचा समावेश टिळकांच्या राजकारणांत होत असे. वेळ अनुकूल दिसली तर मी बंड करीन ही भाषा त्यांनीं ब्रुइनसाहेबाच्या तोंडावर सांगितल्याचें प्रसिद्धच आहे. या विषयावरील मतांसंबंधींची शिवरामपन्तांची एक आठवण नागपूरचे प्रो. ना. के. बेहरे यांनीं दिलेली उपलब्ध आहे.

> "पुढें अण्णासाहेबांची (शिवरामपन्तांची) गांठ पडली तेव्हां या-संबंधीं बोलणें झालें. ते म्हणाले, टिळक उत्तम गणिती आहेत. सशस्त्र बंडाला यश मिळण्याचा शेंकडा पन्नास टक्के संभव असला तरी उरलेल्या पन्नास टक्क्यांचा भार ईश्वरावर टाकून त्या कार्यांत मी पुढाकार घेईन, असें ते म्हणत असतात. पण अशा हिशेबी गणितानें जगांत आजपर्यन्त क्रान्त्या घडून आल्या नाहींत. उत्कट भावना असेल तरच क्रान्ति घडून येईल. क्रान्तिकारकाला हिशेबी होऊन परवडत नाहीं."

हाच नेमका दोघांतला फरक आणि तो बेहऱ्यांशीं बोलतांना खुद्द शिवरामपन्तांच्याच शब्दांत उत्तम रीतीनें प्रकट झालेला आहे. असो. एवढा मतभेद सोडला तर बाकीच्या बाबतींत दोघांचें सर्वसाधारणपणें मतैक्यच होतें, हें वर सांगितलेंच आहे. चालू राजकारणांत मवाळ पक्षाच्या विरुद्ध हे दोघेही एकच असत. टिळकांबद्दल शिवरामपन्तांना पराकाष्ठेची आदरबुद्धि होती. व उलट टिळकांचे मनांत त्यांचेबद्दल अत्यन्त प्रेम व आपलेपणा वसत होता. शिवरामपन्तांवरील खटल्याचे वेळीं टिळक वडील भावाप्रमाणें त्यांच्या मागें उभे राहिले, ही हकीगत पुढें ओघानें येणारच आहे. परांजपे १९०५ मध्यें नाशकास गणपत्युत्सवा-मध्यें व्याख्यान देण्याकरितां गेले होते, त्या वेळीं त्यांना एक मानपत्र

देण्यांत आलें. पण त्या मानपत्राचा स्वीकार न करितां तो गौरव आपले गुरुवर्य लो. टिळक यांच्या चरणीं त्यांनीं अर्पण केला! उलट १९०६ सालच्या टिळकांच्या बेळगांव जिल्ह्यांतील दौऱ्यांत परांजपेही त्यांचें बरोबर होते. परन्तु परांजपे टिळकांसमवेत येतीलच असें निश्चित माहीत नसल्यामुळें बैलहोंगलच्या नागरिकांनीं लोकमान्यांनाच एक मानपत्र देण्याचें ठरविलें होतें. सभेपूर्वीं मानपत्राची नक्कल गंगाधरराव देशपांड्यांनीं लोकमान्यांना दाखवितांच 'मला एकट्यालाच मानपत्र आहे कीं काय?' असें त्यांनीं विचारलें. लागलींच उणीव भरून काढण्यांत आली व मानपत्र दोघांनाही दिलें गेलें! याप्रमाणें परांजपे हे टिळकांच्या विश्वासांतले, बैठकींतले व त्यांच्या कार्याला पूरक पोषक असे होते. तथापि त्यांनीं स्वत्व सांडिलेलें नव्हतें. परांजप्यांचीं मतें स्वयंभू, स्वयंप्रकाशित होतीं. परांजपे टिळकांच्या विश्वासाच्या पंचायतनापैकीं खरे, पण ते टिळक-विकसित कमळांपैकीं नव्हत. तर टिळकांप्रमाणेंच कमळें विकसित करणारे ते एक स्वतंत्र तेजोगोल होते. गंगा-यमुनांचे प्रवाह सम्मीलित होऊन समुद्राला मिळण्याकरितां एकाच दिशेनें व एकत्र वहात जातात पण त्यांचें पाणी एकमेकांत मिसळत नाहीं, त्याप्रमाणेंच या दोघांच्या कार्याची व संगतीची स्थिति होती. तत्त्व मान्य, तपशिलांत थोडथोडा फरक!

## (२) परांजपे–सावरकर

वरच्या सदरांतील टिळक व परांजपे या गुरुशिष्यांच्या जोडीपेक्षां गुरुशिष्यांची प्रस्तुत जोडी वेगळ्या प्रकारची होती. या जोडींत गुरुशिष्य समरस होऊन त्यांची पूर्णांशानें जोड बसल्याचें दिसून येतें. सावरकर परांजप्यांचे शिष्य उघडपणें म्हणवितात व तसें समजलेंही जातें. सावरकर-चरित्रांत शि. ल. करंदीकर म्हणतात—

> "यापुढें तात्या ( सावरकर ) काळ पत्राचें परिशीलन सतत करीत राहिले आणि काळाच्या भाषासरणीचा व विचारसरणीचा तात्यांच्या मनाच्या उत्क्रान्तीवर पुष्कळच परिणाम झाला. तात्यांच्या क्रान्तिकारक जीवनांतील कृतिविषयक भागाचें गुरुत्व काळपत्राकडे जातें कीं नाहीं हा प्रश्न वादग्रस्त असला तरी, त्यांच्या क्रान्तिकारक जीवनाच्या वैचारिक स्फूर्तीचें गुरुत्व काळ पत्र व त्याचे सम्पादक कै. प्रो. अण्णासाहेब परांजपे यांजकडे जातें, ही गोष्ट मान्य केली पाहिजे."

शिवरामपन्तांची गांठ पडण्यापूर्वी त्यांच्या काळपत्राशींच सावरकरांची प्रथम गांठ पडली. नाशकास शाळेंत शिकत असतां एका वक्तृत्वस्पर्धेमध्यें सावरकरांचा पहिला नंबर आला म्हणून त्या समारंभाच्या चालकांनीं सावरकरांना बक्षिसादाखल काळपत्र एक वर्षपर्यंत देण्याचें ठरविलें, ह्या योगायोगानें त्यांचा काळाशीं जो संबंध आला तो पुढें वाढतच गेला. ह्याच सुमारास मागील प्रकरणांत उल्लेखिलेला 'चाफेकर आणि रानडे,' हा सम्पादकीय लेख काळांत प्रसिद्ध झाला होता. या लेखाचा त्यांच्या मनावर अतिशय खोल परिणाम झाला होता. त्याच वेळीं म्हसकर व पागे हे दोन महत्त्वाकांक्षी व तरतरीत तरुण नाशिकांत होते. हे दोघेहीं सरकारी नोकरींत असले तरी आंतून त्यांचा ओढा देशकार्य करण्याकडे होता. या दोघांचे लेख 'M. P.' या टोपण नांवाखालीं काळपत्रांत प्रसिद्ध होत असत—

"म्हसकर व तात्या ( सावरकर ) यांच्या दरम्यान गुप्तमण्डळाच्या स्थापनेबद्दलची चर्चा जोरांत सुरू झाली, तो काळ म्हणजे १८९९ चा आक्टोबर नोव्हेंबर महिना होय. म्हसकर व पागे हे दोघेही केसरीच्या राजकीय कार्यपद्धतीचा पुरस्कार करणारे होते; पण त्यांच्या मनाचा सगळा ओढा काळकर्ते प्रो. परांजपे यांच्या निर्भेळ स्वातन्त्र्यवादाकडे होता........म्हसकर व तात्या यांचीं जीं सम्भाषणें चालत त्यांत खण्ड पडलेला नव्हताच. गुप्तमण्डळाच्या स्थापनेला कांहीं तरी निमित्तानें दिवसगत व्हावी म्हणून म्हसकर असें सुचवूं लागले कीं, या गुप्तमण्डळाची स्थापना, वाढ, कार्यक्रम वगैरे सर्वच गोष्टी काळकर्ते परांजपे यांच्या पूर्वसम्मतीवर अवलम्बून ठेवाव्या ! गुप्त संस्था काढून सशस्त्र क्रान्तीचा मार्ग चोखाळण्याच्या बाबतींत तात्या तर निश्चयी बनलेले होते ! शेवटीं वाटाघाटी होऊन तडजोड म्हणून असें ठरलें कीं, गुप्तमण्डळ स्थापावयाचें; पण काळकर्त्यांचा अभिप्राय हातीं येईपर्यंत मण्डळांत आणखी कोणाला घ्यावयाचें नाहीं व त्यांच्या अनुमती-शिवाय कोणतेंही क्रांतिकारक कृत्य करावयाचें नाहीं. असें ठरल्यावर १८९९ च्या नोव्हेंबर अखेर म्हसकरांनीं शपथ घेतली व दोघातिघां-चेंच गुप्तमण्डळ प्रथम स्थापण्यांत आलें. परांजपे काय म्हणतात तें

कळेपर्यंत बाबांनाही या बाबतींत कांहीं कळवावयाचें नाहीं, असें ठरलें. या गुप्तमण्डळाचें पहिलें नांव " राष्ट्रभक्तसमूह " हें होतें व तें म्हसकरांनीं सुचविलें होतें. "

याच राष्ट्रभक्तसमूहाची 'मित्रमेळा' ही उजळ माथ्यानें काम करणारी शाखा निघाली व नंतर त्यांतूनच पुढें 'अभिनव-भारत' या सावरकरांच्या प्रसिद्ध गुप्तसंस्थेचा जन्म झाला. असो. परंतु या सुमारास प्रो. परांजपे नाशिकला जाऊं शकले नाहींत. व त्यामुळें त्यांच्या आगमनावर अवलम्बून असलेल्या बऱ्याच भानगडी जागच्या जागींच जिरल्या !

या सुमारास सावरकर मॅट्रिकचे वर्गांत होते. पास झाल्यावर त्यांचें उच्च शिक्षण चालू राहावें या हेतूनें त्यांचे मित्र म्हसकर यांनीं प्रो. परांजपे यांस एक पत्र लिहिलें. व उच्च शिक्षण पदरांत पडावें याकरितां कम्पॉझिटरपासून लेखकापर्यंत कोणतेंही काम करण्याची आपली तयारी आहे असें खुद्द सावरकरांनीं परांजप्यांस कळविलें होतें. परंतु त्यांच्या श्वशुरांनीं त्यांस आर्थिक मदत केल्यामुळें तशी जरूर पडली नाहीं. १९०२ मध्यें तात्या सावरकर पुण्यास येऊन फर्ग्युसन कॉलेजांत दाखल झाल्यावर थोड्याच दिवसांत म्हसकरांच्या मार्फत त्यांची व काळकर्त्यांची ओळख झाली. काळकर्त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव कृष्णाजीपन्त हे त्यावेळीं त्याच कॉलेजांत शिकत असल्यानें त्यांचा व सावरकरांचाही स्नेह जमला होता. त्यामुळें लौकरच कोनकरांच्या वाड्यांत परांजप्यांचे घरीं सावरकरांचें येणेंजाणें सुरू झालें. तात्यांसारखा चलाख, बुद्धिमान्, महत्त्वाकांक्षी तरुण आणि अंतःकरणापासून तळमळणारा तीव्र भावनाप्रधान वाणीलेखणीचा शिवरामपन्तांसारखा देशभक्त, यांचा मेळ बसून उभयतांचें लौकरच रहस्य जमलें. या अवधींत, सावरकर कोनकरांच्या वाड्यांत नित्य येऊं लागले. व सणसुट्टी असल्यास जेवावयासही रहात. अशा प्रसंगीं भोजनोत्तर उभयतांमध्यें कोणत्या प्रकारच्या विषयांची भवति न भवति चालत असेल याची कल्पना, परांजपे व सावरकर यांचें चरित्र माहीत असणारांना न सांगतांही येण्यासारखी आहे. शिवरामपन्तांचा स्वभाव इतका खोल असे कीं, साध्या किंवा दाट ओळखीच्या स्नेह्यापाशींसुद्धां, तो विश्वासयोग्य आहे, अशी खात्री पटल्याखेरीज ते आपलें अन्तरंग

कधींच उघडें करून दाखवीत नसत. परन्तु ज्या कार्यांची कळकळ शिवरामपन्तांना तेंच कार्य करण्याची उभारी सावरकरांना, अशी सांगड जमल्यामुळें वरीलप्रमाणें दोघांच्या मसलती किंवा खलबतें वारंवार चालत असत. याच सुमारास म्हणजे स. १९०२ पासून पुढें सावरकरांच्या कविता 'काळांत' प्रसिद्ध होऊं लागल्या. ह्यांपैकीं एक उत्तम कविता 'विश्वांत आजवरि शाश्वत काय झालें ?' ही, काळावरच्या 'सर्वे यस्य-वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः' या श्लोकांतील कल्पनेवरच आधारलेली आहे.

पुढें १९०५ चा गणेशोत्सव आला. नाशिककरांची शिवरामपन्तांना नाशकास नेण्याची मनीषा पुष्कळ दिवसांपासून अतृप्त राहिली होती. या वेळीं प्रो. परांजपे हे आपल्या स्वातंत्र्यप्रवण आणि मोहक अशा लेखनानें व वक्तृत्वानें विलक्षण लोकप्रिय झाले होते. सावरकरप्रभृति नाशकाच्या अभिनवभारताच्या मण्डळींनीं या वर्षींच्या गणेशोत्सवांत परांजप्यांना नाशिकला नेण्याचें ठरविलें. या गणेशोत्सवांत परांजपे यांचा मुक्काम नाशिक येथें फक्त दोनच दिवस होता; पण या दोन दिवसांत प्रवचनें व व्याख्यानें मिळून त्यांचे सहा कार्यक्रम झाले. प्रत्येक कार्यक्रम 'प्रतिपच्चन्द्र-लेखेव वर्धिष्णु' असाच झाला व परांजपे यांची नाशिकच्या तरुणांवर पुरी छाप बसली. परांजपे यांच्या या मुक्कामांत अभिनवभारताच्या गणेशोत्सवातर्फे त्यांना मानपत्र अर्पण करण्यांत आलें.या मानपत्र समर्पण-प्रसंगीं कवि गोविंद यांचीं पदें म्हणण्यांत आलीं. या प्रसंगीं मुख्य भाषण सावरकरांचें झालें व प्रो. परांजपे यांना मानपत्र अर्पण करण्याचें कामही सावरकर यांचेवरच सोंपविण्यांत आलें होतें. वंगभंगाची चळवळ सुरू होऊन स्वदेशी व बहिष्काराचें आन्दोलन सुरू झालें होतें. त्याला चांगला जोर चढत चालला होता. या चळवळीला पुण्यांतील विद्यार्थ्यांची सहानुभूति प्रकट करण्याकारितां ता. १।१०।१९०५ रोजीं सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षते-खालीं विदेशी मालावरील बहिष्काराला ठसठशीत स्वरूप यावें म्हणून विदेशी कपड्यांची होळी करण्यांत यावी ही कल्पना सावरकरांनीं आपल्या भाषणांत सांगितली. काळकर्ते प्रो. परांजपे हे या सभेला उपस्थित होते.

त्यांनीं आपल्या भाषणांत विद्यार्थ्यांचें अभिनन्दन केलें व विलायती कपड्यांची होळी करण्याच्या कल्पनेचा पुरस्कार केला. सभा संपल्यावर सभाध्यक्ष केळकरांनीं सावरकरप्रभृति विद्यार्थ्यांना बाजूला बोलावून घेतलें. परदेशी कपड्यांची होळी करून ते फुकट घालविण्यापेक्षां ते गोळा करून अंध, पंगु, रोगग्रस्त अशा बांधवांना वांटून टाकणें श्रेयस्कर होय असा विचार त्यांनीं त्या तरुणांपुढें मांडला!

या सुमारासच महाराष्ट्र-विद्यालय नांवाची भोपटकर बंधूंनीं चालविलेली राष्ट्रीय धोरणाची एक शाळा पुण्यांत पांजरपोळाजवळ होती. दसऱ्याचा म्हणजे सीमोल्लंघनाचा दिवस या होळीसाठीं निश्चित करण्यांत आला होता. त्या दिवशीं सायंकाळीं गाडीभर कपडे जमवून वाद्यें लावून नागरिकांच्या जमावांत जी थाटाची मिरवणूक निघाली ती वरील शाळेंतून, असें भालाकार भोपटकर सांगतात. त्यावेळच्या वर्तमानपत्रांतील उल्लेखांवरूनही तेंच दिसून येतें. स्वतः भालाकार भोपटकर, टिळक व परांजपे या मिरवणुकींत सामील होते. लकडीपुलापलीकडे होळी पेटविल्यानंतर लोकांच्या जमलेल्या प्रचंड गर्दीपुढें लोकमान्य टिळकांचें व्याख्यान फार तेजस्वी असें झालें. पण त्यानंतर 'शिवरामपन्त,' 'शिवरामपन्त परांजपे,' अशा आवाहनपर आरोळ्या लोकसमूहांतून उठूं लागल्यामुळें, शिवरामपन्तांना बोलावयास उठणें भाग झालें. एकदां उभें राहिल्यावर परांजप्यांनीं या प्रसंगीं वक्तृत्वाची अगदीं कमालच करून सोडली. आपल्या भाषणाचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर कायमचा व ठसठशीत व्हावा म्हणून कपड्यांच्या जळत्या ढिगांतला न पेटलेला एक कोट काढून त्यांनीं तो लोकांपुढें धरला; आणि त्या कोटाच्या खिशांची झडती घेतल्यासारखें करीत व्यापाराच्या मिषानें खिसे भरभरून हिंदुस्थानची सम्पत्ति लुटून नेणाऱ्या इंग्रजांची त्यांनीं हजेरी घेतली! हा पातकी कोट मी अग्निसमर्पण करतों, असें निर्णयात्मक वाक्य शेवटीं बोलून तो कोट त्यांनीं धगधगलेल्या होळींत फेंकून दिला! अशा रीतीनें टिळकांचें व परांजप्यांचें भाषण आटोपलें, त्यावेळीं रात्रीं नवाचा सुमार झाला होता. तथापि या बाबतींत केळकरांचें म्हणणें वेगळेंच आहे. टिळक-चरित्रांत ते लिहितात—

"प्रत्यक्ष होळी करण्याच्या बाबतींत टिळकांपेक्षां शिवराम महादेव परांजपे यांच्यावरच विद्यार्थ्यांची अधिक भिस्त होती. कारण प्रत्यक्ष होळी केलीच पाहिजे असें टिळकांचें मत नव्हतें. टिळक व त्यांचे अनुयायी, आणि परांजपे व त्यांचे अनुयायी, या दोघांतील मतांचा व धोरणांचा फरक पूर्वी जो गूढ होता, तो या चळवळींत किंबहुना या होळीपासून प्रकट होऊं लागला."

टिळकांचा स्वभाव लक्ष्यांत घेता ते होळीच्या कल्पनेला विरुद्ध असते, तर ते तसें खडखडीत बोलून दाखविते व त्यांत सामीलही होते ना. तथापि त्यांच्या मनांतून नापसंती होती, असें गृहीत धरलें तरी सुद्धां तरुणांचें किंवा इतरांचें मनोगत ओळखून कां होईना, ते मिरवणुकींत सामील होऊन त्यांनीं भाषणही केलें, ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. या होळीच्या प्रसंगानें टिळक-परांजप्यांतला भेद, लोकांना काय दिसला असेल तो असो, पण या लहानशा प्रसंगानें या तीनचार पुढाऱ्यांचे वेगवेगळे स्वभावविशेष व मतवैचित्र्य चांगलें दिसून येण्यासारखें आहे, एवढी मात्र गोष्ट खरी.

ही बारीकशी होळी, पण पुण्यांत गाजली. तिचा सावरकरांपुरता परिणाम असा झाला कीं, त्यावेळचे फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल, रँग्लर परांजपे यांनीं त्यांना दहा रुपये दंड केला. ह्याचा निषेध करतांना काळकर्त्यांनीं आपल्या नेहमींच्या चमत्कारपूर्ण पद्धतीनें काळांत खालील स्फुट लिहिलें.

"देशबन्धु सावरकर यांस देशभक्तिबद्दल दहा रुपये दण्ड, कॉलेजांतील अधिकाऱ्यांकडून झाल्याची बातमी पूर्वीच प्रसिद्ध झाली आहे. देशभक्तीसाठीं दण्ड होण्याची पाळी यावी आणि तीही हिंदुस्थांतच जन्मलेल्या एका मनुष्याकडून दुसऱ्यावर यावी, ही खरोखरच शोचनीय गोष्ट आहे. व अशी जी व्यवस्था हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं सर्व कामांत होत आहे त्यांतच इङ्ग्लिशांचें कौशल्य, कौटिल्य, आणि सामर्थ्य आहे. लोकांच्या पैशावर चालविलेल्या संस्थांनीं तरी निदान लोकमताची पायमल्ली करणें श्रेयस्कर नाहीं. असो. देशबन्धु सावरकर हे प्रस्तुतच्या कामांत किती निर्दोष आहेत, हें त्यांच्याबद्दल त्यांच्या सहाध्यायी देशबन्धूंनीं जी सहानुभूति दाखविली आहे तिजवरून व्यक्त होत आहे. दे. सावरकर यांच्या दण्डाची रकम त्यांच्याच बेचाळीस

विद्यार्थीवंधूंनीं वर्गणीनें त्यांना गोळा करून दिली. परन्तु सावरकरांनीं स्वतःच्या उपयोगाकरितां न घेतां तिचा विनियोग त्यांनीं दुसरीकडे केला आहे. ”

शिवाय दि. १६।१०।१९०५ रोजीं सार्वजानिक सभेच्या दिवाणखान्यांत काळकर्ते प्रो. शि. म. परांजपे यांचे अध्यक्षतेखालीं पुण्यांतील विद्यार्थ्यांची चौथी जाहीर सभा झाली. सभेंत विद्यार्थिवर्गानें वर्गणी करून सावरकरांचा दंड भरला, याबद्दल विद्यार्थ्यांचें अभिनन्दन करण्यांत आलें.

हें प्रकरण येथेंच संपल्यानंतर पुढल्याच वर्षांत सावरकर बी. ए. झाले. व त्याचें इंग्लंडला 'शिक्षणा'साठीं जावयाचें ठरलें. त्याकरितां इंग्लंडांत रहाणारे पंडित श्यामजी कृष्णवर्मा यांजकडून त्यांना शिष्यवृत्ति मिळावी म्हणून टिळक-परांजप्यांनीं खटपट केली व त्या कामीं जरूर तीं हवीं असणारीं दोन शिफारसपत्रें या दोघांनींच दिलीं होतीं. ता. ९ जून १९०६ रोजीं सावरकरांनीं इंग्लंडला निघणाऱ्या पर्शिया बोटींत पाय ठेवला. त्यासाठीं कांहीं दिवसांपूर्वींच मुंबईला जाण्याकरितां त्यांनीं पुणें सोडलें होतें. पुणें सोडल्याच्या आदल्या रात्रीं त्यांचा मुक्काम शिवरामपन्तांकडे होता. पिठासारखें शुभ्र चांदणें पडलेल्या त्या रात्रीं दोघांचें काय संभाषण झालें असेल तें त्या दोघांनाच माहीत! रात्र सरली पण बोलणीं सरलीं नाहींत. अखेर जड अन्तःकरणानें पण उत्साहानें सावरकरांनीं अण्णांचा निरोप व आशीर्वाद घेतला व ते निघाले! या भेटीनंतर दोघांची गांठ आणखी सतरा वर्षांत पडणार नाहीं असें दोघांपैकीं कोणालाच त्यावेळीं वाटलें नसेल!

यानंतर सावरकरांनीं इंग्लंडांत काय केलें याचा इतिहास प्रसिद्धच आहे. तेथें त्यांनीं लिहिलेलें मॅझिनीचें चरित्र त्यांनीं लोकमान्य टिळक व लोकमान्य परांजपे यांना अर्पण केलें होतें. त्याचप्रमाणें इंग्लंडांत गेल्यापासून सावरकर तेथून त्यांचीं प्रसिद्ध 'लंडनचीं बातमीपत्रें' काळासाठीं धाडीत असत व हा क्रम सन १९०९ अखेर त्यांना अटक होईपर्यंत चालू राहिला होता. पुढें सावरकरांना इंग्लंडांत अटक झाली व त्यांना 'मोरिआ' बोटीनें हिंदुस्थानांत आणीत असतांना झुकांडी देऊन निसटून जाण्याचा त्यांचा प्रयत्न अयशस्वी झाला, त्यांना मार्सेल्स

बंदरांत पुनः पकडण्यांत आलें व त्यांना जन्मठेपीची शिक्षा सुनावण्यांत आली, इत्यादि हकीकती प्रसिद्ध आहेत. यानंतर बारा वर्षें अंदमानांत काढल्यावर सन १९२१ मध्यें अलीपूर व मग येरवड्याच्या तुरुंगांत आणण्यांत आलें. याच सुमारास शिवरामपन्त मुळशीसत्याग्रहांत झालेली सहा महिन्यांची शिक्षा भोगण्याकरतां येरवड्याच्या तुरुंगांत आले होते. त्यावेळीं दोघांनाही एकमेकांला पाहून काय वाटलें असेल! सन १९०५ नंतर १९२२ मध्यें गांठभेट! तीही तुरुंगांत कैद्यांच्या वेषांत! दोन भेटींत सतरा वर्षांचें—नव्हे जमीन-अस्मानाचें अन्तर पडलेलें होतें. पूर्वीच्या भेटीचे वेळीं दोघेही मनानें व शरीरानें स्वैरसंचार करण्याला मोकळे होते. आतां शृंखला पडलेल्या होत्या! ज्या सरकारी 'लीले'नें प्रथम या दोन तळमळणाऱ्या अंतःकरणांची गांठ घालून दिली होती त्याच सरकारी लीलेनें आतां या दोन देशभक्तांना फिरून एकत्र आणलें होतें. दैवाची अनुकूलता लाभली व वेळ आली म्हणजे ज्या देशभक्तांच्या गांठी स्वराज्याच्या स्वतंत्र वातावरणांत पडाव्यात, त्यांच्याच भेटी काळ विपरीत असला म्हणजे तुरुंगांत पडत असतात. आपआपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं जगांत आजपर्यंत किती देशभक्तांना अशा हालअपेष्टा भोगाव्या लागल्या असतील, त्याची गणतीही करणें शक्य नाहीं!

सावरकरांची मुक्तता व्हावी म्हणून शिवरामपन्त वारंवार प्रसंगोपात्त भाषणें करीत व लिहीतही असत. गेल्या महायुद्धाच्या अखेर राजबंदींची मुक्तता व्हावी याकरितां जोराची खटपट झाली. त्यावेळीं दिनांक ११।११।१९१९ रोजीं सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत मुक्ततेच्या मागणीचा पुरस्कार करण्याकरितां नागरिकांची सभा झाली होती. त्या प्रसंगीं शिवरामपन्तांच्या भाषणांत त्यांच्या अन्तःकरणांतली भावना पुढील-प्रमाणें व्यक्त झाली:—

"या विजयोत्सवप्रसंगीं सरकार आम्हांस सर्वत्र दीपोत्सव करण्यास सांगत आहे. सरकारच्या या सूचनेस अनुसरून आम्हीही अशी विनंती करतों कीं, तुमच्या राज्यकारभारावर जो एक काळा डाग आहे तेवढा काढून टाकून, तुम्हीही राजकीय कैद्यांच्या अंधारकोठड्या खुल्या करा, म्हणजे आमच्या घरोघरीं आपोआपच आनंदानें दीपोत्सव होईल."

सन १९२४ सालीं सावरकरांना चवदा वर्षांच्या दीर्घ कारागृहवासानंतर येरवड्याच्या तुरुंगांतून मुक्त करण्यांत आलें. त्यावेळीं मुंबईस जाण्यापूर्वी पुण्यास ते कांहीं तासपर्यंतच होते. कारण ताबडतोब रत्नागिरीस जाण्याचें त्यांच्यावर बन्धनच होतें. तथापि तेवढ्याही थोड्या वेळांत सावरकर शिवरामपन्तांचे घरीं येऊन भेटून गेले.

प्रस्तुत चरित्र लिहिण्याचे वेळीं सावरकरांची जी मुलाखत झाली, त्यांत सुरवातीलाच ते म्हणाले, 'माझ्या राजकीय चरित्राला शिवरामपन्तांपासूनच सुरुवात आहे—माझ्या चरित्राचे जनकच आहेत ते!' शिवरामपन्तांच्या स्मरणामुळें त्यांचे त्यांचे पूर्वीचे संबन्ध सावरकरांच्या डोळ्यापुढें उभे राहून ते बोलण्याच्या ओघांत म्हणाले—

**'मी आत्मचरित्र लिहीन त्यांत शिवरामपन्तांबद्दल मला प्रत्यक्ष माहीत आहे तेवढें लिहिलें तरी सहज दोनशें पानें होतील.'**

गुरूच्या भात्यांत कसले बाण होते हें शिष्यालाच ठाऊक! आणि त्यांनीं होऊनच ते सांगितल्याशिवाय कुणाला कळावयालाही मार्ग नाहीं. सावरकरांचें हें आत्मचरित्र बाहेर पडेपर्यंत परांजप्यांच्या चरित्राची ही बाजू अशीच अंधारांत रहाणार!

## (३) एकाच पक्षांतील स्वभाव-भेद

सन १८९८ पासूनची एक हकीकत सांगितली पाहिजे. परांजप्यांचे कॉलेजपासून झालेले स्नेही कृष्णाजीपन्त खाडिलकर केसरींत शिरले होते व त्याच्याही थोडे दिवस अगोदर 'लिहिण्याच्या हौशी'नें न. चिं. केळकर हे केसरी-मराठ्याला येऊन मिळाले होते. केळकरांचा स्वभाव, शत्रूचाही बरा दिसला तर गुण घेण्याचा. सरकारासंबंधींही व विशेषत: नेमस्तपक्षासंबंधानें लिहितांना त्यांची विवेचकबुद्धि बरीच जागृत असे. उलट, राज्यकर्ते साहेब एकदां म्हटलें म्हणजे त्यांत बरावाईट हा भेद मानावयाला तयार नसलेल्या शिवरामपन्तांना वरील प्रकारचें केळकरांचें लिहिणें व तेंही टिळकांच्या केसरींत आलेलें मनापासून नापसंत असे. एकजण हौसेनें लिहिणार तर दुसरा मनाच्या तळमळीनें लिहिणार. दोघांचें पटावें कसें? टिळक १८९७ सालच्या कैदेंत असतां त्यांच्या गैरहजेरींत केळकरांनीं

मराठ्यांत प्रोफेसर जिनसीवाले यांजवर टीका करून गोपाळराव गोखल्यांची बाजू उचलून धरली होती. ह्यामुळें केळकरांच्या ह्या लिहिण्याचें पुष्कळांस वैषम्य वाटलें. व टिळक सुटून आल्यावर कांहीं मंडळींनीं ही गोष्ट त्यांच्या निदर्शनास आणली. ह्यावर टिळकांनीं जें समाधान केलें तें ध्यानांत घेण्यासारखें आहे. मंडळींनीं आपलें म्हणणें पुढें टाकल्याबरोबर बळवन्तराव *म्हणाले कीं,

" नरसोपन्तांसारखीं तरी माणसें कोठें आहेत ? मला माणूस आणून द्या. व शिवाय गोखल्यांशीं आमचे आजपर्यन्त जे प्रसंग आले त्यांमुळें एकमेकांच्या मनांत एकमेकांविषयीं ज्या अढी पडल्या आहेत त्या या त्रयस्थ असलेल्या नरसोपन्तांच्या मनांत कशा उतराव्या व त्यांनीं त्याप्रमाणें लिहावें अशी आम्हीं अपेक्षा तरी कशी करावी ? " टिळकांपाशीं राहून केळकरांना मधून मधून गोखले—नेमस्तांचा कड यावा, हें योग्य आहे किंवा नाहीं हा प्रश्न येथें नसून परांजपे व केळकर यांच्यामध्यें स्वभाव-भेद व नैसर्गिक वृत्तींतलाच विरोध कसा होता, एवढेंच पहावयाचें आहे. केळकरांमधील पक्षाभिनिवेशाचा अभाव आणि टिळकांची, जे असतील ते गुण आपल्या कार्याला लावून घेण्याची हातोटी, हे दोघांचे स्वभाव-विशेष या प्रसंगीं दिसून आले. स्वतःमधील या उणीवेची जाणीव खुद्द केळकरांना नव्हती असें नाहीं. 'गतगोष्टीं'त ते म्हणतातः

" वास्तविक प्रतिपक्षी म्हटला म्हणजे त्याच्यासंबंधीं आपल्या मनांत कसलाही बरा विचार येण्याच्या सर्व वाटा बंद करून बसलें पाहिजे. तरच मनुष्याला खऱ्या पक्षाभिमानानें वागतां येतें व पक्षपात यशस्वी होतो. उलट प्रतिपक्ष्यासंबंधानें बरा विचार कोणत्याही कारणांनीं मनांत आला कीं, त्याच्यावरील टीका दिसण्यांत लुळीपांगळी होते; ही गोष्ट अगदीं यथार्थ आहे. या दृष्टीनें, म्हणजे पक्षाभिमानाच्या दृष्टीनें पाहतां पुढारी ( किंवा त्यावेळीं पुढारीपणाचा प्रश्न नव्हता म्हणून टिळकांच्या विश्वासांतले सल्लागार ) होण्याला खाडिलकर, परांजपे, जोशी हीच मंडळी मजपेक्षां अधिक लायक होती. या दृष्टीनें टिळकांच्या हिशेबीं मी केव्हांही कमी पडत होतों. तरी माझ्या इतर व एकंदर उपयुक्ततेमुळें त्यांना मी हवा होतों व म्हणूनच टिकलों. त्यांनीं बहुधा प्रथमपासूनच मनाशीं ठरवून ठेविलें होतें कीं, पक्षा-

* आठवण-शं० ग० लवाटे-टि० आ० व आ० खंड दुसरा.

भिमानाची विशेष गोष्ट उपस्थित झाली असतां ती मजवर न सोपवितां त्यांच्या या कसोटीला उतरणाऱ्या इतर लोकांवर ती सोपवावयाची. ''

एवढेंच नव्हे तर याच पुस्तकांत केळकर दुसऱ्या एका ठिकाणीं लिहितात ''पक्षाभिमानाच्या दृष्टीनें मी कट्टर नाहीं ही गोष्ट टिळकांना प्रथमेंपासूनच कळून चुकली होती......या विशेष परिस्थितीमुळें इतर म्हणजे कट्टर पक्षाभिमानी लोक टिळकांना मजपेक्षां अधिक जवळ वाटत. आणि केव्हां केव्हां अगदीं गुप्त स्वरूपाचीं खलबतें होत, त्यांत मुद्दाम होऊन मला बोलावणें पाठवावेंच असें घडत नसे. पण मीही माझा स्वभावदोष जाणून होतों. व त्या अव्हेराची तक्रार कधीं केली नाहीं. टिळकांचाही स्वभाव खरोखरच असा कीं, जोडलेला मनुष्य सहसा तोडावयाचा नाहीं '' वगैरे. या सर्व लिहिण्यांत मुरड असली तरी असावा तितका पक्षाभिमान आपणांत नाहीं, या उणीवेची कबुली यांत आहेच. पण लगेच या उणीवेची भरपाई पक्षाभिमानी मंडळींची उलट उणीव काढून करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला आहे. केळकर शेरा मारतात—

> '' खाडिलकर व परांजपे यांनीं टीका करण्याशिवाय प्रत्यक्ष उपयुक्त काम असें किंवा विधायक काम असें कांहींएक न करण्याची जवळजवळ शपथच वाहिली होती. आणि मी वर्तमानपत्रांतून टीका करणारा झालों तरी प्रत्यक्ष कांहीं काम करण्याची हौस मला वाटे याचें तेव्हांचें एक उदाहरण म्हणजे प्लेगव्यवस्थेचा सरकारी जुलूम टाळण्याकरितां स्वयंसेवक पथकांत नांव दाखल करण्याचें. ''

परांजप्यांपुरतें बोलावयाचें तर त्यांनीं काय केलें, काय केलें नाहीं, हें सर्वांस ठाऊकच आहे. जन्मभर त्यांनीं जो उद्योग किंवा कार्य केलें तोच या चरित्राचा विषय असल्यामुळें त्यासंबंधीं या ठिकाणीं वेगळें लिहिण्याची आवश्यकता नाहीं. केळकरांना जें उपयुक्त वाटलें तें केलें नाहीं किंवा त्यांना परांजप्यांनीं जें करायला पाहिजे होतें तें केलें नाहीं असेंच म्हणणें असेल तर तें मात्र अक्षरशः बरोबर आहे! परंतु परांजप्यांचें सर्व चरित्र लक्षांत घेतां केळकरांचें वरील विधान अनुदार, विपर्यस्त व त्यांचा प्रसिद्ध समतोलपणा सोडून केलेलें आहे हें सहज लक्षांत येणार आहे. त्यांतली खरी गोष्ट अशी आहे कीं, ' उपयुक्त व विधायक ' या

शब्दांच्या व्याख्येंतच दोघांमध्यें मूलभूत फरक होता. पण तें सर्व सोडून देऊन केळकरांच्या पद्धतीचें ' उपयुक्त व विधायक ' काम परांजप्यांनीं केलें नाहीं हें घटकाभर गृहीत धरून चालूं. तरीसुद्धां परांजप्यांनीं तसें काम बजाविलें नाहीं तर उलट असेंही विचारतां येईल कीं, राष्ट्रकार्याची चेतना व स्फूर्ति ही तरी केळकरांपासून आजपर्यंत कोणाला काय मिळाली आहे ? एका दृष्टीनें टिकिटिकि दिवाणजीचें काम सतत ठाक-ठिकीनें करणाऱ्याला इतर संस्थांप्रमाणें राजकारणांतही स्थान असतें यांत शंका नाहीं. पण असा दिवाणजी धडाडीनें व्यापार करणाऱ्या दुसऱ्या मनुष्यास, तो जमाखर्च व बैठें काम करीत नाहीं अशीं नांवें ठेवूं लागला, तर तें कितपत बरोबर व समंजसपणाचें होईल हा एक प्रश्न आहे. तात्पर्य, दोनही किंबहुना सर्व प्रकारचे लोक पक्षाच्या राजकारणाला लागतात हें तत्त्व ओळखणें अधिक श्रेयस्कर होय. प्रत्येकानें आपली स्वतःची व इतरांची योग्यता ओळखणें व त्या सर्वांचाच देशकार्याकडे उपयोग करून घेण्याची दृष्टि ठेवणें हेंच सर्व दृष्टींनीं उपकारक असतें व नेमकें हेंच सर्व-संग्राहकत्व टिळकांच्या अंगीं होतें. म्हणून कोणीं काय केलें हें न पाहतां नुसते 'अकरणरूप' दोष चिकटवून एकमेकांत उखाळ्या-पाखाळ्या शोधून काढणें हें अप्रयोजकच नव्हे तर कार्यविघातकही ठर-ण्याचा संभव असतो. असो. परांजपे व केळकर या दोन पुढाऱ्यांच्या मनोरचनेंत, स्वभावांत व अतएव राजकारणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांतच विळ्याभोपळ्याइतकी भिन्नता असल्यामुळें या दोघांचें फारसें कधीं बनलें नाहीं, यांत नवल नाहीं. व मुळांत दोघांच्या वृत्तींतलाच विरोध लक्षांत आणला म्हणजे सन १८९७।९८ मध्येंच उभयतांच्या धोरणांचे वारे कसे निरनिराळ्या दिशेनें वाहूं लागले होते, याची सहज संगति लागते.एकजण नको असलेल्या झाडावर 'मूले कुठारः' करूं म्हणणारा, तर एकजण लोकांनीं झाड तोडून तें तुटेपर्यंत काय बरीं वाईट फळें येतील तेवढींच, असें म्हणून तीं तोडीत बसणारा. अशां-तलाच हा फरक होता. हीच मूळ वृत्तींतली तफावत लहानमोठ्या राजकीय प्रश्नांत त्या त्या मानानें लहान रहाते अगर रुंदावत जाते. याचें एकच ठळक उदाहरण दिलें म्हणजे पुरे. पुढें १९०९ सालीं इंग्लंडांत कर्झन-

वायलीवर मदनलाल धिंग्रा, या क्रान्तिकारक तरुणानें पिस्तुल चालवून गोळी झाडली व कर्झनवायली यांना परलोकास धाडलें. परांजप्यांचीं मतें काय होतीं तीं प्रसिद्ध आहेत. हिंसावादाच्या उघड पुरस्कारामुळें तर त्यांचें काळवाङ्मय जप्त झालें आहे. पण केळकरांनीं या धिंग्राच्या कृत्याला लाजिरवाणें व भ्याड म्हणून ना. गोखल्यांप्रमाणेंच त्याचा उघड निषेध केला. ना. गोखले तर हा निषेध करतांना इतके वाहवले कीं, कांहीं ॲंग्लो इंडियन व नेमस्त पत्रांनाही त्यांचे उद्गार खपले नाहींत व त्यांनींही त्याबद्दल आपली नापसंती व्यक्त केली. दिनांक ९ जुलई रोजीं भरलेल्या सभेंत निषेधाच्या ठरावावर भाषण करतांना केळकरांनीं खालील-प्रमाणें उद्गार काढले:—

Mr. President and gentlemen,

It is a disgraceful deed which we have here assembled to condem and it certainly deserves to be condemned from every point of view ......... Madanlal Dhingra is, I am sorry to say, an Indian; and we, Indians, are therefore, bound to express, in the strongest manner, our sense of detestation of his crime ... ... ... The London police have declared that the outrage was the result of a private and imaginary grievance. The crime has thus no political significance and we feel certainly grateful that the good name of Indian politics is not likely to be imperilled thereby ........ the doctrine of violence, if at all it exists as a doctrine, is confined to stray individuals. But gentlemen, we must unite and uproot it though its dimensions may be howsoever meagre. It is a poison tree which must not be allowed to grow, even in neglected corners.

[ अध्यक्ष महाशय आणि सभ्यगृहस्थ हो,

ज्या कृत्याचा निषेध करण्यासाठीं आपण जमलों आहों तें कृत्य लाजिरवाणें असून कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी तें निःसंशय निषेधार्ह आहे. .....मदनलाल धिंग्रा हा एक हिंदी इसम आहे असें सांगतांना मला फार दुःख होत आहे. तो हिंदी इसम असल्यामुळें

त्याच्या गुन्ह्याबद्दलचा तिटकारा जास्तींत जास्त कडक शब्दांत व्यक्त करणें हें हिंदी लोक म्हणून आपलें कर्तव्यच आहे.....वैयक्तिक स्वरूपाच्या व काल्पनिक तक्रारींतून या गुन्ह्याचा जन्म झालेला आहे, असें लंडनच्या पोलिसांनीं जाहीर केलें आहे. याचाच अर्थ असा कीं, या गुन्ह्याला राजकीय स्वरूप नाहीं. या गुन्ह्यामुळें हिंदी राजकारणाचें सोज्ज्वल नांव संकटांत सांपडण्याचा संभव नाहीं याबद्दल आपणां सर्वांना खात्रीनें समाधान वाटत असलें पाहिजे. हिंसातत्त्व हें तत्त्व म्हणून अस्तित्वांत असलेंच तर कांहीं भुरट्या माणसांपलीकडे त्याची व्याप्ति नाहीं. पण सद्गृहस्थ हो, या तत्त्वाचें प्रमाण कितीही अल्प असलें तरी आपण सर्वांनीं एकजुटीनें त्याचीं पाळेंमुळें खणून काढलीं पाहिजेत. हा विषवृक्ष आहे; आणि अगदीं दुर्लक्षिलेल्या सांदीकोपऱ्यांतही या वृक्षाला वाढूं देतां कामा नये." [ इंग्रजी उतारा मराठ्याचा अंक ता० ११-७-१९०९-मराठी भाषांतर सावरकर-चरित्र पान २७७।७८ ]

दुसऱ्या कोणाचें धोरण अगर मार्ग भिन्न असले तरी 'साधनानाम् अनेकता' म्हणून किंवा जो तो आपापल्या परीनें स्वातंत्र्य मिळविण्याचा यत्न करीत असतो या दृष्टीनें मी दुसऱ्याच्या कृत्याचा निषेध करीत नाहीं–किंवा कां करावा ? असें केळकर नेहमीं म्हणून घेतात; किंबहुना हें त्यांच्या धोरणाचें सूत्रच आहे, असेंही ते मानतात-सांगतात. व याच तत्त्वावर त्यांनीं मेथांच्या धाकाला न जुमानतां काळ पत्रांतील लेखांचा निषेध मी केला नाहीं असा झोंक त्याविषयीं लिहितांना दाखविला आहे. एवढेंच नव्हे तर 'एखाद्या गोष्टीचा निषेध केला नाहीं, म्हणजे ती गोष्ट आम्हांला पसंत आहे असें होत नाहीं' असें बोलून त्यांनीं मेथांनीं घातलेला कोलदांडा आपल्या बुद्धिचापल्यानें मोडून काढला. याप्रमाणें केळकरांचा हा कोटिक्रम, त्यांतलें धोरण, सूत्र वगैरे लक्षांत घेतां धिंग्रा-प्रकरणांत निदानपक्षीं ते मौन धारण करतील अशीच कोणाचीही अपेक्षा असणार.. पण केळकरांचे वरील स्पष्टोक्तिपूर्ण उद्गार पाहिले म्हणजे चापल्याच्या गुणाबरोबरच चांचल्याचा दोषही त्यांना चिकटू पाहतो.असो. परांजप्यांचीं याविषयींचीं मतें व केळकरांची वरील व एकूण विचारसरणी महशूर असल्यामुळें या बाबतींत अधिक लिहिणें नको. एकंदरीनें

पहातां केळकरांच्या समतोलपणाचा कांटा प्रतिपक्षापेक्षां स्वपक्षालाच बोंचण्यासारखा असे; उलट परांजप्यांच्या बिनतोलपणाचा बडगा स्वकीयांच्या रक्षणाकरितां व प्रतिपक्षीयांच्याच पाठींत बसण्याकरितां वापरला जात असे. अशी स्थिति उघड उघड होती, यांत शंका नाहीं. मूळ प्रकृतींतला विरोध तो हाच.

## (४) काळकर्ते व Passive Resitance

बंगालची फाळणी प्रत्यक्ष १९०५ च्या आक्टोबर महिन्यांत अमलांत आली, परन्तु त्यापूर्वींच सर्व देशभर वंगभंगाचा निषेध करण्याची धामधूम सुरू झाली होती. करंदीकरांनीं 'टिळकभारत' या नांवाचें टिळकांचें चरित्र प्रसिद्ध केलें आहे त्यांत टिळकांनीं ता. १०।७।१९०६ च्या केसरींत पॅसिव्ह रेझिस्टन्स या शब्दप्रयोगाचा उपयोग केला आहे, ही माहिती कौतुकानें नमूद केली आहे. परन्तु त्याच्याही अगोदर काळपत्रांत ता. ६ आक्टोबर १९०५ च्या अंकांतच शिवरामपन्तांनीं या विषयावर एक स्फुट लिहिलेलें होतें. त्यांत त्यांना कोणत्या प्रकारची चळवळ अभिप्रेत होती व त्या चळवळीची व्याप्ति कोठपर्यन्त नेऊन भिडवावयास हवी हें त्यांनीं मोठ्या मर्मभेदकपणानें सूचित करून ठेवलें असल्यामुळें तें स्फुट येथें जसेंच्या तसें उद्धृत करण्यांत येत आहे.

"Active Resistance आणि Passive resistance" असे प्रतिकाराचे इंग्रजींमध्यें दोन प्रकार आहेत. एखादी गोष्ट इंग्लिश लोकांच्या विरुद्ध झाली, तर तिचा प्रतिकार करण्यासाठीं ते या दोहोंतून कोठल्यातरी एका युक्तीचा उपयोग करितात. Active resistance म्हणजे उघड प्रतिकार होय. व याच्या उलट दुसरा गुप्त प्रतिकार होय. इंग्लंडमध्यें थोडे दिवसांपूर्वीं एज्युकेशन बिलाची चळवळ चालली होती, त्यावेळीं धर्मखात्यांतील पुष्कळ लोक त्या बिलाच्या विरुद्ध होते.परंतु इंग्लिश सरकार फार प्रबळ पडल्यामुळें त्या लोकांस त्याचा उघड प्रतिकार करतां येईना. म्हणून त्यांनीं, Passive resistance चा मार्ग पत्करिला होता. हल्लींची हिंदुस्थानांतील स्थितीही तशीच आहे. इंग्रजी व्यापार अतिशय बलाढ्य आहे. त्याच्याशीं समोरासमोर टक्कर देणें तूर्त तरी निदान हिंदुस्थानांतील व्यापाराला शक्य नाहीं.अशा स्थितींत Passive resistance हाच इंग्रजी

मार्ग उत्तम होय. इंग्रजी कोणताही माल घ्यावयाचा नाहीं. या निश्चयानें इंग्रजी व्यापाराचें बरेंच प्रस्थ कमी होईल, व आपल्यावरील इंग्रजी मालाचा पगडा उठावा आणि देशी उद्योगधंदे जास्त वाढावे या हेतूनें आपल्या लोकांनीं हल्लीं जी देशी चळवळ चालविली आहे, ती निःसंशय भरभराटीला येईल. परंतु ह्या एका साध्या लहानशा चळवळीवरून कित्येक इंग्लिश लोकांच्या मनांत भलभलतेच कुतर्क उत्पन्न होऊं लागले आहेत. त्यांची अशी कल्पना आहे कीं, ह्या स्वदेशी चळवळीनें हिंदुस्थानमध्यें एक मोठी संघशक्ति उत्पन्न होत आहे. एकच विचार कोट्यवधि लोकांच्या मनांत खेळूं लागला आहे. स्वदेश-हिताच्या स्तुत्य हेतूसाठीं सर्व लोक एकत्र होत आहेत. ही लाट चोहोंकडे फैलावली आणि विलायती मालाचा द्वेष असाच सर्वत्र पसरला तर त्याचा परिणाम काय होईल ? इंग्रजी माल घ्यावयाचा नाहीं, इंग्रजांच्या उद्योग-धंद्याच्या कारखान्यांत चाकऱ्या करावयाच्या नाहींत. इंग्रजांशीं होतां होईल तों कमी संबंध ठेवावयाचा, त्यांचें आपण घ्यावयाचें नाहीं आणि आपलेंही त्यांना द्यावयाचें नाहीं, अशी प्रवृत्ति वाढत गेली तर पुढें कसें होईल ? Passive resistance च्या तत्त्वावर नेटिव लोकांनीं चाकरी करण्याचें बंद केलें, तर आपलें अडणार नाहीं काय अथवा इतर चाकरीचें असो, परंतु युरोपियन शिपायांच्या छावणीबरोबर नेटिव कॅम्पफालोअर्स कितीतरी असतात; त्यांनीं आपआपलीं कामें करण्याचें नाकारलें तर आमचे गोरे शिपाई मोठे शूर असूनही काय करणार आहेत ? सगळ्या हिंदुस्थानांत सगळे युरोपियन आणि युरेजियन धरले तरी दोन लक्षांच्यावर भरणार नाहींत. हे आपण मूठभर लोक नेटिवांची अशा रीतीनें मनःप्रवृत्ति बदलली असतां काय करणार आहों ? अशा अनेक तऱ्हेच्या शंका कोठें कोठें इंग्रजी पत्रांतून उद्भवूं लागल्या आहेत. हिंदुस्थानांत असें कांहीं एक होत नाहीं. साहेब-लोकांनीं हिंदुस्थानावर आपला अंमल पूर्ववत् गाजवीत खुशाल झोंपीं जावें ! ”

शिवरामपन्तांचा हा उतारा म्हणजे एक ‘बोलका ढलपा’च आहे. त्यांत त्यांचें सर्व मनोगत व द्विविध धोरणाची सामान्य रूपरेषा उत्कृष्ट-पणें प्रतिबिंबित झाली आहे. किंबहुना त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचें मर्मच यांत उतरलें आहे, असें म्हणावयाला हरकत नाहीं. एवढेंच नव्हे

तर पुढें १९२०।२१ सालीं गांधींच्या असहयोगाचा जो पुरस्कार शिवरामपन्तांनीं केला व असहकारितेची चळवळ उचलून धरिली त्या धोरणाचा उगम या १९०५ सालच्या उताऱ्यांत सांपडतो. अर्थात् त्या चळवळीविषयींची त्यांच्या मनांतली कल्पना व प्रत्यक्षांत आलेल्या गांधींच्या कल्पना यांत कांहीं बाबतींत तफावत पडली असेल; नाहीं असें नाहीं. तथापि सरकारी राज्ययंत्राशीं असहकार व त्याची अडवणूक करून तें अनन्यगतिक करून सोडणें हा जो असहकारितेच्या चळवळीचा गाभा म्हणून होता, त्याचीं अस्पष्ट बीजें स्पष्टपणें वरील उताऱ्यांत पहावयास मिळतात, यांत शंका नाहीं. पण तो विषय असहकारितेच्या प्रकरणांतला असल्यामुळें येथें त्याचा अधिक विस्तार नको.

## (५) शिवरामपन्त व सनदशीर चळवळ

सन १८९७ च्या डिसेंबरांत राष्ट्रीय सभा उमरावती येथें भरली. शिवरामपन्त, कॉंग्रेसच्या अधिवेशनाला, प्रथम उपस्थित राहिले ते याच वर्षीं. उमरावतीच्या या अधिवेशनाच्या निमित्तानें कॉंग्रेस या संस्थेशीं त्यांचा जो संबंध जडला तो थेट १९२९ पर्यंत म्हणजे सतत ३२ वर्षें टिकला. पहिल्या ५।६ वर्षांत त्यांनीं खुल्या बैठकींत इंग्रजींतून भाषणें केलीं होतीं व तीं उत्कृष्ट वठत असत असें त्यांच्या संक्षिप्त चरित्रांत नमूद आहे. त्या वेळच्या कॉंग्रेसचीं सूत्रें मेथाप्रभृति नेमस्तांच्या हातांत असल्यामुळें, तोंपर्यंत कॉंग्रेसच्या कार्याचें व राजकारणाचें स्वरूप अर्जविनन्ती व कंठाळी ठराव पास करणें यापलीकडे फारसें गेलेलें नव्हतें. कॉंग्रेस जोंपर्यन्त मवाळ लोकांची आहे तोंपर्यन्त कांहीं धडाडीचें अगर प्रगतिपर कार्य होणें नाहीं, अशी शिवरामपन्तांची मनापासून भावना असे. प्राप्त परिस्थितीच्या मानानें कां होईना पण प्रत्यक्ष सरकारविरुद्ध उभें ठाकून कार्य करण्याला मनाची घडण निराळीच बनलेले लोक लागत असतात. तें सुखावलेल्या पेन्शनरवजा केवळ बुद्धीच्याच क्षेत्रांत काम करूं इच्छिणाऱ्या मवाळ मंडळींच्या हातून व्हावयाचें नाहीं, अशी ठाम कल्पना शिवरामपन्तांची झाली होती. उलट, अशाशीं प्रसंग पडल्यानें पायांत पाय घुटमळून पडण्याचा संभव अधिक असेंही त्यांना वाटे. एवढ्याचकरितां पुढें १९०७ सालच्या कॉंग्रेसमध्यें रणें माजून कॉंग्रेसची बैठक

उधळली गेल्यानंतर, त्यापेक्षां आतां नॅशॅनलिस्ट म्हणजे राष्ट्रीय पक्षाची वेगळीच काँग्रेस काढावी असेंही त्यांचें मत होतें. तथापि मागें एक ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें ते या बाबतींतून स्वतःचा हेका चालवीत नसत. मतभेद बोलून दाखवावयाचा, खासगी संभाषणें करून आपलीं मतें पटवून देण्याचाही प्रयत्न करावयाचा, पण अखेर टिळक व एकूण आपल्या राष्ट्रीय पक्षांत जें मत-धोरण ठरेल तेंच अनुसरावें अशी त्यांची रीत असे.एखादे वेळेस एखादें धोरण मनापासून अगदींच नापसंत असेल तर मग फार झालें तर ते सोइस्कर मौन पत्करीत;पण ठरलेल्या टिळकांच्या धोरणाला ते आड येत नसत. राष्ट्रीय व नेमस्त या दोन पक्षांच्या वृत्ती, स्वभाव, भूमिका, स्वार्थत्याग करण्याची तयारी व दृष्टिकोन यांमधल्या मूलभूत व ढळढळीत विरोधामुळें हीं कधीं एकत्र न येणारीं दोन टोकें म्हणून सोडून द्या. पण राष्ट्रीय पक्षापुरते आपआपसांतले कमी-अधिक प्रमाणांतले मतभेद सांधून रंधून घ्यावयाचे, एकोपा एकवटपणा बिघडूं द्यावयाचा नाहीं अशीच परांजप्यांची विचारसरणी व कार्यपद्धति होती. पुढें १९२०।२१ सालीं असहकारितेच्या कार्यक्रमाच्या निमित्तानें काँग्रेसला एक प्रकारें कसोटीच लागली व तुमची इतकी तरी तयारी आहे काय व इतपत सरकारविरोध दर्शविण्याची व कृतींत आणण्याची तुमची सिद्धता आहे काय, असा रोकडाच प्रश्न उपस्थित झाला.या वेळीं ही कात्री लागून मवाळांचे किंवा मवाळ वृत्तीच्या लोकांचें काँग्रेसमधून निष्कासन झालें. यानंतर मात्र शिवरामपन्त काँग्रेसमध्यें अधिकाधिक भाग घेऊं लागले. महाराष्ट्र प्रां. काँ.क. चे ते पुष्कळ वर्षें अध्यक्ष होते. 'ऑल इंडिया'वरही महाराष्ट्राचे प्रतिनिधि म्हणून जात असत.

सनदशीर चळवळीवर त्यांचा मनापासून विश्वास नव्हता. त्यांची खरी मदार कशावर होती, हें मागें सांगितलेंच आहे. तथापि, बाहेरून देशांत सनदशीरपणें करावयाच्या चळवळीबाबत त्यांचें धोरण कोणतें होतें हें पाहूं. वंगभंगाचे वेळीं स्वदेशी-बहिष्काराच्या आन्दोलनांत पुण्यांत व फिरतीवर जाऊन त्यांनीं शेंकडों व्याख्यानें दिलीं. त्याचप्रमाणें पुढें टिळकांच्या होमरूल लीग चळवळींतही त्यांनीं भाग घेतला. सरकारशीं असहकार हें त्यांच्या स्वाभिमानी व मानी स्वभावांत सांपडणारें,

' लब्धप्रकाश-इतिहास-विवेक-मानें ' बिंबलेलें व अतएव त्यांच्या राजकीय धोरणांत उतरलेलें एक अखंड सूत्र होतें. कौन्सिलांतील कामकाजानें-मग तें ना. गोखले, फेरोजशहा मेथा इत्यादि बुद्धिमान् व कांहीं तडफेच्या लोकांनींही केलेलें असो—फारसा लभ्यांश होत नाहीं, एकंदर प्रगतीचा गाडा फारसा पुढें रेटला जात नाहीं, कांहीं चमत्कार दाखविल्याशिवाय नमस्कार मिळत नाहीं, अशा प्रकारचीं मतें शिवरामपन्त काळ पत्रापासूनच मांडीत असत. त्यावेळीं, म्हणजे लोकप्रातिनिधित्व नव्हतें तेंव्हां कौन्सिलच्या भिंतीवर वरीलसारखी मंडळी मारीत असलेल्या टकरांतलें वैयर्थ्य, प्रश्नोत्तरांमधला फुसकेपणा व देशाचा कांहीं फायदा व्हावा म्हणूनच कौन्सिलांत झटणाऱ्या या लोकांची तिथल्या वरिष्ठ सरकारी सभासदांकडून होणारी मानहानि, इत्यादि गोष्टी लोकांच्या मनांत भराव्या म्हणून काळांतून त्यांवर वर्णनें देणारीं टीकात्मक स्फुटें येत असत. 'महात्मा गांधींच्या आधींपासूनच शिवरामपन्तांचा कौन्सिल-बहिष्कार मनानें सिद्ध झाला होता. ' १९३७ सालीं कांहीं अंशीं भरीव हक्कांची घटना पदरांत पडल्यानंतर शिवरामपन्तांचें धोरण त्याबाबत ते हयात असते तर काय राहिलें असतें, हें सांगणें कठीण आहे. परन्तु त्यापूर्वी त्या काळांत सगळ्या देशभर मिळूनही मूठभरच चळवळ्ये असत. व तेही वरील प्रकारच्या कौन्सिली कामकाजाचे वायबार काढण्यांत गुंतले गेले, तर काय साधणार ? कौन्सिलाची ही आघाडी उघडली पाहिजे, सर्व आघाड्या झुंजविल्या पाहिजेत, हें सगळें ठीक आहे, पण आहेत त्या कार्यकर्त्यांतलें चळवळीचें सामर्थ्य सगळेंच्या सगळें या झुंजींत खर्ची घालून, त्या मानानें परत लाभ किती होणार, व जनतेंत करावयाच्या दुसऱ्या इतर चळवळी त्यामुळें तितक्या प्रमाणांत थंड पडून आपलें नुकसान किती होणार, हा खरा हिशेबाचा आणि मुद्दयाचा प्रश्न आहे. अशा तऱ्हेची शिवरामपन्तांची विचारसरणी असे.

तीच गोष्ट म्युनिसिपालिट्यांबाबत. सरकारनें औदार्यानें बहाल केलेले स्थानिक-स्वराज्याचे हक्क हे गप्प करण्याकरितां व निदान पुष्कळशा लोकांचे किंवा सार्वजनिक कार्यकर्त्यांचें चित्त त्यांतच रमावें एवढ्याकरितां तोंडावर टाकलेले तुकडे आहेत; पण त्याला भाळून भरल्या ताटावरचें

म्हणजे स्वराज्याच्या हक्कांवरचें आपलें लक्ष आपण कमी करतां कामा नये, असें त्यांचें म्हणणें असे. असें असतांही एकदा १९०८ सालच्या मार्च महिन्यांत पुणें म्युनिसिपल निवडणुकीला ते उभे राहिले होते. कारण, त्यावेळीं पुण्यांत नेमस्त विरुद्ध राष्ट्रीय पक्ष यांच्यांत बळ अजमाविण्याची शर्यतच लागली होती. त्यामुळें जयापजय व्यक्तींचा नसून पक्षांच्या वांट्याला येणारा होता. सुरतेची काँग्रेस नुकतीच झाली असल्यामुळें, किंवा नुकतीच मोडली असल्यामुळें पुण्यांत राष्ट्रीय पक्षाचें वर्चस्व प्रकट होणें जरूर होतें. बाकीच्या निवडणुकी होऊन गेल्या होत्या, फक्त एकच जागा भरावयाची राहिली होती. त्या वेळीं वॉर्डस् पाडलेले नसून सर्व शहरातर्फे 'जनरल सीटस्' असत त्यामुळें अर्थातच या एका जागेपुरती चुरसही शहरभर पसरली होती. नेमस्त पक्षातर्फे त्या वेळचे वजनदार व कादंबऱ्यांमुळें लोकप्रिय झालेले हरि नारायण आपटे उभे करण्यांत आले होते. राष्ट्रीय पक्षाचे उमेदवार शिवरामपन्त परांजपे. सामना मोठा चुरशीचा झाला. रँ. परांजपे प्रभृति बडे बडे नेमस्त पुढारी जातीनें गांवांत हिंडत होते. उलट टिळकांसारखी मंडळी परांजप्यांकरितां बाहेर पडली होती. पुण्याच्या जनतेनें या निवडणुकींत राष्ट्रीय पक्षाच्या बाजूनेच कौल दिला! पण या समासदत्वाची त्यांची कारकीर्द खण्डित झाली. कारण याच वर्षी त्यांचेवर राजद्रोहाचा खटला झाला व शिक्षा होण्याचे पूर्वीच त्यांनीं आपला राजीनामा पाठवून दिला होता.

असो. एकूण सार असें काढतां येईल कीं, प्रकट करावयाच्या चळवळींतून जागृति करावयाची असेल, रान उठवावयाचें असेल, अडवणूक करून दडपण येणार असेल, तर त्यांत शिवरामपन्त उडी टाकून पडत असत. १८९६च्या दुष्काळी चळवळींत, शिवाजी-उत्सव, गणपत्युत्सवांत हेंच दिसून येतें. बंगाल-फाळणीच्या वेळीं होळी-बहिष्कार, व्याख्यानादिकांनीं त्यांनीं हेंच केलें. विदेशी मालाच्या बहिष्कारानें इंग्रजी व्यापार मारला जाऊन आर्थिक तंगी व दडपण कसें जाणवूं लागेल व देशी उद्योगधंद्यांना कसें उत्तेजन मिळेल याबद्दल त्यावेळीं अनेक लेख त्यांनीं काळांत लिहिले होते. कोणकोणते धंदे निघाले आहेत, निघण्यासारखे आहेत यांच्या विस्तृत माहितीनें काळाचे अंकच्या अंक खर्ची पडलेले आहेत. वेळो-

वेळीं टिळकांबरोबर दौऱ्यावर जाऊन त्यांनीं हीच कामगिरी केली. कॉंग्रेसच्या अधिवेशनांत व प्रांतिक परिषदांत टिळकांच्या म्हणजे राष्ट्रीय पक्षाच्या बाजूनें भाग घेतला. व पुढें गांधींच्या चळवळीतही त्यांनीं हेंच कार्य केलें. सनदशीर प्रकटपणें करावयाच्या चळवळींत पूर्वीच्या सदरांत सांगितलेलें Passive resistance चें त्यांचें शस्त्र होतें.

## परिशिष्ट

### टिळकांना 'लोकमान्य' कोणीं केलें ?

सन १९०० सालापूर्वीपर्यंत टिळक हे साधेच म्हणजे 'रा. रा.' होते. कौन्सिलांत निवडून गेल्यावर कांहीं दिवस त्यांचा नामदार म्हणून उल्लेख होत असे हें खरें, तथापि कौन्सिलचें सभासदत्व रद्द झाल्यानंतर पुन्हां अर्थातच त्यांना 'राजमान्य राजश्री' या ठरीव सांच्याच्या रूढ उपपदानें लांच्छित करण्यांत येऊं लागलें. परंतु त्यांतील 'राजमान्य' या शब्दांत पूर्वीच्या काळीं कांहीं अर्थ असला तरी आतां टिळक हे खरे लोकपक्षाचे पुढारी आहेत असा श्लेष व मर्म शोधून शिवराम पन्तांनीं १९०० सालांत आपल्या काळपत्रांत 'लोकमान्य आणि राजमान्य' या मथळ्याचा एक अग्रलेख लिहिला. त्यापूर्वीं लोकमान्य हा शब्द कोणीं क्वचित् वापरला असला तरी तो पडून होता. पण या अग्रलेखामुळें तो सर्वांच्या जिव्हाग्रीं खेळूं लागून अखेर लोकमान्य झाला, यासंबधींची केसरीचे संपादक श्री. ज. स. करंदीकर यांनीं लिहिलेली आठवण येथें उध्दृत करण्यांत येत आहे:--

" टिळकांना लोकमान्य ही पदवी प्रथम कोणीं व केव्हां दिली याविषयीं वाद असून त्याविषयीं अनेकजण आपआपला अग्रहक्क सांगत असतात. यासंबंधांत स्वतः लोकमान्यांनाच एकदां प्रश्न केला असतां त्यांनीं पुढील अर्थाचें उत्तर दिलें. " लोकमान्य ही पदवी प्रथम कोणीं उपयोगांत आणली हें कांहीं मला आतां नक्की स्मरत नाहीं. १९०० सालापूर्वीं कांहीं लेखकांनीं अगर वक्त्यांनीं ती पदवी वापरली असेल. परंतु ती कोणाच्या लक्षांत येण्याइतकी रूढ झाली नव्हती. पण १९०० सालीं शिवरामपंत परांजपे यांनीं आपल्या 'काळ' पत्रांत 'लोकमान्य

आणि राजमान्य ' या विषयावर अग्रलेख लिहिला आणि तो लेख वाचून कित्येकांनीं मला पत्र लिहितांना 'राजमान्य राजश्री' हा नेहमाचा मायना न लिहितां ' लोकमान्य ' म्हणून लिहिण्याचा संकल्प केला असावा असें दिसतें. कारण त्यावेळेपासून मला ' लोकमान्य ' या मायन्याचीं पत्रें येऊं लागलीं; आणि तो शब्द पूर्ण रूढ होण्याला ५ वर्षें लागलीं. ' राष्ट्रमत ' पत्रानें तो शब्द कायमचा रूढ केला. ''

(टि० आ० व आ० खंड दुसरा)

## शिवरामपंत व साधु–सत्पुरुष

खरोखर ज्ञानी व अधिकारी अशा साधु सत्पुरुषांची कीर्ति ऐकली म्हणजे त्यांची गांठ घेऊन त्यांच्याशीं चर्चा करण्याचा शिवराम पंतांना हव्यास असे. आधीं वेदांत विषय आवडीचा, त्यांतून आस्तिक्यबुद्धिही जबरदस्त. त्यामुळें, मोक्ष-ज्ञान किंवा परमात्मस्वरूपज्ञान याबाबत मनुष्याची शास्त्रांत कितीही गति झाली असली तरी कांहीं एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे अज्ञात आणि अज्ञेय असा अंधाराचा प्रांत लागत असतो. त्यांत उजेड पडून अधिक कांहीं कळून घेण्याची जिज्ञासा वरच्या-सारख्या चर्चेच्या मुळाशीं असे. अशाच प्रकारच्या गुलाबराव महाराज नांवा-च्या एका वऱ्हाड प्रांतांतल्या थोर सत्पुरुषाची व त्यांची गांठ पडली होती. जातीनें मराठा, जन्मांध, अशिक्षित, असें असून गुलाबराव महाराजांची सर्व शास्त्रांत गति असे; एवढेंच नव्हे तर ते एकपाठी असून शिवाय कोणत्या ग्रंथांत कुठें काय लिहिलेलें आहे हें पानासकट सांगत असत ! वैकुंठवासी श्रीसंत केशवराव देशमुख यांनीं त्यांचें एक ओंवी-बद्ध स्तवन रचलें आहे, त्यांनीं त्यांस गुरुस्थानीं मानलें होतें. एकदा विष्णुबुवा जोग, केशवराव देशमुख वगैरे मंडळी महाराजांची कीर्ति ऐकून त्यांचें दर्शन घेण्याकरितां म्हणून गेली होती. तेव्हां महाराजांनीं आदल्या रात्रीं शिवराम पंतांकडे गेलों होतों, तिथें रात्रभर चर्चा संभाषण झालें, असें त्या मंडळीस सांगितलें व त्यानंतर पुन्हां एकदां शिवरामपंताची भेट होऊन वादविवाद झाला इत्यादि कथाभाग केशवरावांच्या ओंव्यांतून ओंवला गेला आहे. म्हणून त्या त्या ओंव्या वेगळ्या काढून खालीं दिल्या आहेत. त्यांतही गुलाबराव

महाराजांबरोबर शिवरामपंतांनीं देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीबाबत जी चर्चा केली तिचें ओझरतें वर्णन आलेलें आहे.

*जोग महाराजांसमवेत । पानवलकर नानासाहेबादि समस्त
मंडळी निघाली त्वरित । दर्शनालागीं उल्हास
वेळ होती सकाळची । सूर्योदय समयाची
प्रसन्न अंत:करणें सर्वांचीं । भेटीलागीं उतावीळ
तंव देखिलें त्यांसी । पहुडले स्वस्थ मानसीं
पांघरूण घेऊन डोईसी । सभामंडपाभीतरीं
शिष्यमंडळी आसपास । वावरत होती सावकाश
म्हणाति निद्रा 'लागली खास । रात्रीं जाहलें जागरण
शिवरामपंत परांजप्यांनीं । बोलाविलें भेटी लागोनि
म्हणोनि गेलों त्यांचे स्थानीं । रात्र फार जाहली
कांहीं काल थांबाल । तरी अवश्य भेटी होईल
जाग लवकरी येईल । हेतू पुरेल मनींचा'
तंव आपआपसांत । बैसलों आम्ही कुजबुजत
तर्क वितर्क करीत । नानापरीचे मानसीं
इतुक्यांत झाले जागृत । उंच स्वरें हांका मारित
शिष्यमंडळी आली धांवत । लगबगीनें सन्मुख
मुखावरूनि वस्त्र काढिलें । दर्शन आम्हांलागीं झालें
दर्शन घेण्या सरसावले । पानवलकर सर्वांपुढें
मग झिडकारिती तयासी । स्पर्श करूं नका पायासी
तुम्ही ब्राह्मण शूद्रासी । चरणस्पर्श करूं नये
ऐसें दरडावूनि सांगितलें । पानवलकर दूर बैसले
नानासाहेब पुढें झाले । केली सुरुवात बोलावया
रात्रींची हकीकत सांगितली । परांजप्यांसमवेत जी घडली
देशभक्ति त्यांची मानवली । परि म्हणति बहिर्मुख
रात्र सरे तों संभाषण । नाना शंकांचें निरसन

*केशवराव महाराज देशमुखकृत 'श्रीनारद-भक्ति-सूत्रें' पान २-३ ओंव्या १८ ते ३७.

बहुत विषयांचें विवेचन । वादविवाद बहुसाल
तेणें शीण झाला फार । झोंप डोळ्यावरी अनिवार
पुन्हा भेटूं म्हणोनि सत्वर । डोईवर पांघरूण घेतलें
कांहीं काळ वाट पाहून । आम्ही निघालों परतून
शिवरामपंतांचे भेटीलागून । दोन प्रहरीं निघालों
भेटी त्यांची जाहली । म्हणती खात्री माझी पटली
अंध असोनि विद्वत्ता येतुली । कैसी आली न कळे
पुन्हां रात्रीं भेटीसी आले । राजकारण बोलूं लागले
म्हणति शक्तिवीण वायां गेले । प्रयत्न आजवरीचे
पूर्वकाळीं धनुर्विद्या । अस्त्र मंत्र शस्त्र साध्या
भारतभू झाली वंद्या । घातलें विश्व पायांतळीं
सांप्रत गेलें सर्व लया । कांहीं करितां न ये उपाया
म्हणाल तरी आणीन ठाया । प्राचीन विद्या सकल
शिवरामपंतीं ऐकून घेतलें । परी अंतरीं नाहीं मानवलें
हो हो ऐसें म्हणत राहिले । काळ गेला सरूनि

*　*　*

# ८

# काळानें उग्र स्वरूप धारण केलें
## ( १९०५ ते १९०८ )

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।

— भगवद्गीता

सन १९०५ मध्यें बंगालच्या फाळणीचें निमित्त पुरून जें राजकीय सक्रिय आंदोलन देशभर सुरू झालें, तें अपूर्व असें होतें. खरी गोष्ट अशी होती कीं, देशांत झालेल्या जागृतीमुळें लोकांच्या मनांत असंतोष धुमसूं लागला होता. त्याला आज ना उद्यां तोंड फुटल्याशिवाय गतचि नव्हती. कर्झन-शहांची अरेरावी कृति व उपमर्दकारक उक्ति आधींच सुशिक्षितांच्या जिव्हारीं लागल्या होत्या. त्यांत फाळणीचा फाळ शिरल्याबरोबर सगळी-कडे जोराची प्रतिक्रिया झाली. फाळणी रद्द करून घेण्याच्या मिषानें जी चळवळ सुरू झाली ती हां हां म्हणतां साऱ्या हिंदुस्थानभर पसरली. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण हीं तीन त्या चळवळीचीं प्रमुख अंगें मानलीं जाऊं लागलीं. पण त्या नांवांखालीं सभा, निदर्शनें, संप, होळ्या, दंगे वगैरे सर्व कांहीं होऊं लागलें. बंगालचे ले० गव्हर्नर फुल्लर यांचेवर लादली गेलेली निवृत्ति ही या लोकक्षोभाच्या आगींत पडलेली एक-प्रकारची आहुतिच होती. यांतूनच वंदेमातरम्‌चा जयघोष कायदेशीर ठरला. त्यांतच वीरनवाली—अत्याचार प्रकरणानें आगींत तेल पडल्या-सारखें झालें. जनतेंतला उत्साह, चैतन्य व चीड वाढतच चालली होती-सगळें वातावरण फिरून जात चाललें होतें. सरकार—विरोधी भावना

दिवसेंदिवस तीव्र होत चालली होती. ना० गोखल्यांसारखे जपून बोलणारे नेमस्तही या बाबतींत कडक भाषा वापरूं लागले होते. मग जहाल किंवा ज्वलज्जहाल मंडळींची स्थिति काय असेल हें सांगावयासच नको. या सुमारासच आयर्लंडमध्यें चालू असलेल्या सिनफेन चळवळीच्या धर्तीवर चालावें, असेही प्रयत्न झाले. टिळक १९०६ च्या जून महिन्यांत बंगाल्यांत गेले, त्यावेळीं त्यांनीं सिनफेन चळवळीची माहिती देणारीं पत्रकें आपल्याबरोबर नेलीं होतीं, तीं एका सभेंत वांटण्यांत आलीं. राजकीय क्षितिज सगळीकडून भरून आल्यासारखें झालें होतें. वर सांगितल्याप्रमाणें मेघांचा गडगडाट तर सुरूच होता, पण त्यांत आणखी क्रांतिकारकांच्या विजाही चमचमूं लागल्या !

या चळवळीचा सूर्य तीनचार वर्षें वर येत येत १९०८ सालीं मध्यान्हीं येऊन तळपूं लागला. क्रांतिकारक तरुण — त्या सूर्याचे प्रखर किरण — सरकारला प्रत्यक्ष चटका देऊं लागले. तोंपर्यंतच्या मधल्या अवधींतच सरकारच्या दडपशाहीचीं चक्रें फिरूं लागलीं होतीं. 'भाला' पत्रावरील खटला, लाला लजपतरायांची हद्दपारी, सरदार अजितसिंगांना अटक, त्याचप्रमाणें कॉंग्रेस-अध्यक्ष ना० गोखले यांचेंही कडक भाषण, बंगाल्यापर्यंत फैलावलेला शिवाजी-उत्सव, सुरतेचा संग्राम वगैरे महत्त्वाच्या व धामधुमीच्या घटना याच काळांतील होत. बंगाल आणि महाराष्ट्र या प्रांतांतल्या चळवळींत फार साम्य होतें. महाराष्ट्रानें या प्रसंगीं बजाविलेल्या कामगिरींत शिवरामपंतांनीं मोठा वांटा उचलला होता. यावेळीं मूळच्याच तिखट असलेल्या त्यांच्या वाणी—लेखणीला अधिकच स्फुरण चढलें व दोन्ही हातांत पट्टे चढवून मैदानांत उतरावें त्याप्रमाणें या दोन्ही साधनांचा त्यांनीं या प्रसंगीं जास्तींत जास्त उपयोग केला.

सहाव्या प्रकरणाच्या शेवटीं 'हृदयाविष्करणाची' जी हकीगत दिली आहे, त्यानंतरच्या काळाच्या पुढच्याच अंकांत शिवरामपंतांनीं मुद्दाम 'दगडी कोळसा' असा दिसण्यांत निरुपद्रवी व नेभळट विषय शोधून काढून त्यावर अग्रलेख लिहिला. पण तो लेखही A wolf in a Sheep's clothing या मासल्याचाच होता. कारण, या कोळशाच्या

खाणींतही प्राणघातक हिरकण्या बऱ्याच होत्या ! सदर लेखाच्या प्रारंभींच सरकारला, 'नृपांगणगत खलां'ना आणि नेमस्त पत्रांना आमचे सद्यःस्थितीवरचे सडेतोड लिहिलेले लेख आवडत नाहींत म्हणून वरील मंडळींना पसंत पडावा म्हणून आम्हीं मुद्दाम दगडी कोळशासारखा अगदीं बेचव आणि नीरस विषय शोधून काढला आहे असें लिहून खिजविलें होतें; व शिवाय सदर लेख शक्य तितक्या नीरसपणानें लिहून झाल्यावरही त्यांत चुकून कोठें तिखटपणा, झणझणीतपणा किंवा चटकदारपणा राहील या भीतीनें आम्हीं तो एका मोठ्या वजनदार नेमस्त गृहस्थाच्या डोळ्याखालीं घालून मग छापला आहे, असा निर्वाळाही त्या लेखांत देण्यांत आला होता ! ज्या बिचाऱ्या नेमस्त पत्रांनीं काळाचे लेख कडक असतात अशी कोल्हेकुई केली होती व ज्यांच्या कॉलमांतून सरकारच्या अन्यायावर अगर दुष्कृत्यावर टीका न येतां कांहींतरी नेभळट व पाणचट अशा विषयांचें विवेचन मात्र येई त्यांच्यावर केलेली ही 'शिवरामपंती' होती. परंतु दगडी कोळसा असा नेभळट मथळा दिला असला तरी हरदासाची कथा जशी मूळपदावर येते, त्याप्रमाणें आंत शिवरामपंतांनीं लिहावयाचें तेंच लिहिलें होतें ! असो. यापुढें मात्र 'काळ' पत्रानें खरोखरीच आपलें उग्र स्वरूप प्रकट केलें. देशांतील जागें झालेलें लोकमत व अनुकूल तऱ्हेनें बदलत चाललेलें वातावरण ओळखून काळांत व्यंगोक्तीचा बुरखा वारंवार बाजूला ठेवून देऊन स्पष्टोक्तीचा आणि स्वभावोक्तीचा आश्रय केलेला दृष्टीस पडूं लागला.

१९०५ पासून १९०८ पर्यंतचीं तीनचार वर्षें काळानें बजावलेल्या कामगिरीचें वर्णन एका प्रकरणांत करणें केवळ अशक्य होय. या अवधींत परराष्ट्रीय घडामोडींचें मार्मिक विवेचन, देशांतील निरनिराळ्या विचारप्रवाहांचें वर्गीकरण, जगाच्या पाठीवर त्यावेळीं चाललेल्या लढाया व क्रांत्या यांचा इतिहास, आणि त्यांच्या बुडाशीं असलेलीं तत्त्वें, भारतीयांवर राज्यकर्त्यांकडून अनेक बाजूंनीं होणारें आक्रमण, त्यावर उपाय म्हणून स्वदेशी–बहिष्कार–Passive Resistance इत्यादींचा पुरस्कार, संपासारख्या राजकीय शस्त्राची उपयुक्तता, हिंदुस्थानांतील गरीब रयतेचे हाल वाचकांपुढें मांडून त्यांना सद्यःस्थितीची करून दिलेली जाणीव,

शिवाजीच्या स्फूर्तिदायक चारित्रांतील गत गोष्टी पण त्यांत चालू चळवळी-करितां प्रकट झालेलें गुप्त संसूचन, इत्यादि 'काळा'तल्या विषयांचा परामर्ष ध्यावयाचा तर त्याचा एक स्वतंत्र ग्रंथच होईल. शिवाय त्यांतले 'निवडक निबंध' अजून जप्त आहेत ही आणखी एक अडचण. म्हणून या काळांतल्या लेखन-प्रवाहाचें धावतें चित्र रेखाटून जी काय कल्पना येईल त्यांतच समाधान मानून घेणें भाग आहे.

सन १९०५ च्या पाडव्यापासून 'काळा'चा आकार दुप्पट झाला. त्याबरोबरच त्यांतल्या लिखाणाचा जोमही द्विगुणित झाला यांत शंका नाहीं. रशियांत त्यावेळीं लोकांनीं झारची जुलमी राजसत्ता उलथून पाडण्याकरितां जे प्रयत्न चालविले होते त्यांच्या हकीकतीची तर काळाची पार्श्वभूमीच बनलेली होती, असें म्हणावयास हरकत नाहीं. या विषयावर चारदोन कॉलम नाहींत असा प्रायः एक अंकही त्यावेळचा सांपडावयाचा नाहीं. परंतु या विषयाच्या तात्त्विक बाजूचा विचार पुढें स्वतंत्र प्रकरणांत केला असल्यामुळें इथें दुसरे चालू अगर नैमित्तिक विषय कोणते होते तें पाहूं. स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीप्रीत्यर्थ तर अंकच्या अंक खर्ची पडत होते. ता. २० ऑक्टोबर १९०५ च्या अंकांत आम्हीं स्वदेशी कागद वापरण्याचें ठरविलें आहे हें अभिमानानें सांगतांना काळानें असें लिहिलें होतें.

> " स्वदेशी चळवळ या विषयाचा उपदेश ज्या कागदावर छापला जावयाचा तो कागदही स्वदेशी असणें अत्यंत इष्ट आहे. परंतु स्वदेशी कागद विलायती कागदाइतके स्वस्त पडत नाहींत व त्यामुळें एकंदरींत खर्चाचा आंकडा बराच वाढतो. आतां अशी अडचण आहे तरीही आम्हीं आपले अंक स्वदेशी कागदावर काढण्याचें ठरविलें आहे. मागील अंकाला मिळाले तितके स्वदेशी कागद घातले होते. व या अंकाला कागद वेळेवर न मिळाल्यामुळें जरी सर्व अंक स्वदेशी कागदावर छापतां आले नाहींत तरी बऱ्याच प्रतींना या आठवड्याला स्वदेशी कागदच वापरण्यांत आला आहे. व पुढें लवकरच सर्व प्रती स्वदेशी कागदावर काढण्याचा विचार ठरविला आहे. "

याच वर्षीच्या म्हणजे १९०५ च्या जूनमध्यें बाळा गोविंद पारखे नांवाच्या माळी जातींतल्या बाटून ख्रिश्चन झालेल्या इसमास पावन करून घेतला, त्याबद्दल कार्यकर्त्यांचें काळानें अभिनंदन केलें. बाटून परधर्मांत गेलेल्या सर्वांना आपण अशा रीतीनें आपल्यामध्यें घेण्याला सुरवात केली पाहिजे असें स्पष्ट लिहून जगद्गुरु शंकराचार्य यांनींही या कामांत लक्ष घालण्याची वेळ आली आहे, असा त्यांस इषारा दिलेला होता. त्याचे पूर्वी "फक्त अर्धा उपास!" —हा हृदयाला तोडणारा अग्रलेख प्रसिद्ध झाला होता. पुढच्या एका लेखांत भिक मागून कुणी हक्क देत नाहीं, हें तत्त्व अर्वाचीन व प्राचीन इतिहासानें सिद्ध झालेलें आहे हें उदाहरणें देऊन विशद करून सांगितलें आहे. त्याचप्रमाणें लॉर्ड कर्झनसाहेब राजिनामा देऊन परत चालले, त्यावेळचें काळांतील स्पष्टोक्तिपूर्ण स्फुट पहाण्यासारखें आहे.

> "लॉर्ड कर्झन साहेबांना राजिनामा देण्याची पाळी आलेली पाहून बंगाल्यांत कोणासही वाईट वाटलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर उलट ही ब्याद निघून गेल्यावर वंगभंगाचा प्रश्न मागें पडेल असेंही त्यांना वाटलें होतें......त्यांचा राजिनामा मंजूर होऊन दुसऱ्याही गव्हर्नर जनरलची नेमणूक झालेली असल्यामुळें मावळत्या लाट साहेबांची कारकीर्द आतां आसन्नमरण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां ते यावेळीं प्रायश्चित्त घेतील व प्रायश्चित्ताचीं बरींच कृच्छ्रें आपल्या वांटणीस येतील असें साध्या भोळ्या सात्त्विक बंगाली लोकांस वाटावें यांत नवल नाहीं. पण लॉर्ड कर्झन साहेब हे सामान्य मानवी कोटींतले नसून आसुरी वैभवानें धुंद झालेल्या दुर्योधनाच्या कोटींतील होत."

अशा झणझणीत तऱ्हेनें काळकर्त्यांनीं कर्झन-कारकीर्दीविषयींचा आपला निषेध व्यक्त केला होता.

या वर्षाअखेर ना. गोखले आपली विलायतेंतील कामागिरी बजावून हिंदुस्थानांत परत आले. त्यावेळीं त्यांचा मुंबई आणि पुणें येथें चांगला सत्कार झाला असें कळवून अशा प्रसंगीं सर्व मतांचे लोक आपापले बारीकसारीक मतभेद क्षणभर विसरून एकत्र झाले होते,

याबद्दल काळानें आनंद व्यक्त केला होता. परंतु ना. गोखल्यांनीं कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून स्वदेशी चळवळीला बहिष्कारयोगाची जोड देऊं नये असें जें प्रतिपादन केलें होतें त्यावर काळांत खालील टीका आली—

"... ... ... परंतु ना. प्रो. गोखले ह्यांनीं बहिष्कारयोगासंबंधानें जे उद्गार काढले आहेत ते वाचून लोकांची पूर्ण निराशा झाल्यावांचून राहणार नाहीं. नामदारांनीं राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून सर्व हिंदी लोकांस असें कळविलें आहे कीं, 'स्वदेशी चळवळ ही फार चांगली आहे. ह्या चळवळीनें देशी उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळून देशाची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा संभव आहे. परंतु या चळवळीला बहिष्कारयोगाची जोड देऊन उपयोगी नाहीं. कारण बहिष्कारयोग हा फार जालीम व कडक उपाय आहे. त्याचा एव्हांच उपयोग करून उपयोगी नाहीं. देशांतील सगळे लोक ज्यावेळीं खडबडून जागे होतील व उन्नतीला दुसरा मार्गच राहाणार नाहीं अशा शोचनीय अवस्थेंत उपयोग करण्याकरितां हें शस्त्र राखून ठेवलें पाहिजे. सध्यांच्या स्थितींत ह्या बहिष्कारयोगापासून कांहीं फायदा न होतां सरकारी अधिकाऱ्यांच्या मनांत आपणांविषयीं अप्रेम उत्पन्न होत आहे. असें होणें आपणांस अपायकारक आहे, करितां बहिष्कारयोग आपण सोडून दिला पाहिजे.' निर्वाणीची आणि आणीबाणीची वेळ ह्याचा नामदारांनीं स्पष्ट खुलासा केला असता तर बरें झालें असतें. कारण सध्यांची वेळ हीच आणीबाणीची वेळ आहे असा पुष्कळांचा समज आहे. ह्याहून आणीबाणीची वेळ ती कोणती? नामदारांचें मत कांहींही असो, स्वदेशी चळवळीला बहिष्कारयोगाची जोड दिल्याशिवाय स्वदेशी चळवळीचें पाऊल पुढें पडणार नाहीं; व तिच्यांत जोमही रहाणार नाहीं हें निर्विवाद आहे. स्वदेशी चळवळीनें इंग्लंडांत जी गडबड उडाली आहे व अमेरिकन लोकांच्या अंतःकरणांतही हिंदुस्थानच्या लोकांविषयीं जो आदर उत्पन्न झाला आहे त्याचें कारण बहिष्कारयोगच आहे हें विसरतां कामा नये."

हाच नेमका मवाळ व जहाल पक्षांच्या वृत्तींतला फरक होता. आणि सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां तो सांधला जाणेंही अशक्य होतें. अखेर

सुरतेच्या कॉंग्रेसच्या वेळीं तो कांहींतरी वरपांगी निमित्तानें चांगलाच बाहेर फुटून निघावयाचा होता !

ता. १२ फेब्रुवारी १९०६ रोजीं भालाकार भोपटकर यांस 'नरकाचा दरबार' हा राजद्रोही लेख लिहिल्याबद्दल हायकोर्टांत खटला चालून सहा महिन्यांची शिक्षा झाली. भालाकारांतर्फे बचावाचें काम बॅ. दावर यांनीं केलें होतें. पण तें करतांना आपल्याच पक्षकारास मूर्ख आणि वेडा ठरवून त्याचें संरक्षण करण्याचा प्रयत्न बॅरिस्टरसाहेबांनीं केला होता. या विलक्षण प्रकारावर काळांत खालील टीका आली—

"देशबंधु भोपटकर यांनीं आपल्याच वकिलाकडून आपल्याला असे शेलके अपशब्द मिळवून घेण्यासाठीं खात्रीनें आपले पैसे खर्च केले नसलें पाहिजेत. बाकीचे लोक कांहींही म्हणोत, परंतु वकिलांनीं तरी निदान चार घटका जें भाडोत्री काम करावयाचें तेवढ्या वेळेंत आपल्या पक्षकाराला उद्देशून कोणताही वाईट शब्द आपणहून वापरतां कामा नये. वकील जुने आरोप पुसून टाकण्याकरितां केलेले असतात, त्यांच्याकडून नवीन आरोप आपल्यावर करून घेण्यासाठीं ते केलेले नसतात. निष्कारण अपशब्द सोसून एकादा कार्यभाग साधून घेण्यापेक्षां तो न साधलेलाही बरा हाच उत्तम पक्ष होय."

पुढें आपल्यावरील राजद्रोहाच्या खटल्यांत शिवरामपंतांनीं स्वतःचा बचाव स्वतःच केला त्याचें कारण भालाकारांच्या खटल्यांत आलेला हा विचित्र अनुभवच असावा. आणखी दोन वर्षांत हेंच बॅरिस्टर दावर मुंबई हायकोर्टाच्या न्यायासनावर चढले व त्यांच्याच पुढें काळकर्त्यांचा खटला चालला. भालाकारांच्या खटल्यांत बॅ. दावर यांनीं खटला चालवितांना पक्षकारांशीं द्रोह केला म्हणून काळकर्त्यांनीं पत्रकार या नात्यानें त्यांना दोषी ठरविलें खरें. पण १९०८ मध्यें काळकर्त्यांनीं राजाशीं द्रोह केला असें धरुन दावर यांनीं न्यायासनावरून काळकर्त्यांना दोषी ठरविलें !

याच सुमारास सनदशीर चळवळीचे भोक्ते महर्षि दादाभाई नवरोजी यांना इंग्लंडांत पार्लमेंटच्या निवडणुकींत अपयश आलें. व ते निराश

होऊन मायभूमीला परत येण्याच्या विचारांत होते. त्यावेळीं काळानें दादाभाईना उद्देशून—

"अहो हिंदुस्थानचे उत्तम देशभक्त दादाभाई महाराज, सुईच्या अग्रावरची मातीसुद्धां मिळावयाची नाहीं, हें आपण सिद्ध करून दाखविलें आहे. याबद्दल हिंदुस्थानचे सर्व लोक आपले फार आभारी आहेत."

असें लिहून '**आपल्यासारख्या वृद्धांच्याच शिक्षणानें हिंदुस्थानांत एक नवीन तरुण हिंदुस्थान तयार होत आहे**' अशी ग्वाही दिली होती. स्वातंत्र्य याचनेनें मिळत नसतें, स्वावलंबी बनून तें हिसकून घ्यावें लागतें, हा या लिखाणांतील रोख अगदीं स्पष्ट आहे.

'**विषासाठीं कंठशोष**' ही शिवरामपन्तांची सुप्रसिद्ध वक्रकथा १९०६ च्या फेब्रुवारींत पहिल्यांदा प्रसिद्ध झाली. त्यानंतर हृदयाला पाझर फोडणारी '**एका खडी फोडणाऱ्याची गोष्ट**' त्याच्या मागोमागच काळाच्या वाचकांच्या मनावर छापली गेली!

स्वदेशी चळवळीपासून काळानें एक नवी टूम सुरू केली होती ती सांगण्यासारखी आहे. कोणाही हिंदी माणसाच्या नांवाचा उल्लेख करावयाचा झाल्यास, त्याच्या नांवामागें त्यावेळच्या प्रचलित पद्धतीप्रमाणें रा. रा. किंवा मि० (मिस्टर) असें न छापतां दे० हें अक्षर काळांत लावलें जाई! प्रत्येक हिंदी मनुष्य देशभक्त असलाच पाहिजे, निदान तसा तो असावा या काळकर्त्यांच्या मनांतल्या विचाराचेंच तें गमक होतें. Wish is the father of thought यांतलाच तो प्रकार होता.

असो. विस्तार टाळण्याकरितां यापुढील एकदोन वर्षांतील महत्त्वाच्या लेखांचा नामनिर्देश करूनच पुढें गेलें पाहिजे; तथापि त्या लेखांचे मथळेही अगदींच बोलके नाहींत असें नाहीं.

**रामदासांच्या शब्दांत स्वराज्यासाठीं प्रार्थना**; इंग्लिशांची परोपकारबुद्धि; **हिंदुस्थानांत काय संतोष माजला आहे!**; लो० टिळक हेच अध्यक्ष व्हावेत; ट्रान्सव्हालमधील जुलूम व हिंदी राष्ट्राचा अपमान; **तें झाड अजून आहे ना हो!**; गुलामांचें राष्ट्रीय शिक्षण; जोसेफ

मॅझिनी यांचें आत्मचरित्र व राजकारण; असंतोषावर औषध; मोठे-पणाचा वीट; शांततापरिषद् आणि गुलाम राष्ट्रें; जशास तसें पाहिजे होतें; सुरतेची काँग्रेस, काँग्रेस मोडण्याकरितां नेमस्तांची कारस्थानें; आमचे गलबतांचे कारखाने कोठें गेले?; माझ्या पर्वता!; बॉंब गोळे हिंदुस्थानांत येण्याला मूळ कारण इंग्लिश लोकच!

याखेरीज एका लेखांत हिंदी भाषा ही पार्शिअन व संस्कृत या भाषांची अल्लड कन्या होय असें म्हणून इंग्रजीचे ऐवजीं तीच राष्ट्रभाषा व्हावी असें म्हटलें होतें. दुसऱ्या एका लेखांत रूसो-जपानी युद्धांत जपानी लोकांनीं पराक्रम गाजवून एशिआटिक लोक नेभळट, कर्तृत्वशून्य व दास्यांत रहाण्याला योग्य या कल्पनेचा चुराडा उडवून Asia for Asiatics या कल्पनेला जोराची चालना दिली आहे, असें नमूद केलें होतें. या वर्षीच्या अंकांत पुन्हा Passive Resistance वर एक स्फुट लिहून त्यांत संप म्हणजे लढाई नसली तरी तो लढाईचा धाकटा भाऊ आहे इत्यादि विषय त्यांत मांडलेला होता. १९०७ सालचे मध्याचे सुमारास मुंबईचे जुने गव्हर्नर लॉर्ड लॅमिंग्टन हे आकस्मिक राजीनामा देऊन निघून जाऊन त्यांचे जागीं सर जॉर्ज क्लार्क—नंतरचे लॉर्ड सिडनहॅम—येऊन त्यांनीं इलाख्याच्या कारभाराचीं सूत्रें हातांत घेतलीं होतीं. याच वेळीं काळकर्त्यांनीं क्लार्क साहेबांच्या पूर्वेतिहासाची कुंडली मांडून त्यांची कारकीर्द मागल्या गव्हर्नरांप्रमाणें शांततेची जाण्याचा रंग दिसत नाहीं असें भविष्य वर्तविलें होतें. पुढें लवकरच विहारी पत्राचें संपादक दे. फडके यांचेवर खटला झाला त्यावेळीं अशाच प्रकारचें 'विहारी'च्या खटल्यावरील कांहीं विचार 'काळ'नें प्रदर्शित केले होते, व त्यांत हिंदुस्थानांत देशभक्तीचें लिहिणें लिहिल्याबद्दल लेखकाला तुरुंगांत बसावें लागतें, याबद्दल खेद व्यक्त केला होता. दडपशाहीबाबतचें वरील भविष्य लवकरच तंतोतंत खरें ठरलें. कारण त्यानंतर सुरू झालेल्या शिक्षा-सत्रांत 'काळ' व 'केसरी' यांच्या संपादकांनाही जबर शिक्षा ठोठावण्यांत आल्या.

वर सांगितलेले लेख हे प्रायः नैमित्तिक स्वरूपाचे व चालू राजकारणावर लिहिलेले असे आहेत. पण याखेरीज प्रतिभाविलासाच्या दृष्टीनें अत्यंत उच्च आणि त्यांतल्या गुप्त संसूचनाच्या दृष्टीनें अनुपम असे मनोवृत्ति थरारून सोडणारें शिवाजीचें पुण्याहवाचन, अदृश्य क्रांतिकारकांची परिषद्, एक कल्पित गोष्ट, शिवाजीची एक रात्र, दिल्लीचें तक्त आणि भाऊसाहेबांचा घण, मृत्यूचा दरबार, एक ऐतिहासिक पदार्थसंग्रहालय, जुनीं मढीं आणि नवीं अंतःकरणें, इत्यादि एकापेक्षां एक अनेक सुंदर सुंदर लेख 'काळांत' या काळांत येत असत. कायद्याचा डोळा चुकवून नव्हे, डोळ्यादेखत— पण त्याच्या टप्प्याच्या बाहेर राहून लिहिलेले हे लेख म्हणजे गद्यकाव्याचे व गनिमीकाव्याचे उत्कृष्ट नमुने आहेत! अशा प्रकारच्या काळांतील लेखनाचा लोकमतावर फार परिणाम होत चालला आहे, हें सरकारला जाणवूं लागलें होतें. काळाचे लेख वाचून तरुणांनाच काय पण वृद्धांनाही चेव येई. मग तरुणांचीं डोकीं भडकून जात असलीं तर त्यांत नवल काय? काळांतील विचारसरणीचा किंवा तत्त्वज्ञानाचा वाचकांच्या मनावर अंमल बसून त्यांत सांगितलेले मार्ग चोखाळल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें मत बनण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति होत असे! शिवराम-पंतांनीं जरी उघड अत्याचाराचा उपदेश केला नाहीं तरी त्यांच्या लिखाणावरून काय बोध घ्यावयाचा तो लोक घेत.

पण काळकर्ते नुसते काळांत लिहून स्वस्थ बसले नव्हते. या सुमारास लेखणीबरोबरच कदाचित् अधिक प्रखर व परिणामकारक असें आपलें दुसरें अस्त्र त्यांनीं बाहेर काढलें होतें. पुण्यांतल्या विलायती कापडाच्या होळीचें वर्णन मागील प्रकरणांत आलेंच आहे. याखेरीज दौरे, व्याख्यानें, तरुणांशीं खलबतें हे उद्योग चालूच होते. या सुमारास त्यांच्या उमेदीला जणूं कांहीं बहर आलेला होता. स्वदेशी-बहिष्काराच्या चळवळींत त्यांचीं शेंकडों व्याख्यानें झालीं असतील. त्यांचीं व्याख्यानें ऐकून स्वदेशीच्या शपथा घेतलेले कित्येक लोक अजूनही सांपडतात. शिवरामपंतांचा नाशिकचा संस्मरणीय दौरा याच काळांतला. दहा दहा हजारांचा श्रोतृसमुदाय त्यांच्या अस्खलित वाक्प्रवाहानें मुग्ध होऊन तीन

तीन तासपर्यंत नागासारखा डुलत रहात असे. ते मनांत आणीत तेव्हां श्रोत्यांच्या चित्तवृत्ति थरारून सोडीत असत. हा काळ म्हणजे त्यांच्या वक्तृत्वाचा वसंतऋतु होता. या सुमारास त्यांनीं वाग्वैभवाचा विक्रमांक गांठलेला होता यांत शंका नाहीं. यामुळें वैयक्तिक दृष्ट्या या वेळीं ते लोकप्रियतेच्या शिखरावर होते. लोकमान्य टिळक एवढे सव्यसाची, तेजस्वी नेते खरे; पण शिवरामपंतांची सुवेषभूषित भव्य आकृति आणि अप्रतिम वाक्‌चातुर्य यांची कांहीं विलक्षण मोहिनी व छाप पडून शिवरामपंतांबद्दल लोकांना अधिक आकर्षण वाटत असे. त्यावेळच्या तरुणांना व शाळा–कॉलेजांतील विद्यार्थ्यांना तर त्यांच्या व्याख्यानाचें वेडच लागलें होतें.

या काळांतील त्यांचीं व्याख्यानें कशीं वठत असत आणि त्यांचा परिणाम श्रोतृवृंदावर कसा होत असे याबद्दलची कल्पना येण्याकरितां श्री. द. प. चिंचाळकर यांनीं वर्णिलेला एक वक्तृत्वप्रसंग खालीं दिला आहे––

"स्वदेशी, बहिष्कार आणि स्वराज्य या विषयांनीं तरुण लोकांचीं अंतःकरणें भारून गेलेलीं होतीं व तरुण समाजांत उत्साहातिरेक उत्पन्न झालेला होता. अशा प्रसंगांतलि एका सभेंत एके वेळीं शिवरामपंत भाषण करण्यास उभे राहतांच टाळ्यांचा प्रचंड गजर झाला. तो कडकडाट थांबतांच "फ्रान्समध्यें जेव्हां राज्यक्रांति झाली—" या वाक्यापासून शिवरामपंतांनीं आपल्या भाषणास सुरुवात केली; परंतु ज्या आवेशानें व भावनेनें हें मंत्रवाक्य उच्चारण्यांत आलें त्या आवेशाला व भावनेला ५ मिनिटेंपर्यंत टाळ्यांचा कडकडाट मिळाला व तो संपेपर्यंत पुढें भाषणच करतां येईना. अशा रीतीनें तरुणांचा उत्साह वाढविणारें तें एक प्रासंगिक संक्षिप्त भाषण दर मिनिटाला टाळ्या घेत घेत १५।२० मिनिटांत पूर्ण झालें."

अशा रीतीनें शिवरामपंत आपल्या लेखनवक्तृत्वाच्या जोडगोळीच्या साहाय्यानें क्रांतिकारक विचारसरणीचा प्रसार करीत होते, तरी राष्ट्रीय सभेच्या राजकारणांत ते टिळकांच्याच बाजूला होते. सुरतेच्या कॉंग्रेसमध्यें जहाल आणि मवाळ यांच्यांत जो अपूर्व संग्राम झाला त्यांत शिवरामपंत अर्थातच

टिळकांच्या बाजूला होते. कॉंग्रेसच्या मंडपांत झालेली दंगल, आधींच्या व नंतरच्या वाटाघाटी, मागाहून भरलेली नॅशनॅलिस्टांची सभा, या सर्वांत शिवरामपंत हजर होतेच. सुरत कॉंग्रेसमधील जहाल–मवाळ फुटीचा आणि त्यानंतर सरकारनें सुरू केलेल्या दडपशाहीचा काय कार्यकारणसंबंध असेल तो असो. पण सुरतेच्या दुहीनंतर राष्ट्रीय जहाल गटांतील पुढाऱ्यांवर खटले केले तर निदान लोकमताचा कांहीं भाग तरी आपल्या बाजूला राहील अशी खूणगांठ सरकारनें मनाशीं खासच बांधली असेल. सुरतेच्या कॉंग्रेसनंतर बाबू अरविंद घोष पुण्यास आले होते. बंगालमध्यें पसरत चाललेला बॉंब संप्रदाय महाराष्ट्रांतही अवतरलेला आहे हें अरविंद-बाबूंना या भेटींत समजलें. या मुक्कामांत शिवरामपंतांनीं त्यांना आपल्या घरीं थाटाची मेजवानी देऊन त्यांचा सत्कार केला. कर्झनसाहेबांसारख्या अधिकाऱ्यांच्या अविचारी अरेरावीनें, लाला लजपतरायांसारख्या देश-भक्तांच्या हद्दपारीनें, व इतरत्र सरकारनें अनुसरलेल्या अनुदार व प्रतिगामी धोरणानें देशभर उत्पन्न झालेला व स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीनें शत-गुणित झालेला तीव्र असंतोष राष्ट्रीय पक्षाच्या रूपानें कॉंग्रेसमध्यें डोकें वर काढीत होता. या ताज्या दमाच्या नवीन पक्षांत नवा जोम होता, तेजस्विता होती. पूर्वींच्या कलाकलानें बेताबेतानें रागरंग पाहून वागणाऱ्या पुढाऱ्यांपेक्षां या नव्या लोकांचें लक्षण निराळेंच होतें.

या सुमारास असंतोषाची व चळवळीची वावटळ देशभर उठून राज-कारणाला असा कांहीं रंग येत चालला होता कीं,प्रतिपक्षाला आतां काय होतें आणि काय न होतें याची भीतीच वाटावी. या सर्व प्रकाराला वेळींच पायबंद बसावा या हेतूनें सरकारनें सर्वत्र दडपशाही सुरू केली. मुंबई इलाख्यांत मे अखेर हिंदस्वराज्य, विहारी व अरुणोदय या पत्रांवर खटले करण्यांत आले व त्यांच्या संपादकांना शिक्षाही सांगण्यांत आल्या.

ता. २०–३–०८ रोजीं झालेली पुणें जिल्हा परिषद् व त्यानंतर पुण्यांत झालेली मद्यपाननिरोधनाची चळवळ यांत शिवरामपंतांचा भाग होताच. एप्रिल अखेर धुळें येथें भरलेल्या १५ व्या प्रांतिक सभेला ते हजर होते, व आपल्या देशांतील लोकांनीं राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न हातीं घ्यावा, आणि राष्ट्राच्या हल्लींच्या परिस्थितीला अनुरूप अशा

रीतीनें राष्ट्रीय हुकमतीखालीं आणि राष्ट्रीय धोरणाप्रमाणें, वाङ्मयात्मक, शास्त्रीय, यांत्रिक वगैरे विषयांसंबंधींची शिक्षणपद्धति सुरू करावी अशा आशयाचा राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव त्यांनींच मांडला होता. ता. ३ व ४ मे रोजीं वसई प्रांतिक सभेचें वसई येथें भरलेलें अधिवेशन शिवराम-पंतांच्या अध्यक्षतेखालीं झालें. टाळ्यांच्या व वंदेमातरम्च्या गजरांत अध्यक्षस्थान स्वीकारल्यावर प्रो. परांजपे यांचें पुढें दिल्याप्रमाणें अस्खलित, सुश्राव्य व वक्तृत्वपूर्ण असें एक तासपर्यंत भाषण झालें.

"हल्लीं सर्वत्र जी जागृति दिसत आहे ती पुष्कळ दिवसपर्यंत सांठत आलेल्या निरनिराळ्या गोष्टींचें फळ आहे. ज्याप्रमाणें चार महिनेपर्यंत अंत-रिक्षांत वाफ सांचत असते व पुढें पर्जन्यरूपानें त्या वाफेचे मेघ ह्या पृथ्वी-तलावर कोसळतात, तद्वतच हल्लींची जागृति ही दोन वर्षें चालू असलेल्या चळवळीचेंच केवळ फळ नसून आजपर्यंत इंग्लिशांच्या अंमलाखालीं ज्या वऱ्यावाईट स्थितींतून आपणांस जावें लागलें व हल्लींही जावें लागत आहे, व त्याच्या योगानें आपल्या मनावर जे परिणाम झाले व होत आहेत त्यांचें हें फळ आहे. स्वदेशोन्नत्यर्थ हल्लीं जिकडे तिकडे सर्व देशभर सभा स्थापन होत आहेत व जो तो आपल्यापरी देशाची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करीत आहे. कोणी स्वदेशी व बहिष्कारसंबंधानें खटपट करीत आहेत कोणी औद्योगिक बाबतींत चळवळ करीत आहेत, व कोणी मद्यपान निषेधाची खटपट करीत आहेत, व कांहीं संस्था सामाजिक सुधारणा करीत आहेत. पण या सर्वांचा रोख आपल्या देशबांधवांची स्थिति सुधारण्याकडेच आहे. ह्या सर्वांचें कारण बंगालची फाळणी असें वरवर पहाणारास वाटेल. परंतु खरें पाहिलें असतां बंगालची फाळणी हें एक निमित्त झालें आहे. परमेश्वराचे मनांत एखादें इष्ट कार्य घडवून आणावयाचें असलें म्हणजे असेंच एखादें निमित्तमात्र तो उत्पन्न करीत असतो." ह्याप्रमाणें सांगितल्यावर सभेपुढें येणाऱ्या ठरावासंबंधानें त्यांनीं थोडक्यांत भाषण केलें. व त्यांतले त्यांत जमलेल्या शेतकरी व कामगार लोकांस फारच कळकळीचा व त्यांस समजेल अशा रीतीचा त्यांनीं उपदेश केला. ते म्हणाले, "आम्ही जी ही सर्व खटपट करीत आहों ती तुमच्या हितासाठीं असल्यामुळें त्यांत तुमच्या मदतीची आम्हांला जरूर आहे. दारूच्या योगानें १० कोट रुपये सरकारच्या घरांत

जात आहेत. तुम्ही सर्व जर मद्यपानापासून पराङ्मुख व्हाल, तर हे दहा कोट रुपये दर वर्षास वांचतील. हें सर्व तुमच्या हातीं आहे. त्याचप्रमाणें सरकारसारा कमी होण्याविषयीं देखील जारीनें खटपट चालू आहे. सारांश असल्या सभांना तुमच्यानें होईल तितकी मदत केली पाहिजे." अशा रीतीचा कळकळीचा उपदेश करून त्यांनीं आपलें भाषण आटोपलें.

वसईची परिषद् आटोपून शिवरामपंत् पुण्यास परतले त्याच सुमाराला बंगाल्यांत मुझफरपूर या ठिकाणीं बॉंब गोळा फेकून खुदीराम बोस व प्रफुल्लचंद्र चाकी यांनीं मिसेस केनेडी व त्यांची मुलगी यांचे प्राण घेतले, अशी बातमी आली. शिवरामपंतांनीं यावर काळांत 'हिंदुस्थानांत बॉंब-गोळे येण्याला मूळ कारण इंग्लिश लोकच!' असा लेख लिहिला व पुन्हां ता. १५-५-०८ च्या अंकांत या विषयाची चर्चा केली. यानंतर आठ-पंधरा दिवसांतच लोकांना कुणकुण लागली कीं, काळकर्त्यांवर खटला होणार! याच दिवसांत त्यांचे धाकटे बंधु विष्णुपंत यांच्या कन्येचें लग्न भोरास झालें. लग्नाला शिवरामपंत जाऊन आले तेव्हांही शिवरामपंतांना पकडणार हीच बातमी आणि बोभाटा वातावरणांत जिकडे तिकडे झाला होता. पण नक्की बातमी कोणाला कशी कळणार?

९

# स्वदेशभक्तीवर राजद्रोहाचा आरोप

## ( १९ महिन्यांची शिक्षा )

" वाटेल तर मला आपण दोषी ठरवून शिक्षा करा, मी भोगण्यास तयार आहें; पण देशभक्तीसारख्या उज्ज्वल कल्पनेला गुन्हेगारीचें काजळ फांसूं नका. "

—हायकोर्टांत ज्यूरीला उद्देशून शिवरामपंत परांजपे

गुरुवार ता. १९ जून सन १९०८ रोजीं सकाळीं सहा वाजण्याचे सुमारास पुणें येथील पोलिसांपैकीं मि. किंग, मि. डेविस, मि. पॉवेल व मुंबईचे पोलिस इन्स्पेक्टर मि. सुलेव्हान ह्या अधिकाऱ्यांसह पांच सहा युरोपियन पोलिस व पंचवीस तीस नेटिव्ह पोलिस व कांहीं घोडेस्वार यांनीं ' काळ ' ऑफिसला वेढा दिला. पुणें जिल्ह्याचे पोलिस सुपरिंटेंडेंटही ह्या पोलिस सैन्याबरोबर होते. चोहोंकडून गराडा दिल्यानंतर मि. किंग व इतर अधिकारी यांनीं प्रो. शिवराम महादेव परांजपे यांना त्यांचे निजण्याचे खोलींत मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. ॲस्टन यांच्या सहीचें वॉरंट दाखवून पकडलें ! इं. पीनल कोडचें कलम १२४ अ व १५३ अ ह्या कलमांखालीं त्यांजवर आरोप ठेवण्यांत आला आहे असें वॉरंटांत नमूद केलें होतें, परंतु काळांतील कोणते लेख राजद्रोही म्हणून धरण्यांत आले हें नमूद केलें नव्हतें. ' काळ ' ऑफिसचें झडतीचें काम सुमारें तीन तास चाललें होतें. झडतींत ऑफिसांतील वह्या, पावत्या,

---

या प्रकरणांतील खटल्याची हकीगत त्यावेळींच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांतील माहितीच्या आधारें लिहिलेली आहे. भाषा व शब्दप्रयोग त्यावेळचें वातावरण मनांत भरण्याकरितां मुद्दाम तसेच ठेवले आहेत.

पत्रव्यवहार, पुस्तकें, हस्तलिखित मजकूर, वगैरे एका गाडीच्या भरतीचें सामान जप्त करण्यांत आलें. झडतीचें काम संपल्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनीं शिवरामपंत यांस सांगितलें कीं, आपण पोषाख करून आमचे-बरोबर चलावें. शिवरामपंतांस त्यांचे निजण्याचे खोलींत धरल्याकारणानें प्रातर्विधि करण्यास सवड झाली नव्हती व दूध वगैरे घेतलें नसल्याकारणानें त्यांचे चिरंजीव कृष्णाजीपंत यांनीं पोलिस अधिकारी यांस विचारिलें कीं, तोंड धुऊन दूध घेऊन येण्यास परवानगी द्यावी. दूध वगैरेची सर्व तजवीज आम्ही करितों असें पोलिस अधिकारी यांनीं सांगितलें. पोलीस अधिकारी यांनीं त्यांचे चिरंजीवांस असें सांगितलें कीं, परांजपे यांस अकराचे गाडीनें मुंबईस नेण्यांत येईल; तेव्हां त्यांचे कपडे वगैरे असतील ते पोलिस सुपरिंटेंडेंट यांचे बंगल्यावर तुम्ही घेऊन यावेत. सडकेवर व्हिक्टोरिया गाडी उभी होती त्यांत शिवरामपंत व दोन पोलिस अधिकारी असे बसून व मागें दोन घोडेस्वारांसहित त्यांस पोलिस सुपरिंटेंडेंट यांचे बंगल्यावर नेण्यांत आलें.

जेवणाची सोय आम्ही करितों असें पोलिस अधिकारी यांनीं सांगितलें असल्यामुळें, दहा वाजण्याचे सुमारास कृष्णाजीपंत व शिवरामपंतांचे स्नेही श्री. नानासाहेब दंडवते फक्त कपडे वगैरे घेऊन पोलिस सुपरिंटेंडेंट यांचे बंगल्यावर जातात, तों शिवरामपंतांना स्टेशनवर नेण्यासाठीं गाडींत बसवून चालविलें होतें. तेथें समजलें कीं, जेवणाची सोय कांहीं एक झाली नाहीं. परांजपे यांजकरितां फर्स्ट क्लासचें एक कंपार्टमेंट रिझर्व केलें होतें. गाडी प्लॅटफॉर्म सोडीतोंपर्यंत प्रो. परांजपे कृष्णाजीपंत यांचेशीं बोलत होते व आपल्या ऑफिसमधील मंडळींना पुढील व्यवस्था ठेवण्याविषयीं मधून मधून सांगत होते. परांजपे यांचेबरोबर पुण्यापासून ते बोरीबंदर स्टेशन येईपर्यंत पोलिस अधिकारी मि. सुलेव्हान व दोन युरोपिअन कॉन्स्टेबल होते. याच गाडीनें नानासाहेब दंडवते वेगळ्या डब्यांत बसून मुंबईस रवाना झाले.

सायंकाळीं सहा वाजल्यावर त्यांची गाडी बोरीबंदरचे स्टेशनावर आली त्यावेळीं आधीं बातमी लागून बरीच मंडळी स्टेशनवर जमली होती. शिवाय बरेचसे पोलिस व खुद्द डेप्युटी कमिशनर साहेबही हजर होते. ' प्रो. परांजपे बोरीबंदर स्टेशनावर उतरल्यावर आपल्या रोजच्या

पोषाखानें, तसेंच रोजच्या उल्हसित वृत्तीनें व जरा स्मित वदनानें इन्स्पेक्टरसाहेब मि. सुलेव्हान यांजबरोबर बोलत दुतर्फा उभ्या राहिलेल्या आपल्या देशबांधवांमधून चालत होते.' स्टेशनाबाहेर गेल्यावर त्यांस चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट साहेबांच्या कोर्टातील पोलिसचौकींत नेलें. लो. टिळक यांस परांजपे पुण्यास पकडले अशी तार नाशकास तावडतोब गेली होती. ते कदाचित् आले असतील कीं काय याची चौकशी करण्याकरितां म्हणून दंडवते जों सरदारगृहांत जातात तों त्यांना समजलें कीं, टिळक साडेपांचचे गाडीनें येऊन कोठें बाहेर गेले आहेत. बळवंतरावांची स्वारी तार पोंचतांच नाशकाहून जी निघाली ती थेट मुंबईला येऊन सरदार-गृहांत सामान टाकून परांजप्यांना कोठें ठेवलें आहे, याचा शोध काढून त्यांची भेट घेऊन—बोलून संध्याकाळीं ७॥ वाजतां सरदार-गृहांत हजर आणि तिथें वाट पहात बसलेल्या दंडवत्यांना म्हणतात काय " अहो बसलांत काय ? त्या शिवरामपन्तांना सबंध दिवसांत अन्न नाहीं. तें पोंचवण्याची व्यवस्था करा बघूं आधीं " चकित झालेल्या दंडवत्यांनीं सरदार-गृहांतून ताट पोंचवण्याची व्यवस्था केली. याचें नांव टिळक !

शुक्रवारीं ता. १२ रोजीं प्रो. परांजपे यांस चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. ॲस्टन यांच्यापुढें उभें करण्यांत आलें. मि. बॉवेन पब्लिक प्रॉसिक्युटर हे सरकारतर्फे काम चालवीत असून बॅ. इंद्रजित काळाभाई व मि. दीक्षित हे आरोपीतर्फे काम चालवीत होते. पंधरा मेच्या अंकावरून सदर खटला करण्यांत आला आहे, असें सरकारतर्फे सांगण्यांत आलें व त्या अंकामधील लेख कोर्टापुढें ठेवण्यांत आला.

यानंतर मुंबईच्या क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन डिपार्टमेंटचे सुपरिंटेंडेंट मि. स्लोन यांनीं आरोपीस ओळखलें. मि. बॉवेन यांनीं सदहू खटला तहकूब करावा व खटल्याची तारीख लवकर नेमावी, कारण ता. २७ रोजीं सुरू होणाऱ्या हायकोर्टच्या सेशनमध्यें सदहू खटला पाठवावा लागेल, असें कोर्टास सांगितलें. व त्याप्रमाणें मि. ॲस्टन यांनीं सोमवारपर्यंत खटल्याचें काम तहकूब ठेविलें. यापुढें आरोपीतर्फेचे वकिलांनीं

आरोपीला जामिनावर सोडण्याविषयीं कोर्टास विनंती केली. परंतु यास पब्लिक प्रॉसिक्युटर मि. बॅवेन यांनीं हरकत घेतली आणि असें सांगितलें कीं, ज्या लेखावरून हा खटला करण्यांत आला आहे, ते जर राजद्रोही आहेत, असें कोर्टास वाटत असेल तर आरोपीस जामिनावर सोडण्यांत येऊं नये. आरोपीतर्फेचे वकील मि. दीक्षित यांनीं रा. टिळक यांच्या खटल्यांतील न्या. बद्रुद्दीन तय्यबजी यांच्या जज्जमेंटाचा उल्लेख करून सांगितलें कीं, जामिनाचा उद्देश आरोपी खटल्याचे वेळीं कोर्टांत हजर व्हावा एवढाच असतो व आरोपी कोर्टास वाटेल तितक्या रकमेचा जामीन देण्यास तयार आहे. सबब त्यास जामिनावर खुलें करण्यास हरकत नाहीं. परंतु हें म्हणणें कोर्टास पसंत न पडून कोर्टानें आरोपीस जामिनावर खुलें करण्याचें नाकारलें. आरोपीवर जो गुन्हा केल्याचा आरोप आहे तो गुन्हा जामिनावर सोडण्यासारखा नाहीं आणि गुन्ह्यास आधारभूत झालेला लेख वाचून पाहतां आरोपीनें राजद्रोहाचा गुन्हा केला असें मानण्यास सबळ कारण आहे, असें मि. ॲस्टन यांनीं सांगितलें. मि. ॲस्टन यांच्या जामिनाच्या हरकतीसंबंधानें हायकोर्टाकडे अपील करण्यासाठीं मि. ॲस्टन यांच्या हुकमाची नक्कल मि. दीक्षित यांनीं मागितली व ती त्यांना देण्यांत आली. त्यानंतर मि. दीक्षित यांनीं कोर्टापुढें एक अर्ज करून सांगितलें कीं, आरोपी गेला पंधरवडा तापानें बराच आजारी असल्यामुळें, त्यास औषधपाण्याची वगैरे विशेष व्यवस्था ठेवण्याविषयीं कोर्टानें हुकूम करावा. परंतु ही गोष्ट तुरुंगांतील अधिकाऱ्यांचे अधिकारांतील असल्यामुळें आपणांस तसा हुकूम करतां येत नाहीं, असें कोर्टानें सांगितलें.

## हायकोर्टानें जामीन नाकारला

मि. ॲस्टन यांनीं जामिनीवर आरोपीस सोडण्याचें नाकारल्यावर ताबडतोब हायकोर्टाकडे अर्ज करण्यांत आला. अर्जाचें काम चीफ जस्टिस मि. स्कॉट व न्या. नाइट यांच्यापुढें निघालें. सरकारतर्फे बॅ. इन्व्हेरॅरिटी व आरोपीतर्फे बॅ. चेमियर आणि बोडस काम चालवीत होते. परांजपे सध्यां तापानें आजारी आहेत, आरोपी एक लाख रुपयांपर्यंत जामीन

देण्यास तयार आहे अशा व इतर कायद्याच्या तक्रारीही कोर्टापुढें मांडण्यांत आल्या.

यानंतर मि. चेमिअर व न्या. नाइट यांचा जामिनाबद्दल खल होऊन न्या. बद्रुद्दीन तय्यबजी यांनीं मागें दिलेल्या जज्जमेंटाबद्दल शहानिशा होऊन चीफ जस्टिसच्या मतें, आरोपी जामिनीवर सोडतां येणार नाहीं असेंच अखेर ठरलें ! चीफ जस्टिस निकाल देतांना म्हणाले कीं, मॅजिस्ट्रेट साहेब मि. अॅस्टन यांनीं सदरहू लेखांचीं भाषांतरें वाचलीं आहेत, तीं बरोबर आहेत असेंही त्यांना वाटत आहे. त्यांच्या मताप्रमाणेंच त्या भाषांतरासंबंधानें आमचें मत आहे. आरोपीच्या अफिडेविटमध्यें जामीन देण्यास कांहीं विशेष कारण दाखविण्यांत आलें नाहीं. आरोपी गेले पंधरा दिवस तापानें आजारी आहे, अशा तऱ्हेची फक्त एक सबब पुढें आली, पण त्याच्याबद्दल योग्य डॉक्टरचें सर्टिफिकेट नसल्यामुळें आरोपीस जामिनावर सोडतां येत नाहीं. तरीपण पुढें डॉक्टरचें योग्य सर्टिफिकेट असेल तर आरोपीच्या जामीन देण्याबद्दलच्या अर्जाचा पुनः विचार करण्यांत येईल.

सोमवार ता. १५ रोजीं पुनः खटल्यास सुरवात झाली. सरकारतर्फे मि. बॉवेन पब्लिक प्रॉसिक्यूटर हे हजर असून, काळकर्त्यांचे तर्फे बॅरिस्टर इंद्राजित काळाभाई व मि. दीक्षित वकील हे काम चालवीत होते.

ओरिएंटल ट्रान्सलेटरचे फर्स्ट ऑसिस्टंट मि. भास्कर विष्णु जोशी यांनीं आपल्या जबानींत सांगितलें कीं, ' माझी जन्मभाषा मराठी असून इंग्रजीचें मराठींत व मराठीचें इंग्रजींत भाषांतर करणें हें माझें ऑफिसांतलें काम आहे. तें मी दहा वर्षें करीत आहें. ' साक्षीदारानें, काळपत्राचे आपण मुद्रक व प्रकाशक आहों, असा डि. मॅजिस्ट्रेटपुढें प्रो. परांजपे यांनीं केलेला प्रतिज्ञालेख कोर्टांत दाखल केला. पण हा हुकूम खुद्द ओरिएंटल ट्रान्सलेटर यांचे नांवाचा असल्यामुळें तो या साक्षीदारास दाखल करतां येत नाहीं, अशी तक्रार बॅ. इंद्रजित यांनीं केली. पण ती अयोग्य ठरवून मॅजिस्ट्रेटांनीं हा हुकूम पुराव्यांत घेतला. रा. जोशी यांनीं याखेरीज काळ पत्राचा ता. १५ मे चा अंक व त्यांतील फिर्यादीस कारण झालेल्या स्फुट विचारांचें इंग्रजी भाषांतर कोर्टांत दाखल केलें.

काळांतील हा लेख कोर्टांत दाखल केल्यानंतर, मि. बॉवेन म्हणाले कीं, आरोपी गुन्हेगार ठरला तर त्या गुन्ह्याचे मानानें या कोर्टाचे अधिकारांतील शिक्षा अपुरी असल्यामुळें हा खटला सेशनकमिट करावा. या विनंतीस बॅ. काळाभाई यांनींही संमति दिली व सांगितलें कीं, फिर्यादविषयक लेख प्रौढ व उच्च मराठींत असल्यामुळें चौकशी ज्यूरीपुढें झालेली बरी.

यावर मॅजिस्ट्रेट म्हणाले कीं, दोन्ही पक्षांची जर अशी इच्छा आहे तर खटला सेशनकमिट करण्यांत येईल. शिवाय ता. १ जुलैपासून मी रजेवर जाणार असल्यामुळें त्याचे आधीं ही चौकशी मजपुढें पुरीही होणार नाहीं.

हिंद एजन्सीचे म्यानेजर रा. नारायण नरसो केतकर यांनीं सांगितलें कीं, दर आठवड्यास मी काळपत्राच्या सुमारें ६५० प्रती मागवितों. त्या, मजकडे काळाचे मॅनेजराकडून येतात. १५ मेच्या अंकांपैकीं ५।६ खेरीज करून सर्व प्रती खपल्या.

मुंबईच्या कलेक्टरचे हपीसांतील एक क्लार्क रा. अनंत लक्ष्मण देशमुख, यानें आपण काळ पत्राचे वर्गणीदार असून आपणास १५ मेचा अंक मिळाला, असें सांगितलें. गणपत कृष्णाजी पटेल आणि कंपनी या साक्षीदारानेंही अशीच जबानी दिली.

मॅजिस्ट्रेटचे प्रश्नास उत्तर देतांना प्रो. परांजपे यांनीं सांगितलें कीं, आपलें म्हणणें आपण येथें सांगणार नसून सेशनकोर्टांत सांगणार आहों.

यानंतर मॅजिस्ट्रेटांनीं १२४ अ व १५३ अ या कलमांतील आरोप ठेवून खटला सेशनकमिट केला.

कांहीं घरगुती गोष्टींबद्दल सल्ला घेण्यास आलेल्या तीन गृहस्थांबरोबर दोन तास बोलण्याचीही परवानगी त्यांनीं काळकर्त्यांस दिली म्हणून दंडवते, दत्तोपंत बेहेरे व रा. नानासाहेब साठे मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांतून जेथें कैदी ठेवतात, तेथें रा. परांजपे यांस आणिल्यानंतर त्यांना भेटण्यासाठीं खालीं आले. परंतु खोलीचें दार बंद असल्याकारणानें पोलीस अधिकारी आंत जाऊं देईनात. तेव्हां पुन्हां मॅजिस्ट्रेट यांस विचारून आंत जाण्याची परवानगी घेतली. या मुलाखतीची हकीगत सांगतांना

श्री. दंडवते लिहितात—"दार उघडून आंत गेल्यानंतर रा. परांजपे म्हणाले, 'तुम्हांलाही कांहीं वेळ तुरुंगाचा वास माझ्यामुळें मिळत आहे.' अशा प्रसंगीं देखील प्रो. परांजपे हे आपला विनोद सोडीत नाहींत म्हणून आम्हांला आश्चर्य वाटलें !"

शनिवार ता. २० रोजीं ज. दावर यांजकडे काळकर्त्यांचे तर्फे बॅरिस्टर जिना यांनीं पुनः जामिनाचा अर्ज केला. तो न्या. दावर यांनीं मंजूर करून काळकर्त्यास प्रत्येकीं ७॥ हजारांचे दोन जामीन व १० हजारांचा जातमुचलका घेऊन मुक्त करावें असा हुकूम केला.

परांजप्यांना पकडलें हें कळतांच मुंबईला धावून आलेल्या टिळकांनीं जामीन-अर्ज देणें, बॅरिस्टर पहाणें इत्यादि व्यवस्था तर केलीच होती. पण प्रत्यक्ष जामीन पटविण्याची त्यांची खटपट कशी आगाऊच सुरू होती हें खालील हकीगतीवरून कळेल.

## *'काळावरील खटल्याचे वेळीं'

"काळावरील खटल्याचे वेळीं दे० भ० शिवरामपंत उर्फ अण्णासाहेब परांजपे यांचेसाठीं जामीन वगैरेच्या तजवीज करण्याकरितां बळवंतराव मुंबईस आले. जामिनास लागणारे रकमेचे तजविजीकरितां लोकमान्य स्पीशी बँकेचे व्यवस्थापक डॉ. चुनीलाल सरैय्या यांजकडे शेअर गहाण ठेवून रकम मिळण्याची सोय झाल्यास पहावी म्हणून गेले होते. हे दिवस कलकत्त्याचे स्वदेशी व बहिष्कार यांचे ऐन अमदानीचे होते. कलकत्त्यास जाणारा स्वदेशी कपडा बहुतेक माझे मार्फत जात असे, त्यामुळें मला स्पीशी बँकेमध्यें रोज रकमेकरितां जावें लागे. बळवंतराव वरील कामाकरितां तेथें आले असतां त्यांची व माझी गांठ पडली. मीं येण्याचें कारण विचारलें तेव्हां परांजपे यांचे जामिनाचे रकमेचे तजविजीकरितां डॉ० चुनीलाल यांची भेट घेण्याकरितां आलों आहें, असें त्यांनीं सांगितलें. तेव्हां 'भेटः घेण्याची जरूरी नाहीं; आपणांस लागेल त्या रकमेची तजवीज करीन' असें मीं आश्वासन दिलें.

*कल्याणचे इतिहास-संशोधक व व्यापारी सदाशिव महादेव दिवेकर यांची आठवण—टि० आ० व आ० खंड दुसरा.

'ठीक आहे. परंतु मी आलों आहें त्या अर्थी डॉ० चुनीलाल यांस भेटून विचारून जातों. तुम्ही मला चारपांच दिवसांनीं भेटा' असें ते म्हणाले. त्याप्रमाणें मी भेटण्यास गेलों व सांगितलें 'उद्यां शनिवार आहे. बँक लवकर बंद होते. आमचे मार्किटांतील सर्व रकमेचा भरणा ११ वाजतांच बँकेंत होतो, करितां उद्यां रकमेची जरूर असल्यास मला आजच नक्की कळल्यास अडचण नाहीं.' त्यावर लोकमान्य म्हणाले कीं, रा० बाळासाहेब नातू हे रकम घेऊन येत आहेत, तुम्हांस तजवीज करणें नलगे. परंतु शनिवारीं सकाळीं रा० नातू यांची तार आली कीं 'मी बेळगांवकडे जात आहें रकमेची तजवीज दुसरीकडे पहावी.' तेव्हां रा० बळवंतराव, उमरावतीचे श्री० खापर्डे व रा० वासुकाका जोशी यांसह १२॥ चे सुमारास आकस्मिक माझे पेढीवर आले व तार आल्याची हकीकत सांगून रकम पाहिजे म्हणून सांगितलें. शनिवार असल्यामुळें व उशीरा आल्यामुळें मी थोडा मनांत सांशक झालों. परंतु रकमेचे तजविजीकरितां पेढीवरून खालीं मार्किटांत गेलों. परमेश्वराच्या कृपेनें व लोकमान्यांच्या पुण्याईनें शनिवार होता तरीही ५।७ मिनिटांतच मोठी रकम हस्तगत झाली ती त्यांचे हवालीं करून त्यांस निरोप दिला. रकम घेतल्यानंतर जाते वेळीं 'व्यापारसुद्धां आपल्या सुशिक्षितांच्या व देशप्रेमी मनुष्यांच्या हातांत असला म्हणजे मोठमोठीं अडचणींचीं कामेंही अति स्वल्प वेळांत कशीं होतात हें तुम्हीं मला आज दाखविलेंत' असे उद्गार त्यांनीं काढले.

नंतर त्याच दिवशीं दोन प्रहरीं मी बळवंतरावांस भेटण्याकरितां सरदारगृहांत गेलों व रा० शिवरामपंत जामीनावर सुटले का म्हणून विचारलें. ते म्हणाले "अजून आले नाहींत; तुम्ही कोर्टांत जाऊन या." मीं म्हटलें कीं, आतां माझ्या अंगांत नुसता सदरा व टोपी आहे. लागलीच त्यांनीं स्वतःचा आंगरखा, उपरणें व पागोटें दिलें व मी गेलों, यावरून लोकमान्यांच्या प्रसंगावधानाचें व मनाच्या मोकळेपणाचें मला कौतुक वाटलें."

या वर्षींच्या गणेशोत्सवांत—'मुंबईस केसरि होता। काळाच्या कामाकरितां' अशा अर्थाचीं पदें म्हटलीं जात होतीं, तीं टिळकांच्या वर सांगितलेल्या कामगिरीलाच अनुलक्षून केलेलीं होतीं.

हायकोर्टमध्यें रा. परांजपे यांस जामिनावर सोडण्याबद्दल परवानगी मिळाल्यामुळें दंडवते व इतर मंडळी डोंगरीच्या तुरुंगांत जाऊन त्यांनीं तेथें रा. परांजपे यांस जामिनावर सोडल्यासंबंधीं हकीगत सांगितली. त्यांना हायकोर्टाकडे नेत असतां त्यांची गाडी सरदारगृहावरून गेली. त्यावेळेस लो. टिळक हे सरदारगृहाचे गॅलरींत उभे होते, त्यांस प्रो. परांजपे यांनीं नमस्कार केला. त्यांस लो. टिळक यांनीं हायकोर्टांत जाऊन यावें असें खुणेनें सांगितलें. हायकोर्टांत जाऊन जामीन पटून मुक्तता झाल्यानंतर दंडवते व इतर सर्व मंडळी सरदारगृहामध्यें आली. तेथें रा. परांजपे व रा. टिळक यांची गांठ झाली, व रात्रीचे गाडीनें पुण्यास यावयाचें ठरलें. त्याप्रमाणें रात्रीच्या शेवटच्या गाडीनें रा. टिळक व परांजपे वगैरे मंडळी पुण्यास येण्यास निघाली व सकाळीं पुण्याच्या स्टेशनावर दाखल झाली. रा. परांजपे यांची जामिनावर सुटका झाल्याची बातमी शनिवारीं संध्याकाळींच पुण्यामध्यें पसरली होती. त्यामुळें शनिवारीं संध्याकाळीं रा. परांजपे हे मुंबईच्या मेलनें पुण्यास येतील असा पुष्कळ मंडळींचा अंदाज होता. व त्याप्रमाणें स्टेशनावरही संध्याकाळीं बरीच गर्दी जमली होती. पण त्या दिवशीं रा. परांजपे हे न आल्यामुळें पुष्कळांचा हिरमोड झाला. तरीपण रविवारीं सकाळीं रा. परांजपे यांस भेटण्यासाठीं स्टेशनावर थोडीथोडकी मंडळी जमली होती असें नाहीं. रा. परांजपे यांच्याबरोबर त्यांचे कनिष्ठ बंधु विष्णुपंत परांजपे (महाड) हेही होते. सर्व मंडळी स्टेशनावरून परांजपे यांच्या घरीं आली. रा.परांजपे यांना पकडल्याची तार ऐकल्यानंतर रा.टिळक हे जे तडक मुंबईस जाऊन ठाणें देऊन राहिले ते त्यांची हायकोर्टांतून जामिनावर सुटका करून घेऊन त्यांना त्यांच्या स्वतःच्या घरीं पोहोंचवून नंतर आपल्या घरीं चालते झाले. रा. परांजपे हे पुण्यास आपल्या घरीं आल्यानंतर रविवार व सोमवार हे दोन दिवस तेथेंच होते. त्यांनीं आपल्या मित्र-मंडळींची, काळ ऑफिसमधील लोकांची व घरांतील मंडळींची मोठ्या सद्गदित अंतःकरणानें गांठ घेतली व त्या सर्वांना धैर्य धरण्याबद्दल उपदेश केला. या दोन दिवशीं रा. परांजपे यांस भेटण्यासाठीं व त्यांचें दर्शन घेण्यासाठीं अनेक लोक येऊन गेले. कित्येक ज्योतिष्यांनीं त्यांच्या-

संबंधीं भविष्यें वर्तविलीं. कित्येक भाविकांनीं त्यांचें हितचिंतन केलें व कित्येक धर्मात्म्यांनीं त्यांना आशीर्वाद दिले. फावल्या वेळांत रा. परांजपे यांनीं आपल्या पाठीमागें व्यवस्था कशी ठेवावयाची, याबद्दल घरांतील व ऑफिसांतील मंडळीस चार शब्द सांगितले.अशा तऱ्हेनें हे दोन सबंध दिवस दोन क्षणांप्रमाणें गेले. मंगळवारीं सकाळीं रा. परांजपे मुंबईस जावयाचे होते. जाण्याची वेळ जवळ येतांच सर्वांचे डोळे अश्रूंनीं भरून आले. पण भावी सुखाच्या आशेवर सध्यांचें दुःख विसरून सर्वांनीं रा. परांजपे यांचा सप्रेम निरोप घेतला. नंतर रा. परांजपे हे पुणें स्टेशनवर येऊन पोहोंचले. इतक्यांत रा. टिळक यांची स्वारी एका हातांत केसरी, टाइम्स इत्यादि वर्तमानपत्रें घेऊन लगबगीनें येऊन पुण्याच्या स्टेशनावर दाखल झाली. त्यांच्याबरोबर जाण्यास पुण्याचे रा. गांधी बी. ए. एल्. एल्. बी. हेही आले. रा. परांजपे यांस पोहोंचविण्यास स्टेशनावर बरीच मंडळी आली होती. त्या सर्वांचा निरोप घेऊन रा. परांजपे हे पुण्याहून निघाले व मंगळवारीं दुपारीं मुंबईस येऊन दाखल झाले.

## मुंबईस गेल्यानंतर

रा. टिळक, रा. परांजपे, रा. गांधी वगैरे मंडळी सदर खटल्याचें कसें स्वरूप होईल, बॅरिस्टर द्यावा कीं नाहीं, कीं खटला स्वतः चालवावा यासंबंधीं मंगळवारीं विचार करीत होती. पण बुधवार सकाळपासून मुंबईची स्थानिक परिस्थिति अगदीं बदललेली दिसली. सरदारगृहासभोंवतीं गुप्त पोलिसांचा पहारा चमकूं लागला व आमच्यांतील कांहीं मंडळींच्या कानांवर आज लो. टिळक यांस पकडणार अशा वदंता येऊं लागल्या.

अशा तऱ्हेनें आपल्यावरही प्रसंग आलेला पाहून रा. टिळक यांनीं रा. परांजपे यांची तशा स्थितींतही अगदीं खासगी गांठ घेतली. देशाची परिस्थिति वाईट झालेली आहे,लोकांच्या परीक्षेची आलेली वेळ आहे,असे प्रसंग आयुष्यांतून एकदां येतात, अशा तऱ्हेचें परस्परांचें परस्परांना स्फूर्तिदायक संभाषण झाल्यानंतर आपला खटला आपण स्वतः चालविण्याबद्दल रा. टिळक यांनीं रा. परांजपे यांस सांगितलें. नंतर रा. टिळक हे आपल्या वारंटाची वाट पहात सरदारगृहाच्या गॅलरीमध्यें येऊन इझीचेअरवर पडले. रा.परांजपे हेही त्यांच्याजवळ येऊन बोलत बसले.इतक्यांत

संध्याकाळीं रा. टिळक यांस पकडण्यास पोलिस अंमलदार आले. रा. टिळक यांस घेऊन जात असतांना पाहून रा. परांजपे यांस अत्यंत वाईट वाटलें.

## सरकारतर्फे स्पेशल ज्यूरीकरितां अर्ज

त्यानंतर हायकोर्टातील सेशनजज्ज मि. जस्टिस दावर यांच्यापुढें पूर्वी ठरल्याप्रमाणें स्पेशल ज्यूरीचा प्रश्न निघाला. सरकारतर्फे ॲडव्होकेट जनरल मि. ब्रॅन्सन, मि. इन्व्हेरॅरिटी आणि मि. विनिंग व रा. परांजपे यांचेतर्फे ॲ. जिना हे काम चालवीत होते. सदहू राजद्रोहाचा खटला स्पेशल ज्यूरीपुढें चालावा, असा सरकारतर्फे अर्ज करण्यांत आला. या अर्जास हरकत घेतांना बॅरिस्टर जिना यांनीं असें सांगितलें कीं, सामान्यतः स्पेशल ज्यूरीमध्यें हिंदी गृहस्थ बरेच असणें फार आवश्यक आहे. कारण 'काळ' वर्तमानपत्रांतील लेख उच्च आणि भारदस्त भाषेंत लिहिलेले असल्यामुळें सदहू खटल्यांतील ज्यूरीमध्यें चांगले भाषाभिज्ञ लोक असले पाहिजेत. युरोपियन लोकांस मराठी भाषेचें खरें मर्म कळणें शक्य नसतें. याकरितां स्पेशल ज्यूरी न नेमतां सामान्य ज्यूरीपुढेंच हा खटला चालावा. बॅरिस्टर जिना यांचें वरील म्हणणें न्यायमूर्तींनीं कबूल न करतां स्पेशल ज्यूरी नेमण्याचाच निश्चय ठरविला !

## हायकोर्ट सेशन्सला सुरवात

ता. २७ रोजीं हायकोर्टाच्या सेशन्सला सुरवात झाली. आरोपीची सुनावणी झाल्यानंतर आरोपीला हायकोर्टामध्यें चार्ज वाचून दाखविण्यांत आला.

## आरोपीवर आरोप

तुम्ही शिवराम महादेव परांजपे यांजवर क्लार्क ऑफ दी क्राऊन यांनीं खालीं लिहिलेल्याप्रमाणें चार्ज ठेविला आहे.

( १ ) तुम्ही तारीख १५ मे १९०८ चे दिवशीं अगर त्या सुमारास मुंबई येथें त्यावेळीं आणि त्या ठिकाणीं 'काळ' या नांवाचे मराठी वर्तमान-त्राचे एडिटर, पब्लिशर आणि प्रोप्रायटर असून छापील शब्दांनीं ब्रिटिश इंडियामध्यें कायद्यानें स्थापित अशा सरकाराविरुद्ध अप्रीतीचे मनोविकार

वाढविण्याचा प्रयत्न केला. म्हणजे असें करून कीं, ता. १५ मेच्या सदरचे वर्तमानपत्रांचे अंकांत दुसरे पानावरील ४।५।६ रकान्यांत व तिसरे पानावरील ११।१२ रकान्यांत अग्रलेख, स्फुट टीपा छापून मुंबई-मध्यें प्रसिद्ध केल्या व ज्यामध्यें ( भाषांतर केल्यावरून ) खालील लिहिल्या प्रकारचा मजकूर आहे कीं, " बंगाल्यांतील बॉंबगोळ्याच्या प्रकरणांतील आरोपी पकडण्याच्या कामीं ज्या लोकांनीं बहादरी केली त्यांच्या बक्षिसाची यादी प्रसिद्ध झाली आहे." येथपासून ( भाषांतर ) " युरोपियन डिफीट असोसिएशन " पावेतों. आणि असें करून इं. पी. कोड कलम १२४ अ यांत ज्या अपराधास शिक्षा सांगितली आहे व जो अपराध हायकोर्टाचे अधिकारांत आहे असा अपराध तुम्हीं केला.

( २ ) तुम्हीं ता. १५ मे १९०८ रोजीं किंवा त्या सुमारास मुंबई येथें त्या दिवशीं सकाळीं ' काळ ' या नांवाचे मराठी वर्तमानपत्राचे तुम्ही संपादक, प्रकाशक व मालक असून छापील शब्दांनीं महाराणी सरकार यांचे प्रजेपैकीं निरनिराळ्या जातींमध्यें म्हणजे युरोपियन प्रजा व नेटिव प्रजा यांमध्यें द्वेष अगर वैरभावाचे मनोविकार वाढविले अगर वाढविण्याचा प्रयत्न केला.म्हणजे सदरचे ता.१५मे१९०८चे काळ पत्राचे अंकांत पान २ वर ४।५।६ रकान्यांत व पान ३ वर ११२ रकान्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें भाषांतर केलें असतां दिसणारे अग्रलेख व स्फुट-विचार छापून मुंबई येथें प्रसिद्ध केले ते येणेंप्रमाणें:—" बंगाल्यांतील बॉंब-गोळ्याच्या प्रकरणांतील आरोपी पकडण्याच्या कामीं ज्या लोकांनीं बहादरी केली त्यांच्या बक्षिसाची यादी प्रसिद्ध झाली आहे." येथपासून " युरोपियन डिफिट असोसिएशन " येथपावेतों. आणि असें करून इं. पी. कोड कलम १५३अ मध्यें शिक्षा सांगितली आहे व ज्या गुन्ह्यास शिक्षा करण्याचा अधिकार हायकोर्टास आहे, असा अपराध तुम्हीं केला.

ता. २० जुन १९०८ रोजीं माझे शिक्क्यांनिशीं लिहिला.

सहीः—एम्. एस्. जार्डिन, क्लार्क ऑफ धी क्राऊन

यानंतर आरोपी रा. परांजपे यांनीं वाचून दाखविलेले आरोप ऐकून सदर आरोपांचे गुन्हे मीं केले नाहींत असें सांगितलें.

खटल्याचें पुढील काम तारीख ६ जुलै रोजीं चालण्याचें ठरलें.

# तिसरें फौजदारी सेशन.

सोमवार, तारीख ६ जुलै सन १९०८

| | | |
|---|---|---|
| बादशहा सातवे एडवर्ड | } | फिर्यादी |
| शिवराम महादेव परांजपे | } | आरोपी |

१२४ अ कलमाखालीं राजद्रोहाचा व १५३ अ या कलमाखालीं जातीजातींत वैमनस्य उत्पन्न करण्याचा आरोप.

फौजदारी सेशन्समध्यें सोमवार तारीख ६ रोजीं काळपत्राचे संपादक, प्रकाशक व मालक रा. शिवराम महादेव परांजपे यांच्यावर खटला करण्यांत आला. रा. परांजपे यांच्यावर १२४ अ कलमाखालीं राजद्रोहाचा व १५३ अ ह्या कलमाखालीं निरनिराळ्या जातींत वैमनस्य उत्पन्न करण्याचा, ह्याप्रमाणें दोन आरोप ठेवण्यांत आले. सरकारतर्फें काम चालविण्यास ॲक्टिंग प्रॉसिक्युटर व सरकारी सॉलिसिटर मि. बोवेन मि. विनिंग, मि. इन्व्हेररिटी व ॲडव्होकेट जनरल मि. ब्रॅन्सन हे हजर होते. आरोपी रा.परांजपे हे स्वतःच आपलें काम चालवीत होते व त्यांस मदत करण्यासाठीं रा. खापर्डे, रा. करंदीकर, रा. केळकर व रा.गांधी हे हजर होते. न्यायमूर्ति व रा. परांजपे यांच्यामधील अंतर अधिक असल्यामुळें ऐकूं जाणें सुलभ पडावें म्हणून, कोर्टानें त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यामधून वकील मंडळींमध्यें बसण्याची परवानगी दिली. कोर्टाच्या इमारतीकडे जाणारे चारी बाजूंचे रस्ते पोलिसनें अडविले होते तरी सुद्धां कोर्टांत खटला ऐकण्यास लोकांची गर्दी झाली होती. त्यांत कांहीं युरोपियन स्त्रियाही होत्या.

## स्पेशल ज्यूरी

ज्यूरीमध्यें खालील गृहस्थ होते. ( १ ) जॉर्ज एच. मॅकॉसलँड ( फोरमन ), ( २ ) मि. महंमद युसफ, ( ३ ) एल. डब्ल्यू. मायकेल, ( ४ ) मि. हर्बर्ट जी. क्लार्क, ( ५ ) मि. सोराबजी डी. दुभाष, ( ६ ) मि. ए. जे. बिलिमोरिया, ( ७ ) मि. हैदरअली दुभाष, ( ८ ) मि. एच्. एम्. मेयर व ( ९ ) पोचाजी, बी. दुभाष.

## पुराव्यासाठीं आणखी अंक

आरोपीनें राजद्रोहाचा व जातीजातींत वैमनस्य वाढविण्याचा असे जे दोन गुन्हे तारीख १५ मेच्या अंकांत केले आहेत, असें म्हणण्यांत येतें त्याची शाबिती अधिक दृढ करण्यासाठीं सरकारतर्फे काळाचे आणखी मागील अंक कोर्टापुढें सादर करण्यांत आले. तारीख २० मार्च, तारीख २९ मे व तारीख ५ जून या तारखांचे हे तीन अंक आहेत. एका अंकांत रा. परांजपे यांनीं तुतिकोरीन येथील स्थिति वर्णन करून इंग्रजी राज्याच्या बलाढ्यपणाचा पाया किती पोकळ झाला आहे, तो सांगितला असून त्याच लेखांत तो पाया कसा दृढ करितां येईल याबद्दल सरकारास योग्य सल्ला दिला आहे. दुसऱ्या अंकांत इंग्लिश लोक हल्लीं हिंदुस्थानांत कसे पिसाळल्यासारखे वागत आहेत, याबद्दल लंडनच्या जस्टिस पत्रामध्यें मि. हिंडमन यांनीं जे विचार प्रसिद्ध केले आहेत, त्यांचें अक्षरशः भाषांतर केलें आहे; तिसऱ्या अंकांतील लेख 'बॉंब गोळे हिंदुस्थानांत येण्याला कारण इंग्लिश लोकच !' असा आहे. सदर लेखांत इंग्लिशांचें माप इंग्लिशांच्या पदरांत घालून दुसऱ्यावर निष्कारण तुटून पडण्याबद्दल इंग्लिश लोकांस दूषण दिलें आहे.

## ॲ० ज० ब्रॅन्सन यांचें भाषण

खटल्याला सुरवात ॲडव्होकेट जनरल मि. ब्रॅन्सन यांच्या भाषणानें झाली. फिर्यादीतर्फेच्या या प्रारंभींच्या भाषणाचा सारांश असाः—ॲ० ब्रॅन्सन यांच्या मतानें आरोपीचे लेख इतके उघड उघड राजद्रोही होते कीं, "आरोपी जर सुज्ञ असेल तर त्यांनीं आपल्या लेखांत राजद्रोह नाहीं असें कोर्टाच्या मनांत भरविण्याच्या नादांत पडूं नये." असे उद्गार त्यांनीं काढले. १५३अ कलमाखालील आरोपासंबंधीं बोलतांना जस्टिस स्ट्राची यांच्या मताचा आधार घेऊन मि. ब्रॅन्सन म्हणाले "नुसता प्रीतीचा अभाव म्हणजे अप्रीति होणार नाहीं. अप्रीति म्हणजे उघड व स्पष्ट द्वेष पाहिजे. संपादकाच्या मनांतल्या अर्थावरून त्याला कधींही शिक्षा होत नाहीं. त्याच्या लेखाचा जो साहजिक अर्थ होईल त्यावरूनच त्याला शिक्षा झाली पाहिजे. हा अर्थ करतांना लेख केव्हां लिहिले, कोठें लिहिले, कोणाकरितां लिहिले व ते लिहिले गेले त्यावेळची परिस्थिति कशी होती वगैरे सर्व गोष्टींचा ज्यूरीनें

विचार केला पाहिजे......आरोपीनें लिहिलेल्या लेखांचा उद्देश स्पष्ट आहे. लेखांच्या योगानें अप्रीति उत्पन्न झालीच पाहिजे असें कायदा सांगत नाहीं. फक्त अप्रीति उत्पन्न करण्याचा प्रयत्न झाला म्हणजे गुन्हा होतो......सरकारच्या ज्या खऱ्या किंवा काल्पनिक जुलमी कृत्यांवर लेखांत टीका येते, तीं कृत्यें खरोखरच सरकारनें केलेलीं असलीं तरी आरोपीचा अप्रीति उत्पन्न करणारे लेख लिहिल्याबद्दलचा गुन्हा मुळींच कमी होत नाहीं, असें मुंबईचे माजी चीफ जस्टिस सर लॉरेन्स जेन्किन्स व दुसरे पुष्कळ न्यायाधीश यांचें मत आहे.

यानंतर खालच्या कोर्टांत सरकारतर्फे बोलावण्यांत आलेल्या साक्षीदारांची पुन्हा तपासणी करण्यांत आली. शिवरामपंतांनीं सरकारी साक्षीदारांची उलट तपासणी केली नाहीं; परंतु आपला जबाब मात्र थोडक्यांत देऊन दोन्ही आरोप आपणास कबूल नसल्याचें सांगितलें.

त्यानंतर मि. ब्रॅन्सन यांचें ज्यूरीला उद्देशून भाषण झाल्यानंतर शिवरामपंत आपलें भाषण करण्याकरतां उठले. खटला ऐकण्याकरितां आलेल्या लोकांनीं हायकोर्टाचा हॉल फुलून गेला होता. बंदोबस्त असूनही बेसुमार गर्दी झाली होती. ऐकणाऱ्यांत युरोपियन स्त्रियाही आलेल्या दिसत होत्या.

## प्रो. परांजपे यांचें कोर्टामधील भाषण *

"जज्जसाहेब आणि ज्यूरीमधील सभ्य गृहस्थहो,

हें न्यायाचें कोर्ट आहे आणि येथूनच मला न्याय मिळावयाचा आहे, ही गोष्ट माझ्या पूर्णपणें लक्षांत आहे. ती सांगण्याची जरूरी ॲडव्होकेट जनरल यांना बिलकूल नव्हती. कोर्ट ही वादविवाद करणारी मंडळी नाहीं हें मी समजतों. ......मी कांहीं वकील नाहीं. मी मुंबई युनिव्हर्सिटीचा एक एम. ए. आहें......जरी

* प्रो. परांजपे यांच्या या भाषणावरही बंदी होती. १९३७ सालीं काँ. सरकारनें ही बंदी उठविल्यावर चित्रशाळेनें हें बत्तीस पानी भाषण जसेंच्या तसें खटल्याच्या हकीकतीसह प्रसिद्ध केलेंच आहे. शिवाय सबंध भाषण या ठिकाणीं देणें शक्य नसल्यामुळें सारांश तेवढा दिला आहे. अर्थात् मूळच्या इंग्रजी भाषणाचें हें भाषांतर आहे.

या राजद्रोहाच्या खटल्यांत कायद्याचा पुष्कळ संबंध आहे तरी सरकारतर्फेच्या पुराव्याची भिस्त सर्वस्वी माझ्या लेखावरच आहे. आणि ते लेख मीं स्वतः लिहिलेले असल्यामुळें त्यांचें हृद्गत दुसऱ्या कोणाला माझ्याइतकें स्पष्ट सांगतां येणार नाहीं.......राजद्रोहाचे दोन भाग करण्यांत येतात एक कायद्याचा आणि दुसरा वस्तुस्थितीचा. आणि मी माझ्या भाषणांत वस्तुस्थितीच्या दृष्टीनें विचार करणार आहें. कायद्याचें विवेचन करण्याचें काम मी जज्जसाहेबांवर सोंपवितों.......ज्या लेखावरून फिर्याद करण्यांत आली आहे ते लेख आपणांपुढें आहेत. ॲडव्होकेट जनरलप्रमाणेंच मी आपणास विनंति करतों कीं, हे लेख आपण समग्र वाचून पहा. लेखांतील सरकारतर्फे पुढें मांडलेलीं तुटक तुटक वाक्यें आपण वाचूं नका...... आपण तुटक तुटक वाक्यें न वाचतां जर समग्र लेख वाचाल तर ते लेख लिहिण्यामध्यें माझा हेतु प्रामाणिकपणाचा होता असेंच आपलें मत होईल... या खटल्यामध्यें आपणाला सदर लेख लिहिण्यामध्यें काय हेतु होता हें पहावयाचें आहे. प्रत्यक्ष कृत्य जरी दोषार्ह असलें तरी जोंपर्यंत तें कृत्य करण्याचा हेतु दोषार्ह ठरत नाहीं, तोंपर्यंत तें कृत्यही दोषार्ह होत नाहीं. माझा लेख राजद्रोही असेल. किंबहुना तो वाचल्यानंतर आपणालाही तसें वाटेल. परंतु हा लेख लिहिण्यामध्यें जर माझा हेतु राजद्रोही ठरणार नाहीं तर त्यामुळें माझ्या लेखाला कांहींच बाध येत नाहीं.......वस्तुतः मीं माझे लेख स्वदेशभक्तीनें आणि देशाभिमानानें लिहिलेले आहेत. राजद्रोह प्रसृत करण्याचा माझा इरादा नव्हता. ज्या वेळेला मी सदर लेख लिहावयाला बसलों त्यावेळीं इंग्रज सरकारच्या विरुद्ध आपल्याला बंडाळी माजवावयाची आहे असें माझें उद्दिष्ट नव्हतें. पण जातां जातां सरकारच्या दुष्कृत्यांवर टीका करण्यामध्यें सरकाराविषयीं थोडीबहुत अप्रीति उत्पन्न झाली असेल तर तेवढीही सवलत सरकारनें पत्रकारांना ठेवूं नये काय ?...पण अप्रीति उत्पन्न करणें म्हणजे तरी काय ? मरेच्या डिक्शनरींत excite disaffection याचा अर्थ प्रचंड खळबळ उडवून देणें आणि भयंकर व घातकी मनोविकार जागृत करणें असा दिला आहे. आणि अशा तऱ्हेचा जर मीं प्रयत्न केला असेल तर मी गुन्हेगार आहें. पण मी आपणांस खात्रीपूर्वक सांगतों कीं, माझा तसा हेतु नव्हता आणि

प्रयत्नही नव्हता. बॉंब हा शब्द मीं माझ्या लेखांत शंभर वेळां वापरला आहे खरा, पण मीं बॉंब हा शब्दच वापरला आहे, मीं बॉंब फेकलेला नाहीं. यासाठीं बॉंब शब्द वारंवार आल्यामुळें त्यावरच विशेष भिस्त न ठेवतां लेखांचें साग्र स्वरूप आपण लक्षांत घ्यावें......मीं माझ्या देशाचें असंतोषी अंतःकरण सरकारपुढें उकलून ठेवून त्यांतील सुधारणेचीं गुप्त रहस्यें मीं सरकारला कळविलीं आहेत.आणि यासाठीं तुम्ही मला राजद्रोही ठरविणार. मला वाटतें याला राजद्रोह म्हणत नाहींत. प्रत्यक्ष लॉर्ड मोर्ले यांनीं देखील असेच उद्‌गार काढले आहेत. मोर्लेसाहेब हे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी आहेत. ते स्टेट सेक्रेटरी म्हणतात " आपण हिंदी लोकांना विद्यामृत पाजिलें आहे ह्यामुळें त्यांच्या अंतःकरणांत स्फूर्ति उत्पन्न झाली आहे. तेव्हां त्या स्फूर्तींची तृप्तता केलीच पाहिजे. असंतोषाचा सर्प कांहीं तरी हक्कांच्या देणगीच्या मंत्रानें मारून टाकला पाहिजे. दशमुखी दडपशाही करून चालावयाचें नाहीं. " हे मोर्लेसाहेबांचे उद्‌गार आपण ध्यानांत ठेवा. त्यांचाच अनुवाद आम्ही आपल्या पत्रांत करीत असतों. स्वराज्यासारखे कांहीं तरी राजकीय हक्क लोकांना यावेळीं मिळाले पाहिजेत. दडपशाहीनें कोणालाही दडपतां येणें कधींच शक्य नाहीं. सलोख्यानेंच सर्व कारभार चालविला पाहिजे आणि हेंच मीं आपल्या लेखांत सुचविलें आहे......लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें ज्या वेळेला हा राजद्रोहाचा कायदा पसार झाला त्यावेळेला अशा तऱ्हेचे वादविवाद वर्तमानपत्रकारांना करण्याचा हक्क आहे असें सांगण्यांत आलें होतें. पण असा वादविवाद आज राजद्रोह होऊं पहात आहे. वादविवादाचें मूळ कारण राजद्रोहाची इच्छा नसून वस्तुस्थितीचें निदर्शन आहे......लॉर्ड केनिनन म्हणतातः सुधारणा आणि क्रांति या दोन गोष्टी इंग्लंडमध्यें घडून आलेल्या आहेत त्याचें सर्व श्रेय वादविवादाच्या मुद्रण-स्वातंत्र्याकडे आहे.

मी हिंदुस्थानचा रहिवासी आहें आणि मला माझ्या देशबांधवांचीं अंतःकरणें समजतात...लोकांची स्थिति आम्हांलाच माहीत आहे.ते किती असंतुष्ट झाले आहेत याची बरोबर कल्पना आम्हांलाच आहे, आणि म्हणून आम्हींच ती सरकारला कळविली पाहिजे, आणि तीच मीं कळविली आहे. लोकांत असंतोष माजला आहे, आपण कर्झनशाहीची

दडपशाही स्वीकारूं नका अशी मसलत मीं सरकारला दिली आहे. हा जर गुन्हा असेल तर मीं तो केला आहे. हा जर राजद्रोह असेल तर तो मीं पसराविला आहे. पण माझी खात्री आहे कीं, आपण असें कधींही म्हणणार नाहीं. आपण विचार करा कीं, लोकांमध्यें असंतोष माजला आहे असें मीं काय म्हणून म्हटलें ? लोकांची खरी स्थिति सरकारला समजली तर लोकांचा फायदा होऊन सरकारचें त्यांत हित होईल म्हणून. याखेरीज दुसरा जर कांहीं सदर लेख लिहिण्यामध्यें माझा हेतु असेल तर मीं सरकारविरुद्ध अप्रीति उत्पन्न केली हें उघड होईल. पण मला असें वाटत नाहीं कीं, लोकांत असंतोष आहे, असें मीं सरकारला सांगितलें म्हणजे मीं राजद्रोह केला असें म्हणण्याइतका सरकारचा न्याय अनुदार होईल......मीं सरकारविरुद्ध राजद्रोह पसरीत नव्हतों, मीं तो राजद्रोह थांबवीत होतों......इंग्लिश जात कशीही असली तरी ती आम्हांवर राज्य करणारी जात आज आम्हांला हक्क देणारी पाहिजे आहे. राज्य करणारी जात इंग्लिशांचीच आहे असें नाहीं. त्यामध्यें इंग्लिश लोक आहेत, हिंदु लोक आहेत, मुसलमान लोक आहेत, व पार्शी लोक आहेत. तेव्हां ज्यावेळीं आम्ही वर्तमानपत्रकार राज्य करणाऱ्या जातींविषयीं लिहितों, त्यावेळीं आम्ही हिंदु व इंग्लिश या दोन जातींमध्यें वैमनस्य कसें उत्पन्न करतों हें मला समजत नाहीं......कारण ब्यूरॉक्रसीच्या कृत्यावर टीका करण्याचा लोकांना हक्क आहे. आणि जर ब्यूरॉक्रसीसंबंधानें आम्हांस लिहावयाचें आहे तर त्या ब्यूरॉक्रसींतील मंडळीवर टीका न करून आमचें कसें भागेल !

**आणि हीच ब्यूरॉक्रसी आज जर हिंदु लोकांची असती आणि तिनें जर या ब्यूरॉक्रसीप्रमाणेंच आपलें धोरण ठेवलें असतें तरी आम्हीं त्या नेटिव्ह ब्यूरॉक्रसीवर अशीच टीका केली असती.**

अशा दृष्टीनें आपण माझ्या लेखांकडे पहाल तर माझा हेतु निर्दोष आहे, असें सहज आपल्या लक्षांत येईल; व माझा सदर लेख लिहिण्यामधील उद्देश व प्रयत्न इंग्रज सरकारविरुद्ध राजद्रोह उत्पन्न करण्याचा किंवा जातीजातींमध्यें वैमनस्य माजविण्याचा नव्हता अशी आपली खात्री होईल.

वरीलप्रमाणें कायद्याचे व इतर मुद्दे ज्यूरीला समजावून सांगितल्यानंतर

साडेतीन तासपर्यंत चाललेल्या या वक्तृत्वपूर्ण व मुद्देसूद भाषणाचा शेवट प्रो. परांजपे यांनीं पुढें दिल्याप्रमाणें केला.

" ज्यूरीमधील सभ्यगृहस्थहो, मीं माझें म्हणणें आपल्यापुढें मांडलें आहे. आतां माझ्यासंबंधींचा न्याय आणि निकाल मी आपल्या स्वाधीन करतों. सुलेव्हानच्या केसमध्यें लॉर्ड फिट्स्जेरॉल्ड यांनीं ज्यूरीला उद्देशून जें सांगितलें आहे तेंच मी आतां आपल्याला सांगत आहें. आपणांस कांहीं व्यक्तिविषयक सांगण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. मला मुद्रण-स्वातंत्र्याचें संरक्षण झालेलें पहावयाला पाहिजे आहे. सध्यां मुद्रणस्वातंत्र्य पेचांत सांपडलेलें आहे. आपण जो या खटल्यामध्यें निकाल देणार आहां त्यावर सर्व मुद्रणस्वातंत्र्य अवलंबून असून तिकडे देशाचें लक्ष वेधून राहिलें आहे.

ज्यूरीमधील सभ्यगृहस्थहो, आपण मुद्रणस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहां. आपण जो निकाल द्याल तो मला मान्य आहे. आपली जबाबदारी आपण लक्षांत घ्या; आपण मला दोषी ठरविलें तर त्याबद्दल जी शिक्षा होईल ती भोगण्याला मी तयार आहें, पण असें होईल असें मला वाटत नाहीं.

मीं माझें हृदय आपणांला मोकळें करून दाखविलें आहे. माझा सदर लेख लिहिण्यामध्यें निर्मळ आणि प्रामाणिक हेतु होता, हें मी आपल्याला सांगतों. असें करून, मीं ज्या देशांत जन्म घेतला आहे आणि ज्या प्रदेशांत मी वाढलों आहें त्या देशाचें मीं हित साधलें आहे. ज्यूरीमधील सभ्यगृहस्थहो, आपण हें लक्षांत ठेवा कीं, आपलाही जन्म याच देशांत झालेला आहे. आपल्या मनाची उदात्तता आपण यावेळीं धारण करा म्हणजे मला अशी खात्री आहे कीं, आपणांपासून मला जो निकाल पाहिजे आहे तो मला मिळेल. मीं माझा लेख आपणांला स्पष्टपणें समजावून सांगितला आहे आणि त्यांत मला पूर्ण न्याय मिळणार आहे अशी माझी मनोदेवता मला वारंवार सांगत आहे. माझ्या मतें मी सर्वस्वीं निर्दोषी आहें. मीं माझ्या देशासाठीं आपले प्राण झिजविले आहेत आणि यांत मीं कांहीं दोषास्पद गोष्ट केली नाहीं, असें माझें अंतःकरण आणि माझ्या अंतःकरणांतील सदसद्विवेकबुद्धि मला ओरडून सांगत आहे. या माझ्या कार्यामध्यें प्रत्यक्ष

न्यायदेवता मला साहाय्य आहे, अशाच तऱ्हेचें वर्तन नेहमीं चालू ठेव-ण्यासाठीं माझ्या परमप्रिय देशाची उन्नति मला उत्तेजन देत आहे आणि या कामांत परमेश्वर माझा पाठीराखा होईल, अशी माझी खात्री आहे. सदर लेख लिहिण्याच्या प्रसंगीं जर माझ्या मनांत कोणता मनोविकार जागृत झाला असेल, तर तो इंग्रजसरकारबद्दल राजद्रोह नसून माझ्या परमपूज्य हिंदुस्थान देशाची एकनिष्ठ प्रीति हा होय. हल्लींच्या परि-स्थितींत हिंदुस्थान देशाबद्दल एकाद्या मनुष्याला जितकें करतां येणें शक्य असेल तितकें मीं करून सोडलें आहे असें मला वाटत आहे. माझ्या या कृत्याबद्दल माझ्या देशाला आणि माझ्या परमेश्वराला मी जबाबदार धरतों. ''

आरोपी प्रो. परांजपे यांचे भाषणानंतर न्या. दावर यांनीं समारोपाचें भाषण केलें व निकाल ज्यूरीच्या सभ्यांवर सोंपविला.

दोन प्रहरीं बारा वाजतां ज्यूरींतील सभासद उठून गेले ते एक वाजून पंचावन्न मिनिटांनीं परत आले.

क्लार्क ऑफ दि क्राउनः—आपणा सर्वांचें एकमत आहे काय ?

सरपंचः—नाहीं.

क्ला. क्राउनः—आपलीं मतें कशीं विभागलीं आहेत ?

सरपंचः—पांचास चार.

ज० दावरः—तुमचें एकमत होण्याचा संभव नाहीं काय ?

सरपंचः—न्यायमूर्तींनीं आम्ही देऊं त्या विशिष्ट शब्दांमध्यें जर आमच्या म्हणण्याचा स्वीकार केला तर एकमत होण्याचा संभव आहे.

ज० दावरः—मग तरी तुमचें एकमत आहे काय ?

सरपंचः—होय.

ज० दावरः—तुमच्या हातांतील कागद मला पाहूं द्याल काय ?

नंतर सरपंचांनीं आपला अभिप्रायाचा कागद दिला. तो पाहून त्याला कांहीं हरकत नाहीं असें ठरल्यावर सरपंचांनीं आपला अभिप्राय वाचून दाखविला तो असाः—

" आरोपी दोन्ही कलमांखालीं गुन्हेगार आहे असें सर्व ज्यूरीचें मत आहे, परंतु आरोपीनें स्वदेशाभिमानानें प्रेरित होऊन लेख लिहिला असें

ज्यूरीस बहुमतानें वाटतें व यामुळें आरोपीवर दया करावी असें सर्वांचें मत आहे. ''

यानंतर शिक्षा सांगतांना आरोपीस उद्देशून ज. दावर म्हणाले:—
" तुमच्यासारख्या विद्वान् व गुणी गृहस्थावर असा प्रसंग यावा हें पाहून मला फार वाईट वाटतें. तुमच्या लेखांचे स्वरूपावरून ज्यूरीचें मत काय पडणार याबद्दल मुळींच शंका नव्हती. ज्यूरीच्या अभिप्रायानें कायद्याचा बोज राखला आहे, तेव्हां आतां कोर्टाची शिक्षा खुनशीपणाची असण्याचें कारण नाहीं, व तशी कधींही असूं नये. या गुन्ह्यास जन्मठेप काळेपाण्याची किंवा पुष्कळ वर्षांच्या कैदेची शिक्षा कायद्यानें सांगितली आहे, हें तुम्हांस माहीत असेलच. या हायकोर्टापुढें आजपर्यंत आलेल्या बहुतेक सर्व राजद्रोहाचे खटल्यांत कोर्टानें तुमच्यासारख्या गुन्हेगारांस फार सौम्य शिक्षा दिलेल्या आहेत. हेतु हा कीं, एवढ्यावरच सावध होऊन लेखकांनीं पुनः असले गुन्हे करूं नयेत. परंतु कोर्टाच्या या सौम्यपणाचा लेखकांचे मनावर कांहींच परिणाम झालेला दिसत नाहीं. काल जेव्हां मीं तुमचें भाषण ऐकलें तेव्हां, माझे समोर भाषण करणाऱ्या याच गृहस्थानें हे लेख लिहिले हें मला खरें सुद्धां वाटेना. तुमचें भाषण मीं ऐकलें हें एक प्रकारें बरें झालें. निदान तुम्ही तरी इतउत्तर असला गुन्हा पुनः करणार नाहीं, असा तुमच्या भाषणावरून मला भरंवसा वाटतो. हा माझा भरंवसा खरा ठरेल अशी माझी समजूत असल्यामुळें, हल्लींच्या परिस्थितीच्या दृष्टीनें मी ज्यूरीच्या शिफारशीचा विचार करून तुम्हांस सौम्यच शिक्षा करणार आहें. तुमचें या कोर्टांतील वर्तन व ज्यूरीची शिफारस यांकडे पाहून मी आतां देत असलेल्या शिक्षेंत व पूर्वी दिली असती त्या शिक्षेंत फार फरक पडला आहे. ही शिक्षा जरी माझे दृष्टीनें सौम्य आहे तरी तुमच्या दर्जाच्या गृहस्थास अत्यंत कष्टदायक होण्याचा संभव आहे. पण राजद्रोहाच्या अपराधाबद्दल १५ महिने व जातिद्वेषाबद्दल ४ महिने सक्तमजुरीची शिक्षा तुम्हांस दिली नाहीं तर मीं आपलें कर्तव्य केलें नाहीं असें होईल.'' यानंतर मनोहर छापखान्याचे जप्तीबद्दल अर्ज करणार काय? असें ज. दावरनीं बॅ. ब्रॅन्सन यांस विचारलें. विरुद्ध पक्षास अद्याप नोटीस दिली नाहीं, अशी त्यांनीं हरकत सांगितली. बॅ. बॅप्टिस्टा यांनींही आपली या बाबतींत

तयारी नाहीं असें सांगितलें. ज. दावरः—आरोपीस शिक्षा झाल्या-नंतर अशा अर्जांची जरूरच आहे काय ? ब्रॅन्सनः—याचा विचार करण्यास वेळ पाहिजे. ज. दावरः—सरकारचे असल्या प्रसंगींचे वर्तनास "आरोपीचा छळ" अशा दोषारोपाचा संपर्कही लागतां कामा नये. आरोपीचें वर्तन व चालचलणूक यांवरून आरोपी पुनः असला गुन्हा करील असा मुळींच संभव दिसत नाहीं. तथापि अशा अर्जांची जरूरीच वाटल्यास तो मजपुढें केव्हांही करण्यास मोकळीक आहे. पंधरा व चार महिन्यांच्या दोनही शिक्षा लागोपाठ भोगावयाच्या कीं एकाच वेळीं भोगावयाच्या असा प्रो. परांजपे यांनीं प्रश्न केला असतां, शिक्षा लागोपाठ भोगावयाच्या असें ज. दावर यांनीं उत्तर दिलें व कोर्टाचें काम संपलें.

इकडे हायकोर्टाबाहेर पोलिसच्या कडेकोट पहाऱ्यांत कैद्यांची गाडी उभी होती; व तिच्या आसपास लोकही बरेच जमले होते. पण रा. परांजपे यांस निराळ्या दरवाजानें नेऊन मोटारगाडींतून भायखळा स्टेशन-वर नेण्यांत आलें, व तेथून त्यांस आगगाडीनें ताबडतोब ठाण्याचे तुरुंगांत पाठविण्यांत आलें.

याप्रमाणें सरकारी कायद्याखालीं दोषी ठरविले जाऊन परांजप्यांची अखेर तुरुंगांत रवानगी झाली. परंतु लोकमत त्यांना स्वदेशभक्त आणि निर्दोषी असेंच मानीत होतें, हें त्यावेळच्या प्रमुख वर्तमानपत्रांतील लेखांवरूनही सहज दिसून येतें. एवढेंच नव्हे तर खुद्द खटल्यांतील 'स्पेशल' ज्यूरीनेंही 'स्वदेशभक्ती'चा अभिप्राय कसा दिला, तें वरील हकीगतींत आलेंच आहे. असो. या सुमारास सरकारी दडपशाहीनें एकंदर वातावरण किती प्रक्षुब्ध झालें होतें व लोकांतील खळबळीचा पारा ( tempo ) किती चढला होता याची कल्पना येण्याकरितां त्याचें गमक म्हणून पुण्यांत घडलेली एक गोष्ट सांगितली तरी पुरें होईल.

शनिवारीं पहांटे सदाशिव पेठेच्या हौदाजवळ कांहीं मोठा आवाज झाला. त्यामुळें नेहमींप्रमाणें पोलिस येऊन कांहीं चौकशी करून गेले. रा. गोखले, लिमये व केतकर ह्या गृहस्थांस पोलिसनें बोलावून नेऊन कांहीं विचारपूस केली. याच हौदाजवळ 'युरोपियन लोकांना घालवून द्या' अशा अर्थाचा एक जाहीरनामा लावण्यांत आला होता !

## खटला कोणीं जिंकला ?

प्रो. परांजपे यांचें या प्रसंगींचें ज्यूरीला उद्देशून केलेलें वक्तृत्वपूर्ण व मुद्देसूद भाषण वाचणाऱ्याला त्यांत परांजप्यांनीं आपल्याकडून मुद्यास मुद्दा खोडून काढलेला दिसेल. त्यावर जस्टिस दावर यांनींही आपला निकाल काय द्यायचा तो दिला. तथापि, फिर्यादविषयक लेख व ॲडव्होकेट जनरल व परांजपे यांच्या कोर्टातील उलट-सुलट तक्रारी वाचून वाचकाला स्वतंत्र मत बनवितां येणें शक्य असल्यामुळें पुराव्याची छाननी या ठिकाणीं करण्याची जरूर नाहीं. मात्र या खटल्यांत कायद्याचा एक महत्त्वाचा व मनोरंजक मुद्दा आहे, त्याची तेवढी चर्चा करूं. शिवाय, ती करतांना या खटल्यांत परांजप्यांचाच एक प्रकारें कसा विजय झाला, हेंही आपोआपच दिसून येणार आहे.

कोर्टातील खटला म्हणजे एक सामना असतो. पण पोलिसनें भरलेला खटला आणि त्यांतल्यात्यांत तो राजकीय गुन्ह्याबद्दलचा असला म्हणजे बहुधा हा सामना विषम होत असतो. कारण फिर्यादी पक्षाच्या मागें सरकार उभें असतें; उलटपक्षीं आरोपी हा एकटाच लढत असतो. त्याला लोकपक्षाची सहानुभूति असली तरी तिला सत्तेच्या सामर्थ्याची सर थोडीच येणार आहे ? अशा प्रतिकूल परिस्थितींतही शिवरामपंतांनीं आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर केलेली करामत पहाण्यासारखी आहे. सरकार त्यांच्यावर ' राजद्रोह ' शाबीत करून तुरुंगांत घालविण्यासाठीं बसलें होतें, हें उघडच आहे. म्हणून तर खटला भरला होता. शिवाय गुन्ह्याच्या शाबितीनंतर शिक्षा द्यावयाची ती मॅजिस्ट्रेटला दोन वर्षांपेक्षां जास्त देण्याचा अधिकार नसतो म्हणून विनंति करून खटला मुद्दाम हायकोर्टांत कमिट करून घेतला होता. एवढेंच नव्हे तर सरकारी वकिलांनीं कोर्टाला मुद्दाम अर्ज करून स्पेशल ज्यूरी मागून घेतली होती. ज्यूरींतील नऊ सभ्यगृहस्थांपैकीं पांच युरोपियन, तीन पारशी व दोन मुसलमान होते, हें वरील हकिगतींत आलेलेंच आहे. अशीं एकंदर कोर्ट-वातावरणांतील प्रसाद-चिन्हें पाहून अॅ. ज. बॅरिस्टर ब्रॅन्सन यांनीं मऊ माती म्हणून कोंपरानें खणण्याला प्रारंभ केला. खटल्याच्या

सुरवातीच्या भाषणांतच ब्रॅन्सनसाहेबांनीं खटला व आरोपी दोन्ही गुंडाळण्यास सुरवात केली. त्यांचें सुरवातीचेंच वाक्य असें होतें.

'आरोपीच्या लेखांत ढळढळीत राज-द्रोह भरलेला असून आपली बाजू मांडण्याच्याही भानगडींत आरोपीनें पडूं नये' हा शहाणपणा आणि तसें केलें तरी त्याच्या उपयोग होणार नाहीं, असा आव यांत घातलेला होता. यावरून फिर्यादी पक्षाच्या बळकटपणाबद्दल ब्रॅन्सन यांस किती विश्वास वाटत होता, हें सहज दिसून येतें. ते आपल्याच घमेंडींत होते. त्यांना आपल्या पुंढल्या जबरदस्त आरोपीची कल्पना नव्हती !

इंग्रजींतून चार तासपर्यंत वक्तृत्व-पूर्ण भाषण करून शिवरामपंतांनीं स्पेशल ज्यूरींत फूट पाडली. "गारोड्याच्या पुंगीनें नाग जसा डुलावा, तशी श्रोत्यांची स्थिति झाली" असें त्यांचें तें भाषण ऐकणारे सांगतात. ज्यूरीनें विचार करण्याकरितां दोन तास घेतले. पांचास चार मतें विभागलीं गेलीं. परंतु मागाहून ज. दावर यांनीं तुमच्यांत एकमत होण्याचा संभव नाहीं काय ? असें विचारल्यावर ज्यूरीनें कसा अभिप्राय दिला हें वर सांगितलेंच आहे. तो काळ, सरकारी खटला व राजद्रोहासारखा गुन्हा लक्षांत घेतां 'स्वदेशाभिमानानें प्रेरित होऊन लेख लिहिला' असें ज्यूरीच्या तोंडून वदवून घेतलें हा त्यांच्या वक्तृत्वाचा मोठा विजय होय. एवढेंच नव्हे तर खुद्द जज्जांवर शिवरामपंतांनीं निरपराधित्वाची व संभावितपणाची अशी कांहीं छाप बसविली कीं, काल जेव्हां तुमचें भाषण मीं ऐकलें तेव्हां माझेसमोर भाषण करणाऱ्या याच गृहस्थानें हे लेख लिहिले हें मला खरें सुद्धां वाटेना असे उद्गार ज. दावर यांनीं काढले. अखेर १९ महिन्यांची शिक्षा सौम्य म्हणून त्यांनीं सुनावली. एरवीं ही शिक्षा कितीतरी जास्त झाली असती असें दावर यांनीं बोलून दाखविलें. पण भाषणानें भारलेल्या ज्यूरीचा एकमताचा दाब पडल्यामुळेंच ती कमी झाली. या दृष्टीनें पाहतां सामन्यांतील हा निकाल म्हणजे शिवरामपंतांचा वैयक्तिक विजय तर होताच, पण दुसराही एक तात्त्विक विजय होता. जेव्हां ज्यूरींत पांचास चार असा मतभेद झाल्याचें फोरमननें जाहीर केलें तेव्हां तिथेंच जज्जसाहेब थांबते तर त्यांना ही पहिली ज्यूरी बरखास्त करून पुन्हा दुसरी ज्यूरी बोलावून खटला नव्यानें पुन्हा पहिल्यापासून चाल-

वावा लागला असता. कारण हायकोर्टीत ज्यूरीचें मताधिक्य फक्त एकाच मतानें असलेलें चालत नाहीं. दोन किंवा दोहोंपेक्षां अधिक मताचें असावें लागतें. आणि म्हणून हा खटला पुन्हा एकवार चालता तर अधिक गाजला असता आणि मग कदाचित् कांहीं वेगळाच रंग भरला असता ! परंतु ज. दावर यांनीं तुमचें एकमत होण्याचा संभव नाहीं काय असें ज्यूरीस विचारलें व नंतर ' आम्ही देऊं त्या विशिष्ट शब्दांमध्यें जर आमच्या म्हणण्याचा स्वीकार केला तर ' असें म्हणून ज्यूरीनें आपलें एकमत दिलें. म्हणून खटला पुन्हा चालविण्याचा प्रसंग टळला. तरी देखील ज्यूरीनें दिलेला अभिप्राय लक्षांत घेण्यासारखा आहे.

" आरोपी दोन्ही कलमांखालीं गुन्हेगार आहे असें सर्व ज्यूरीचें मत आहे. परंतु आरोपीनें स्वदेशाभिमानानें प्रेरित होऊन लेख लिहिला असें ज्यूरीस बहुमतानें वाटतें व यामुळें आरोपीवर दया करावी असें सर्वांचें मत आहे. "

या अभिप्रायांत आरोपीचा हेतु स्वदेशभक्तीचा होता असा स्पष्ट निर्णय ज्यूरीकडून मिळाला हाच शिवरामपंतांनीं मिळविलेला तात्त्विक विजय. पण या ज्यूरीच्या निर्णयांतच एक कायद्याचा मुद्दा गोवला गेला आहे !

कायद्याप्रमाणें आरोपीचा हेतु कोणता होता हीच मुद्द्याची गोष्ट असते आणि त्या दृष्टीनें ज्यूरीचा अभिप्राय पाहिला म्हणजे त्यांतून आरोपी दोषी होता किंवा नव्हता याचा कांहींच बोध होत नाहीं. झालाच तर आरोपी निर्दोषी होता असाच ध्वनि त्यांतून निघतो. कारण स्वदेशभक्तीनें प्रेरित होऊन लेख लिहूं नयेत, असें कोणत्याच कायद्यांत सांगितलेलें नाहीं ! पुढें या निकालावर अपील करण्याबद्दलचा परवानगी-अर्ज परांजपे यांजतर्फे मुंबईचे राघवय्या सॉलिसिटर यांजकडून करण्यांत आला. त्यांतल्या इतर मुद्द्यांपेक्षां याच मुद्द्यावर भर देण्यांत आला होता. सदर अर्जांतील अठराव्या कलमांत हा मुद्दा खालीलप्रमाणें मांडण्यांत आला होता.

'( १८ ) आरोपीची अशी खात्री आहे, कीं वरील सतरा व अठरा या आंकड्यांखालीं दिलेल्या विवक्षित गोष्टींखेरीज दुसऱ्याही आणखी पुष्कळ मुद्द्यांसंबंधानें जज्जांनीं ज्यूरीचा गैरसमज केला.व त्यांची आणखी अशी खात्री आहे कीं, ह्याप्रमाणें जज्जांनीं ज्यूरीचा गैरसमज केला नसता

तर ज्यूरीनें आरोपीविरुद्ध निकाल कधींही दिला नसता. वास्तविक म्हटलें असतां ज्यूरीनें निकाल आरोपीचे विरुद्ध दिला कीं त्याच्या तर्फेचा दिला, हेंच सांगणें मुष्किलीचें झालें आहे. कारण वर सांगितल्याप्रमाणें ज्या हेतूस्तव आरोपीवर मेहेरनजर करण्यास कोर्टास ज्यूरीनें सांगितलें, त्यावरून बघितलें असतां, ज्यूरीची आरोपीच्या गुन्ह्याबद्दल काय समजूत झाली हें सांगणेंच कठीण आहे.'


वास्तविक हा कायद्याचा व पंचांच्या मतांचा अर्थ लावण्याचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा व निदानपक्षीं अपील करण्याला परवानगी देण्याच्या योग्यतेचा असा होता.

परंतु अपील करण्याला परवानगी मिळाली नाहीं. म्हणून प्रीव्ही कौन्सिलांतही अपील करण्यांत आलें होतें. पण तिथेंही appeal is an up-hill task हीच गोष्ट अनुभवाला आली.

इकडे पुण्यास, शिवरामपंतांच्या कुटुंबांत त्यावेळीं त्यांची पत्नी, मुलगे कृष्णाजीपंत व विनायक आणि सर्वांत धाकटी मुलगी दुर्गा अशीं माणसें होतीं. पण विनायक सरासरी सात वर्षांचा व दुर्गा तर तीनचार वर्षांचीच होती. त्यामुळें, घरांतील व पत्राची सर्व जबाबदारी त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव कृष्णाजीपंत यांजवर येऊन पडली. त्यावेळीं कृष्णाजीपंतांचें वय वीस वर्षांचें असून ते डेक्कन कॉलेजांत बी. ए. चे वर्गांत शिकत होते. त्यांचें लग्न आदल्याच वर्षीं म्हणजे १९०७ च्या वैशाखाच्या महिन्यांत शिवरामपंतांनीं करून दिलें होतें. व व्याह्यांनीं (कल्याणचे कै. सदाशिवराव ओक) शिवरामपंतांचे मुलाला मुलगी दिली त्यावेळींच शिवरामपंतांचा एक पाय तुरुंगांत आहे हें जाणूनच दिली. असो. शिवरामपंतांना पकडलें तेव्हां त्यांच्या गैरहजेरींत 'काळा'चा एक अंक त्यांचे स्नेही व त्यावेळचे केसरीचे संपादक खाडिलकर यांनीं काढला होता. पण कायमची कांहीं तरतूद करणें अवश्य होतें. म्हणून दे. पुरुषोत्तम बापूजी खरे बी. ए. यांचे नांवानें काळपत्राचें डेक्लरेशन करण्यांत आलें. हे खरे म्हणजे ना. दाजी आबाजी खरे यांचे पुतणे होते. तथापि त्यांचीं मतें त्यांच्या चुलत्यांच्या अगदीं विरुद्ध टोंकाचीं म्हणजे जहाल होतीं. त्यांनीं काळ पूर्वींच्याच धडाडीनें चालविण्यास



कृ. शि. परांजपे



पति-पत्नी

सुरवात केली. शिवाय, कृष्णाजीपंतांनाही मधूनमधून लिहावें लागत असे. याखेरीज छापखान्याची व्यवस्था व कुटुंबाचा भारही त्यांचेवरच पडला असल्यामुळें त्यांनीं डेक्कन कॉलेजच्या रेसिडेन्सींत राहण्याचें सोडून जवळ असलेल्या फर्ग्युसन कॉलेजमध्यें नांव दाखल केलें होतें. घरीं राहून, काम संभाळूनच कॉलेजमध्यें जात. अण्णांना शिक्षा झाल्याचें वर्तमान ऐकून महाडास त्यांच्या वृद्ध मातोश्रीला धक्काच बसला. इकडे पुण्यास शिवरामपंतांच्या शिक्षेमुळें त्यांच्या पत्नीची तर चमत्कारिकच अवस्था होऊन गेली. जानकीबाई जुन्या चालीच्या, आशिक्षित पण गृहकृत्यांत दक्ष आणि संसारांत लक्ष असलेल्या, पतिसेवातत्पर अशा आर्य पतिव्रता या नांवाला शोभण्यासारख्या होत्या. शिवरामपंतांच्या भव्य, तेजस्वी शरीरयष्टीच्या मानानें त्या बारीक दिसत. पतीच्या कामगिरीचें यथार्थ स्वरूप त्यांना कळण्याचा संभव नव्हता, तथापि त्यांचें मोठेंपण आणि लोकप्रियता जानकीबाईच्या नेहमींच अनुभवाला येत होती. खटल्याचे वेळीं कुणी म्हणे काळेंपाणी होणार, कुणी म्हणे लांब मुदतीची शिक्षा होणार. मुलगा धीर देण्याला होता, तरी बाईचें अंतःकरण या कानावर येणाऱ्या वार्तांनीं करपून जात असे. अखेर एकोणीस महिन्यांची शिक्षा झाल्याची बातमी कळली तरीही जानकीबाईना डोक्यावर वज्राघात झाल्यासारखेंच झालें. आणि पुढें शिवरामपंत सुटून येईपर्यंत जानकीबाईनीं उंबरठ्याच्या बाहेर पाऊल टाकलें नाहीं कीं सणासुदीला डोक्याला कधीं बोटभर तेल लावलें नाहीं! नवससायास सारख्याच बोलत. व्रतवैकल्यें चालूच होतीं. पतीनें तुरुंगांत घर केलें होतें तर पत्नीनें घरालाच तुरुंग मानलें होतें! सांत्वन-समाधान करणाऱ्यांची रीघ लागत असे. त्याच्या जिवावर जानकीबाई दिवस मोजीत बसत.

एकीकडे खऱ्यांच्या संपादकत्वाखालीं काळ शिवरामपंतांच्या वेळेप्रमाणेंच निर्भयपणें आणि तडफदारपणानें निघत होता. इतकेंच नव्हे तर ‘ उससे भी जादा ’ असें लोकांना वाटण्यासारखे खऱ्यांचे लेख असत. सरकारनें खटला करून शिवरामपंतांना तुरुंगांत टाकलें असलें तरी त्यामुळें काळाचा खप कमी न होतां आणखी विलक्षणच वाढला. सरकारच्या दृष्टीनें शिवरामपंतांच्या अपराधाची ही ‘ उलटी खूण ’च होती. काळाचा खप

किती आहे, याची चौकशीही काळ ऑफिसांत होऊं लागली. शिवराम-पंतांचेवरील खटल्याचे पाठोपाठ पुढल्याच आठवड्यांत टिळकांवरचा 'देशाचें दुर्दैव' या लेखाबद्दलचा खटला जस्टिस दावर यांचेपुढेंच सुरू झाला. ता. २२ जुलई रोजीं टिळकांना सहा वर्षांची जबर शिक्षा सांग-ण्यांत आली. त्यावर टीका करतांना 'देशाचें दुर्दैव' हाच दुहेरी अर्थाचा मथळा देऊन खऱ्यांनीं काळांत अग्रलेख लिहिला होता. त्यांच्या लेखांतून शिवरामपंतांची चुणूक वाचकांच्या प्रत्ययाला येत असे. त्याचें एक उदाहरण म्हणजे त्यावेळीं सरकारनें चालविलेल्या दडपशाहींत शिक्षा होऊन कित्येकजण तुरुंगवास भोगीत होते, त्यांचीं नांवें एकत्र करून देतांना त्यावर Honours list किंवा सन्मानितांची यादी असें हेडिंग घातलें होतें व त्याखालीं मोठ्या पदवीधरापासून सुरवात करून छोट्या-पर्यंत देण्याची जशी सरकारी पद्धत असते, त्याप्रमाणेंच फांशीं गेलेल्यांपासून, काळेंपाण्यावर गेलेले सहा वर्षवाले, दोन वर्षवाले अशी उतरती मांडणी दिलेली होती. खऱ्यांवरही सरकारची नजर वळणार, हें उघड दिसूं लागलें होतें. आणि तसें झालेंच. ता. १८ डिसेंबरच्या काळाच्या अंकांत त्यांनीं 'बुडत्याचा पाय खोलांत' हा लेख लिहिला होता. ता. २८-१-०९ रोजीं खऱ्यांना काळ ऑफिसांतूनच अटक करून नेण्यांत आलें व हाय-कोर्टांत त्यांच्यावरील खटला चालून सहा महिन्यांची सजा भोगण्याकरितां त्यांना येरवड्याला पाठविण्यांत आलें. खऱ्यांची जागा श्री. सदाशिव लक्ष्मण सोमण (किरातांचे बंधु) बी. ए. एलएल्. बी. यांनीं घेतली. हेच 'काळा'चे शेवटले संपादक! कारण पुढें शिवरामपंत सुटून आल्यावर कांहीं दिवसांतच काळ बंद करावा लागला.

याच सुमारास प्रो० परांजपे यांजवरील खटल्याची हकीगत, त्यांचें संक्षिप्त चरित्र व बचावाचें मुद्दाम शब्दशः टिपून घेतलें गेलेलें भाषण छापलेलीं सापकर, दंडवते इत्यादींचीं तीनचार पुस्तकें प्रसिद्ध झालीं. याखेरीज टिळक-परांजप्यांवरील खटल्यांची एकत्र माहिती देणारींही दोन-तीन पुस्तकें निघालीं होतीं. परंतु परांजपे यांचें हायकोर्टांतलें भाषणच सरकारनें आक्षिप्त ठरविल्यामुळें सगळींच पुस्तकें जप्त झालीं! (ही बंदी १९३७ मध्यें कॉं. सरकारनें दूर केली) तरीसुद्धां हीं भाषणें

धनाप्पा वाळवे नांवाच्या गृहस्थानें छापून प्रसिद्ध केली, म्हणून त्यास शिक्षा देण्यांत आली. इतकें होत आहे तोंच या वर्षीचा गणेशोत्सव आला. लोकांना या दोनही पुढाऱ्यांची उणीव भासत होती. त्यावेळच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेल्या मुंबईच्या बातमीपत्रांत 'चापधर' लिहितो:

'लो. टिळकांच्या व वाग्देवीचे लाडके लो.परांजपे यांच्या बंदिवासाच्या संकटामुळें हें कार्य कशा रीतीनें तडीस जाणार हा एक येथें बिकट प्रश्न येऊन पडला होता. पहिले एकदोन दिवसांत या लोकमान्यद्वयांच्या अभावाची बरीच उणीव दिसून आली.''

पुण्यांत दहा दिवसांतून एक दिवस मेळे—टिळक-परांजपे नसले तरी—त्यांच्या वाड्यांत हजेरी लावून जात.

असो. इकडे शिवरामपंतांचें काय झालें तें पाहूं. शिक्षा होतांच त्यांना ठाण्याच्या तुरुंगांत नेऊन ठेवलें होतें व पहिले तीन महिने त्यांना तिथेंच काढावे लागले. या तुरुंगांत शिवरामपंतांना फार हाल सोसावे लागले. त्यावेळच्या आणि आतांच्या राजकीय कैद्यांच्या स्थितींत जमीन-अस्मानांचें अंतर पडलें आहे. तेव्हां राजकीय कैद्यांनाही इतर सामान्य गुन्हेगारांप्रमाणेंच लेखण्यांत येई. तुरुंगाच्या आचारांत खून केलेला आणि 'राजद्रोही' देशभक्त दोघेही सारखेच, अशी स्थिति असे. पहिल्या-पहिल्यांदा शिवरामपंतांना जेवणाच्या बाबतींत अतिशयच त्रास सोसावा लागला. कांद्याचें व त्यांचें तर सरकारइतकेंच वांकडें असे. आणि तुरुंगां-तल्या अन्नांत कांद्याचें प्रमाण आणि प्राबल्य फार. कांद्याच्या नुसत्या वासानेंही त्यांना वांत्या होत.शिवाय, सुरवातीला त्यांना चक्की पिसण्याचें व नंतर वेत विणण्याचें काम दिलें होतें. अंगावर कैद्याचे कपडे आले होते. तिथें चड्डी—कुडत्यांतल्या शिवरामपंतांना पाहिलेल्या लोकांना तें दृश्य पाहवत नसे. तीन महिन्यांतच त्यांचें वजन वीस पौंडांनीं घटलें होतें.

टिळकांना साबरमतीच्या तुरुंगांत ठेविलेलें होतें. मंडालेला नेण्या-पूर्वी त्यांना तिथून हलविल्यानंतर ता. ४ ऑक्टोबर १९०८ रोजीं शिवरामपंतांना ठाण्याच्या तुरुंगांतून काढून कैद्याच्या पोषाखांतच थर्ड-क्लासमधून आगगाडीनें साबरमतीच्या तुरुंगांत पोंचविण्यांत आलें !

# १०

# मुक्ततेनंतरचे दोन आघात

“ मातोश्री, मी अनंत अपराधी आहें !—”

“ देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा देऊन सुद्धां मला जितका धक्का बसला नसता तितका सरकारनें माझा प्रतिप्राण असणारें दहा वर्षांतलें वाङ्मय जप्त करून दिला व हाच माझा तरुणपणचा जिवंत मृत्यु होय.”

—शि. म. परांजपे.

साबरमतीच्या तुरुंगांत शिवरामपंतांना टिळकांचीच कोठडी मिळाली होती. तुरुंगांतल्या आवारांत शिरल्याबरोबर युरोपियन वॉर्ड आहे त्यांतल्या बराकींत ही कोठडी आहे. तिथल्या वातावरणाचें वर्णन खुद्द शिवरामपंत करतात*—

“ साबरमती जेलच्या थोरल्या दरवाजांतील ऑफिसवरून पुढें गेल्यावर उजव्या हाताकडे जो रस्ता वळतो, त्या रस्त्यावरून कांहीं अंतरावर गेल्यानंतर लहान वयाच्या गुन्हेगार मुलांना ठेवण्याकरितां एक ज्युव्हेनाईल वॉर्ड लागतो. त्यामध्यें त्यावेळीं श्री. बाळासाहेब नातू यांना जागा करून देण्यांत आलेली होती. आणि त्याच्याच पुढें जो एक युरोपियन वॉर्ड आहे, त्यांत लोकमान्यांना नेऊन ठेवण्यांत आलें होतें. व तेथें दुसऱ्या कोणालाही येण्याची सक्त बंदी करण्यांत आली होती. ही जागा फार रमणीय आहे. मध्यभागीं असलेल्या रहावयाच्या बराकीला फरशी व भिंतीला चुन्याचा गिलावा केलेला असून पुढील पटांगणामध्यें जिकडे तिकडे बारीक रेती टाकलेली आहे. या पटांगणांतच मधल्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंला

* लो. टिळक यांच्या आठवणी आणि आख्यायिका पान २००

कडुलिंबाचीं हाताला सहज पानें आणि फुलें येण्याइतकीं लहान लहान झाडें आहेत. त्यामुळें तेथें वारा फार चांगला येतो, आणि त्या वाऱ्याबरोबर कडुलिंबाच्या फुलांचा जो वास येतो, तो इतका मधुर असतो कीं,त्या वासाच्या फुलांच्या झाडाच्या पाठीमागें कडू हें विशेषण कोणीं लावलें असावें, याच्याबद्दल मोठें आश्चर्य वाटतें. या ठिकाणीं लोकमान्यांचा सुमारें दोन महिने मुक्काम होता,व नंतर येथूनच त्यांना मंडालेकडे नेण्यांत आलें.''

चार भिंतींत कोंडलेल्या रसिक मनाला तुरुंगाच्या कडुलिंबांतलेंही मधुरपण प्रत्ययाला येतें, याचें ही आठवण म्हणजे एक उदाहरणच आहे. पण शिवरामपंतांची शरीरप्रकृति मात्र खालावत चालली होती. इथल्या तुरुंगांत मुख्यत: वेत तयार करून विणण्याचें काम त्यांचेकडे दिलें होतें. या कामांतल्या पारंगततेची व तुरुंगवासाची खूण म्हणून सुटल्यावर स्वतः तयार केलेली एक वेताची खुर्ची त्यांनीं आपल्याबरोबर आणली होती. साबरमतीच्या तुरुंगांत पुढें पुढें टाइम्स व कांहीं पुस्तकें वाचण्याची सवलतही त्यांना मिळाली होती.शिवाय तुरुंगातलें कदन्न आणि कष्टमयता यांचा कांहीं अंशीं सरावही होऊन त्यांचें आरंभीं जें वीस पौंड वजन कमी झालें होतें, त्यांतलें ४ पौंड भरून निघालें! तथापि अशक्तता, भोंवळ येणें, निद्रानाश यांमुळें ओळखूं न येण्याइतकी प्रकृतीची स्थिति झाली होती. या क्षीणतेला आणखीही एक कारण झालें असावें असें दिसतें. ' तुरुंगांत गेल्यावर शिवरामपंतांनीं प्राणायाम सुरू केला. तेथें त्यांस तिसऱ्या नेत्रांतून उजेड दिसूं लागला, पण त्यांस तो उजेड पुनः बंद कसा करावा हें समजेना. त्यांस झोंप घेतां येईना. डोळे बंद केले, तरी प्रकाश दिसत असे. शेवटीं जेव्हां त्यांची कारागृहांतून मुक्तता झाली, तेव्हां ते कै. गजानन भास्कर वैद्य यांस भेटले. कै. वैद्य यांनीं ' तुम्ही प्राणायाम करण्याचा नाद सोडून द्या ' असें सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं केलें व प्रकाश दिसण्याचें बंद झालें. पुढें त्यांची प्रकृति नीट सुधारली. '

ह्या तुरुंगांतील योगाभ्यासाची माहिती आचार्य भागवतांनीं आपल्या लेखांत पुढीलप्रमाणें दिली आहे:--

''या शिक्षेच्या वेळीं त्यांना तुरुंगांत योगाभ्यासाचा नाद लागला होता. तुरुंगाच्या राहणींत खाण्यापिण्याचा आणि निजण्याउठण्याचा नियमित-

पणा सक्तीनेंच पाळावा लागतो. त्यांनाच एकट्याला एकीकडे ठेविलें असल्यामुळें अनायासेंच त्यांस एकांत लाभला होता. बोलावयाला कोणीच भेटत नसल्यामुळें सहजच मौन घडत होतें. त्यांच्या खोली-समोरच्या अंगणांत एक कडुलिंबाचें झाड होतें. फिरतां फिरतां त्याचीं हातास येणारीं कोंवळीं पानें खेळ म्हणून चघळावीं असा त्यांचा योग्याला साजेल असा दिनक्रम चालला होता. तेथें योगसमुद्रांत निष्णात असणाऱ्या एका कैद्याची व त्यांची गांठ पडली. त्याच्या संगतीनें करम-णुकीसाठीं त्यांनींही योगाभ्यास सुरू केला. हळूहळू त्यांची त्या मार्गांत प्रगति होऊं लागली. तेजाचें ध्यान करतां करतां काळोख्या रात्रीं डोळे उघडल्यानंतरही खोलींत त्यांना सर्वत्र प्रकाश दिसूं लागला. असें कित्येक दिवस चाललें होतें. एक दिवस असा प्रकाश पाहत असतां त्यांस एका-एकीं मूर्च्छा आली आणि कित्येक तास ते बेशुद्ध होऊन पडले ! या अप-घातामुळें पुढें त्यांनीं तो अभ्यास सोडून दिला. या योगानुभवाच्या आधारें ' विष्णुसहस्रनामा 'वरील आपल्या सुंदर लेखांत त्यांनीं पुढील प्रदीर्घ वाक्य लिहिलें आहे:—

" अनेक दिवसांच्या शुभ संस्कारांनीं मनाचें मालिन्य निर्मूल होतें, वासना गलित होतात, भगवंताच्या चरणारविंदाचें आणि मुखारविंदाचें ध्यान स्थिरता पावूं लागतें, भगवंताची कृपा होऊं लागते, भगवंताची प्रत्यक्ष मूर्ति अंतःकरणामध्यें प्रकट होऊं लागते, त्याच्या त्या ओजाची नीलवर्ण निश्चित सुंदर स्तुति आपल्या डोळ्यांच्या पुढें आणि पाठीमागें, आंत आणि बाहेर, या बाजुला आणि त्या बाजूला, वर आणि खालीं, जिकडे पाहावें तिकडे व्यापलेली दिसूं लागते, तनु रोमांचित होते, कंठ सद्गदित होतो, नेत्र अश्रुपूर्ण होतात, मन वेडावून जातें, आणि या दृश्य जगाचा मात्र आधार सुटतो, परंतु त्या अदृश्य परमात्म्याचा पूर्णहस्तावलंब हस्तगत होत नाहीं, अशा प्रकारची जेव्हां अवस्था होते तेव्हां भक्तिरसानें अंतर्बाह्य एकाकार वृत्ति बनून जाते, तर्काच्या पायावर उभी राहणारी बुद्धि लंगडी पडून या अल्प शरीरामध्यें कोंडलेलें मन प्रेमातिरेकानें सर्व त्रैलोक्यामध्यें हर्षनिर्भर होऊन नाचूं लागतें, आणि हे अदृष्टपूर्व, अश्रुत-पूर्व, अज्ञातपूर्व असे अंगावर शहारे आणणारे अद्भुत चमत्कार परि-

दृश्यमान करविणारा तो ब्रह्मांडाचा मायावी गारुडी आहे तरी कोण ? आणि तो असतो तरी कोठें ? अशा जिज्ञासेनें मन जेव्हां त्याच्याविषयीं विचार करूं लागतें, डोळे जेव्हां त्याला शोधूं लागतात आणि 'हे देवा ! हे प्रभो ! हे भगवंता ! हे नारायणा !' अशा अनेक परींनीं आपली गोंधळून गेलेली वाणी जेव्हां त्या सच्चिदानंदाला कारुण्यानें हांका मारूं लागते, जेव्हां मनांत कोंडलेलें आश्चर्य वसंत ऋतूंतील तरुपल्लवांप्रमाणें अंकुरित होऊन मुखावाटे बाहेर पडूं लागतें, आणि जेव्हां सात्त्विक प्रेमरसाचा ओघ गंगानदीच्या सहस्रमुखांप्रमाणें वाणीच्या सहस्रावधि वाटांनीं अप्रतिबद्धपणानें आणि सर्व मर्यादांचें उल्लंघन करून सैरावैरा धावूं लागतो, त्यावेळीं देवाला आपण किती नांवांनीं हांक मारीत आहों, एकाच देवाला हांका मारण्याला इतकीं नांवें कशाला पाहिजेत, किंवा एकदां ज्या नांवानें हांक मारिली तेंच नांव फिरून एखादवेळीं चुकून येत आहे कीं काय, असल्या क्षुद्र आणि क्षुल्लक प्रश्नांकडे लक्ष देण्याला कोणतें मन जाग्यावर असतें ?"

अशा रीतीनें १५ महिन्यांचा बंदिवास भोगल्यानंतर १९०९ चा सप्टेंबर महिना उजाडला. तुरुंगाच्या नियमाप्रमाणें शिक्षेच्या मुदतींत मिळणारी सूट जमेस धरली तरी परांजप्यांची सुटका नोव्हेंबरांत होईल अशी लोकांची अपेक्षा होती. पण १८५८ सालच्या जाहीरनाम्याच्या पन्नास वर्षांच्या वाढदिवसानिमित्त एक महिना जादा सूट कैद्यांना मिळावयाची ठरल्यामुळें परांजप्यांची मुक्तता ता. ५ ऑक्टोबर रोजीं होणार असें सरकारनें सप्टेंबर अखेर जाहीर केलें. ही बातमी 'काळ' पत्रानें ता. १ ऑक्टोबरच्या अंकांत एक स्फुट लिहून प्रसिद्ध केली. योगायोग असा कीं, याच अंकांत

**ने, मजसी ने, परत मातृभूमीला**
**सागरा, प्राण तळमळला !**

ही सावरकरांची कविता प्रसिद्ध झाली होती.

वर सांगितलेल्या काळाच्या स्फुटांत, 'सरकारी अधिकाऱ्यांनीं कितीही प्रयत्न केले, तथापि परांजप्यांबद्दलची जनतेची आदरबुद्धि केव्हांही नष्ट होणें शक्य नाहीं,' असा विश्वास प्रकट केला होता. त्याचें प्रत्यंतर

परांजपे सुटल्यानंतर त्यांचें अहमदाबाद, मुंबई, पुणें या ठिकाणीं जें अपूर्व असें स्वागत झालें, त्यावरून चांगलेंच दिसून आलें. मुंबई पुण्यास प्रचंड जनसमुदायानें गाडीचे घोडे सोडून मिरवीत त्यांना आपल्या घरीं पोंचतें केलें. पुणें स्टेशनवर तर त्यांना आणण्याकारितां झालेल्या गर्दी रेटारेटींत भोपे नांवाच्या एका भक्तानें आणिलेलें चांदीचें ताट बेपत्ता झालें ! असो. या स्वागताची हकीगत त्यावेळच्या वर्तमानपत्रांतून आलेलीच देऊं.

## अहमदाबादची हकीगत

" श्रीपरमेश्वरकृपेनें दे. भ. परांजपे तुरुंगवासासारख्या आपत्तींतून बचावून देशकार्य करण्यासाठीं पुनः आपल्यांत आले आहेत, त्याबद्दल परमेश्वराचें अंतःकरणपूर्वक स्तवन करणें आपल्या सर्वांचें आद्यकर्तव्य आहे. दे. भ. परांजपे यांना प्रथम कांहीं दिवस ठाण्याच्या बंधगृहांत ठेवण्यांत आलें होतें. गेल्या वर्षी ऑक्टोबरच्या ४ थ्या तारखेस त्यांना तेथून काढून साबरमती येथील बंधगृहांत ठेवण्यांत आलें. व तेव्हांपासून बरोबर एक वर्ष एक दिवस इतक्या अवधीनंतर म्हणजे गेल्या मंगळवारीं सकाळीं पावणेसात वाजतां त्यांची हिंदी देश-भक्तांच्यासाठीं सरकारनें सदैव तयार ठेवलेल्या नवीन गृहांतून सुटका झाली. त्यांची कांहीं आप्त इष्ट व स्नेही मंडळी त्यांना घेऊन जाण्यासाठीं अमदाबादेस गेली होती. ती सर्व त्या प्रसंगीं हजर असून गांवांतील कांहीं व्यापारी गृहस्थ व इतर कांहीं सभ्य गृहस्थ फलपुष्पादि उपचारांनीं दे. भ. परांजपे यांचा बहुमान करण्यासाठीं त्या ठिकाणीं हजर होते. गांवांत आल्यानंतरही आपल्या देशाविषयीं व देशभक्तांविषयीं प्रेम बाळगणारे पुष्कळ गृहस्थ दे. भ. परांजपे यांच्या भेटीस येऊन गेले. अहमदाबादे-सारख्या राजकीय बाबतींत उदासीन शहरांत सुद्धां इतक्या लोकांनीं सरकारच्या कोर्टानें राजद्रोही ठरविलेल्या सद्गृहस्थांचा बहुमान करावा ही गोष्ट खास आशाजनक होय. दे. भ. परांजपे यांची प्रकृति अर्थात् क्षीण झाली आहे. परंतु मूळ वजनापेक्षां त्यांचें वजन जें वीस पौंडांनीं कमी झालें होतें, तें आतां फक्त सोळा पौंडांनीं कमी झालें आहे. परंतु परमेश्वरकृपेनें लवकरच त्यांना पूर्ववत् शक्ति प्राप्त होऊन ते आपलें अंगी-कृत कार्य अधिक नेटानें करूं लागतील असें मानावयास आज कांहींच

हरकत नाहीं. हल्लीं इतकी क्षिणता प्राप्त झाली असूनही ते सायंकाळीं बहिऱ्यामुक्यांची एक शाळा पाहण्यास गेले होते.व त्या संस्थेला त्यांनीं योग्य देणगीही दिली आहे.त्याचप्रमाणें तेथील कांहीं तरुण मंडळींच्या निमंत्रणावरून ते त्यांच्या एका संस्थेमार्फत झालेल्या पानसुपारीस गेले होते.व त्या प्रसंगीं त्यांना आपलें अलीकडचें पहिलें भाषण करावें लागलें.त्यांत ते म्हणाले:—

"आजच्या दिवसास आपण आनंदाचा म्हणतां, परंतु खऱ्या आनंदाचा दिवस दूर आहे. आपले लोकमान्य परमपूज्य बळवंतराव टिळक मुक्त होतील तो आपला एक खरा आनंदाचा दिवस होईल. परंतु त्याच्याही पलीकडे आपल्याला त्याहीपेक्षां अधिक आनंदाचे दिवस येणार आहेत. आपण निराश होण्याचें मुळींच कारण नाहीं. या संस्थेंतील लोक बालगोपाल आहेत, असें एका वक्त्यांनीं सांगितलें. ते उद्यां तरुण होतील, वृद्ध होतील; परंतु त्यांची आजची स्थिति फारच स्पृहणीय आहे. त्यांचे सुखाचे दिवस अद्यापि यावयाचे आहेत. त्यांचे स्नायु ढिले झालेले नाहींत, त्यांचें रक्त मेलेलें नाहीं. त्यांच्या शरीराप्रमाणेंच त्यांचें मनही अद्यापि तरुण आहे. भावी सुखाच्या आशेनें त्यांच्या हृदयांत आपली छाप बसविली आहे. तरुण सूर्य केव्हांतरी आपल्या डोक्यावर येणारच. त्याचप्रमाणें आपलें राष्ट्र आज तरुण झालें आहे. उगवणाऱ्या सूर्याच्या व चंद्राच्या प्रभेप्रमाणें आपल्या राष्ट्राची प्रभा अद्याप क्षितिजावर फारशी दिसत नाहीं. परंतु आपल्या राष्ट्राची प्रभा पूर्वेकडे दिसत आहे. व पूर्वेकडे दृष्टीस पडणारी प्रत्येक प्रभा दिवसेंदिवस वाढत जाणार. आज नाहीं, उद्यां ती सर्व जगाला उजेड देईल व सर्व जगाला दिपवून सोडील. यासाठीं तरुण लोकांना व तरुण राष्ट्रांना निराश होण्याचें कारण केव्हांही नसतें. पूर्वेकडे उदय पावणारे चंद्र, सूर्य व तारे आपल्याला हेंच शिकवीत आहेत. परमेश्वराचा नियमही असाच आहे. चिखलाचा जसा घट बनतो, त्याप्रमाणें आपली उन्नति आमच्या कर्मापासून बनविली जाते. परंतु चिखलाचा घट बनविण्यास जसा कुलाल हवा लागतो, त्याचप्रमाणें आपली उन्नति घडवून आणणें परमेश्वराच्या आधीन आहे.युक्तकर्म करणें आपलें कर्तव्य आहे.अहमदाबाद शहर व्यापाऱ्यांचें

स्थान आहे. व्यापारीही आपल्यास पाहिजे आहेत. या संस्थेसारखी संस्था येथें बीजरूपानें अस्तित्वांत आहे, ही आशाजनक गोष्ट होय. आपण कर्तव्य करीत गेल्यास हीच संस्था महाफलप्रद होईल..."

अहमदाबादेस एकंदर १०-१२ मंडळींचे घरीं दे.परांजपे यांचा बहुमान झाला. त्या दिवशीं रात्रींच्या मेलगाडीनें ते आपल्या मित्रमंडळीसह मुंबईस निघून आले. वाटेंत बडोदा, सुरत, नवसारी, पालघर, दादर वगैरे ठिकाणीं तत्रस्थ लोकांनीं त्यांचा बहुमान करून त्यांना आपलें अंगीकृत देशकार्य पूर्वींप्रमाणेंच दृढ निश्चयानें पुढें चालविण्यास अप्रत्यक्ष रीतीनें विनंती केली. अहमदाबाद वगैरे प्रत्येक स्टेशनवर त्यांच्या स्वागतप्रसंगीं श्रीशिवराज, लोकमान्य टिळक, मातृभूमि व शिवरामपंत यांच्या नांवांचा जयघोष करण्यांत येत असे."

## मुंबईतील स्वागत

" दे. शिवरामपंत परांजपे यांची मंगळवार ता. ५ सकाळीं साबरमतीचे तुरुंगांतून सुटका झाल्याची खबर त्याच दिवशीं मुंबईस तारेनें आली. त्या दिवशीं दिवसभर अहमदाबाद येथें राहून दे. परांजपे रात्रींच्या मेलनें निघून बुधवारीं सकाळीं ७॥ वाजतां येथें ग्रँटरोड स्टेशनवर उतरले. त्यांस सामोरे जाण्यासाठीं चारपांचशेंवर मंडळी गाडी येण्यापूर्वीं स्टेशनाजवळ जमली होती. स्टेशनाचे आंत गर्दी न होऊं देण्याची पोलिसनें व्यवस्था केली होती. तरी बाहेर उभ्या राहिलेल्या मंडळीला पोलिसांकडून मुळींच त्रास झाला नाहीं. शिवरामपंत गाडींतून उतरल्यावर 'वंदेमातरम्'च्या गजरांत सरदारगृहामार्फत आलेल्या घोड्याच्या गाडींत ते बसले. तेथें त्यांच्या गळ्यांत फुलांचा हार घातल्यावर गाडी चालूं लागली. केसरीकर्ते दे. भ. खाडिलकर हे पुण्याहून त्यांच्या स्वागतासाठीं आले होते, तेही त्यांच्याबरोबर गाडींत होते. चर्नी रस्त्यावर 'राष्ट्रमत' कचेरीच्या आवाराशीं येण्यापूर्वीं गाडीचा घोडा सोडून मंडळीनेंच गाडी ओढीत आवारांत आणली. तेथें शिवरामपंत जरा विश्रांति घेण्यासाठीं उतरले. या सुमाराला मंडळींची बरीच गर्दी झाली. तेव्हां शिवरामपंतांनीं कचेरीच्या पडवींत उभे राहून सर्व जमलेल्या मंडळींचे प्रेमपुरःसर आभार मानून सांगितलें कीं, आभारही मानण्यासाठीं लागणारी शक्ति आतां मजजवळ नाहीं. त्यांच्या तोंडून

हे चार शब्द ऐकल्यावर मंडळी घरोघर गेली, व शिवरामपंत आपल्या कांहीं स्नेह्यांसह माडीवर गेले, आणि तेथें शौचमुखमार्जनादि विधि आटोपून ते दे. भ. खाडिलकरांबरोबर गाडींत बसून सरदारगृहांत गेले. त्यांच्या दर्शनासाठीं पुष्कळ लोक दिवसभर सरदारगृहाकडे जात होते. संध्याकाळीं साडेसहा वाजतां त्यांना येथील शांतारामाचे वाडींतील भव्य पटांगणांत राष्ट्रमतकचेरीमार्फत त्यांच्या मुंबापुरस्थ बंधूंनीं पानसुपारी केली. त्या पानसुपारीचे प्रसंगीं तीनचार हजार लोक जमले होते. स्वागतासाठीं चौघडा वाजत असतां शिवरामपंतांची स्वारी पटांगणांत येतांच तेथें जमलेल्या प्रचंड लोकसमूहानें 'वंदेमातरम्'चा गजर केला. त्यांना जाग्यावर बसविल्यावर रा. गंगाधरराव देशपांडे आणि येथील दे. नगरवासी अण्णासाहेब नेने यांनीं थोडक्यांत भाषणें करून दे. शिवरामपंत हे पुनः आमच्यांत आल्यामुळें सर्वांना झालेला आनंद प्रदर्शित केला, आणि शिवरामपंतांचे गळ्यांत पुष्पहार घातले. शिवरामपंतांविषयींच्या उत्कट प्रेमामुळें येथील निरनिराळ्या चाळींतर्फे तसेंच व्यापारी लोकांतर्फे पुष्कळ जणांनीं त्यांना पुष्पमालांनीं मंडित केलें. नंतर दे. खाडिलकर यांनीं थोडक्यांत भाषण करून सांगितलें कीं, 'देहदंडाचीं १५ महिने तपश्चर्या करून दे. शिवरामपंत आपल्यांत पुन्हां परत आले आहेत. देहदंडाशिवाय कार्य होत नसतें. देहाच्या यःकश्चित् भागाला जरा दुःख झाल्याबरोबर आत्मा जागा होतो, त्याप्रमाणें परमेश्वराच्या विराट् स्वरूपाचे आपण अवयव झाल्यास तो परमात्मा आपल्या दुःखानें जागा झाल्याशिवाय राहणार नाहीं. दे. शिवरामपंतांना तुरुंगांतील त्रासामुळें कधीं भोंवळ येऊं लागली आहे. परंतु त्या भोंवळीनें परमेश्वर जागा झाल्याशिवाय राहणार नाहीं.' अशा आशयाचें भाषण करून दे. खाडिलकर यांनीं शिवरामपंतांना उपदेशपर शब्द बोलण्याची विनंति केली. त्याप्रमाणें शिवरामपंत बोलावयास उठले. प्रकृति बरीच क्षीण झालेली होती. दिवसां एकदां भोंवळ आलेली होती. परंतु सर्वांच्या सुदैवानें आणि त्यांच्या स्वतःच्या देशभक्तीनें त्यांना यावेळीं शक्ति दिल्यामुळें त्यांनीं आपल्या देशबांधवांपुढें आज १५ महिने मूक असलेलें आपलें हृदय मोकळें केलें. आणि सर्वांच्या हृदयाला पाझर फोडून त्यांत जिवंतपणा आणिला. कारागृहाला

तीर्थ स्थान समजून तेथील आपला अनुभव त्यांनीं निवेदन केला. ते म्हणाले:--

" तुरुंगांत असतांनाही असले प्रचंड समाज जमलेले मला दिसत होते. तसेंच माझ्या देशबांधवांची बाहेरची कामगिरीही मी पाहात होतों. गेल्या श्रीगणपतीचे उत्सवांत मी असल्या समाजांत वावरत होतों, आणि माझ्या देशाकडे पाहा, अशी मंगलमूर्तींची प्रार्थना करीत होतों. शिवाजी महाराजांचा उत्सव मीं अनुभविला. देशभक्तीचा झरा ज्यांच्या हृदयांत वाहूं लागला, त्यांना तुरुंगाच्या दगडाच्या भिंती पारदर्शक होतात. तुरुंगांतील जी खोली मला मिळाली होती, ती लो. बळवंतराव टिळकांच्या पादस्पर्शानें पवित्र झालेली असल्यामुळें त्यांत असतांना मला मोठी धन्यता वाटली. कारागृहवासासंबंधानें एका आंग्ल कवीनें असें म्हटलें आहे कीं, ' Stone walls do not a prison make.' दगडाच्या भिंतींनीं कांहीं तुरुंग बनत नाहीं. आपल्या मनानें त्याला ऋषीचा आश्रम बनाविल्यावर मग दुःख कसलें होणार ? अशा अर्थाचें बोलून शिवरामपंत पुढें म्हणाले, " माझ्या देशबांधवांनीं मला आपलें काम थोडीशी विश्रांति घेऊन सुरू करण्याची आज्ञा केली आहे. परंतु, मी कालपासून ( तुरुंगांतून सुटल्यापासूनच ) तें काम सुरू केलें आहे, " असें सांगून सध्यांच्या परिस्थितींत कोणत्या धर्तीवर काम केलें पाहिजे, याविषयीं शिवरामपंतांनीं आपलें मत सांगितलें.

प्रकृति क्षीण असतांही लोकांच्या विनंतीवरून त्यांनीं आपल्या स्वाभाविक अशा हृदयाला चटका लावणाऱ्या वाणीनें अत्यंत उत्कट देशभक्तिपर असें पाऊण तासावर भाषण केलें, आणि सर्वांचे आभार मानले. नंतर श्रोतृवृंदापैकीं एकानें शिवरामपंतांविषयीं कांहीं चांगल्या आर्या म्हटल्यावर आणि त्यांना देशसेवा करण्यास ईश्वरानें शक्ति द्यावी, अशी प्रार्थना केल्यावर पानसुपारी, अत्तरगुलाब होऊन समारंभ बरखास्त झाला."

पुण्यांत—

मुंबईहून निघून गुरुवारीं सकाळीं शिवरामपंत पुण्यास येऊन पोहोंचले. पुण्याहून दे. भ. खाडिलकर, ल. ब. भोपटकर वगैरे बरीच मंडळी त्यांना

आणण्यासाठीं आगाऊच मुंबईस गेली होती. त्या सर्वांसह ते येथें स्टेशनवर सकाळीं सव्वासात वाजतां येऊन दाखल झाले. स्टेशनावर श्री. अण्णासाहेब पटवर्धन, दे. केळकर, दामले, किसनदास, रामदास, भोपटकर वगैरे मंडळी हजर होती. स्टेशनावर पुष्पहार वगैरे उपचारांनीं दे. भ. परांजपे यांचें स्वागत करण्यांत आल्यावर बाहेर स्टेशनजवळील धर्मशाळेंत त्यांना घेऊन जाण्यांत आलें. त्या ठिकाणीं महर्षि अण्णासाहेब यांनीं आपले मित्र यांची कष्टमय बंधगृहांतून सुरक्षितपणें सुटका करून आणल्याबद्दल भगवंताची आपण अनन्य भावानें प्रार्थना करावी, प्रेमळपणानें व शुद्ध अंतःकरणानें त्याचें स्तोत्र गावें, आजचा हा आनंदाचा दिवस दाखविल्याबद्दल परमेश्वराचे उपकार मानावे तितके थोडेच आहेत, दे. परांजपे यांचें ते आपल्या उद्योगासाठीं सुरक्षितपणें सुटून आल्याबद्दल अभिनंदन केलें पाहिजे, वगैरे प्रकारचें भाषण केल्यानंतर दे. परांजपे म्हणाले:—

"अण्णासाहेबांसारख्या परमपूज्य पुरुषांचा अनुग्रह आहे, त्यांचे आशीर्वाद आहेत, त्यांची कृपा आहे म्हणूनच आज आपल्या हातून कांहींतरी कार्य होत आहे. ह्या कार्याचें सर्व श्रेय अशा पुरुषांकडेच असतें. आपल्याकडे नसतें. आजचा आनंदाचा दिवस असल्याचें श्री. अण्णासाहेबांनीं सांगितलें आहे. परंतु आपल्या हिंदुस्थानचा, महाराष्ट्राचा, निदान पुण्याचा तरी आनंदाचा दिवस अद्यापि लांब आहेसा दिसतो. आपल्या सर्वांच्या हृदयांत पूज्य होऊन राहिलेले लोकमान्य परमपूज्य बळवंतराव हे पुनः आपल्यांत येतील तोच खरा आपला आनंदाचा दिवस होय. आपल्या प्रत्येकाचा आनंद आपण तोंव्हांपर्यंत राखून ठेविला पाहिजे. आपल्यापैकीं प्रत्येकास जें वाटत आहे, तें मी उघड करीत आहें. आपल्या सर्वांच्या खऱ्या आनंदाचा दिवस आज फार लांब दिसत आहे; तो जवळ करावा अशी आपण प्रत्येकजण परमेश्वराजवळ प्रार्थना करूं. आपण त्याची तो दिवस लवकर प्राप्त करून देण्याबद्दल आळवणी करूं......"

तेथून दे. परांजपे वगैरे मंडळी ठिकठिकाणीं पुष्पहाराद्युपचारपुरःसर स्वागताचा स्वीकार करीत करीत, श्री गणपतिमंदिर (कसबा पेठ), श्रीजोगेश्वरीमंदिर, श्रीदत्त, अण्णासाहेब पटवर्धन यांचा वाडा वगैरे ठिकाणीं जाऊन देवतांचें दर्शन घेऊन दे. परांजपे यांच्या घरीं आली.

अशा रीतीनें लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें साजरे केलेले स्वागतसमारंभ पार पडले खरे. परंतु सरकारनें शिक्षा देऊन अवमानित केलेल्यांचा लोक सन्मान करतात म्हणूनच कीं काय, पुण्याच्या डि. मॅ. नीं एक नवीनच हत्यार उपसलें. पुण्यास राष्ट्रीय मंडळ व इतर संस्था यांनीं मिळून शनिवार ता. ९ ऑक्टोबर रोजीं एक संयुक्त सत्कार–समारंभ करण्याचें ठरविलें होतें, व त्यासाठीं किर्लोस्कर थिएटर भाड्यानें घेतलें होतें. परंतु त्या दिवशींच डि. पोलिस ॲक्टाच्या ४२ व्या कलमान्वयें डि. मॅ. यांनीं एक हुकूम काढून सदरचा सत्काराचा व पानसुपारीचा कार्यक्रम बंद पाडला ! पण एवढ्यानेंही सरकारची तृप्ति झाली नाहीं. डिसेंबरांत थोडी प्रकृति सुधारल्यानंतर आप्तेष्टांस व विशेषत: आपल्या वृद्ध मातुःश्रीस भेटण्याकरितां शिवरामपंतांना महाडास जावयाचें होतें. या बातमीची गुणगुण लागतांच महाडकर व आसपासची मंडळी या ‘ राजद्रोहाची शिक्षा नुकतीच भोगून आलेल्या कैद्या’चा सन्मान केल्याखेरीज राहणार नाहींत, असें वाटून महाडच्या फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटांनीं ता. ११ डिसेंबर रोजीं लोकांस उद्देशून एक जाहीरनामा काढला. तो येणेंप्रमाणें होता:—

## Notification.

To the Public under S. 42 of the Bombay District Police Act IV of 1890.

Where as it is reported to me (Shrinivas Swamirao Deshpande) First Class Magistrate, Taluka Mahad, District Kolaba, that on the occasion of the visit to or the residence in Mahad of Shivram Mahadeo Paranjape of Poona lately convicted of offences under Section 124 A and 153 A. I. P. Code, some persons intend to organize demonstrations or meetings or to do other acts which, in my opinion may probably incite to the commission of an offence, to a disturbance of the public peace or to resistance to or contempt of the law or of a lawful authority.

I do hereby prohibit in the town of Mahad or the vicinity thereof from the 11th December 1909 to 25 January 1910 from ( ? ) the public utterance of cries, singing of songs, delivery of harangues and use of gestures,

or mimetic representations and the preperation, exhibition or dissemination of pictures, symbols, placards or of any other object or thing intended to or in connection with any movement to show honour to the said Shivram Mahadeo Paranjape.

( Sd. ) S. S. Deshpande,
Magistrate, 1st Class, Mahad.
Date 11-12-09.

या जाहीरनाम्यावरून जनता अशा देशभक्तांचा आदरसत्कार करते ही गोष्ट सरकाराला त्यावेळीं किती लागली होती, हें सहज लक्षांत येईल. अर्थात्, महाडला नुसतें जाण्याला बंदी नव्हती. म्हणून 'बाती'ला भेटण्याकरितां जाण्याच्या विचारांत शिवरामपंत होते. लहानपणीं त्यांना आईचा अत्यंत लळा होता, ही गोष्ट पाहिल्या भागांत सांगितलेलीच आहे. शिवरामपंतांच्या मोठेपणींही त्यांची मातेवरील श्रद्धा व भक्ति अढळ होती. 'बाती'चा स्वभाव जितका भाविक व प्रेमळ, तितकाच कडक व बाणेदार असे. शिवरामपंत सदैव तिच्या आज्ञेंत व इच्छेप्रमाणें वागत असत. आईचा एकही शब्द त्यांनीं कधीं खालीं पडूं दिला नाहीं.एम्.ए.चे परीक्षेंत बाक्षिसादाखल मिळालेले नऊशें रुपये त्यांनीं आईकडे धाडून दिले होते. त्याप्रमाणेंच शिवरामपंत एकदां महाडास गेले असतां त्यांच्या आईनें आपल्या घरीं भागवताचा सप्ताह करविण्याची इच्छा प्रदर्शित केली. बाती म्हणाली ' मी देवळांत जाणार नाहीं मला घरीं सप्ताह ऐकायचा आहे. ' यावर पंतांनीं लगेच विद्वान्, तेजस्वी व राष्ट्रीय जहाल वृत्तीचे पुराणिक विनायकशास्त्री अभ्यंकर यांस बोलावून आणिलें, ( हे शास्त्रीबुवा वासुदेव बळवंताच्या धामधुमींत होते, असें सांगतात ) व स्वतःच्या घरीं त्यांचा सप्ताह करविला. सप्ताह संपत आला तेव्हां पुराणिकबुवांना बिदागी काय द्यावी, याची वाटाघाट चालू झाली. तेव्हां पंतांनीं आपल्या आईला सांगितलें, कीं 'बाती ! तुला बुवांना जें कांहीं द्यावेंसें वाटत असेल तें मी देण्यास तयार आहें. ' त्यांच्या मातेनें ' मला ओंजळभर रुपये द्यावयाचे आहेत, ' असें सांगितलें. यावर पंतांनीं मुळींच वेळ न दवडतां आपल्या आईच्या हातीं ओंजळभर रुपये घातले,

व पंतांनीं आपल्या आईकडे हसत हसत पाहिलें; तेव्हां त्या माउलीच्या नेत्रांतून खळकन् आनंदाश्रू बाहेर पडले !

आईच्या ओंजळींत एकशें व्यायशीं कां कायसे रुपये मावले. शिवराम-पंतांना त्या रुपयांपेक्षां त्या अश्रूंचें मोल अधिक होतें ! त्याचप्रमाणें आईची एकदां काशीयात्रा करण्याची मनीषा त्यांनीं अशीच पुरी केली. सन १९०५ सालची कॉंग्रेस बनारसला व्हावयाची होती. त्यावेळीं आठवण ठेवून बातीला व दारशेतकरांकडे दिलेल्या थोरल्या बहिणीला मुद्दाम पुण्यास आणवून शिवरामपंतांनीं आपल्याबरोबर नेऊन त्यांना काशीदर्शन घडवून आणलें होतें. या सुमाराला त्यांच्या मातेला साठावें वर्ष लागून ती वयोमानानें थकलीही होती. शिवाय, जवळ जवळ दोन वर्षांत तिची भेटही झाली नव्हती. त्यामुळें आईला पाहण्यासाठीं शिवरामपंत उत्सुक झाले होते. परंतु त्यांच्या इच्छेच्या आड येणारी एक अडचण होती. वर सांगितलेल्या सरकारी जाहीरनाम्यानें शिवरामपंतांचा कोणताही मानसन्मान करण्याची बंदी करण्यांत आली होती. तथापि, शिवरामपंत महाडास आले म्हणजे कांहीं लोक तरी त्यांना सामोरे जाणार, पानसुपाऱ्या करणार, निदान हारतुरे घालणार ही दिसती गोष्ट होती. त्यांत पोलिसचा अडथळा झाला तर कांहीं दंगलही माजणार. एवंच, कांहीं लोकांना नाहक त्रास भोगावा लागणार, आणि शिवाय कदाचित् त्या निमित्तानें शिवरामपंतांनाही पुनः पकडण्याचा संभव; असें महाडच्या त्यांच्या आतेष्टांस व मित्रमंडळींस वाटून ते तिथून ' तुम्ही इकडे येऊं नका' अशीं पत्रें पुण्यास त्यांना पाठवीत होते. या कारणानें व प्रकृतिही नीट नसल्यामुळें या सुमाराला शिवरामपंतांचें महाडला जाणें झालें नाहीं. पण कांहीं थोड्याच दिवसांत त्याचा पश्चात्ताप करण्याची पाळी त्याचेवर आली!

सन १९१० तल्या वैशाखांत पुण्यास शिवरामपंतांचा धाकटा मुलगा विनायक याची मुंज निघाली. या ठिकाणीं शिवरामपंतांच्या आईच्या बाणेदार व करारी स्वभावाची एक गोष्ट ह. स. गोखले यांनीं आपल्या स्मरणवहींत दाखल केली आहे, ती सांगण्यासारखी आहे. " मुंजीसाठीं महाडची सर्व मंडळी पुण्यास आली पण आजी'बाती' आली नाहीं. तिचें म्हणणें कीं, सुटल्यापासून इतक्या दिवसांत अण्णांनीं तिच्या दर्शनास यावयास

पाहिजे होतें. या वेळीं मी महाडासच होतों. एक ओळखीचे गृहस्थ शेजारचे गांवाहून महाडास आले. त्यांना आजी पुण्यास कां गेली नाहीं हें कळलें, तेव्हां त्या गृहस्थांना आजीच्या बाणेदारपणाची धन्यता वाटून 'आजी, तुम्ही खऱ्या वीरमाता आहांत, ' असें म्हणून त्यांनीं आजीला साष्टांग नमस्कार घातला. " एवंच, याही वेळेला मायलेकरांची गांठ पडूं शकली नाहीं. आणखी दोन महिन्यांनींच श्रावण महिना आला. 'बाती' शेवटल्या दुखण्यानें आजारी पडली ! पुण्यास अण्णांना ( शिवरामपंत ) तार गेली. ते लगेच निघाले. पण त्या काळांत मोटारी नव्हत्या. बैल-गाडीचा प्रवास. घाटांतून रस्ता, आणि कोंकणांतली श्रावण महिन्यांतली ती पावसाची झड ! जवळजवळ पायींच रस्ता तोडावा लागे. सत्तर मैलांचें अंतर लवकर लवकर म्हटलें, तरी चार दिवस सहज लागायचे. इकडे मृत्युवेळ समीप आल्यामुळें बातीनें तर मुलाचा ध्यास घेतला होता. बाकीचीं मुलें जवळ होतीं. फक्त अण्णाच नव्हते. मधूनमधून डोळे उघडून बाती विचारी, " वेणे, तो 'बृहस्पति आला कां नाहीं अजून ?" अण्णांच्या वक्तृत्वाच्या हकीगती लोक बातीला नेहमीं सांगत असत, व प्रशंसा करून म्हणत, " आजी, तुमचा मुलगा बृहस्पति आहे दुसरा !" यामुळें बाती कौतुकानें अण्णांचा उल्लेख बृहस्पति या नांवानें करीत असे. म्हणून बाती विचारी–आला का बृहस्पति ? अण्णा वाट चालत होते. पण मृत्यूची चाल त्यांच्यापेक्षां जलद होती. अण्णांनीं महाड गांठण्यापूर्वीच मृत्यूनें बातीला गांठलें ! अगदीं शेवटीं, अण्णासारखा पोषाख करून एकाला 'बाती' पुढें उभें करण्यांत आलें होतें, तेव्हां त्या प्रेमळ आईनें प्राण सोडला. अण्णांनीं महाडांत पाऊल टाकलें, त्यावेळीं बातीचें प्रेत स्मशानांत गेलें होतें. गांवच्या शिवेवर माणसें बसविलीं होतीं, त्यांनीं अण्णांना परस्पर तिकडेच नेलें. बातीला सरणावर ठेवून अग्नि देण्याचाच राहिला होता ! दर्शन झालें ! अण्णांनीं पदर पसरला, साष्टांग नमस्कार घालून नाक घासलें, आणि ऐकूं न येणाऱ्या मातेला म्हणतात, 'मातोश्री, मी तुमचा अनंत अपराधी आहें, मला क्षमा करा.' बातीच्या स्मशानयात्रेला महाडांतील पुष्कळ लोक आलेले होते. कल्पित काव्यांतल्या शोकरसानें रडणारे अण्णा–त्यांची अवस्था या प्रत्यक्ष

प्रसंगानें कशी झाली असेल !......इतक्यांत अण्णा बोलूं लागले. जमलेल्या लोकांपुढें त्यांनीं चार शब्द सांगितले. पोटांतला मूक असहाय आवेग शब्दांचा आधार पकडूं पहात होता. अण्णांच्या डोळ्यांतून वहाणारे अश्रू आतां ऐकणाऱ्यांच्या डोळयांतून वाहूं लागले !

त्यानंतर पंधरावीस दिवस अण्णांचा मुक्काम महाडासच होता. पण त्यांच्या डोळ्याचें पाणी खळलें नाहीं. क्रिया आटोपली, त्यावेळीं भाल्काका जोशी म्हणून ग्रामोपाध्याय होते. क्रिया सांगण्याचे वेळीं त्यांनीं चूर होऊन अण्णांना म्हणावें, " तुम्ही विद्वान्, जाणते; सर्व पढलेले. आम्ही पोटभरू मंडळी, आम्हीं तुम्हांस मंत्रतंत्र काय सांगावें ? " पण यावर अण्णांनींही ' कांहीं नाहीं; तसं कांहीं नाहीं, ' असें मान हलवून आणि संदिग्ध बोलून त्या संकोचलेल्या उपाध्याचें समाधान करावें. असा प्रकार चालत असे. अण्णांनीं सर्व क्रियाकर्मांतर श्रद्धापूर्वक यथासांग केलें. ते कॉलेजांत असतांनाच वडील निवर्तले होते. आतां आईही गेली ! त्या महाडच्या घरांतच त्यांचें सारें लहानपण गेलेलें. बाळपणींच्या साऱ्या रम्य सुखद आठवणी त्याच वस्तुशीं निगडित झालेल्या–विवाह तिथेंच झाला. त्यानंतर तिथेंच वारंवार येणें–रहाणें होऊन आईबापांचा सहवास घडलेला. त्यांच्या पहिल्या मुलाचा जन्म झाला, आणि दादांनीं व बातीनें त्या आपल्या नातवाचीं कोडकौतुकें केलीं, तीं याच घरांत अशा चिरपरिचित पण आतां मातृ–पितृ–वियुक्त अशा घरांत वावरतांना–

" जीवत्सु तातपादेषु नवे दारपरिग्रहे
मातृभिश्चिन्त्यमानानां ते हि नो दिवसा गताः

हा भवभूतीचा अश्रुमोलाचा श्लोक त्यांच्या सहृदय अंतःकरणांत त्यावेळीं जागा होऊन उभा राहिला असला पाहिजे, यांत शंका नाहीं.

बातीचें क्रियाकर्मांतर यथासांग करून अण्णा पुण्यास परतले. पण मातृ-निधनापूर्वी पुण्यास असतांनाच त्यांच्यावर दुसरा एक तसाच जबरदस्त आघात झालेला होता. हे दोन्ही धक्के वियोगाचेच होते. नवीनच पास झालेल्या प्रेसॲक्टाचा हात ' काळ ' वर्तमानपत्रावर पडला होता. दहा हजारांच्या जामिनकीची नोटीस सरकारकडून बजाविण्यांत आली होती. इतकी रक्कम त्यांचेजवळ स्वतःची अशी नव्हती. लोकांकडून फंड-वर्गणी

मागावी—काढवावी हा त्यांचा स्वभावच नव्हता, व ती गोष्ट त्यांच्या स्वप्नींही येणें शक्य नव्हतें. बरं, कांहीं खटपट करून इतकी रक्कम उभी करून भरावी, तरी कोणता लेख केव्हां आक्षिप्त वाटून सरकार ही जामिनकीची रक्कम जप्त करील त्याचा भरंवसा नाहीं, अशी स्थिति होती. म्हणजे पाहिली जामिनकी गडप होऊन पुन्हां आणखी तेवढ्या रकमेसाठीं सरकार ' आ ' वासून बसणारच. म्हणजे, आजचें मरण पुढें ढकललें तरी उद्यां तें येणारच नाहीं, अशी शाश्वती नव्हती. उलट, तें केव्हां तरी येणार याचाच संभव अधिक असा विचार करावा लागून, शिवरामपंतांना थोड्याच काळांत गाजलेलें आपलें वर्तमानपत्र बंद करणें भाग पडलें. पण एवढ्यानेंही सरकारचें समाधान झालें नाहीं. काळांतील निवडक निबंधांचे दहाच्या दहा भाग आक्षेपार्ह ठरवून सरकारनें जप्त केले. केवळ प्रतिप्राण असें तें वाङ्मय, रक्ताच्या शाईनें लिहिलेलें तें साहित्य, बारा वर्षांच्या, नव्हे जन्माच्या तपश्चर्येचें तें फळ,—सरकारी टांकाच्या एका फटकाऱ्यानें नष्टप्राय होऊन बसलें ! शिवरामपंतांना काय वाटलें असेल ? त्यांचें हृदय, त्यांचें अंतःकरणच त्यांनीं काळाच्या कॉलमांतून ओतलेलें होतें. डोक्यावर वीज पडल्यासारखी झाली असेल ! मातृ-वियोग ही काळाची झडप होती. पण ही माणसानें ' काळा 'वर घातलेली झडप त्याहूनही दारुण आणि दुर्दैवी अशी होती !

× × ×

काळाचीं दहाच्या दहा पुस्तकें जप्त झाल्यानंतर त्यांच्या मनावर केवढा आघात झाला असेल याची कल्पनाच केली पाहिजे ! कित्येक दिवस त्यांना स्वतःचीं पुस्तकें स्वतः आपल्या हातांनीं जाळावीं लागलीं. यावेळीं त्यांच्या मनाला ज्या वेदना आणि यातना होत असतील त्या त्यांनीं भासाची भवितव्यता या आपल्या लेखांत ओतून अजरामर करून ठेवल्या आहेत. भासाला पुढें करून व त्याला अनुलक्षून लिहितांना त्यांत त्यांनीं आपलेंच अंतःकरण जणुं मोकळें केलें आहेः

" भासा, ही गोष्ट झाली—तुझीं नाटकें जाळलीं—तेव्हां तूं जिवंत होतास ? तुझ्या डोळ्यांदेखत ही गोष्ट झाली असेल, तर ती पाहून तुझ्या मनाला काय वाटलें असेल ? तुझीं होरपळलेलीं पुस्तकें पाहत असतांना

तुझें अंतःकरण होरपळून गेलें असेल! तझ्या पुस्तकांतून अग्नीच्या ज्वाळा निघत असतांना तुझ्या हृदयांतूनही तितक्याच लाल क्रोधाच्या ज्वाळा निघाल्या असतील! तुझ्या जळणाऱ्या ग्रंथांतील आणि डोळ्यांतील ठिणग्या एकदमच बाहेर पडल्या असतील! भासा, कांहीं वेळानें तुझ्या पुस्तकाची आग विझली असेल! पण तुझ्या मनाची आग कधींतरी विझली असेल काय रे? बहुधा ते बाहेरचे अंगार धुमसण्याचे थांबल्यानंतरही अनेक वर्षेपर्यंत तुझ्या अंतर्यामांतील क्रोधांगार तसेच धुमसत राहिले असतील! तुझीं नाटकें जळलेलीं पाहून तूं रडला असशील, हळहळला असशील! त्या आगीच्या उष्णतेनें तुझे हातपाय गार पडले असतील! आणि त्या नाटकांची प्रसवित्री ती तुझी जीभ दुःखातिरेकानें वांकडी पडल्यानंतर कंठाच्या अग्रभागीं आलेले तुझे पंचप्राण त्या पेटलेल्या अर्चीवर आरूढ होऊन त्या सुप्रसिद्ध अर्चिरादि मार्गानें ब्रह्मलोकाला जाण्याला उत्कंठित झाले असतील!''

शिवरामपंत सुटून आले त्यावेळीं देशाची राजकीय परिस्थिति मोठी चमत्कारिक झालेली होती. दडपशाहीचें धोरण कमाल मर्यादेपर्यंत ताणण्यांत आलेलें होतें. तुरुंगांतून सुटलेल्यांचे अभिनंदनावर सुद्धां बंदीचे हुकूम सुटत होते. हात-पाय हलविण्याची सोयच नव्हती. सगळ्या बाजूंनीं प्रतिबंधांचा गराडा पडल्यासारखाच झाला होता. दि. २१ डिसेंबर १९०९ च्या रात्रीं नाशिकचे कलेक्टर मि. जॅक्सन यांचा थिएटरमध्यें खून झाला. या प्रकरणामुळ धरपकड, झडत्यांचें सत्र सुरू होऊन जिकडे-तिकडे संशयाचें वातावरण उत्पन्न झालें होतें. याच सुमाराला शिवराम-पंतांच्या रहात्या वाड्याचे तरुण मालक श्री. तात्यासाहेब कोनकर यांचेकडे पोलिसांची झडती येऊन त्यांत पिस्तूल मिळालें. जॅक्सन् खून खटल्यांतील आरोपी अनंत कान्हेरे यानें आपल्या जबाबांत, 'आमच्या लोकांना साहेबापासून न्याय मिळत नाहीं, -असें मला दिसून आलें; जुलमाचीं पुष्कळ उदाहरणें मीं केसरी, राष्ट्रमत, काळ वगैरे इतर वर्तमान-पत्रांतून वाचलीं आहेत' इत्यादि हकीगत कोर्टांत सांगितली होती. तसेंच दामू जोशी याचेवरील खटला चालू असतांना 'दामू हा दोन अडीच महिने पोलीस पहाऱ्यांत होता, व त्यानें दोनतीन जबान्याही

दिल्या ' त्याचा वृत्तांत टिळकचरित्रांत दिला आहे.¶ दिलवर व घाटगे या पोलीस अधिकाऱ्यांच्या जाचामुळें त्यानें लांबलचक जबानी दिली... "महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांच्या सल्ल्यानें बॉंबचा एक मोठा कारखाना काढण्यांत यावयाचा होता! कर्झन यांचा दिल्ली दरबारचे वेळीं खून करावयाचा होता. शिवरामपंत परांजपे यांचेकडून मला पैसे मिळाले. टिळकांनाही ही खून करण्याची गोष्ट ठाऊक होती. कर्नल फेरिस याचा खून कोल्हापुरास आक्कासाहेब महाराज यांचे लग्नमंडपांत करावयाचा होता;" असल्या अनेक विचित्र हकीगती या जबानींत असून महाराष्ट्रांतील लहानथोर पुढाऱ्यांची व निदान शंभर दीडशें प्रसिद्ध व्यक्तींचीं नांवें या जबानींत दामू यानें गोंवलीं आहेत! पण तीं खरीं असल्याचा यत्किंचितही पुरावा सरकारास खरोखरीच मिळता, तर सरकारनें इतरांना व टिळकांना कांहीं निमित्त ठेवून फांसावर चढविलें असतें, अगर हद्दपारच केलें असतें.

त्याचप्रमाणें कृष्णाजी दामोदर लिमये या क्रांतिकारकाची पोलिसांनीं जबानी घेतली, ती वरील मासल्याचीच आहे.

†" १८५७ सालाप्रमाणें बंड करावें असा सावरकर दातार वगैरेंचा बेत होता. व शिवराम महादेव परांजपे यांची त्याला संमति होती. पण टिळकांना यांचे मार्ग मुळींच पसंत नव्हते. व त्यांनीं असें बजावलें कीं,अशा अविचारांनीं देशाला तुम्ही संकटांत आणाल! अजून बंडाची वेळ आलेली नाहीं. सावरकराला टिळकांचा उपदेश पटला नाहीं, व त्यानें परांजप्यांच्या मार्गाचीच स्तुति केली!"

एकूण, या वेळच्या जबान्या म्हणजे केळकरांनीं म्हटल्याप्रमाणें त्या क्षणीं चौकशीवर असलेल्या पोलीस अंमलदाराच्या मनाचें तें प्रतिबिंब असे. ' जबानी देणार हा मेणाचा गोळा. खरा चित्रकार जबानी पढविणारा पोलीस!' एवंच अशा स्थितींत व वातावरणांत सुताचें भूत होण्याचाच संभव अधिक होता, हें उघड दिसत होतें. अर्थात् कोणाच्या तरी तोंडून कांहींही खरें खोटें वदविलें म्हणून तें त्या त्या

¶ केळकरकृत टिळक–चरित्र,खंड ३ भाग ४ था पान ९१ व † ९७.

व्यक्तींना येऊन चिकटलें असतें अगर शाबित झालें असतें, असें नाहीं. तथापि कांहीं साधें बोललें लिहिलें तरीही सरकारी अधिकारी केव्हां अर्थाचा अनर्थ करतील, याचा नेम नव्हता.

अशा रीतीनें बिघडलेल्या वातावरणांत शिवरामपंतांना तूर्त गप्प राहण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता. कॉंग्रेसमध्येंही सुरतेस फूट होऊन राष्ट्रीय व मवाळ असे दोन तट पडले होते. टिळक तुरुंगांत, व बाहेर दडपशाही जोरांत. प्रेसॲक्टामुळें ' काळ ' पत्रही बंद पडलेलें. येऊन जाऊन कॉंग्रेसच्या समेटाची चळवळ तेवढी चालू होती. राष्ट्रीय पक्षाची इच्छा मवाळांशीं तडजोड करून कॉंग्रेसमध्यें पुन्हां शिरण्याची होती. परंतु मवाळपक्षानें तडजोडीकरितां अपमानास्पद अटी राष्ट्रीय पक्षाला दिल्या होत्या. त्यांचें म्हणणें, ' यावर सह्या करा, मग तुम्हांला आंत घेऊं ' यामुळें या अटी कबूल करणें, न करणें या मुद्द्यांवर राष्ट्रीय पक्षांत मतभेद होऊन आपसांतच दोन गट झाले. १९१४ सालीं साताऱ्यास प्रांतिक परिषद भरली, त्यावेळीं याविषयीं बराच खल झाला. अर्थात्, समेट घडून यावा, असेंच सर्वांचें मत होतें. पण तो कोणत्या अटींवर व्हावा एवढाच वादाचा विषय होता. शिवरामपंतांनीं असें मत मांडलें कीं, अपमानास्पद अटी लादून घेऊन समेट होण्यांत मतलब नाहीं. त्यांत राष्ट्रीय पक्षाचा पराभव तर आहेच, पण त्यामुळें पक्षाच्या कार्याचाही घात होण्याचा संभव आहे. म्हणून आपल्यातर्फेच्या दुसऱ्या अटी पुन्हां सादर कराव्या, व त्या मान्य झाल्या, तरच तडजोड घडवून आणावी. नाहींपेक्षां त्या तडजोडींत कांहीं तथ्य नाहीं. कृष्णाजीपंत खाडिलकर वगैरे मंडळी याच मताची होती. शेवटीं साताऱ्यास या मताप्रमाणेंच ठराव पास झाला. तथापि, केळकरांनीं या बाबतींत लिहितांना थोडें निराळें, म्हणजे 'राष्ट्रीय पक्षानें राष्ट्रीय सभेंत हल्लीं शिरूंच नये व तसा प्रयत्नही करूं नये ', असें परांजपे—खाडिलकरांचें मत होतें, असें भासविलें आहे.

आपल्या ' गतगोष्टी 'त (पान ४०१) श्री. केळकर लिहितातः— साताकर मंडळींनीं उभय पक्षांचा समेट व्हावा असा कांहीं उपक्रम करण्याकरितां एक परिषद् भरविण्याचें ठरविलें. तींत साताऱचे नेमस्त पुढारी

रावबहादूर विठ्ठलराव पाठक हे तेथील राष्ट्रीय पक्षाशीं सहकारिता करीत होते, व त्यांना सातारकरांची अनुकूलता होती. परंतु बाहेरून आलेल्या लोकांत मतभेद होता. सभेचें अध्यक्षस्थान नामदार बेळवी यांना देण्यांत आलें होतें. मुख्य ठरावासंबंधानें आमच्या आमच्यांत दोन तट होते, ते असेः— राष्ट्रीय सभेंत जाण्याचा दुरून कां होईना, उपक्रम करावा, निदान कोणी त्रयस्थ लोक सद्धेतूनें समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करूं म्हणतील, तर त्याला तरी विनाकारण नाहीं म्हणूं नये, अशा मताचा मी होतों, आणि परांजपे, खाडिलकर वगैरे मंडळी उलट मताची होती. त्यांचें म्हणणें असें कीं, " टिळक परत येईपर्यंत या बाबतींत कोणत्याही प्रकारचें मत प्रकट करण्याची जबाबदारी आपण घेऊं नये. " ते तोंडानें इतकेंच म्हणत. परंतु " राष्ट्रीय सभेंत राष्ट्रीय पक्षानें हल्लींच्या स्थितींत तर शिरूं नयेच, पण हल्लींचे निर्बंध व अटी दुरुस्त करून घेण्याचा प्रयत्नही आपण करूं नये. त्यांत आपल्याला कमीपणा येतो. " असें त्यांना मनांतून वाटे. त्यावर माझें म्हणणें असें होतें कीं, " स्वतःला कोणत्याही प्रकारें बांधून न घेतां कोणी तिऱ्हाईत सामोपचाराचें बोलणें बोलेल, तर त्याला ' ठीक आहे, प्रयत्न करा, ' असें म्हणण्यांत आपलें कांहीं वेंचत नाहीं. कॉंग्रेसच्या नव्या घटनेला जर आपण नांवें ठेवीत आहों, तर तींत काय दुरुस्ती व्हावयाला पाहिजे हें पर्यायानें सुचवीतच आहों कीं नाहीं ? मग तेंच ठरावाच्या रूपानें मांडण्याला कां हरकत असावी ? "

केळकरांनीं मतभेदाची हकीगत अशा रीतीनें मांडली आहे. यावर ज. स. करंदीकरांचाच उतारा देऊं. म्हणजे त्यावरून खरा मुद्दा आपोआप स्पष्ट होईल.

## * " सातारा येथील प्रांतिक परिषद्

सभेंतील बहुमत आपल्या विरुद्ध बाजूचें झालें आहे, असें उघड दिसत असतां जो आपल्या वक्तृत्वानें तें आपल्या बाजूला खेंचून आणतो तो खरा वक्ता होय. असा वक्तृत्वाचा प्रभाव शिवरामपंतांनीं अनेक वेळां गाजविला होता. यांतलें एकच उदाहरण सांगतांः

* ओगले बर्वे कृत परांजप्यांचें चरित्र व आठवणी, पान १५०–१५१.

"१९१४ सालीं साताऱ्यास प्रांतिक परिषद् भरली होती. त्यावेळीं नेमस्त आणि जहाल यांचा समेट करून यापुढें संयुक्त प्रांतिक परिषद् भरवावी, असा सभेच्या चालकांचा विचार होता. व समेटाचा एक ठराव विषयनियामक कमिटींत चर्चेला निघाला. समेट व्हावा, ही गोष्ट सर्वांसच इष्ट वाटत होती; पण तो कोणत्या अटींवर व्हावा याविषयीं तीव्र मतभेद होता. विषयनियामक कमिटीची सभा रात्रीं ९ वाजतां सुरू झाली होती. व साडेअकरा वाजून गेले, तरी अद्यापि वाटाघाट संपली नव्हती. पण त्यावेळीं एकंदरींत रंग असा दिसून आला कीं, मवाळांच्या सर्व अटी कबूल करून एकदांचा समेट करून टाकावा व वाद मिटवावा. विशेषतः विजापुरचे श्री. श्रीनिवासराव यांचें भाषण समेटाला अनुकूल असें झालें. आणि त्यांची छाप सभेवर इतकी पडली कीं, 'मतें घ्या मतें घ्या,' अशी मागणी सगळीकडून ऐकूं येऊं लागली. यावेळीं मतें घेतल्यास आपण हरणार हें शिवरामपंतांना उघड दिसूं लागलें. त्यावेळीं ते पुनश्च बोलावयास उभे राहिले. वादाचा एक मुद्दा अद्यापि वाटाघाटींतून राहिला आहे, असें निमित्त पुढें करून त्यांनीं भाषण करण्याला अध्यक्षांची परवानगी घेतली; आणि आपल्या भाषणांत, वक्रोक्ति, व्याजोक्ति, अन्योक्ति, दृष्टान्त, अर्थांतरन्यास इत्यादि सर्व साधनांचा उपयोग करून त्यांनीं विषयनियामक कमिटीवर अशी छाप पाडली कीं, सभेचें मत पार उलटलें, आणि या अटींवर समेट करूं नये, आपल्या तर्फेच्या नव्या अटी प्रतिपक्षास मान्य होतील तरच तडजोड करावी, असें ठरलें, आणि त्या तडजोडीचा निकाल सकाळीं पुन्हां कमिटीची बैठक होऊन तींत करावा असें ठरून विषयनियामक कमिटीची सभा रात्रीं १२ वाजतां, निकाल न लागतांच आटोपली. त्यानंतर रात्रभर खाजगी वाटाघाट किती झाली, प्रत्येक बाजूनें आपल्याकडे बहुमत करण्यासाठीं कॅनव्हासिंग कसें सुरू केलें, सकाळीं पुनः सभा भरली असतां शिवरामपंतांनीं सुचविलेल्या अटींवर कसा समेट झाला, आणि परिषदेंत नगरचे श्री. बाळासाहेब देशपांडे आणि श्री. शिवरामपंत परांजपे यांचीं अत्यंत मार्मिक व खोंचदार भाषणें कशीं झालीं, हें त्या परिषदेस हजर असलेल्या सर्वांना विदित आहे. पण आदले दिवशीं रात्रीं डाव अंगावर आला असतां

तो अत्यंत कुशलतेनें उलटविण्याची जी कामगिरी शिवरामपंतांनीं केली ती कित्येकांच्या स्मरणांत नसेल, म्हणून तिची आठवण करून देण्यांत येत आहे. ''

ऐन सभेंत वक्तृत्वाला जो रंग भरत असतो त्याची योग्य कल्पना रसाळ वर्णनानें अगर वृत्तांत वाचूनही यावी तशी येणें शक्य नसतें. तथापि कांहीं कल्पना येण्याकरितां शिवरामपंतांच्या या भाषणाचा त्यावेळच्या केसरींत आलेला अहवाल जसाच्या तसा खालीं देण्यांत येत आहे. दुसरे दिवशीं शिवरामपंतांनीं सुचविलेल्या अटी मान्य होऊन सर्व-संमत झालेला ठराव नगरचे चितळे यांनीं मांडला.

" .....नंतर रा. शिवरामपंत परांजपे या ठरावास दुजोरा देण्याकरितां उठले, त्यावेळीं टाळ्यांच्या गजरांनीं सभागृह दणाणून गेलें. ते म्हणाले:—

इतके दिवस भिजत पडलेल्या या प्रकरणाचें—इतके दिवस चालू असलेल्या या वादाचें—पर्यवसान ठरावाच्या रूपानें आज बाहेर येत आहे. या ठरावाबद्दल मला जें कांहीं सांगावयाचें आहे तें मी मराठींतच सांगणार व त्यांतच आपलें हित आहे असें मला वाटतें. रा. चितळे यांनीं ठरावाचा अर्थ इतका स्पष्ट करून सांगितला आहे कीं, ठरावांतील Person या शब्दाची स्त्री व पुरुष अशी फोड करून आमच्या येथील स्त्रियांना रा. चितळे यांनीं कॉंग्रेसमध्यें येण्याची मोकळीक करून दिली आहे. ठरावाप्रमाणें जी कमिटी नेमून दिली आहे तींत गर्दी होत नसेल तर रा. ब. वैद्य हेही एक जंटलमन तींत असावे अशी सभेस माझी सूचना आहे. ( सूचना मान्य होऊन वैद्यांचेंही नांव कमिटींत घालण्याचें ठरलें.नंतर त्यांनीं कॉंग्रेसच्या पहिल्या नियमाचें विवेचक पद्धतीनें भाषांतर करून सांगितलें. ) आपण हिंदुस्थानचे लोक विशिष्ट प्रकारची राज्यपद्धति मागत आहों. ब्रिटिश साम्राज्याची छत्री मोठी आहे. त्या छत्रीखालची राज्यपद्धति आम्हांला पाहिजे आहे. ती प्राप्त करून घ्यावी अशी आमची सर्वत्रांची इच्छा आहे. आम्हांला स्वतंत्र वसाहतीसारखें सरकार Self Government मिळवावयाचें आहे. (इतक्यांत रा. ब. पाठक यांनीं ' स्वराज्य ' हा शब्द सुचविला. तेव्हां स्वराज्य हा शब्द

घालूं ना ? असें वक्त्यांनीं विचारल्यावरून Local Self Government वगैरे ठिकाणीं स्वराज्य हा शब्द रूढ झाला आहे तेव्हां तो घालण्यास हरकत नाहीं असें दादासाहेब करंदीकर म्हणाले.) तेव्हां असें हें स्वराज्य मिळविण्याची महत्त्वाकांक्षा आमच्यांत उत्पन्न झाली आहे. ही महत्त्वाकांक्षा बाळगावयास कोणाचीही हरकत नाहीं. इंग्रज सरकार पक्षपाती नाहीं. योग्यतेप्रमाणें हक्क देण्यास तें केव्हांही तयार आहे. स्वराज्याचे हक्क मिळविल्यास तुम्हांला सैन्य ठेवावें लागेल व आरमारें बांधावीं लागतील. अशा प्रकारच्या मोठ्या जबाबदाऱ्या पत्करावयाच्या असतील तर ही महत्त्वाकांक्षा बाळगा. हे हक्क कशा रीतीनें मिळवावयाचे हा कांहीं मोठा अवघड प्रश्न नसून कायदेशीर रीतीनेंच ते मिळविले पाहिजेत, हें कोणीही सांगेल. त्याच-प्रमाणें या कामांत घाई उपयोगी नाहीं. हळूहळू पचेल कीं नाहीं हें पाहूनच प्रयत्न केले पाहिजेत. आतां ही इच्छा पूर्ण होण्यास राष्ट्रीय ऐक्य झालें पाहिजे. सध्यां आपण तरी एक झालों आहों. Provincial Unityप्रांतिक ऐक्य तर झालेंच आहे.आणखी या नियमांतील शब्दांवरूनच ' पब्लिक स्पिरिट ' उत्पन्न करणारी बुद्धि वाढवावी, उद्योगधंद्यांना उत्ते-जन द्यावें, तिचा प्रसार करावा असें स्पष्ट दिसून येत आहे.अशा प्रकारचें हें पहिलें आर्टिकल आहे.हें आर्टिकल ज्यांना कबूल असेल त्यांनाच कॉंग्रेसचें दार मोकळें आहे. कबूली लिहून देण्याचे अनेक प्रकार आहेत. त्यांपैकीं लेखी लिहून द्यावें किंवा लिहितां वाचतां येत नसेल तर आंगठा पाठवून द्यावा हा एक प्रकार आहे. हा लेखी कबुलीचा मार्ग कॉंग्रेसनें पत्करला आहे. सहीची जरूरी नसून ती मागणें अपमानकारक असल्यानें कोणाच्याही मनाला चिमटा बसेल. तुम्हां आम्हांला-प्रत्यक्ष अध्यक्षांना सुद्धां सही करणें अप-मानकारक वाटतें. पण ठरावांतील बाकीचीं तत्वें मान्य झाल्यास नुसत्या सहीनेंच तुम्ही संतुष्ट होत असाल तर तेवढीही करण्यास आम्ही तयार आहों. तुम्ही एका बाजूनें दोन पावलें पुढें आल्यास तीन पावलें पुढें सरकण्यास आम्ही तयार आहों. महत्कार्य साधत असल्यास क्षुल्लक गोष्टी बाजूला ठेवण्यानें मन उदार होतें.एकी करण्याबद्दल आम्हीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली आहे. सद्बुद्धीनें आपण या कार्यास प्रवृत्त झालों

आहों. ठरावांतील अटी कबूल केल्या गेल्या नाहींत तर आपण मात्र सही द्यावयाचें कबूल करुन अडकून पडलों असें वाटण्याचें कारण नाहीं. अशा सद्बुद्धीचा पुढें फायदा घेतला जाऊं नये म्हणून ठरावांतील गोष्टी मान्य न झाल्यास सही करण्याची अट कोणासही बंधनकारक होऊं नये, असा निर्णय करण्यांत आला आहे. हा निर्णय सर्वानुमतें झाला असून तो कॉन्फरन्सच्या रेकॉर्डवर रहाणार आहे. ठरावाचा कागद वाचल्यानंतर हा निर्णयाचा कागद मात्र न वाचतां ठेवावयाचा नाहीं. हाही वाचलाच पाहिजे. तडजोडीच्या सूचना मान्य न झाल्यास ठरावांतील अटींचा कोणावरही बोजा नाहीं. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मला विचाराव-याचा आहे. रा. चितळे यांनीं मुदतीचा प्रश्न काढला असून मुदतीचें बंधनच त्यांनीं कांहीं ठेवलें नाहीं. तेव्हां या ठरावाप्रमाणें तडजोडीची वाट किती दिवस पहावयाची ! ( रा. परांजपे यांच्या या प्रश्नास दोन राष्ट्रीय सभा होईपर्यंत वाट पहावी असें अध्यक्षांनीं उत्तर दिलें. ) या-प्रमाणें रा. परांजपे यांचें मुद्देसूद व विचारपरिप्लुत भाषण झाल्यावर टाळ्यांच्या बराच वेळ चाललेल्या गजरांत हा ठराव सर्वानुमतें पास झाला. ”

याप्रमाणें या समेटाच्या वादाची खरी हकीगत केसरींतील अहवाला-वरुन व श्री. ज. स. करंदीकर यांच्या आठवणीवरून लक्षांत येते. शिवाय खुद्द केसरींतील सातारा प्रांतिक परिषद् या ता.५मे च्या अग्रलेखावरूनही केळकरांनीं शिवरामपंतांच्या हेतूचा व धोरणाचा विपर्यास करून सदर हकीगतीला जी कलाटणी दिली आहे ती प्रमाणसिद्ध नाहीं असें स्पष्ट दिसतें. सदर अग्रलेखांतील प्रस्तुत विषयाच्या दृष्टीनें महत्त्वाचा असा एक उतारा देऊन हें प्रकरण संपवूं.

“ अटकळीप्रमाणें तो विषय परिषदेपुढें निघालाच, व बरीच भवति न भवति होऊन समेटाचा ठरावही आज दुसरीकडे दिल्या-प्रमाणें सर्वानुमतें मंजूर झाला............आणि ही तडजोड सयुक्तिक असून पुण्याबाहेरील इतर जिल्ह्यांतील राष्ट्रीय पक्षाच्या लोकांस, एवढेंच नव्हे तर खुद्द कन्व्हेन्शनच्या पक्षांतील कित्येक विचारी नेमस्त पुढाऱ्यांसही ती पंसत आहे, हें साताऱ्याच्या परिषदेमुळें दिसून आलें.

नेमस्त पक्ष, राष्ट्रीय पक्ष व या उभयतांचा सांधा जोडणारा मध्यवर्ती पक्ष अशा तीनही पक्षांच्या मिळून अडीचशेंहून अधिक प्रतिनिधींना ही तडजोड पसंत पडली, या गोष्टीचें महत्त्व कोणासही न सांगतां समजण्यासारखें आहे. ''

असो. होतां होतां १९१४ चा मे महिना आला. ता. २१।२२ रोजीं पुण्यास नूतन आर्यभूषण थिएटरमध्यें शिवरामपंतांचे अध्यक्षतेखालीं दहावें नाट्य-संमेलन पार पडलें. दि. १६ जूनला त्यांचे भाचे अनंत सखाराम गोखले यांचें लग्न होतें. लग्न-वरात होऊन रात्रीं १-२ वाजण्याचे सुमारास शिवरामपंत घरीं येतात तोंच टिळकांकडून बोलावणें आलें ! कारण, टिळक सुटले होते. मंडालेहून कोणाला न कळवितां रात्रीं गुपचुप त्यांच्या वाड्यांत त्यांना पोचतें करण्यांत आलें होतें.

---

## ११

# स्वल्पविराम

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः
—गीता

लोकमान्य टिळक सहा वर्षांच्या दीर्घ कारागृहवासानंतर लोकांत पुन्हां परत आले होते. त्यामुळें जनतेनें त्यांचें उत्साहानें स्वागत केलें. शनिवार ता. २० जून रोजीं गायकवाडवाड्यांत जाहीर पानसुपारीचा समारंभ झाला. अनेक संस्थांतर्फे टिळकांना हार अर्पण करण्यांत आले.

"ज्या स्वदेशभक्तांना येथें हजर रहातां येत नाहीं, त्या गैरहजर स्वदेशभक्तांबद्दल मी हा हार घालतों."

असें म्हणून शिवरामपंत परांजपे यांनीं आपला एक पुष्पहार समर्पण केला.

टिळक सुटले म्हणून या सालचा गणेशोत्सव विशेष आनंदानें आणि उत्साहानें साजरा झाला. ता. २८ सप्टेंबर रोजीं गायकवाडवाड्यांतील गणपतीपुढें लो. टिळक यांचे अध्यक्षतेखालीं शिवरामपंतांचें वेदान्त या विषयावर व्याख्यान झालें. हें भाषण विद्वत्ताप्रचुर आणि तत्त्व-गंभीर असल्यामुळें त्याचा सारांश मुद्दाम खालीं देण्यांत येत आहे:

"वेदान्त या विषयाचें चर्वण जगाच्या प्रारंभापासून चालू असूनही पुनः त्याचें कोणीं चर्वण सुरू केल्यास त्याला उच्छिष्टाचा दोष यावयाचा नाहीं. प्रत्येक व्यक्तीच्या विशिष्टत्वामुळें हा विषय नवा नवाच भासतो, भक्तिज्ञान-वैराग्यानें ज्यांना पूर्ण अधिकार प्राप्त झाला आहे, किंवा ज्यांच्यावर गुरुकृपा झाली आहे त्यांना हे वेदांतांतील बिकट प्रश्न सुटून त्यांचें समाधान झालें असेल; पण सर्वसामान्य मनुष्यांना हे प्रश्न सुटत नाहींत. शाळेंत परीक्षा घेणारी इन्स्पेक्टर वगैरे मंडळी असतात; पण हे प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटले कीं नाहीं हें पाहणारें मन हें येथलि परीक्षक आहे. आकाशाच्याच भिंती

असलेल्या या विश्वाच्या शाळेंत हे प्रश्न सोडवून दाखविणारे कांहीं सत्पुरुष हे शिक्षक कांहींही फी घेत नाहींत. या जगाचा अर्थ काय? याचा आपल्याशीं संबंध काय? हें अस्तित्वांत कसें आलें? हें लयाला केव्हां जाणार? इत्यादि अनेक प्रश्न सामान्य कोटींतल्या माणसापुढें उभे राहतात व त्याचें समाधान होत नाहीं. हे प्रश्न समजण्याचा अधिकार येण्यास बाल्यावस्था अनुकूल नसते. तारुण्यांतील विषयलालसेमुळें या प्रश्नांचा विचार करण्याकडे माणसाचें लक्ष लागत नाहीं. तारुण्याच्या सरहद्दीवर व वृद्धापकाळच्या दरवाजावर येऊन पोंचला म्हणजे त्याला संकटाची आठवण होते व मागें भोगलेल्या अनेक विषयांचा वीट येऊं लागतो: पिंवळा रसरशीत सुंदर आंबा आपण एकदां चोखून चोखून त्यांतील रस संपविल्यावर मग त्याच्या कोईचा व सालीचा वीट येतो, त्याप्रमाणें जगांतले विषय नीरस वाटूं लागतात व मग तो वेदान्ताकडे वळूं लागतो. पांचसहा वर्षांच्या मुलांमुलींनीं भातुकलीकरतां केलेला संग्रह प्रौढ मनाच्या माणसांना जसा तुच्छ वाटतो, त्याचप्रमाणें आमच्या व आमच्या राजेरजवाड्यांच्या तिजोरींतील जडजवाहीरही आमच्यापेक्षां उच्च वातावरणांत असलेल्यां मनुष्याला तुच्छ दिसतात. आपण संग्रह करतों व परमेश्वर अध्यास करीत असतो. व्यवहारांतील गारुडी ज्याप्रमाणें आपल्या पोतडींतून एक एक वस्तु काढून इंद्रजाल पसरतो, दृष्टीस भ्रम उत्पन्न करतो व खेळ संपल्यावरसुद्धां एक एक पैसा घेऊन आपण फसल्याची कबुली घेऊन सोडून देतो, त्याप्रमाणें परमेश्वरानेंही हा भ्रम उत्पन्न केला आहे. क्षणभर गंमत करून गारुडी जसा एक एक जिन्नस पोतडींत भरतो, त्याप्रमाणें परमेश्वरही या सर्व अध्यासाचा निरास करतो. मृगजळ उत्पन्न करून बिचाऱ्या हरिणांना परमेश्वर धावावयास लावतो व तीं बिचारीं तापलेल्या वाळूवरून धावून धावून छाती फुटून मरतात. अशा प्रकारचा हा परमेश्वराचा भ्रममूलक खेळ पाहून हा विषयाला कंटाळलेला माणूस उदास होतो. असे वैराग्य झालेले व राज्यत्याग केलेले राजेही आपल्यांत झाले आहेत. जनकराजाला असेंच वैराग्य उत्पन्न झालें. त्याला सुखोपभोग नकोसे झाले. एकेवेळीं त्याच्या राजवाड्यालाच आग लागली. राजवाड्यालाच काय पण 'मिथिलायां प्रदीप्तायां न मे दह्यति किंचन–सबंध मिथिला जळली तरी माझें त्यांत कांहीं जळत नाहीं,' असें तो म्हणाला! अमक्या एका वयांत हें वैराग्य उत्पन्न होतें असें नसून पूर्वकर्माच्या संस्कारानें कोणी उपजतही विरागी असतात. शुकाचार्य मातेच्या उदरांतूनच हे जगांतले अनर्थ पाहून, बाहेर आलों तर माझी

वृत्ति बिघडेल कीं काय या भीतीनें बारा वर्षे गर्भांतच राहिले. या भ्रमपूर्ण जगांतील अनेक आपत्ति सोसून कंटाळून गेल्यामुळें वैराग्य उत्पन्न व्हावें व नंतर हे परमार्थमार्गांतील विकट प्रश्न आठवावे, यापेक्षां परमेश्वरानें हें जगच मुळीं कां उत्पन्न करावें, हा प्रश्न उत्पन्न होतो. शंकराचार्य याला परमेश्वराचे 'लोकवत्तु लीलाकैवल्यम्' असें ब्रह्मसूत्रावरील भाष्यांत उत्तर देतात. हा आयुष्याची नासाडी करणारा खेळ परमेश्वराला कां सुचावा, कांहीं कळत नाहीं. ही कृति पाहिली म्हणजे इसापाच्या तळ्यांतील मुक्या पण त्यावेळीं बोलक्या झालेल्या बेडकांच्या 'तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो' या वाक्याची आठवण होते. आचार्यांच्या 'लीलाकैवल्यम्' या वचनाशिवाय याला दुसरें उत्तरच नाहीं. माणसाची जिज्ञासा कोठेंतरी थांबलीच पाहिजे. जिज्ञासेला तशी कांहीं हद्द नसेल तर शास्त्राची प्रवृत्तीच होणार नाहीं. या वेदान्तशास्त्रांतील प्रश्न सोडविण्याचा अधिकार येण्यास विरक्ति ही पहिली पायरी आहे. आपल्या हिंदु लोकांचीं मनें हें वैराग्य उत्पन्न होण्यास पात्र असतात. आमचे आनुवांशिक संस्कारच तसे आहेत. हिंदु मन सत्त्वगुणप्रधान आहे. खरें समाधान, खरी शांति या सत्त्वगुणानेंच प्राप्त होईल. खरी स्वतंत्रता यांतच आहे. जनक, प्रल्हाद, शुकाचार्य यांनीं जगाला तुच्छ मानिलें म्हणूनच त्यांना तें प्राप्त झालें. आपल्यांत सत्त्वगुणाचीच वृद्धि झाली पाहिजे. ऐहिक उपभोगावर पाणी सोडल्याशिवाय सत्त्वगुणाची वाढ होणार नाहीं. विरक्त व्हावें, साधुसंतांचे ग्रंथ वाचावे, त्यांचा समागम करावा म्हणजेच परमपदाची प्राप्ति होईल. चित्स्वरूप झाल्यावर कर्म केलें काय आणि न केलें काय एकच. तर मग कर्म करून तरी काय बिघडणार? याच तत्त्वावर जनकादिकांनीं ज्ञानप्राप्तीनंतर राज्यत्याग केला नाहीं. तो निवृत्तियुक्त राहून प्रवृत्तींतच राहिला होता. अशा प्रकारचें निष्काम कर्म करणारे महात्मे आपल्यांत उत्पन्न होऊं देत, अशी गजाननापाशीं नम्रतापूर्वक मागणी आहे."

सन १९१६ च्या एप्रिल अखेरीस बेळगांवला अठरावी प्रांतिक परिषद् भरली. त्याचे आधींपासूनच राष्ट्रीय पक्षानें कॉंग्रेसमध्यें जावें कीं नाहीं या प्रश्नाला पुन्हा जोराची चालना मिळाली होती. क्रीडवर सही करून आणि अपमानास्पद अटी पत्करूनही अखेर मवाळांशीं हातमिळवणी करण्यापासून लाभ होणार नाहीं असें शिवरामपंतांचें मत असल्यामुळें

त्यांचा वाटेल तें पत्करून समेट करण्याला विरोध होता. टिळकांचें मत शक्य तितक्या सन्मान्य अटी मिळविण्याचा प्रयत्न करावा पण तुटेपर्यंत ताणूं नये असें होतें. बेळगांवास या प्रश्नाची उलटसुलट पुष्कळ चिकित्सा झाली. पण अखेरीस शिवरामपंत टिळकांचे म्हणण्याचे उलट गेले नाहींत. परिषदेचे अध्यक्ष दादासाहेब खापर्डे होते. समेटाचा महत्त्वाचा ठराव खुद्द टिळकांनींच मांडला. त्याला ना॰ बेळवी, श्री॰ गांधी ( महात्मा ), शिवरामपंत परांजपे, दादासाहेब करंदीकर वगैरे मंडळींनीं पाठिंबा दिल्यावर तो सर्वानुमतें पास झाला.

ही परिषद् समाप्त झाल्यानंतर शिवरामपंतांचें व्याख्यान ऐकावयाला मिळावें अशी बेळगांवकरांची फार इच्छा असल्यामुळें परिषदेच्याच भव्य शामियान्यांत लो॰ टिळक यांचे अध्यक्षतेखालीं त्यांचें व्याख्यान ठेवण्यांत आलें. विषय ‘ पूर्वींचा इतिहास व हल्लींचें राजकारण ’ असा होता. शिवरामपंतांनीं या विषयाची केलेली चर्चा जितकी वक्तृत्वपूर्ण तितकीच त्यांच्या पांडित्याची आणि राजकारणांतील खोल निरीक्षणाची निदर्शक अशी होती. ते म्हणाले:

“पूर्वींचा इतिहास हा अनुभवशीर व अमोलिक संग्रह आहे. हल्लींचें राजकारणसुद्धां कालाच्या विशिष्ट दृष्टीनें पाहिलें म्हणजे तो पूर्वींचाच इतिहास आहे व पूर्वींचा इतिहासही एकावेळीं हल्लींचें राजकारणच होता. पिता हा केव्हां तरी पुत्र होता व पुत्र हा केव्हां तरी पिता होणार, त्याप्रमाणेंच पूर्वींचा इतिहास व हल्लींचें राजकारण यांचा संबंध आहे. आपण ज्या ठिकाणीं फसलों, ज्या खड्ड्यांत आपले पाय चुकून पडल्यामुळें ते चिखलानें भरले व प्रसंगीं आपलें डोक्यावरचें पागोटेंही गमावलें, ते खड्डे चुकविण्यासाठीं कोठें उडी मारावी, कोणत्या ठिकाणीं सावधगिरी बाळगावी हें पूर्वींचा इतिहास लक्षपूर्वक वाचल्यास चांगल्या रीतीनें कळून येईल. मोठमोठे यांत्रिक शोध निघून जगाच्या सुखांत भर पडलेल्या काळाचा इतिहास असो, किंवा हे शोध लागण्याच्या पूर्वीच्या काळाचा इतिहास असो, त्यांच्या प्रमेयांत फरक पडत नाहीं. ज्या देशांत ज्ञानाचा प्रसार होतो त्या देशाला कोणत्याही बाबतींत यशःप्राप्ति, जेथें अज्ञान तेथें अपयश, जेथें धर्म तेथें जय, जेथें अधर्म तेथें अपजय, हीं इतिहासाचीं तत्त्वें केव्हांही अबाधितच असणार. अगोदर बुद्धि

जाते व नंतर भांडवल जातें, ही जी व्यावहारिक म्हण आहे तिचाच प्रत्यय राष्ट्राच्या बाबतींतही अनुभवास येतो. राष्ट्र प्रज्ञाहत झालें म्हणजे तें अवनतीस पोंचणार हा इतिहासाचा सिद्धांत आहे. लोकांच्या हातांतून हत्यारें काढून घेतलीं तर फारसें बिघडावयाचें नाहीं. पण राष्ट्रांतील लोकांची बुद्धि नष्ट करण्याचे प्रयत्न झाले व त्यामुळें राष्ट्राचा बुद्धिभ्रंश झाला तर मात्र उन्नतीची आशा करावयास नको. आपल्या राष्ट्रांतील राजनीतीचा आद्यप्रवर्तक जो आर्यचाणक्य त्यानेंही ' बुद्धिस्तु माऽगान्मम ' असेंच म्हटलें आहे. हा चाणक्य एकदां नंदाच्या राजवाड्यांत जेवावयास गेला असतां एका पाटा-वरून–हात सव्वाहात रुंदीच्या लांकडाच्या तुकड्यावरून–त्याला उठविण्यांत आलें; पण तेवढ्या अपमानानें संतापून जाऊन असला अपमान करणाऱ्या नंदाचें निर्मूलन करीपर्यंत शेंडीला गांठ न बांधण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. चाणक्याला जसें त्याच्या पाटावरून उठविलें त्याप्रमाणें दुसऱ्या एखाद्या ब्राह्मणावर तो प्रसंग आला असता तर तो सुटलेली शेंडी चटकन बांधून दुसरीकडे जाऊन बसला असता. चाणक्याच्याजवळ फक्त गळ्यांतलें एक जानवें व त्याची प्रखर तेजस्वी बुद्धि यांशिवाय दुसरें कांहीं साधन नव्हतें. पण त्याची बुद्धि ठिकाणावर असल्यानें त्यानें चंद्रगुप्ताला राज्यावर बसविण्याची मोठी कामगिरी पार पाडली. त्याची बुद्धि नष्ट झाली असती तर त्याच्या हातून एवढें हें कार्य झालें नसतें. पूर्वीचा इतिहास आपणांस हेंच सांगत आहे: आपली बुद्धि कायम ठेवा. बुद्धि कायम ठेवल्यावर तुम्हांला आपलें राष्ट्र नष्ट होण्याची भीति बाळगावयास नको. ही कल्याणकारी बुद्धि कल्पवृक्षासारखी आहे. हिच्या आश्रयाखालीं पाहिजे ती गोष्ट साध्य करून घेतां येईल. ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादि संतांनीं दुसरें कांहीं न मागतां ' तुझे चरणच आमच्या हृदयांत कायमचे राहूं देत ' असें मागणें पांडुरंगापाशीं मागितलें. यांतसुद्धां बुद्धि शुद्ध व कायम ठेवण्याचीच भावना आहे. तेव्हां आत्मोद्धार असो वा राष्ट्रोद्धार असो, बुद्धि शुद्ध व कायम राखणें हें अत्यंत जरूर असून अशा शुद्ध बुद्धीचा लाभ आपल्या लोकांना व्हावा व ही देशभक्तियुक्त निर्मल बुद्धि लोकांच्या अंतःकरणांत कायम रहावी अशीच माझी परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे. ''

बेळगांव परिषदेनंतर लवकरच महाराष्ट्र होमरूल लीगची स्थापना होऊन तिचेमार्फत चळवळीस सुरवात झाली. पण होमरूल लीगच्या राज-

कारणांत शिवरामपंत समरस झाले नाहींत. कारण त्यांत १९०८ पूर्वीच्या चळवळीचा जोम नव्हता. सामुदायिक उठावणी नव्हती. शिवाय याच सुमारास सरकारनें त्यांचेवर भाषण-बंदीची नोटीस बजावली होती. सन १९१५ पासून ते १९२० पर्यंतच्या काळांत राजकारणाची गाडी ज्या रुळावर गेली होती तशीच ती नेणें हें त्यावेळच्या परिस्थितीच्या दृष्टीनें योग्य आणि आवश्यक असेल, परंतु शिवरामपंतांना मनापासून उत्साह व प्रेम वाटण्यासारखा कार्यक्रम किंवा धोरण त्यांत नव्हतें. अर्थात् टिळक-पक्षांतच ते मोडत आणि होईल तें करीतही. पण या काळांत चालू असलेल्या राजकारणांत त्यांचें चित्त तितकेंसें नव्हतें, ही गोष्ट कांहीं खोटी नव्हे.

" जें करावयाला पाहिजे आहे तें करतां येत नाहीं आणि
जें करतां येतें तें करावयाला नको आहे, "

अशी त्यांचा विलक्षण अवस्था झालेली होती. खुद्द शिवरामपंतांचें हें विधान त्यांचें त्यांनाच विशेषतः त्यांच्या या काळांतील मनःस्थितीला सर्वांत अधिक समर्पक रीतीनें लागू पडतें, यांत शंका नाहीं.

तथापि राजकारणांत न गुंतलेली त्यांची कार्यक्षमता स्वस्थ विश्रांति घेत बसेल हें शक्यच नव्हतें.कारण,कामांत बदल हीच विश्रांति घेण्याची त्यांची तऱ्हा होती. विद्या-व्यासंगाचें जें व्यसन कॉलेजपासून जडलें होतें तें कायमच होतें. काळ बंद पडल्यानंतर त्यांचे स्नेही वासुदेवराव जोशी यांच्या सांगण्यावरून चित्रमयजगतांत ते आपले लेख देत असत. आतांपर्यंत त्यांच्या लेखणीला राजकारणाशिवाय इतर प्रांतांत भ्रमण करण्याला त्यांची परवानगी नसे. पण यापुढें थोडथोडी मोकळीक मिळूं लागली. 'साहित्य–संग्रहा'च्या दोन भागांत ग्रथित करण्यांत आलेले संशोधनात्मक, वेदान्तविषयक व साहित्य–विषयक लेख या काळांतच लिहिलेले आहेत. त्यांतला **मदन-दहन** हा उच्च प्रतीच्या शृंगारिक रसाचा आणि रम्य कल्पनाविलासाचा एक उत्कृष्ट मासला आहे. 'भासाच्या भवितव्यतें'त त्यांच्या स्वतःच्या भवितव्यतेचा भास भरलेला आहे! शिवरामपंत रूढिप्रिय आणि सनातनी वृत्तीचे होते, असा

पुष्कळांचा समज आहे. आणि आचारांत दिसण्याला ते तसे होते ही गोष्टही तितकीच खरी आहे. परंतु वैचारिक दृष्टया ते अत्यंत पुरोगामी आणि जुन्याला न जुमानणारे होते, ही गोष्ट त्यांचें लेखन व उद्गार सूक्ष्म दृष्टीनें पहातां सहज कळून येण्यासारखी आहे. बुद्धिवादानें पाया भक्कमपणें भरल्यावर मागाहून त्यावर भावनावशतेची त्यांची इमारत उभारली जात असे, ही गोष्ट विसरतां कामा नये.

*"शिवरामपंत बुद्धीनें तर्कवादी आणि भावनेनें आस्तिक होते. बुद्धिवादानें मनुष्य अज्ञेयवादी बनतो. आस्तिक्याच्या अनुभूतीसाठीं शुद्ध भावनांची आणि उच्च श्रद्धेची आवश्यकता असते. आस्तिक्याचा नाश होणार नाहीं, अशा बेतानें ते आपली तर्कशक्ति चालवीत असत. 'दोन काळोखांत तीन काजव्यांचा लुकलुकाट' आणि 'श्रद्धा' या लेखांत या असल्या दोनही गुणांची साक्ष त्यांनीं पटविली आहे. 'प्रस्थानत्रयीच्या एकवाक्यते' विरुद्ध लिहिल्यानें वे. ओडल्मने शास्त्री जुन्या 'लोकशिक्षणां'त त्यांजवर रुष्ट झाले होते. संतांच्या ग्रंथांवर बुद्धिवाद चालविल्यामुळें कै. 'गोविंदसुत' चिंचाळकर त्यांच्यावर खवळले. चिंचाळकरांचा आणि त्यांचा स्नेह होता. चिंचाळकर आपणाला परमार्थाचे अनुभवी म्हणवीत. शिवरामपंतांचा आणि त्यांचा सदा विद्याविनोद चाले. चिंचाळकरांनीं म्हणावें, "तुम्ही तांत्रिक आहांत. तुम्हांला संतांचें मर्म कांहीं समजावयाचें नाहीं." शिवरामपंतांनीं म्हणावें "तुम्हांला काय अनुभव आला आहे, तो तर आम्हांला ऐकूं द्या." आणि शेवटीं निर्णय न लागतां वाद संपे.

"विश्वाच्या मांगल्यावर श्रद्धा नसेल तर साहित्य निराशावादी (Pessimistic) होतें. संसारांत कितीही दुःखें येत असलीं तरी सत्याचा शेवटीं जयच होणार असा श्रद्धावाद साहित्यांतून प्रकट झाला पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. पाश्चात्य वाङ्मयामध्यें कांहीं श्रेष्ठ कलोपासक असे आस्तिक नसल्यामुळें त्यांच्या वाङ्मयांत निराशावाद दिसून येतो. इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं शारदोपासक संमेलनांत अध्यक्ष म्हणून मराठी भाषेसंबंधीं जे निराशेचे उद्गार काढिले ते शिवरामपंतांना

* 'शिवरामपंतांच्या संगतींत'—आचार्य भागवत लोकशिक्षण मासिक

आवडले नाहींत. " राजवाडे नेहमींच Pessimistic असतात " असें ते मजजवळ बोलले. आपल्या लेखांतून ते सदैव आशावाद प्रकट करीत असत. ' भासाची भवितव्यता ' या नितांत करुण लेखाच्या शेवटीं ते म्हणतातः—

" पण हे भासाच्या आत्म्या, तूं निराश होऊं नको. परमेश्वर या जगांत जोंपर्यंत हयात आहे, तोंपर्यंत दुष्ट लोकांनीं कितीही अपकार केले तरी कोणालाही निराश होण्याचें कारण नाहीं. ज्यानें बुडणारी श्रुति मत्स्यरूपानें तारली, ज्यानें ज्वाळांमध्यें प्रविष्ट झालेली सीतादेवी प्रत्यक्ष अग्नीच्याच हातून श्रीरामचंद्राच्या हातीं आणून दिली, आणि ज्यानें तुकारामाच्या अभंगांची गाथा श्रीपांडुरंगाच्या रूपानें इंद्रायणीच्या डोहांतून कोरडीच्या कोरडी वर काढून आणिली तोच परमेश्वर तुझ्याही कवितेच्या पाठीमागें उभा आहे ! तो पहा ! तो या जगांतील जरूरीची अशी कोणतीही गोष्ट नाहींशी होऊं देणार नाहीं. "

" साहित्यशास्त्रात ते अत्यंत निष्णात होते. सर्व रसांत करुणरस श्रेष्ठ होय, असा त्यांचा सिद्धांत होता. दृश्यसंसार क्षणभंगुर आणि ऐहिक सुख नश्वर असल्यामुळें येथील सर्व उलाढालीचा अंत दुःखांत व्हावयाचा. संसाराची विरक्ति आणि परमेश्वराची भक्ति या दोनच शाश्वत मनोवृत्ति आहेत, असें भारतीय संत ऋषींचें तत्त्वज्ञान आहे. यामुळें काव्यांत करुण आणि शांत या रसांनाच प्राधान्य येतें. शृंगारांतही विप्रलंभाचेंच विशेष महत्त्व आहे. पाश्चात्य साहित्यशास्त्रकारांनीं देखील यामुळेंच ' ट्रॅजेडी 'ला महत्त्व दिलें आहे. "

आणि या विचारानेंच या काळांत लिहिलेली **गोविंदाची गोष्ट** त्यांनीं शोकान्त केलेली होती. गोविंदाच्या गोष्टींतील घटना हृदयद्रावक आणि शेवट चटका लावून सोडणारा आहे. त्याचा लेखी पुरावाच कांहीं दिवसांनीं मिळाला. पुढें त्यांची विंध्याचल कादंबरी चित्रमयजगत्मध्यें प्रकरणशः प्रसिद्ध होऊं लागली. व जसजसा शेवट जवळ जवळ येऊं लागला तसतसा तोही शोकपूर्ण होणार हें वाचकांना उघड दिसूं लागलें. आणि शिवरामपंतांच्या मनांतून विंध्याचलही शोकपर्यवसायीच करावयाचें होतें. कथानकाचे धागेदोरेही त्या अनुसंधानानेंच विणले जात होते. परंतु या सुमाराला अनेक वाचकांचीं पत्रें

येऊं लागलीं कीं, ' गोविंदाच्या गोष्टीसारखें करूं नका. निदान विंध्याचल तरी आनंदपर्यवसायी करा. ' लोकमताला योग्य मान देणाऱ्या शिवरामपंतांनीं लोकाग्रहास्तव शेवट गोड केला !

या दोन्ही कादंबऱ्यांतील सृष्टि–वर्णनें बहारीचीं आहेत. सृष्टिसौंदर्याचें निरीक्षण व रस-ग्रहण करण्याची शिवरामपंतांची शक्ति व प्रवृत्ति विलक्षण होती. निमित्तमात्र घेतलेल्या भासाविषयीं लिहितांना ते स्वतः-चाच अनुभव वर्णन करीत आहेत असा भास होतो. ते लिहितातः—

" बिचारा तुंगपर्वताच्या शिखरावर चढला असेल आणि तेथें एखाद्या नवशाद्वल भूमिकेवर अथवा पर्जन्यधौत शिलातलावर बसून त्या पर्वताचे सुळके गगनोदराला कसे टोंचीत आहेत, कडे कसे तुटलेले आहेत, खोल दऱ्या कशा लांबवर पसरल्या आहेत, त्यांतून अरण्यें कशीं वाढलीं आहेत, पाण्याचे धबधबे कसे पडत आहेत, नद्यांचे उगम कसे होत आहेत, नवीन मेघांची रचना कशी बनत आहे इत्यादि सृष्टिसौंदर्याचे अत्यद्भुत देखावे तल्लीन मनानें पहात असतां तदाकार वृत्ति होऊन, बाहेरचें कांहीं दिसेनासें होऊन आणि बाहेरच्या सर्व देखाव्याचें चित्र अंतर्यामामध्यें प्रतिबिंबित होऊन त्यापासून उत्पन्न होणाऱ्या आद्वितीय आनंदाचा आस्वाद घेत देहभान विसरून बिचारा दिवसच्या दिवस ध्यानस्थ बनला असेल ! एखादें फूल पाहिलें म्हणजे त्याचें कौतुक करीत तेथेंच बसला असेल ! हिरवीगार वनश्री पाहून त्याच्या प्रकृतींतील सत्त्व, रज, आणि तम ह्यांचे रंगही हरितवर्ण झाले असतील ! कोकिळेचा आवाज ऐकून ती कोकिळा कोणत्या झाडाच्या माडीवर बसून हें मधुरगायन करीत आहे हें पाहण्यासाठीं तो वेड्यासारखा कितीतरी ठिकाणीं फिरला असेल ! मेघ, विजा आणि पाऊस यांचीं वर्णनें हुबेहुब करतां यावीं म्हणून पावसांतून कितीतरी वेळां तो भिजला असेल ! चकोर चंद्रकिरण कसे प्राशन करीत आहेत आणि मेघोदकांनीं चातकाची तृषा कशी शांत होत आहे, हें आकाशाकडे टक लावून पाहत असतांना त्याची मान कितीतरी वेळां खुडी झाली असेल ! तो रात्रीच्या अंधकारांतून मुद्दाम एकटा फिरला असेल ! मित्रांची संगति कितीही सुखकर असली तरी सुद्धां एकान्ताशिवाय सृष्टिसौंदर्याशीं

आपली एकतानता बरोबर होणें शक्य नाहीं हें लक्षांत आणून त्या मित्रांना चुकवून तो एकटाच कितीतरी वेळां अरण्यांतील डोंगरापाशीं आणि वृक्षापाशीं कवींच्या रसात्मक भाषेंत बोलत उभा राहिला असेल! तो जलाशयाच्या कांठीं बसला असेल आणि त्यांत प्रतिबिंबित झालेलीं सभोंवतालच्या वनश्रीचीं चित्रें पाहण्यांत त्यानें प्रहरच्या प्रहर घालविले असतील!''

याप्रमाणें एकीकडे शिवरामपंतांची साहित्यसेवा सुरू होती, त्यावेळीं युरोपांतील गेल्या महायुद्धाचा भर आलेला होता. सरकारला लष्कर-भरतीसाठीं हिंदुस्थानांतून स्वयंसेवकांची जरूर होती. या बाबतींत पुण्याच्या राष्ट्रीय पक्षांतील पुढारी मंडळींचें मत काय होतें याबाबत वीर वामनराव जोशी यांची आठवण पुढीलप्रमाणें आहे.

''पुढें एकदोन दिवसांत लॉर्ड किचनेर यांचा जाहीरनामा सविस्तर प्रसिद्ध झाला. पुण्यास राष्ट्रीय पक्षाच्या मंडळींत या संधीचा फायदा घ्यावा किंवा नाहीं याविषयीं कडाक्याचा वाद सुरू झाला. लोकमान्य व श्री. खाडिलकर हे स्वयंसेवक पुरवावेत असें म्हणत होते. डॉ. नानासाहेब देशमुख, श्री. शिवरामपंत परांजपे, श्री. वासुकाका जोशी व इतर बहुतेक सर्व मंडळी लोकमान्यांच्या विरुद्ध होती. किमानपक्ष आठवडाभर तरी हा वादविवाद चालू होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु इतका वादविवाद होऊनही सर्वांचें एकमत कांहीं केल्या होऊं शकलें नाहीं. पुढें एक दिवस कांहीं कामानिमित्त लोकमान्य मुंबईस गेले. श्री. बाबासाहेब विद्वांस त्यांचेबरोबर होते. कर्मधर्मसंयोगानें त्याच गाडीनें मी व माझे मित्र श्री. हरिभाऊ फाटक असे दोघे मुंबईस गेलों होतों. बोरीबंदराच्या स्टेशनवर उतरल्यानंतर आम्ही लोकमान्यांना भेटलों. लोकमान्यांच्याकरितां कै. खऱ्यांची मोटार आली होती. '' चला, माझ्याबरोबर मोटारींतूनच चला. मी तुम्हांला तुमच्या बिऱ्हाडीं उतरून पुढें जाईन '' असें लोकमान्यांनीं आम्हांला म्हटलें व आम्ही सर्व मोटारींत बसलों. मोटारींतून जात असतां लोकमान्य आम्हांस म्हणाले, '' सरकारास स्वयंसेवक देण्यासंबंधानें तुमचें म्हणणें मला पटतें; परंतु सरकारनें मागणी केली असतां आपण त्यांना आज नुसते शब्दांनींही

' होय ' म्हटलें नाहीं तर उद्यां सरकार तेवढेंच धरून बसेल आणि पुढें ज्या ज्या वेळीं आम्हांला सरकारच्या दाराशीं जाण्याचा प्रसंग येईल त्यावेळीं हें निमित्त पुढें करून आमचा शब्द सरकार फेटाळून लावील. तुमच्याप्रमाणें मलाही सरकारास स्वयंसेवक द्यावयाचे नाहींत, परंतु तसें स्पष्ट सांगून मला सरकारची बाजू मजबूत करावयाची नाहीं. एकही स्वयंसेवक सरकारच्या हातास लागूं न देतां मी तोंडानें मात्र ' देतों ' असेंच नेहमीं म्हणत राहणार ! खरें म्हटलें म्हणजे उद्यां आमच्या उपयोगी पडतील अशीं माणसें सरकारला नकोच आहेत आणि त्याप्रमाणेंच ज्यांचा आम्हांला कांहीं उपयोग होणार नाहीं अशा माणसांची भरती करण्या-साठीं धडपडत बसण्याचें आम्हांलाही कारण नाहीं. आज चालला आहे हा नुसता शब्दांचा खेळ आहे. सरकारला हवीं असणारीं माणसें सरकार आमच्या मदतीवांचूनही मिळवीत आहे. इतकेंच नव्हे तर त्यांच्या भरतींत आम्ही लुडबुडूं लागलों तर सरकारला तें आवडावयाचेंही नाहीं. परंतु आमच्यावर पुढेंमागें दोष ढकलतां यावा म्हणून त्यांनीं हा डाव टाकला आहे. तेव्हां शब्दाच्या मागणीला आपणही शब्दानें रुकार द्यावा व आपणांस दोष लावण्यास सरकारास जागा राहूं देऊं नये, एवढेंच माझें म्हणणें आहे. बाकी तुमच्या आमच्यांत वास्तविक खरा मतभेद कोठेंच नाहीं.''पुढें या बाबतींत लोकमान्यांनीं कसें वर्तन केलें हें जगजाहीरच आहे.

पण शिवरामपंत लष्करी शिक्षणाचें महत्त्व पूर्णपणें जाणून होते. सरकारनें इंडियन डिफेन्स फोर्स काढल्यानंतर त्यांत तरुणांनीं नांवें नोंदवावींत एवढ्यासाठीं प्रि. रघुनाथराव परांजपे यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १७ फेब्रुवारी १९१७ रोजीं किर्लोस्कर थिएटरांत एक जंगी संस्मरणीय सभा झाली. मुख्य ठराव टिळकांनीं मांडला. त्याला अनुमोदन देतांना शिवरामपंतांनीं खालील खुबीदार व सूचक उद्गार काढले:

> ''लोकांचीं हत्यारें काढून घेण्याची दृष्टि बदलून त्यांतलीं कांहीं पुनः आमच्या हातीं देऊन युद्धकला शिकविण्याचें सरकारनें मनांत आणलें आहे. **इतर कांहीं गोष्टी असल्या** तरी कोणत्याही प्रकारचें किल्मिष मनांत न धरतां **मातृभूमीच्या संरक्षणार्थ** सैनिक होण्याचें पवित्र कर्तव्य आपण पार पाडलें पाहिजे.''

या व्याख्यानाचे वेळीं वक्त्याला आवेश आणि वक्तृत्वाला रंग चढला होता. त्याचें मार्मिक वर्णन प्रो. ओतुरकर यांनीं टिळकांच्या आठवणींत केलेलें आहे. त्यावरून टिळक—परांजपे या दोघांचेही नेमके स्वभावविशेष सहज दिसून येण्यासारखे आहेत:

" इंडियन डिफेन्स फोर्समध्यें तरुणांनीं नांवें नोंदवावींत म्हणून रँ. परांजपे यांच्या अध्यक्षतेखालीं किर्लोस्कर थिएटरमध्यें जंगी जाहीर सभा भरली होती. त्यावेळीं झालेलें **प्रो. शिवराम महादेव परांजपे** यांचें भाषण केवळ मूर्तिमंत वक्तृत्वाचा अवतार असें होतें. सर्व सभा त्यांच्या प्रश्नास होकार देत होती. त्याच दिवशीं लोकमान्य टिळकांना पंजाबांत जाण्याचा प्रतिबंध केल्याचें सरकारनें प्रसिद्ध केलें होतें. तेव्हां प्रो. परांजपे अतिशय आवेशांत आले व त्यांनीं सभेंत श्रोत्यांस प्रश्न केला कीं ' समजा, लोकमान्य तुमचे सेनापति आहेत व त्यांना अशी बंदी झाली तर तुम्ही काय कराल ? ' सभेंतही अत्यंत आवेश भरलेला होता. बिचाऱ्या नेमस्त अध्यक्षांची स्थिति केविलवाणी झाली. तेव्हां लोकमान्य टिळकांनी प्रो. परांजपे यांचा आंगरखा मागें ओढला व आतां पुरें करा असें खुणावलें व रँग्लरांना त्या विकट प्रसंगांतून मुक्त केलें. "

याच शस्त्र-धारण या विषयाच्या अनुसंधानानें, त्यावेळची श्री. व्यंकटेश विष्णु वैद्य यांची आठवण उल्लेखनीय आहे. १९१९ सालीं परांजपे गोमांतकीयांच्या अत्याग्रहाच्या निमंत्रणावरून **मडगांव** येथील सरस्वती उत्सवांत व्याख्यानें देण्याकरितां गेले होते. श्री० वैद्य लिहितात—

"आम्हीं त्यांस म्हटलें, "गोमंतकाला स्वराज्य Autonomy मिळालें आहे अशी तुमची समजूत करून दिली गेली आहे तशी वस्तुस्थिति नाहीं. पोर्तुगीज सरकारनें आम्हांस दिलेले स्वराज्याचे हक्क केवळ तकलुपी आहेत ! " तेव्हां ते हसून म्हणाले, " स्वराज्य ही इतकी मौल्यवान् चीज आहे कीं, ती परकीय राज्यकर्त्यांकडून आपखुषीनें प्रजेला मिळणें अगदीं दुर्घट आहे. स्वराज्य हें राज्यकर्त्यांकडून घ्यावें लागतें आणि तसें घेतलें तरच तें टिकतें. पोर्तुगीज सरकारनें कृपावंत होऊन गोमंतकाला स्वराज्याचे हक्क दिले आहेत असें जेव्हां आम्हांला सांगितलें गेलें तेव्हांच त्यांत कांहीं भरीवपणा नाहीं असें आम्हांला वाटलें होतें !"

पुढें ते म्हणाले, " तुम्हांला स्वराज्य मिळालें असो अगर नसो, लष्करी शिक्षण मिळण्याची तरी तुम्हांस सर्रास सोय आहे ना ? बस्स ! लष्करी शिक्षण हीच स्वराज्याची पहिली आणि शेवटची पायरी आहे. ज्या लोकांचें लष्कर तेच देशाचे मालक, तुम्ही गोमंतकीय तरुणांनीं या संधीचा जरूर फायदा घेतला पाहिजे. स्वराज्य मिळविणें हें कठीणच; पण त्याहींपेक्षां स्वराज्याचें रक्षण करणें जास्त कठीण आहे. प्रत्येक गोमंतकीय तरुण येत्या दहा वर्षांत लष्करी शिक्षणांत पारंगत झाला पाहिजे. हें ध्येय तुम्ही मनाशीं बाळगा आणि त्याप्रमाणें कृति करा, कीं यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें तुम्हांला जिकडे तिकडे स्थित्यंतर दिसून येतें कीं नाहीं तें पहा ! "

सन १९१८ सालीं टिळक सुप्रसिद्ध चिरोल केसच्या कामाकरितां विलायतेस गेले. या गाजलेल्या खटल्यांत सर एडवर्ड कार्सन यांनीं आपल्याकडून टिळकांची कसून कडक उलटतपासणी केली. या उलट-तपासणींतील पहिल्या दिवशींचा पहिलाच मुद्दा काळकर्ते परांजपे यांचे-संबंधींचा होता. या विषयापुरतीं प्रश्नोत्तरें उद्धृत करून पुढें जाऊं.

कार्सनः—काळ पत्राचे परांजपे हे तुमचे शिष्य होते काय ?

टिळकः—माझ्यावेळीं शाळेंत एक विद्यार्थी होते. त्यांचा वर्ग मीं शिकविला असेल. व्यक्तिशः त्यांना शिकविलें असें नाहीं.

प्र०—परांजपे यांना शिक्षा झाली तेव्हां तुम्ही एकत्र राहात होतां काय ?

उ०—एकाच खानावळींत होतों.

प्र०—परांजपे यांच्यावर खटला झाला तेव्हां परांजपे जामिनावर खुले होते काय ?

उ०—नाहीं.

प्र०—तुम्हांला पकडलें त्यावेळीं तुम्ही व ते एकत्र बसलां होतां काय ?

उ०—होय.

प्र०—त्यांच्या खटल्यांत तुम्ही त्यांच्या बचावाला मदत करीत होतां काय ?

उ०—थोडी बहुत करीत होतों.

प्र०—ते तुमचे स्नेही होते ?

उ०—पुष्कळ होते त्यांतील ते एक होते.

प्र०—त्यांनाही राजद्रोहाबद्दल शिक्षा झाली होती ?

उ०—माझ्यापूर्वी सुमारें १५ दिवस.

प्र०—त्यांचे व तुमचे लेख एकाच स्वरूपाचे होते काय ?

उ०—दोन्ही लेखांवर राजद्रोहाकरितां खटला झाला म्हणून त्यांना वाटेल तर एका स्वरूपाचे म्हणा.

प्र०—तुम्हीं परांजपे यांना काय मदत केली ?

उ०—पैसे व बॅरिस्टर पाहून देणें ह्यासंबंधानें केली.

प्र०—परांजप्यांचे लेख बॉम्बच्या अत्याचारासंबंधानें असतां तुम्हीं त्यांना मदत केली ?

उ०—गुन्हा कशाचाही असला तरी स्नेही व आप्त बचावाला मदत करतातच.

प्र०—तुम्हीं अशा माणसाशीं संगत ठेवली काय ?

उ०—त्यांच्या लेखाचा आणि माझ्या संगतीचा-स्नेहाचा-काय संबंध ?

प्र०—त्यांना शिक्षा झाल्यामुळें तुमच्या स्नेहांत अंतर पडलें कीं नाहीं ?

उ०—शिक्षेमुळें स्नेहांत अंतर पडण्याचें काय कारण ?

प्र०—त्यांच्या लेखाबद्दल तुमचें काय मत ?

उ०—लेख कडक होते. पण अत्याचारांना उत्तेजन देणारे होते असें वाटलें नाहीं.

प्र०—मग कडक म्हणजे काय ?

उ०—विचारसरणी जरा कडक.

न्या. डार्लिंगः—परांजप्यांच्या वर्गांत टिळक Science शिकवीत होते तें कसलें हें विचारा !

( कार्सन ) प्र०—कसलें सायन्स ?

उ०—पदार्थविज्ञान, ज्योतिष व यंत्रशास्त्र.

प्र०—रसायनशास्त्र ?

उ०—नाहीं.

प्र०—पिकरिक ॲसिड ?

उ०—तो विषय मलाही माहीत नाहीं.

प्र०—पिकरिक ॲसिडचा उपयोग काय हें तुम्हांला माहीत आहे काय ?

उ०—वर्तमानपत्रांतून वाचला होता.

प्र०—परांजपे व तुम्ही नाशकास केव्हां एकत्र होतां काय ?

( मजकूर वाचून दाखविल्यावर )

उ०—होय.

प्र०—तुमच्या समक्ष विलायती कापडाची तेथें होळी केली ?

उ०—होय.

प्र०—सर्व देशभर होळ्या केल्या काय ?

उ०—नाहीं.

न्या. डार्लिंग—टिळक व परांजपे यांच्या नाशकाच्या मुक्कामाच्या वर्णनांत ‘ काली ’ हा शब्द आला आहे ती काली म्हणजे काय ?

उ०—काली ही शंकराची पत्नी.

प्र०—दोन्ही विध्वंसाच्या देवता ना ?

उ०—होय.

कार्सन:—एक विध्वंसाचा राजा व दुसरी विध्वंसाची राणी !

प्र०—मॅझिनीचें एक चरित्र त्याच्या कर्त्यानें तुम्हांला व परांजप्यांना मिळून अर्पण केलें होतें काय ?

उ०—होय.

खुद्द चिरोलसाहेबांनीं आपल्या Unrest in India या पुस्तकांत काळांतील एक उतारा दाखल करून काळाबद्दल खालीलप्रमाणें लिहिलें होतें:—

“ Besides the Kal edited by another Chitpawan Brahmin, and the Rashtramat at Poona, which went to even greater lengths than Tilak’s own Kesari, lesser papers obeying his inspirations had been established in many of the smaller centres. ”

( टिळकांखेरीज दुसऱ्या एका चित्पावन ब्राह्मणानें काढलेला **काळ** आणि **राष्ट्रमत** यांनीं तर टिळकांच्या केसरीच्याही पुढें मजल मारली.इ०)

अखेर चिरोल केसचा निकाल टिळकांच्या विरुद्ध लागला. *ता. ३० मे रोजीं मुंबई येथें शांतारामाच्या चाळींत मोठी सभा भरून टिळकांच्या आजपर्यंतच्या देशसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यांत आली. अध्यक्षस्थानीं **गांधी** हे होते. ते म्हणाले, " टिळकांचे व माझे मार्ग वेगळे आहेत. पण त्यांच्या स्वार्थत्यागाचे व विद्वत्तेचे गुण घेण्याचा जो जो प्रसंग असेल त्यांत मी सामील होणारच. विलायतेंतील खटला टिळकांच्या विरुद्ध गेला म्हणून त्यांच्याविषयींची लोकांची आदरबुद्धि कमी झाली नसून उलट वाढलीच आहे. ज्याच्या पिशवीचें तोंड मोठें त्याची फत्ते हा न्यायच आहे. पण न्यायकोर्टाला मी कंटाळून गेल्यामुळें मला असें वाटतें कीं, टिळक हे केवळ सत्याग्रही असते तर काय बहार झाली असती ! तथापि या अपयशानें निराश न होतां टिळकांनीं विलायतें-तील आपली कामगिरी खंबीरपणानें चालविली आहे हें पाहून कौतुक वाटतें. तरी इकडे आपण प्रयत्न करून त्यांच्यावरील खर्चाचा बोजा उठविला पाहिजे. "

शेवटीं शिवरामपंत परांजपे म्हणाले.

"टिळक हे सत्याग्रही आहेत म्हणूनच त्यांनीं हा खटला विलायते-पर्यंत नेला. सत्याचा आग्रह गेल्या एप्रिलांतच सुरू झाला असें नाहीं. तर तो फार पुरातन काळापासूनचा आहे. "

टिळक १९१९च्या नोव्हेंबरांत विलायतेहून परत आल्यानंतर पुण्याला थाटाचा स्वागतसमारंभ झाला. म्यु. प्रेसिडेंट ल. ज. आपटे यांनीं पुणें म्युनिसिपालिटीतर्फे टिळक-केळकरांना मानपत्र अर्पण केलें.पुणें शहरातर्फेचा मोठा जाहीर समारंभ व्हावयाचा होता परंतु त्याला रँ. परांजपेप्रभृति प्रतिपक्षीयांकडून विरोध होणार अशीं चिन्हें दिसत होतीं. ही पहा त्यावेळची वै. गणेशशास्त्र्यांची शिवरामपंतांबद्दलची मार्मिक आठवण—

" लोकमान्य टिळक विलायतेहून आल्यानंतर त्यांच्या सन्मानार्थ रेमार्केटच्या पटांगणांत मोठी सभा करावयाची होती. त्यावेळीं कांहीं

---

* केळकरकृत टिळकचरित्र खंड तिसरा.

लोक विरोध करण्याकरितां हजर राहणार होते. ही माहिती पूर्वी कळली होती. सभेची व्यवस्था विरोधकांच्या विरोधाला न जुमानतां नीट राहावी याकरितां अनेक लोकांनीं अनेक उपाय सुचविले होते. कै. अण्णासाहेबांनीं लोकांचें म्हणणें ऐकून घेतल्यानंतर रात्रीं दहा वाजतां सभेची जागा स्वतः पाहून व्यवस्थेबद्दलच्या सूचना स्वयंसेवकांस केल्या. व्यासपीठाची जागा ठरविली व ती ठरवितांना वक्त्यांचीं तोंडें कोणत्या दिशेकडे असावीं ते वाऱ्यांची दिशा पाहून ठरविलें व विरोधकांना कोठें बसविलें असतां ते काबूंत राहतील याबद्दलचाही युक्तायुक्त विचार सांगितला. वक्ता, अध्यक्ष व सभेची जागा यांची कशी जुळणी करावी याबद्दल त्यांनीं जी माहिती सांगितली ती खरोखरच त्यांनीं अनुभवानें ठरविली होती. ती ऐकून मला त्यांच्या खोल विचाराबद्दल कौतुक वाटलें. ''

असो. सन १९१४ सालीं शिवरामपंतांनीं कानड्यांचा वाडा सोडला व तेव्हांपासून तुळशीबागेजवळ घेतलेल्या स्वतःच्या घरांतच ते राहूं लागले होते. काळ पत्राच्या वेळच्या 'मनोहरा'चे ऐवजीं 'गोवर्धन' असें नामांतर केलेला छापखानाही या वाड्यांत आणला होता. गांधींचा सत्याग्रह, पंजाबांतील जालियनवालाबाग प्रकरण, खिलाफत प्रकरण व महायुद्धाची समाप्ति इत्यादि घटनांनंतर मॉटेग्यू-चेम्सफर्डच्या सुधारणा जाहीर झाल्या होत्या. या सुमारास शिवरामपंतांनीं पुन्हा वर्तमानपत्र सुरू करण्याचें ठरविलें. त्यांनीं आपल्या नव्या पत्राचें नांव योजलें-**स्वराज्य.**

शिवरामपंत स्वराज्य सुरू करण्याच्या पूर्वतयारींत असतांनाच मुंबईला टिळक आजारी असल्याची बातमी आली. त्याबरोबर शिवरामपंत मुंबईस जाण्याकरितां निघाले व सरदारगृहांत टिळकांची प्रकृति पाहून पुण्यास परत आले. याच मुक्कामांत टिळकांच्या जयंतीनिमित्त त्यांचें व्याख्यान झालें. त्यांत '' राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आड आपले जातिभेद येत असतील तर अश्वत्थाम्याप्रमाणें ' इयं सा जातिः परित्यक्ता ' असें आपण म्हटलें पाहिजे '' असें त्यांनीं प्रतिपादन केलें होतें.

शिवरामपंत पुण्यास परतले खरे. पण मुंबईस लोकमान्यांची प्रकृति अधिकाधिकच बिघडत चालली. आणि अखेर ता. १ ऑगस्ट १९२० या दिवशीं देशाचें दुर्दैव ओढवलें. देशाच्या राजकारणांत वेळ अशी

आली होती कीं, कांहींतरी धडाडीचें आणि निर्णयात्मक धोरण आंखणें आवश्यक होतें. आणि अशा वेळीं लोकमान्यांसारख्या परिणतप्रज्ञ व सव्यसाची नेत्याच्या नेतृत्वाची आपल्या देशकार्याला अत्यंत आवश्यकता होती. पण दैवदुर्विलास असा कीं, अशा ऐन वेळीं 'हा हन्त हन्त ! नलिनीं गज उज्जहार ! ' अशी स्थिति होऊन लोकमान्यांना त्यांच्या या परमप्रिय मातृभूमींतून आणि त्यांच्या अंगीकृत कार्यापासून दूर नेण्यांत आलें ! !

टिळकांच्या निधनाची दुःखद वार्ता शिवरामपंतांना रात्रींच तारेनें कळली. तार वाचून पंतांना धक्काच बसला. दुःखाला वाचा फोडण्या-साठींच कीं काय घरांत येऊन पत्नीला म्हणतात 'ऐकलंस का ग, बळवंतराव गेले ! ' हे शब्द बोलून दुःखावेग असह्य होऊन डोकें हातांनीं धरीत ते मट्कन खालींच बसले. डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले होते. १८९२ सालीं न्यू इं. स्कुलांत पंत विद्यार्थी म्हणून आले तेव्हां टिळक शिक्षक; फर्ग्युसन कॉलेजांत एक वर्ष प्रोफेसर; ९६-९७मध्यें मार्गदर्शक पुढारी; १८९८ पासून पुढें समव्यवसायी आणि सहकारी; आणि काल्या रात्रीं वडील भावासारखे धावून येणारे नेते; अशा रीतीनें ३८ वर्षें ज्या पुरुषसिंहाच्या सहकार्यांत आणि साहचर्यांत घालविलीं, त्याच्या मृत्यूची वार्ता कळतांच हळव्या, सहृदय आणि टिळकांविषयीं ओतप्रोत आदर असलेल्या शिवरामपंतांना काय वाटलें असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी. आनंदाच्या प्रसंगानेंही गहिंवरून जाणाऱ्या शिवरामपंतांना त्याचा केवढा धक्का बसला असेल ! लोकमान्यांच्या दहाव्या दिवशीं भरलेल्या जंगी दुखवट्याच्या सभेंत शिवरामपंत म्हणाले—

"लोकमान्य गेले, पण त्यांचे गुण पाठीमागें आहेत. त्यांना आपण अटकाव केला पाहिजे. नाहींतर हे Father of Indian unrest वरती चळवळ करतील आणि परमेश्वराशीं भांडून मला लवकर कां आणिलें म्हणून त्याला विचारतील. लोकमान्यांच्या जाण्यानें परलोकाचाच काय तो फायदा झाला आहे."

## १२

# पुन्हा राजकारण

यात्येकतोऽस्तशिखरं पतिरोषधीना-

माविष्कृतारुणपुरःसर एकतोऽर्कः ॥

— अभिज्ञान शाकुंतल

दिनांक १ ऑगस्ट १९२० या दिवशींचा दैवयोगच असा लिहिलेला होता कीं, टिळक गेले, आणि त्या दिवशींच गांधी असहकारितेच्या कार्यक्रमाच्या रूपानें पुढें सरसावले! शाकुंतलांतील चवथ्या अंकांतल्या सुरवातीच्या प्रवेशांत वर्णन केल्याप्रमाणें एका बाजूनें एक तेजोगोल अस्ताला जावा, आणि दुसऱ्या बाजूनें दुसरा तेजोगोल उदयाला यावा, अशीच स्थिति हिंदुस्थानांतल्या राजकीय क्षितिजावर झाली. याचे आधींच दक्षिण आफ्रिकेंत गांधींनीं निःशस्त्र प्रतिकाराचे प्रयोग केलेले होते, व १९१५ सालीं हिंदुस्थानांत येऊन चंपारण्यांत त्यांनीं सत्याग्रहाला सुरुवात केलेली होती. पण तो सत्याग्रह वैयक्तिक जबाबदारीवर उभारलेला होता. अजून त्यांचा कार्यक्रम देशापुढें किंवा राष्ट्रीय सभेपुढें येऊन मान्य झालेला नव्हता. त्यांचा कार्यक्रम ते कलकत्त्याच्या स्पेशल कॉंग्रेसमध्यें पुढें मांडणार होते. त्याची रूपरेषा किंवा योजना त्यांनीं १ ऑगस्टलाच प्रसिद्ध केली.

इकडे टिळकांच्या आजारामुळें स्थगित केलेला 'स्वराज्या'चा पहिला अंक पुण्यांत ता. १२ ऑगस्ट गुरुवार रोजीं प्रसिद्ध झाला. अर्थातच पहिल्याच अंकांत लो. टिळकांवरचा मृत्युलेख लिहिण्याचें त्यांच्या नशीबीं आलें होतें. सदरच्या तीन कॉलमी मृत्युलेखांत आपल्या नेहमींच्या

तत्त्वशोधक व व्यापक दृष्टीला अनुसरून शिवरामपंतांनीं टिळकांच्या चरित्रांतील तपशील न देतां त्यांच्या सबंध आयुष्यांतलें सार आणि कामगिरींतलें मर्म काढूनच वाचकांपुढें मांडलें आहे. "लो. टिळक हे हा इहलोक सोडून परलोकीं गेले, त्यामुळें परलोकाचा काय फायदा झालेला असेल तो असो; परंतु येथील लोकांचें मात्र त्यायोगानें अतिशय नुकसान झालें आहे." अशी सुरुवात करून त्यांनीं मधून मधून पुढील वाक्यें लिहिलीं आहेत.

"लो. टिळकांचीं जीं मतें आहेत, तीं आपल्याला पाहिजे आहेत तशींच आहेत, असें लोकांना वाटे, म्हणूनच लो. टिळक हे लोकांना प्रिय होते."..."आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति या उपनिषदांतील वचनामध्यें जें रहस्य सांगितलें आहे, तेंच लो. टिळक यांच्या लोकप्रियतेमधील रहस्य होय."..."भीमाची जमिनीला पाठ लागली, म्हणजे उलट त्याला जास्तच बळ येत असे, अशी जी एक पौराणिक आख्यायिका आहे, त्याचप्रमाणें लो. टिळकांची एका कामांत निराशा झाली, तर दुसऱ्या कामांत ते जास्तच चिकाटीनें उद्योग करण्याला तयार होत." "अधिकारी वर्गाच्या किल्लयाचा तट हा अजिंक्य व दुर्भेद्य आहे, अशी लोकांची पिढीजाद समजूत होती. पण ती राजकारणांतील धर्मभोळेपणाची ( Political Superstition ) समजूत लो. टिळक यांनीं सपशेल काढून टाकली."..."अधिकाऱ्यांच्या तैनातींतील या पगारी व बिनपगारी बारगिरांची किंमत लोकांना कळवून दिल्यानंतर लो. टिळक यांनीं लोकमताचें बिनपगारी, निःस्पृह आणि स्वदेशाभिमानी असें लोकपक्षीय सैन्य जमवून त्या लोकमताचीं पलटणें त्यांनीं तयार केलीं. या लोकमताच्या सैन्याच्या पलटणींच्या छावण्या त्यांनीं प्रथमतः जेथें जेथें मराठी भाषा बोलली जाते आणि वाचली जाते अशा महाराष्ट्रांतील अनेक ठिकाणीं स्थापन केल्या. व अशा रीतीनें लोकमत बनत गेल्यावर स्वदेशाभिमानाच्या मोहिमा करण्याला महाराष्ट्राला—इतकेंच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानाला— लो. टिळक यांच्यासारखा धाडसी, बुद्धिमान् आणि यशस्वी नेपोलियन मिळाला होता, हें आपल्या देशाचें इतके दिवस मोठें भाग्य होतें."

असो. "स्वराज्या"च्या या पहिल्याच अंकांतला अग्रलेख स्वराज्य या विषयावर आहे. 'काळ' आणि 'स्वराज्य' यांत बारा वर्षांचें अंतर पडलेलें होतें. त्या काळांत सरकारशीं मुळापासूनच सगळें भांडण होतें. त्यामानानें आतां परिस्थितींत पुष्कळच फरक पडलेला होता. म्हणूनच या अग्रलेखांत मॉंटेग्यू साहेबांनीं २० ऑगस्ट १९१७ रोजीं पार्लमेंटमध्यें ( Self Government ) बद्दल दिलेल्या जाहीर अभिवचनाचा उल्लेख केला होता. पण त्याबरोबरच, 'आपण स्वराज्य मिळवूंच मिळवूं, असें जें हिंदुस्थानांतील सर्व लोकांना आज वाटत आहे, तें दुसऱ्यांनीं आपल्याला तशा प्रकारचीं वचनें दिलीं आहेत त्याच्या बळावर वाटत नाहीं, तर तें त्यांना आपल्या स्वतःच्या बुद्धीच्या, एकीच्या आणि कार्यक्षमतेच्या बळावर वाटत आहे', असें लिहिलें होतें. व शेवटीं, 'तें जबाबदारीचें स्वराज्य आपल्या हिंदुस्थान देशाला मिळण्याचा दिवस लवकर येवो, अशी परतंत्र राष्ट्रांना स्वराज्यें देण्याच्या कामांत अलीकडे गुंतून गेलेल्या परमेश्वरापाशीं नम्र प्रार्थना' करून हा पहिला अग्रलेख पुरा करण्यांत आला आहे. पहिल्याच अंकापासून गांधींच्या असहकारितेच्या तत्त्वाला अनुकूल असे लेख येऊं लागले. अजून कलकत्त्याची कॉंग्रेस भरावयाची होती. त्याचेपूर्वीच शिवरामपंत या असहकारितेच्या चळवळीकडे आशेनें पाहूं लागले होते. या आगामी चळवळींत त्यांना काय दिसत होतें, किंवा काय व्हावयाला हवें होतें, याचें त्यांनीं आपल्या मनाशीं जें चित्र रंगविलें होतें त्याचें प्रतिबिंब ता. १९ ऑगस्ट १९२० च्या 'स्वराज्यां'-तल्या लेखांत स्वच्छ उमटलेलें आहे. शिवरामपंतांच्या या चळवळी-बाबतचा खरा दृष्टिकोन समजण्यासाठीं त्यांतील उतारा देणें अत्यंत आवश्यक आहे.

"सगळयांनीं पदव्या टाकल्या, सगळयांनीं वकिली सोडली, सगळीं मुलें शाळेंतून निघालीं, सगळ्या पोलिसांनीं गुप्त बातम्या सांगण्याचीं आपलीं कामें सोडून दिलीं, आणि सगळ्या मुलकी व लष्करी इंडियन लोकांनीं आपल्या नोकऱ्यांचे राजीनामे दिले, तर मग ती हिंदुस्थानांत क्रांतीच झाली, असें म्हटलें पाहिजे. अशी क्रांति कोणाला व्हावयाला मुळीं नकोच आहे. आणि इतकी आणि एवढी मोठी क्रांति होईपर्यंत अधिकारी लोक हात जोडून

स्वस्थ बसतील, हें शक्य नाहीं. लढाईत प्रत्येक मनुष्य मरेल, तेंव्हांच लढाई संपावयाची, असा कांहीं शाहण्या सेनापतींचा नियमच असतो असें नाहीं. आपल्या विरुद्ध पक्षाचा जोर जास्त आहे, असें निकरानें प्रयत्न केल्यानंतरही दिसूं लागलें, तर वस्तुस्थितीचा कल पाहून सगळेच सेनापति आणि मुत्सद्दी आपलें धोरण बदलीत असतात. बंगालच्या फाळणीचे वेळीं प्रतिपक्षाचा जोर पाहिल्यानंतर हिंदुस्थानांतील इंग्रजी मुत्सद्यांनीं ज्याप्रमाणें एकदम बंगालची फाळणी रद्द केली, त्याप्रमाणें असहकारितेच्या पक्षाकडे जास्त लोक आहेत, आणि आपल्याशीं सहकारिता करणाऱ्या समंजस लोकांची संख्या उत्तरोत्तर कमी होत चालली आहे, असें पाहिल्याबरोबर धूर्त इंग्रज अधिकारी तेंव्हांच आपलें धोरण बदलतील. कारण, ते शहाणे आणि दूरदर्शी आहेत. व जबरदस्त लोकमताला मान देण्याला ते कधींही मागें सरत नाहींत, हा त्यांच्यांतील सद्गुण आहे. हा त्यांचा गुण महात्मा गांधींना माहीत असल्यामुळें हिंदुस्थानांतील सगळे लोक असहकारितेच्या चळवळीस आजच त्यांना अनुकूल व्हावयाला पाहिजे आहेत असें नाहीं. सगळे लोक अनुकूल झाले, तरी हिंदुस्थानचा फायदा आहेच. परंतु, या दोहोंपैकीं कांहीं लोक अनुकूल होऊन त्यांच्या वजनानें अधिकारीवर्गानें आपली दिशा बदलावी, हेंच इष्ट कार्य आज आम्हांला पाहिजे आहे. कारण, आम्ही हिंदुस्थानांतील लोक स्वतःचें आणि स्वतःच्या स्वराज्याचें संरक्षण करण्याला लायक होईपर्यंत आम्हांला इंग्रजी अधिकारी आणि त्यांचें संरक्षण पाहिजे आहे. म्हणून सगळे लोक अद्यापि असहकारितेला अनुकूल झालेले नाहींत, हा महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळींतील दोष नसून ती निदान आम्हांला तरी इष्टापत्तिच वाटत आहे.सगळेच लोक असहकारितेला अनुकूल झाले असतां, कोणता परिणाम घडून आलेला मेलच्या बातमीदाराला पाहावयाला पाहिजे आहे, हें त्याचें त्यासच माहीत! ”

कलकत्याला स्पेशल कॉंग्रेसपुढें असहकारितेचा ठराव आला. वादविवाद कडाक्याचा झाला. बॅ. सी. आर. दास व बॅप्टिस्टा यांनींच काय तो उघड आणि खणखणीत विरोध केला. परंतु कौन्सिल-बहिष्काराखेरीज बाकीच्या बाबी दासबाबूंनाही मान्य होत्या. शेवटीं ठराव बहुमतानें पास झाल्यावर मात्र त्यांतील धोरणाचा पाठपुरावा करण्याचें सबंध राष्ट्रानें

ठरविलें. टिळकांचा राष्ट्रीय पक्षही यांत सामील झाला. एक खापर्ड्यों-खेरीज सर्वांनीं कौन्सिलांतील आपापल्या उमेदवाऱ्या परत घेतल्या. सबंध देशभर जनतेच्या उत्साहाला भरती आली. वातावरणांत जिकडे तिकडे क्रान्ति घडून आल्यासारखी दिसूं लागली. हा इतिहास अगदीं ताजा अलीकडील असल्यामुळें विस्तारानें सांगावयास नको. रंगभूमीवर जसा एकदम 'ट्रॅन्स्फर सीन' व्हावा, त्याप्रमाणें या नव्या चळवळीची कळ दाबल्यासारखें होऊन सगळीकडे सरकारविरोधी व युयुत्सु वृत्तीचें जें दृश्य व चमत्कार दृष्टीस पडूं लागला, तो कोणाही उत्कट देशप्रेमी मनुष्याला चकित व आनंदित करण्याजोगा होता, यांत शंका नाहीं. खादीचा पोषाख ही या क्रांतीची खूणच समजली जाऊं लागली. हजारों-लाखों लोकांनीं विलायती कपडे टाकून देऊन खादी घातली. ह्या वेळपर्यंत सुशिक्षितांतच घोटाळणारी चळवळ-जागृति-अशिक्षितांपर्यंत, खेड्यापाड्या-पर्यंत जाऊन भिडली, त्यावेळीं भरणाऱ्या ज़ंगी सभा श्वेतसमुद्राप्रमाणें वाटत. परिस्थितीही तशीच अनुकूल होती. पंजाबांतील अत्याचार लोकांच्या पोटांत डांचत होते. लॉइड जॉर्जच्या वचनभंगानें मुसलमानसमाजही प्रक्षुब्ध झालेला होता. या योग्य वेळीं जादुगार गांधींनीं आपल्या व्यक्ति-मत्त्वानें व असहकारितेच्या क्रांतिकारक व आकर्षक कार्यक्रमानें अवाढव्य जनताजनार्दन हलवून जागा केला. मूठभर पुढाऱ्यांच्या स्वार्थत्यागा-बरोबरच अखिल जनतेचाही त्याग त्यांचे मागें उभा असावयास पाहिजे, ही गोष्ट लोक याच चळवळींत शिकले. या नवीन चळवळीनें भारतांत असहकारितेच्या नव्या पर्वाला आरंभ झाला.

याच ठिकाणीं आचार्य भागवतांच्या लेखांतील दोन परिच्छेदक उद्धृत करणें योग्य होईल.

"टिळकांची पुण्यातिथि ही असहकारितेची जयंती ठरली! शिवराम-पंतांनीं उत्साहानें असहकारितेचा स्वीकार केला. त्यानिमित्त त्यांचीं भाषणें मुंबईस ऐकावयास मिळालीं. त्यावेळीं शाळांमधून पदकें वांटलीं जात होतीं. त्या पदकावर एक जखमी झालेला हिंदी आणि त्याच्या जोडीला एक युरोपीय अशा दोन शिपायांचीं चित्रें काढलेलीं होतीं. या पदकांचा उल्लेख करून "हिंदी शिपायाचा हात मोडून तो त्याच्याच गळ्यांत अडकवून

देण्याचें परोपकाराचें कृत्य युरोपकर नेटानें करीत आहेत ! ” अशा प्रकारची उपरोधपूर्ण टीका शिवरामपंतांनीं आपल्या भाषणांत केली. चर्निरोड स्टेशनावर एका पारशी गृहस्थानें “ असहकारितेची चळवळ चालली आहे तिच्याबद्दल आपणांस काय वाटतें ?” असें विचारिलें असतां, त्यांनीं अगदीं निश्चयी सुरानें ‘ It must go on ’ असें उत्तर दिलेलें मला ऐकावयास मिळालें.”

“ १९२१ च्या उन्हाळ्यांत महाड येथें जिल्हापरिषदेचें अधिवेशन झालें, त्यावेळीं त्यांचीं एकदोन व्याख्यानें तेथें झालीं. त्यांतील एका व्याख्यानांत ‘ हिंदुस्थान आणि रशिया यांचा कांहीं दैवी संबंध दिसतो’, असें मत त्यांनीं व्यक्त केलें. झारच्या जुलमी अधिकाऱ्यांचा खून करणारे अनार्किस्ट क्रांतिकारक व हिंदुस्थानांतील अत्याचारी युवक; अहिंसा व शरीरश्रम यांचा उपदेश करणारा काउंट टॉलस्टॉय आणि सत्याग्रह व खादी यांचा संदेश सांगणारे महात्मा गांधी; या दोनही पिढ्यांतील लोकांच्या राजकारणाप्रमाणें आजची रशियांतील कम्यूनिस्ट समाजपद्धति आणि हिंदुस्थानांतील तरुण समाजसत्तावादी पक्ष यांच्यांतही दिसून येणारें साम्य पाहिलें म्हणजे शिवरामपंतांनीं प्रतिपादिलेलें मत पटण्यासारखें आहे. ”

या चळवळींत शिवरामपंतांना क्रांतीचीं अस्पष्ट बीजें दिसलीं म्हणूनच ते तींत सामील झाले. आणि शिवरामपंतांचें आतांपर्यंत पूर्व-चरित्र व त्यांचीं मतें लक्षांत घेणाऱ्या कोणाही निःपक्षपाती मनुष्याला त्यांत कांहीं नवलही वाटणार नाहीं. कलकत्ता कॉंग्रेसनंतर ता. १९ सप्टेंबरला राष्ट्रीय पक्षाची म्हणजे टिळकांच्या अनुयायांची सरदारगृहांत सभा भरली. ‘त्यांत ज्या बाबीनें ‘ रेव्होल्यूशन ’ जवळ येईल, ती बाब आधीं हातीं घ्यावी ’ असेंच त्यांनीं आपलें मत म्हणून सांगितलें होतें. ( Passive Resistance ) चा मार्ग अवलंबून राज्ययंत्राची अडवणूक करून राजसत्तेला जेरीस आणून अगतिक करून सोडावयाची, याबाबत ते ‘ काळ ’ पत्रांतून प्रतिपादन करीत असत, त्यांतला एक महत्त्वाचा उतारा मागें सातव्या प्रकरणांत दिलेलाच आहे. या असहकारितेंत तें त्यांचें स्वप्न सत्यसृष्टींत अवतरल्यासारखेंच त्यांना दिसूं लागलें. आणि म्हणूनच त्यांनीं असहकारिता जोरानें उचलून धरली.

त्यांतील तत्त्व व बहुतेक कलमें त्यांच्या मताशीं जुळणारीं होतीं. किंबहुना बंगाल–फाळणीच्या वेळच्या स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीची ही बहुतांशीं सुधारून वाढविलेली आवृत्तीच होती. राष्ट्रीय शिक्षणाचें शिवरामपंतांचें तत्त्व जुनेंच होतें. खादी ही तर स्वदेशीची पुढची पायरी. याखेरीज पदव्यांचा त्याग, शाळा–कोर्टांवर बहिष्कार, सरकारी नोकऱ्यांचा त्याग इत्यादि नवीन बाबती त्यांना पहिल्यापासून अभिप्रेत आणि हव्याशा अशाच होत्या. कौन्सिल-प्रवेशावर त्यांचा भर पूर्वीही नव्हता. येऊन जाऊन या चळवळीचें अनत्याचारित्व किंवा अहिंसा, हिंसावादी शिवरामपंतांनीं कशी पत्करली, याचा कित्येकांना अचंबा वाटतो. परंतु प्राप्त परिस्थितींत अहिंसेचें धोरण हें सोइस्कर, बुरखा किंवा पांघरूण म्हणून घेणें योग्य व इष्ट आहे, असें त्यांचें मत असे. खाजगी चर्चेंतून ते हेंच सांगत, व 'स्वराज्यांतील' लेखांतही त्यांनीं तें ठिकठिकाणीं सूचित केलेलें आहे. अर्थात्, अहिंसातत्त्वाची इतकी चिकित्सा किंवा त्याचे आतांइतके नाजूक पापुद्रे त्या काळांत निघाले नव्हते, हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. शिवाय, अत्याचारयुक्त म्हणा, किंवा विरहित म्हणा, पण असहकारितेशिवाय दुसरा कोणताच लढाऊ सामुदायिक कार्यक्रम देशापुढें त्यावेळीं नव्हता. कौन्सिलांत शिरून सरकारशीं झुंज खेळणें म्हणजे कांहीं थोड्या लोकांचेंच काम होतें. त्यानें सामुदायिक उठावणी (Mass Movement) होत नव्हती. उलट पंजाबप्रकरणानें चिडलेली जनता व खिलाफत प्रकरणानें दुखावलेले मुसलमान या दोहोंचाही उपयोग कुशलतेनें करून घेणें हेंच या परिस्थितींत इष्ट व मुत्सद्दोगिरीचें होतें. त्याचा उपयोग करून, सुधारणा धिक्कारून व शक्य त्या ठिकाणीं असहकार करून सरकारवर दाब दडपण आणण्यानेंच आणखी हक्क मिळाल्यास पहावें, हाच डाव अधिक चांगला होता.

असहकारपूर्व राजकारण तितकेंसें त्यांच्या मनाजोगतें नव्हतें, हें मागें सांगितलेलेंच आहे. म्हणूनच यावेळीं देशांत गांधींनीं पुकारलेली व पुरस्कारिलेली असहकारिता ही शिवरामपंतांना धुमसतां धुमसतां त्यांतून चट्कन निघालेल्या ज्वाळेसारखी भासली. आणि याचमुळें यापूर्वी त्यांच्या मनःक्षितिजावर जी तात्कालिक निराशा, निवृत्ति–सदृशता आणि निष्क्रियता

छावली होती त्याची निष्प्रभ चंद्रकोर या सुमारास एकीकडे मावळत होती; व आशेचा, प्रवृत्तिपरतेचा आणि सक्रियतेचा सूर्य दुसऱ्या बाजूनें वर येत होता.

याप्रमाणें देशांत असहकारितेची आणि जनतेंत उत्साहाची लाट उठलेली पाहतांच शिवरामपंत मनापासून त्यांत सामील झाले. एवढेंच नव्हे, तर पूर्वीच्या काळाप्रमाणें त्यांच्या अंगांत स्फुरण चढल्यासारखें झालें, व मध्यंतरीच्या काळांतल्या निष्क्रियतेनंतर या नवीन सरकारविरोधी विधायक व विध्वंसक अशा दुहेरी कार्यक्रमानें त्यांना पुन्हा हुरूप चढला. या सुमारास नवीन निघालेल्या टिळकमहाविद्यालयांत पुन्हां निर्वेतन प्रोफेसरी त्यांनीं पत्करली. धाकटे चिरंजीव विनायकराव न्यू पूना कॉलेजांत शिकत होते, त्यांना काढून मुंबईस नॅशनल मेडिकल कॉलेजमध्यें शिकावयास ठेविलें. टिळक-स्वराज्य-फंडाला स्वतः ५०० रु. दिले. व याखेरीज, पुण्याच्या व्यापारीवर्गांत त्यांचें चांगलें वजन होतें, त्याचा उपयोग करून व ठिकठिकाणीं हिंडून त्यांनीं फंडाला पुष्कळ वर्गणी गोळा करून दिली. एवढेंच नव्हे, तर स्वतःच्या डौलदार पोषाखाचाही त्यांनीं त्याग केला. यावेळीं त्यांनीं तलम अंगरखा व जरतारी पागोटें जें एकदां काढून ठेविलें तें कायमचेंच. यानंतर अखेरपर्यंत त्यांचा शुभ्र खादीचा साधा व जाडाभरडा पोषाखच कायम राहिला.

असहकारितेंत प्रत्येक सरकारी संस्थेला संस्था, व खात्याला खातें उभें करण्याची जी योजना होती, त्याची शिवरामपंतांच्या मनावर जबरदस्त मोहिनी पडलेली होती. कारण नेमकें तेंच त्यांना मनांतून अभिप्रेत होतें. ता. ९ सप्टेंबर १९२० च्या 'स्वराज्यां'त ते लिहितात—

"लष्करी खात्यांत ज्यांना नोकऱ्या आहेत, त्यांनीं त्या आपल्या नोकऱ्या सोडाव्या असें महात्मा गांधी यांचें म्हणणें आहे. पण एकदां धरलेली नोकरी सोडणें सामान्य मनुष्याला अवघड जातें. त्याच्यापेक्षां गुजराथ राजकीय सभेचें सांगणें जास्त सोपें व जास्त फायदेशीर आहे. सभेचें म्हणणें असें आहे कीं, मेसापोटेमिआ वगैरे ठिकाणीं कोठेंही शिपाई, कारकून किंवा मजूर यांच्या नवीन जागा आल्या, तरी त्या

जागा आपल्या देशांतील कोणींही लोकांनीं पत्करूं नयेत. त्याचप्रमाणें वकिलांनीं आपली वकिली सोडून द्यावी, असें महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळींतील एक कलम आहे. परंतु, त्याच्यापेक्षां गुजराथ सभेची कल्पना जास्त सयुक्तिक आहे. सदर सभा असें म्हणते कीं, आपल्या लोकांनीं आपलीं स्वतःचीं लवाद कोर्टें स्थापन करावीं, आणि त्यांत पक्षकारांनीं आपल्या फिर्यादी आणाव्या, आणि सर्व वकिलांनीं सरकारी कोर्टांतील आपली वकिली सोडून देऊन या लवादकोर्टांतील कामें करावयाला लागावें. त्याचप्रमाणें, शाळा, कॉलेजें आणि युनिव्हर्सिट्या ह्यादेखील लोकांनीं आपल्या स्वतःकरितां नवीन निर्माण कराव्या, आणि त्यांतून आपल्या मुलांना शिक्षण द्यावें; ही गुजराथ सभेची सूचना सरकारी शाळांतून मुलें पाठवूं नयेत ह्या सूचनेपेक्षां खरोखर जास्त ग्राह्य आणि मनाला पटण्यासारखी आहे. कांहीं गुन्हा झाला, किंवा कोठें कांहीं चोरी झाली, अगर दरोडा पडला, तर पोलिसाकडे धाव घेण्याची आपल्या लोकांना एक मोठी वाईट संवय लागलेली आहे. गुजराथ सभा म्हणते कीं, ही संवय आपण मोडून टाकिली पाहिजे; आणि त्या पोलिसांच्या जागीं प्रत्येक खेडेगांवांतून आणि शहरांतून लोकांनीं आपले व्हॉलंटियर्स आणि बॉयस्काऊट्स तयार केले पाहिजेत. आणि त्यांच्याकडून आपण आपल्या संरक्षणाचीं कामें भागवून घेण्याला शिकलें पाहिजे. लोक आपल्या स्वतंत्र आणि नवीन निर्माण केलेल्या साधनांनीं आपलीं सर्व राजकीय कार्यें उरकून घेऊं लागले, म्हणजे हीं सगळीं सरकारी खातीं आपोआपच अर्धांग वायु झालेल्या अवयवांप्रमाणें लुळीं आणि निर्जीव होऊन वाळून आणि गळून जातील. आणि हेंच स्वराज्य होय! दुसऱ्याच्या अपेक्षेशिवाय आपलीं कामें आपण स्वतःच करूं लागलों, म्हणजे याच्यापेक्षां स्वराज्य हें कांहीं निराळें आहे, असें नाहीं."

त्याचप्रमाणें आणखी एक उतारा मोठा असला, तरी त्यांचें मनोगत व्यक्त करण्याला अत्यंत उपयुक्त आहे. ता. ९ डिसेंबर १९२० च्या 'स्वराज्यांत' शिवरामपंत लिहितात---

"नॉन को-ऑपरेशनची चळवळ ही कांहीं अंशीं बोलूनचालूनच विघातक आहे, आणि तिच्यापासून कांहीं बारीकसारिक तोटे होत असतील, हें त्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांनादेखील समजत नाहीं असें नाहीं. परंतु, त्या चळवळीपासून देशाचें जें कल्याण होणार आहे, तें निःसंशय अकल्याणापेक्षां पुष्कळ पटीनें जास्त होणार आहे, हें त्या पुरस्कर्त्यांना स्पष्टपणें दिसत आहे. इजिप्तचें उदाहरण आपल्याला जर कांहीं शिकवीत असेल, तर तें हीच गोष्ट शिकवीत आहे. आपल्या इकडे हिंदुस्थानांत मॉंटेग्यू साहेब आले होते, त्याचप्रमाणें इजिप्तमध्यें १९१९ सालांत मिलनर साहेबांचें एक मिशन पाठविण्याचें ठरलें. परंतु, असलीं कितीही मिशनें आलीं, तरी त्यांच्यापासून देशाचा खरा फायदा कधींही व्हावयाचा नाहीं, ही गोष्ट लक्षांत आणून इजिप्शियन लोकांनीं त्या मिशनवर बहिष्कार घालण्याचें ठरविलें. हें जें मिशन इजिप्तमध्यें यावयाचें होतें, त्याच्याबद्दल आपली नापसंती व्यक्त करण्याकरितां सगळ्या वकील लोकांनीं एक आठवडाभर आपलीं कोर्टांतील कामें बंद ठेविलीं. पुढें इजिप्तमधील सर्व खात्यांतील सार्वजनिक कचेऱ्यांनीं सार्वत्रिक हरताळ पाडून आपलीं ऑफिसेस तीन आठवडेपर्यंत बंद ठेवलीं होतीं. कामकरी लोक आणि मजूर लोक यांच्यामध्येंही हें असहकारितेचें तत्त्व पसरत चाललें, आणि त्यांनींही जिकडे तिकडे संप सुरू केले. त्याचप्रमाणें, शाळेंतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनींही कांहीं दिवसपर्यंत शाळेंत जाण्याचें बंद केलें. अशा स्थितींत लॉर्ड मिलनरच्या मिशनचे लोक तीन महिनेपर्यंत इजिप्तमध्यें हात हालवीत रिकामे बसले. पण, त्यांना जी माहिती पाहिजे होती, ती त्यांना देण्याकरितां त्यांच्याकडे एकही प्रतिष्ठित इजिप्शियन मनुष्य गेला नाहीं. आणि अशा कारणामुळें तें मिशन जसें आलें तसें इंग्लंडला परत गेलें. मिशनचे लोक एका खाणावळींत उतरलेले होते, व इजिप्शियन लोकांनीं आपल्या कमिशनपुढें पुरावा देण्याकरितां यावें म्हणून ते निरनिराळ्या लोकांना दररोज बोलावणींही पाठवीत होते. परंतु साक्षी देण्याकरितां कोणीही इजिप्शियन लोक आले नाहींत. हल्लीं आपण जसें पूर्ण जबाबदारीचें स्वराज्य मागत आहोंत, त्याचप्रमाणें इजिप्शियन लोकांनीं त्या मिशनमधील लोकांना निक्षून सांगितलें कीं, तुम्ही आम्हांला जर पूर्ण स्वातंत्र्य देण्याचें कबूल करीत असाल, तर आम्ही तुमच्याशीं बोलणीं करण्याला येऊं, नाहीं-

तर आम्हांला तुमच्याशीं कांहींएक कर्तव्य नाहीं. अशा रीतीनें इजिप्तमध्यें बहिष्काराची जी चळवळ चालली होती, त्या चळवळींत तेथील विद्यार्थ्यांनींही फार खटपटी केल्या. इजिप्शियन विद्यार्थी नेहमीं रस्त्यांतून भिरवणुकी काढीत असत, लोकांकडून संप करवीत असत, दुकानदारांना दुकानें बंद करण्याविषयीं आग्रह करीत असत; आणि ज्या हॉटेलमध्यें त्या मिशनचे लोक उतरले होते. त्या हॉटेलच्या सभोंवतीं वेढा घालून पहारा करीत बसत असत. आणि मिशनमधील लोक बाहेरच्या कोणा लोकांमध्यें मिसळण्याकरितां किंवा त्यांच्या गुप्त मुलाखती घेण्याकारितां म्हणून निघाले, तर त्यांच्या मोटारीच्यापुढें विद्यार्थ्यांच्या मोटारी हजर रहात असत! विद्यार्थ्यांच्याप्रमाणेंच इजिप्तमधील बायकाही ह्या बहिष्काराच्या कार्याला पुष्कळ मदत करीत असत. उच्च दर्जाच्या बायका बुरखा घेऊन आणि हलक्या दर्जाच्या बायका आपले बुरखे काढून मिरवणुकींत रस्त्यांतून चालत असत. प्रत्येक दंगेखोरपणाच्या चळवळीमध्यें बायका पुढें असावयाच्या हें ठरलेलेंच असे! त्यांच्या मिरवणुकी निघाल्या म्हणजे त्या निशाणें घेऊन चालत असत, आणि आम्हांला पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे, अशा प्रकारच्या गर्जना करीत असत! आपल्या राष्ट्राच्या पुढाऱ्यांच्या घरीं मोठमोठे जमाव जमवून त्या जात असत आणि झगलूल पाच्छासारखे पुढारी लोक त्यांना तेथें व्याख्यानें देत असत. एकाद्या रस्त्यावरील दंग्यांत कोणी इसम मरण पावला, तर त्याच्या प्रेतयात्रेला त्यांची अतिशय गर्दी जमत असे. आणि कोठें रस्त्यांत तात्पुरते मेढेकोट वगैरे बांधावयाचे असले, तर तीं कामें सुद्धां इजिप्शियन बायका करीत असत! जेव्हां सरकारी नोकरांनीं संप केला होता, त्यावेळीं लपून छपून कोणी कदाचित् कचेऱ्यांतून जातील, म्हणून त्या कचेऱ्यांच्या बाहेर बायकांनीं आपले पहारे बसविले होते! आणि कित्येक प्रसंगीं रेल्वेचे रूळ उपटणें, आणि तारायंत्राच्या तारा तोडणें, असल्या कामांत देखील त्या पुरुषांना मदत करीत असत! अशा प्रकारच्या इजिप्शियन बायकांच्या बहिष्काराच्या चळवळीच्या कित्येक गोष्टी सर व्हॅलंटाईन चिरोल यांनीं लिहिलेल्या आहेत. या सगळ्याचा परिणाम असा झाला, कीं लॉर्ड मिल्नरचें मिशन इजिप्तमध्यें कांहींएक काम न करतां परत विलायतेला गेलें! व झगलूल पाच्छाला आपलें मिशन घेऊन विलायतेस येण्याविषयीं विनंती

करणें त्यांना भाग पडलें. परंतु, आम्हांला पूर्ण स्वातंत्र्य देण्याची अट तुम्ही कबूल करीत असाल, तर आम्ही येतों असें झगलूलपाच्छानें सांगितलें; व त्या अटीवर लंडनमध्यें जाऊन इजिप्शियन लोकांनीं आपल्या देशाकरितां पूर्ण स्वातंत्र्य मिळविलेंही. आणि हा सगळा परिणाम इजिप्तमधील बहिष्काराच्या चळवळीचाच होय."

असहकारितेची गाडी अखेर त्यांना कोणत्या रुळावर जावयाला हवी होती, हें वरील उताऱ्यांत उत्तम दिसून येतें. त्यावर अधिक लिहिणें नको. त्यांतील सर्व गोष्टी लक्षांत आणूनच शिवरामपंतांनीं गांधी यांचेवर 'एक कल्पक एंजिनियर' असा एक अग्रलेख लिहिलेला आहे. कौन्सिल-बहिष्काराबाबतचें त्यांचें मत वरील विचारसरणी लक्षांत घेऊनच ठरविलेलें होतें: "नॉन कोऑपरेशन करावयाचें आणि कौन्सिलावर बहिष्कार घालावयाचा; यांत कांहीं मोक्ष आहे म्हणून त्या गोष्टी करावयाच्या, असें नसून त्यापासून कांहींतरी इष्ट हेतु म्हणजे अर्थात् स्वराज्यप्राप्ति—साध्य करून घेण्यासाठीं त्या गोष्टी करावयाच्या आहेत. गिरण्यांतील कामगार ज्याप्रमाणें आपल्या संपानें कांहीं वेळपर्यंत आपले कारखाने बंद पाडून आपल्या जरूरीच्या मागण्या प्राप्त करून घेतात, त्याप्रमाणें अधिकाऱ्यांचे हे कौन्सिलचे कारखाने कांहीं वेळपर्यंत चालूं न देतां, त्यांच्याकडून आपल्या स्वराज्याचे हक्क संपादन करून घेणें, हाच आपला ह्या कौन्सिलावरील बहिष्काराच्या संपामध्यें मुख्य हेतु आहे; आणि तो कसा साध्य होईल हा मुख्य विचाराचा प्रश्न आहे."

परंतु राष्ट्रीय पक्षांतील लोकांनीं कौन्सिलमध्यें जाण्याचें थांबविलें, तरी त्याचा उलट फायदा घेऊन नेमस्त पक्षांतील व इतर लोक कौन्सिलांतून आशाळभूतपणानें शिरतील व त्यामुळें कौन्सिलें ओस पडून कौन्सिलावरील बहिष्कार जितका प्रभावी व परिणामकारक व्हावा तितका होणार नाहीं अशी एक मोठी अडचण होती. त्यावर त्यांनीं सामाजिक बहिष्काराचा उपाय सुचविला होता. ते लिहितात—"राजकीय बहिष्कार आणि सामाजिक बहिष्कार हे हातांत हात घालून जोडीनें काम करूं लागतील, तर राजकीय बहिष्काराला पुष्कळ पाठबळ आणि यश मिळण्याचा संभव आहे. सामाजिक बहिष्काराची मदत घेण्यापूर्वीं लोकांमध्यें या राजकीय



अण्णासाहेब

मुळशी-सत्याग्रहाला निघण्यापूर्वी—



डॉ. फाटक, सी. के. दामले, अण्णासाहेब परांजपे, वासुकाका जोशी, हरिभाऊ फाटक,
मागें उभे—बाळूकाका कानिटकर

बहिष्काराच्या तत्त्वाच्या महत्त्वाचें ज्ञान जास्त प्रसृत करण्यांत आलें, तर त्याच्यापासून पुष्कळ फायदा होणार आहे."

त्याचप्रमाणें राष्ट्रीय शिक्षणाची कल्पनाही शिवरामपंतांनीं उचलून धरली होती, व नवीन राष्ट्रीय शाळा अपुऱ्या पडत असल्या, तरी तात्पुरत्या 'शाळांवरील बहिष्कारानें विद्यादेवीचें सिंहासन डळमळत नाहीं' असा अग्रलेख त्यांनीं 'स्वराज्यां'त लिहिला होता.

*"शिवरामपंत व अनत्याचारी असहकारिता यांचें कसें जमलें, ह्याचें पुष्कळांना आश्चर्य वाटतें. पण त्यांत नवल वाटण्यासारखें कांहीं नाहीं. जेथें तेज दिसेल, जेथें जिवंतपणा दिसेल, जेथें देशभक्तीचें खरें नाणें आढळून येईल, तेथें शिवरामपंत पुढें सरसावत. महात्मा गांधींच्या असहकारितेंत जिवंतपणा होता, राष्ट्रभक्तीचा ज्वालामुखी पेटलेला त्यांना दिसला, प्रामाणिकपणाची आणि आत्यंतिक स्वार्थत्यागाची धगधगणारी आग त्यांच्या दृष्टीस पडली." आणि म्हणूनच **मुळशीच्या सत्याग्रहांत** ते उत्साहानें आणि धडाडीनें सामील झाले.

वास्तविक चालू बदललेल्या परिस्थितीच्या दृष्टीनें पहातां १९२२।२३ मधील मुळशी प्रकरणाचा इतिहास आतां जुना झालेला आहे. म्हणजे त्याला राजकीयदृष्ट्या कांहींच महत्त्व उरलेलें नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. तथापि शिवरामपंतांचा दृष्टिकोन, लढाऊ वृत्ति आणि स्वार्थत्याग हे त्यांचे गुणविशेष त्यांत प्रामुख्यानें व ठळकपणें दिसत असल्यामुळें त्याची संक्षिप्त हकीगत येथें दाखल करणें आवश्यक आहे.

## मुळशीचा लढा

सन १९२० च्या अखेरीपासून पुणें जिल्ह्यांतील मुळशी-पेठ्यांत टाटा कंपनीनें वीज उत्पन्न करण्याकरितां नदीचें पाणी अडवून धरण बांधण्याचे कामाची पूर्व तयारी सुरू केली होती. अर्थात् टाटा कंपनीच्या पाठीशीं मुंबईसरकार होतेंच. ह्या धरणाच्या योजनेनें मुळशीपेठ्यांतील गांवेंच्या गांवें बुडणार होतीं. तेथील रयतेच्या जमिनी कायमच्या नष्ट होणार असल्यामुळें त्यांना त्याच्या मोबदल्यांत दुसऱ्या जमिनी देणें हें

* चित्रमयजगत् (ऑक्टोबर १९२९) मधील उतारा.

सरकारचें कर्तव्य होतें. परंतु तें बाजूलाच राहून जमिनींचें योग्य कॉंपेन्सेशनही मावळ्यांच्या पदरांत पडण्याचें चिन्ह दिसेना. करायच्या तेवढ्या सर्व खटपटी करून झाल्या. पण सत्तेपुढें शहाणपण चाललें नाहीं. जे लोक खुषीनें जमिनी सोडणार नाहींत, त्यांच्यापासून त्या जबरदस्तीनें हिसकून घेण्याकरितां लँड ॲक्विझिशन ॲक्ट लागू केला. त्यामुळें अखेर नाइलाजानें सत्याग्रह करण्याचा निश्चय ठरला. म० प्रां० कॉं० कमिटीनें सत्याग्रहाच्या धोरणाला अनुकूल असा ठराव केला व कॉंग्रेसनेंही आपली सहानुभूति प्रदर्शित केली.

अण्णासाहेबांनीं, या मुळशी-धरणाचे बाबतींत कंपनी व सरकार यांच्या अन्यायी धोरणाचे विरुद्ध **स्वराज्यांत** १९२१ च्या जानेवारीपासूनच लेख लिहावयास सुरुवात केली होती. आधुनिक, आधिभौतिक सुधारणा नकोत, असल्या प्रतिगामी व अशास्त्रीय मुद्द्यावर त्यांचा धरण बांधण्याला विरोध नव्हता. ता. ९ डिसेंबरच्या अंकांत त्यांनीं आपला दृष्टिकोन स्पष्ट केला होता.

"आमच्या स्वराज्यांत आम्हांला सर्व कांहीं अर्वाचीन काळच्या सुधारणा पाहिजे आहेत. फक्त त्या आमच्या अंमलाखालीं असल्या पाहिजेत. दुसऱ्यांच्या तंत्राखालीं राहणारीं आणि दुसऱ्यांची तुमडी भरणारीं अशीं आगगाड्या, तारायंत्रें, पोस्ट–ऑफिसें वगैरे खातीं पुष्कळ असून आम्हांला त्यांचा काय उपयोग! अशा प्रकारचीं तीं निरुपयोगी खातीं असल्यापेक्षां नसलेलींच जास्त चांगलीं. परंतु तीं आमचीं खातीं आमच्याच फायद्याकरितां जेव्हां चालविलीं जाऊं लागतील, तेव्हां तीं सर्व आमच्या स्वराज्याकरितां आम्हां हिंदुस्थानांतील लोकांना पाहिजेच आहेत."

परकीयांचा व कांहीं मूठभर श्रीमंत लोकांचा फायदा करून देणाऱ्या सुधारणा आपण आपल्या डोक्यावर लादून घेऊं नयेत, हें अण्णासाहेबांचें सूत्र होतें. असो, सुरुवातीला सर्व प्रमुख पुढारी व लोकमत मुळशी सत्याग्रहाला अनुकूलच होतें. त्यामुळें अखिल महाराष्ट्रांत एकोप्याचा देखावा दिसत होता. परंतु दुर्दैवानें लवकरच तात्त्विक, प्रामाणिक, सूक्ष्म मतभेदाचे पापुद्रे निघूं लागले. आणि शिवाय धरणाच्या बांधकामाशीं जेव्हां

प्रत्यक्ष प्रतिकाराला सुरवात झाली, व मावळे सत्याग्रहींच्या कृतसंकल्पापुढें काम चालू होऊन तडीस जाणें अशक्य दिसूं लागलें, त्यावेळीं फोडा व झोडा या कुटिल राजनीतीचा अवलंब करण्यांत आला. कांहीं ' सत्य-शोधक ' मंडळींना हाताशीं धरण्यांत आलें व कोल्हापूर–महाराजांच्या नांवाचा उपयोग करून सत्याग्रहींवर अनन्वित जुलूम करण्यांत येऊं लागले !

मुळशीच्या मावळ्यांच्या या कार्याला मदत करण्याकारितां ' सत्याग्रह–साहाय्यक–मंडळा ' ची स्थापना होऊन त्याचें अध्यक्षपद अण्णासाहेबांना देण्यांत आलें. मंगळवार ता. २१ मार्च १९२२ रोजीं शिवाजीमंदिरांत भरलेल्या सभेचा समारोप अण्णासाहेबांनीं पुढीलप्रमाणें केला.

> " अज्ञान, भोळेपणा, फितुरी असल्या दुर्गुणांनीं आजवर हिंदुस्थान देश कसा बुडाला याचें मुळशी पेटा हें एक मॉडेल होऊं पहात आहे. १५० वर्षांच्या अनुभवानें जर आपण अद्यापि शहाणपण शिकलों नसलों तर आपण बुडण्याच्याच लायकीचे ठरूं. पूर्वीं मराठे वीरांनीं ढाल-तलवारी घेऊन आपला झेंडा अटकेपार नेला तर आतां कित्येक मराठे (?) डफ तुणतुणें घेऊन मुळशीपेटा बुडविण्याकारितां धावून येत आहेत हें दुर्भाग्य होय. असला देशबुडवेपणा सोडून सर्वांनीं ऐक्यानें वागण्याची ही वेळ आहे. या वेळीं निकरानें व एकजुटीनें सत्याग्रह करून मुळशीपेटा वांचवा. कारण जमिनीचें उत्पन्न जसजसें पिढ्यानुपिढ्या टिकलें जातें तसे कॉंपेन्सेशनचे रुपये टिकत नाहींत. शेतकऱ्यांचे कैवारी म्हणविणाऱ्या सरकारला तरी ही गोष्ट कळली पाहिजे. त्यास ती कळली नाहीं, तर आपण आपल्या सत्याग्रहानें ती त्यास कबूल करावयाला लावली पाहिजे. "

१९२२ च्या एप्रिल महिन्यांत अण्णासाहेबांनीं खुद्द मुळशीला सत्याग्रह–मंडपांतच मुक्काम केला होता. ता. १ मेला सर्व मंडळी घेऊन स्वतः सत्याग्रहाला जाण्याचें त्यांनीं निश्चित केलें. आदले दिवशीं पुण्यास सारी निरवानिरव करून मुळशीला जाण्यासाठीं अण्णासाहेब निघाले. त्या दिवशीं लग्नाचा मुहूर्त असून त्यांच्या वाड्यांतच एका बिऱ्हाडकरूकडे

मंगलकार्य होतें. त्यामुळें बाहेरच्या चौकांतच पहाटेपासून मंगलवाद्यें वाजत होतीं. परंतु आज अण्णासाहेब सत्याग्रहाला जाणार आणि अर्थातच पकडले जाणार ही बातमी त्याला कळून आपल्या हातून केवढी चूक झाली असें वाटून, ओशाळून त्यानें तीं वाद्यें तावडतोब बंद करविलीं. अण्णा निघण्याच्या गडबडींतच होते. पण हा प्रकार त्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं त्यांना बोलवून घेतलें आणि सांगितलें " अहो, मी चांगल्या कार्याला ( अर्थात् देशाच्या ) जाण्यासाठीं निघत आहें, तेव्हां मला चांगला शकुन होत होता तो बंद कां केलांत ? मंगलकार्याच्या मुहूर्तावर मी बाहेर जातों आहें. आणखी चांगला मुहूर्त मला कोणता लाभायचा ? वाद्यें सुरू करा; आणि नंतरही मी जणूं कांहीं गेलोंच नाहीं, वाड्यांतच आहें अशा भावनेनें सर्व समारंभ साजरा करा. उगीच वाईट दिसेल, अशा खोट्या कल्पना बाळगूं नका. " ज्यांच्या घरीं कार्य होतें त्यांचा विरस तर झालाच, पण उलट उत्साह आला.

मुळशीला ता. १ मे रोजीं सर्व पुढारी मंडळींच्या तुकडीनें सत्याग्रह केला व त्यांना अटक करण्यांत आली. त्या प्रसंगाची * हकीगत एक सत्याग्रही श्री. पांडुरंग प्रल्हाद कुकडे यांनीं लिहिली आहे.

"१९२१ सालीं मुळशी सत्याग्रह जोरानें चालू असतां तेथें प्रो. अण्णासाहेब परांजपे यांचें सान्निध्य–निकट सान्निध्य–लाभलें. त्यावेळीं 'मुळशी सत्याग्रह मंडपा' वर महाराष्ट्रांतील बहुतेक पुढारी विशेषतः पुणें शहरांतील पुढारी व स्वयंसेवक, शेंकडों मावळ्यांना साह्य करण्यासाठीं जमले होते. तो एप्रिलचा महिना. त्यांत मावळचा उन्हाळा. उन्हानें स्वयंसेवकांचीं तोंडें करपून जात. हजारों मावळे स्त्री-पुरुष सकाळीं आपलें खाद्य घेऊन धरणाचे चरामध्यें जाऊन बसत, धरणाचें काम बंद पाडीत व सायंकाळीं कंपनीचे मजूर कामावरून निघून गेल्यावर ५॥ वाजतां परत सत्याग्रह–मंडपावर येत. मध्यंतरीं उन्हाची ऐन तीव्र तिरीप असतां १२ ते २ चे सुमारास कांहीं पुढारी पुण्याचें ताजें टपाल पाहण्याकरितां किंवा अन्य कामाकरितां, चर सोडून सत्याग्रहमंडपांत जात असत. अशाच तऱ्हेनें त्या दिवशीं अण्णासाहेब

* चित्रमयजगत् ऑक्टोबर १९२९.

व इतर बरीच पुढारी मंडळी धरणाकडून मंडपांत उन्हाचे तापामुळें हुश् हुश् करीत आली. कांहीं ताजें टपाल वाचून झाल्यावर सकाळपासूनचे थकव्यामुळें बहुतेक वामकुक्षीची आराधना करूं लागले. एक-दोघांखेरीज बहुतेक सर्वच पहुडलेले असतां एकाएकीं धरणाकडून एक मावळा धावत धावत मंडपांत आला व कंपनीनें टेंकडीबाजूस काम सुरू केल्याचें व मावळ्यांना मारहाण सुरू झाल्याचें वर्तमान त्यानें सांगितलें मात्र; कीं अण्णासाहेब परांजपे आपल्या सकाळपासूनच्या दीर्घ श्रमाचा परिहार न होतांच सर्व पुढाऱ्यांचे अगोदर एकदम चित्त्यासारखे उठून उभे राहिले व आपला रुमाल डोकीस गुंडाळीत गुंडाळीत धावतच धरणाकडे वेगानें निघाले. मावळा पुढें, अण्णासाहेब त्याचे मागें पळत आहेत; मीही त्यांचेबरोबर धरणावर पळत गेलों. बाकीची पुढारी मंडळी अगदीं सावकाश "हवा खाण्यास" जातात त्याप्रमाणें आमचे कितीतरी मागाहून आली. कोणतेंही काम तडकाफडकीं, दाक्षिण्यानें व कळवळ्यानें करण्याची अण्णासाहेबांची हातोटी पाहून मला त्यांचें कौतुक वाटलें; साठींत गेलेला वृद्ध, मावळ्यांचें संकट ऐकतांक्षणींच जवानांना मागें टाकून पुढें धावत जातो; हें दृश्य माझे अंतःकरणापर्यंत जाऊन भिडलें.

मुळशी–सत्याग्रहाचे संग्राम चालू असतां सत्याग्रह–मंडपांतील सभेमध्यें दे० भ० अण्णासाहेबांची मार्मिक वाणी ऐकणारा व त्यांचे सहपंक्तीस क्षुधा शांत झालेला त्या वेळचा प्रत्येक सत्याग्रही आपणांस धन्य मानीत असेल. यांत शंका नाहीं.

त्या दिवशीं—ता. १ मे १९२२–शेंकडों मावळ्यांच्या पुणेंकर स्वयंसेवकांच्या सभेंत स्वामी सत्यदेवजींचें आशीर्वादात्मक स्फूर्तिदायक भाषण झालें. आजच्या मावळे–स्त्रिया, पुरुष व मुलें – सत्याग्रहींच्या तुकडींत अध्यक्ष दे० अण्णासाहेब परांजपे; चिटणीस डॉ. फाटक, चित्रशाळेचे मालक दे० वृद्ध वासुकाका जोशी; नारायणराव वैद्य, अकोला सरस्वतीमंदिराधिपति सहस्रबुद्धे, राजकारणकर्ते सी. के. दामले, पुणें जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे चिटणीस हरिभाऊ फाटक, वर्वे इत्यादि मंडळी सामील होती. ह्या सत्याग्रहींवर आज जुलमाचा कळस झाला. 'कोल्हापूर महाराज की जय' असा जयघोष करीत टाटाकंपनीचे गुंडांनीं सत्याग्रहींना भरमसाट चोप देण्यास व मारहाण करण्यास सुरुवात केली. आमच्या मावळणी बहिणींपुढें एक गुंड नग्न उभा राहिला व

बीभत्स शब्द बोलला. मावळे-मावळणी व त्यांचीं मुलें यांनीं सहनशीलतेची व शांततेची कमाल केली. बुटांच्या लाथा, काठ्या व घाव सत्याग्रहींचे मर्मस्थानीं मारण्यांत येत होते. ६।७ सत्याग्रही बेशुद्ध झाले. एका मुलाचा गळा दावून त्यास निपचित पाडण्यांत आलें. पूना कलेक्टरचे पर्सनल असिस्टंट मि. ब्रिस्टो हा सर्व अन्यायी प्रकार आपल्या 'साम्राज्यशाहीच्या अंध झालेल्या डोळ्यांनीं' बघत होते. इतरही कांहीं दुय्यम अधिकारी तेथें गमत पहात उभे होते. मातृभूमीवर जुलूम करण्यास आपलें शरीर व मन विकलेलें डे. पो. सु. शिंदेही हा प्रकार बघत होते. त्यावेळीं दे० अण्णासाहेबांवर माती उधळण्यांत आली! हा प्रकार पाहून कोणासही संतापच येता..."

या वर वर्णन केलेल्या प्रकारानंतर सर्व सत्याग्रहींना अटक करण्यांत आली. मुळशी सत्याग्रह सुरू झाल्यापासून 'सत्याग्रही गुन्हेगारांचा' बंदोबस्त करण्याकरितां सरकारनें तेथेंच एक स्पेशल मॅजिस्ट्रेट नेमून न्यायदानाची तजवीज तंबूंत जवळच्या जवळ केली होती.

या तंबूंतच शुक्रवार ता. ५ मे रोजीं सत्याग्रहींचे वरील खटला सुरू झाला. डि. मॅ. साहेबांनीं कंपनीचे कामास हरकत करूं नये असा जाहीरनामा काढला असतां कंपनीचे कामास हरकत करून ज्यायोगें दंगा अगर गर्दी होणेचा संभव होता असें वर्तन केल्याची फिर्याद वाचून दाखविण्यांत आली. अण्णासाहेब परांजपे यांनीं 'आपण शांत रीतीनें हरकत केली व ज्या योगानें कांहींएक दंगा होईल असें वर्तन केलें नाहीं' असा जबाब दिला. नंतर सरकारतर्फेचा साक्षीपुरावा उरकून घेण्यांत आला. डे. सु. शिंदे यांचीही साक्ष झाली. अण्णासाहेबांनीं त्यांची थोडीशी उलट–तपासणी केली व त्यांना छेडलें तेव्हां 'मी सर्व सत्याग्रह्यांचीं नांवें देतों पण तुम्ही मजुरांना काम थांबविण्यास सांगा' असें परांजपे म्हणाल्याचें त्यांनीं आपल्या जबानींत कबूल केलें.

शिंदे म्हणाले "मी तसें कॅमेरॉनसाहेबांना (कंपनीचे मॅनेजर) विचारलें, पण त्यांनीं नाकबूल केलें." आम्हीं शांततेचा भंग केला नाहीं असा परांजप्यांचा मुद्दा होता. याप्रमाणें साक्षीपुराव्याचें काम संपल्यानंतर निकालाकरितां म्हणून तीन दिवसांनंतरची तारीख देण्यांत आली. दरम्यान जामिनावर मोकळे करण्यांत आल्यामुळें अण्णासाहेब पुण्यास आले

होते. ते निकालाकरितां—म्हणजे शिक्षा ऐकण्याकरितां—पुन्हा मुळशीला जाण्यापूर्वी ता. ६ मे रोजीं रे–मार्केट पटांगणांत श्री० नं. चिं. केळकर यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरली होती. त्यांत भाषण करतांना अण्णासाहेबांनीं खालील कळकळीचे उद्गार काढले.

"आज सर्व जगभर भांडवलवाले व मजूर यांचा झगडा सुरू आहे. श्रीमंतांनीं संपत्तीच्या जोरावर गरिबांस सतत चिरडणें यापुढें शक्य नाहीं. ते कायद्याच्या जोरावर असल्या गोष्टी करीत असतील. पण ते कायदे अन्यायाचे आहेत हें विसरतां उपयोगी नाहीं. ज्याला चिमटा बसतो तो तक्रार करतो. लोणावळ्याच्या धरणामुळें तेथें फार चिलटें झालीं अशी तक्रार राजनिष्ठ डॉ. भांडारकर यांनींही केली होती. तेव्हां ज्यांचीं घरेंदारें कायमचीं नाहींशीं होत आहेत, त्यांनीं किती तक्रार करावी? आतां या लँड ॲक्विझिशन ॲक्टाची दुरुस्ती होत आहे. सार्वजनिक हित कोणतें व त्रास कशापासून होतो हें न्यायकोर्टानें ठरविल्याशिवाय असा कायदा लागू करूं नये अशी ही दुरुस्ती आहे. ती दुरुस्ती होईपर्यंत तरी काम बंद ठेवावें हें बरें!"

सोमवार ता. ८ मे रोजीं दुपारीं दोन वाजतां मुळशीला खटल्याचा निकाल सांगण्यांत आला. परांजपे, डॉ० फाटक व सी. के. दामले यांना सहा महिने व बाकीच्यांस कमी प्रमाणांत अशा एकंदर तीस सत्याग्रहींस त्या दिवशीं शिक्षा फर्माविण्यांत आल्या. शिक्षा सांगण्यांत आल्यावर दे० भ० परांजपे यांनीं पुढील संदेश सांगितलाः—

"लँड ॲक्विझिशन कायद्याच्या दुरुस्तीचें बिल वरिष्ठ कौन्सिलांत आलें, हा ज्या तत्त्वासाठीं आम्ही सत्याग्रह करीत आहों त्या तत्त्वाचा विजयच आहे. या सत्याग्रहांत जें शिक्षण मिळणार आहे, त्या जोरावर आपली राजकीय उन्नति झाल्याखेरीज रहाणार नाहीं."

त्याच दिवशीं अण्णासाहेबांची रवानगी मोटारनें येरवड्याच्या तुरुंगांत करण्यांत आली; परंतु पूर्वीच्या आणि या शिक्षेंत पुष्कळच अंतर होतें. त्या पूर्वीच्या कालांत सरकार नेमकीं माणसें वेंचून काढून शिक्षेला पाठवी. आतांची शिक्षा सामुदायिक चळवळींतली होती. शिवाय साठीच्या जवळ

आलेले म्हणून त्यांना कांहीं सवलती मिळत असत. अण्णासाहेबांच्या या कारागृहवासाची कल्पना येण्याकरितां श्री० कुकडे यांच्या लेखांतीलच एक उतारा देऊं.

"सर्कल नं. १ चे आठव्या बरॅकमध्यें अण्णासाहेबांची भेट झाली. त्या वेळीं त्यांचे चर्येवर अत्यंत गांभीर्यपूर्ण छटा व तेज आणि स्मित विलसत होतें. सायंकाळीं जेवण– छे भाकर खाणें– झाल्यावर ६ ते ७ पर्यंत कैद्यांना आपापसांत बोलण्यास– हळू हळू बोलण्यास– परवानगी असे. किंवा कैदसि सी. ओ. ( Convict Overseer ) चे कृपेनें ती मिळत असे. ह्यानंतर नं. ८ चे बराकीमध्यें सत्याग्रहींनाच रात्रौ कोंडून ठेवीत असत. ह्या बराकीचे शेजारीच कारखान्याची एक लहान बराक होती तीमध्यें सत्याग्रहीच असत. इतर बराकींतून क्वचित् सत्याग्रही ठेवीत. येरवड्यांत सत्याग्रहींचें वास्तव्य सर्कल नं. १, सेपरेट वॉर्ड, सॉलिटरी सेल्स, सर्कल नं. २ व क्वचित् इतरत्र असे. ह्या नं.८ चे बराकीमध्यें स्वराज्यकार अण्णासाहेब,राजकारणकार दामले, नागरिककार निंबकर, ना. का. वैद्य, का. वि. सहस्रबुद्धे, हरिभाऊ फाटक, वासुकाका जोशी, ल. ना. साने, बा. दा. भिडे ( चित्रशाळा ) वगैरे सुमारें ७५ सत्याग्रही होते. ज. स. करंदीकर सॉलिटरी सेल्समध्यें असत. आमच्या बराकींतील देहदंड सहन करण्यास एकत्रित झालेल्या सर्व सत्याग्रहींचा तो आनंद काय वर्णन करावा? सर्वानुमतें असें ठरलें कीं, परस्पर विचारविनिमय करण्यापेक्षां कोणीतरी एकानेंच आपले विचार सांगणें बरें. पण या गोष्टीस अनेक अडचणी होत्या.बराकींतीलआमचे बरोबरच पाळीपाळीनें झोंपणारे कैदी पहारेकरी ह्या गोष्टीस अनुकूल दिसेनात. अण्णासाहेबांनीं आज सायंकाळीं दोन शब्द सांगावेत ही सर्वांची इच्छा. पण निंबकरांशिवाय सयुक्तिक तऱ्हेनें ती अण्णासाहेबांपुढें मांडण्यास दुसरा कोणीच पुढें येईना. निंबकरांनीं ती अण्णासाहेबांपुढें मांडली; पण 'कैदी पहारेकरी' बोलले : 'चार मंडळी एकत्र जमल्याचें अंमलदारास दिसून आलें तर आमचें प्रमोशन सुपरिंटेंडेंट काढून घेईल.' थोड्याच मंडळींनीं एकत्र जमावें व अण्णासाहेबांनीं गीतेवर दोन शब्द सांगावेत असें ठरलें. येरवड्यांतील राजकीय कैद्यांत प्रवचन अगर भाषण करण्याचा अगदीं पहिला मान कोणास मिळाला असेल तर तो ह्या वेळीं अण्णासाहेबांनाच मिळाला. अण्णासाहेबांचें ह्या प्रवचनाचें रसभरित

वर्णन करण्यांत काय तात्पर्य? हें प्रवचन फार अल्प वेळांत संपविलें. कोणी अंमलदार आल्याची खबर आली. सर्व सत्याग्रही कैदी आपापल्या जागेवर गेले. अंमलदार सर्कलमध्यें आले व परस्पर निघून गेले. सत्याग्रहींमध्यें पुन्हा हळू हळू आपापल्या विषयावर गप्पागोष्टी सुरू झाल्या......ह्या वेळीं अण्णा-साहेब आपल्या बिछान्यावर वाचीत होते. हरिभाऊ फाटक व सितारामपंत दामले यांचेप्रमाणेंच अण्णासाहेब तिसऱ्या क्लासचे (वृद्ध–अशक्त) कैदी म्हणून पिवळी टोपी घालण्यास दिली होती. मी अण्णासाहेबांजवळ हळूच जाऊन बसलों, तेव्हां ते वाचनांत निमग्न होते. 'तुम्ही कुकडे का?' चष्म्याखालून मजकडे पहात ते बोलले. 'तुमचें इनिशियल काय?' 'तुमचे लेख व कविता आमचेकडे येत असत; पण ते देण्यासारखी आज परिस्थिति नाहीं. हल्लीं देशांत फार निराळेंच वातावरण उत्पन्न झालें आहे.' कांहीं औपचारिक भाषण झाल्यावर मीं म्हटलें, 'गव्हर्मेंटनें हा केवढा हो मोठा तुरुंग बांधला आहे! आणि याची आम्हांस आतांपर्यंत खबरही असूं नये?'

'हा जेल मोठा आहे असें नाहीं.' अण्णासाहेब नेहमींच्या लकबेनें बोलले; "आणि हिंदुस्थानांतील जेल हे मोठे आहेत असें म्हणतां येणार नाहीं. पाश्चात्य देशांतील तुरुंग यापेक्षां फारच मोठे आहेत. तेथें कैद्यांना फुटबॉल खेळण्यासाठीं अगर इतर व्यायाम करण्यासाठीं मोठमोठ्या क्रीडाभूमी (Play Grounds) असतात. तिकडील एखादी क्रीडाभूमीच कदाचित् ह्या तुरुंगाचे आवाराएवढी असेल, पण येथें परवशतेंत तसें कांहींच नसल्यामुळें तुरुंग नुसते कोंडवाडेच आहेत हें तुम्ही पहात आहां. एवढें म्हणतां येईल कीं, हिंदुस्थानांत कैद्यांची संख्या वाढली आहे."

"जितकी आपण कल्पना करीत होतों तितका कांहीं येथें त्रास दिसत नाहीं." मीं हळूच म्हटलें.

"तुम्ही महिना पंधरवड्याची शिक्षा भोगून का तुम्हांला नोकरशाहीचीं कृष्णकृत्यें समजून येणार आहेत? अहो! आमचें–हिंदुस्थानचें–चैतन्य मारण्या-साठीं हे तुरुंग आहेत. आजपर्यंत लक्षावधि हिंदी लोकांचें चैतन्य याच 'Blood Sucking Factory' मध्यें नष्ट करून हिंदुस्थानास नोकर-शाहीनें दास्यांत ठेविलें आहे!"

" सर्वसाधारण कैद्यास भयंकर कष्ट दिले गेले असतील, पण राजकीय कैद्यांवरही असाच जुलूम केला गेला का ? "

" शेकडों देशभक्त फांसावर चढले गेले, युनियन जॅक हिंदुस्थानच्या प्रत्येक प्रांतावर लागण्यापूर्वी व या आपल्या पुणें शहरावर लागण्यापूर्वी शेकडों खरे देशभक्त बळी पडले. १८५७ सालचे बंडांतील अव्वल प्रतीचे देशभक्त हिंदुस्थानच्या भिन्न भिन्न तुरुंगांत नष्ट केले गेले—हाल हाल करून नाहींसे केले गेले. शेंकडों आत्महत्या करून मेले. शेकडों फरारी होऊन देशत्याग करून परराष्ट्रांत गेले किंवा स्वदेशांतील रानावनांत झाडपाला खाऊन राहिले. नीच देशद्रोह्यांनीं गुप्त बातमी देऊन शेंकडों लोकांना पकडून दिलें; खरे देशभक्त पारतंत्र्यांत फार काळ जिवंत रहात नसतात. दुय्यम प्रतीचे देशभक्त देशाच्या सर्वसाधारण जनतेस कवटाळून लौकिक मिळवतात व साधारण जनही त्यांना फार सन्मान देतात; म्हणून ते अत्युच्च प्रतीचे असें मात्र नव्हे. खऱ्या देशभक्तांची खरी देशभक्ति फार भिन्न प्रकारची असते; त्यांच्या उच्चतम योग्यतेची कल्पना खुशालचेंडू लोकांना कळणें अशक्य ! "

सायंकाळचे सात वाजले. सर्वत्रांना फक्त आपापले बिछान्यावरच बसण्याविषयीं व तेथून जागा न सोडण्याविषयीं हुकुमावर हुकूम कर्कश आवाजांत झाले गेल्यानें हें संभाषण येथेंच संपलें.

दुसरे दिवशीं सकाळीं आठ वाजतां अण्णासाहेबांचें नांव पुकारीत कैदी कारकून व वॉर्डर आले. व त्यांना आमच्यांतून विभक्त केलें गेलें, व सेपरेट सेल्समध्यें नेऊन ठेवण्यांत आलें. त्यांना नेतांना त्यांचा तो फाटका तुटका कैदी पोषाख पाहून आमच्यापैकीं पुष्कळांना अतिशय चीड आली. "

[......तिसऱ्या खेपेस भेट झाली. प्रथम त्यांनीं मला ओळखलें नाहीं. ते बोलले, ' तुम्हांला ओळखण्यास मला बराच त्रास पडला. कारण त्यावेळचें बळकट शरीर, उत्तम प्रकृति, यांत आणि पोषाखांत तर नखशिखांत बदल झालेला आहे.' तुरुंगासंबंधीं कांहीं संभाषण झाल्यावर निरोप देतांना अण्णासाहेब म्हणाले, ' आतां तुमच्यासारख्या तरुणावर राष्ट्र अवलंबून आहे. आम्ही आतां वृद्ध आमचें कार्य बहुतेक...तरुणांचें मात्र कार्य करणें हें कर्तव्य आहे. "

'हो यांत कांहीं शंका नाहीं' मीं म्हटलें. 'राष्ट्रकार्य हा तरुणांचा धर्म पण त्यागाची किंमत ओळखणारे महाराष्ट्रांत कोणी आज आहेत का?' "खऱ्या कार्यकर्त्यांनीं आपल्या त्यागाची किंमत लोक ओळखतात कीं नाहीं, याकडे कधींही लक्ष देऊं नये." अण्णासाहेब उठतांना बोलले, 'कुणी निंदो वंदो आपली कार्याशीं गरज.' 'बरें, वन्दे मातरम्' म्हणून मीं निरोप घेतला. ]

या तुरुंगवासांतच अण्णासाहेबांनीं मीमांसेवरील 'जैमिनीय न्यायमाला' या सुप्रसिद्ध ग्रंथाचा सूक्ष्म अभ्यास केला. त्यासाठीं त्यांना पेन्सिलीचा एक तुकडा चोरून आपल्यापाशीं बाळगावा लागला होता. पुढें तुरुंगांतून बाहेर आल्यानंतर त्यांनीं 'अर्थ-संग्रह' नामक आपला पूर्वमीमांसेवरील ग्रंथ तयार केला.

अण्णासाहेब मुळशी-सत्याग्रहाला जाण्यापूर्वीच या मुळशी-प्रकरणा-बाबत महाराष्ट्रांत सूक्ष्म मतभेद होऊं लागले होते, हें मागें सांगितलेंच आहे. कांहीं समन्वयवादी पुढारी, मावळ्यांना मिळणाऱ्या कॉंपेन्सेशनच्या रकमेंत कांहीं कमीजास्त करून तडजोड करावी, मिटतें घ्यावें, अशा मताचे झाले. पण या तडजोडीनें ज्या तत्त्वावर व ज्यासाठीं सत्याग्रह सुरू करण्यांत आला त्यावरच सपशेल बोळा फिरविला जात होता. टाटाच्या धरणानें उत्पन्न होणारी वीज सत्याग्रहाच्या अध्वर्यूंना नको होती. तर या चळवळींत त्या धरणाला प्रतिकार करून त्या घर्षणांतून निर्माण होणारी कार्यशक्तीची व चैतन्याची वीज उत्पन्न होण्याची त्यांना अपेक्षा आणि अभिलाषा होती. धरण उभें रहाण्याची वेळ आलीच तर ज्यांच्या जमिनी बुडाल्या त्यांना मोबदला देणें सरकारला भागच होतें. त्याच्यासाठीं मोठीशी खटपट किंवा चातुर्य खर्चीं घालावें लागणार होतें, अशांतला भाग नव्हता. वर सांगितलेली तडजोड ही तडजोड नसून मोडतोड कशी होती हें अण्णासाहेबांनीं 'स्वराज्यां'त एका नमुनेदार वक्रोक्तिपूर्ण पण तत्त्वसूचक लेखांत स्पष्टपणें सूचित केलें होतें. त्यांत त्यांची विशिष्ट लेखनशैली आणि त्याच्या आंत अस्तरासारखी असणारी भक्कम तत्त्वप्रणाली या दोहोंचाही पूर्ण आविष्कार झाला असल्यामुळें तो लेख मुद्दाम येथें देण्यांत येत आहे—

## अर्थनाशे समुत्पन्ने सर्वं त्यजति पंडितः !

एक मनुष्य स्वर्गाला जाण्यासाठीं खटपट करीत होता. परंतु त्याचा तो प्रयत्न कांहीं पातकाच्या आचरणामुळें सिद्धीस गेला नाहीं. त्याचे हे स्वर्गाला जाण्याचे प्रयत्न चालले होते, त्यावेळीं सैतानानें आडून त्याच्यावर टेहळणी ठेवलेली होती. त्याचे स्वर्गांत जाण्याचे प्रयत्न फसले, तेव्हां हळूच सैतान पुढें आला आणि म्हणाला, 'काय करणार, बाबा! तूं इतकी खटपट करून तुला त्यांत यश आलें नाहीं, याबद्दल मला मोठें वाईट वाटतें. असो. झाली गोष्ट येत नाहीं. पण आतां तुझी इच्छा असेल तर पाहिजे असल्यास मी तुला नरकांत घेऊन जातों!' त्याला ती गोष्ट पटली. व त्याप्रमाणें करण्याला तो तयार झाला!

एका गांवांत कोणी सभ्य, श्रीमंत, संभावित आणि प्रामाणिक, असे चोर रहात असत. त्यांनीं एका इसमाच्या घरावर एके दिवशीं राजरोसपणें दरवडा घालून त्याची सर्व संपत्ति लुटून घेतली; व त्या लुटींत त्यांना त्याची एक सुस्वरूप बायको सांपडली, तीही उपटून नेण्याचा त्यांनीं निश्चय केला. तेव्हां ती आपली बायको तरी निदान अशा रीतीनें नेली जाऊं नये, म्हणून त्यानें पुष्कळ विनवण्या केल्या. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेरीस ती सगळी संपत्ति आणि ती सुस्वरूप बायको घेऊन ते निघाले. त्या वेळीं ती सुंदर स्त्री आपल्या पायांनीं चालूं लागली. तेव्हां त्यांच्यापैकीं एका सात्विक चोराला तिची दया आली आणि ही इतकी कोमल स्त्री इतक्या लांब कशी चालत जाईल म्हणून त्याला चिंता पडली! तेव्हां त्याला एक युक्ति सुचली! आणि तो तिच्या नवऱ्याला म्हणाला कीं, 'बाबा, तूं हिच्या कल्याणासाठीं आणि हिला त्रास न पडावा म्हणून आमच्यापाशीं एवढा वेळपर्यंत रदबदली करीत होतास. त्यांत तुला जरी यश आलें नाहीं, तरी हिच्यावर जर तुझें कांहीं थोडेंबहुत तरी प्रेम असेल व हिला त्रास पडूं नये अशी जर तुझी निःस्वार्थी आणि प्रामाणिक इच्छा असेल, तर ही तुझी कोमल पत्नी या खड्याकांट्यांतून चालतांना तुझ्यानें कशी पहावते, हें मला समजत नाहीं! इतका निष्ठुर तूं कसा होऊं शकतोस? तेव्हां तूं आतां असें कर कीं, हिला तूं आपल्या खांद्यावर घे आणि आमच्या घरापर्यंत हिला आणून पोहोंचती कर!' हें म्हणणें पटून

त्यानें तिला खरोखरच आपल्या खांद्यावर घेतली आणि तिला चोरांच्या घरीं पोंचती करण्याकरितां तो त्यांच्या बरोबर निघाला! त्या वेळीं त्या सर्व सभ्य शर्विलकांनीं त्याच्या समंजसपणाची तारीफ केली! व त्याच्या घरच्याच चोरलेल्या जिनसांचें बांधलेलें आणखी एक ओझें होतें, तें त्याच्या दुसऱ्या खांद्यावर ठेवण्यांत येऊन ते सर्व सभ्य गृहस्थ आपल्या गांवाकडे चालले! एवढा मोठा लुच्चा रावण! पण ही युक्ति न सुचल्यामुळें त्याला आपली चोरी स्वतःच्या खांद्यावरूनच लंकेपर्यंत दूर वाहून न्यावी लागली होती!

एका गांवांत एक मद्यपाननिषेधक मंडळ होतें व त्यांत पुष्कळ स्वयंसेवक होते. त्यांनीं आपल्या हद्दींतील मद्यपानाचें व्यसन बंद करण्याकरितां आपल्या प्रयत्नांची शिकस्त करून पाहिली. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अंमलदाराच्या धूर्तपणामुळें आणि मद्यपीं लोकांच्या मूर्खपणामुळें दारूचा खप अबाधितपणें कायम राहिला. तेव्हां त्या बिचाऱ्या मद्यपानप्रतिबंधक मंडळांतील स्वयंसेवकांची त्या गांवांतील गुत्तेवाल्यांना फार दया आली; व त्यांची परोपकार करण्याची हौस मद्यपानप्रतिबंधाच्या कामीं परिपूर्ण होत नाहीं, असें पाहून त्यांना फार वाईट वाटलें! व त्यांची परोपकाराची हौस या कामांत पूर्ण होत नाहीं, तर त्यांना परोपकाराकरितां दुसरें कांहीं तरी कार्यक्षेत्र काढून देणें आवश्यक आहे, असा सर्व गुत्तेवाल्यांच्या मनाचा कल झाला! आणि म्हणून त्यांनीं मद्यपानप्रतिबंधक मंडळांतील सर्व सभासदांना आमंत्रण देऊन त्यांची एक सभा भरविली. त्या सभेंत स्वयंसेवकांच्या परोपकारबुद्धीची अतिशय तारीफ करण्यांत आली. व अखेरीस त्यांना असें सुचविण्यांत आलें कीं, 'तुम्ही दारू बंद करण्याकरितां परोपकारबुद्धीनें अतिशय शिकस्त केली; परंतु आपल्या देशाच्या दुर्दैवानें आपल्या देशांतील दारू बंद होत नाहीं. या दारूबाज लोकांच्यावर उपकार करण्याची तुमची बुद्धि अनावर आहे, परंतु ते ऐकत नाहींत. परंतु यांचें कल्याण करण्याची जर खरोखर तुमची इच्छा आहे आणि यांची दारू जर बंद होत नाहीं, तर आतां निदान तुम्ही एवढें तरी करा कीं, हे दारू पिणारे लोक आमच्या गुत्त्यांतून एकदम इतके लोटतात कीं, त्यांचे उष्टे दारूचे पेले स्वच्छ रीतीनें धुवून दुसऱ्यांना देणें देखील अशक्य होतें!

तेव्हां या कामीं जर तुमच्या स्वयंसेवकांनीं मदत केली, तर ज्या या लोकांचें कल्याण करावें, अशी तुमची पहिल्यापासून इच्छा आहे, त्यांना लोकांच्या उष्ट्या पेल्यांतून दारू न देतां स्वच्छ पेल्यांतून दारू प्यावयाला दिल्याचें श्रेय तुम्हांला मिळेल! तेव्हां आतां एवढा तरी परोपकार तुम्ही या लोकांवर अवश्य करा!' ही त्या गुत्तेवाल्यांची आणि दारूबाजांची परोपकारासंबंधींची विचारसरणी त्या स्वयंसेवकांपैकीं कित्येक भोळसर लोकांना फार चांगली वाटली. व लगेच त्यांनीं तेथल्या तेथें मद्यपान-प्रतिबंधक मंडळ मोडून टाकून त्याच्या ऐवजीं चषक-स्वच्छतोत्पादक मंडळ या नांवाची एक नवीन संस्था उत्पन्न केली! व पूर्वींच्या मंडळांतील बहुतेक स्वयंसेवक हल्लीं या चषक-स्वच्छतोत्पादक मंडळामध्यें ऑनररी व्हॉलंटियरचें काम करीत आहेत! त्यामुळें गुत्तेवाल्यांनीं आपले सगळे पहिले पगारी नोकर काढून टाकले असून हल्लीं स्वच्छपणानें पेले विसळले जात असल्याची सदर गांवच्या गुत्तेवाल्यांची तारीफ खुद्द सरकारपर्यंत जाऊन पोहोंचली आहे! व त्याबद्दल गुत्तेवाल्यांना सिल्व्हर मेडल्स मिळणार आहेत!

पूर्वीं ईस्ट इंडिया कंपनीच्या वेळीं आपल्या लोकांचीं पुष्कळ राज्यें होतीं. व तीं टिकविण्यासाठीं त्या त्या राज्यांतील लोक स्वदेशभक्तीनें प्रेरित होऊन ईस्ट इंडिया कंपनीच्या शिपायांशीं निकरानें लढत असत. परंतु आपल्याच देशांतील कित्येक घरबुडव्या फितुरी लोकांच्या घरभेदेपणामुळें त्यांचे लढाईतून पराभव झाले, आणि कंपनीच्या लोकांना विजय मिळाले! तेव्हां कंपनीच्या लोकांनीं स्वदेशभक्तीसाठीं लढणाऱ्या या पराक्रमी लोकांची फार तारीफ केली; व तुमच्यासारखे देशभक्त वीर दुसरे कोणी नाहींत, असेंही त्यांनीं त्यांना सांगितलें. परंतु पुढें त्यांनीं त्यांना असा उपदेश केला कीं, 'तुम्ही मोठे वीर खरे! परंतु आतां काय करणार? लढाईंत पराभव झाल्यानंतर तुमच्या या शौर्याचा काय उपयोग? तेव्हां आतां ज्या देशाचें कल्याण करण्याकरितां तुम्ही इतके लढलां, त्या देशाचें यापुढें खरें कल्याण करण्याचें जर तुमच्या मनांतून असेल, तर तुम्ही आतां या देशामध्यें शांतता आणि स्वस्थता उत्पन्न करण्याला मदत करा म्हणजे झालें!' हें म्हणणें पुष्कळांना सयुक्तिक वाटलें. व त्यामुळें स्वराज्यसंस्थापकमंडळ म्हणून त्यांची जी साऱ्या देशभर पसरलेली एक संस्था होती, ती मोडून टाकण्यांत

आली; आणि तिच्या जागीं सुराज्यसंरक्षक मंडळ या नांवाची एक नवीन संस्था त्यांच्याकरितां काढून देण्यांत आली. तेव्हांपासून पूर्वीचे राजे, प्रधान, सरदार, दरकदार, मानकरी, शिपायी, किल्लेदार, शूर, शहाणे, मुत्सद्दी, देशभक्त, वगैरे झाडून सगळे लोक या नवीन संस्थेमध्यें आपल्या देशाचें कल्याण करण्याच्या इच्छेनें नोकऱ्या पत्करून राहिले आहेत !

मुळशी पेठ्यांतील लोकांच्या जमिनी पाण्यांत बुडूं लागल्या, तेव्हां त्या बुडूं नयेत म्हणून तेथील लोकांनीं सत्याग्रह सुरू केला. व त्यांना या सत्कार्यामध्यें मदत करण्यासाठीं सत्याग्रहसंवर्धक या नांवाचीं अनेक मंडळें अनेक ठिकाणीं स्थापन करण्यांत आलीं. त्यानंतर मुळशी पेठ्यांतील मावळ्यांनीं कांहीं वेळपर्यंत नेटानें आणि दृढनिश्चयानें सत्याग्रह केला. परंतु पुढें कित्येक महिन्यांनीं टाटा कंपनी मुळशी पेठ्यांतील मावळ्यांना कॉंपेन्सेशनकरितां म्हणून सढळ हातानें पैसे देण्याचें आमिष दाखवूं लागल्यामुळें व इतरही कित्येक परोपकारी मंडळींच्या सल्लामसलतीमुळें थोडसे मावळे लोक पैसे घेऊं लागले. तेव्हां कित्येक कल्पक लोकांनीं अशी एक शक्कल काढली कीं, ' आतां एवीं तेवीं हे मावळे पैसे घेणार ! आणि टाटा कंपनीचें मुळशीच्या डोंगरांत धरण उभें रहाणार ! तेव्हां आतां कांहीं केलें तरी जर हे मावळे पैसे घेतच आहेत, तर ज्या मावळ्यांच्या कल्याणासाठीं आपण झटत आहों, त्यांना कांहीं जास्त पैसे मिळवून देऊन तरी आपण त्यांचें कल्याण करूं या ! ' ही युक्ति निघाल्याबरोबर ती कित्येकांना पटली व त्यामुळें मावळे जमिनीबद्दल जे पैसे घेतील, ते ठरल्याप्रमाणें तितके आहेत किंवा नाहींत, हें मोजून पाहणारें एक मंडळ स्थापन करण्यांत येणार आहे ! व त्यांना मिळणारे रुपये खरे आहेत किंवा खोटे आहेत, हें तपासून पहाणारें दुसरें एक मंडळ त्याच्याच पाठोपाठ लगेच स्थापन व्हावयाचें आहे !

असो. सहा महिन्यांच्या कारागृहवासानंतर ता० ७ नोव्हेंबर १९२२ रोजीं दे० परांजपे, दामले, फाटक प्रभृतींची येरवड्याच्या तुरुंगांतून मुक्तता झाली. त्याचे पूर्वीच जूनमध्यें मुळशीचा लढा मोठ्या प्रमाणावर व अखिल महाराष्ट्रातर्फें लढविण्याकरितां मुंबईस डॉ. मुंजे यांचे अध्यक्षते-

खालीं अखिल–महाराष्ट्र–मुळशी–परिषद् भरविण्यांत आली होती व तींत चिं. वि. वैद्य, नानासाहेब देशमुख, माधवराव अणे व डॉ. मुंजे या चौघा पुढाऱ्यांचें एक नियमनमंडळही नेमण्यांत आलें. परंतु अखेर त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. पुढें सेनापति बापट प्रभृति वीरांनीं वैयक्तिक प्रयत्नांनीं व मिळाले तेवढ्या सैनिकांनिशीं झुंज केली. पण त्याला यश आलें नाहीं; येणें शक्य नव्हतें. अखिल महाराष्ट्र, टिळकांच्या वेळेप्रमाणें एकवटून, एकमुखीपणानें आणि धडाडीनें उभा ठाकला असता तर न जाणो बार्डोलीच्यापूर्वीं मुळशीचेंच नांव चिरस्मरणीय होऊन बसलें असतें !

---

# १३

# असहकारिता विरुद्ध कौन्सिलप्रवेश

"लोक आपल्या स्वतंत्र आणि नवीन निर्माण केलेल्या साधनांनीं आपलीं सर्व राजकीय कार्यें सरकारच्या कोणत्याही खात्याची अपेक्षा न धरतां उरकून घेऊं लागले, म्हणजे हीं सगळीं सरकारी खातीं आपोआपच अर्धांगवायु झालेल्या अवयवांप्रमाणें लुलीं आणि निर्जीव होऊन वाळून आणि गळून जातील. आणि हेंच स्वराज्य होय!"

—शि. म. परांजपे

स्वराज्य ता. ९ सप्टेंबर १९२०

मागील प्रकरणाच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें शिवरामपंत सहा महिन्यांच्या शिक्षेनंतर सुटून आले त्यावेळीं महाराष्ट्र दुभंगूं लागला होता. ते मुळशीला सत्याग्रह करावयाला जाण्यापूर्वीच १९२२ मध्यें म. गांधींना सहा वर्षांची शिक्षा झालेली होती. त्यानंतर लगेच जमनादास मेथा, भोपटकर वगैरे मंडळींनीं अकोल्यास जमून असहकारितेच्या धोरणाविरुद्ध ठराव पास केले होते. केळकर या सभेला हजर होते. परंतु अजून त्यांचें उभयस्पर्शी धोरणच कायम होतें. कारण याच सुमाराला खुद्द गांधींना लिहिलेल्या एका पत्रांत त्यांनीं खालील मजकूर लिहिलेला* आहे.

......" पत्र पुरें करण्यापूर्वीं एवढेंच सांगतों कीं, माझ्यावर व अकोला-परिषदेवर जो निष्कारण कडक आरोप करण्यांत आला आहे त्याचा मी मनःपूर्वक निषेध करतों. स्वतः मीं तेथें फार तर सभा-

* गतगोष्टी अर्थात् माझी जीवनयात्रा-पान ५०६

नियामक अगर प्रेक्षक यांपेक्षां जास्त कांहींच केलें नाहीं तेथें पास अगर नापास झालेल्या कोणत्याही ठरावांना मीं आपलें मत अगर पसंती दिलेली नाहीं. '' इ.

असो. पण फाटाफुटीला सुरवात होत चालली होती, यांत शंका नाहीं. या अकोला-पक्षाचा भर कौन्सिलप्रवेशावर असून त्या दृष्टीनें असहकारितेच्या कार्यक्रमांत फेरफार करावा असा त्यांचा आग्रह होता. उलट बाकीच्या कॉंग्रेसवाल्यांचें म्हणणें असें कीं, असहकारितेचा कार्यक्रम आहे तसाच ठेवावा व त्यावरच जोर देऊन चळवळ चालवावी. या दोन पक्षांनाच फेरवाले व नाफेरवाले अशीं नांवें पडलीं व उभयतांतले मतभेद पुढें वाढतच गेले. या बाबतींत अकोल्याच्या सभेनंतर शिवरामपंतांचें मत असें होतें कीं, या अकोलावाल्यांनीं देशांतील एकोपा व एकमुखीपणा बिघडवूं नये. असहकारितेच्या चळवळींत खऱ्या मनानें सामील होऊन कार्यसिद्धि काय होते ती पहावी. व नंतर अपरिहार्यच झाल्यास मग कॉंग्रेसमध्यें ठराव बदलून घ्यावा. तोंपर्यंत उतावीळपणा करून फुटीर वृत्ति दाखवूं नये व बेकीचें प्रदर्शन करूं नये. चालत्या गाड्याला खीळ घालून किंवा अपशकुन करून सरकारचे हात बळकट करूं नयेत. स्वराज्यांत त्यांनीं हेंच लिहिलें होतें.

......'' कै. लो. टिळक हे हयात होते तोंपर्यंत त्यांनीं देशाच्या उन्नतीकरितां आटोकाट प्रयत्न केले, याच्याबद्दल कोणाचाही मतभेद नाहीं; व त्याबद्दल सर्व लोक त्यांचे अत्यंत ऋणीही आहेत. परंतु त्याकरितां म. गांधी यांनीं त्यानंतर केलेल्या देशसेवेची किंमत कमी करण्याचा प्रयत्न करणें हें केव्हांही श्रेयस्कर नाहीं. म. गांधींच्या मागील राजकीय वर्तणुकीमध्यें कित्येक न्यूनता असतील व हल्लींच्या त्यांनीं आंखून दिलेल्या असहकारितेच्या कार्यक्रमामध्यें अनेक दोषही असतील. तरीपण त्यांनीं आपल्या असहकारितेच्या कार्यक्रमानें देशामध्यें हल्लीं जो कल्पनातीत परिणाम उत्पन्न करून दिला आहे, तो त्यांच्या शत्रूंनाही नाकबूल करितां यावयाचा नाहीं. आजपर्यंतच्या कोणाच्याही आणि कोणत्याही कार्यक्रमानें जितकें कार्य घडून आलें नाहीं, तितकें प्रचंड कार्य म. गांधी यांच्या असहकारितेच्या कार्यक्रमानें फक्त वर्ष दीड वर्षाच्या अवधींत उत्पन्न करून दाखविलें आहे. इतक्या उत्कृष्ट आणि उपयुक्त कार्यक्रमांतील छिद्रें शोधीत न बसतां त्याचा

जास्त उपयोग करून घेण्यांतच जास्त शहाणपणा आहे. तरी पण कित्येकांना असें वाटत नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे. व तें आपलें सर्व बुद्धिसर्वस्व म. गांधींच्या चुका मोजून दाखविण्यामध्येंच प्रदर्शित करीत आहेत. पण अशानें राष्ट्राचें नुकसान होत आहे. व ज्यावेळीं राष्ट्रांत एकीच उत्पन्न झाली पाहिजे, त्यावेळीं राष्ट्रांत भांडणें उत्पन्न करणारे हे लोक आपल्या राष्ट्राचें हित करण्याच्या प्रामाणिक आणि प्रशंसनीय बुद्धीनें राष्ट्राचें प्रचंड आणि कल्पनातीत नुकसान मात्र करीत आहेत ! ''

असो. पण फेर-नाफेरवाल्यांतले हे मतभेद वरवरचे नव्हते, असें दिसून आलें. हे मतभेद खोल म्हणजे राजकारणाकडे पहाण्याच्या दृष्टिकोनांतील मूळ फरकामुळें उत्पन्न झालेले होते. मूळपासूनच अकोलावाल्या मंडळींचा डोळा कौन्सिल–प्रवेशावर होता. तरीसुद्धा निदान दुसरा डोळा असहकारितेच्या इतर कार्यक्रमावर असता, तरी इतका वाद माजला नसता. पण कौन्सिल-प्रवेशाची उपयुक्तता मनांतच ठसली असल्यामुळें आरंभापासूनच किंवा जरा मागाहून या मंडळींचीं पावलें एकीकडे असहकारितेच्या मार्गानें पुढें पडत असलीं तरी मन मागें वळून कौन्सिलच्या कामगिरीकडे पहात होतें. भक्त तुळशीदासाची गोष्ट अशी सांगतात कीं, आपल्या प्रियेची भेट घेण्याकरितां उत्कंठित झालेला तुळशीदास सापाला दोरी समजून वर चढून गेला. त्यावेळीं ' इतकी निष्ठा जर परमेश्वराच्या ठिकाणीं तुम्हीं ठेवली असती, तर तुम्हांला मोक्षपद मिळालें असतें ' असें भाषण त्याच्या प्रियेनें केल्यावर तुळशीदास, ते शब्द वर्मी लागल्यासारखे होऊन, त्या मोहाचा त्याग करून निघाला खरा. परंतु त्यावेळची तुळशीदासजींची मनाची अवस्था

कदम चले आगे मन पीछे भागे

या एका अर्थपूर्ण सुंदर पदांत वर्णन केल्याप्रमाणें होती. अकोलावाल्यांपैकीं कांहींजणांची अवस्था तरी यासारखीच पुष्कळ अंशीं होती, यांत शंका नाहीं. परंतु, ते वाद एका दृष्टीनें जुने झालेले आहेत. म्हणून त्यांचा तपशीलवार इतिहास न देतां फक्त तात्त्विक दृष्ट्या त्यांच्यामधील विरोध काय होता तें पाहूं व त्याबाबतचे शिवरामपंतांचे काय विचार होते ते सांगूं. फेरवाले म्हणत, आमचा टिळकांचा पक्ष आहे. म्हणजे आम्ही

टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेच्या अर्थात् ‘ मिळेल तें घ्या व बाकीच्या-साठीं झगडा ’ किंवा ‘ठोशास ठोसा’ या तत्त्वावर चालणारा आमचा पक्ष आहे, असा त्यांचा दावा होता. पण त्यांचा बहुतेक भर कौन्सिल-प्रवेशावर होता. ‘बाकीचीं असहकारितेचीं कलमें पुष्कळ अंशीं आम्हांला पसंत आहेत, ’ असें हे फेरवाले तोंडानें म्हणत. परंतु आंतून किंवा खऱ्या कळकळीनें त्या पसंत असलेल्या बाबींना उचलून धरावें तितकें हे लोक मुळींच धरीत नसत. यामुळेंही मतभेद वाढण्याला मदत झाली. दिसावयाला फेरवाले खरोखरीच टिळकांच्या ‘ अर्ध्या वचनांत ’ होते ! म्हणजे मिळेल तें घ्या एवढा पूर्वार्ध उचलावयाचा पण ‘बाकीच्यासाठीं झगडा ’ या महत्त्वाच्या मुद्द्याच्या उत्तरार्धासंबंधीं त्यांचेजवळ कांहींच कार्यक्रम किंवा धडाडी दिसून येत नव्हती. शिवाय फेरवाल्यांचें मत किंवा धोरण शिवरामपंतांना पसंत न पडण्याला आणखी कारणें होतीं. तत्त्व कितीही चांगलें असलें तरी तें कोणत्या प्रसंगीं अंमलांत आणावें,याचा विचार त्या त्या वेळची परिस्थिति पाहूनच करावा लागतो.त्रिकालाबाधित चालणारें तत्त्व राजकारणांत नसतें. शत्रूचें धोरण व इतर साधक-बाधक गोष्टी पाहून नंतरच धोरण आंखावें लागतें. टिळकांचें प्रतिसहकाराचें तत्त्व फेरवाले म्हणत त्याप्रमाणें बारा महिने अठरा काळ आचरणीय आहे असें मानलें, तरी त्या तत्त्वाचें शस्त्र पेलणाराही टिळकांसारखाच पुढारी असावा लागतो, हें विसरतां उपयोगी नाहीं. तेव्हांच तो लोकांना विश्वास-योग्य वाटतो, एरवीं वाटत नाहीं. भलत्यासलत्यांच्या तोंडांत खेळणारीं तत्त्वें हास्यास्पद होतात. एवंच, प्रतापरावाचा चाबूक प्रताप-रावाच्याच हातांत पाहिजे. जो खंबीरपणानें त्या उत्तम तत्त्वाचे दोन्ही अर्ध अंमलांत आणील आणि चालू ठेवील, त्यानेंच या तत्त्वाचें शस्त्र खरें चालविलें म्हणावयाचें व तेव्हांच त्या शस्त्राचा खरा उपयोग होणार, हें उघड आहे. कौन्सिलप्रवेशाची आघाडी झुंजवूं, सगळीकडून सगळ्या बाजूंनीं सरकारावर दडपण आणूं इत्यादि तत्त्वज्ञान दिसण्या-लिहिण्यांत व्यवहारी, आकर्षक व तेजस्वी दिसतें खरें. परंतु सूक्ष्म निरीक्षण व चिकित्सा केल्यानंतर हें सहज दिसून येतें कीं, नुसत्या कौन्सिलांतील झुंजीला सरकार मुळींच धूप घालीत नाहीं. कौन्सिलांत जाऊन सरकारा-

वर पूर्वी नेमस्त पुढारीही हल्ला करीत आले होते. कोणतेंही प्रस्थापित सरकार मूठभर सुशिक्षितांच्या कायदेशीर वक्तृत्वपूर्ण अडवणुकीला भीक घालीत नाहीं व भीतही नाहीं. सरकार दखल घेतें ती बहुजनसमाजांत उत्पन्न झालेल्या कार्य-शक्तीची. वांकविण्याचें सामर्थ्य ( Sanction ) जें अखिल जनतेच्या पाठबळांत—त्यागाच्या तयारींत—असतें, त्यालाच सरकार वचकतें. कागदी घोड्यांनीं लढाया थोड्याच जिंकल्या जातात !

जगाच्या इतिहासाकडे नजर टाकली म्हणजे असें दिसून येतें कीं, जित, पद-दलित राष्ट्रांतल्या लोकांच्या असंतोषाची वाफ धडक मारूं लागली, कीं राजकारणकुशल जेते-राज्यकर्ते सावध होतात व विचार करूं लागतात. या उत्पन्न झालेल्या वाफेच्या धक्क्यानें आपण उडून जाऊं नये म्हणून तिला दुसरीकडे लहानशी वाट काढून देऊं पाहतात. म्हणजे निराळ्या शब्दांत, कांहीं थोडेफार हक्कांचे तुकडे तोंडावर टाकून परतंत्र लोकांना झुलविण्याची ही राज्यकर्त्यांची एक जुनी आणि नेहमींची युक्ति असते. ती कांहीं इंग्रजांनीं हिंदुस्थानासाठीं प्रथम शोधून काढली, असें मुळींच नाहीं. अशा वेळीं नवीन देऊं केलेले हक्क अगर सुधारणा घ्याव्यात कीं न घ्याव्यात असा गुंतागुंतीचा प्रश्न नेहमींच पुढें उभा रहात असतो. व यावर रणें माजून पुष्कळदां दोन तट पडलेलें इतिहासांत दिसून येतात. स्थूल मानानें पहातां नरम वृत्तीच्या लोकांचा कल सुधारणा पत्करण्याकडे असतो; उलट ताठर लोक संतुष्ट न होतां त्यांतलें इंगित ओळखून, आणिकासाठीं प्रयत्न करितात. नरम, 'स्वीकारूं' म्हणणाऱ्यांतले कांहीं लोक राजकारणाच्या आखाड्यांत पडून वादपटु झालेले असले तर ते या स्वीकारावरच देश-हिताचें वा देशभक्तीचें टोपण चढवूं पहातात; किंवा कांहीं लोकांना खरोखरींच प्रामाणिकपणानें स्वीकाराचा मार्ग उपयुक्त व उपकारक वाटत असतो. कोणत्याही प्रश्नाप्रमाणें याही प्रश्नाला उलट-सुलट बाजू आहेतच. अशा वेळीं निर्णयासाठीं निकष लावावयाचा तो हाच लावावा लागतो कीं, सुधारणा स्वीकारार्ह आहेत काय ? म्हणजे त्या स्वीकारून त्यांचा उपयोग पायऱ्यांप्रमाणें करून आणखी वर चढतां येईल किंवा नाहीं ? का सुधारणा तकलुपी असून त्या पत्करल्यामुळें बाहेरची खरी चळवळ थंडावेल,

प्रगति खुंटेल व सांचलेली वाफ व्यर्थ वायां जाईल ? याच प्रश्नांच्या उत्तरांवर स्वीकार कीं धिक्कार हा कोलदांडा सोडवावा लागतो. अर्थात् वरील प्रश्नांचीं उत्तरेंही स्वभावभेदानें व वृत्तींतल्या फरकानेंही निर-निराळ्या पुढाऱ्यांकडून निरनिराळीं येतात, हें अनुभवाला येतेंच. शिव-रामपंतांसारख्या खोल व व्यापक दृष्टीनें पहाणाऱ्या पुढाऱ्याचा कल कुणीकडे असणार हें वेगळें सांगावयास नको. देशांतील सामुदायिक चळवळीची किंवा अडवणुकीची मर्यादा कोठपर्यंत नेऊन भिडविण्याची त्यांची कल्पना होती हें मागील प्रकरणांत त्यांचें स्फुट दिलें आहे, त्यावरून चांगली येण्यासारखी आहे. म. गांधींची असहकारिता कशीही असो; पण शिवरामपंतांची कल्पना ही अशी होती. अर्थात् अशीं मतें असणाऱ्याला कौन्सिलांत राम आहे किंवा मोक्ष आहे असें वाटूं नये, यांत नवल नाहीं. पहिल्यापासूनच कौन्सिली कामकाज हें दुय्यम दर्जाचें राजकारण अशी त्यांची भावना होती.

त्यांतही आणखी एक विचार असा कीं, सुधारणा टाका कीं राबवा, अर्थात् त्यांतलें कोणतें करावयाचें हा त्या त्या वेळीं ठरविण्याचा महत्त्वाचा प्रश्न असतो यांत संशय नाहीं. तथापि, राबविण्याचें धोरण ठरविल्यानंतरही राबवूं म्हणणारा माणूस कसा काय आहे यावर सर्व कांहीं अवलंबून असतें. हेंच काय, कोणतेंही कार्य घ्या, धोरण घ्या (त्यांतल्या इष्ट–अनिष्ट गोष्टी बाजूला ठेवूनही ) अखेर तें कार्य-धोरण-उचलणाऱ्या माणसाच्या खंबीरपणावर, टणकपणावर व कणखरपणावरच त्याचें यशापयश अवलंबून असतें. टिळकांच्या वर उल्लेखिलेल्या तत्त्वाची दुधारी तलवार पुष्कळ वेळां चालवावयाला उपयुक्त ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. पण ती चालविणारा तशाच वस्ताद हवा. एरवीं त्या शस्त्रानें शत्रूचा गळा कापला जाण्याऐवजीं तलवार–बहाद्दराचेंच बोट कापलें जावयाचें ! /दुर्बळाच्या हातांतील तलवारीपेक्षां सबळाच्या हातांतल्या काठीलाच शत्रु अधिक भितो./ फेरवाल्यांचें तत्त्व बिनचूक मानलें तरी 'बाकीच्यासाठीं झगडा' किंवा 'कौन्सिलाच्या आंतून बाहेरून' पैकीं 'बाहेरून'ची चळवळ या अधिक प्रभावी व परिणामकारक उत्तरार्धाला हात घालण्याची पात्रता असणारे त्यांच्यामध्यें फारसे कोणी नव्हते, ही दिसती गोष्ट होती. फेर-

वाल्यांचे अध्वर्यु ( व मागाहून निघालेल्या प्रतिसहकारपक्षाचे अध्यक्ष ) बॅ. जयकर मागाहून कितपत टणक राहिले, तें कालांतरानें दिसून आलेंच. केळकरांची विचारसरणी तशीच आंब्याच्या कोईसारखी निसटती. ते Line of least resistance हुडकून काढून, मग हाच व्यवहारी, मुत्सद्देगिरीचा व टिळकांचा मार्ग होय असें प्रतिपादून मागाहून त्याच्यासाठीं समर्थनें व आधार शोधीत बसतात, असा त्यांच्याबद्दल पुष्कळांचा समज झालेला. विरोध करावयाचा झाला, तर तोही रागरंग बघून, टेंकू द्यावयाचा झाला तर तोही तानमान पाहून. वारा येईल तशी पाठ फिरविणें या धोरणालाही त्यांतल्या चांगल्या अर्थानें राजकारणांत स्थान आहे, यांत शंका नाहीं; पण म्हणजे त्याचा अर्थ दर एक बाबतींत पळवाटा ठेवीत जाणें, व तारेवरची कसरत करीत रहाणें हा नव्हे. शिवाय त्या धोरणालाही कांहीं मर्यादा आहे. त्याचा अतिरेक होऊन बोलांत बोल नाहीं आणि आजचें उद्यांला नाहीं अशी स्थिति होऊं लागली, तर त्यानें लोकांचा बुद्धिभेद होऊन कार्याचा घात होण्याची भीति असते. अशा प्रकारांनीं बुद्धीची कुशाग्रता वाढत असली तरी कर्तृत्वशक्ति बोथटच होते! केळकर दंड ठोकून छातीठोक पाय रोवून उभे राहिले आहेत, असें सहसा दिसावयाचें नाहीं, असें लोकांना वाटे. (या विधानाच्या पुष्ट्यर्थ हिंसावाद, असहकारिता, मुळशी-सत्याग्रह, कायदेभंग, खादी–धारण, बेळगांव साहित्य–संमेलनांतील कानडी–मराठी वाद, हिंदुमहासभेनें केलेली भागानगर निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ, परवां परवां आलेली व्हेल–योजना या सर्व बाबतींत, केळकरांचें सैल व मोघम लिखाण, किंवा उभयस्पर्शी पण खरें पाहिलें असतां घरसोडीचें धोरण, यांची संगतवार विसंगति दाखवून देतां येण्यासारखी आहे. पण तो विषय या पुस्तकांत इतक्या विस्तारानें येऊं शकत नाहीं.) पुन्हा उलट–सुलट वाद निघाला कीं त्यांत समन्वय–मेळ–मुरड इत्यादि प्रकार चालावयाचे. त्यांत गोष्ट अशी असते कीं, कोणतीही बाजू घेतली तरी मुरलेल्या माणसाला ती आपल्या बाजूनें सजवून–रंगवून दाखवितां येते; तिचें समर्थन करतां येतें. राजकारण हें उखळच असें आहे कीं, त्यांत पडलेल्या मुत्सद्द्याला सात घाव चुकवितां येतात. पण खऱ्या कळकळीच्या, पुरोगामी व धडाडीच्या राजकीय कार्यकर्त्याला केवळ

वकिली थाटाचें लिहिणें लिहून भागत नाहीं. म्हणून पुन्हा मुद्द्याचा तोच प्रश्न—एखाद्याचीं मतें कशीं कां असेनात, त्याचा वकूब काय आहे ? त्याची खरी वृत्ति कोणती आहे ? गांधींनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे,' People generally do not weigh the pros and cons of a problem, they follow their heroes' त्यांतील मर्म हेंच आहे. गांधींच्या या विधानांत वरवर दिसतें त्यापेक्षां अधिक सत्य भरलेलें आहे. पण Heroes पसंत करतांना विचारी जनतेनें त्यांची उलट–सुलट बाजू पाहूनच परीक्षा केलेली असते, हेंही त्याबरोबर विसरतां कामा नये. शिवरामपंत हे अंध गांधीभक्त कधींच झाले नव्हते. पण त्यांनीं गांधींचा स्वार्थत्याग ओळखला होता. गांधींची सरकार-विरोधी वृत्ति त्यांना मनोमन पटलेली होती. संघशक्ति वाढविण्याचें आणि जनतेंत आत्मविश्वास व स्वावलंबन उत्पन्न करण्याचें गांधींचें सामर्थ्य शिवरामपंतांच्या डोळ्याआड होणें शक्य नव्हतें.

अशा प्रकारची शिवरामपंतांची एकंदर विचारसरणी होती. टिळक जिवंत असते तर त्यांनीं काय केलें असतें हा प्रश्न उपस्थित करून कित्येकांनीं त्याला आपापल्या धोरणाला सोइस्कर अशीं उत्तरें देऊन टाकलीं आहेत. पण टिळकत्व आणि टिळकतत्त्व लक्षांत घेतां खालील अंदाज केला तर तो चुकीचा ठरणार नाहीं, अशी खात्री मनोदेवता आंतून देते. टिळकांनीं गांधी–चळवळीचा चांगला भाग सर्वात्मना उचलून धरला असता. सत्याग्रहांतील दडपण ( santcion ) उत्पन्न करण्याच्या सामर्थ्याचा उपयोग केला असता. गांधींचीं कांहीं कांहीं एका टोंकाच्या, लहरीपणाच्या, चमत्कारिक एकारलेल्या मतांना टक्कर देऊन खासगी चर्चेनें समजावून, मन वळवून किंवा त्यांनीं नच ऐकलें तर त्यांवर झोड उठवून तीं खोडून काढलीं असतीं. वेळेवर गांधींना आपल्या सैन्यांत सामील करून घेतलें असतें. आणि त्यांनीं फेरवाल्यांची ' आंतून–बाहेरून " अशी भाषा जी नुसती तोंडांतच राहिली होती, ती खऱ्या अर्थानें प्रत्यक्षांत आणली असती. यासंबंधांत चिरोलकेसमध्यें कार्सनसाहेबांच्या* उलटतपासणीला टिळकांनीं दिलेलीं उत्तरें मननीय आहेत:—

* केळकरकृत टिळकचरित्र–खंड तिसरा.

**कार्सन:**—एखाद्याला कायदा चांगला वाटला नाहीं तर त्यानें तो मोडावा कीं नाहीं ?

**टिळक:**—मोडावा. पण शिक्षा निमूटपणें सोसावी. ह्याचेंच नांव Passive ressistance.

× × × ×

**प्रश्न:**—' लोकांनीं स्वराज्याचे हक्क मिळविण्याकरितां जिवाचीही परवा केली नाहीं ' या लेखाला तुमची संमति होती काय ?

**उ०:**—होय. निःशस्त्र प्रतिकारानें ही गोष्ट केली तर त्याला माझी संमति होती.

**प्र०:**—लोकांनीं कायदा मोडला, तरी तुम्ही असें म्हणणार काय ?

**उ०:**—असें केल्याशिवाय वाईट कायदा रद्द होऊं शकत नाहीं.

**प्र०:**—सभा व विनंत्या ह्यांना तुम्हीं पोरखेळ म्हटलें आहे ना ?

× × × ×

**उ०:**—होय. जेव्हां त्यांचा उपयोग नाहीं तेव्हां ते पोरखेळच.

**प्र०:**—पण यापलीकडे काय करायला हवें होतें ?

**उ०:**—निःशस्त्र प्रतिकार.

**प्र०:**—म्हणजे काय ?

**उ०:**—स्वतः दुःख सोसून प्रतिकार करणें.

**प्र०:**—स्वतः दुःख सोसण्यानें प्रतिकार कसा होतो ?

**उ०:**—धार्मिक भावनेनें आपण दुःख सोसलें म्हणजे इतरांवर त्याचाही परिणाम होतो असें धर्मग्रंथांत सांगितलें आहे.

* * * *

त्यावेळची दासबाबूंची म्हणून जी एक चिठी प्रसिद्ध आहे त्यांतील महत्त्वाचीं वाक्यें खालीलप्रमाणें आहेत.

> " प्रॉव्हिन्शिअल ॲटॉनमी मागावी. नवीन निवडणुकीकरतां उभें रहावें. संप वगैरे करून करबंदीपर्यंत चळवळ भिडवावी. इ० "

या लहानशा चिठींत जी मोठी योजना आहे त्यांतल्यासारखीच टिळकांनीं तयारी आरंभली असती. आणि पूर्वीचा इतिहास व शिवराम-पंतांचा बाणा पहातां टिळकांनीं अशा रीतीनें चालविलेल्या चळवळींत शिवरामपंत टिळकांच्या निशाणाखालींच रहाते, यांत शंका घेण्याचें कारण नाहीं !

या सर्व विवेचनावरून एक गोष्ट सहज स्पष्ट होण्यासारखी आहे. ती ही कीं, १९२० च्या पूर्वीचे शिवरामपंत आणि नंतरचे शिवरामपंत यांत फरक नव्हता. तीच स्वातंत्र्याची लालसा आतांही होती. परसत्तेच्या शरीराला, नव्हे काळजाला, हात घालण्याची चळवळ करण्याची तीच ती पूर्वींची वृत्ति होती. साध्य तेंच, साधनें त्या तारुण्याच्या काळांत Active resistance, passive resistance अशीं दोन्ही सांगत होते. आतां कालमानाला अनुसरून व तूर्त अधिक सोईस्कर व फायदेशीर म्हणून तेव्हांप्रमाणें आतांही Passive Resistance चेंच तत्त्व ते पुरस्कारीत होते. हां, वरवर दिसण्यासारखा फरक एकदोन बाबतींत झाला होता. तो केळकरांनीं आपल्या 'गतगोष्टीं'त (१९३९) दाखविला आहे. ते लिहितात—

"परांजपे यांच्यावर भवितव्यतेनें असा सूड घेतला कीं, त्यांचा डौलदार श्रीमंती थाटाचा पोशाख म्हणजे तें पोपटी जाकीट, तें रेशीमकांठी उपरणें, तें झोंकदार पागोटें हीं सर्व जाऊन त्याजागीं बाळसंतोषासारखें खादीचे डगले आणि डोकीवर बेढब विन् आकाराची अर्धवट पांढरी खादीची टोपी आली. दोन वर्षांपूर्वींचे परांजपे दोन वर्षांनंतर कोणाला ओळखेनासे झाले. 'हें परांजपे नसून परांजप्यांचें शापग्रस्त भूत आहे' असें त्यांच्या भिजाशी पोशाखाकडे पाहून पूर्वीं डुलणारे लोक मनांत म्हणूं लागले."

वास्तविक यांत भवितव्यतेचाही कांहीं संबंध नाहीं आणि सूडाचा त्याहून नाहीं. देशासाठीं किंवा शिस्तीसाठीं आपण होऊन स्वेच्छेनें त्यांनीं आपल्या हातांनीं 'भिजाशी पोशाखा'चा त्याग केला व जाडीभरडीं वस्त्रें अंगावर घेतलीं व अखेरपर्यंत तें व्रत टिकविलें, ही गोष्ट पुष्कळ जाणत्या माणसांच्या मतानें उलट भूषणावह, निदान कौतुकास्पद ठरण्यासारखी आहे. पुन्हा हलूच किंवा हळू हळू पगडी घालण्याला त्यांना कुणीं मना केलें नव्हतें! पूर्वीं जितके लोक त्यांच्या भिजाशी पोशाखाकडे पाहून डुलणारे असतील त्यापेक्षां ती भिजास झुगारून दिलेली पाहून माना डोलावणारे अधिक निघाले असतील यांत शंका नाहीं. कारण भोगापेक्षां त्यागाची महती अधिक आहे. पण दुर्दैवानें याही बाबतींत मतभेद आहे, असें दिसतें! भर्तृहरीनें राज्यत्याग करून भगवीं वस्त्रें परिधान करून संन्यास घेतला हा भवितव्यतेचा

सूड होता काय ? किंवा खुद्द केळकरांनीं मध्यंतरीं कांहीं दिवस टोपीचा आश्रय केला होता तो भवितव्यतेचा सूड होता ? अशा गोष्टींना भवितव्यतेचा सूड म्हणत नाहींत. तर उभी हयात टिळकांपाशीं राहून ठोशास ठोसा अशीं मोठालीं तत्त्वें घोकून अगर घोकलीं असें म्हणून त्या तत्त्वांवर घडाडीचें राजकारण चालवूनही लोक तसें समजत नाहींत; व स्वतःच्या समजुतीप्रमाणें अत्यंत मुत्सद्देगिरीनें व 'टिळकांच्या खालोखाल' तेजस्वी, व्यावहारिक व फायदेशीर राजकारण चालविलें असतांही जनता मात्र त्याला दुर्बळ, दुटप्पी आणि अंगचुकार असें मानतें याला फार तर भवितव्यतेचा सूड असें म्हणतां येईल.

असो. केळकरांच्या वरील विधानांत, सूड घेण्याकरितां त्या बिचाऱ्या भवितव्यतेला उगीच पुढें करण्यांत आलें आहे ! तात्पर्य, वेष बदलला म्हणजे आंतला माणूस बदलत नाहीं. उलट वेष कायम ठेवण्याचा प्रयत्न करूनही आतला माणूस बदलूं शकतो ! गीतेंत

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि

या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें शरीरें दोन असलीं तरी आत्मा एकच, आणि कपडे वेगळे असले तरी माणूस तोच राहूं शकतो; हें तत्त्व ओळखलें पाहिजे. खरी व्यक्ति अंतरंगांत असते, बहिरंगांत नाहीं. तीच गोष्ट अनत्याचाराच्या ( किंवा पुढें पुढें अधिक रूढ झालेला शब्दप्रयोग वापरावयाचा तर अहिंसेच्या) तत्त्वासंबंधींची. फेरवाल्या पक्षापैकीं म्हणजे टिळकाभिमानी म्हणवून घेणाऱ्या स्वजनांच्याच पक्षांतले कांहीं लोक शिवरामपंत अहिंसावादी झाले असें वांकडें लावीत आणि चकित झाल्यासारखे होऊन म्हणत ' केवढें हें आश्चर्य ! काय ही तत्त्वच्युति, किंबहुना अधःपात ! ' वास्तविक या लोकांना अहिंसाही नको आणि हिंसा त्याहून नको अशी खरी गोष्ट होती. केळकर तर करनकऱ्याचा वसा घेतल्याप्रमाणें पूर्वी ' हिंसावाद हा विषवृक्ष आहे व तो समूळ उपटला पाहिजे ' असें म्हणून शिवरामपंतांना एकांतिक, अतिरेकी जहाल, अव्यवहारी असें म्हणावयाला तयार; आणि आतां तो 'विषवृक्ष' तूर्त टाकून देऊन ही अमृतवल्ली पत्करली, तरी सूड घ्यावयाला

भवितव्यतेला पाचारण करायला तयारच ! राजानें टोपी घेतली, राजा भिकारी; परत दिली, राजा भ्यायला; अशांतलीच ही अवस्था. दुसऱ्या कोणीं अहिंसा-स्वीकाराचा आरोप शिवरामपंतांवर केला तर तो एक वेळ शोभेल. पण अशा मंडळींनीं त्याबद्दल शिवरामपंतांवर टीका करणें म्हणजे शमीवृक्षावर शस्त्रें लपवून कांहीं दिवस दवून काढाव्या लागणाऱ्या पांडवांची विराटपुत्र उत्तरानें निर्भर्त्सना करण्यासारखें वाटतें, यांत शंका नाहीं. शिवरामपंतांच्या मनांतील असहकारिता नेभळी नव्हती आणि अनत्याचारही खुळ्या तऱ्हेचा नव्हता. अनत्याचाराच्या नांवाखालीं हाल-चालींना व जागृति करण्याला जें पुष्कळसें स्वातंत्र्य आपोआप मिळतें त्याचा फायदा घेण्याचीच त्यांची बुद्धि होती. अनत्याचार, अहिंसा हें धोरण ( Policy ) म्हणून त्यांना मान्य होतें. पण म्हणून विशेषतः अलीकडे अहिंसादेवीला गांधींनीं राजकारणांत जें उच्च आसनावर नेऊन बसविलें आहे, इतकें मानाचें व उंच स्थान देण्याला शिवरामपंत राजी नव्हते. " सध्यां इतक्यांतच या प्रश्नाचा कीस काढूं नये, पुढें मागें तशी वेळ आली म्हणजे पाहूं "* एवढेंच त्यांचें म्हणणें असे. पण त्यांचें मनोगत त्यांनाच त्यांच्याच शब्दांत सांगूं द्या. शिवरामपंतांच्या दोनतीन लेखांतले उतारे खालीं एकाच ठिकाणीं देण्यांत येत आहेत. त्यांवरून त्यांची या विषयावरची एकंदर विचारसरणी चांगली ध्यानांत येते.

" टिळक आणि म. गांधी हे दोघेही सर्वांना सारखेच वंदनीय आहेत. परंतु लो० टिळक हे म. गांधींपेक्षां कितीतरी जास्त मोठे होते, असें मानणें ज्यांना जरूर असेल, त्यांनीं तसेंही जरूर मानावें. त्याबद्दल कोणाचाही वाद नाहीं. गांधी मोठे कीं टिळक मोठे, आणि यांच्या तुलनेपासून काय सिद्ध होतें, हा कांहीं हल्लीं राष्ट्रापुढें प्रश्न नाहीं. आपला देश स्वतंत्र आणि स्वराज्ययुक्त कसा होईल हा लोकांपुढें मुख्य प्रश्न आहे. आणि हा प्रश्न वडिलांच्या कीर्ति गाऊन सुटण्यासारखा नाहीं. याच्याकरितां राष्ट्रामध्यें जितकी एकी उत्पन्न होईल, तितकी पाहिजे आहे. कार्यक्रम कोणताही असो, तो म. गांधींचा असहकारितेनें स्वराज्य मिळविण्याचा असो, किंवा लो० टिळकांचा निग्रहानें होमरूल मिळविण्याचा असो, त्याच्यामध्यें सर्व लोकांची एकवाक्यता होईल,तर त्या वृक्षाला सहजगत्या यशस्वितेचीं फळें आल्यावांचून

* स्वराज्यांतील निवडक निबंध भाग पहिला.

राहणार नाहींत. आणि म्हणूनच म. गांधी हे वारंवार असें म्हणत असत कीं, कोणताही कार्यक्रम झाला, तरी तो आपल्याला स्वराज्य देईल, असा दृढ विश्वास तुमच्या मनांत तुम्ही उत्पन्न करा ! फळ विश्वासांत आहे, कार्यक्रमाच्या पोटभेदांत नाहीं. सामर्थ्य हें मनुष्याच्या मानसिक विश्वासामध्यें आहे. कोळ्याच्या लाळेपासून निघणाऱ्या तंतुजाळाप्रमाणें एखाद्या मनुष्याच्या कल्पनेंतून दिवसांतून तीनदां प्रसव पावणाऱ्या स्कीम्समध्यें नसतें. म. गांधींचा कार्यक्रम निर्दोष म्हणून नव्हे, तर त्यांच्या आध्यात्मिक बलावर लोकांचा विश्वास म्हणून असंख्य लोक त्यांचे अनुयायी बनले आहेत. तुमच्या स्कीममध्यें तार्किक दृष्ट्या बिलकुल दोष नसतील, पण तुमच्यावर लोकांचा बिलकुल विश्वास बसत नाहीं, या दुर्दैवाला आपण काय करणार?...

"......म. गांधींच्या कार्यक्रमावर विघातक टीका करीत बसण्यापेक्षां जर बृहन्महाराष्ट्रानें होमरूल कांहीं थोडाबहुत जवळ आणिला असता, तर लो. टिळकांना खात्रीनें जास्त आनंद झाला असता !

"परंतु असो. हल्लींची वेळ अशी आहे कीं, आपल्या सर्वांना एक होतां आलें, तर शक्य त्या प्रयत्नानें आपण एक झालें पाहिजे. भांडण वाटेल तेव्हां करितां येईल. पण कांहीं एक मर्यादा उल्लंघन करून गेल्यानंतर मग एकी उत्तरोत्तर जास्त दुर्घट होत जाते. म्हणून भांडणें वाढविण्यांत अर्थ नाहीं. मागें चुका झाल्या असल्या, तर त्या पुढें न होतील एवढी खबरदारी बाळगून आपण यापुढें तरी एकीनें वागलें पाहिजे. सरकारशीं नॉन-को-ऑपरेशन करण्याचें थांबवून आपण आपसांमध्येंच नॉन-को-ऑपरेशन करूं लागलों, तर मग सरकारला याच्यापेक्षां आणखी जास्त तें काय पाहिजे? याकरितां कोणी कोणाच्या उखाळ्यापाखाळ्या न काढतां दोघांनीं मिळून तिसऱ्यांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्याकरितां एक झालें पाहिजे, तरच आपल्याला स्वराज्य मिळेल. व्यक्तींच्यासाठीं देश नाहीं, देशासाठीं आपण सर्व व्यक्ति आहों, ही उच्च आणि उदात्त भावना आपण आपल्या मनांत बाळगिली, तर परमेश्वर आपल्याला अजूनही स्वराज्याच्या सुखाचे दिवस खात्रीनें लवकर दाखवील !"

"......फेरफार हे त्यांतील तार्किक निर्दोषतेवरून केवळ स्वीकारले जातात असें नसून ते सुचविणाऱ्या माणसांच्या योग्यतेवरूनही त्या फेरफारांची किंमत लोक ठरवितात......"

"......खरें पाहिलें असतां अकोलावाले आणि इतर राष्ट्रीय पक्षांतील लोक यांच्यामध्यें खऱ्या आणि महत्त्वाच्या मतभेदाचा एखादा मुद्दा असेल, तर तो फक्त कौन्सिलमध्यें जाण्यासंबंधींचा होय. व त्या मुद्द्याबद्दल त्यांनीं प्रामाणिकपणानें आपले प्रयत्न चालू ठेविले असते, तर त्याबद्दल कोणाचें कांहीं म्हणणें नव्हतें. परंतु म. गांधींच्या बहुतेक प्रत्येक गोष्टीला विरोध करून त्याच्या जागीं आपलें दुसरें कांहीं तरी म्हणणें मांडावयाचें, ही कांहीं सलोख्याची वृत्ति नव्हे....

"......आपण जी गोष्ट करावी, असें आपले प्रतिपक्षी इच्छित असतात ती गोष्ट आपण सहसा करूं नये, असा एक सामान्य नियम आहे. इंडियन लोकांनीं कौन्सिलमध्यें यावें, ही अधिकाऱ्यांची मनापासूनची इच्छा! व आपल्या कौन्सिलावर लोकांनीं बहिष्कार घातल्याबद्दल अधिकाऱ्यांना मनापासून विषाद! अशा स्थितींत चितागांग, पेण, नागपूर, वगैरे ठिकाणीं निघालेल्या कांहीं उद्गारांवरून कॉंग्रेसच्या जहालांपैकीं कित्येक लोक कौन्सिलांतून येत आहेत, असा नुसता अंधुक देखावा पाहून देखील टाइम्स ऑफ इंडियासारख्या लोकांना किती तरी आनंद झालेला आहे, हें पाहून आपल्या प्रतिपक्षाला आनंद देणारें आणि स्वजनांच्या मनामध्यें विषाद उत्पन्न करणारें कृत्य आपण करावें किंवा न करावें, हा अकोलावाल्यांनीं एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे."

अत्याचार व म. गांधींचा अनत्याचार ( किंवा अहिंसा ) या दोन तत्त्वांची चिकित्सा करणाऱ्या 'महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचारी' या अत्यंत विवेचक लेखांत शिवरामपंतांनीं, स्वतः कांहीं एक न करतां नुसत्या गर्जना करणाऱ्या फेरवाल्यांचीं पांघरलेलीं कातडीं ओढून काढून त्यांचें स्वरूपाविष्करण केलें होतें.

"......राज्यक्रांतीला रक्तपात व्हावा लागतो, ही गोष्ट जरी खरी असली, तरी राज्यक्रांतीसाठीं रक्तपाताची तयारी प्रथमपासूनच व्हावयाला पाहिजे, ही गोष्ट खरी नाहीं. इंग्लिश लोक हिंदुस्थानांत राज्य उभारण्याचें मनांत आणूं लागले तेव्हांपासून त्यांनीं अत्याचाराला सुरवात केली नाहीं. प्रथमपासून जवळ जवळ अगदीं शेवटपर्यंत, त्यांनीं बाहेरून अनत्याचारित्वाचेंच सोंग घेतलें, होतें. किंबहुना आपण अत्याचारी आहों, अशी वर्तणूक त्यांनीं पहिल्यांदाच दाखविली असती, तर हिंदुस्थानच्या त्या वेळच्या लोकांनीं त्यांना

या देशांत थाराही दिला नसता. या राज्यक्रांतीच्या बाबतींत अत्याचाराचीही जितकी जरूरी आहे तितकीच अनत्याचाराचीही आहे. प्राचीन काळच्या उदाहरणांत लढाई, रक्तपात, राज्यप्राप्ति वगैरेंचा अन्योन्य संबंध दिसत असला तरी हल्लींच्या या विसाव्या शतकांत जगाचें पाऊल सुधारणेच्या बाबतींत पुढें पुढें पडत असतां, तेंच तेंच तोडगे करून गुण आणण्याचा प्रयत्न सफळ करून घेणें योग्य नाहीं.

"रक्तपाताशिवाय स्वराज्य कोणालाही मिळालें नाहीं, ही गोष्ट म. गांधींनीं इतिहासांत वाचली नव्हती, असें नाहीं. पण हे अत्याचाराचे दाखले दाखविणारे त्यांतले तज्ज्ञ म. गांधींना त्यांच्या अनत्याचारित्वाच्या तत्त्वासाठीं नांवें ठेवीत असत ! महाराष्ट्राची परंपरा धाडसाची, शौर्याची, धडाडीची आणि ठोशास ठोसा देण्याची आहे, ही गोष्ट हे लोक म. गांधींना बजावीत होते ! टक्कर देण्यासाठीं यांचे बाहू स्फुरण पावत होते ! शठाबरोबर शठ झालें पाहिजे, असें या लोकांना वाटे ! एका गालावर चापट मारली तर दुसरा गाल क्षणभर भावी कार्यभाग साधून घेण्यासाठीं सहनशीलतेचा आविर्भाव आणून पुढें करावा, हें तत्त्व न पटून या लोकांच्या हातांचीं बोटें उलट थोबाड फोडण्यासाठीं वळवळत होतीं ! लहान लहान पण शाळेंतून आणि कॉलेजांतून जाणाऱ्या मुलांना हें निगरगट्टपणाचें तत्त्व बालपणींच शिकविलें, तर त्यांच्या भावना कधींही उद्दीपित होणार नाहींत, त्यांच्या हातून कोणतीही क्षोभकारक कृत्यें घडून येणार नाहींत, व ते मोठेपणीं नेभळे व हतवीर्य बनतील, अशी या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांना भीति वाटूं लागली. या सुप्रजानिर्माणशास्त्रासाठींच त्यांनीं म. गांधींच्या चळवळींत अंगचुकारपणा केला, आंतून धूसफूस चालविली आणि वरून मुग्धता स्वीकारिली....

"......या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांना हें समजावयाला पाहिजे होतें कीं, साधनांच्या दृष्टीनें अत्याचार आणि अनत्याचार हीं दोन्हीही तत्त्वें परस्परविरोधी आहेत असें नाहीं. **अनत्याचाराचें रूपांतर अत्याचारांत पुढें मागें केव्हां होणारच नाहीं, असें नाहीं.** अनत्याचार फक्त कांहीं ठराविक मुदतीपर्यंतच पाळावयाचा होता. मुदतीनंतरचा कार्यक्रम पुढें ठरणार होता.

"अत्याचार आणि अनत्याचार या दोन्ही तत्त्वांच्या मुळाशीं एक प्रचंड शक्ति आहे, ही गोष्ट म. गांधींनीं ओळखली होती. ही शक्ति निर्माण करण्याचें काम एक वर्षांत केलें म्हणजे पुढील मार्ग मुळींच दुर्घट गेला नसता.

" अनत्याचाराची पूर्वतयारी दाखविल्यानंतर जनतेनें अत्याचाराकडे बोट वळविलें असतें, तर म. गांधींनींही आपलें अनत्याचारित्वाचें तत्त्व अगदीं राज्यप्राप्ति होण्याच्या वेळीं देखील सोडलें नसतें असें नाहीं. जनतेची तयारी आणि एकंदर वातावरण पाहून म. गांधींनीं आपले कार्यक्रम मधून मधून बदलले नाहींत काय? पण एक वेळ या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांच्या समाधानासाठीं असें गृहीत धरूनच चाललें कीं, म. गांधींनींही आपला अनत्याचारित्वाचा आग्रह सोडला नसता व अगदीं शेवटीं त्यांनीं आपली एकटी व्यक्ति सबंध जनतेंतून काढून घेतली असती, तर मग अर्थात् त्या वेळीं जनतेनें म. गांधींना टाकूनच दिलें असतें. म. गांधींनींही त्या वेळीं आपल्या डिक्टेटरच्या जागेचा राजीनामा दिला असता ! आणि अनत्याचारित्वाच्या तत्त्वानें संपादन केलेल्या शक्तीवर थोड्याशा अत्याचारानें म. गांधींच्या मदतीशिवाय जनतेनें यशःप्राप्ति करून घेतली असती. पण इतका दूरवर विचार या राष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचारी लोकांच्या तरतरीत डोक्यांत कसा यावा ?......या अनत्याचारित्वाच्या चळवळीनें म. गांधी हे आपणां हिंदुस्थानांतील लोकांच्या हातांत एक सामर्थ्य आणून देत होते. त्या सामर्थ्याचा उपयोग मग आपणांस वाटेल तसा करतां आला असता......

"......यांना म. गांधींचें तत्त्व पसंत नव्हतें, पण यांना जें तत्त्व पसंत होतें त्या तत्त्वाच्या फैलावासाठीं यांनीं गेल्या दीड दोन वर्षांत काय कामगिरी बजाविली आहे ? कोणता दिग्विजय गाजविला आहे ?.........मग ही आपण होऊन पसंत केलेली रूपरेषा या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांनीं आपल्या कार्यक्रमांत मुळींच कशी आणली नाहीं ? नुसत्या म. गांधींना शिव्या देऊनच हे आपल्या आयुष्याची किंमत करून घेणार आहेत काय ? या सर्वसंमत अनत्याचारित्वाच्या दिवसांत अत्याचाराची हौस वाटणाऱ्या इसमाला पुष्कळ उत्तम उत्तम संध्या आहेत.

"...किंवा या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांचे दिसावयाचे दांत वेगळे आहेत आणि खरोखरीचे दांत वेगळे आहेत ! स्वतः कांहीं एक देखील न करतां नुसते प्रतिष्ठित अत्याचारी म्हणून मिरवून कालमानाप्रमाणें स्वीकारिलेल्या अनत्याचारित्वाच्या योग्य व न्याय्य मार्गांत म. गांधींना शिव्या देण्यासाठींच काय यांचा पुरुषार्थ ? हाच यांचा अत्याचार ? सत्याग्रहासारखी साधी गोष्ट करून फुकट हालअपेष्टा सहन करणें महाराष्ट्राच्या परंपरेच्या दृष्टीनें

चुकीचें ठरतें, म्हणून ती गोष्ट करावयाची नाहीं ! दुसऱ्या उरलेल्या गोष्टींबद्दल हे महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचारी गेल्या एक दोन वर्षांप्रमाणें हल्लीं देखील उदासीनच आहेत. काय करतात बिचारे ! मनांतल्या मनांत जळत आहेत. या वीरशिरोमणींच्या धीरोदात्त कृतीला महात्माजींची शिकवणूक आडवी येते ! हे धैर्यमणी आपापल्या पांचपंचवीसांच्या टोळ्या कोणत्या सेनानायकाच्या हुकमासाठीं थपकवून ठेवीत आहेत कोणास ठाऊक ! त्यांचे ते कमाविलेले बाहू, भरलेली छाती, घष्टपुष्ट शरीरें, या अनत्याचारित्वाच्या प्रसारामुळें कशीं अगदीं कुचकामी झालीं आहेत ! फक्त आंतून आणि थोडी थोडी बाहेरून, दुसऱ्यांच्या कुचेष्टेनें आपली प्रतिष्ठा माजविण्यासाठीं, निंदेची कृतिशून्य तोंडपाटिलकी मात्र यांनी अहोरात्र सुरू आहे......

"......हे महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचारी गेल्या वर्ष दीड वर्षांत अनत्याचाराचा उघड आणि गुप्त उपहास करण्याचें सोडून देऊन म. गांधींच्या मदतीला आले असते, तर म. गांधींचा आणि हिंदुस्थान देशाचा बराच कार्यभाग सुलभ झाला असता. पण आपसांतील दुहीचें नष्टचर्य जें हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या पाठीमागें लागलें आहे, तें कोणाच्या तरी कमनशिबाच्या जोरावर अजून संपून जात नाहीं, ही एकच गोष्ट निर्विवाद आहे, असें म्हणणें भाग पडतें....

१९२० नंतर महाराष्ट्रांत टिळकांच्या किंवा राष्ट्रीय पक्षांत जे दोन तट पडले त्यांच्यांतील मतभेदाचें स्वरूप याप्रमाणें होतें. शिवरामपंत आपलीं स्वतःचीं मतें कशींही असलीं व तीं दुसऱ्यांना पटवून देण्याचा ते प्रयत्न करीत असले, तरी अखेर बहुमताच्या निर्णयाप्रमाणें चालावयाचें हें त्यांचें धोरण पूर्वीपासून कसें होतें, हें मागें सांगितलेलेंच आहे. टिळकांशींसुद्धां कांहीं कांहीं बाबतींत त्यांचे मतभेद नव्हते, असें नाहीं. त्याचप्रमाणें गांधींच्या धोरणाशींही होते. परंतु आपसांतले मतभेद जगाला न दाखवितां, म्हणजे आपसांत कांहीं बाबतींत फूट असली तरी तिचें प्रदर्शन किंबहुना ती बाहेर कळूंही न देतां सरकाराविरुद्ध भांडणांत आपण सर्व एक अशा भावनेनें व आविर्भावानें वागावयाचें असें शिवरामपंतांचें ठरीव सूत्र होतें. अशी वास्तविक खरी स्थिति होती. पण त्यालाच निराळी कलाटणी देऊन केळकरांनीं आपल्या 'जीवनयात्रे'त ही वस्तुस्थिति कशी दाखविली आहे पहा.

" असहकारितेच्या या ठरावानें राष्ट्रीय पक्षाची फळी दुभंगली. टिळकांच्या वेळींही या पक्षांत डावी व उजवी अशा दोन बाजू होत्याच. डावी म्हणजे एकांतिक जहाल मतवाल्यांची. आणि उजवी म्हणजे सारासार विचार करून, व्यवहारांत लक्ष घालून राष्ट्रीयच पण मध्यक्रमिक मतवाल्यांची.साध्याच्या दृष्टीनें दोघे सारखेच. पण साधनाच्या दृष्टीनें थोडेथोडे वेगळे. याविषयीं कांहीं उदाहरणेंच देतों, म्हणजे लक्षांत येईल. डाव्या बाजूचें टोक म्हणजे चित्रशाळेचे वासुकाका जोशी, आणि उजव्या बाजूचें टोंक म्हणजे दादासाहेब खापर्डे. शिवरामपंत परांजपे हे डाव्या बाजूंत नेहमींच मोडावयाचे. **गांधींच्या आधींपासूनच कायदेकौन्सिलाविषयीं त्यांचा बहिष्कार मनानें सिद्ध झाला होता.** याकरतां आणि त्यांतल्यात्यांत निवडणुकीला खर्च लागतो म्हणून, ते कोणत्याही जागेला उमेदवार म्हणून उभे राहिले नव्हते. म्हणून असहकारितेंतील कौन्सिल-बहिष्कार त्यांना पूर्ण संमत झाला. **इतर कांहीं कलमांसंबंधानें मात्र त्यांचा गांधींशीं मतभेद होता.** पण त्यांचा स्वभाव विधायक टीका करण्याचा कधींच नसल्यामुळें त्यांना अमुक हवें, अमुक नको, असें नक्की कधींच कोणास कळलें नाहीं. राष्ट्रीय भावनेनें एखादा मुद्दा घ्यावयाचा, आणि तो तेवढा रंगविण्यांत आपली प्रतिभा खर्चावयाची. टिळकांच्या वेळींही जोशी व परांजपे हे टिळकांचीं कांहीं कांहीं मतें अमान्य करणारांपैकींच होते. आणि आतां तर हुल्लडीची एक नवी संधी आली. ते ती कशी सोडणार ? "

या लिहिण्यांतला विपर्यास अगदीं उघड आहे. याच ग्रंथांत केळकरांनीं स्वतः कांहीं कांहीं वेळेला टिळकांच्या मताविरुद्ध आपलीं बाणेदार व स्वतंत्र मतें प्रकट केलीं हें नमूद करून त्याबद्दल अभिमान भोगला आहे. ती झाली ' स्वातंत्र्य-प्रियता '; पण दुसऱ्या कोणीं टिळकांचीं मतें अमान्य केलीं तर ती झाली हुल्लड ! केळकरांनीं आपल्या स्वभावावर समतोलपणाचा छाप मारून घेतलेला नसता तर वरील उतारा विपर्यास करण्याच्या व द्वेषाच्या बुद्धीनें लिहिलेला आहे असें म्हणावें लागलें असतें ! शिवरामपंतांच्या मृत्यूनंतर दहा वर्षांनीं लिहिलेल्या त्यांच्या ' गतगोष्टी अर्थात् माझ्या जीवनयात्रें 'त बऱ्याच ठिकाणीं त्यांचेविषयीं

व्यक्ति-विषयक उल्लेख आले आहेत ते बहुतेक वरील मासल्याचेच आहेत. ' मरणान्तानि वैराणि ' असा एक शिष्ट-संप्रदाय आहे. पण त्यांतल्या संकेताला केळकरांनीं आपल्या ' जीवनयात्रे 'त फारशी किंमत दिलेली दिसत नाहीं. जागोजाग अनेक मोठ्या व्यक्तींची स्वतःशीं तुलना उभी करून त्यांजवर जी वैयक्तिक टीका केली आहे, त्यापेक्षां तत्त्वांपुरती केली असती, तर तें शोभून गेलें असतें. दर्शनासाठीं आलेले कांहीं ' यात्रेकरू ' आपल्या निष्ठेचें प्रदर्शन करण्याकरितां मोठ्यांदा टाळ कुटीत जातात, किंवा गर्दीत पुढें सरकण्याकरितां इतरांना धक्काबुक्की करितात, तसाच कांहींसा प्रकार या ' जीवनयात्रे 'त स्पष्टपणें दिसून येतो ! अर्थात् चांगली बाजू किंवा निदान शिवरामपंतांच्या दृष्टीनें जी खरोखरी त्यांची बाजू होती ती पुढें मांडण्याची जबाबदारी केळकरांचेवर नव्हती, हें कबूलच केलें पाहिजे ! असो. या विपर्यस्त आक्षेपांचें निरसन करण्याचा हेतु येथें नाहीं. केळकरांचा वरील उतारा येथें मुद्दाम देण्याचें कारण एवढेंच कीं, लेखनांतला त्यांचा हेतु कसाही असला, तरी शिवरामपंतांचें खरें व्यक्तिमत्त्वच त्यांत चित्रित झालेलें आहे, मात्र हें चित्र कॅमेरा हलल्यामुळें जसा फोटो निघतो तसें झालें आहे. तथापि, त्यांतही खरी व्यक्ति पहाणाऱ्याला ओळखल्याशिवाय रहात नाहीं. वरील उताऱ्यांत विपर्यस्तपणाचा जो पीळ किंवा तिढा घातला आहे, तो काढून टाकला म्हणजेच शिवरामपंतांचें व्यक्तिमत्त्व सरळ शिल्लक रहातें. कोण म्हणतो त्यांचे टिळकांशीं मतभेद नव्हते ? मतभेद जरूर होते. त्यानंतर गांधींशींही झाले. यांत उलट त्यांचा स्वतंत्र बाणाच दिसून येतो. पण वैशिष्ट्य हेंच कीं, ते मतभेद त्यांनीं राष्ट्राच्या प्रगतीच्या आड येऊं दिले नाहींत, अगर वेशीवर टांगले नाहींत. कौरव-पांडवांत आपापसांतल्या कुरबुरी असल्या तरी बाहेरच्या शत्रूविरुद्ध आम्ही एकशेंपांच, अशा प्रकारचीच शिवरामपंतांची मनोभावना होती. स्वराज्यांतील लेखांत त्यांनीं हेंच तत्त्व प्रतिपादन केलें आहे. ...त

"अमका असहकारितावादी अमक्या असहकारितावाद्याच्या वि... असें बोलतो आणि तमका दुसऱ्याच्या विरुद्ध तसें करतो, या दोनतीन बाण्या कलागती लावून देण्यापासून ज्ञानप्रकाशाला का... एक रेषा

आहे ? असहकारितावाद्यांत कांहीं किरकोळ मतभेद असले, तर ते आम्ही आपसांत पाहून घेऊं आणि मिटवूनही घेऊं. "

महाराष्ट्रांतला राष्ट्रीय पक्ष एकमुखी रहावा, अशी शिवरामपंतांची फार इच्छा असे. आपसांतील ऐक्याविषयींची त्यांची तळमळ स्वराज्यांत वारंवार प्रकट होत असे. पण तसें घडून आलें नाहीं. असो. महाराष्ट्रांत असहकारिता विरुद्ध कौन्सिल-प्रवेश असे जे दोन पक्ष पडून मतभेद वाढत गेला त्याचें तात्त्विक विवेचन आतांपर्यंत केलें. यापुढें या काळांतल्या हकिगती थोडक्यांत देऊन हें प्रकरण समाप्त करूं.

सन १९२२ मध्यें मुळशी-सत्याग्रहाच्या शिक्षेंतून सुटून आल्यावर पुढच्याच सालाकरितां शिवरामपंतांची महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदावर निवड झाली. फेर-नाफेर पक्ष नुकतेच पडले असल्यामुळें विरारच्या प्रांतिक सभेंतील ही निवडणूक मोठी चुरशीची झाली. नाफेर-पक्षातर्फें शिवरामपंत व फेरवाल्यातर्फें जमनादास मेथा यांना उभें करण्यांत आलें होतें. तडजोडीचे प्रयत्न करण्यांत आले; पण ते निष्फळ झाले. स्वतः शिवरामपंत, मेथा व विठ्ठलभाई पटेल यांचेकडे बोलणें करण्याकरितां गेले होते. निवडणुकीच्या वेळीं सभेंत दंगल माजली. एवढेंच नव्हे, तर डोकीं फुटण्यापर्यंत पाळी आली. विरारची सभा म्हणजे सुरतेची छोटी आवृत्तीच ठरली. एका सभेच्या दोन सभा झाल्या आणि दोन सवते सुभे होऊन एकाच प्रांताच्या दोन कमिट्या निवडून आल्या ! यामुळें कोणती कमिटी अधिकृत हें ठरविण्याकरितां कॉंग्रेसची एक सब्-कमिटी नेमण्यांत आली होती. तिनें महाराष्ट्रांत येऊन तपासणी करून असा निकाल दिला कीं, सध्यां जे पदाधिकारी निवडून आले म्हणून जाहीर झालें आहे तेच रहावे; पण १९२२-च्या कॉंग्रेस अधिवेशनांत ज्या पक्षाचें बहुमत ठरेल त्या पक्षाचे लोक निवडून आले असें समजावें. पुढें याच पक्षाचें बहुमत झाल्यामुळें शिवरामपंतच प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्ष कायम झाले. नंतर १९२४ सालीं कॉंग्रेसनें कौन्सिल-प्रवेशाला मान्यता दिली व स्वराज्य-पक्षाची स्थापना झाली. त्यावेळीं बहुमताला मान देण्याकरितां म्हणून शिवरामपंतांनीं कौन्सिल-प्रवेश-प्रचाराकरितां दौरे काढले होते. त्यापूर्वींच महाराष्ट्रांत कौन्सिल-प्रवेशेच्छु लोकांचा प्रबळ

गट होत होता. त्यानेंच पुढें स्वराज्य-पक्षांतून फुटून आणखी एक प्रतिसहकारपक्ष स्थापला, हा इतिहास प्रसिद्धच आहे. त्यांना दिसत होतें कीं, तूर्त तरी आपल्या मताविरुद्ध वारे वहात आहेत. पण म्हणून त्यांनीं आपल्या मताला मुरड घातली नाहीं. सवंग लोकप्रियतेला भुलले नाहींत. पुन्हां पगडी चढवून कौन्सिलांत चला म्हणणें हें त्यावेळीं अधिक सोपें व सोईचें होतें, पण तसें त्यांनीं केलें नाहीं, यांतच त्यांचा मोठेपणा दिसतो. या काळांत त्यांना बरीच अप्रियता सोसावी लागली. ती त्यांनीं आनंदानें सोसली. पण ' न निश्चितार्थात् विरमन्ति धीराः' हें व्रत आमरणान्त पाळलें.

सन १९२४ च्या जानेवारी महिन्यांत तुरुंगांत एकाएकीं म. गांधी यांचा अपेंडिक्सचा विकार बळावून त्याकरितां त्यांचेवर ससून हॉस्पिटल-मध्यें शस्त्रक्रिया करावी लागली. व त्यानंतर महात्माजी हॉस्पिटल्-मध्यें रहात असतानाच त्यांची मुक्तता केल्याचें सरकारनें जाहीर केलें. या काळांत रोज संध्याकाळीं शिवरामपंत महात्माजींच्या भेटीला, समा-चाराला जात असत. पूर्वीच झालेला जुजबी नैमित्तिक परिचय या प्रसंगानें दृढ झाला होता. संध्याकाळीं इस्पितळाच्या आवारांत हिंडतांना दोघांचें संभाषण अनेक विषयांवर होत असे. त्याचेनंतर पुढल्या वर्षीं महात्माजी पुण्यास आले होते त्यावेळीं त्यांचा मुक्काम एक दिवस शिवरामपंतांकडेच होता. १९२० चे नंतर कॉंग्रेस पुढारी पुण्यास येत जात, त्यावेळीं शिवरामपंतांचें घर हेंच त्यांचें उतरण्याचें ठिकाण होऊन बसलें होतें. या काळांत महाराष्ट्रांतील असहयोगी पक्षाचे तेच पुढारी समजले जात. पूर्वीच्याप्रमाणेंच आतांही त्यांचें स्वार्थत्यागपूर्वक देश-सेवेचें व्रत अखंड चालूच राहिलें. काळाच्याऐवजीं आतां स्वराज्य होतें. कांहींच्या मतें काळाची सर स्वराज्याला आली नाहीं. उलट कांहींच्या मताप्रमाणें "काळाच्या वेळीं महाराष्ट्रांत दुही नव्हती, बुद्धिभेद केला जात नव्हता, म्हणून ती कामगिरी खुलून दिसली. स्वराज्य पत्रानें महात्मा गांधींचें राजकारण महाराष्ट्रांत आणलें. म्हणूनच आज महाराष्ट्रांत गांधींची चळवळ दिसत आहे व कॉंग्रेसचें तेज पडत आहे."

एकंदरींत शिवरामपंतांच्या या काळांतील कार्याविषयीं दोनतीन मतें प्रचलित आहेत एवढी गोष्ट खरी. १९२० सालांत जर एक रेषा

ओढली किंवा काढिली, तर शिवरामपंतांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमाचे दोन भाग सहज आणि तेही ढळढळीत असे पडतात. कांहीं लोक तर असें म्हणणारे आहेत, कीं पूर्वाश्रमांतले शिवरामपंत पुढें राहिले नाहींत. ते बदलले व अखेर दुराग्रहाला बळी पडून त्यांच्यांत जमीन–अस्माना-इतका फरक पडला. एवढेंच नव्हे, तर

मोळिविक्यानें काष्ठें फोडाया असिलता वना नेली

या मयूरकवीच्या उक्तीप्रमाणें त्यांच्या कर्तृत्वशक्तीसंबंधानें झालें. परंतु हा आक्षेप पक्षापक्षांत एकदां वाद सुरू झाले म्हणजे उर्णींदुर्णी निघतात, त्या मासल्याचा असून असा आक्षेप घेणारा वर्ग अगदींच लहान आहे. तो सोडून दिला तरी परांजप्यांच्या चहात्या व अभिमानी वर्गामध्येंही दोन मतें आहेत. गांधींच्या आहारीं जाऊन जुना राष्ट्रीय किंवा पर्यायानें टिळकांचा पक्ष त्यांनीं डावलला, असें प्रामाणिकपणें वाटणारे कांहीं लोक आहेत. याच्या अगदीं उलट म्हणजे सूक्ष्म पापुद्रे सोलीत न बसतां स्थूलमानानें टिळकांचे राजकारणांत जी धडाडी व हल्ला होता तोच त्यांना गांधींच्या कार्यक्रमांत दिसला, म्हणूनच त्यांनीं गांधी-पक्ष उचलला व तेंच योग्य होय, असेंही मानणारे कांहीं लोक आहेत. या समजुतींतून सत्य किती, असत्य किती हें हंस-क्षीरन्यायानें ज्याचें त्यालाच पारखतां येण्यासारखें आहे. पण ज्या ज्या ठिकाणीं म्हणून सरकारला खरा विरोध होईल, चिमटा बसेल असें त्यांना प्रामाणिकपणें वाटलें, तें तें धोरण उचलून धरण्याचा बाणा त्यांनीं जन्मभर टिकविला, या गोष्टीबद्दल दुमत होणार नाहीं एवढें निश्चयानें म्हणतां येईल.

सन १९२७ मध्यें त्यांच्या वयाला त्रेसष्ट वर्षें पुरीं झालीं होतीं, तथापि त्यांची उमेद व उत्साह तरुणपणांतल्या इतकाच कायम होता, यांत शंका नाहीं. परंतु या सुमाराला त्यांची प्रकृति नीट नसल्यामुळें व या वयांत वर्तमानपत्र व छापखाना यांच्या कामाचा दैनंदिन व्याप व दगदग संभाळणें अशक्य होऊं लागल्यामुळें त्यांनीं प्रेस काढून टाकला, व स्वराज्य-पत्र श्री. शंकरराव देव व हरोलीकर यांचे स्वाधीन केलें. या काळांत देशांतल्या राजकारणाला मंदाई तर आलेली होतीच; पण शिवाय आपसांतील माजलेले मतभेद आणि बुद्धिभेद पाहून त्यांच्या अंतःकरणांत विषाद उत्पन्न होत असे.

## १४

# बेकीची एकी

" ...याकरितां कोणी कोणाच्या उखाळ्यापाखाळ्या न काढतां दोघांनीं मिळून तिसऱ्यांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्याकरितां एक झालें पाहिजे, तरच आपल्याला स्वराज्य मिळेल. व्यक्तींच्यासाठीं देश नाहीं, देशासाठीं आपण सर्व व्यक्ति आहों, ही उच्च आणि उदात्त भावना आपण आपल्या मनांत बाळगिली, तर परमेश्वर आपल्याला अजूनही स्वराज्याच्या सुखाचे दिवस खात्रीनें लवकर दाखवील. "

—शि. म. परांजपे ( स्वराज्य )

" शिवरामपंतांचा स्वभाव अत्यंत मानी असे. पण हा मानी स्वभाव परक्यांच्याकरितां होता. स्वकीयांशीं ते अत्यंत प्रेमळ, माऊळे व निरभिमानी असत. त्यांच्या संगतींत असणाऱ्या गृहस्थाला त्यांच्या विद्वत्तेचा जसा लाभ मिळे, तशी त्यांच्या विनोदी स्वभावाचीही ओळख पटे. लोकांशीं मिळून मिसळून वागण्यांत व तडजोड करण्यांत त्यांचें पाऊल केव्हांही पुढें होतें ! " या समेटाच्या वृत्तीचें प्रत्यंतर १९२८ च्या आरंभीं सायमन कमिशनवरील बहिष्काराचे वेळीं व पुढेंही आलें. प्रतिसहकार पक्ष व असहयोगी पक्ष हे दोन्ही यावेळीं एक झाले, व हें ऐक्य आणखी दीडदोन वर्षें म्हणजे शिवरामपंतांच्या हयातीपर्यंत टिकलें. याचे आधींच तीनचार वर्षांपासून खुद्द असहयोगी पक्षांतही दोन गट पडल्यासारखे झाले होते. कांहीं लोक गांधीनिष्ठ किंवा गांधीमय बनण्याच्या मताचे होते किंवा बनत होते. ही मंडळी शब्दप्रामाण्यवादी असल्यामुळें गांधी म्हणतील तेंच तंतोतंत आचरणांत आणावयाचें व त्याचा

प्रसार करावयाचा, असें त्याचें धोरण असे. शिवरामपंतांना, व्यक्ति कितीही थोर असली तरी तिचे देव्हारे माजविणें, किंवा सूतकताई इत्यादि किरकोळ गोष्टींचें स्तोम वाजवीपेक्षां अधिक करणें, या गोष्टी संमत होणें शक्य नव्हतें. कोणत्याही रोगावर ताकाची योजना करणाऱ्या एका ताक्या वैद्याची गोष्ट प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणें महात्माजी कोणत्याही गोष्टीवर चरक्याच्या मंत्राचा वळसा मधूनमधून देत असत. कदाचित्, चरक्याची ही स्तुति अर्थवादात्मकही असेल. तें कसेंही असो, पण ती अक्षरशः खरी मानली तर त्यांत फारसा अर्थ नाहीं, हें उघड आहे. या कारणांनीं शिवरामपंतांसारखी विचारसरणी असलेल्याला हीं मतें पसंत पडण्यासारखीं नव्हतीं. तथापि, इतर महत्त्वाच्या सर्व बाबतींत असहकार-योगी पक्षांत व त्यांच्यांत एकमतच होतें यांत संशय नाहीं. "विक्रीते करिणि किमंकुशे विवादः ? " यांतील तत्त्वाला अनुसरून शिवरामपंत मुद्दयाच्या गोष्टीकडे लक्ष देऊन अशा किरकोळ बाबतींत फांटे फोडीत बसत नसत.

अशा परिस्थितींत १९२७ अखेर मद्रास येथें झालेल्या राष्ट्रीय सभेंत सायमन कमिशनवर बहिष्कार, स्वातंत्र्याच्या ध्येयाचा ठराव इत्यादि महत्त्वाचे ठराव पास झाले, व बाबू सुभाषचंद्र बोस आणि जवाहर-लाल नेहरू यांना कॉंग्रेसचे सेक्रेटरी निवडण्यांत आलें. या नव्या दमाच्या जोडीमुळें राष्ट्रीय सभेच्या कार्यांत चैतन्य येणार, अशी आशा वाटूं लागली. शिवाय, सायमन–कमिशन बहिष्कारासारखी बाबत देशांतल्या सर्व पक्षांनाच संमत होण्यासारखी होती. सायमन सतकाच्या आगमनाची तारीख ३ फेब्रुवारी, म्हणून त्या दिवशीं देशभर कडक हरताळ पाडण्याचें निश्चित झालें. पुण्यांतला हरताळ चांगला यशस्वी झाला. प्रो. शिवरामपंत उर्फ अण्णा-साहेब परांजपे, डॉ. फाटक, दा. वि. गोखले इत्यादि उभयपक्षांच्या मंडळींनीं शहराच्या निरनिराळ्या भागांत हिंडून व्यवस्थित रीतीनें हरताळ होत असल्याबद्दल निरीक्षण केलें. सायंकाळीं ४॥ वाजतां ठरल्याप्रमाणें मिरवणुकीसाठीं रे मार्केटच्या मैदानांत हजारों लोक गोळा झाले. पांच वाजतां पुढें कवाइती बँड व मागें शेंकडों काळीं निशाणें, व ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, ' ' आम्ही कमिशनचा धिक्कार करतों, ' इत्यादि वाक्यें लिहिलेल्या घोषपताका यांचेसह मिरवणुकीला सुरवात

झाली. श्री. ल. ब. भोपटकर, अण्णासाहेब परांजपे, श्री. चिंतामणराव वैद्य, श्री. वासुकाका जोशी, श्री. बाबूराव गोखले, श्री. नारायणराव गुंजाळ, गुलाम दस्तगीर, श्री. न. वि. गाडगीळ इत्यादि पुढारी मिरवणुकीच्या अग्रभागीं होते. शनिवारवाड्यापुढील पटांगणांत उच्चपीठ मुद्दाम तयार केलें होतें. त्या ठिकाणीं मिरवणूक आल्यावर श्री. भोपटकरांचे अध्यक्षतेखालीं प्रमुख मंडळींचीं कमिशनच्या निषेधपर भाषणें झालीं. व अशा रीतीनें महाराष्ट्रांत इतके दिवस दूर असलेले दोन पक्ष एकत्र येऊं लागले.

म्हणूनच पुण्यास संयुक्त महाराष्ट्र-प्रांतिक-परिषद् भरवावी अशी कल्पना निघाली. यावेळीं म. प्रां. कॉं. कमेटीचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब भोपटकर हे होते. त्यांनीं ही गोष्ट विशेष मनावर घेतल्यानें व त्यांच्याच खटपटीनें दोन्ही पक्षांतील लोकांचें स्वागतमंडळ बनविण्यांत आलें, व स्वागताध्यक्षांचे जागीं शिवरामपंतांची निवड झाली. शिवरामपंतांबद्दल आदर बाळगणारी पुष्कळ मंडळी प्रतिसहकारपक्षांत होती. पण त्यांतल्यात्यांत शिवरामपंतांचें सहकार्य मिळविण्याची व त्यांना ओढण्याची श्री. अण्णासाहेब भोपटकर यांची तीव्र इच्छा होती. अण्णासाहेब भोपटकरांची युयुत्सुवृत्ति आणि खिलाडू स्वभाव प्रसिद्धच आहेत. आम्हांला शिवरामपंत परत पाहिजेत अशा भावनेनेंच त्यांनीं नेट व आग्रह धरला होता व तो यशस्वी झाला.

वरील परिषदेचें अध्यक्षस्थान बंगालचे त्यागी देशभक्त बाबू सुभाषचंद्र बोस यांना द्यावें, असें सर्वानुमतें निश्चित झालें. परिषद् सुरू होण्याचे आदले दिवशीं खडकी स्टेशनवर अध्यक्षांचें स्वागत करण्याकरतां श्री. परांजपे, श्री. भोपटकर, श्री. ग. वि. केतकर, श्री. दा. वि. गोखले वगैरे मंडळी हजर होती. तेथून अध्यक्ष सुभाषबाबू यांना शनिवारवाड्यापाशीं आणून त्यांचा सत्कार करण्यांत आला. तेथून अध्यक्ष घोड्याच्या सुंदर रथांतून अध्यक्षांची थाटाची मिरवणूक काढण्यांत आली. अध्यक्षांचे शेजारीं श्री. परांजपे व श्री. भोपटकर बसलेले होते. दोन्ही पक्षांतील लोक सामील झाले असल्यामुळें समारंभाला कांहीं अपूर्व उत्साह व वेगळाच रंग आलेला दिसत होता.

परिषदेकरितां टिळक-स्मारक-मंदिरांत भव्य मांडव उभारण्यांत आला होता. १९१५ सालीं बॅ. बॅप्टिस्टा यांचे अध्यक्षतेखालीं मुंबई इलाखा प्रां. परिषद् झाली, त्यानंतर प्रांतिक परिषद् पुण्यांत भरण्याचा योग आलेला नव्हता. तो इतक्या वर्षांनीं आला, व त्यांतही सर्व पक्षांनीं भाग घेतलेला. यामुळें लोकांच्या उत्साहाला भरती आलेली होती. ता. २ मे रोजीं परिषदेच्या कामाला सुरवात झाली. एवढा मोठा मांडव, पण ठिकठिकाण च्या प्रतिनिधींनीं आणि प्रेक्षकांनीं फुलून गेलेला होता. पुण्यांतील सर्व पुढारी व प्रतिष्ठित मंडळी तर हजर होतीच.पण परजिल्ह्यांतून सर्व मतांचे पुष्कळ लोक आलेले होते. सुरवातीला स्वागताध्यक्ष श्री. अण्णासाहेब परांजपे यांचें भाषण झालें. त्यांनीं आपल्या भाषणांत प्रथमच १९१५ सालीं भरलेल्या परिषदेंत लो. टिळक व महर्षि अण्णासाहेब पटवर्धन हे आपल्यामध्यें मार्गदर्शन करण्यासाठीं होते, याची हृदयस्पर्शी आठवण करून दिली. अशा परिषदांतून अध्यक्ष व स्वागताध्यक्ष यांचीं भाषणें आगाऊच लिहून छापलेलीं असतात. त्याप्रमाणें श्री. अण्णासाहेबांचें भाषणही छापून परिषदेंत वांटण्यांत आलेलें होतें. तथापि, सदरील भाषणांतील आरंभींचा कांहीं भाग वाचून दाखविल्यानंतर श्री. अण्णासाहेबांनीं तें भाषणाचें पुस्तक बाजूस ठेवून दिलें व आपल्या खऱ्या 'भाषणाला' प्रारंभ केला. अर्थात्, विषय छापील भाषणांतीलच होते खरे, परंतु त्या विषयांचें प्रतिपादन त्यांनीं स्वतंत्र रीतीनें म्हणजे त्यावेळीं सुचेल तसें केलें. स्वतंत्र, उत्स्फूर्त भाषणें करण्याची संवय लागलेल्या श्री. अण्णासाहेबांना छापील भाषण वाचून दाखविणें ही एक आडकाठी व संकट वाटत असे. म्हणूनच पुष्कळदां ते छापील मळलेली वाट सोडून देऊन व अशा रीतीनें निरंकुश होऊन विषयाला अनुकूल अशी सांपडेल तशी वाट काढीत पुढें जात असत. पुढील वर्षीं भरलेल्या बेळगांव येथील साहित्यसंमेलनांतील त्यांच्या अध्यक्षीय भाषणाचें असेंच झालें.असो. या प्रसंगीं दोन्ही पक्ष एकत्र आले याबद्दल आनंद प्रदर्शित करून त्यांनीं त्यावेळचे मुख्य मुख्य प्रचलित विषय हाताळले होते.

* टाइम्स ऑफ इंडियाच्या मानभावी उपदेशाचा खरपूस समाचार

* केसरी ता. ८ मे १९२८.

महाराष्ट्र प्रांतिक परिषद् (१९२८)



वासुकाका जोशी, परांजपे (उभे), खेर, भोपटकर, सुभाषचंद्र बोस, चिं. वि. वैद्य, केळकर

घेऊन स्वागताध्यक्षांनीं बहिष्काराची चळवळ चालू ठेवण्यासाठीं कळकळीचा उपदेश केला तो असा:—

"बहिष्कार चालू ठेवा

"आपल्या बहिष्कारवाद्यांच्या चळवळीमुळेंच प्रांतिक कायदे कौन्सिलांना कांहीं सवलती मिळाल्या आहेत. पण ज्या अर्थीं आपल्या मागण्या अजून पूर्णपणें मान्य करण्यांत आलेल्या नाहींत त्याअर्थीं आपला हेतु पूर्णपणं साध्य होईपर्यंत आपण या कमिशनशीं विरोध आणि असहकारिता करणें अतिशय जरूरीचें आहे......इंग्लंडची शक्ति त्याच्या आरमारांत किंवा सैन्यांत मुळींच नाहीं. तर ती आपल्यामधील फाटाफुटींत आणि वैमनस्यामध्यें आहे. हल्लीं आपल्यामध्यें जेथें एकीचें प्रावल्य पसरत चाललें आहे, तेथें फाटाफूट पाडण्यांत ब्रिटिश नोकरशाही आपलें सारें कौशल्य आणि कल्पनाशक्ति खर्च केल्यावांचून राहणार नाहीं. याकरितां बहिष्कारवाद्यांमध्यें फूट पाडण्यासाठीं ज्या युक्त्या योजण्यांत येतील, आणि जीं आमिषें दाखविण्यांत येतील, त्यांपासून अलिप्त राहाण्याचा आपण आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. आतांपर्यंत एकाद्या व्यक्तीच्या फायद्यानें आणि जातिविशिष्टतेच्या स्वार्थानें आपल्या देशाचें भयंकर नुकसान झालेलें आहे. परंतु यापुढें तरी आपण आपल्या जुन्या चुका सुधारल्या पाहिजेत, आणि भविष्यकाळांतील आपल्या भावी स्थितीला आपण अगदीं निराळें वळण लावलें पाहिजे."

त्यांतील शेवटला विषयही महत्त्वाचा असल्यामुळें तेवढा भाग मुद्दाम खालीं देण्यांत येत आहे.

"कर न देण्याची चळवळ

"...पण बहिष्कार आणि असहकारिता या तत्त्वांचा अवलंब येथेंच थांबत नाहीं. हल्लीं मुंबईसरकारनें जमीनमहसुलाच्या बाबतींत असें एक धोरण स्वीकारलें आहे कीं, त्यायोगानें या प्रांतांतील जमीनदारांच्या हिताविरुद्ध आणि मनाविरुद्ध पुष्कळ गोष्टी करण्यांत येत आहेत. मुंबई कौन्सिलमध्यें हल्लीं जें एक बिल आणण्यांत आलेलें आहे, त्याकडे बाहेरचे लोक मोठ्या संशययुक्त रीतीनें आणि प्रतिकूल दृष्टीनें पहात आहेत. आणि शेतकरीवर्गांत तर ह्या बिलाविरुद्ध चांगलीच खळबळ सुरू झाली आहे. जमिनीचे तुकडे पाडणें ही खरोखर एक वाईट गोष्ट असेल, नाहीं तर नसेल; पण

हें बिल शेतकऱ्यांच्या आणि जमीनदारांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर लादण्यांत येतां कामा नये. जमिनीच्या बाबतींत असंतोष उत्पन्न करणारी दुसरी गोष्ट म्हणजे कित्येक जिल्ह्यांतून जी सारावाढ कारणावांचून करण्यांत आलेली आहे, ती होय. आणि अलीबाग आणि बार्डोली येथील लोकांची मजल तर हा वाढलेला सारा न देण्यापर्यंत गेलेली आहे. दे. भ. वल्लभभाई पटेल यांच्या देखरेखीखालीं हें बहिष्काराचें आणि असहकारितेचें बीज बार्डोलीमध्यें चांगलेंच रुजत चाललें आहे; आणि त्यानें तेथें सत्याग्रहाचें स्वरूप धारण केलें आहे. मनुष्याच्या हाताएवढ्या लहान असलेल्या या ढगांतूनच पुढें कर न देण्याची सार्वत्रिक सत्याग्रहाची चळवळ निघाल्याशिवाय राहाणार नाहीं."

या उताऱ्यावरून शिवरामपंतांचें उद्दिष्ट काय होतें व त्यांची खरी दृष्टि कोणत्या तऱ्हेच्या कार्यक्रमावर होती, हें दिसून येण्यासारखें आहे. शिवरामपंतांचें भाषण संपल्यावर सुभाषचंद्र बोस यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी औपचारिक सूचना मांडण्याकरितां उभे राहिलेल्या श्री. तात्यासाहेब केळकरांनीं आपल्या सुभाष–स्तुतिपर भाषणांतच थोडी वांकडी वाट करून मद्रास कॉंग्रेसनें अखेर कौन्सिल-प्रवेश व ( अधिकार-स्वीकार ) संमत केला, हा प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वाचाच अखेर झालेला विजय होय, असें श्रोतृवृंदास तिथेंच खणखणीत बजाविलें ! महाराष्ट्राच्या वेगळाल्या पक्षांच्या या दोन पुढाऱ्यांचा भिन्न दृष्टिकोन पुन्हा एकदां लोकांना दिसला. दोघेही पूर्वीचे एकाच राष्ट्रीय पक्षांतले, व आतांही कॉंग्रेसमध्यें काम करणारे किंवा लोक-पक्षाच्या बाजूचे, परंतु एकाची अधिक भिस्त किंवा खरा जोर कौन्सिलांतील कामकाजावर तर दुसऱ्याची मदार जागृति, संघटना करून असहकारिता करबंदीपर्यंत भिडविणाऱ्या चळवळीवर. महाभारतांत धनुर्विद्येचें शिक्षण संपल्यानंतर द्रोणाचार्यांनीं शिष्यांची परीक्षा घेतल्याचें वर्णन आहे. झाडावरील पक्षी हा शरसंधानाचें लक्ष्य म्हणून शिष्यांना सांगितलेला होता. पण धनुष्याला बाण जोडतांना प्रत्येक शिष्याला गुरुजी विचारीत कीं, ' तुला समोर काय दिसत आहे ? ' प्रत्येकानें उत्तर द्यावें. ' तुम्ही. ' इतर शिष्य मंडळी म्हणत ' झाड, फांद्या, पक्षी या वस्तु आम्हांस दिसत आहेत. ' पण अर्जुनानें

सांगितलें कीं, ' पक्ष्याचा डोळा आणि माझ्या बाणाचें टोक, याखेरीज मला दुसरें तिसरें कांहीं एक दिसत नाहीं. ' अर्जुनाच्या दृष्टिकोनांत आणि शिवरामपंतांच्या दृष्टिकोनांत फारसा फरक नव्हता ! असो. परिषदेच्या दुसऱ्या दिवशीं स्वातंत्र्याच्या ध्येयासंबंधींचा सर्वांत महत्त्वाचा ठराव स्वागताध्यक्ष श्री. अण्णासाहेब परांजपे यांनीं मांडला, तो असा—" हिंदी लोकांचें ध्येय संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्य हें आहे, असें ही परिषद् जाहीर करीत आहे. " हा ठराव शिवरामपंतांनीं मांडण्यांतलें औचित्य उघड होतें. ही परिषद् दोन दिवस चालून एकोप्यानें व यशस्वी रीतीनें पार पडली. त्याच दिवशीं सायंकाळीं शिवरामपंतांनीं आपल्या घरीं सुभाषबाबूंच्या सन्मानार्थ एक थाटाची ' ॲटहोम ' दिली होती. या प्रसंगीं उभयपक्षांची सर्व मंडळी बोलावण्यांत आली होती. पुण्यांतील राष्ट्रीय पक्षाचें तें एक छोटेंसें संमेलनच भरलें होतें.

या वर्षीच्या वसंतव्याख्यानमालेचा समारोप ता. ३१ मे रोजीं श्री. शिवरामपंतांचे हस्तें झाला. त्यांचेच जामात श्री. वि. मा. देशमुख यंदांचे मालेचे सेक्रेटरी होते. त्यांनीं अहवाल वाचल्यानंतर पंत आपल्या भाषणांत म्हणाले,—

> " न्या. रानडे यांनीं सुरू केलेल्या या संस्थेचा मूळ उद्देश हिंदुस्थानच्या स्वराज्य संपादण्यास साहाय्य करावें, हाच असला पाहिजे. आज १५० वर्षे पारतंत्र्याची शृंखला हिंदुस्थानच्या पायांत अडकवून देण्यांत आली असून, फार दिवस घेण्यानें एकादें औषध जसें रोग्याच्या पचनीं पडावें, तद्वतच पारतंत्र्य हिंदुस्थानच्या पचनीं पडलें आहे. पण ही स्थिति अत्यंत लाजिरवाणी आहे. ती आपण ताबडतोब बदलली पाहिजे. माला सुरू करण्यांत, न्या. रानडे यांचा उद्देश हाच कीं, " प्रत्येकास आपलें कर्तव्य स्पष्ट करून यावें. "

यानंतर पुढल्याच आठवड्यांत पुण्यास त्यांचे अध्यक्षतेखालीं तिसरें शारदोपासक सम्मेलन भरलें होतें. स्वागताध्यक्षांचे जागीं श्री. न. चिं. केळकरांची योजना झालेली होती. ता. २४ जून रोजीं सकाळीं श्री. शिवरामपंतांनीं आपलें अध्यक्षीय भाषण केलें. त्यांत काव्य, प्रतिभा, इत्यादि विषयांची चर्चा केलेली होती. झाडावर बसलेल्या क्रौंचमिथुनापैकीं एकाला बाणानें विद्ध झालेला पाहून वाल्मीकि ऋषींच्या तोंडून

मा निषाद प्रतिष्ठां त्वं अगमः शाश्वतीः समाः
यत्क्रौंचमिथुनादेकं अवधीः काममोहितम्

अशी जी छंदोबद्ध वाणी बाहेर पडली, ती म्हणजे जगांतील पहिलें काव्य होय, असें त्यांनीं या प्रसंगीं सांगितलें होतें. यानंतर मराठी भाषेचें शुद्धलेखनावरील चर्चेंत श्री. केळकरांनीं या विषयाचा पूर्वपक्ष मांडला, व अनुच्चारित अनुस्वार लिहितांना ते काढून टाकावेत, असें सांगितलें. श्री. दत्तोपंत पोतदारांनीं या प्रश्नाची विरुद्ध बाजू मांडली. पुष्कळांचीं उलट-सुलट भाषणें झाल्यावर श्री. शिवरामपंतांनीं खालीलप्रमाणें समारोप केला.

" शास्त्र, इतिहास, व्युत्पत्तिपरंपरा यांचा अभिमान बाळगणारे लोक अशा प्रकारच्या सुधारणा मान्य करणार नाहींत. जोंपर्यंत सुधारणा सर्वसंमत नाहीं, तोंपर्यंत जुनी पद्धतीच चालू ठेवावी. शास्त्रीय विचाराचे प्रश्न बहुमतानें सोडवितां येणें शक्य नाहीं. "

या सुमारास गुजराथेंत प्रसिद्ध बार्डोलीचा लढा ऐन भरांत आलेला होता. किर्लोस्कर थिएटरांत मंगळवार ता. १२ जुलै रोजीं शिवरामपंतांचे अध्यक्षतेखालीं बार्डोली दिनानिमित्त पंडित मदनमोहन मालवीय यांचें व्याख्यान झालें होतें. पण त्याहींपेक्षां सोमवार ता. २३ जुलै हा दिवस पुणें युवकसंघामार्फत ' बार्डोली दिन ' म्हणून अत्यंत यशस्वी रीतीनें पाळण्यांत आला. दुपारीं १२ वाजतां ८-१० हजार विद्यार्थ्यांची जंगी मिरवणूक शिवाजी मंदिरांतून निघाली. मुंबईचे श्री. नरिमन, मेहरअल्ली, भट व पुण्याचे शिवरामपंत परांजपे, श्री. दा. वि. गोखले, श्री. गुत्ते, श्री. गाडगीळ, श्री. केतकर वगैरे पुढारी मंडळी मिरवणुकीबरोबर होती. ' बार्डोली सत्याग्रहकी जय, ' ' दिवाणांनो, राजीनामे द्या ' अशा घोषणा सारख्या सुरू होत्या. दोन वाजण्याचे सुमारास मिरवणूक कौन्सिल हॉलपाशीं आली. तेव्हां श्री. जयरामदास दौलतराम, लालजी नारायणजी, अमृतलाल ठक्कर, मुकादम, स्वामीनारायण वगैरे कौन्सिलचे सभासद आंतून मिरवणुकीस सामोरे आले. पुढारी मंडळींनीं मिरवणुकीचा उद्देश व मागण्या त्यांना समजावून सांगितल्यावर, त्यांनीं आपणांकडून शक्य ती खटपट करूं, असें आश्वासन दिलें. २॥ वाजतां गव्हर्नरसाहेबांची स्वारी आली, तेव्हां विद्यार्थ्यांनीं ' शेम, शेम ' म्हणून निषेध प्रदर्शित

केला. नंतर ही जंगी मिरवणूक विसर्जन पावली. यानंतर जुलै महिन्याच्या २५ तारखेला रे मार्केटच्या पटांगणांत ' मुंबई इलाखा शेतकरी परिषद् ' भरली होती. अध्यक्षस्थानीं श्री. विठ्ठल रामजी शिंदे हे होते. या परिषदेच्या कामांत श्री. शिवरामपंतांनीं अत्यंत आस्थेनें व उत्साहानें भाग घेतला होता. सकाळचें अधिवेशन समाप्त झाल्यावर सुमारें ५००० शेतकऱ्यांची जंगी मिरवणूक कौन्सिल हॉलकडे जाण्यास निघाली. शिवरामपंत परांजपे, धुळ्याचे श्री. शंकरराव देव, प्रो. भागवत, श्री. शिंदे, श्री. जेधे वगैरे मंडळीं मिरवणुकीच्या अग्रभागीं चालत होती. कौन्सिल हॉलपाशीं गेल्यावर मिरवणुकीच्या पुढाऱ्यांचें एक शिष्टमंडळ कौन्सिलच्या सभासदांशीं मुलाखत घेण्यास कौन्सिलच्या आवारांत गेलें. त्यांत शिवरामपंतही एक होते. परिषदेंत पास झालेले ठराव व ठरावास मान्यता असणाऱ्या ६०,००० शेतकऱ्यांच्या सह्यांचे अर्ज, सभासदांतील प्रमुख लालजी नारायणजी यांचे हातीं देण्यांत आले.नंतर तेथून मिरवणूक परत परिषदेच्या जागीं आल्यावर, दुपारीं परिषदेंत श्री. गंगाधरराव देशपांडे, शिवरामपंत परांजपे, भाऊराव पाटील, देव,कानिटकर, जवळकर इत्यादींचीं भाषणें झालीं. बहुतेक वक्त्यांनीं व शिवरामपंतांनींही बार्डोलीप्रमाणेंच संघटना करून सत्याग्रहाची तयारी करावी, असें मत प्रतिपादन केलें.

ऑक्टोबर महिन्यांत शुक्रवार ता. १२ रोजीं सायमन कमिशनचें हिंदुस्थानांत आगमन होणार, ही गोष्ट आगाऊच जाहीर झालेली होती. परंतु, कमिशनचा मुंबईस कांहींच कार्यक्रम न ठेवतां, बोटींतून पाय ठेवल्याबरोबर त्याला स्पेशल ट्रेननें तावडतोब पुण्यास आणण्याचा सरकारी बेत ठरला असल्यामुळें पुण्याला निषेधाची पहिली सलामी ठोकावी लागली. ते दिवशीं नरकचतुर्दशी पडल्यामुळें भल्या पहांटेच घरीं मंगलस्नानें उरकून आधीं ठरल्याप्रमाणें शनिवारवाड्यासमोर सहा वाजतां मंडळी जमूं लागली. तेथून चार पांच हजारांची मिरवणूक निघून तीन तास मिरवत दहा वाजण्याचे सुमारास रेल्वेलाइनला समांतर असणाऱ्या गणेशखिंडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर येऊन थडकली. इतर पुढाऱ्यांसमवेत शिवरामपंतही मिरवणुकीबरोबर होतेच. पहिली ट्रायल ट्रेन गेल्यावर मागाहून खाशी ट्रेन आली. त्यांत सर सायमन एकटेच

डोकें बाहेर काढून बसले होते. जमावानें ' शेम शेम ' ओरडून त्यांची योग्य संभावना केली. तेव्हां सायमनसाहेबांनीं हात हलवून निषेध पोहोचल्याचें दर्शविलें ! कांहीं वेळानें सायमन व त्यांचे सहकारी यांच्या मोटारी त्याच रस्त्यानें गव्हर्नमेंट हाऊसकडे जाऊं लागल्या, तेव्हांही लोकांनीं तोंडावर त्यांचा निषेध करण्याची संधि पुन्हा साधून घेतली. याच दिवशीं सायंकाळीं शनिवारवाड्यासमोरील विस्तीर्ण पटांगणांत जंगी सभा भरली. दहाबारा हजारांचा श्रोतृसमुदाय जमला होता. शिवरामपंतांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईचे मेहेरअल्ली, खेर व पुण्याचे बागडे, गाडगीळ, केळकर इत्यादिकांचीं भाषणें होऊन निषेधाचा ठराव पास झाला. शिवरामपंतांचें यावेळचें भाषण पूर्वीच्या काळाची आठवण करून देणारें झालें, असें सांगतात. प्रतिभा देखील प्रसंगानेंच कडाडते.

यानंतर लवकरच नेहरू रिपोर्ट या नांवानें प्रसिद्ध असलेली सर्व पक्षांनीं मिळून पसंत केलेली स्वराज्याची एकमुखी घटना तयार करण्यांत आली. तिचा प्रचार करण्याकरितां व पाठिंबा मिळविण्याकरितां महाराष्ट्रांत एक सर्वपक्षीय दौरा काढण्याचें ठरून, परांजपे, केळकर, दा. वि. गोखले, दिवेकर, कृ. ग. लिमये, मीर शुकुल्ला अशी सर्व पक्षांतील मंडळी दौऱ्यावर निघाली. ता. १ नोव्हेंबर रोजीं नगरपासून सुरवात होऊन नाशिक, जळगांव, एरंडोल, अंमळनेर, चाळिसगांव, धुळें, येवलें, कल्याण अशा मुख्य ठिकाणीं सभा व्याख्यानें होऊन हा दौरा समाप्त झाला. विशेषतः प्रतिसहकारपक्ष व असहकारपक्ष यांतील पुढारी एकत्र आल्यानें लोकांना अतिशय आनंद व उत्साह वाटत होता. तें दृश्यच अत्यंत आशादायक आणि उत्साहकारक होतें. याच दौऱ्यांत ता. ३ नोव्हेंबरला जळगांवला मुक्काम पडला असतांना शिवरामपंतांचे पायाला ठेंच लागली होती. परंतु, किरकोळ म्हणून त्यावेळीं त्यांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. नाशकास गंगाधरराव देशपांडे व राजगोपालाचारियर यांचा अनायासें तेथेंच मुक्काम असल्यामुळें तिथल्या सभेंत त्यांचीही भाषणें झालीं. या सबंध दौऱ्यांत शिष्टमंडळाचा ठिकठिकाणीं सन्मान व सत्कार होत होता, व सभाव्याख्यानांना अलोट गर्दी होत होती. कल्याणच्या सभेंत प्रो. परांजपे यांनीं आपल्या भाषणांत मौ. शौकतअल्ली यांच्या कानपूर येथील भाषणाची चांगली हजेरी घेतली.

अशा रीतीनें म. प्रां. परिषदेंत उभय पक्षांत समेट झाल्यापासून टिळकांच्या वेळेप्रमाणेंच महाराष्ट्र पुन्हा एक झाल्याचें दृश्य दिसूं लागलें होतें. या काळांत अण्णासाहेब भोपटकर, बाबूराव गोखले, बाबा विद्वांस वगैरे मंडळी वारंवार शिवरामपंतांकडे येत. ह्या जुन्या पठडींतील बैठकींतल्या मंडळींच्या पुन्हा एकवार गांठी पडूं लागल्यामुळें त्यांना अतिशय आनंद वाटत असे. राष्ट्रीय पक्षांत ऐक्य घडून यावें याबद्दल त्यांना किती तळमळ वाटत होती, हें त्यांच्या स्वराज्यांतील लेखांवरून आणि स्नेहीमंडळींशीं होणाऱ्या त्यांच्या संभाषणावरून सहज समजून येत असे. यासंबंधीं गणेशशास्त्री जोशी लिहितातः—

"भांडणाचा त्यांना मनापासून तिटकारा असे. परंतु त्यांचें बरेंच आयुष्य राजकीय पक्षांशीं भांडण्यांत गेलें. असहकाराचे चळवळींत निघालेल्या मुळशी पेटा सत्याग्रहाचे बाबतींत झालेल्या मतभेदामुळें महाराष्ट्रांत दोन पक्ष झाले. ते मोडावे म्हणून त्यांनीं अनेक खटपटी केल्या. विरारचा तंटा न व्हावा म्हणून सभेचे वेळेपर्यंत कै. विठ्ठलभाई पटेलांशीं ते विचारविनिमय करीत होते. पुढें कॉंग्रेस कमिट्यांच्या निवडणुकीच्या वेळीं प्रत्येक वर्षी तीव्र अनुयायांना शांत करून समेटाचा प्रयत्न करीत. परंतु कांहीं ना कांहीं निमित्त होऊन त्यांचे प्रयत्न फुकट जात. एके वेळीं अशा प्रयत्नांना कंटाळून निराशेनें ते मजजवळ म्हणाले, "शास्त्रीबोवा, मी जिवंत आहें तोंपर्यंत राष्ट्रीय विचारांच्या लोकांचा एकपक्ष व्हावा म्हणून प्रयत्न करीन. याउपर ईश्वराची मर्जी!" यानंतर थोड्याच दिवसांनीं पुण्यास प्रांतिक परिषद भरली व त्यावेळीं दोन्ही पक्ष एक झाल्याचें दिसलें. प्रांतिक परिषदेचे वेळीं सुद्धां दोन्ही पक्षांत अनेक मतभेदांचे प्रसंग येत व अण्णासाहेबांचे अनुयायी दररोज तक्रारी करीत. परंतु प्रत्येक वेळीं अण्णासाहेब माघार घेऊन दुसऱ्या पक्षाशीं मित्राप्रमाणें वागले."

आपल्या आपसांतील दुहीमुळें व वैमनस्यामुळें आपला नाश झाला, हें प्रथमपासून सांगण्यांत ज्यांचा जन्म गेला, त्या शिवरामपंतांची प्रवृत्ति मिळतें घेण्याकडे आणि मतभेद मिटविण्याकडे किती असेल, हें वेगळें सांगावयाची आवश्यकता नाहीं.

१५

# उपान्त्य प्रकरण

मानुष्यं वरवंशजन्म विभवो दीर्घायुरारोग्यता
सन्मित्रं सुसुतः सती प्रियतमा भक्तिश्च नारायणे
विद्वत्त्वं सुजनत्वमिंद्रियजयः सत्पात्रदाने रतिः
ते पुण्येन विना त्रयोदश गुणाः संसारिणां दुर्लभाः

मागील प्रकरणाच्या शेवटीं वर्णन केलेल्या सर्वपक्षीय दौऱ्यावरून अण्णासाहेब पुण्यास परत आल्यावर, वाटेंत जळगांवच्या मुक्कामांत पायाला लागलेली ठेंच साधी नव्हती, असें दिसून आलें. पायाच्या करंगळीला झालेली जखम अगदींच लहान होती, पण पंधरा दिवस होऊन गेले तरी भरून येईना. त्याचवेळीं डॉक्टर घरांत दुसऱ्या कोणाला तरी पहाण्यासाठीं आले असतां अण्णांनीं त्यांना पाय दाखविला. डॉक्टरना शंका येऊन त्यांनीं अधिक चिकित्सा व तपासणी केली, तेव्हां मधुमेह असल्याचें आढळून आलें. त्याबरोबर पथ्य येऊन चिकटलें. साखर वर्ज्य! हें पथ्य अण्णांच्या मुळींच पथ्यावर पडण्यासारखें नव्हतें. कारण पहिल्यापासून त्यांना गोड पदार्थ खाण्याची अतिशय आवड असे. ती इतकी कीं, जिलबी खातांनाही जिलबीचा पाक वाटींत दिला तर तो त्यांना हवासा असे. त्यांच्या तिखट जिव्हेला खाद्य गोड लागत असे. सामान्यतः चांगले गोड म्हणून केलेले पदार्थ त्यांत आणखी एकदोन चमचे साखर घातल्याशिवाय त्यांना गोड लागत नसत. अन् मधुमेहाचा आणि साखरेचा तर छात्तिसाचा आंकडा! परंतु संयमानें साखर सोडल्यावर दोनतीन दिवसांतच जखम भरून आली. तथापि जळगांवची ठेंच ही मृत्यूची नव्हे पण मृत्यु समीप आल्याची हळूच हळुवारपणें देण्यांत

आलेली पूर्वसूचनाच ठरली. अर्थात् त्यावेळीं तसें वाटलें नाहीं हें खरें, पण पुढें कांहीं महिन्यांत दुर्दैवानें तोच अनुभव येणार होता !

पण त्यांची कार्यक्षमता रतिमात्र कमी झालेली नव्हती. दांडगें लेखन-वाचन नेहमींप्रमाणें चालू होतेंच. पण सभा–व्याख्यानें–चर्चा यांतही खंड नव्हता. टिळकमहाविद्यालयांतील अध्यापनही सुरूच होतें. मात्र यानंतर त्यांचा वर्ग ते आपल्या घरींच आठवड्यांतून एकदां घेत असत. शिकविण्याची मनापासून मोठी हौस. आचार्य भागवत लिहितात—

"राष्ट्रीय शिक्षणाविषयीं शिवरामपंतांना आस्था वाटत असे. यामुळेंच माझा त्यांच्याशीं संबंध वाढत गेला. जिल्हापरिषदेसाठीं आले असतां महाडच्या राष्ट्रीय शाळेला त्यांनीं लहानशी देणगी दिली होती. टिळक महाविद्यालयांत 'तर्कसंग्रह', 'कुवलयानंद', 'अर्थसंग्रह', इत्यादि विषय ते आवडीनें शेवटपर्यंत शिकवीत असत. १९२५च्या उन्हाळ्यांत अहमदनगर येथें राष्ट्रीय शिक्षणपरिषदेचें दुसरें अधिवेशन भरलें तेव्हां शिवरामपंत अध्यक्ष होते. असहकारितेचा पूर ओसरून गेल्या-मुळें विद्यार्थ्यांची संख्या सगळीकडे घटूं लागली होती. समारोपाच्या वेळीं शिवरामपंतांनीं फार कळकळीचे उद्गार काढले: 'आपलें स्तन्य चोखून घेणारीं बालकें कोठें आहेत?' अशा वात्सल्यानें विह्वल झालेल्या मातांप्रमाणें तुम्हां शिक्षकांची आज अवस्था झाली आहे" असे हृदयाला वेधून टाकणारे ते शब्द होते."

चरित्र दोन प्रकारांनीं किंवा दोन अंगांनीं लिहितां येतें. प्रस्तुत पुस्तक हा जीवन-वृत्तांत आहे. यांत चरित्रनायकाचें संपूर्ण स्वभाव–चित्रण, तत्त्व–दर्शन किंवा व्यक्तिमत्त्व वेंचून काढून वेगळें दाखविणें शक्य नाहीं. तसें करावयाचें म्हटल्यास त्याकरितां वेगळा ग्रंथ लिहिला पाहिजे. जीवन-वृत्तांत लिहिण्याच्या ओघांत लेखकाची स्थिति प्रवाहपतिता-प्रमाणें होऊन जाते. डोकें वर काढूं म्हटलें तरी निघत नाहीं. तथापि अपूर्णत्व राहूं नये एवढ्याकरितां चरित्रनायकाचे ठळक स्वभावविशेष व गुणविशेष यांचें दिग्दर्शन या प्रकरणांत करण्याचें ठरविलें आहे.

पहिला सांगण्यासारखा स्वभाव-विशेष म्हणजे शिवरामपंतांची विनोद-प्रियता. त्यांच्या अथांग गांभीर्याच्या आवरणाखालीं सूक्ष्म मार्मिक

विनोदबुद्धि नेहमींच दडलेली असे. आणि एरवींच्या व्यवहारांत ती प्रकट झाली नाहीं, तरी संध्याकाळच्या वेळेला आपल्या मित्रमंडळींत ते बसले, म्हणजे ती मोकळेपणानें बाहेर येई. त्यांचे स्नेही कृष्णशास्त्री कवडे किंवा रामदास गोवर्धनदास यांच्या दुकानांत त्यांचा बसण्याचा अड्डा असे. खाडिलकर, चिंतामणराव वैद्य इत्यादि बैठकींतील मंडळी तिथें जमत. आणि मग तिथल्या संभाषणामध्यें कोट्या-प्रतिकोट्या, हास्य-विनोद यांना रंग भरत असे. या अड्ड्यांतलें शिवरामपंतांचें भाषण—संभाषण,वक्रोक्ति, नर्मविनोद या त्यांच्या नेहमींच्या सर्व अलंकारांनीं व खुब्यांनीं खचित असल्यामुळें मंडळींना ती एक बौद्धिक मेजवानीच वाटत असे. त्यांचें खासगी भाषणसुद्धां

……………… सुज्ञेंही ऐकतांचि डोलावें
ऐसेंचि बोलणें जरि तरि पुरुषानें दहांत बोलावें

या मयूरकवींच्या कसोटीला उतरण्यासारखें असे. या गप्पांच्या अड्ड्यांत बसून तास दोन तास मनसोक्त घालविणें, हें बहुवा दिवसभर केलेल्या कामाचा शीण घालविण्याचें त्यांचें साधन असावें.त्यानें अनायासें मनोविनोदन होऊनच्या होऊन चालू महत्त्वाच्या विषयांची चिकित्साहीं पदरांत पडत असे. त्यांच्या मार्मिक विनोदाचें एकच उदाहरण देतों. **प्रणयिनीचा मनोभंग** या ठाकुरसिंगांच्या चित्रावर शिवरामपंतांनीं 'रत्नाकर' मासिकांत एक अतिमार्मिक चिकित्सक टीकालेख लिहिला होता. तो शृंगारिक समजून त्यावर बरीच अनुकूल–प्रतिकूल टीका वृत्तपत्रांतून येत होती. कांहींनीं तर त्यांना म्हातारचळ लागला येथपर्यंत बाजू नेऊन भिडविली. वास्तविक या रम्य लेखांत त्यांच्या विदग्ध रसिकतेनें मधूनमधून डोकें वर काढलें होतें, यांत संशय नाहीं. तथापि या चित्रामध्यें शृंगारापेक्षां विरहजनित कारुण्यच अधिक चित्रित केलेलें आहे, ही गोष्ट शिवरामपंतांनीं विस्तारपूर्वक स्पष्ट केली होती. लेखाच्या शेवटीं त्यांनीं म्हटलें होतें—

" दुर्दैवापुढें मनुष्याचें कांहीं चालत नाहीं. सगळें जग असेंच आहे. या दुर्दैवी जगामध्यें परमेश्वराच्या कृपेवांचून दुसरी कोणतीही स्पृहणीय वस्तु नाहीं. "

अशा या लेखासंबंधीं बोलतांना त्यांचे समवयस्क स्नेही गोविंदसुत (परशरामपंत चिंचाळकर)त्यांना थट्टेनें म्हणाले,"या वयांत असले शृंगारिक लेख लिहिणें तुम्हांस शोभतें काय ?" यावर शिवरामपंतांनीं लागलीच उत्तर दिलें, "एकूण तुम्हीही या वयांत असले लेख वाचतां हें तरी ठीक आहे का ?"

त्याचप्रमाणें त्यांचा आणखी एक वृत्तिविशेष म्हणजे त्यांची कमालीची शालीनता आणि पराकाष्ठेची प्रसिद्धि-पराङ्मुखता हा होय. व्यवहारांत किंवा सार्वजनिक कामांत कित्येकांचे पुढें सरकण्याकरितां, किंवा माजलेलें प्रस्थ कायम टिकविण्याकरितां उठल्यासुटल्या आरत्या ओंवाळून घेणें व स्वतःची टिमकी वाजविणें असे जे आत्मप्रसिद्धीचे राजरोस प्रकार न कचरतां चालतात; ते पाहिल्यानंतर वरील गुणांच्या महत्त्वाची आणि दुर्मिळत्वाची सहज कल्पना येते. आश्चर्य करण्यासारखी गोष्ट अशी कीं, सन १८९८ ते १९०८ या दहा वर्षांत त्यांनीं शेंकडों व्याख्यानें दिलीं असतील. किंबहुना हा कालखंड म्हणजे त्यांच्या वक्तृत्वाला घसघशीत बहर आलेला. त्यांच्या अंगीं असलेल्या वक्तृत्व-शक्तीचा परमोत्कर्ष झाला असेल तर तो ह्याच अवधींत. पण असें असून त्यांच्या स्वतःच्या 'काळ'पत्रांत अगर 'स्वराज्यां'त व्याख्यानाचा वृत्तांत किंवा निदान व्याख्यान अमुक ठिकाणीं झालें अशा चार ओळीही सांपडावयाच्या नाहींत! गणेशोत्सवांतील सबंध म्हणजे इतर वक्त्यांसह कार्यक्रम मात्र क्वचित् छापलेला आढळतो. तोही उत्सवाचा सेक्रेटरी प्रसिद्धीकरितां देत असावा. त्याचप्रमाणें त्यांनीं स्वतः आपल्या छापखान्यांतून जीं स्वतःचीं पुस्तकें म्हणून प्रसिद्ध केलीं आहेत, त्यांत त्यांचा फोटो म्हणून कधीं मिळावयाचा नाहीं. प्रस्तावना दुसऱ्याची तर नाहींच पण स्वतःचीही नसायची. हद्दत, चार शब्द, 'आत्म–निवेदन' कांहीं सांपडावयाचें नाहीं. फार काय पण वर्तमानपत्रावर, पुस्तकावर किंवा लेखांवरही त्यांच्या नांवाचे पुढें पाठीमागें प्रोफेसर किंवा एम्. ए. अशीं उपपदांचीं 'लांछनें'ही आढळणार नाहींत.

वाणी ममेव सरसा यदि रंजयित्री
न प्रार्थये रसविदां अवधान-दानम्

या जगन्नाथपंडितांच्या उक्तींतील अहंकाराचा सूर वजा करून,

अजिबात वगळून, बाकी जो खणखणीत आत्मविश्वासाचा प्रत्यय त्यांत दिसतो तोच शिवरामपंतांचे ठायीं तंतोतंत होता, असें दिसतें. माझें व्याख्यान करवा, माझे लेख छापा, माझें पुस्तक प्रकाशित करा किंवा शाळा–कॉलेजांतून लावा, माझें नांव सुचवा अगर मला अध्यक्ष करा, अशी गळ जन्मांत त्यांनीं कधीं घातली नाहीं. तो विचारच त्यांच्या मनाला शिवणें शक्य नव्हतें. दुसऱ्यापाशीं कांहीं मागणें हा शब्दप्रयोगच त्यांच्या कोशांत नव्हता. तथापि, हिरव्या चांफ्याचीं फुलें जवळ खिशांत असलीं म्हणजे ज्याप्रमाणें आजूबाजूच्या लोकांना माझ्याजवळ असा असा सुगंध आहे अशी जाहिरात करावी लागत नाहीं, त्याप्रमाणेंच त्यांच्या बाबतींत झालें. त्यांनीं होऊन आपला मोठेपणा जरी चुकूनही आपल्या मुखानें अगर हस्तेंपरहस्तेंही प्रकट केला नाहीं, तरी Actions speak louder than words हा सिद्धांतच खरा ठरला; आणि इतर बहुतेक पुढाऱ्यांच्या जाहिरातबाजीच्या, उदोउदो करण्याच्या तंत्राचा थोडा जरी अवलंब त्यांनीं केला असता,तरी त्यांची कीर्ति आणि नांव आहे यापेक्षां शतपटीनें अधिक पसरलें असतें ही गोष्ट जरी सोळा आणे खरी असली, तरी त्यांच्यांतला ' मी ' चा अभाव आणि प्रसिद्धि-विन्मुखता पाहतां त्या मानानें त्यांना लाभलेली कीर्ति पुष्कळ पटीनें अधिक आहे असेंच म्हटलें पाहिजे. अर्थात् याचें श्रेय जितकें त्यांच्या अंगच्या गुणांना तितकेंच महाराष्ट्रांतील गुणज्ञांना आहे, त्यांत शंका नाहीं.

याच ठिकाणीं आर्थिक स्थितीचें चित्र रेखाटणें आवश्यक आहे.

शिवरामपंतांच्या वाणींत आणि वागणींत जितका अर्थ भरलेला असे, तितका तर नव्हेच, पण त्यामानानेंही त्यांच्या पैशाच्या विशवींत 'अर्थ' नसे ! अर्थात् त्यांनीं समजून उमजून चालत आलेला संपत्ति-योग किंवा 'सुवर्ण'-संधि आपल्या हातानेंच झुगारून दिली होती. परंतु एकंदरींत दैववान् खरे. त्यांच्या आयुष्यांत शेवटपर्यंत त्यांना कांहीं कमी पडलें नाहीं. याला कारणें दोन. एक तर लोकजागृति आणि साक्षरता त्या काळांत तोटकी असूनही 'काळा'नें त्यांना चांगला हात दिला. याचें श्रेय जितकें त्यांच्या चटकदार आणि अभिनव लेखनशैलीला आहे,

तितकेंच त्यांच्या धंद्यांतल्या चोख व्यवस्थेला आणि देखरेखीला द्यावें लागेल. पीक आलें तरी काढून पदरांत पाडून घ्यावें लागतें आणि फुलें आलीं तरी वेंचावीं लागतात.

सन १९१० मध्यें 'काळ' बंद झाला. त्यानंतर द्रव्यार्जनाचें असें कांहींच साधन उरलें नाहीं. मधून मधून पुस्तकांवर काय थोडीफार प्राप्ति होईल तेवढीच. महाडच्या वडिलोपार्जित मिळकतींतील एक कपर्दिकही त्यांनीं घेतली नव्हती. त्याचप्रमाणें त्यांच्या श्वशुरांना मुलगा नव्हता. फक्त दोन मुली होत्या. श्वशुर निवर्तल्यानंतर त्यांची मिळकत दोन मुलींना वारसाहक्कानें देण्यासंबंधींचें प्रकरण कोर्टांत चालू झालें. त्यावेळीं "दुसऱ्या मुलीची सुस्थिति नाहीं; सबब तिलाच सर्व इस्टेट द्यावी" असा जबाब शिवरामपंतांनीं आपल्या पत्नीकरवीं देवविला होता. स्वतःच्या वडिलांची मिळकत घेण्याची मारामार तिथें सासऱ्याची कोण घेणार? पण स्वतः चोख व्यवहारानें आणि दक्षतेनें जी पुंजी जवळ केली होती, ती घालून तुळशीबागेजवळ घर घेतलें असल्यामुळें राहून कांहीं भाडेंही येई. तरीसुद्धां त्यांतून प्रपंचाचा चालू नित्य-खर्च भागला तरी नैमित्तिक खर्च मधेंच आ वासून उभे रहात. त्यांतून शिवरामपंतां-सारख्या 'घरंदाज' प्रतिष्ठित पुढारी गृहस्थांवर पुष्कळ मागण्या आणि पुष्कळांच्या अपेक्षा! लग्न आहे, कार्यें आहेत, मोठें नांव म्हणून आला गेला आहे, सभा-परिषदांसाठीं प्रवास आहे, वर्गणी आहे, नाना तऱ्हा आहेत. होय म्हणावें तरी पंचाईत, नाहीं म्हणावें तरी पंचाईत! ऐपतीपेक्षां अब्रू आणि मोठायकी हजार पटीनें वाढलेली. लौकिकांत बरें दिसेल असें तर केलें पाहिजेना? बरं, सार्वजनिक कार्याला-सुद्धां दुसऱ्यांकडून किंवा फंडांतूनही पै पावआणा घ्यायचा नाहीं, असा बाणा. आणि तो अखेरपर्यंत त्यांनीं चालविलाही. उलट, फंड अगर कांहीं सार्वजनिक कार्य निघालें म्हणजे त्यांनाच लहान-मोठ्या रकमा द्याव्या लागत. बोलणाराचें तोंड धरतां येत नाहीं म्हणूनच कीं काय हवें तें बोलणारे पुष्कळ असतात. असो. जगाचा न्याय असूनही ज्यांच्यावर या बाबतींत लोकापवादाचा शिंतोडाही उडाला नाहीं अशा थोड्या लोकांत लो० टिळकांबरोबरच शिवरामपंतांची गणना होते. सार्वजनिक

फंडांतून किंवा दुसऱ्यांच्या पैशांतून कांहीं घ्यावयाचें नाहीं, एवढेंच नव्हे तर ट्रस्टी वगैरे अन्य तऱ्हेनेंही सार्वजनिक पैशाशीं होतां होईलतों संबंधही ठेवायचा नाहीं, असें त्यांचें धोरण असे. घरचें खाऊन होईल तितकी देशसेवा करून, ऐपतीप्रमाणें, किंबहुना ऐपतीच्याबाहेर सार्वजनिक कार्याला द्रव्यद्वारा-ही मदत करणें, हें शिवरामपंतांच्या सार्वजनिक जीवनाचें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल. कारण, टिळक निदान कांहीं प्रसंगीं नाइलाजानें आणि नाखुषीनें कां होईना, पण त्यांच्यासाठीं काढलेला फंड किंवा देणग्या स्वीकारीत असत. अर्थात् टिळक हे लोकांचेंच काम करीत असल्यामुळें लोकांनीं त्यांच्या अडचणीच्या वेळीं त्यांना दिलेल्या रकमा घेण्याला कांहींच हरकत नाहीं. उलट तो त्यांचा एक प्रकारचा हक्कच होय. किंबहुना प्रामाणिक सार्वजनिक कार्यकर्त्याला कांहीं वेळेला तसें करावें लागतें, तसें करण्याशिवाय भागतही नाहीं. आणि त्यामुळें म्हणजे त्याच्या चारित्र्याला मोठा कलंक लागतो किंवा कमीपणा येतो, अशांतला बिलकुल भाग नाहीं. तथापि, प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव आणि मतें निरनिराळीं असल्यामुळें त्यांच्या वृत्तीला अशा गोष्टी मानवण्यासारख्या नव्हत्या. त्यांची त्यांनीं कधीं अपेक्षा धरली नाहीं आणि प्रपंचांतील तोंड-मिळवणी बेतावातानें होत असतांनाही ते त्या वाटेला कधींच गेले नाहींत. तरी-सुद्धां गृहप्रपंचांत ठाकठिकीनें वागून, मोठ्या खुबीनें वाट काढीत, त्यांनीं 'ठाकुरकी' राखलीच! संसारांत कोंड्याचा मांडा करून दाखवावा त्यांनींच.

पण मुख्यतः आर्थिक अडचणींतून तरून जाण्याला त्यांना एक मोठें साहाय्य लाभलें. आणि तें म्हणजे त्यांचे थोरले चिरंजीव कृष्णाजीपंत यांजकडून. शिवरामपंत १९१० सालीं पहिल्या शिक्षेतून सुटून आल्यावर ' निरुद्योगी ' बनले. त्यानंतर कृष्णाजीपंत वकील होऊन सुदैवानें त्यांची वकिली लवकरच चांगली चालू लागली. विहिरींतलें पाणी आटत यावें आणि तितक्यांत पावसाळा सुरू व्हावा अशी स्थिति होऊन सांधे-जोड बरोबर जमली. एकप्रकारें मुलगा म्हणून त्यानें मिळविलेल्या पैशावर शिवराम-पंतांचा हक्कच होता; आणि मुलानेंही त्यांना तो मनाप्रमाणें बजावूं दिला. अशा रीतीनें विशेषतः उत्तर आयुष्यांत त्यांना कृष्णाजीपंतांची बरीच मदत झाली. ती न होती, तर त्यांना पुष्कळ हालचाल करतां न येती.

छापखाना आणि वर्तमानपत्रें यांचे हिशेब चोख लिहिलेले असत. हिशेबांत पै पावआण्याचाही गोंधळ सांपडावयाचा नाहीं. धंद्यांत काय किंवा घर-प्रपंचासाठीं काय, करावयाचा खर्च त्यांनीं आपल्याच हातीं ठेवला असल्यामुळें बाहेर जाणारा एकही पैसा त्यांची नजर चुकवून अगर वायफट म्हणून कधीं गेला नाहीं ! कधीं लग्नकार्य निघालें तर त्याच्यासाठीं एक वेगळी वही होऊन सामान आणलें त्याची खातीं पडून, कार्यांतून मोकळे झाल्याबरोबर दोनचार दिवसांत पैसे चुकते करून त्या त्या लोकांच्या त्याखालीं सह्या घेऊन आरशासारखी झालेली ती वही व्यवस्थेनें कपाटांत जाऊन बसायची !

आदा पाहून खर्च हें त्यांच्या आर्थिक व्यवहाराचें सूत्र होतें. बाकी जगांत ज्यांना अर्ध-सत्यें असें म्हणतात त्यांतीलच हें एक होय. ज्याला दैवयोगानें कांहीं कमी पडत नाहीं,त्यानें या गोष्टी सांगाव्या. पण ज्याचें नशीबच पालथें म्हणा किंवा इतर बाबतींत नशीब चांगलें असूनही चंचल लक्ष्मीची ज्याच्याकडे नजर जात नाहीं असें म्हणा, त्याला हें तत्त्वज्ञान काय उपयोगी पडणार ? तरीपण अशाही माणसाच्या बाबतींत वरील तत्त्वाला कांहीं थोडा मर्यादित अर्थ आहेच, यांत शंका नाहीं. पुढें पुढें कीर्ति, किफायत आणि संसार एकदमच वाढूं लागल्यामुळें यथाप्रमाण खर्च किंवा रहाणीचा दर्जा वाढला ही गोष्ट योग्य आणि क्रमप्राप्त अशी झाली खरी. पण सुरवातीला वडिलांच्या मृत्यूनंतर महाडहून कांहींही न आणतां त्यांनीं आपला नवा संसार किती काटकसरीनें आणि स्वावलंबनानें चालविला होता, याचें वर्णन पूर्वीं आलेलेंच आहे.

उभ्या आयुष्यांत त्यांनीं चार पैसे कुणाजवळ मागितले नाहींत. याचा अर्थ व्यवहारांत समजतात तसा सरासरीनें घ्यावयाचा असें नव्हे, तर हें विधान अगदीं शब्दशः-अक्षरशः-खरें आहे. म्हणजे, नड पडली म्हणून मागितले नाहींत एवढेंच नव्हे, तर कधीं चुकून-विसरून अगर आयत्या वेळीं कमी पडले असें होऊनही मागितले नाहींत. पैशाच्याच काय, पण कोणत्याही बाबतींत याचना हा शब्दच त्यांच्या कोशांत नव्हता. वास्तविक एखाद वेळेस केवळ जवळ आणलेले नाहींत म्हणून कोणी कुणाजवळून तात्पुरते हातउसने पैसे घेतले, तर त्यांत मोठा बेहिशोबीपणा,

अव्यवस्थितपणा किंवा अव्यवहारीपणा आहे, असें नाहीं. मनुष्य आहे, होतें विस्मरण एखादवेळेस. पण शिवरामपंतांची वागण्याची पद्धतच अशी कीं, नाहींच अशीसुद्धां पाळी येतां कामा. केव्हां किती पैसे लागतील याचा अंदाज बांधून आणि वेळेवर त्यालाही शेंडी फुटली तरी कितपत फुटेल या हिशोबानें तितकी अधिक माया राखून आगाऊच तरतूद करून ठेवलेली असावयाची.जातांयेतांना सत्यनारायणाला जावयाचें असलें तरी बाहेर निघतांनाच पोथीपुढें आणि देवापुढें ठेवावयाचे दोन सुटे पैसे खिशांत आहेत किंवा नाहींत हें पाहूनच स्वारी बाहेर पडावयाची ! याप्रमाणें रोख आणि चोख वागणाऱ्याला कर्ज काढण्याची कल्पनाही शिवणें शक्य नाहीं मग प्रत्यक्ष कर्ज काढण्याची गोष्ट तर बाजूलाच, हें वेगळें सांगावयास नको.

शिवरामपंतांनीं मोठीशी मिळकत मागें ठेवली नाहीं, तरी त्यांच्या नांवालौकिकाला साजण्याइतपत संपन्नता त्यांना लाभली होती. आणि गरजेपेक्षां फाजील संपत्ति असली तरी देखील ती आळशासारखी पडून रहाणारी असल्यामुळें तिचा तादृश उपयोगही नसतो. सामान्यतः लक्ष्मी आणि सरस्वती यांची कडाकडी असते व एक जिथें जाऊन राहील त्या वाटेलाही दुसरी जावयाची नाहीं, हा अनुभव सार्वत्रिक आहे. पण शिवरामपंतांच्या घरीं मात्र सरस्वतीपाशीं तिची दावेदारीण अगदीं प्रेमानें नाहीं, तरी लाजेकाजेस्तव कां होईना, पण नांदायला कबूल होती, असें म्हणावयाला हरकत नाहीं.

शिवरामपंतांची द्रव्यार्जनाकडे पहिल्यापासूनच दृष्टि असती, तर त्या काळांतल्या डेक्कन कॉलेजांतली प्रोफेसरी पत्करून लाखों रुपये मिळवितां आले असते. पण तें त्यांचें ध्येय नव्हतें. त्यांनीं पैशाचा हव्यास कधींच केला नाहीं. पण मिळालेला पैसा संभाळून ठेवायलाही चुकले नाहींत. इष्टमित्रांना, नातेवाइकांना होईल तितकी मदत केली. आणि त्यांतही खुबी ही कीं,अमक्यातमक्याला मदत केली हें कुणाच्या कानाला कळायचें नाहीं; एवढंच नव्हे तर त्यालाही आपण त्याच्यावर उपकार करतों आहोंत असें भासून द्यावयाचे नाहींत. ' दे दान गुप्त, उपकार करी न बोले ' अशांतला बिनबोभाट प्रकार त्यांचा असे. याखेरीज फंडाच्या

वर्गण्या, देणग्या, प्रवासखर्च इ. रूपांनीं देशासाठीं सार्वजनिक कामाप्रीत्यर्थ त्यांनीं प्रत्यक्ष केलेली पदरमोड कांहीं हजारांपर्यंत होईल.

संपत्तीमध्यें अर्थ आहे आणि अर्थ नाहीं या दोन पायांवर त्यांच्या आर्थिक व्यवहाराची इमारत उभारलेली असे. दोन्ही पाय सारखेच भक्कम होते!

यानंतर पुन्हा आपलें कथासूत्र हातीं घेण्यापूर्वीं आचार्य भागवतांचे कांहीं उतारे दाखल करतों. त्यांत शिवरामपंतांचें वक्तृत्व व लेखन यांचें मार्मिक वर्णन केलेलें असून शिवाय त्यांच्या स्वभावावरही चांगला प्रकाश पडलेला दिसतो.

"सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें "शाकुंतलांतील सौंदर्यस्थळें" यावर त्यांनीं दिलेलें व्याख्यान मात्र मी कधींही विसरणार नाहीं. वक्तृत्व आणि विचार यांचा अत्यंत उत्कर्ष त्या व्याख्यानांत झालेला पाहावयास मिळाला. रवींद्रनाथ ठाकूर आणि बाबू अरविंद घोष यांचे कालिदासावरील लेख अत्यंत श्रेष्ठ समजले जातात. शिवरामपंतांचें हें भाषण रसिकतेच्या दृष्टीनें त्या लेखांच्या तोडीचें झालें. व्याख्यानाच्या नांवावरून पुष्कळ लोकांची शाकुंतलांतील शृंगार-प्रसंग ऐकावयास मिळतील अशी भोळसर आणि उथळ कल्पना झाली होती. परंतु कालिदासाचा दुष्यंत हा कोणी रंगेल वृत्तीचा उल्लू पुरुष नसून राजधर्म पाळणारा एक धीरोदात्त राजर्षि आहे. अनपत्यतेमुळें त्याचा गृहस्थधर्म खंडित होऊन आपल्या कुलाचा संपूर्ण लोप होणार यामुळें तो सुखांत असूनही दुःख भोगीत आहे, अशा धर्मवृत्तीच्या दुष्यंताचें जीवन कलापूर्ण रीतीनें रंगविण्यांत कालिदासानें आपलें सगळें प्रतिभासामर्थ्य वेंचिलें आहे. शृंगारापेक्षां करुणाला आणि विलासापेक्षां धर्मभावनेला शाकुंतलांत अधिक महत्त्वाचें स्थान देण्यांत आलेलें आहे. अशी स्वतंत्र विचारसरणी प्रस्थापित करून त्या दृष्टीनें शाकुंतलांतील सौंदर्याचीं स्थळें कोणतीं यांचें त्यांनीं अत्यंत मनोहर भाषेंत विवेचन केलें. हें व्याख्यान अडीच तासपर्यंत चाललें होतें आणि श्रोतृवर्ग शेवटपर्यंत मंत्रमुग्ध झालेला दिसत होता!

"शिवरामपंतांच्या वक्तृत्वाचा प्रभाव कांहीं असामान्य होता. व्याख्यानाच्या वेळीं ते ताठ उभे राहत. त्यांची मूर्ति भव्य व देखणी होती आणि त्यांचा आवाज मधुर व खणखणींत होता. ते अभिनय फारच थोडा करीत. केवळ हाताच्या एकट्या तर्जनीवर त्यांचा भर असे, क्वचित् उजव्या हाताच्या

तर्जनीचें टोंक डाव्या तर्जनीच्या टोंकावर ठेवून ते मुद्द्याची गोष्ट दर्शवीत. त्यांच्या वाणींत काव्य आणि नाट्य या दोघांचाही समावेश असे. श्रोत्यांना गदगदा हासवूनही ते स्वतः गंभीर राहत. क्वचित् मंदस्मित मुखावर झळके. उच्चार अत्यंत स्पष्ट आणि शुद्ध. वाक्यरचना केवढीही प्रदीर्घ झाली तरी विशेषणांचें विशेष्यांशीं, कर्त्यांचें क्रियापदांशीं आणि वाक्यांतील निरनिराळ्या अंशांचें परस्परांशीं अनुसंधान चुकत नसे. विषयाचे अनेक धागे वनवून त्यांची एकमेकांत गुंफण करतांना त्यांचें व्यवधान तुटत नसे. विचारसरणी अत्यंत तर्कशुद्ध आणि भाषेची मांडणी विरोध, वक्रोक्ति, प्रश्न, दृष्टान्त, उत्प्रेक्षा, रूपक इत्यादि विविध अलंकारांनीं नटलेली असे. श्रोत्यांच्या भावना प्रक्षुब्ध करून, वीर, अद्भुत, शांत, करुण इत्यादि विविध रसांची निर्मिति करण्याचें त्यांचें प्रतिभासामर्थ्य अवर्णनीय होतें. या सर्व गुणांचा उपयोग पारतंत्र्याची चीड, स्वातंत्र्याची तळमळ, ध्येयवादाची आवड आणि आशावाद यांचा उत्कर्ष करण्याकडे होत असल्यामुळें, त्यांचें व्याख्यान म्हणजे उच्च प्रकारचें शिक्षण असे. आपला विषय थोडाथोडा, घोळून घोळून सांगण्याची त्यांची एक विशिष्ट शैली होती, त्यामुळें त्यांच्या व्याख्यानाला रंग भरण्यास थोडा वेळ लागे. परंतु रसोत्कर्ष झाल्यावर आपला वेळ किती गेला याचें श्रोत्याला भान न राहिल्यामुळें तो कधीं कंटाळत नसे. मध्येंच प्रश्न विचारून विषयाला कलाटणी देण्याची त्यांची रीत होती. स्वरांचे रसानुकूल आरोह–अवरोह करून श्रोत्यांच्या मनांत विविध विकार जागृत करण्याचें त्यांचें सामर्थ्य असाधारण होतें. महाराष्ट्रांत शिवरामपंतांच्यापूर्वींही कित्येक नामांकित वक्ते होऊन गेले आणि त्यांच्या पिढींतही अगदीं नव्हते असें नाहीं. परंतु ‘ शिवरामपंती वक्तृत्व ’ म्हणून कांहीं अपूर्व होतें. आजही त्यांच्यामागें महाराष्ट्रांत त्या तोडीचें वक्तृत्व कोठेंही ऐकावयास मिळत नाहीं.

“शिवरामपंतांचें लेखन त्यांच्या वक्तृत्वासारखेंच असे. संस्कृतामधील सर्व शास्त्रगांभीर्य, प्राकृत कवींचा गोड जिव्हाळा आणि इंग्रजी वाङ्मयांतील प्रखर स्वातंत्र्यप्रेम या गुणांचा त्यांच्या लेखनांत रमणीय संगम आढळून येई. इतकी शुद्ध, अलंकृत, रसपूर्ण आणि ध्येयवादानें भारलेली भाषापद्धति मराठींत अन्यत्र सांपडत नाहीं.

"शुद्धता आणि सूक्ष्मता हे त्यांच्या लेखनांतील दोन महत्त्वाचे गुण होत. एकदां निवृत्तिनाथांच्या गीतेवरील ग्रंथाची 'केसरी'त जाहिरात आली होती. ज्ञानेश्वरीच्या अनुकरणानें 'निवृत्तेश्वरी' असा शब्द प्रकाशकानें बनविला होता. शिवरामपंतांनीं त्या शब्दाविषयीं आक्षेप घेतला. 'भाल्यां'तील 'विद्यार्थी कीं धंद्यार्थी ?' असले शब्द पाहून त्यांना चीड येई. शुद्धतेचे भोक्ते असूनही सावरकरांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीस त्यांचा विरोध होता. श्री. केळकर यांनीं आपल्या टिळक-चरित्रांत अनुस्वारांची हकालपट्टी केलेली पाहून, "केळकरांनीं मराठी भाषेचा तिलक पुसून टाकला!" असें ते म्हणत. वर्तमानपत्रांत आचरटपणाचे लेख येऊं लागल्याचें पाहून त्यांना खेद होई. ते म्हणत, "वर्तमानपत्रांत काय लिहावें याबद्दल आमच्या वेळीं मोठा विचार करावा लागे. आतां काय लिहावें आणि काय लिहूं नये हा विवेक मुळींच उरला नाहीं!

"शिवरामपंत हे श्रेष्ठ कलोपासक होते, ही त्यांची कला त्यांच्या सर्व जीवनांत भरून राहिलेली होती. घरीं त्यांचें वागणें अगदीं साधेपणाचें असे. परंतु त्यांच्या प्रत्येक कृतींत कलाप्रेम दिसून येई. घरीं चार मंडळी जेवावयाची असतील, तर ते केळीचीं पानें तयार करतांना नीट मोजून कापतील आणि काळजीपूर्वक पुसून रचून ठेवतील. गोंधळ आणि गडबड त्यांना मानवत नसे. एक एक काम संथपणानें पण कुशलतेनें करण्याची त्यांची रीत असे. गोड शब्दानें आणि लहानशा कृतीनें माणसाचें मन जिंकून घेण्याची त्यांची विलक्षण हातोटी होती. एकदां मी महाडहून पुण्यास आलों असतां सहज त्यांची भेट घेतली. आपलें 'स्वराज्य' पत्र आणि छापखाना हीं त्यांनीं हातावेगळीं केलीं होतीं. मला पाहिल्यावर अभिप्रायार्थ जमलेल्या पुस्तकांपैकीं दीडदोनशें पुस्तकें महाडच्या वाचनालयासाठीं देणगी म्हणून त्यांनीं माझ्या स्वाधीन केलीं; मी कधींही आलों तरी माझी चौकशी करून माझ्याशीं ते स्नेहभावानें बोलत. सामान्यतः त्यांचा स्वभाव विशेष बोलका नव्हता, तथापि एकदां बोलूं लागले म्हणजे ते विपुलतेनें बोलत. त्यांच्या वक्तृत्वाचे सर्व गुण त्यांच्या खाजगी संभाषणांतही पहावयास मिळत.

"शिवरामपंतांनीं आपलें वाङ्मय-चरित्र लिहावें अशी माझी इच्छा होती, निदान टिळक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांपुढें त्यांनीं आपल्या वाङ्मयाबद्दल

एखादें व्याख्यान द्यावें असा मीं त्यांना आग्रह केला. परंतु त्यांच्या शालीनतेमुळें तें झालें नाहीं. मात्र खाजगी संभाषणांत त्यांनीं कांहीं माहिती सांगितली."

* * * *

एप्रिल महिन्यांत, बेळगांवला भरणाऱ्या चवदाव्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाचें अध्यक्षपद अण्णासाहेब परांजपे यांना देण्याचें स्वागत-मंडळानें निश्चित व जाहीर केलें. यापूर्वी नाट्यसंमेलन, कीर्तन-संमेलन, शारदोपासक-संमेलन, ठाणें-मुंबई येथील ग्रंथालयांचे वार्षिक समारंभ, सार्वजनिक सभा, म. प्रां. कॉंग्रेस, इत्यादि अनेक सभा-संस्था-संमेलनांत अध्यक्षपदाची माळ त्यांच्या गळ्यांत पडली होती. परंतु या मराठी साहित्य-संमेलनाचें अध्यक्षस्थान त्यांना यापूर्वीच द्यावयाला पाहिजे होतें, असें कित्येक विद्वानांचें मत होतें. प्रकृतीची अनुकूलता नसतांही अण्णासाहेबांनीं बेळगांवास येण्याचें कबूल केलें. अण्णांच्या वाचनाचा भर बहुतांशीं संस्कृत व इंग्रजी ग्रंथांवरच असे. या मराठी साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदीं त्यांची निवड झाली त्यावेळीं मराठींतील या थोर साहित्यभक्तानें आधुनिक मराठीचीं दहापांच पुस्तकें तरी वाचलेलीं असतील कीं नाहीं, याची वानवाच होती. तथापि याच सुमारास त्यांनीं कांहीं आधुनिक कवींचीं काव्यें, ग्रंथ व माजी संमेलनाध्यक्षांचीं भाषणें यांतील महत्त्वाचे भाग मुद्दाम वाचवून घेतले. व नंतर अध्यक्षीय भाषण लिहिण्याचा त्यांचा विचार होता.

तोंच एक विघ्न अकस्मात् उपस्थित झालें. काळपुळीचा आजार उद्भवला आणि कपाळावर पोफळाएवढें गळूं होऊन त्यामुळें ज्वर व वेदना असह्य होऊं लागल्या. अण्णांच्या वयाला यावेळीं ६५ वर्षें पुरीं व्हावयाला आलीं होतीं. त्यांत मधुमेह, त्यामुळें या आजारानें घरांतील लोकांना व मित्रमंडळींनाही चिंता वाटूं लागली. काळपुळी या नांवावरूनच त्या दुखण्याची भीषणता व त्यांतल्या ध्वनीनेंच मनाला बसणारा धक्का यांची कल्पना येण्यासारखी आहे. ह्या आजारांतील चिठी सहसा परतत नाहीं, असा डॉक्टर लोकांचाही अनुभव आहे. हें काळजीला आणखी एक कारण होतें. डॉ. सहस्रबुद्धे यांचे उपचार चालू होते. पण खरी स्थिति अशी होती कीं, औषधयोजनेचा फारसा उपयोग होण्या-

सारखा नव्हता. मधुमेहाच्या रोग्याची जखम, योग्य आहारानें व विशेष प्रकारच्या उपचारांनींच बरी होऊं शकते. यामुळें अखेर डॉक्टरांना भूल न देतां कपाळाच्या गळवावर शस्त्रक्रिया करावी लागली.

पंधरा तीनवार अत्यंत काळजीचे गेले. परंतु त्यानंतर सुदैवानें दुखण्यानें उलट खाल्ली आणि गळूं निचरून जाऊन व जखमही भरून येऊन त्याची फक्त खूण कपाळावर शिल्लक राहिली !

पण या दुखण्यांत अण्णासाहेबांना अत्यंत अशक्तता आली. आतांपर्यंत ‘ कृतांतकटकामलध्वजा ’ शिवाय बाकीचीं जरेचीं कोणतींही लक्षणें दिसत नव्हतीं, तीं आतां दिसूं लागलीं. यांतून बरे झाल्यावर अण्णासाहेबांनीं पुढल्या महिन्यांत आपल्या वाड्यांतील सर्व भाडेकऱ्यांना एक महिन्याच्या भाड्याची सूट दिली. यावरून स्वतः अण्णांनाही जिवावरचें दुखणें टळलें असें वाटत असावें. अशाही स्थितींत साहित्यसंमेलनाची तारीख जवळ येऊं लागल्यामुळें त्यांनीं भाषण लिहून काढण्याचें काम सुरू केलें होतें.

ता. २६ मे ही साहित्य-संमेलनाच्या सुरवातीची तारीख ठरली होती. परंतु हें अधिवेशन बेळगांवला भरणार हें ठरल्यापासूनच कानडी–मराठी वाद डोकें वर काढूं लागला होता. व आतां तर त्यानें चांगलेंच तीव्र स्वरूप धारण केलें. एवढेंच नव्हे तर अध्यक्ष व पाहुणे मंडळी यांच्या निषेधार्थ काळीं निशाणें दाखविलीं जाणार, बहिष्कार टाकला जाणार, इत्यादि अनेक लोकवार्ता त्यावेळीं उठत होत्या. त्यामुळें संमेलन कसें काय पार पडतें याची चालकांना मोठी चिंताच येऊन पडली होती. स्वागताध्यक्षांचे जागीं बेळगांवच्या स्वागत-मंडळानें रा. ब. अण्णा बाबाजी लठ्ठे यांची योजना केली होती. “ ता. २५ रोजीं सकाळीं नियोजित अध्यक्ष दे. भ. अण्णासाहेब परांजपे हे पाहुणे मंडळीसह बेळगांवास दाखल झाले. बुधगांव व मिरज स्टेशनांवर त्यांचा साहित्यभक्तांकडून सन्मान करण्यांत आला. कर्नाटक भागांत गोकाकपासून बेळगांव स्टेशनापर्यंत बहुतेक सर्व स्टेशनांवर अध्यक्षांच्या सन्मानार्थ पुष्पहार समर्पण करण्यांत आले व अल्पाहार देण्यांत आला. १०॥ वाजतां बेळगांवास गाडी येतांच शिवाजीमहाराज, लो. टिळक यांच्या नांवांचा

व वंदेमातरम्‌चा जयघोष झाला. प्लॅटफॉर्मवर उतरतांच स्वागताध्यक्ष रा. ब. लट्ठे यांजकडून व त्यानंतर वाङ्मय-चर्चा-मंडळ, कॉंग्रेस कमिटी, आयुर्वेद मंडळ इत्यादि अनेक संस्थांतर्फे अध्यक्षांना हार अर्पण करण्यांत आल्यावर अध्यक्ष दे. भ. परांजपे यांची जयघोषांत मोटारींतून शहरांतील प्रमुख रस्त्यांवरून मिरवणूक काढण्यांत आली. आणि वसतिस्थानाकडे अध्यक्षांची स्वारी रवाना झाली.'' याप्रमाणें स्वागत होऊन विरोधाच्या कंड्या निराधार ठरल्या. तरीपण हा कानडी-मराठी-वाद आंतून धुमसत होता व त्यावर विषय-नियामक-समितींत खडाजंगी उडालीच.

अध्यक्षांची उतरण्याची सोय इतर प्रतिनिधींबरोबरच सरदार्स हायस्कूल हॉस्टेलच्या एका प्रशस्त खोलींत केली होती. या वेळची किरातांनीं लिहिलेली आठवण देण्यासारखी आहे. त्यावेळीं किरात म्हणाले, "आपणांसाठीं स्वतंत्र रहाण्याची सोय मीं केली आहे तेव्हां आपण तिकडे रहायला चला.'' तेव्हां शिवरामपंत म्हणाले, "छे ! छे ! इथून मी आतां हलणें शक्य नाहीं. मला या खोलीकडे पाहिल्यानंतर मी जणूं डेक्कन कॉलिजच्या खोलींतच आहें असें वाटत आहे.'' इतक्या उतारवयांत सुद्धां विद्यार्थीजीवनांतला मनमुराद आनंद लुटावयाची हौस या उद्गारांत दृग्गोचर होत नाहीं काय !

अण्णासाहेबांना मधुमेहाची व्यथा असून ते नुकतेच जिवावरच्या दुखण्यांतून बरे झालेले आहेत हें जाणून बेळगांवकरांनीं त्यांची बडदास्त व पथ्य सांभाळण्याची शिकस्त केली होती. त्यांना साखर वर्ज्य म्हणून वेळेला बिन साखरेचे वीस वीस पदार्थ पानावर वाढलेले पाहून अण्णांचें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून जात असे.

रविवार ता. २६ रोजीं संमेलनाच्या खुल्या अधिवेशनाला अत्यंत उत्साहाच्या व थाटाच्या वातावरणांत सुरवात झाली. त्या दिवशीं दरवाजावर पांच हजार रुपयांची तिकीट विक्री झाली. मराठींतील बहुतेक प्रसिद्ध साहित्यिक उपस्थित होते. साऱ्या महाराष्ट्रांतून प्रतिनिधी आलेले होते. त्याचप्रमाणें खुद्द बेळगांवचे दे. भ. गंगाधरराव देशपांडे, ना. बेळवी वगैरे मंडळी हजर होती. श्रीमंत रामदुर्गकर व राजघराण्यांतील मंडळी खास निमंत्रित म्हणून आलेली होती. बरोबर २॥ वाजतां आगमन होतांच टाळ्यांच्या

कडकडाटांत श्रोतृसमाजाकडून त्यांचें स्वागत झालें. प्रथम स्वागताध्यक्ष लट्ठे यांचें भाषण झाल्यावर गंगाधरराव देशपांडे यांनीं दे. भ. परांजपे यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना मांडली व त्याला मुंबईचे पी. व्ही. काणे, प्रा. आघारकर इत्यादि मंडळींनीं अनुमोदन दिल्यावर अध्यक्षांचें भाषण झालें व त्या दिवशींचें काम संपलें. परंतु खरी खडाजंगी विषय-नियामक-समितींत कानडी-मराठी ठरावावर उडाली. एकीकडे केळकर, गंगाधरराव देशपांडे, बेळवी अशी मंडळी तर दुसऱ्या बाजूला बाकीचे साहित्यिक असा सामना जमल्यामुळें वादविवाद अटीतटीचा व चकमकीचा झाला. बडोद्याचे राजरत्न वा. वि. जोशी लिहितात, "त्यांची (अध्यक्षांची) प्रकृति नादुरुस्त असतांना देखील त्यांनीं भाषण तयार केलें आणि बखेडा उत्पन्न होणाऱ्या सभेचें कार्य नियंत्रित करण्याचें जोखमीचें काम पत्करलें हें त्यांच्या अनन्य वाङ्मय-सेवा-लोभामुळेंच होय. त्यांनीं सभेचें काम अत्यंत चातुर्यानें चालविलें यांत शंकाच नाहीं." वादाचें स्वरूप व अध्यक्षांचें चातुर्य लक्षांत येण्याकरितां 'रत्नाकरां'तील वा. वि. जोशांच्या लेखांतलाच उतारा घेऊं.

" विषयनियामक समितींत रा. नरसोपंत केळकर, बेळवी आणि देशपांडे या त्रिकुटांनीं घडविलेला एक ठराव चर्चेसाठीं रा. केळकर यांनीं पुढें मांडला. त्रिकुटांनीं म्हणण्याचें कारण एवढेंच कीं, या ठरावास खुद्द कानडीबंधूंची संमति नव्हती आणि पसंतीही पण मिळणार नाहीं असें केळकर आणि देशपांडे यांनीं स्पष्ट जाहीर केलें होतें, व स्थानिक महाराष्ट्रीयबंधु एकजात त्याविरुद्ध होते.

"रा. गंगाधरराव देशपांडे व रा. केळकर यांची लढाई जुंपेल अशी सर्वांची प्रथम कल्पना होती; परंतु स्वभावधर्म विसरून जाऊन हे दोन्ही सिंह आपापसांत न लढतां एक झाले आणि त्यांनीं साहित्यसेवकांची मात्र कुतरओढ चालविली. सभेपुढें आलेला ठराव असा होता कीं, "कानडी-मराठी वाद हा अत्यंत अनिष्ट आहे व तो मिटवावा व त्यासाठीं (१)बेळगांवजिल्हा हा कर्नाटक प्रांताचा भाग असून त्याची मुख्य भाषा कानडी समजली जावी, ( २ ) त्या भाषेस सर्वांनीं मान द्यावा, ( ३ ) कन्नड बंधूंनीं मराठीचें भ्रातृभाषा म्हणून संरक्षण करावें, ( ४ ) कर्नाटक

साहित्य–सभेनें असाच ठराव करावा. " ठराव मांडतांना रा. नरसोपंत यांनीं भाषण केलें त्यांत ' बेळवी आणि देशपांडे यांच्या आजवरच्या मदतीबद्दल कृतज्ञता दाखविण्यासाठींच हा ठराव पास करावा. हा ठराव कन्नडबंधूंना पसंत नाहींच; तरी पण आपण या दोघांच्या ( बेळवी,देशपांडे ) समाधानाकरितां पास करावा. ' असले महत्त्वाचे ( ! ) मुद्दे होते. हा ठराव पास करून घेण्यासाठीं त्यांनीं आपलें तपःसामर्थ्य खर्चीं घातलें, व लोकक्षोभाच्या वावटळीनें उडून जाणाऱ्या या अप्रस्तुत ठरावावर त्यांनीं स्वतःच्या वजनाचें पेपरवेट ठेविलें; परंतु तें फेदरवेट ठरलें आणि नरसोपंतांनीं आपलें स्वतःचें हंसें करून घेण्यापलीकडे दुसरें कांहींच साधलें नाहीं. रा. नरसोपंतांचें प्रास्ताविक भाषण संपतांच बेळगांव येथील महाराष्ट्रीय तेजस्वी पुढारी रा. दळवी वकील यांनीं हा ठराव साहित्य–संमेलनाच्या कार्यक्षेत्रांत न येतां राजकीय विषयांत मोडत असल्यानें तो नियमबाह्य आहे असा (क) हुकमतीचा मुद्दा पुढें मांडल्यावर वादास खरें तोंड लागलें. हुकमतीच्या अगर शिस्तीच्या ( point of order ) मुद्द्यावर लांब भाषण करण्याचा प्रघात नसतांही रा. गंगाधरराव यांनीं सुमारें १॥ तास भाषण केलें. त्यांतही त्यांनीं सांगितलेंच कीं, ' कन्नडबंधूंचें याही ठरावानें समाधान होणार नाहीं. भावनेचा हा प्रश्न आहे आणि हा ठराव पास न झाला तर आमच्या (त्रिकुटांच्या) भावना दुखावतील. तो साहित्य–चर्चेच्या कार्यक्षेत्रांत येत नसला आणि राजकीय विषय जरी असला तरी कायदा मोडण्यांतच जास्त श्रेय आहे, तेव्हां नियमच मोडा ! असें पोकळ, गैरलागू, धडधडीत चुकीचे मुद्दे त्यांनीं मांडले व त्याचा योग्य तोच परिणाम झाला. दुर्दैवानें जो समाज तेथें जमला होता तो भावनावश, अज्ञान असा नसल्यानें रा. केळकर अगर देशपांडे यांच्या भाषणाच्या वाढत्या वक्तृत्वाच्या समप्रमाणांत ठरावाबद्दलचा तिटकारा श्रोतृवर्गांत वाढत गेला. एका अर्थानें अध्यक्षांनीं त्यांना लांब लांब भाषणें करण्यास परवानगी दिल्यानें त्यांची लंगडी बाजू सभेपुढें उघडी पाडली, इतकेंच नव्हे तर हा राजकीय विषय साहित्य–संमेलनाच्या कार्यक्षेत्रांत कसा अप्रस्तुत आहे याबद्दल पुनः पुन्हा त्याचा खुलासा विचारून प्रतिपक्षाच्या तार्किक शक्तीस त्यांनीं

कुंठित केलें आणि त्यांच्या विवेकशून्य हटवादीपणाचें आविष्करण त्यांच्या मुखावाटे होऊं दिलें.

"केसरीकार म्हणून त्यांनी त्याच दिवशीं काढलेल्या उद्गारांशीं विसंगत असा आग्रह बेळगांवीं धरला, त्यामुळें त्यांचें वागणें दुटप्पी म्हणावें कीं दुहेरी! कानडी बंधूंना प्रिय वाटावें म्हणून हट्ट शिकस्तीनें चालविला; महाराष्ट्रीयांना प्रिय व्हावें म्हणून केसरींत त्यांची बाजू उचलून धरली; वाणींत एक लेखणींत निराळेंच, असा धडधडीत प्रकार बाहेर आला असतां कानडी अगर महाराष्ट्रीय या उभयतांच्या हिताहून श्रेष्ठ अशा महत्त्वाच्या आणि गूढ हिताच्या कल्पना, मग त्या वैयक्तिक असोत अगर राष्ट्रीय असोत, त्यांच्या मनांत घोळत नसतील ना? भावनेचाच जर हा प्रश्न होता, तर महाराष्ट्रीय जनतेच्या भावनेचें काय?...... सर्व कन्नडबंधूंचें समाधान याही ठरावानें होणार नाहीं असें त्रिकुटानें कबूल केलें. तेव्हां रा. बेळवी आणि देशपांडे यांच्या समाधानाकरितांच हा ठराव करा, असला हट्टही केळकरांनीं धरून पाहिला. त्या दोघांच्याच समाधानाची गोष्ट असेल तर त्यांनींच स्वागत-मंडळाचे अधिकारी कार्यकर्ते म्हणून गेल्या जून महिन्यांत मंजूर केलेल्या ठरावांनीं समाधान झालें असतां पुन्हा हा ठराव कशाला? त्यानंतर असें काय वर्तमान घडलें कीं, त्यामुळें पूर्वीचीं साफ मनें कलुषित झालीं? फक्त दिलसफाई हाच उद्देश असता तर पहिलें कलम गाळल्यानंतरचा ठराव योग्य असतांही आपला संबंध ठरावच परत घेतों असें म्हणण्याचेंही कारण नव्हतें."

असो. पण एकंदरींत शिवरामपंतांनीं कोणाच्या आहारीं न जातां मराठीला योग्य असाच ठराव पास करून घेतला, एवढी गोष्ट खरी. अध्यक्षांचें शेवटचें समारोपाचें भाषण अत्यंत वक्तृत्वपूर्ण व त्यांच्या नामांकित भाषणांपैकीं एक समजलें जातें. त्यासंबंधींची व एकूण बेळगांव—संमेलनाबद्दलची प्रो. श्री. नि. चाफेकर यांनीं लिहिलेली शिवरामपंतांबद्दलची आठवण दाखल करून हा विषय संपवूं. ते लिहितात: "त्यांची ही आठवण खऱ्या विद्वानाच्या शीलास साजेशी, सर्वसंग्राहक वृत्तीची व अन्यगुणलेशगौरवतत्पर साहित्यरसिक अशा

मर्मज्ञतेची द्योतक आहे. बेळगांवच्या साहित्य–संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवडणूक निश्चित झाल्यावर पुण्यांतील कित्येक वाङ्मय–व्यवसायी मंडळींना आपल्या घरीं बोलावून अध्यक्षांच्या भाषणांत कोणकोणत्या मुद्द्यांचा व विषयांचा समावेश असावा व संमेलनांत पुणें वगैरे ठिकाणच्या महाराष्ट्रीयांनीं आपलें धोरण कसें काय ठेवावें याविषयीं चर्चा केली. वादग्रस्त मुद्द्यांना प्राधान्य न देतां किंवा ( स्व ) मताभिनिवेशाच्या आहारीं न जातां सर्वांनीं खेळीमेळीचें धोरण ठेवावें असें ठरलें. बेळगांवांत कानडी–मराठी वाद अत्यंत तीव्र स्वरूपांत असल्यामुळें साहित्यसंमेलनाचें अधिवेशन कसें काय पार पडतें याची सर्वांनाच काळजी लागून राहिली होती. पण शेवटीं अध्यक्षांच्या चतुर व ऐक्य स्थापन करण्याच्या कळकळीनें केलेल्या भाषणाचा सुपरिणाम होऊन ‘ आक्रमणा ’च्या केवळ काल्पनिक भीतीनें व्याकुळ होऊन महाराष्ट्रीयांबद्दलच्या रोषाच्या दुहीच्या भुतानें पछाडलेल्या कर्नाटकी बंधूंचा ‘ संशयकल्लोळ ’ उपशम पावला व बेळगांवचें संमेलन अपूर्व उत्साहानें, उज्ज्वल यशस्वितेनें साजरें होऊन साहित्य–संमेलनाच्या इतिहासांत संस्मरणीय झालें आहे. कै. शिवरामपंतांसारख्या मराठी भाषेच्या एकनिष्ठ व अपूर्व कर्तबगारीच्या सुपुत्राचा गुणगौरव शेवटपर्यंत न केल्यामुळें सर्व महाराष्ट्रास कृतघ्नतेचा व कायमचा काळिमा लागला असता, तो या मानानें टळला ! प्रस्तुत प्रसंगींचें अध्यक्षीय भाषण आजन्म व्यासंगी विद्वानांस साजेसें व अभिनिवेशरहित आहे. जवळ येऊं घातलेल्या मृत्यूच्या पावलांची चाहूल ऐकूं येऊं लागल्यामुळेंच कीं काय, संमेलनाच्या समारोपाचें त्यांचें भाषण त्यांच्या ऐहिक जीवितरूप करुणोदात्त नाटकाचें मृदुमंजुलरूप भरतवाक्यच ठरलें. तें भाषण ऐकण्याची अपूर्व संधि ज्यांना लाभली त्यांच्या मनापुढें त्यावेळचा एकंदर देखावा उभा राहून व कै. परांजपे यांचें हृदयाला द्रवित करणारे कळकळीचे व कोमल मृदु वक्तृत्वशैलीचे करुण-मधुर नाद अजूनही कानांत घुमून राहून एक प्रकारचा अपूर्व व खेदसंमिश्र आनंद होतो. ”

---



दुखण्यांनीं आणि हारांनीं भारावलेले बे. सा. सं. चे अध्यक्ष



प्रयाण

## १६

# अतृप्त आत्म्याचें प्रयाण

"...परकीय लोकांनीं अतिशय छळल्यामुळें किती तरी आत्मे तळतळत पडलेले होते, ते या परकीय राजांच्या पातकांचे घडे भरण्याची वाट पहात होते; त्या आत्म्यांपैकीं कित्येक महापुण्यवान् होते व त्यांनीं पृथ्वीवरील आपल्या कृत्यांनीं स्वर्गलोकांतील सलोकता, सरूपता इत्यादि चारी मुक्ति प्राप्त करून घेण्याचीं योग्यता संपादन केली होती. तरीपण आपला हिंदुस्थानदेश स्वतंत्र झालेला पहावा आणि मग आपण स्वकर्मजित अशा उत्तम गतीला जावें,अशी त्यांची इच्छा होती. अशा रीतीनें ह्या आर्यभूच्या स्वातंत्र्यामध्यें त्यांचा हेतु गुंतलेला असल्यामुळें ते मुक्त झालेले असूनही अमुक्त स्थितीमध्यें हिंदुस्थानच्या भाग्योदयाची वाट पहात राहिले होते.—"

—शि. म. परांजपे

काळ—शिवाजीचें पुण्याहवाचन

साहित्य-संमेलन आटपून अण्णासाहेब पुण्यास परत आले तेव्हां ते अत्यंत उल्हसित व आनंदी वृत्तींत होते, त्यांच्या आयुष्यांत कीर्तीनें त्यांना माळ घातली होती, त्याप्रमाणेंच संसारसौख्यानेंही आपलें छत्र सदैव त्यांच्या डोक्यावर धरलेलें होतें, हें येथें सांगितलें पाहिजे. ' जगीं सर्वसूखी असा कोण आहे ? ' असें या जगांत संसाराचें वर्णन केलें आहे खरें. पण त्याला अपवाद म्हणण्याजोगा शिवरामपंतांचा संसार झाला होता यांत शंका नाहीं. आतांपर्यंत त्यांची ही प्रपंचाची बाजू फारशी सांगितली नाहीं. तिचें दिग्दर्शन थोडक्यांत कां होईना करणें अवश्य आहे. अण्णांना दोन मुलगे व एक धाकटी मुलगी. पैकीं मुलगी पुण्यांत

गांवांतल्या गांवांतच सुस्थळीं पडलेली. कृष्णाजीपंत इंग्लंडला बॅरिस्टरीच्या परीक्षेला गेले म्हणून मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. परंतु तेथें गेल्यावर पांचसहा महिन्यांतच ते आजारी पडले. हें कळतांच अण्णांनीं तार करून त्यांना परत बोलाविलें. म्हणून कृष्णाजीपंत परत येण्यास निघाले व १९२८ च्या नोव्हेंबर महिन्यांत सुखरूप घरीं येऊन पोहोंचले. तेव्हां-पासून त्यांनीं पुन्हा आपल्या वकिलीला सुरवात केली होती. कृष्णाजी-पंतांचें वय त्या सुमारास ४३ वर्षांचें असून पुण्यांतील एक नाणावलेले फौजदारी वकील म्हणून त्यांनीं लौकिक संपादन केलेला होता. १९२२ सालीं ते पुणें शहर म्युनिसिपालिटींत राष्ट्रीय पक्षातर्फें निवडूनही आलेले होते. काळावरील खटल्याचे वेळीं व मुळशी–सत्याग्रहाचे शिक्षेच्या अवधींत स्वराज्य पत्राचे संपादक म्हणून त्यांनीं पत्र चालविलें. त्याची शिवरामपंतांना मदत तर झाली होतीच पण त्यांत कृष्णाजीपंतांचीही लेखनशास्त्रांतील गति दिसून आली होती. याखेरीज 'शांतादेवी'ही कादंबरी व 'पाणिग्रहण' हें नाटक त्यांनीं लिहिलें होतें. तथापि एकंदरींत त्यांचें बहुतेक लक्ष वकिलीकडेच असे. व एका दृष्टीनें तेंच अधिक व्यवहारोपयोगी ठरलें. कारण शिवरामपंतांना द्रव्यार्जनाचा असा कांहींच उद्योग नसल्यामुळें, त्यांनीं सार्वजनिक कार्याची बाजू पाहिली, तर कृष्णाजीपंतांनीं पैशाची बाजू संभाळली. नकळत कामाची वांटणी व्हावी तसें झालें. मुलगाही खरोखरीच इतका पितृभक्त कीं, जें कांहीं आपलें आपण मिळविलेलें तें पित्याचेंच आहे अशी त्याची भावना व कृति असे. कृष्णाजीपंतांची मोटार सदैव अण्णांच्या दिमतीला दिलेली असे. दुसरे चिरंजीव विनायकराव या सुमारास सुमारें तीस वर्षांचे असून वकील झाल्यानंतर, ग्वाल्हेरला नोकरी म्हणून सहकुटुंब तिकडेच रहात होते. त्यांनाही लिहिण्याची हौस होती. पुण्यास शिवरामपंतांच्या घरांत तिन्ही पिढ्या नांदत होत्या. स्वतः शिवरामपंत व त्यांच्या पत्नी जानकीबाई, चि. कृष्णाजीपंत व त्यांचें कुटुंब; आणि शिवरामपंतांचीं नातवंडें म्हणजे कृष्णाजीपंतांचे शाळा–कॉलेजांत जाणारे दोन मुलगे व एक धाकटी मुलगी. घरांत अण्णा म्हणजे एक प्रेमळपणाची मूर्ति वाटत. पण त्यांच्याबद्दल आदरमिश्रित धाक–वचक सगळ्यांनाच वाटत असल्यामुळें लहान मुलांशिवाय त्यांच्याशीं

सलगी करण्यास कोणी धजत नसे. अण्णा लहान मुलांत खरोखरी लहान होऊनच मिसळत असत. त्यांच्या स्वतःच्या भावाबहिणींशीं त्यांची वर्तणूक व संबंध पहिल्यासारखेच कायम आणि जिव्हाळ्याचे होते. विष्णुपंत त्याचप्रमाणें कै. गणपतराव यांची मुलें, यांच्यावरील प्रेम व लक्ष अजूनपर्यंत अणुभरही ढळलें नव्हतें. पण त्यांतल्यात्यांत गोखल्यांकडे दिलेली त्यांची धाकटी बहीण वेणूताई यांचेवर त्यांचा फार लोभ पहिल्यापासून असे. वेणूताई त्यांच्या पाठच्याच. म्हणजे त्यांचेंही वय ६२।६३ वर्षांचें होतें. वेणूताई पुण्यासच रहात असल्यामुळें उभयतांचें नेहमीं जाणें येणें चालू राहून गांठीभेटी होत असत. महाडास रहाणाऱ्या विष्णुपंतांची गांठ कार्याकारणानेंच पडावयाची व शिवाय पुण्यास आले तर अण्णा फार 'मोठे' म्हणून ते दूरदूरच रहात. म्हणून लहानपणच्या गोष्टी मोकळेपणानें, समरसतेनें व आनंदानें आठवून बोलण्याचें वेणूताई हें अण्णांचें एकच ठिकाण राहिलेलें होतें.

वृद्धावस्था म्हणजे आयुष्याची संध्याकाळ असें म्हणतात. पण अण्णांना तसें वाटत नव्हतें. त्यांचें शरीर थकत चाललें होतें पण मन थकलेलें नव्हतें. तोच पूर्वीचा उत्साह आणि तीच तारुण्यांतली उभारी अजून कायम होती. ते मरायला तयार नव्हते ! तथापि त्यांच्या मनांत मृत्यूची अंधुक कल्पना मधून मधून येत असावी. मृत्यूनंतर मनुष्याची किंवा त्याच्या आत्म्याची काय स्थिति होत असावी ? हा गहन प्रश्न व त्याबद्दलची जिज्ञासा या सुमाराला त्यांच्या डोक्यांत घोळूं लागली होती व त्याबद्दलचे तर्क-वितर्क ते मनाशीं बसवीत होते. मनुष्याच्या मरणोत्तर होणाऱ्या अवस्थेसंबंधीं जुन्या संस्कृत ग्रंथांतून आलेले उल्लेख शोधून काढून त्यावर एक लेख लिहिण्याची त्यांची तयारी चाललेली होती. पण तो पुरा होण्याच्या आंतच त्यांना तिकडलें बोलावणें आलेंही !

ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस अण्णांचा कान दुखूं लागला. पण कांहीं दिवस तें किरकोळ म्हणून त्याचें कोणालाच कांहीं वाटलें नाहीं. पण कानाचा ठणका वाढत जाऊन आंत फोड झाल्याचें डॉक्टरांनीं सांगितलें. म्हणून पुण्यांतले त्यावेळचे कानाचे तज्ज्ञ डॉ. चिपळूणकर यांना दाखविलें. त्यांनीं त्याला ' मॅस्टॉयडायटिस ' म्हणतात म्हणून सांगितलें व

उपचार सुरू केले. मधुमेह असल्यामुळें पथ्य आणखी कडक करण्यांत आलें. त्यानंतर दुखण्याला थोडा उतार पडला. या शेवटच्या दुखण्यांत वेणूताई नित्य समाचाराला व बोलावसायला येत असत, त्यावेळीं त्यांच्या–अण्णांच्या बोलण्यांत घरगुती व बालपणींच्या आठवणी निघत. पण त्यांतल्यात्यांत अण्णांना आईची फार आठवण होई. अण्णा म्हणत, "वेणे, मला बातीच्या ( त्यांच्या आईच्या ) गोष्टी सांग ग." मग वेणूताईनीं आठवून आठवून जुन्या गोष्टी सांगाव्या आणि अण्णांनीं ऐकाव्या. मध्येंच अण्णा म्हणत, "वेणे, ( उच्चार किंचित् " वेण्ये ' सारखा ) मी बरा झालों, म्हणजे आपण महाडास जाऊन राहूं वरं का. तूं येशील ना ?—तुझीं मुलं तुला येऊन देतील का पण ?........तो विष्णु माझ्याशीं मोकळेपणानें बोलत नाहीं, तूंच आलं पाहिजेस महाडला...... वेणे, मला किनी महाडास जाऊन आपल्या घरांतल्या झोंपाळ्यावर बसण्याची फार इच्छा होते." आयुष्याच्या दोरीचें एक वर्तुळ आहे कीं काय, असा मनाला भास होतो ! जों जों अखेरच्या टोंकाला मनुष्य जातो, तों तों त्याला पुन्हा सुरवातीचें पहिलें टोंक दिसूं लागतें ! वृद्धापकाळीं हटकून बालपणींची आठवण होते. अण्णांना या आजारांत महाडचें त्यांचें जन्मस्थान व लहानपण गेलेलें घर, वडील, आई, घराच्या आसपासचा चिरपरिचित भूप्रदेश यांच्या आठवणी आठवून मनानें त्यांचा आस्वाद घेण्यांत आनंद व समाधान वाटत असे. बहीण–भावांच्या अशा सुखदुःखाच्या गोष्टी चालत. बरोबरीच्या व जिव्हाळ्याच्या नात्यानें वेणूताईना मोकळेपणानें बोलण्याचा परवानाच मिळाल्यासारखा होता. अण्णांच्यावरील भक्तीमुळें'काळा'चे सुरवातीपासून तों आतांपर्यंत अण्णांचे लेख मुलांकडून वाचून घेण्याचा त्यांचा प्रघात होता. अशिक्षित असल्या तरी जात्या बुद्धिमान् असल्यामुळें अण्णांच्या लेखनांतील मर्म समजण्याची वेणूताईची पात्रता होती. म्हणून कधीं कधीं अण्णांना त्या म्हणत, "अण्णा, तुम्ही अलीकडे पहिल्यासारखें लिहीत नाहीं" यावर अण्णा जरा थांबून उत्तर देत "अग मला तसं सुचत नाहीं वेणे आतां." उतरत्या वयांत प्रतिभेचेंही तारुण्य टिकत नाहीं, याची निराळ्या शब्दांत ही कबुलीच होती ! हें अण्णांचें उत्तर पाहून

डॉ. जॉन्सनच्या ‘ I have written my share ’ या वाक्याची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं.

मंगळवार ता. २४ सप्टेंबरपर्यंत अण्णांची प्रकृति ठीक होती. सगळ्यांची चिंता निवारण झाल्यासारखी झाली होती. एवढेंच नव्हे तर त्यांनीं पुन्हां लेखनालाही प्रारंभ केला होता. “ स्वतंत्रता आणि सरस्वती ह्या त्यांच्या कलेच्या दोन अधिष्ठात्र्या देवता होत्या. पारतंत्र्याचें शल्य त्यांच्या हृदयांत खोल घुसलेलें होतें. स्वतंत्रतेची त्यांना जिवंत तळमळ होती. परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें त्यांना प्रतिरुद्ध केल्यामुळें ते आपला काळ सरस्वतीच्या सेवेंत घालवीत. ‘ मयूरमंडळा ’प्रमाणें ‘ ज्ञानेश्वर-मंडळ ’ काढावें आणि त्यांत ज्ञानेश्वरीची चर्चा करावी, अशी त्यांनीं एकदोन वेळां आग्रहानें सूचना केली. त्याप्रमाणें पुढें ‘ज्ञानेश्वर मंडळ ’ निघालेंही होतें. टिळक–महाराष्ट्र–विद्यापीठानें ‘ वैदिक संशोधन मंडळ ’ काढल्यानंतर ते त्यांच्याही बैठकींना येत. रोज कोणत्याना कोणत्या तरी विषयाचा त्यांचा विचार चालू असे. अंतकालापर्यंत त्यांचें वाचनलेखन सुरू होतें. अध्ययनाचे नवीन नवीन विषय ते हातीं घेत होते. ” रिकामें बसणें हें त्यांच्या स्वभावांतच नव्हतें. या सुमाराला नुकतेंच लिहून झालेल्या ‘ पहिला पांडव ’ या नाटकांत प्रयोगदृष्ट्या कोणते फेरफार करावयास पाहिजेत यासंबंधीं महाराष्ट्र नाटक मंडळींतील नटवर्य केशवराव दाते यांचेशीं त्यांची चर्चा सुरू असे. एकीकडे रूसोच्या ‘ सोशल कॉन्ट्रॅक्ट ’चें भाषांतर सुरूच होतें. ‘ संगीत मिराबाई ’हें नवीन नाटक लिहिण्याला सुरवात करून त्याच्या प्रवेश-लेखनाचें काम चालूच होतें. ह्याचे आधींपासूनच ग्वाल्हेरचे सरदार आंग्रे यांना आपलीं मुलें पुण्यास शिकण्यास ठेवून त्यांच्यावर अण्णांची देखरेख असावी अशी फार इच्छा होती व म्हणून त्यांनीं अण्णांना त्याबद्दल आग्रह चालविला होता. व प्रकृति बरी असल्यास मी तें पत्करीन असें अण्णांनींही त्यांना अभिवचन दिलें होतें. परंतु हा सर्व मांड मांडला होता त्याची मृत्यूला पर्वा नव्हती ! मंगळवारीं संबंध दिवसभर अण्णांची प्रकृति चांगली होती. व म्हणूनच ‘ मिराबाई ’ नाटकाच्या पहिल्या अंकांतील दुसरा प्रवेश त्यांनीं लिहिला होता. पण त्याचवेळीं दुर्दैवानें

त्यांच्या जीवित–नाटकाचा अखेरचा प्रवेश लिहिण्यास सुरवात केली होती ! कारण मंगळवारीं संध्याकाळीं मोटारींतून मोकळ्या हवेवर हिंडून परत येतांना ते डॉ. चिपळूणकर यांजकडे उतरले व डॉक्टरनीं त्यांना एक इंजेक्शन दिलें. परंतु त्यानें बरें न वाटतां दुसरे दिवशीं म्हणजे बुधवार ता. २५–९–२९ रोजीं सकाळीं सात वाजल्यापासूनच त्यांना अस्वस्थता भासूं लागली व घेरी येत आहे असें वाटूं लागलें. आणखी तास दोन तासपर्यंतच शुद्धि किंवा अर्धवट शुद्धि राहिली. त्यानंतर सकाळीं १०–११ वाजतां मात्र ते पूर्णपणें बेशुद्ध झाले. तेव्हांपासून ही बेशुद्धावस्था अखेरपर्यंत कायम होती.

ही बेशुद्धि पाहिल्यानंतर मात्र घरांतील मंडळी गडबडली. लगेच डॉ. सहस्रबुद्धे व डॉ. चिपळूणकर यांस बोलावण्यात आलें. त्यांनीं ही बेशुद्धावस्था म्हणजे 'डायबेटिक् कोमा' असावा असें प्रकृति तपासल्यावर निदान केलें. पण अधिक खात्री करून घेण्याकरितां रक्त वगैरेची तपासणी ससून हॉस्पिटलमधून करून आणण्याचें ठरलें. तपासणीअंतीं साखर फार प्रमाणांत आढळून आली. मधुमेहाच्या रोग्याला त्यामुळें आलेली बेशुद्धावस्था ( कोमा ) कांहीं मर्यादेच्या पुढें गेली म्हणजे रोगी उठणें शक्य नसतें. गुरुवारीं सिव्हिल् सर्जन डॉ. शिखरे, डॉ. व्ही. सी. गोखले, डॉ व्ही. डी. फाटक, डॉ. चिपळूणकर, डॉ. सहस्रबुद्धे, डॉ. लागू इत्यादीं-नीं मिळून एकत्र खल केला व उपाययोजना केली. परंतु दुखणें असाध्य होतें, असेंच अनुभवाला आलें. गुरुवारीं संध्याकाळपासून डॉक्टर मंडळींनीं आशा सोडली. अखेरचा उपाय म्हणून त्या रात्रीं 'सलाइन् इंजेक्शन' ही देण्यांत आलें. रात्रीं २-३ वाजेपर्यंत सर्व डॉक्टर मंडळी बसून होती. परंतु इंजे-क्शनच्या इच्छित परिणामाचीं लक्षणें दिसेनात. शेवटीं ऑक्सिजनही देण्यांत आला. परंतु तो सफल उपाय न ठरतां रोग्याच्या यातना मात्र वाढविणें होय, असेंच दिसून आलें. मानवी इलाज थकले ! गुरुवारची रात्र कशीबशी निभावली. शुक्रवारचा दिवस उगवला पण त्या दिवशींचा सूर्य उगवला नाहीं. कारण आदल्या रात्रींपासूनच मुसळधार पाऊस झडत होता. ता. २७ सप्टेंबर शुक्रवार हा खराच 'दुर्दिन' होता. एका अर्थानें दोन दिवसांपूर्वी बुधवारच्या सकाळीं अण्णा बेशुद्ध झाले तेव्हांच

त्यांनीं विश्रांति घेतली होती; परंतु ( आणखी ४८ तासांनंतर ) उगवत्या शुक्रवारीं सकाळीं ७ वाजण्याचे सुमारास मागें धुगधुगी राहिलेल्या पार्थिव शरीरांतली चैतन्याची ज्योतही निघून गेली ! 'काळ पत्र चालू असतांना दर शुक्रवारीं सकाळीं त्यांच्या वाड्यांतून 'काळ' बाहेर पडत होता. पण अखेर 'काळा'नें दावा साधून शुक्रवारीं सकाळीं त्यांनाच बाहेर काढलें !' स्वातंत्र्योपासकाच्या या स्वर्गारोहणाच्या वेळीं आभाळालाही धारा लागल्या होत्या !

आदल्या दिवशींच गांवांत शिवरामपंतांच्या अत्यवस्थतेची बातमी बाहेर पसरली होती. बुधवारपासून इष्टमित्र पुढारी मंडळी समाचाराकरितां येत होती. आणि गुरुवारपासून तर शेंकडों लोकांची रीघच लागली. शुक्रवारीं पहांटेच शिवरामपंतांच्या मृत्यूची वार्ता गांवात कळून सकाळपासूनच शेंकडों हजारों लोक तुळशीबाग रस्त्यावरील त्यांच्या घराकडे अंत्यदर्शनासाठीं जमूं लागले. अण्णासाहेब भोपटकर, धोंडोपंत विद्वांस, बाबूराव गोखले, गोपाळराव देवधर, डॉ. फाटक, हरिभाऊ तुळपुळे वगैरे मंडळी सकाळीं आठ वाजल्यापासून हजर झाली. लोकांना दर्शन व्हावें म्हणून शव बाहेरच्या चौकांत ईझी-चेअरवर ठेवण्यांत आलें होतें. सकाळीं ११ वाजतां पुढें दिंड्या व मागें अलोट जनसंमर्द अशी स्मशान-यात्रा निघाली. त्यांत चाळीस पन्नास हजार लोकांनीं भाग घेतला होता. ना. गोखल्यांच्यानंतर एवढी मोठी स्मशानयात्रा पुण्यांत निघाली नव्हती. मिरवणुकीला ओंकारेश्वरावर पोचण्याला तीन तास लागले. वाटेंत शवावर ठिकठिकाणीं शालजोड्या व शेंकडों पुष्पहार मृताचा अखेरचा सन्मान करण्यासाठीं घालण्यांत येत होते. बुधवार चौकांत तर फुलवाल्यांनीं अक्षरशः फुलांचा पाऊस पाडला. मृताला सन्मान दर्शविण्याकरितां प्रत्येकाला टोपी काढण्याविषयीं सांगण्यांत येत होतें. व ग्लोब सिनेमासमोर मिरवणूक असतां, गर्दीचा बंदोबस्त ठेवण्याकरितां कांहीं सार्जंट हिंडत होते, त्यांनाही जमावानें टोप्या काढणें भाग पाडलें !

* सकाळीं ८ वाजल्यापासून तुळशीबागेजवळील त्यांच्या घराकडे त्यांच्या अंत्यदर्शनासाठीं प्रचंड लोकसमुदाय लोटूं लागला. ज्ञानप्रकाशनें जादा अंक काढून प्रेतयात्रा ११ वाजतां निघेल असें जाहीर केलें.

*केसरी सप्टेंबर १९२९.

११ वाजतां प्रेतयात्रा निघाली ती शनीचा पार, मार्केट-टिळक-पुतळा, ग्लोब सिनेमा, बुधवार चौक, नाना वाडा, अण्णासाहेब पटवर्धनांचा वाडा, शनिवार मारुति या रस्त्यानें ओंकारेश्वराकडे गेली. मिरवणुकी-पुढें ह. भ. प. केशवराव देशमुख यांच्या भजनी मंडळीचें भजन चालू होतें. दोनतीन ठिकाणीं मिरवणुकीचा फोटोही घेण्यांत आला. मिरवणूक दुपारीं २ वाजण्याच्या सुमारास ओंकारेश्वरावर पोंचली. हरिभाऊ तुळपुळे, बाबुराव गोखले, वस्ताद गुलाम दस्तगीर, गोपाळराव देवधर, अण्णासाहेब भोपटकर, काशिनाथबुवा पाशाणकर यांची दे. भ. अण्णासाहेबांच्या गुणवर्णनपर भाषणें होऊन अग्निसंस्कारानंतर मंडळी दुःखित अंतःकरणानें परतली.

हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें यथासांग क्रिया करण्यांत आली. अस्थि म्हणजे मानवी शरीराचे आधारस्तंभ. पण चैतन्य निघून गेल्यावर त्यांना भावनेचेंच महत्त्व उरत असतें. मागें उरलेल्या अस्थिही नाशकास गंगेंत विसर्जन करण्यांत आल्या ! आटोपला ग्रंथ ! !

या दहा बारा दिवसांत शेंकडों दुखवट्याचीं तारा—पत्रें आलीं. प्रत्येक खरें राष्ट्रीय अंतःकरण हळहळलें. महाराष्ट्रभर ठिकठिकाणीं शोकप्रदर्शनार्थ सभा झाल्या, दुखवट्याचे ठराव झाले, भाषणें झालीं. फोटो, मृत्युलेख प्रसिद्ध झाले. पण सावरकरांची रत्नागिरीहून तार आली—

**शिवरामपंत गेले; पण ‘काळकर्ते’ जिवंत आहेत !**

शिवरामपंतांच्या दहाव्या दिवशीं पिंडाला काकस्पर्श झाला नाहीं. टिळकांच्यालाही झाला नाहीं, ही गोष्ट नमूद आहे. आपल्या शास्त्रांत अतृप्त राहिलेले आत्मे आणि काकस्पर्श न होणें या दोहोंमध्यें कार्यकारणसंबंध कल्पिलेला आहे. तो खरा असला, तर या दोघांच्याही अतृप्त आत्म्यांची तृप्तता कशानें आणि केव्हां होईल, हें या दोन राष्ट्रसेवकांची स्वातंत्र्याची तळमळ माहीत असणाऱ्यांना न सांगतांही समजण्यासारखें आहे !

---

REFBK-0006611